१८१६

म. ग्रं. सं. ठाणें

विषय काव्य

सं. क्र. २३६४

REFBK-0022449

REFBK-0022449

R. NO. ७

र. नंबर ७

अनंत बाबुराव परांजपे
इंजिनीयर
गोरेगांवकर बिल्डिंग नं. २
गिरगांव
मुंबई

REFBK-0022449

REFBK-0022449

श्रीः

कविवर्य

## मोरोपंतांचे समग्र ग्रंथ

७

# अष्टोत्तरशत रामायणें

[१]

संपादक व प्रकाशक

रामकृष्ण दत्तात्रेय पराडकर

मुद्रक

अच्युत चिंतामण भट

यशवंत

छापखाना, पुणें

शक १८३८ सन १९१६

२३६७
२२०

हें पुस्तक **अच्युत चिंतामणि भट** यानीं पुणें येथें आपल्या '**यशवंत**'
छापखान्यांत छापिलें व **रामकृष्ण दत्तात्रेय पराडकर** यानीं
'**धि प्रिंटिंग एजन्सी**,' ४५६ बुधवार, पुणें येथे प्रसिद्ध केलें.

श्रीः

# प्रस्तावना

शिरावरील कार्याचा भार जसजसा कमी होत जातो, तसतसा मनाला अधिकाधिक विसावा वाटणें व म्हणून च आनंद होणें हा मनुष्याचा धर्म आहे. ईश्वरी कृपेच्या व महाराष्ट्रीय साहाय्याच्या भरंवशावर आम्हीं मोरोपंतांचे समग्र काव्यग्रंथ यथावत् प्रसिद्ध करण्याच्या कामाला हात घातला. हा आमचा भरंवसा केवळ गैरवाजवी नव्हता असे समाधानाचे उद्गार काढण्याचा सुयोग या तिसऱ्या हप्त्याचे हि वेळीं येत असल्याबद्दल आम्ही स्वतःस मोठे भाग्यवान समजतों. महाराष्ट्राच्या सद्यःस्थितींत ग्रंथव्यवसाय हा केव्हां हि मोठा धनोत्पादक व्यवसाय होण्याची भलती च आशा कोणीं धरूं नये व आम्हीं हि तशी धरिलेली नाहीं. ग्रंथव्यवसायानें सोन्याचे लंगर घडवून घरांत ठेवितां आले नाहींत तरी व्यवसायकाच्या अपरिहार्य गरजा भागल्या व सावकाराचे अपशब्द सहन करण्याचा फारसा प्रसंग आला नाहीं म्हणजे पुष्कळ झालें. पण इतका हि सदनुभव या व्यवसायांत क्वचित च कोणाच्या वांट्यास येत असेल. आम्हीं या कार्यास हात घातला तेव्हां च हा मार्ग म्हणजे तेल माखलेला मुंबईतील चौपाटीचा रस्ता नव्हे हें लक्षांत ठेविलें होतें. तथापि कैलासाच्या अत्यंत कठिण यात्रेंत हि यात्रेकरूंचे हाल कमी करण्याकरितां स्वतः हाल सोशीत उभे असलेले उदार महात्मे जर आढळतात तर ग्रंथव्यवसायाच्या कंटकमार्गांत हि वाट चालताना पायांत कांटे मोडतील तेव्हां कोणी तरी सुहृज्जन हातांत सहानुभूतीचें नाचकण घेऊन उभे असलेले आढळतील च असा आम्हांस भरंवसा होता, व या च भरंवशाच्या जोरावर आम्हीं आजपर्यंतचें मार्गक्रमण केलें आहे; या च भरंवशाच्या जोरावर महायुद्धामुळें झालेल्या खडतर परिस्थितींत हि धीर न सोडतां आम्हीं आपलें काम पूर्ववत् चालू ठेवून तिसऱ्या हप्त्यापर्यंत मजल गांठली आहे. आतां एक च हप्ता राहिला; यांत पंतांचीं सर्वोत्कृष्ट स्फुट काव्यें प्रसिद्ध होतील व मग च आम्ही आमच्या प्रिय वाचकांचा अखेरचा निरोप घेऊं. प्रस्तुत कार्यांत द्रव्यसाहाय्याची किती हि अपेक्षा असली तरी तें मिळ-

विण्याचा यत्न पुढें सवडीप्रमाणें करूं असें म्हणून आम्हीं आरभीं आपली सर्व शक्ति ग्रंथांचें अंतर्बाह्यांग निर्दोष, उपयुक्त व मनोहर करण्याकडे च लाविली आहे. तथापि अगदीं अडलें च म्हणजे कांहीं तरी हातपाय हलवावयाचे अशा-रीतीनें या हि बाबतींत जे प्रयत्न केले त्यांचें पर्यवसान ज्या त्या वेळीं वाचकां-च्या निदर्शनास आणिलें च आहे. दुसऱ्या हप्त्यानंतर ज्यानीं–जवळ जवळ स्वयं-प्रेरणेनें म्हटलें तरी चालेल–द्रव्यसाहाय्य केलें आहे त्यांचे प्रथम आभार मानिले पाहिजेत. हे साहाय्यकर्ते म्हणजे जमखंडी संस्थानचे अधिपति **श्रीमंत सर परशु-रामराव भाऊसाहेब** हे होत. श्रीमंताना आम्हीं जी विनंति केली ती केवळ निमित्तमात्र झाली इतक्या अगत्यानें त्यानीं तिसऱ्या हप्त्याच्या *कामीं अल्प मदत म्हणून पांचशें रुपयांची भेट दिली. याचप्रमाणें इचलकरंजी संस्थानच्या अधिपतींनीं हि योग्य मदत करण्याचें अभिवचन दिलें आहे. या उभय संस्था-निकांजवळ आश्रय मागण्याचा आमचा हक्क च आहे असें आम्ही म्हणतों; कारण, या दोन्ही संस्थानिकांच्या पूर्वजानीं पंतांच्या मागें त्यांच्या पुत्रपौत्रांस थोडीं तरी पण कायमचीं उत्पन्नें दिलेलीं आहेत. अर्थात् पंतांच्या काव्यग्रंथप्रकाश-नाच्या कामीं मदत करण्यानें त्यानीं आपल्या पूर्वापर वहिवाटीचें च पालन केल्या-सारखें होत आहे. केवळ सामान्य लोकांच्या ग्राहकत्वावर प्रस्तुतसारखे वाङ्मय-महायज्ञ निर्विघ्नपणें पार पडण्याचा संभव सध्यां तरी नाहीं हें पूर्वी दिग्दर्शित केलें च आहे. समग्र ग्रंथ ज्या स्वरूपांत आम्ही प्रसिद्ध करीत आहों त्या स्वरूपांत प्रसिद्ध करून केवळ १५ रुपयांत देण्यास परवडणें हें जेव्हां ही योजना केली त्या शांततेच्या काळांत हि शक्य नव्हतें च; तथापि सर्वसाधारण ग्राहकाना याहून अधिक किंमत झेंपणें हि शक्य नसल्यामुळें पंधरा रुपयांहून अधिक किंमत ठेवण्याचा विचार त्या हि वेळीं आमचे मनांत आला नाहीं, व सध्यांच्या स्थितींत पूर्वीच्या मानानें जरी महदंतर पडलें आहे तरी या हि वेळीं येत नाहीं. यास कारण आमच्या अनेक अंतर्गत साहाय्यकांची निरपेक्ष पण निरलस साहाय्य करण्याची प्रशंसनीय तयारी हें च होय. सुदैवानें आम्हांस आपल्या घरचीं भाजीभाकरी खाऊन आमचें टाकलें काम करणारी मित्रमंडळी लाभली म्हणून च आमचा निभाव लागला हें आम्ही अगदीं कृतज्ञ मनानें कबूल करितों. या मित्रमंडळींच्या आधारावर च मुख्य काम सोडून द्रव्यसाहाय्य मिळ-

विण्यासाठीं भटकत हिंडण्याची वेळ आम्हांला अद्यापि आली नाहीं. तथापि पुढील मार्ग बरा च कठिण आहे. आम्ही छापण्याच्या सोयीसाठीं समग्र ग्रंथांचे जसे चार हप्ते केले तसे च व्यवहारसौकर्यासाठीं एकंदर किंमतीचे हि ६, ४, ४, व १ असे चार हप्ते केले. परंतु ग्रंथांचे हप्ते जसे जवळजवळ सारखे पडले तसे किंमतीचे मात्र आम्हांस पाडितां आले नाहींत. याचें कारण असें कीं, मागें दर्शविल्याप्रमाणें समग्र ग्रंथांसाठीं लागणारा द्रव्यनिधि केवळ ग्राहकांकडून गोळा होणें असंभवनीय असल्यामुळें व अगदीं आरंभाला च लक्ष्मीवंतांच्या औदार्याची अपेक्षा करणें हि वेडेपणाचें असल्यामुळें पहिल्या पहिल्या हप्त्यांवर अधिक आकारणी करून अडचणीचें तात्पुरतें निवारण करणें आम्हांस भाग पडलें. "अमुक अमुक काम आम्ही आरंभणार आहों; त्याला अमुक इतकें द्रव्य लागणार आहे" असें म्हणून केलेल्या याचनेपेक्षां "अमुक एक काम इतकें महत्त्वाचें आहे; तें इतकें उरकलें आहे; इतकें उरकावयाचें आहे; या कामीं आपणाला शक्य असेल ती मदत करा" अशी याचना केली तर ती फलदायक होण्याचा संभव विशेष असतो या भावनेनें च मूळारंभाला श्रीमंतांचे उंबरठे आम्हीं झिजविले नाहींत. आतां तीन हिस्से काम करून दाखविलें असल्यामुळें यापुढें एका च हिश्शासाठीं आम्हांला येणारी द्रव्याची अडचण दूर होण्यास हरकत पडणार नाहीं अशी आम्हांस आशा वाटते; असो.

शेवटीं, प्रस्तुत हप्त्याचे कामीं कोणाकोणाचें कसेंकसें साहाय्य झालें आहे तें कळवून वाचकांचा निरोप घेऊं. रा. रा. दत्तात्रेय केशव जोशी व महादेव केशव जोशी या पंतभक्त सहोदरानीं 'आम्हांस पंतांची कांहीं सेवा करावयाची आहे' असें म्हणून आग्रहानें मागून घेऊन बऱ्या च रामायणांवर टीपा दिल्या आहेत. रा. रा. दत्तात्रेय शिवराम पुसाळकर, वकील, एरंडोल, यानीं हि बऱ्या च रामायणांवरील टीपा तयार केल्या. काव्यसंग्रहकारानीं सोडून दिलेलीं कित्येक स्थळें या त्रिवर्गानीं सोडविलीं आहेत. वे. शा. सं. रंगाचार्य रड्डी यांचें नांव विद्वज्जनांत महशूर आहे. हे जुन्या पद्धतीचे संस्कृत पंडित असले तरी मोरोपंतांविषयींचा यांचा आदर वाखाणण्याजोगा आहे. यानीं शंकानिवारणाच्या कामीं महत्त्वाची मदत केली असून साररामायणावरील बहुतेक टीपा यांच्या हातच्या आहेत. दंडकरामायणावरील टीपांचें काम आमचे या कामांतील अगदीं

आरंभापासूनचे साहाय्यकर्ते मित्र काव्यालंकारभूषण बाळाचार्य खुपेरकर यानीं केलें आहे. पुष्कळ अप्रसिद्ध रामायणांत क्लिष्ट स्थळीं पूर्वप्रयत्नांचा कांहीं च आयता फायदा न मिळाल्यामुळें जीं स्थळें अजीवात राहून गेलीं असतीं अशीं हि अनेक स्थळें आमचे चुलते तीं० काशीनाथ व्यंकटेश उर्फ भय्यासाहेब पंत यानीं सोडविलीं आहेत. तीं० भय्यासाहेब यांच्या स्वतःच्या विद्याव्यासंगामुळें दुसऱ्या हप्त्याचे वेळीं त्यांची मदत मुळीं च होऊं शकली नाहीं; तथापि ती उणीव त्यानीं तिसऱ्या हप्त्याच्या व अगदीं अडचणीच्या वेळीं येऊन भरून काढिली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. काव्य हा विषय च असा आहे कीं, या विषयांत विचारविनिमयाला जितकी अधिक तज्ज्ञ मंडळी भेटतील तितका त्याचा अधिक आस्वाद घेतां येतो व वाचकाना हि देतां येतो. या दृष्टीनें रा. रा. दत्तात्रेय वामन पोतदार बी. ए., पांडुरंग मार्तंड चांदोरकर, बळवंत बाबूराव कुलकर्णी, विष्णु मोरेश्वर पंत पराडकर, 'यशवंत' छापखान्याचे व्यवस्थापक रा. बा० भा० जोशी इत्यादि मंडळींची बुद्धि व श्रम यांचें विशेष महत्त्व आहे. संस्कृत खंडाच्या कामीं उपयोगीं पडलेल्या मित्रवर्गाचा निर्देश तेथें केला च आहे. रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर यांचेविषयीं मात्र आम्हांस कांहीं लिहावयाचें नाहीं. कारण, प्रस्तुत आवृत्तीच्या योजनेचें बीजारोपण करणाऱ्यांपैकीं ते एक आहेत. अशा गृहस्थानीं अत्यंत भानगडीचे प्रश्न असलेल्या अष्टोत्तरशत रामायणांच्या हप्त्याला उपोद्घात लिहिला असला तरी त्यांत नवल काय? असो. ज्यानीं ज्यानीं आजपर्यंत कायावाचामनोभावें मदत करून आमच्याकडून हें कार्य चालविलें आहे त्यानीं च तें सिद्धीस हि न्यावें म्हणून साधुवर्य तुकारामबोवांच्या सुप्रसिद्ध अभंगांत थोडासा पाठभेद करून आम्ही असें म्हणतों कीं,

**आपुलिया बळें नाहीं बोलवत; । सखे जे बहुत, वाचा त्यांची. ॥**

**—संपादक**

श्रीः

# उपोद्धात

[ लेखकः -न. चिं. केळकर, बी. ए., एल्एल्. बी. ]

**'घोर कलींत मयूर हि गाववुनि स्वयश धन्य केला हो!'**

रा. रा. रामकृष्ण दत्तात्रेय पराडकर हे प्रकाशित करित असलेल्या मोरोपंत-समग्रकाव्यग्रंथांचा हा तिसरा हप्ता वाचकांच्या हातांत देताना आम्हांस फार आनंद वाटतो. या हप्त्यांत पंतांचीं "अष्टोत्तरशत" रामायणें व संस्कृत कविता इतका संग्रह केला आहे. "अष्टोत्तरशत" हा शब्द अवतरणांकित करण्याचें कारण असें कीं, "श्रीरामायण गाइलें तरि पुन्हा गावें चि ऐसें करीं" या पंतांच्या प्रार्थनागर्भ सदिच्छेप्रमाणें त्यांच्या उपास्य देवतेनें त्यांच्या तोंडून अष्टोत्तरशतदां स्वकथा गावविली असली तरी पंतानीं गाइलेलीं रामायणाचीं कांहीं आवर्तनें दुर्दैवानें काळाच्या उदरांत तूर्त तरी गडप झालीं असल्यामुळें 'अष्टोत्तरशत' या विशेषणाला मोरोपंती रामायणांच्या बाबतींत संख्यावाचकत्वा-पेक्षां पारिभाषिकत्व च अधिक आलेलें आहे. पंतांच्या मागें त्यांच्या वंशजानीं आपल्या घरांतील लक्ष्मीहून हि पंतकवितासरस्वतीला च अधिक आस्थेनें सांभा-ळिली आहे; किंबहुना या सरस्वतीला च ते लक्ष्मी समजत आल्यामुळें पंतांच्या हातची बहुतेक कविता आज पहावयास सांपडत आहे. असें असतां पंतानीं भक्तिभावानें आपल्या रामप्रभूच्या चरणीं वाहिलेली रामायणपुष्पमाला खंडित कशी झाली, केव्हां झाली, कोणी केली, तां पुनः अखंडित होणें शक्य आहे काय, अशी प्रश्नपरंपरा कोणा हि उत्साही वाचकाच्या मनांत उद्भवणें अगदीं साह-जिक आहे.

प्रस्तुत हप्त्याचे एकंदर तीन खंड असून तिसरा खंड केवळ संस्कृत कवितेचा आहे. पहिल्या ( सर्वानुक्रमानें सातव्या ) खंडांत २९, दुसऱ्या ( सर्वानु-क्रमानें आठव्या ) खंडांत ५८, व तिसऱ्या ( सर्वानुक्रमानें नवव्या ) खंडांत ३ याप्रमाणें तिन्ही खंडांत मिळून ९० रामायणें संग्रहित केलीं आहेत. यांपैकीं 'त्रुटित'

म्हणून जें रामायण छापलें आहे तें बहुधा स्वतंत्र म्हणून गणण्यास योग्य नसण्याचा हि संभव आहे. म्हणजे अष्टोत्तरशतसंख्येपैकीं ९० किंवा ८९ रामायणांचा निकाल लागला. बाकीच्या १८।१९ रामायणांची वाट काय? या प्रश्नाचें उत्तर पूर्वीच्या कागदपत्रांतून काय मिळतें तें शोधलें पाहिजे. पंतांच्या दप्तरांत च –त्यांच्या हातची नव्हे पण अत्यंत जुनी अशी–एक यादी आहे; या यादींत पंतांचे सर्व ग्रंथ व बहुतेक सर्व प्रकरणें नमूद केलेलीं आहेत. या यादीचा अष्टोत्तरशत रामायणांच्या प्रश्नाच्या बाबतींत किती उपयोग आहे हें पुढें कळून येईल च. दुसऱ्या तीनचार याद्या चातुर्मास्यांच्या दप्तरांत आहेत; यांपैकीं एक 'श्रीमयूरेश्वरकृत ग्रंथसंख्या स्मरणार्थ' म्हणून लिहिली आहे. दुसरी 'याद पुस्तकें पंढरीत ठेविलीं त्याचे स्मरणार्थ तपसील' अशी असून तिसरीचा मथळा 'याद तस्कराचा उपद्रव होउनि गेली ते' असा आहे. चवथी याद मात्र चातुर्मास्यांच्या दप्तरांत असली तरी ती चातुर्मास्यानीं केलेली नसून 'यादि मैराळ गोसावी यांजकडे रामायणें' कोणकोणतीं पाठविलीं तें दर्शविण्याकरितां पंतांकडून आलेली आहे. तथापि ती पंतलिखित नसून पंतांचा ज्येष्ठ पुत्र रघुनाथ यानें तिचा कांहीं भाग लिहिलेला असावा असा रा. पराडकर यांचा तर्क आहे. या सर्व याद्या व जुन्या पत्रव्यवहारांतील कांहीं किरकोळ उल्लेख एवढ्या साधनांवर च अष्टोत्तरशत रामायणांच्या प्रश्नाचा उलगडा होईल तेवढा करावयाचा आहे. वर 'याद तस्कराचा उपद्रव होउनि गेली तें' म्हणून जिचा उल्लेख केला आहे त्या यादींत नमूद असलेल्या पोथ्यांपैकीं कांहीं पुनः प्राप्त झाल्या असून त्याचें द्योतक चिह्न म्हणून यादींतील नांवापूर्वीच्या १ या आंकड्याच्या मागें अथवा पुढें अथवा मागेंपुढें हि एक टिंब किंवा तिरपी रेघ दिली असल्याचें दिसून येतें. या यादींत केवळ पंतांचीं च काव्यें आहेत असें नसून ज्ञानेश्वरीपदबोधिनी, अमृतानुभव, भक्तमाला नाभाजीकृत, विठ्ठलभाष्य संस्कृत असे इतरांचे हि कांहीं ग्रंथ आहेत. या च यादींत पंतांच्या रामायणांपैकीं "मंत्ररामायण सप्तकांड आर्या, मुद्गररामायण, हररमणीय, सद्भक्तिसर्वस्व, मंजु, धन्य, रम्य, मधु, पुण्य, रत्न, धीर, शुद्ध, धर्म, हृद्य, पूत," इतक्या रामायणांचा क्रमानें उल्लेख आहे. यांपैकीं मंत्र, हररमणीय व सद्भक्तिसर्वस्व या रामायणांच्या मूळ प्रती जेथल्या तेथें सुरक्षित असल्यामुळें नष्ट झाल्या त्या चातुर्मास्यांच्या च नकला असल्या पाहिजेत

ही गोष्ट उघड आहे. बाकीच्या रामायणांपैकीं मंजुरामायणाची नक्कल चातुर्मास्यांच्या दप्तरांत मागाहून समाविष्ट केलेली असून पूर्वी सांगितल्याप्रमाणें ती संपादन केल्याची खूण यादींतील नांवाच्या मागें केलेली आहे. या प्रतीचा लेखक कोणी यादव असून तो या रामायणास 'मंजु' ऐवजीं 'रामायणछंद' या नांवानें च विशेष लेखतो असें दिसतें; असो. मंजुनंतर च या यादींत उल्लेखिलेल्या व आठव्या खंडाच्या अखेरीस छापलेल्या धन्यनामक रामायणाची नक्कल तर अगदीं नवीन च मिळालेली आहे. या यादींतील अगदीं अखेरचें रामायण जें 'पूत' त्याच्या एकशेंपासष्ट श्लोकांपैकीं आरंभापासून १३९॥ श्लोक असलेलीं पत्रें गहाळ झालेलीं आहेत. यावरून तस्कराच्या उपद्रवामध्यें विष्णुसहस्रनाम-रामायणांच्या अखेरच्या दुंड्या पत्रापासून (पत्रांक १७२) पूतरामायणाच्या १३९॥ श्लोकापर्यंतचीं (पत्रांक २०७) जीं छत्तीस पत्रें गहाळ झालेलीं आहेत त्यांमध्यें च वरील रामायणें होतीं हें उघड आहे. पूतरामायणापुढील संयुक्त पोथींतील जीं पत्रें उपलब्ध आहेत त्यांपैकीं कांहीं फाटलेलीं आहेत, व हें तस्करोपद्रवाचें च चिन्ह असावें असा आमचा समज आहे. 'यादि मैराळ गोसावी यांजकडे रामायणें' या यादींत हि उपलब्धानुपलब्धत्वद्योतक पूर्वोक्त चिह्नें नांवामागें दिलेलीं असून तीं चातुर्मास्यांकडे यादी आल्यावर च दिलेलीं दिसतात. या यादींत आरंभीं गुरु ते सद्रत्न (पत्रांक २८ ते ७१) पर्यंत तेरा, पुढें शिव ते स्तोत्ररामायणाअखेर (पत्रांक ११४ ते १७३) तेवीस, त्यापुढें परंतु (पत्रें सुमार ७) मंत्रगर्भ (पत्रें सुमार ७) हीं दोन स्वतंत्र लिहिलेलीं व दाम, आणि मूळ संयुक्त पोथींतील पत्रांक ५ ते ७ वर लिहिलेलें पुष्पिताग्रा ऊर्फ रामायणकल्पलता अशीं चार रामायणें लिहिलेलीं आहेत. यापुढें पत्रांक ७२ ते ११३ वरील पृथ्वी ते सद्गर्भपर्यंतचीं १४ रामायणें—म्हणजे जीं वास्तविक सद्रत्नाचे पुढें नमूद असतीं तर क्रमानें २८ ते १७३ पत्रांवरील रामायणें लिहिल्यासारखें झालें असतें तीं—लिहिलीं आहेत. सद्गर्भापुढें 'मुद्र' रामायण लिहिलें असून 'मुद्र' पुढें १३ ते १४ पत्रांवरील हररमणीय व २० ते २५ पत्रांवरील सद्भक्तसर्वस्व अशीं दोन रामायणें नमूद केलीं आहेत. पुढें मंजु ते मंचपर्यंतचीं चौदा रामायणें उपरोक्त क्रमानें लिहिल्यावर याद पुरी झाली आहे.

ह्या आंकडेमोडीचा रुक्ष विस्तार म्हणजे कांहीं केवळ टोणग्याचे आंचळ

च नाहींत हें थोड्या विचारांतीं वाचकांच्या लक्षांत येईल. चातुर्मास्येबुवांच्याकडे पंतकाव्यांच्या पोथ्या तयार होतां च क्रमानें जात असत व त्यांची प्रत ही च पंतकाव्यांची पहिली नक्कल असा जो अर्धवट समज प्रचलित आहे तो यथार्थ नाहीं हें या आंकडेमोडीवरून दिसून येईल. प्रस्तुत यादी ही वेळोवेळीं करून ठेविलेल्या चिठ्ठ्यांचें संकलित स्वरूप असल्यामुळें च जरी या यादींत मूळ अविभक्त पोथींतील २८ ते १७३ पत्रांतील सर्व रामायणें समाविष्ट झालीं आहेत, तरी तीं क्रमानें नसून निरनिराळ्या चिठ्ठ्या कोणत्या हि क्रमानें या यादींत एकत्र ग्रथित केलेल्या आहेत. एकदां गहाळ झालेल्या 'मंजु' रामायणाची नक्कल तत्कालीन चातुर्मास्यांना प्राप्त झाली व सांप्रत हि रा. रा. वि. ल. भावे यांच्यासारख्या काव्यसंशोधकांच्या हातीं धन्यरामायणाची नक्कल लागते, यावरून हि वरील विधानास पुष्टि मिळते इतकें च नव्हे, तर चातुर्मास्यांच्याकडे पाठविल्यावर नष्ट झालेल्या अखेरच्या रामायणांची तत्पूर्वी कोणी तरी अन्य पंतभक्तानें नक्कल केलेली असावी, व पुढेंमागें सुदैवानें ती उपलब्ध होऊन आरंभीं म्हटल्याप्रमाणें रामायणांच्या बाबतींतील 'अष्टोत्तरशत' या विशेषणाचें आजचें केवळ पारिभाषिकत्व जाऊन त्याला आपलें संख्यावाचकत्व पुन्हा लाभण्याचा हि संभव आहे.

येथपर्यंत लिहिलेल्या मजकुरावर व केलेल्या विधानांवर आरंभीं निर्दिष्ट केलेल्या जुन्या यादीनें चांगला च प्रकाश पडत असल्यामुळें आतां तिचा विचार करूं. निरनिराळ्या प्रतींत व निरनिराळ्या याद्यांत एका च रामायणाला निरनिराळीं नांवें दिलेलीं आहेत. मंजुरामायणाला 'रामायणछंद' म्हणून संबोधिल्याचा उल्लेख मागें आला च आहे. तस्करोपद्रवोत्तरकालीन यादींत ज्याला 'मुद्रव' असे म्हटलें आहे त्याला च मैराळ गोसावी यांजकडे पाठविलेल्या यादींत 'मुद्र' व या तिसऱ्या यादींत 'मुद' असें म्हटलेलें आहे. 'छंदोरामायण' हें पंतांचें नांव नसताना सार अथवा वृत्तरत्नमय रामायणाला तद्भावसूचक असें हें दुसरें नांव दिलेलें याद्यांतून आढळतें. प्रहर्षण म्हणून जे नवीन रामायण छापिलेलें आहे त्याला च 'हर्ष' असें या जुन्या यादींत नांव दिलेलें असतां 'हर्ष' म्हणून स्वतंत्र रामायण रा. पांगारकर यांनीं गणिलें आहे. "रामायण अभंग उर्फ सीतागीत" याला "ओव्यारामायण" असें म्हटलें आहे; तथापि काव्य-

संग्रहकारानीं किंवा रा. पांगारकरानीं ज्याला या नांवानें संबोधिलें आहे तें वास्तविक रामायण च नसून आर्याओवीबद्ध असें एक रामस्तोत्र आहे; व तसें च एक दुसरें हि आर्यानुष्टुप्स्तोत्र उपलब्ध झालें आहे. कोल्हापुरचे पंतभक्त दाजीबा पुजारी यानीं या स्तोत्राला रामायण मानण्यांत प्रथम चूक केल्यामुळें वरील उभय विद्वानाना या बाबतींत फारसा दोष देतां येत नाहीं. 'चषक' म्हणून १२५ पद्यांचें एक रामायण या जुन्या यादींत नमूद आहे; तथापि शिवमान्य रामनामाचा महिमा ज्यांत गाइला आहे असा एक चषक पंतानीं रचिला असून त्याच्या मूळ पोथींत ६० वा क्रमांक द्विरावृत्त झाल्यामुळें अखेरचा आंकडा १२६ ऐवजीं १२५ झाला आहे; व आम्हांला वाटतें, प्रस्तुत यादीच्या लेखकानें ज्या अर्थीं चषकाची संख्या १२५ च दिली आहे त्या अर्थीं तो चषक म्हणजे हा च असला पाहिजे; व याला तर रामायणांत मुळीं च गणतां येणार नाहीं, असा यांतील वर्णित विषय आहे. शिवाय अन्य कोणत्या हि यादींत ज्या अर्थीं याचा उल्लेख नाहीं त्या अर्थीं चषक म्हणून दुसरें एकादें रामायण पंतानीं रचिलें असेल असें आम्हांस वाटत नाहीं. प्रस्तुत रामायणें छापताना ज्याप्रमाणें स्वतंत्र पोथ्या असलेलीं कांहीं आरंभीं, मध्यें अविभक्त पोथींतील व अखेरीस पुन्हां विभक्त पोथ्या असलेलीं कांहीं असें झालें आहे, त्याप्रमाणें या यादींतील क्रम हि थोडासा चमत्कारिक आहे. संयुक्त पोथींतील नजरचुकीनें राहिलेल्या रामायणांपैकीं, कविप्रिय, विचित्र, एकश्लोकी, सत्त्व व काशी हीं अगदीं अखेरीस दिलीं आहेत. मंजुरामायण मात्र संयुक्त पोथीच्या सुरुवातीच्या म्हणजे मत्तमयूररामायणाच्या पूर्वीं दिलें आहे. या यादींत क्रमानें सत्त्वरामायण असावयाच्या जागीं 'रामायणाष्टक' नामक एका अनुपलब्ध कृतीचा उल्लेख आहे. तसें च विष्णुसहस्रनामानंतरच्या रामायणांत 'रामप्रार्थना'नामक ५० पद्यांचें एक अनुपलब्ध रामायण नमूद केलें आहे. रा० पांगारकरानीं रामप्रार्थनारामायण म्हणून ज्याचा उल्लेख केला आहे त्याचें खरें नांव 'श्रीरामचारितभारितरामचंद्रप्रार्थना' असें आहे, तें यादींत स्वतंत्र नमूद आहे व त्याची पद्यसंख्या हि भिन्न म्हणजे ४० आहे. शिवाय रा. पांगारकरानीं अष्टोत्तरशत रामायणांची जी वेगळी यादी दिली आहे तिच्यांत तर 'रामप्रार्थना ऊर्फ रामायणाष्टक' म्हणून एक च नांव दिल्यानें तान परस्पर भिन्न नांवाना एके ठिकाणीं संक्षेपरूप दिल्यासारखें च झालें आहे! रम्यमंत्र आणि रम्य अशीं दोन

भिन्न नांवें असून पहिल्याची संख्या उपसंहाराचे श्लोक वजा करितां ९१ आहे व दुसऱ्याची १७१ म्हणून प्रस्तुत जुन्या यादींत दिलेली असून तें चातुर्मास्यांकडील प्रमाणभूत याद्यांतून हि निर्दिष्ट आहे. रा. पांगारकर यांच्या गणनेंत रम्यमंत्र व रम्य अशीं दोन रामायणें धरलीं गेलीं नाहींत. या यादींतील चषक या नांवाविषयीं जरी आम्हीं आपला अभिप्राय प्रतिकूल दर्शविला आहे तरी या यादीला आम्ही विशेष प्रमाणार्ह असें च समजतों. याचें कारण असें कीं, तस्करोपद्रवांत नष्ट झालेल्या रामायणांची हि पद्यसंख्या ज्या अर्थी या यादींत दिलेली आहे त्या अर्थी ही याद लिहिली जाईपर्यंत तीं रामायणें हयात होतीं व या यादीच्या लेखकानें पाहिलेलीं होतीं, यांत शंका नाहीं. संयुक्त पोथींतील मधलीं एकंदर छत्तीस पत्रें गहाळ झालेलीं आहेत हें मागें सांगितलें च आहे. पंतांच्या लेखनमर्यादेचा सरसकट विचार केला तर प्रत्येक पत्रावर ३२ आर्या किंवा आर्याचरणाच्या च तोलाचे ६४ चरण याप्रमाणें ११५२ आर्या किंवा २३०४ चरण इतका मजकूर या गहाळ पत्रांवर लिहिलेला असला पाहिजे असें म्हणावें लागतें, व सर्व याद्यांचा साकल्यानें विचार करतां हि मुद (पद्यसंख्या ९६), निरोष्ठ (६६), मंजु (७०), धन्य (११८), रम्य (१७१), रामप्रार्थना (५०), शुद्ध (१०९), रत्न (५१), मधु (८१), पुण्य (१५९), दाम (९१), धीर (५३), धर्म (५३), हृद्य (७८), आणि पूत (१६५-पैकीं अखेरचे सुमारें २५।२६ श्लोक उपलब्ध) इतकीं रामायणें मिळून इतका च मजकूर भरतो. यांपैकीं निरोष्ठ, मंजु व दाम यांच्या साद्यन्त नकला उपलब्ध आहेत. दाम व निरोष्ठ यांचा तस्करोपद्रवोत्तरकालीन यादींत उल्लेख नसला तरी त्यांचें स्थान हें च असावें असें जुन्या यादीवरून वाटतें. धन्यरामायणाच्या मधल्या च ४५ ते ८७ आर्या नसलेली अर्धवट नक्कल व पूतरामायणाच्या अखेरच्या सुमारें २५।२६ श्लोकांचें मूळ हातीं लागलें आहे, यावरून मागें एकदां म्हटल्याप्रमाणें आम्हांस असा भरंवसा वाटतो कीं, या रामायणांच्या मूळ प्रती चातुर्मास्यांकडे जाण्यापूर्वीं झालेली त्यांची एकादी तरी नक्कल कोठें अंधारांत पडून राहिलेली असावी व इतिहाससंशोधकांच्या प्रयत्नानें तिला सूर्यदर्शन घडण्याची अद्यापि हि आशा आहे, ती सफल झाल्यास सर्व पंतभक्ताना आनंद होईल च; पण पंतांचे समग्र ग्रंथ प्रकाशित करण्याचें ओझें स्वयंप्रेरणेनें शिरावर घेणारे त्यांचे वंशज

हे तर अत्यंत आनंदानें तीं सर्व रामायणें छापून ग्राहकांच्या व वाचकांच्या ऋणांतून मोकळे होतील.

आतां खुद्द पंतांच्या दृष्टीनें विचार केला तर असा प्रश्न सुचतो कीं, त्यांच्या हयातींत हीं रामायणें नष्ट झालीं असतील काय? अष्टोत्तरशत रामायणांच्या कृतसंकल्पांतून आपण केव्हां एकदाचे मुक्त होतो अशी तात पंतांच्या जीवाला अखेरीस लागली होती, असें त्यांच्या च एका पत्रांतील "भारतांतील सुद्धां लहान-मोठी यादी पाठवावी. अष्टोत्तरशतसंख्या जाहली पाहिजे" या उद्गारावरून व्यक्त होतें. असें असतां आपण निश्चयानें कडेला लाविलेलीं रामायणें शेवटीं नष्ट झालीं हें ऐकून पंतांच्या जीवाला परमदुःख झाल्याशिवाय राहतें काय? एकेका प्रकरणाच्या प्रसंगविशेषीं दोनदोन तीनतीन देखील प्रती आपल्या हातानें खरडणाऱ्या पंतांसारख्या फर्ड्या लेखकाला नष्ट रामायणांच्या नकला पुन्हां मिळवून त्यांच्या प्रती करणें अशक्य होतें असें म्हणवत नाहीं. इतकें च काय पण नकलांच्या अभावीं हि त्यानीं तें काम केलें असतें याविषयीं सुद्धां कोणास संशय येणार नाहीं. वार्धक्यामुळें स्वतः पुन्हां लिहिण्याची दगदग सोसली नसती तरी दुसऱ्याकडून लिहविण्याविषयीं हि पंतानीं आळस केला असता असें वाटत नाहीं. मग काय ही रामायणांची रडकथा ऐकण्यास पंत त्या वेळीं इहलोकीं नव्हते असें म्हणावें? होय, आम्हांस तरी असें च वाटतें. निदान इतकें खरें कीं, रामायणांवरील ही आपत्ति दूर करण्यास आवश्यक इतकी फुरसत न मिळतां च पंत स्वर्गवासी झाले असावेत.

याप्रमाणें नष्ट झालेलीं रामायणें हुडकून काढलीं तरी अष्टोत्तरशतसंख्येची भरती झाली च असें म्हणतां येत नाहीं. अद्यापि हि अज्ञात अशीं कांहीं नांवें असावींत. येथें रा. पांगारकर यानीं आपल्या मोरोपंतचरित्रांत दिलेली यादी पुन्हां विचारांत घ्यावी लागते. कारण, पांगारकरांच्या यादींत पंत व चातुमास्ये यांच्या दप्तरांतील कोणत्या हि यादींत न दिसून येणारीं अशीं कांहीं नांवें आहेत त्यांचा विचार केला पाहिजे. त्या यादींतील पहिलें च नांव जें 'अद्भुत' त्याच्याविषयीं ज्यांच्या द्वारें तें नांव प्रथम लोकांपुढें आलें त्या काव्यसंग्रहकारांचें हि अनुकूल मत दिसत नाहीं, व कोणा हि पंतवाचकाचें त्यानीं नमुन्यादाखल दिलेलीं पद्यें वाचल्यावर तसें च मत होईल. केवळ आपणास १०८

नांवांची भरती करावयाची आहे म्हणून घाई करण्याचें कारण नाहीं. "एकपदी रामायण हें मला चातुर्मास्ये बुवांच्या घरीं सांपडलें. हें रामायणांच्या पोथ्यांत दिलें नव्हतें; तथापि हें रामायण आहे असें खास वाटतें" असें रा. पांगारकर म्हणतात. पण केवळ वाटण्याचा किंवा खास वाटण्याचा हि सत्यशोधनाच्या कामीं फारसा उपयोग नाहीं. भरतीसाठीं च जर याला रामायण म्हणावयाचें असेल तर अशा च प्रकारचें एक संस्कृत पद संस्कृत खंडांत छापलें आहे (पृष्ठ ३९३ पहा) त्याला हि रामायणांत च गणावें लागेल. 'हूं' 'कडव्याचें' हीं जीं दोन नांवें पांगारकरांच्या यादींत आहेत तीं, पंतांचे ज्येष्ठ पुत्र राघोपंत नाना यांस सुप्रसिद्ध महिपतिबावाचे चिरंजीव विठोबा ताहराबादकर, यानीं पाठविलेल्या एका पत्रांतील "थोर दशम व हू रामायण, दोहा रामायण व कडव्याचें रामायण हे ग्रंथ बारामतीस लेखक असेल त्यापासून लिहून कार्तिकीस पाठवावे. रुपये पाठवून देऊं हे विनंति" या मजकुरांतून घेतलेलीं आहेत; परंतु पंतांच्या हयातींतील कोणत्या हि कागदपत्रांत किंवा पंत व चातुर्मास्ये या उभयतांच्या दप्तरांतील याद्यांत या नांवांचा निर्देश नाहीं. शिवाय कृष्णविजयाचें लाक्षणिक नांव जें 'वृहद्दशम' त्याची हि लक्षणा ज्याप्रमाणें या पत्रांत 'थोर दशम' अशी केली आहे तसा च प्रकार 'कडव्याचें' या नांवाचे बाबतींत असला पाहिजे. 'कडव्याचें' असें मूळ नांव असण्याचा मुळीं च संभव नाहीं. कारण, कडव्याचें हें च नांव खरें मानले तर तें उपसंहाराच्या श्लोकांत किंवा 'इति श्री' इ. समाप्तिवाक्यांत पंताच्या पद्धतीप्रमाणें गोंवतां येणें शक्य आहे काय? तसें च 'हूं' या नांवासंबंधानें हि आम्हांला असें वाटतें कीं, पंतानीं 'सु' नामक जीं दोन रामायणें रचिलीं आहेत त्यांच्यापैकीं एकाद्याच्या बाबतींत झालेला हा श्रवणभ्रम किंवा अक्षरभ्रम असावा. 'पुत्र' म्हणून जें नांव आहे तें देखील कोणीतरी मायेच्या 'पूता'नें 'पूत' रामायणाला च दिलें असावें. अशा च रीतीनें 'दाम, दंडक, मंत्री, सत्स्व' यांऐवजीं अनुक्रमें 'दास, दिंडी, मंत्रा, सत्व' अशीं भ्रष्ट रूपें अन्यत्र उद्धारिलीं व लिहिलीं गेलीं असलीं पाहिजेत. अशीं च 'सद्गीत व श्लोकबद्ध' हीं आणखी दोन नांवें आहेत. पैकीं श्लोकबद्ध हें नांव तर साफ चुकीचें आहे. कारण, श्लोकबद्ध म्हणजे काय? पंतांच्या कितीतरी रामायणांना हें नांव पूर्ण यथार्थत्वानें लावितां येईल. पंत ज्याला 'रामायणअभंग'

म्हणतात त्याला च जसे लोक ‘सीतागीत’ म्हणू लागले तसें च कोणी ‘सद्गीत’ हि म्हटलें असेल. रा. पांगारकर यानीं अष्टोत्तरशत रामायणांची जुळणी करून दाखविण्याच्या बाबतींत प्रथमपासून च चिकित्सेला फांटा दिला आहे, त्यामुळें त्यांच्या दृष्टीला १०८ हून हि अधिक नांवांचा वेळोवेळीं भास झाला. त्यानीं आपला चरित्रग्रंथ प्रसिद्ध करण्यापूर्वीं सहा वर्षें म्हणजे सन १९०२ सालीं ता. १७।६ च्या केसरीच्या अंकांत ‘मोरोपंती रामायणें’ या मथळ्याखालीं एक पत्र प्रसिद्ध केलें असून त्यांत १०८ रामायणांची ‘मुक्र’ अशी यादी दिलेली आहे. ही मुक्र यादी देईपर्यंत हि रा. पांगारकर दहा स्तोत्ररामायणें मिळून एक च रामायण असें सिद्ध करीत होते. अर्थात् संख्यापूर्तीसाठीं ‘छंदो, वृत्तरत्न व सार’ हीं एका च रामायणाची वाचक असलेलीं तीन नांवें तीन वेगवेगळीं रामायणें म्हणून त्या यादींत दिलीं आहेत व असा च प्रकार ‘अभंग व सीतागीत’ ‘पुष्पिताग्रा व कल्पलता’ ‘कथासुधा व विद्युन्माला’ या रामायणांच्या हि बाबतींत झाला असल्यामुळें पर्याय नांवें हि स्वतंत्र रामायणें च समजून तीन रामायणांचीं सहा रामायणें केलीं आहेत! पंतांच्या अनुज्ञेप्रमाणें भारतादि अन्य प्रसंगीं गाइलीं गेलेलीं रामायणें हिं इष्ट संख्येंत समाविष्ट करणें जरूर आहे व दहा स्तोत्ररामायणांला मिळून एक मानल्यामुळें पडणारी तूट भरून काढण्यासाठीं रा. पांगारकरानीं त्या वेळच्या आपल्या यादींत तीं जमेकडे धरलेलीं आहेत; तरी हरिवंशान्तर्गत धरावयाचें तें त्या हि वेळीं धरलेलें नाहीं च. परंतु स्तोत्ररामायणांच्या बाबतींत झालेली चूक मूळ पोथी न पाहिलेल्या काव्यसंग्रहकारानीं च त्यांच्या लक्षांत आणिल्यानंतर कांहीं नांवें खर्चीं घातल्याशिवाय रा. पांगारकराना गत्यंतर च नव्हतें म्हणून त्यानीं फेरतपासणी करून पुनः मुक्र केलेल्या आपल्या चरित्रग्रंथांतील यादींत नामभेदामुळें द्विरावृत्त झालेलीं कांहीं रामायणें काढून टाकलीं, त्याबरोबर च भारतादि प्रसंगींच्या रामायणांस हि फांटा मिळाला! कारण, स्तोत्ररामायणांची चूक दुरुस्त केली तरी हि रा. पांगारकर यांचे जवळ नांवांची भरती कांहीं कमी होती असें नाहीं! म्हणून मोरोपंतचरित्र पृष्ठ ४४२ वरील टीपेंत पंतांच्या अनुज्ञेप्रमाणें अवश्य धरावयास पाहिजे असलेलीं रामायणें हि “पाहिजे तर जमेस धरावींत! पण ही दांतकोरणी केल्याशिवाय हि इष्ट संख्या भरते आहे.” असें त्यानीं म्हटलें आहे! स्वतः पंत म्हण-

तात, ‘ अमुक अमुक रामायणें जमेस धरावीं; त्याशिवाय इष्ट संख्या भरणार नाहीं;’ पण त्यांचे चरित्रकार रा. पांगारकर म्हणतात, ‘ ही दांतकोरणी कशाला ? ही केल्याशिवाय हि इष्ट संख्या भरते आहे.’ अशा प्रकारचें या वादाचें स्वरूप आहे! सीतागीत ऊर्फ अभंगरामायण याला हि वरील ठिकाणीं रा. पांगारकर दांतकोरणींत च लेखतात; परंतु त्या च ग्रंथांत २५० पानें मागें गेलें म्हणजे ‘ अष्टोत्तरशत रामायणें ’ म्हणून जी स्वतंत्र यादी त्यानीं दिली आहे तीमध्यें मात्र सीतागीताची दांतकोरणी केल्याशिवाय त्यांचें हि पोट भरलेलें दिसून येत नाहीं.

असो. रा. पांगारकर यानीं पंतांच्या बाबतींत बजावलेली सेवा आम्हांस सर्वथा मान्य असून हि त्यांच्या यादीची आम्हीं इतकी कसून छाननी केली याचा अर्थ, पंतांच्या अष्टोत्तरशत रामायणांची जुळणी कोणीं करून दिली तर ती आम्हांस नको आहे असें नाहीं. परंतु ती कशीतरी करून दाखवून भागत नाहीं. सर्व कागदपत्रांचें सूक्ष्म पर्यालोचन करून व सर्व शंकांचें समाधान करून ती करून दाखविली पाहिजे. येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून अष्टोत्तरशत रामायणांच्या प्रश्नाचें वास्तविक स्वरूप कशा प्रकारचें आहे हें वाचकांच्या लक्षांत येईल. थोडक्यांत सागावयाचें म्हणजे आमच्या मतें प्रस्तुत हप्त्यांत छापलेलीं ९० किंवा ८९, पंताच्या अनुज्ञेप्रमाणें धरावयास पाहिजे असलेलीं भारतांतर्गत ( वन. अ.१० ते १२ ) हरिवंशांतर्गत (अ. ११०-२०), भागवतांतर्गत ( नवमस्कंद १४३–१६६) व अवतारमालांतर्गत हीं चार, तस्करोपद्रवांत नष्ट झालेल्यांपैकीं व अनुपलब्ध अशीं ११ मिळून १०५ किंवा १०४ रामायणांच्या नांवांचा सप्रमाण शोध लागतो. आणखी तीनचार नांवांसंबंधीं मात्र आजघटकेला कांहीं उलगडा करतां येत नाहीं. तथापि तो पुढेंमागें करतां येईल अशी अजून हि आशा वाटते. कारण, पंतांचा ज्येष्ठ पुत्र रघुनाथ व कनिष्ठ पुत्र रामकृष्ण यांचें नीटसें पटत नव्हतें असें मोरोपंतांचें चरित्र पृ. ९७ वरील टीपेंत रामकृष्णपंतानें राघूनानास लिहिलेल्या पत्रांतील उद्धृत केलेल्या वाक्यावरून स्पष्ट होतें. पंतांच्या पाठीमागें वर्ष दोन वर्षांत हे उभयता बंधू विभक्त झाल्याचा हि दाखला मिळतो. अशा स्थितींत बारामती सोडण्याची वेळ येऊन रामकृष्णपंत पंढरपुरास आपल्या सासुरवाडीच्या छायेखालीं जाण्याचा संभव दिसूं लागल्यामुळें, व रघुनाथानें हि रामकृष्णाबरोबर पंढरपुरास जाऊन आपल्या

भावाच्या सासुरवाडीच्या वर्चस्वाखालीं राहणें, भावाभावांतील बिघडलेल्या संबंधांच्या दृष्टीनें अधिक च कठिण असल्यामुळें रघुनाथ आपल्या परिवारासह उज्जयनीस गेला असावा असा आमचा सामान्य तर्क आहे. या रामायणांच्या कागदपत्रांतून रघुनाथाचें च नांव डोकावत आहे, व जरी या सहोदरानीं पंतांच्या कवितेची हि वांटणी करून घेण्याइतकी तीव्र भाउबंदकी साधलेली सुदैवानें दिसून येत नाहीं, तरी रघुनाथाबरोबर एकंदरीनें पंतांच्या कवितेविषयीं कांहीं अधिक लिहितां बोलतां येईल अशा प्रकारचे थोडे हि कागदपत्र गेले नसतील च असें म्हणवत नाहीं. उलट उज्जयनीकडे पंतांच्या हातचे कांहीं कागदपत्र असल्याचा च बोभाटा सांप्रत कानीं येऊं लागला आहे हें वाचकानीं लक्षांत ठेवावें.

---

## उत्तरार्ध

येथपर्यंत अष्टोत्तरशत रामायणांच्या नांवांसंबंधीं व उपलब्धानुपलब्धत्वासंबंधीं आम्हीं आपली माहिती व विचार सांगितले. अर्थात् ही माहिती प्रस्तुत आवृत्तीच्या प्रकाशकानीं जी साधनसामग्री आमचेपुढें आणून ठेविली तिच्या आधारावर च आम्हीं दिली आहे हें सांगावयास नको च. मोरोपंती रामायणांसंबंधींचा प्रश्न सुकर सुटला असा जो कांहीं काळ भास झाला तो मात्र केवळ भास होता यांत संशय नाहीं. तीनचार नांवांच्या बाबतींत तरी इतिहाससंशोधकांच्या व चिकित्सकांच्या प्रयत्नास अद्यापि वाव राहिला आहे हें कबूल करण्यांत आम्हांस मुळीं च संकोच वाटत नाहीं. विशेषतः ऐतिहासिक चर्चेच्या कामीं भाबडेपणा जितका निरुपयोगी तितका च आग्रह हि दूषणीय होय असें आमचें मत आहे; असो. आतां पंतानीं रचून ठेविलेल्या अष्टोत्तरशत रामायणांकडे वाचकानीं कोणत्या दृष्टीनें पहावें, मुख्यत्वेंकरून पंतानीं कोणत्या दृष्टीनें हा उद्योग आरंभिला व मग तो सिद्धीस नेताना आपलें बुद्धिवैभव कसकसें प्रकट केलें, तसें च त्या बुद्धिवैभवाचा आपणांस काय उपयोग आहे किंवा करून घेतां येईल वगैरे प्रश्नांचा विचार करूं. रामायण हें एक च; तें एक वेळ गाइलें काय आणि एकशेंआठ वेळां गाइलें काय त्याचें कधीं अनेकवचन होऊं शकत नाहीं. मग पंतानीं जो हा अष्टोत्तरशत रामायणांचा व्याप केला तो केवळ व्यर्थ होय

असें म्हणावयाचें कीं काय ? छे! असें तर मुळीं च म्हणतां येणार नाहीं. भगवद्भक्ति किंवा रामसेवा हें च ज्याचें अव्यभिचारी ध्येय त्या कवीनें आपला सारा जन्म त्या ध्येयाचे पायीं वेंचला यांत कांहीं च तत्त्व नाहीं काय? आपल्यापुढें कोणीं कोणतें ध्येय ठेवावें हा प्रश्न एकमत होण्याजोगा नसेल; किंवा निरनिराळ्या परिस्थितीप्रमाणें या प्रश्नाचीं निरनिराळीं उत्तरें हि संभवतील. तथापि कायावाचामनेंकरून जें ध्येय आपण एकदां अंगीकृत केलें त्या ध्येयाला आमरण चिकटून राहणें व त्यांत च जीवितसाफल्य मानणें या चिकाटीला व दृढनिश्चयाला कांहीं किंमत नाहीं, असें केव्हां हि म्हणतां यावयाचें नाहीं. मोरोपंतानीं एकशें-आठ रामायणें रचिलीं यांत त्यांची लोकोत्तर रामभक्ति तर व्यक्त होत च आहे; पण रा. रा. अच्युत बळवंत कोल्हटकर यानीं आपल्या "मराठी काव्याची प्रभात" या विचारपरिप्लुत लेखांत म्हटल्याप्रमाणें "मोरोपंतानें एकशेंआठ रामायणें रचिलीं ह्याबद्दल मोरोपंताची वाटेल तितकी टवाळी करा; तथापि प्रचंड रामकथेंत निरनिराळे व्यूह रचून त्या व्यूहांतून एकशेंआठ वेळां वाट काढण्याची हिंमत त्याचे अंगीं होती ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे." (प्रभात जुलै १९१५ चा अंक पहा). मोरोपंतांच्या हातून मराठी भाषेच्या उद्धाराचें जें कार्य झालें तें अनिच्छितः झालें असें आम्हांस वाटत नाहीं. पंतानीं भगवंताच्या गुणगायनाची आपली आवड व मराठी भाषेच्या उद्धाराची त्यांस वाटत असलेली तळमळ यांचा जाणूनबुजून मिलाफ केला होता असा आमचा तर्क आहे. केवळ भगवंताच्या च गुणाचें गायन करावयाचें असतें तर तत्कालीन लोकापवाद सहन करून प्राकृत भाषेंत च काव्यविरचना करण्याचा आग्रह धरण्याचें त्याना कारण नव्हतें. पंतांची संस्कृत कविता मराठी कवितेइतकी प्रतिभायुक्त दिसत नाहीं याचें कारण तरी आमच्या मतें हें च असावें कीं, संस्कृतमध्यें कविता करण्याचा त्यांना मनापासून कंटाळा असला पाहिजे. हें जर खरें, तर पंतानीं संस्कृतमध्यें सुमारें पांच हजार म्हणजे कांहीं अगदीं च थोडी कविता रचिली आहे असें नाहीं, अशी शंका येथें घेतां येण्यासारखी आहे; परंतु या शंकेचें निरसन करणें हि मोठें अवघड आहे अशांतला भाग नाहीं. सुप्रसिद्ध धर्मसिंधुकार बाबा पाध्ये यांच्यासारख्या पंतांच्या आप्तमित्रांचीं इच्छा पंतानीं संस्कृत च कविता करावी अशी होती, असें मानण्यास जागा आहे. व म्हणून च बाबा वगैरे संस्कृता-

भिमानी पंडितांच्या आग्रहावरून पंत जी संस्कृत कविता रचित असत, ती अवलोकनासाठीं व शोधनासाठीं प्रथमतः बाबा पाध्यांकडे पाठवित असत, असें पत्रव्यवहारावरून दिसून येतें. अवलोकनांत आलेल्या पंतांच्या संस्कृत कवितेवरून बाबासारख्या केवळ संस्कृत पंडिताची हि समजूत पंत संस्कृतमध्यें च मनापासून कविता करूं लागले तर अधिक उच्च पदवीला पोहोंचतील इतकें च नव्हे, तर त्यानीं आपल्या विद्येचा खऱ्या लोकहिताकडे विनियोग केला असें होईल अशी होती, व म्हणून च संस्कृतमध्यें कविता करूं लागण्याचें टुमणें त्यानीं एकसारखें पंतांचे मागें लाविलें होतें. पंतांच्या वाणींतून जी काय गीर्वाणवाणी बाहेर पडली तिचें कारण हें च मित्रमंडळींचें टुमणें होय. एकदां तर बाबा पाध्यानीं पंताना पुढीलप्रमाणें निकराचें पत्र धाडलें. “आम्हां सर्व सुहृज्जनांस इच्छा झाली ऐशी जे. आजपासून प्राकृत काव्याची लेखणी ठेवावी च. संस्कृत दहा सहस्रपर्यंत काव्य आपलें व्हावें. दों दों सहस्रांत एक एक काव्य ऐशीं पंचकाव्यें आपलीं च असावीं. रघुवंशादि पंचकाव्यांच्या जातीनें च सर्गादि रचना धरून करावीं. शोधनटीकादि आपल्या पुण्यप्रतापें कोणी हि करील. ही विनंति चित्तीं ठेवावी.” परंतु या आग्रहाला बळी न पडतां पंतानीं मराठी भाषेवरील आपलें प्रेम अचल ठेविलें, याबद्दल मराठीच्या अभिमान्यानीं त्यांचे उपकार च मानले पाहिजेत. पंतांच्या मराठीवरील निरतिशय प्रेमामुळें व बाबांच्या पंतांवरील निरतिशय प्रेमामुळें अखेर बाबांच्या संस्कृतप्रेमानें थोडी माघार घेतली, व मग च मराठी भाषेविषयींची बाबांची अढी कांहींशी ढिली झाली, असें त्यानीं “रुक्मिणीपत्रिका” नांवाचें एक आर्याबद्ध मराठी काव्य रचिलें असून त्याच्या समाप्तिवाक्यांत “श्रीमदार्याचार्यमयूरेश्वरशिक्षित” असें उपपद आपल्या नांवामागें लाविलें आहे, यावरून वाटतें.

अशा प्रकारच्या मराठी भाषेच्या अभिमानी कवीनें रचिलेल्या एकशेंआठ रामायणांचा मराठी वाङ्मयाला कांहीं च उपयोग होणार नाहीं काय? संस्कृत वाङ्मय हा अगाध महोदधि असून त्यामध्यें हजारों वर्षांपासून हजारों पंडितानीं मनसोक्त क्रीडा केली आहे. संस्कृत वाङ्मयांत भाषेची जितकी कसरत केलेली दिसून येते, तितकी अन्यत्र दिसून येणार नाहीं, व आमच्या मतें ही च उणीव भरून काढण्याचें धोरण अष्टोत्तरशत रामायणें रचिताना पंतानीं

ठेविलें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. चित्रकाव्यें हीं बहुधा कृत्रिम व म्हणून च रसालंकारहीन असल्यामुळें अधमकाव्यांत गणतात. साहित्यशास्त्रकारांचें हें मत गैरवाजवी आहे असें तर केव्हां हि म्हणतां येणार नाहीं; तथापि साहित्यशास्त्रकारांच्या ह्या नियमाला अपवादक अशीं हि चित्रकाव्यें असूं शकतात असें आढळण्यांत येतें. शिवाय साहित्यशास्त्रकारांच्या दृष्टीनें अधम अशा काव्यांचा हि एका दृष्टीनें कांहीं उपयोग असतो. कोणतें हि कथानक एक अथवा अनेक विशिष्ट बंधनांखालीं व्यवस्थित रीतीनें कथन करून दाखविण्यानें भाषेची कमावणी होते, शब्दसंग्रह व कल्पनासंग्रह यांची वाढ होते, व एकंदरीनें कवीच्या काव्यविरचनाशक्तीची हि बरी च कसोटी लागते. अशा कसोटीस पंतांचीं अष्टोत्तरशत रामायणें कितपत उतरतात या च दृष्टीनें आम्ही त्यांच्याकडे पाहतों. यावरून साहित्यशास्त्रकारानीं अधम ठरविलेल्या काव्याना उत्तमांत ओढण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहों असा गैरसमज करून घेण्याचें कारण नाहीं. तथापि आमचें म्हणणें इतकें च कीं, चित्रकाव्याना अधम काव्यांत लेखावें हें टीकाकारांना च कळतें, आणि स्वतः कवीला कळत नाहीं असें म्हणावयाचें काय? विशेषतः साहित्यशास्त्रनिष्णात असलेल्या पंतांसारख्या महाकवीला चित्रकाव्यांसंबंधींचें हें मत अपरिचित होतें असें तर मुळीं च म्हणतां येणार नाहीं. पंतानीं मराठींत जशीं चित्रकाव्यें रचिलीं तशीं संस्कृतांत रचणारे महाकवि हि आहेत. मग प्रश्न असा उद्भवतो कीं, उत्तम रचना करितां येत असून हि जाणूनबुजून अधम रचना करण्याचा खटाटोप या संस्कृत वा प्राकृत कवीनीं कां करावा? याचें उत्तर असें कीं, निसर्गतः निरोगी प्रकृति असलेल्या मनुष्याला च तालमींत जाऊन आपलें शरीर अधिक घटविण्याची लहर येणें जसें स्वाभाविक, तसें च उत्तमकाव्यरचना करितां येत असतां हि चित्रकाव्यांसारखीं अधम काव्यें रचून आपल्या बुद्धीला चार वळसे देण्याची कोणा हि कवीस लहर येणें स्वाभाविक आहे. सुप्रसिद्ध लक्ष्मीसहस्राच्या कर्त्याला हि अशी लहर येऊन त्यानें चित्रकाव्याचा म्हणून एक स्वतंत्र स्तवक रचिला आहे. पंतांच्या बाबतींत तर त्याना कांहीं तरी चित्रकाव्यें रचण्याची लहर आली होती, असें हि म्हणतां येत नाहीं. नाहीं म्हणावयास केवळ चित्रकाव्यरचना करण्याचा हेतु त्यांच्या 'अम्लानपंकजमाला' या संस्कृत स्तोत्रांत प्राधान्येंकरून व्यक्त होतो.

तसा, लक्षणानें चित्रकाव्यांच्या सदरांत पडणाऱ्या त्यांच्या मंत्रबद्ध व नामबद्ध रामायणांत दिसून येत नाहीं. हीं रामायणें लक्षणानें चित्रकाव्यें असलीं तरी तीं चित्रकाव्यें म्हणून पंतानीं रचिलीं नाहींत. हीं रामायणें रचताना चित्रकाव्यांच्या बाबतींत येणाऱ्या लौकिक दोषापेक्षां पंतानीं आपल्या भक्तिप्रधान अंतःकरणाला रुचणाऱ्या देवदेवता, तीर्थक्षेत्रें, संतमहंत, यांच्या नामोच्चारणलालसेला च अधिक महत्त्व दिलेलें दिसून येतें.

याशिवाय हि या प्रश्नाला आणखी एक बाजू संभवते. ती अशी कीं, पंतांच्या वेळीं सार्वत्रिक अभिरुचि च अशा काव्याना अधिक प्रोत्साहक असावी. शब्द-चमत्काराकडे च तत्कालीन जाणत्या लोकांचा विशेष ओढा असावा. अजून हि साठपाऊणशें वर्षें वयाचे जुन्या पद्धतीचे पंतांचे कांहीं भक्त भेटले तर, पंत हे साक्षात् व्यास, वाल्मीकि किंबहुना गणपति यांचा अवतार च होते अशा रीतीनें अगदीं गहिंवरून त्यांचा महिमा गाताना दिसतात. पंतांच्या मोठेपणाची साक्ष पटविण्याकरितां हे लोक एकदम आर्याभारताकडे किंवा केकावलीकडे अथवा उत्तमोत्तम स्फुट प्रकरणांकडे कधीं हि बोट दाखवावयाचे नाहींत. तर पंतांच्या कवितेंत कोठें जीं ओढाताणीचीं व क्लिष्ट स्थळें असतील तीं किंवा रामायणादि प्रसंगीं जेथें चित्रकाव्यकुशलतेची पंतानीं शिकस्त केली असेल अशीं स्थळें हुडकून, 'लावा पाहूं या कवितांचा अर्थ?' 'पहा पंतानीं कशी व्यासवाल्मीकींवर ताण केली आहे ती!' अशा रीतीनें नवीनाना अडवूं पाहतात असा अनुभव येतो. या च अभिरुचीचा प्रभाव पुढें असा झाला कीं, पंतानीं मंत्ररामायणाच्या उत्तर-कांडामध्यें रामरक्षेंतील चार श्लोक साधलेले कळतां च सर्व रामरक्षा साधल्याचा बोभाटा आजतागाइत चालत आला आहे. उत्तरकांडांत आपण काय शब्द-चमत्कार केला आहे हें पंतानीं निराळ्या (तांबड्या) शाईचा उपयोग करून स्पष्ट केलें असल्यामुळें त्या बाबतींत आतां संशयाला जागा उरली नाहीं. शब्दचम-त्कारगौरवाचें एक असो. पण कांहीं तरी चमत्कारांचीं कृत्यें केल्याशिवाय कोणी भगवद्भक्त किंवा साधु च असूं शकत नाहीं अशा समजुतीनें च कीं काय राजाराम प्रासादी यानें पंतांनंतर चाळीस वर्षांनीं लिहिलेल्या आपल्या "भक्त-मंजरीमाला" नामक ग्रंथांत वर्णिलेल्या मोरोपंतांच्या ओवीबद्ध चरित्रांत, तसे हि कांहीं चमत्कार पंतांच्या माथीं मारिले आहेत; असो. सांगण्याचा हेतु हा

कीं, पंतानीं केली आहे तशी चित्रकाव्यरचना आवडणारा च पक्ष त्या वेळीं प्रबळ होता. तसा तो प्रबळ नसता व उलट पंतांच्या या चित्रकाव्याना नाकें मुरडणारा वर्ग जर निकट असता तर पंतानीं आपला च हेका चालविला असता असें आम्हांस वाटत नाहीं. पंतांचा स्वभाव तसा हेकेखोर असता तर, पांडुरंगराय नाइकानीं "हरिवंशाच्या आर्या व्हाव्या" असें म्हटल्या-बरोबर हा 'भगवन्निदेश' च आहे असें जाणून पंतानीं हरिवंशाच्या ज्या पांच-सहा हजार आर्या रचिल्या त्या रचिल्या च असत्या असें नाहीं. पांडुरंगराय हे पंतांच्या अन्नदात्याचे पुत्र असल्यामुळें हें उदाहरण बरोबर लागूं पडत नाहीं असें कोणी म्हणेल, तर दुसरीं हि उदाहरणें आहेत. कृष्णातटाकीं कऱ्हाडास रहा-णाऱ्या गुरुपुत्र व सहाध्यायी सदाशिव पाध्यानीं सुचविल्यावरून पंतानीं कृष्णा-माहात्म्यकाव्य रचिलें आहे. तसें च विठोबा ताहाराबादकर यांच्या 'दोंचार चालींचीं पदें रचावीं' या विनंतीवरून त्यानीं पदें हि रचिलीं आहेत. यावरून पंतांच्या चित्रकाव्यांविषयीं केवळ आपली नावड व्यक्त करणारा पक्ष जर त्या वेळीं असता तर पंतानीं आपल्या सन्नामोच्चारणलालसेला जें चित्रकाव्याचें वळण लाविलें तें हि लाविलें नसतें, असें आम्हांस वाटतें. पंतांचा पंढरपुरस्थ मित्र राम बडवे यानें तर आपल्या 'मोरेश्वरवर्णनार्या' मध्यें

**अष्टोत्तरशत केलीं जेणें रामायणें पृथग्रस तीं**

अशा रीतीनें रामायणांची प्रशंसा च केली आहे. तात्पर्य, पंतानीं चित्रकाव्यें खरडण्यांत व्यर्थ वेळ दवडिला असा फलशून्य वाद आतां माजविण्यापेक्षां पंतानीं चित्रकाव्यें किती सफाईनें रचिलीं आहेत, चित्रकाव्यांतून हि रसालंकार साधण्याकडे कसें लक्ष पुरविलें आहे, व एकंदरीनें आपली सन्नामोच्चारणलालसा पुरविण्याकरितां आदरिलेल्या चित्रकाव्यांतून हि मूळ वर्ण्य विषयाचा धागा कसा तुटूं दिलेला नाहीं या च दृष्टीनें वाचकानीं अष्टोत्तरशत रामायणांकडे पहावें असें आम्ही पुनःपुनः म्हणतों. एकशेंआठ रामायणांत अगदीं च नीरस व केवळ संख्यापूर्तीसाठीं च रचिलेलीं कांहीं 'विचित्र' रामायणें नाहींत असें आमचें मुळीं च म्हणणें नाहीं; तथापि एकशेंआठ रामायणांचा दीर्घ प्रवास संपवून आलेला प्रवासी साधारणपणें दमलाभागलेला न दिसतां चांगला तरतरीत व हुशार च दिसेल, आणि मार्गांत बरे च दूरान्वयादि खांचखळगे लागले असले तरी वरचे-

वर लागणाऱ्या रसादि मनोरम जलाशयांच्या, उपमाअलंकारादि पुष्पवाटिकांच्या व उपवनांच्या सुखानुभवापुढें त्याला त्या खांचखळग्यांचें व ठेंचांचें विस्मरण च होईल अशी आम्हांस आशा वाटते. ह्या दीर्घ प्रवासास प्रारंभ करिताना लागणारें मराठी मंत्ररामायण तर रसालंकारपरिपूर्ण असल्यामुळें वसंतऋतूंतील टवटवीत व घमघमीत अशा राजोपवनाप्रमाणें च वाचकाच्या मनाला आराम देतें असें म्हणावयास हरकत नाहीं. अशा रीतीनें प्रत्येक रामायणाचा उल्लेख करून त्याचा विशेष सांगूं लागलों असतां बरा च विस्तार होईल म्हणून लेखणी थोडी आंखडती घेणें भाग आहे. "श्रीराम जय राम जय जय राम" हा पंतांचा अत्यंत प्रिय महामंत्र. हा मंत्र साधलेलीं एकंदर दहा रामायणें आहेत. पैकीं संस्कृत मंत्ररामायणासंबंधीं आम्हांस विशेष कांहीं लिहावयाचें नाहीं. तें संस्कृतांत आहे हा च एक त्याचा विशेष. त्याचें वृत्त अनुष्टुप् आहे हा कांहीं त्याचा विशेष नव्हे. कारण, अनुष्टुप् वृत्तांत व तशी च मंत्ररचना केलेलीं मंत्रि व सप्तमंत्र अशीं दोन छोटीं रामायणें मराठींत रचिलेलीं आहेत. 'बालमंत्ररामायण' या नांवांत च त्याचें मंत्ररामायणाशीं कोणतें नातें आहे तें व्यक्त होतें. मंत्रमयरामायणांतील प्रत्येक आर्येत सबंध राममंत्र साधला आहे. त्याचप्रमाणें त्रिःसप्तमंत्र व सत्त्व ह्या दोन रामायणांमध्यें हि शार्दूलविक्रीडितांत सबंध राममंत्र साधून अनुक्रमें २१ व १३ श्लोकांत रामायणाचा गोषवारा आणिला आहे. मंत्रगर्भरामायणाचा विशेष म्हणजे तें साकीवृत्तांत असून मंत्ररचना मंत्ररामायणाप्रमाणें आहे. रम्यमंत्ररामायणाच्या प्रत्येक कांडांत एक मंत्र साधला आहे. यांत शार्दूलविक्रीडित, स्रग्धरा व शिखरिणी या तीन वृत्तांपैकीं पहिल्याचीं तीन, दुसऱ्याचीं दोन व तिसऱ्याचीं दोन कांडें आहेत. याशिवाय नामांक म्हणून एक रामायण आहे. तथापि त्यांत सर्व राममंत्र साधला नसून केवळ रामनाम च साधलें आहे. राममंत्राप्रमाणें च संतमहंतांची नामावलि रामायणांत गोंवण्याची कल्पना रामनामाची हौस पुरी झाल्यावर लगेंच सद्गर्भरामायणाचे वेळीं पंतांच्या मनांत आली. सद्गर्भांत आर्येचें आद्याक्षर चिह्नित आहे तर तशा च प्रकारची नामावलि साधलेल्या सन्नामगर्भरामायणांतील आर्येत चिह्नित अक्षरें इतस्ततः पण क्रमानें विखरलेलीं आहेत. दोन शिवरामायणांपैकीं पहिल्यांत साधलेली शिवाष्टोत्तरशतनामावलि संस्कृत खंडांत छापली

आहे. त्या शिवनामावलीला आत्म्याची उपमा दिली तर या रामायणाला कोशाची म्हणजे देहाची दिली पाहिजे. दुसऱ्या शिवरामायणांत केवळ शिव हें नाम साधलें आहे उमारामायणांतील चरणांच्या आद्याक्षरांत उमा हें नाम साधलें आहे. काशी, गंगा व प्रयाग या रामायणांत तीं तीं नांवें साधलीं आहेत. प्र हें अक्षर बेताबातानें च लागत असल्यामुळें टाइपाच्या घरांतून हि तें बेतानें च असतें; अशा स्थितींत महाराष्ट्रांतील छापखानेवाल्यांची खोड मोडण्यासाठीं च पंतानीं प्रयागमिषानें हें 'खूट' रामायण रचिलें आहे कीं काय असें वाटतें! तीर्थ, ऋषी व राज या रामायणांतून आपल्या या पुरातन व पावन भरतखंडांतील तीं तीं नांवें गोंविलीं असून त्यावरून पंतांची बहुश्रुतता चांगल्या रीतीनें व्यक्त होते. कांहीं रामायणाना तीं ज्या वृत्तांत रचिलीं आहेत त्या वृत्तांचीं नांवें दिलीं आहेत. अशांपैकीं सवया, पंचचामर, तन्वि, दंडक वगैरे विशेष वाचनीय आहेत. ज्या नांवाना तीं कवीनें दिलीं आहेत याहून विशिष्ट अर्थ नाहीं अशीं हि बरीं च नांवें आहेत. त्यांपैकीं 'कन्यारत्न' या नांवासंबंधानें मात्र कांहीं विशेष खुलासा करावा असें आम्हांस वाटतें. या रामायणाचें वृत्त स्रग्धरा आहे. स्रग्धरावृत्तांत एक रामायण रचावें अशी कल्पना पंतांच्या मनांत येतां च 'स्रग्धरा' या शब्दाच्या अर्थाकडे त्यांचें लक्ष गेलें व स्रग्धरा म्हणजे 'पुष्पमाला धारण करणारी' हा अर्थ मनांत येतां च पंतानीं अत्यंत समयसूचकतेनें आपल्या रामायणसत्कथारूप कन्येला सत्कीर्तिरूप पुष्पमालेनें विभूषित करून श्रीरामाच्या चरणीं अर्पण केली व अशा रीतीनें रामाला आपला घरजांवई करून घेतला! पंतानीं हिंदी साहित्यांतील दोहा, दोहासोरठा व हरिगीतिका या वृत्तांत हि तीन सरस रामायणें रचिलीं आहेत. पैकीं पहिलीं दोन त्या त्या नांवानें व तिसरें 'सु' या नांवानें प्रसिद्ध आहे. इतर भाषेंत जें चांगलें आहे व जें मराठींत नाहीं तें मराठींत आणावयाचा सहेतुक प्रयत्न पंतानी केला, व म्हणून च मराठी भाषेवर त्यांचे मोठे उपकार आहेत असें आम्ही वरचेवर म्हणतों. कोणतीं हि अक्षरें कवितेंत साधून दाखविण्यास जी बुद्धिमत्ता लागते त्याहीपेक्षां अधिक बुद्धिमत्ता 'परंतु,' 'धन्य' असे शब्द यथार्थत्वानें साधण्यास लागेल हें कोणी हि कबूल करील; व जो कोणी हीं रामायणें वाचील त्यास तीं चित्रकाव्यें नसून केवळ ध्वनिकाव्यें आहेत असें च आढळून येईल. परंतु, धन्य

या रामायणांचें एक असो. परंतु विष्णुसहस्रनामावलींतील सर्व नामें क्रमानें व कथासंदर्भ विस्कळित न होऊं देतां साधणें हें कांहीं लहानसहान काम नव्हे. सबंध विष्णुसहस्रनामावलि साधण्यासाठीं पंताना दहा रामायणें खर्ची घालावीं लागलीं आहेत. प्रत्येक नामाचा वाच्यार्थ वर्णनाच्या ओघांत सहज मिसळून देण्यासाठीं कोठें कसें वर्णन केलें असतां क्रमानें व यथार्थत्वानें हीं नांवें गोंवितां येतील हें ठरविण्याकरितां पंताना समग्र रामकथेचें स्वस्थ चित्तानें किती वेळां चिंतन करावें लागलें असेल बरें? सहस्र नांवें एका च रामायणांत आणणें अशक्य वाटल्यामुळें च किती किती नांवें आरंभापासून शेवटपर्यंत रामकथेंत गोंवितां येतील याचा सूक्ष्म विचार करून पंतानीं विष्णुसहस्रनामावलीचे दहा विभाग पाडिले असावेत असें आम्हांस वाटतें. नांवांचे दहा विभाग पाडिल्यावर कांहीं विभागांतील नांवें गोंवण्यासाठीं रामकथा आंखडती घ्यावी लागली तर कांहीं-साठीं जरा लांबवावी लागली, व यामुळें च कमींत कमी ५२ व जास्तींत जास्ती ९३ अशी बहुतेक रामायणांची पद्यसंख्या हि अनियमित झाली आहे. आतां विशेष निर्देश करण्याजोगीं रामायणें म्हटलीं म्हणजे रामायणअभंग, श्रीगुरु, सीता व हनुमत् हीं होत. पैकीं पहिलें 'सीतागीत' या नांवानें प्रसिद्ध असून त्याच्या लोकप्रियतेवरून च त्याच्या महत्त्वाची साक्ष पटणार आहे. पुढील तीन रामायणांची भूमिका मात्र कवीनें फार च बहारीची कल्पिली आहे. हीं तीन च रामायणें जरी वाचलीं तरी पूर्वग्रहदूषित वाचकाचें हि मन कविविषयक पूज्यबुद्धीनें भरून येईल अशी आम्हांस खात्री वाटते.

**श्रीरामासि पहावया जनक ये स्नेहें अशोका पुरा,**

असा गुरुरामायणाचा प्रसंग कल्पून सर्व मंडळी एकत्र जमविली असून श्रीगुरु वसिष्ठांच्या आज्ञेवरून रामानीं सर्व वनवासवृत्त सांगण्यास प्रारंभ केला आहे; व पुढें रामायणांतील प्रमुखप्रमुख व्यक्ती शालीनतेनें स्वतःकडे कमीपणा घेऊन दुसऱ्याचा गौरव करीत करीत आपापली हकीकत सांगत आहेत असें या रामा-यणाचें स्वरूप आहे सीतारामायण हा विदग्ध काव्याचा आदर्श च आहे म्हटलें तरी चालेल.

**श्रीजनकसुता सीताप्रभृति सुखें भेटल्या स्वसा जावा;**
**तत्संवाद वदावा, सज्जन पावुनि मद स्व साजावा.**

म्हणून कवीनें हें रामायण गाइलें आहे. या रामायणाची भाषा आपल्या कुल-युवतींच्या भाषेसारखी नम्र, मृदु व मधुर आहे. पंतानीं कुलस्त्रियांसाठीं म्हणून जीं काव्यें रचिलीं आहेत त्यांतील ' सीतारामायण ' हें प्रमुख काव्य आहे. यांत नानाविध वृत्तांची योजना केलेली असल्यामुळें स्त्रियाना त्यांच्या च बोलींत वृत्तांची ओळख करून देण्यास याचा उपयोग होईल, किंवहुना स्त्रियांच्या उपयोगा-साठीं पंतानीं रचिलेलीं सर्व काव्यें व कृष्णविजयांतील अष्टनायिकांच्या विवाह-कथा यांसारखे उतारे एकत्र करून स्त्रियाना उपयुक्त होतील अशा प्रकारच्या टीपा व शब्दकोश जोडून एखादें पुस्तक तयार केल्यास, त्यांचेवर मर्दानी भाषें-तील काव्यें शिकण्याचा जो लाजिरवाणा प्रसंग येतो तो दूर होईल. शिवाय सीता, सावित्री, द्रौपदी इत्यादि आर्य स्त्रियांच्या परमपावन चारित्र्याची त्याना ओळख करून दिल्याचें हि श्रेय मिळेल. हनुमद्रामायणांत पंत हनुमंताकडून त्याच्या मातेला रामकथा निवेदन करवीत आहेत. स्वमुखानें च स्वपराक्रमाचा गौरव कर-ण्याच्या विकट प्रसंगांतून हनुमंत कसा शिताफीनें निसटला आहे हें ह्या रामायणांत पहाण्याजोगें आहे. आतां सरतेशेवटीं एका च पण सारभूत अशा साररामाय-णाची ओळख करून देऊन वाचकांचा निरोप घ्यावयाचा आहे. या रामायणाचीं दोन च कांडें पंतानीं रचिलीं आहेत, असें मूळ पोथीवरून दिसतें. यांतील वर्णना-चा ओघ अत्यंत गंभीर व गति अगदीं मंद आहे. या च गतीनें जर पंतानीं उत्तरकांडाअखेर हें रामायण पोहोंचविलें असतें तर तें बरें च मोठें होऊन हल्लींपेक्षां हि विशेष मान्यतेला पोहोंचलें असतें यांत शंका नाहीं. हें रामायण रचित असताना पंतांचें अन्तःकरण रामकथेविषयींच्या प्रेमानें केवळ भरून आल्यासारखें दिसतें. रामाच्या बाललीला, दशरथाचा पुत्रशोक, कैकेयीचें सां-त्वन, कौसल्येचा विलाप, अयोध्यावासी जनांचा आक्रोश वगैरे प्रसंगीं तर प्रत्यक्ष डोळ्यांसमोर घडत असलेल्या गोष्टींचें च कवी वर्णन करीत आहे कीं काय असा मनाला मोह होतो. स्वभावोक्ति अलंकाराची तर या रामायणांत परमा-वधि पहावयास सांपडते. वर्णनसौष्ठवाशिवाय दुसरा हि या रामायणाचा एक विशेष आहे. तो असा कीं, संस्कृतमध्यें वृत्तरत्नाकरासारख्या ग्रंथांतून जीं पुष्कळ मनोरम वृत्तें दिलेलीं आहेत त्यांमध्यें मराठींत हि अत्यंत सफाईनें क-विता करितां येणें कसें शक्य आहे हें या रामायणांत पंतानीं दाखविलें असून

या च दृष्टीनें साररामायणास 'वृत्तरत्नमयरामायण' असें पर्याय नांव हि त्यानीं दिलें आहे. पंतानीं मराठींमध्यें जितकीं नवीं वृत्तें आणिलीं आहेत तितकीं कोणत्या हि दुसऱ्या महाराष्ट्रकवीनीं आणलेलीं दिसत नाहींत; असो. येथपर्यंत प्रमुखप्रमुख रामायणांचा विहंगमदृष्टीनें निर्देश केला, त्यावरून वाचकाना अष्टोत्तरशत रामायणांसंबंधीं यथार्थ कल्पना येईल असा आम्हांस भरंवसा आहे. मराठी भाषेचे सुधारक व उद्धारक या नात्यानें च आधुनिक सुशिक्षित वर्ग पंताना मानतो असें म्हणण्यास' हरकत नाहीं. तथापि पंतांच्या संबंधानें ही दृष्टी हि केवळ अपूर्व व अभिनव आहे असें नाहीं. जुन्या जाणत्या लोकांत हि ही जाणीव असल्याचें दिसून येतें. या मुद्द्यासंबंधानें सुमारें चौदा वर्षांपूर्वी 'केसरीं'त एका गृहस्थानीं आपल्या येथील जुन्या बाडांतील "मोरोपंतकवीविषयीं"च्या स्तुतिपर आर्यांचें एक दशक प्रसिद्ध केलें होतें. त्यापैकीं विशेष महत्त्वाच्या अशा चार आर्या वाचकांच्या निदर्शनास आणून आम्ही हा उपोद्घात पुरा करितों.

सकल महाराष्ट्रजना उपजे कवनें तुझ्या सदभिमान;
त्वत्काव्यामृतपानें विबुध वदुनि 'धन्य' हालविति मान. ४
त्वत्काव्यदूषणीं जे भूषण जन मानितात ते अंध,
बधिर चि ते अथवा जे कस्तूरीचा न वानिती गंध. ५
कीर्तनरम्योद्यानीं श्रुतिग मनोहर मयूररव नाहीं,
तरी त्यांत काय शोभा? उपजे रस मधुर अन्यकवनाहीं. ९
जनपदभाषेला त्वां स्वकृतीनें चढविलेंस उच्चपदा,
नानालंकाररसीं सजवुनि नेलीस दूर तद्विपदा. १०

ग्रंथ संग्रहालय ठाणे
23६८७
ता. क्र. 22

# अनुक्रमणिका

## १ मंत्ररामायण

**परिभाषा:**–( पृष्ठांक १ ) उपोद्घातात्मक ( १-२० )

**बालकांड:**–( ३ ) नारद व ब्रह्मदेव यांचे सांगीवरून वाल्मीकि रामायण रचितात ( १-१० ); कुशलवांकडून रामचरित्रगान ( ११-१४ ); दशरथाचें अनपत्यत्व (१५-२० ) व त्यावरील यज्ञाची तोड व तयारी ( २१-२४ ); सुमंत्राच्या सूचनेवरून ऋष्यशृंगाला आणवून अश्वमेध व पुत्रेष्टि ( २५-३३ ); देवांची रावणनाशार्थ ब्रह्म्यास प्रार्थना (३४-३७) व त्याचें आश्वासन (३८-४०); दशरथाची पुत्रेष्टि ( ४१ ); पायसप्रसाद व रामलक्ष्मणभरतशत्रुघ्न यांचें जन्म ( ४१-५२ ); उपनयनोत्तर ( ५३ ) विश्वामित्रयज्ञसंरक्षण व ताटकावध ( ५४-५७ ); रामादिकांचे विवाह ( ५८-६५ ); परशुरामाची दिलसफाई ( ६६-६८ ); दशरथाचा आनंद ( ६९-७२ ).

**अयोध्याकांड:**–( १० ) रामराज्याभिषेक ( १-३ ); कैकेयीचा अडथळा ( ४-५ ); तिचा हट्ट व विचित्र वराची मागणी ( ६-७ ); दशरथाचा भडभडून शोक ( ८-१४ ) व मूर्च्छा ( १५-१७ ); रामाची वनवासाची तयारी ( १८-२० ) व कौसल्येचा शोक ( २१-२५ ); लक्ष्मण व सीता बरोबर निघतात ( २६ व २७ ); सुमंत्राची मध्यस्थी व कैकेयीचा दुष्टावा ( २८-३३ ); पौरजनांचा शोक ( ३४-३७ ); गुहाची भेट ( ३८-४६ ); भरद्वाजभेट ( ४७-४९ ); चित्रकूटानिवास ( ५० ); रामाला पोंचवून ( ३४ व ३८ ) परत आलेल्या (४४) सुमंत्रास दशरथाचे करुणप्रश्न ( ५१-५५ ); सुमंत्राचें शोकोत्तर ( ५६-६१ ); मूर्च्छित झालेला दशरथ ( ६२ ) रात्रीं कौसल्येला तापसश्रावणवधकथा व शापाची हकीकत सांगून ( ६३-७१ ) प्राण सोडतो ( ७२ ); आजवळाकडून आणविलेला भरत ( ७३-७५ ) कैकेयीची खरड काढतो ( ७६-८१ ); कौसल्येचा शोक ( ८२-८९ ); भरत राज्य नाकारून ( ९०-९२ ) रामाला भेटतो ( ९३-९५ ); परस्परांची भेट ( ९६-९९ ) भरताची प्रार्थना ( १००-१०३ );

रामाचें आश्वासन व पादुकादान (१०४-१०८); भरताचा नंदिग्रामीं वास (१०९-११२); रामाचा अत्र्याश्रमीं वास (११३-११५) व नंतर दंडकारण्यांत प्रवेश (११६-११८).

**अरण्यकांडः**-(२०) रामास मुनिसहवास (१-३); विराध राक्षसाचें पारिपत्य व उद्धार (४-९); सुतीक्ष्ण व अगस्त्य यांस भेटून (१०-१२) पंचवटीस आगमन व जटायूची गांठ (१३-१७); लघळ शूर्पणखेची अवहेलना व लक्ष्मणाकडून श्रुतिनासादिखंडन (१८-२८); खरदूषणादिकांचा समाचार घेतल्याची (२९-३३) शूर्पणखेची तक्रार (३४) ऐकून रावणाला सीताकामिनीहरणाचा मोह पडतो (३५-३७); त्यानें पाठविलेल्या हरिणवेषधारी मारीचाचा रामकृत वध (३८-४७); मारीचाची कपटी हांक ऐकून बावरलेली सीता लक्ष्मणास रामरक्षणार्थ बाहेर काढते (४८-५४); रावणाचें सीताहरण (५५-५७); जटायूची आडकाठी (५८-६४); ऋष्यमूकावर सीता दागिने फेंकते (६५); रावण तिला अशोकवनांत अडकवितो (६६); इकडे परत येऊन सीता न दिसल्यामुळें रामाचा धाय मोकलून शोक (६७-८४); जटायु शोध सांगतो (८५-८७); जटायुदहन व वनभ्रमण (८८-८९); अयोमुखीवध (९०); कबंधनाश–त्याची पूर्वकथा व उद्धार (९१-९४); शबरीसत्कार (९५-९७); शबरी पंपाऋष्यमूकमार्ग सांगते (९८-१०१); रामाचें पंपास्थळीं आगमन (१०२-१०४)

**किष्किंधाकांडः**–(३०) रामाचे विरहविलाप (१-१०); लक्ष्मणकृत सांत्वन (११); सुग्रीवानें पाठविलेला (१२) मारुति रामाची चौकशी (१३-१७) करून आपली हकीकत सांगून (१८-२१) रामास सुग्रीवास भेटवितो (२२-२३); रामसुग्रीवसख्य (२४-२५); सीतेचे दागिने पाहून (२६) रामाचा शोक (२७-२९); वाळीसुग्रीवांची कलहकथा (३०-४८):–वाळिमायावीयुद्ध व सुग्रीवास गैरसमजानें राज्यप्राप्ति (३०-३६); वाळीचा क्रोध व सुग्रीवाचा पिच्छा (३७-४१); मतंगमुनींनीं वाळीस दिलेल्या शापामुळें सुग्रीवाचें ठिकाण ऋष्यमूक (४२-४८); रामाचें सप्रत्यय आश्वासन (४९-५१); वाळिसुग्रीवयुद्ध (५२-५७); पराजित सुग्रीवाची राम समजूत काढतो (५८-

५९ ); वालिहनन ( ६०-७१ ): सुग्रीवाचें आह्वान ( ६०-६२ ); तारेचें न ऐकतां (६३-६७) युद्धाला गेलेला वाली रामबाणानें मूर्च्छित पडतो (६८-७१); तारेचा शोक ( ७२-७६ ); सावध झालेला वाली ( ७७ ) अंगदास रामहस्तीं अर्पून प्राण सोडतो ( ७८ ); वालीची उत्तरक्रिया ( ७९ ); अंगदास यौवराज्य ( ८० ); सुग्रीवापासून मदतीचें वचन घेऊन ( ८१-८३ ) राम अरण्यांत वर्षाकाळीं सीतेसाठीं शोक करतो ( ८४-८८ ); चैनींत गुंगलेल्या सुग्रीवास जागें करण्यासाठीं लक्ष्मणाची योजना ( ८९-९४ ); तारेची मध्यस्थी ( ९५-९८ ); शरण आलेला सुग्रीव सीताशोधार्थ वानर चहूंकडे पाठवितो ( ९९-१०७ ); बाकीचे परत आले ( १०८ ) परंतु दक्षिणेकडील शोधक तडफडून प्राण देण्यास तयार झाले ( १०९-११६ ); तों च संपाति त्यांस आपल्या भावाचें-जटायूचें-रक्षण, आपण, सूर्यानें पंख जाळिलें तरी कसें केलें ती कथा सांगतो व सीतेचा पत्ता हि सांगून निघून जातो ( ११७-१३० ); सागरलंघनाविषयीं सचिंत झालेल्या कपिवर्गास ( १३१-१३३ ) जांबवान् मारुतिबल वर्णितो ( १३४-१३९ ); मारुति वाढून निघतो ( १४०-१४३ ).

**सुंदरकांड**:–( ४२ ) मारुतीचें समुद्रोड्डान व मैनाकाची मदत ( १–७ ); सुरसामुखांतून मारुतीची सुटका ( ८-१७ ); सिंहिकेला फाडून ( १८-१९ ) मारुती लंकेंत घुसला ( २०-२३ ); सीतेच्या शोधार्थ व्यर्थ भ्रमण ( २४-२७ ); अशोकवनिकेंत सीता दिसते ( २८-३४ ); कामातुर रावणास सीतेचा उपदेश ( ३५-४४ ); संतप्त रावणाचे आज्ञेनें सीतेला भक्षूं पाहणाऱ्या राक्षसींचें निवारण करून सीतेला त्रिजटा धीर देते ( ४५-५२ ); भयभीत सीता सावध झाल्यावर मारुति तिशीं बोलतो ( ५३-६१ ); सीता सर्वांचें कुशल पुसून ( ६२-६५ ) रामानें रावणास मारावें असें निक्षून बोलते ( ६६-७० ); "ठीक" म्हणून मारुति खूण मागतो ( ७१-७६ ); सीता त्यास ऐंद्रकाकाची गोष्ट सांगून व चूडामणीची खूण देऊन निरोप देते ( ७७-८२ ); मारुति अशोकवन उध्वस्त करून जंबुमाली-प्रघसअक्षादिकाना मारतो ( ८३-९६ ); मग इंद्रजित् मारुतीला धरून रावणासमोर नेतो ( ९७-१०९ ); मी रामाचा सेवक ( ११०-११७ ) असें सांगून मारुति सीता परत देण्याविषयीं पुष्कळ उपदेश करतो ( ११८-१३१ ); बिभीषणानें वांचविलेला मारुति ( १३२-१३३ ) शेपटी पेटविल्यानें लंका जाळून

परत जातो ( १३४-१४३ ); मग सर्वजण रामाकडे येऊन मारुति रामास सर्व हकीकत सांगतो ( १४४-१५६ ).

**युद्धकांडः**–( ५७ ) मारुतीस आलिंगन व चौकशी ( १-५ ); तो लंकेची सर्व हकीकत सांगतो ( ६-१५ ); राममारुतींचा समुद्रोल्लंघनाबद्दल विचार ( १६-२० ); सैन्यरचना व प्रयाण ( २१-३५ ); रामाचें समुद्रतीरीं आगमन व शोक ( ३६-४३ ); रावणाच्या सभेंतील मसलत–इंद्रजित् व कुंभकर्ण यांचा धीर ( ४४ ५२ ); विभीषणाचा विरोध व सीता देऊन रामसख्य जोडण्याचा उपदेश ( ५३-६१ ); रावण रागानें विभीषणास निर्भर्त्सितो ( ६२-७४ ); विभीषण रामास शरण येतो ( ७५-९२ ); त्यास रामाकडून लंकाराज्याभिषेक ( ९३-९५ ); रामाची समुद्रोल्लंघनाची मसलत ( ९६-९८ ) दूत रावणास कळवितात ( ९९-१०२ ); रावणाचा निरोप आणणाऱ्या शुकाला बांधून ठेवतात ( १०३-११२ ). उन्मत्त सागराला बाण मारून वठणीवर आणून मरुकांताराची व्यवस्था सागराचे मर्जीनुरूप राम करतो (११३-१२३); 'नळाकडून सेतु बांधीव' या समुद्रवचनाप्रमाणें ( १२४-१२९ ) महासेतु बांधून राम समुद्रपार झाला ( १३०-१३६ ); मुक्त केलेला शुकदूत रावणास रामप्रताप वर्णून "सीता सोड" म्हणून सांगतो ( १३७-१४३ ); रावण त्यास धिक्कारितो ( १४४-१४६ ); रावणानें पाठविलेल्या शुकसारणांची धिंड ( १४७-१५५ ); शुकसारण रावणास वानरसैन्यांची संख्या व अधिपति वगैरे वर्णून साम करण्यास सांगतात ( १५६-१९७ ); रावणाची गर्वोक्ति ( १९८-१९९ ); रावणदूत शार्दूलाची खोड मोडल्यामुळें रामादिकांची तो स्तुति करतो ( २००-२११ ; ती ऐकून रागावलेला रावण ( २१२ ) मायावी रामाचा वध करून सीतेस घाबरवितो ( २१३-२२३ ), प्रधानादिकांचा रावणास उपदेश ( २२४-२२८ ); रामाचें कुशल सरमा सीतेस कळविते ( २२९-२३६ ); सरमा रावणाचा हृद्ग सीतेस कळवून तो मरणार असें तीस आश्वासिते ( २३७-२४२ ); रामाची मसलत व बिभीषणाकडून लंकेची सर्व बातमी ( २४३-२५३ ); सैन्याची व्यवस्था करून रामादि सुवेळीं राहतात ( २५४-२६३ ); रावणाला बघून त्यावर झडप घालणारा सुग्रीव व रावण यांची झटापट (२६४-२७५); 'एकटा पुनः जाऊं नकोस' म्हणून त्यास रामाचा इषारा ( २७६-२७९ ); लंकेस वेढा

( २८०-२८२ ); रामदूत अंगदाचा रावणास उपदेश ( २८३-३१३ ); अंगावर आलेल्या रावणाच्या प्रधानांना मारून आलेल्या अंगदाचा निरोप ऐकून रामानें आज्ञा दिल्यामुळें वानर युद्ध पुकारतात ( ३१४-३२६ ); दोन्ही पक्षांचे योद्धे भिडतात–कित्येक राक्षसवीर मरतात ( ३२७-३३६ ); इंद्रजित् रामलक्ष्मणांना नागपाशानें बांधितो ( ३३७-३४५ ); रावण त्रिजटेकडून हा प्रकार सीतेस दाखवितो–तिचा विलाप ( ३४६-३५८ ); त्रिजटा तिची समजूत घालत्ये ( ३५९-३६४ ); सावध झालेल्या रामाचे,निराशेचे शोकोद्गार ( ३६५-३७३ ); सुषेण वनस्पति आणण्यास सांगतो ( ३७४-३८० ); इतक्यांत गरुड आल्यामुळें रामलक्ष्मण नागपाशांतून मुक्त होऊन ताजेतवाने होतात ( ३८१-३८८ ); पुन्हां लंकेस वेढा व युद्ध ( ३८९-३९३ ); धूम्राक्षप्रहस्तादिकांचा नाश ( ३९४-३९९ ); खुद्द रावण स्वतः येऊन लक्ष्मणास मूर्च्छित करतो ( ४००-४१३ ); पण पुढें रामाकडून पिटाळला जातो, व पश्चात्ताप पावतो ( ४१४-४२९ ); कुंभकर्णास उठवितात ( ४३०-४४० ); त्याला पाहून रामादि भयभीत होतात ( ४४१-४४७ ); बिभीषण रामास कुंभकर्णाचा इतिहास व ब्रह्मदेवाचा शाप व उःशाप सांगतो ( ४४८-४५७ ); रावणास भेटल्यावर कुंभकर्ण त्याची कानउघाडणी करून ( ४५८-४६५ ) युद्धास जातो ( ४६६-४७० ); कुंभकर्णाचा प्रलय, मारुतिलक्ष्मणसुग्रीव इत्यादींशीं युद्ध ( ४७१-४९४ ); राम कुंभकर्णास वधितो ( ४९५-५०५ ); अतिकायादिक चार रावणपुत्रांचा नाश व रावणाचा शोक ( ५०६-५१४ ); बापाला आश्वासून युद्ध करणारा इंद्रजित् रामादिकांचा पराभव करून गेला ( ५१५-५२४ ); जांबवंत बिभीषणाजवळ मारुतीचें सामर्थ्य वर्णून त्यास दिव्य औषधि आणण्यास सांगतो ( ५२५-५३७ ); मारुति उडून ओषधि अदृश्य पाहून सबंध पर्वत च आणतो–सर्व मंडळी सावध होतात ( ५३८-५५० ); रामाचे आभार ( ५५१-५५२ ); पर्वत पुनः जागच्या जागीं ठेवून मारुति आला ( ५५३-५५६ ); कुंभनिकुंभांचा नाश ( ५५७-५६० ); मकराक्षाचा नाश ( ५६१-५६२ ); इंद्रजितानें युद्ध–मायावी सीतेचा वध पाहून रामादिकांचा मोह ( ५६३-५७० ); बिभीषणानें कपटस्फोट केल्यावर ( ५७१-५७५ ) लक्ष्मणादिक जाऊन इंद्रजिताच्या यज्ञाला विघ्न करून भयंकर युद्ध करतात–त्यांत लक्ष्मण इंद्रजितास मारतो ( ५७६-५९३ ); रामाकडे सर्वत्र आनंदीआनंद

( ५९४-५९६ ); रामलक्ष्मण यांची भेट–लक्ष्मणाचा गौरव–बिभीषणाचें भाषण ( ५९७-६०४ ); लक्ष्मणादिकांची मलमपट्टी ( ६०५ ); शोकसंतप्त रावण सीतेला मारणार ( ६०६-६१० ) तों रामाचा अद्भुत पराक्रम ( ६११-६१६ ); रामरावणांचा शेवटचा भयंकर संग्राम (६१७-७०४):–लक्ष्मणाची मूर्छा–मारुतीनें आणिलेल्या दिव्यौषधीनें तो सावध होतो ( ६४८-६७० ); मातलि व रथ यांची जोड ( ६७२-६७३); रामास अगस्त्य भानुहृदय शिकवितो ( ६९२-६९३); सर्वत्र रामाभिनंदन ( ७०५-७११ ); रावणाच्या पारलौकिकार्थ अनुज्ञा ( ७१२-७१४ ); बिभीषणाचा शोक ( ७१५-७१९ ); रावणस्त्रियांचा विलाप ( ७२०-७२९ ); रावणाचें और्ध्वदेहिक व बिभीषणास लंकादान (७३०-७३१); सीतेला आणल्यावर 'तुज सर्वथैव मीं न शिवें ' असा रामाचा निश्चय ( ७३२-७३८ ); सीतेचा अग्निप्रवेश व देवादिकांच्या साक्षी ( ७३९-७४६ ); दशरथ हि स्वर्गांतून उतरून मुलांस भेटून योग्य उपदेश करितो ( ७४७-७५७ ); वानरांचें पुनरुत्थान ( ७५८ ); जयजयकार ( ७५९-७६० ); देवांची बोळवण ( ७६१ ); मातलीचा सत्कार ( ७६२ ); रामाचें ऐवजीं त्याचे आज्ञेवरून बिभीषण सैन्याची पूजा करतो ( ७६३-७६७ ); पुष्पकारूढ होऊन राम सर्वांसह परत निघाला ( ७६८-७७२ ); सीतेला सर्व दाखवीत दाखवीत मध्यें तारा वगैरेंना बसवून घेऊन राम भारद्वाजाश्रमांत उतरला ( ७७३-८०१ ); मारुति गुहाला व भरताला रामागमनाची वार्ता कळवितो ( ८०२-८०६ ); भरताचा हर्षातिरेक पाहून ( ८०७-८०९ ) मारुति त्यास पुढील रामचरित्र सांगतो ( ८१०-८१९ ); भरत निघाला–गुहाची भेट ( ८२०-८२१ ); राम व भरत कडकडून भेटतात ( ८२२-८२८ ); सर्वांचा सत्कार ( ८२९-८३४ ); रामास राज्याभिषेक ( ८३५-८३९ ); भरत युवराज ( ८४० ); इंद्राचा अहेर ( ८४१ ); लोकांचे अहेर ( ८४२ ); परत अहेर ( ८४३ ); मारुतीला सीता मुद्दाम हार देते–मारुतीचे उपकार ( ८४४-८५४ ); सर्वांची बोळवण ( ८५५-८५७ ); रामराज्य ( ८५८ ).

**उत्तरकांडः**–( **१४०** ). रामदर्शनार्थ आलेल्या अगस्त्यानें केलेली रामप्रशंसा ( १-४ ); रामाचें उत्तर व प्रश्न ( ५-८ ); अगस्त्य रावणाचा पूर्वेतिहास वर्णितात ( ९-१८९ ):–पुलस्त्य–त्याचा विश्रवा–त्याचा शंकरमित्र व लंकापति कुबेर ( ९-१४ ); विश्रवसाला कैकसीपासून रावण, कुंभकर्ण, बिभीषण व शूर्प-

णखा हीं अपत्यें होतात ( १५-२३ ); कुबेराचें वैभव पाहून चिथावलेले रावणादि बंधु उग्र तप करतात (२४-२७); रावणास सर्वाभयत्ववरप्राप्ति (२८-३५); बिभीषणास अमरत्वादि ( ३६-४० ) व कुंभकर्णास अखंडनिद्रादि वरदान ( ४१-४४ ); उन्मत्त रावणाला बापाचे सांगीवरून कुबेर लंका खालीं करून देतो ( ४५-५१ ); लंकानाथ रावणादिकांचे विवाह (५२-५७); कुंभकर्णाची स्थापना ( ५८ ); रावणाची क्रीडा ( ५९ ); कुबेराचा धिक्कार ( ६० ); पुष्पकहरण ( ६१-६३ ); शरवणांत अडलेलें पुष्पक–नंदीचा शाप ( ६४-६८ ); कैलास उपडूं पाहणारा रावण रडकुंडीला येतो (६९-७२); शिवभक्ति व वरप्राप्ति ( ७३-७५ ); वेदवतीवर बलात्कार, तिचा शाप, पुनरुत्पत्ति, ती च सीता होत्ये (७६-८८ ); इंद्रजिताचा जन्म ( ८९ ); मरुत्ताचा यज्ञ ( ९०-९२ ); रावणाचे मांडलिक ( ९३ ); अनरण्याचा रावणास शाप ( ९४-९५ ); नारदानें चिथावल्यामुळें रावण यमाशीं युद्ध करतो ( ९६-१०४ ); वासुकीचा पराभव ( १०५-१०६ ); निवातकवचांशीं युद्ध व सख्य ( १०७-१०८ ); शूर्पणखीपतीचा वध (१०९); वरुणपुत्रांचा पराजय ( ११०-१११); बळीनें खुबीनें रावणाचा गर्व उतरून त्यास खजिल केले ( ११२-१२४ ); सूर्य ‘ जितोऽस्मि ’ म्हणाला ( १२५ ); मांधात्याशीं युद्ध ( १२६-१२८ ); चंद्र वांचतो ( १२९ ); रावण कपिलाकडून थप्पड खातो ( १३०-१३४ ); देवस्त्रीहरण व शापप्राप्ति ( १३५-१३६ ); शूर्पणखेची समजाविसी ( १३७ ); शुक्राकडून इंद्रजिताचे पराक्रम व वरसंपादनादि श्रवण करून संतुष्ट झाल्यावर ( १३८–१४६ ) विभीषण त्यास मधूची दांडगाई ऐकवितो ( १४७-१५१ ); मध्यस्थीमुळें मधूशीं सख्य ( १५२-१५५ ); रंभानामक सुनेवर बलात्कार व शापप्राप्ति ( १५६-१६२ ); इंद्रजित इंद्रास पकडतो–ब्रह्मदेव लाडीगोडीनें त्यास वर देऊन इंद्रास सोडवितो व पूर्वपापाची आठवण देतो ( १६३-१७३ ); सहस्रार्जुनाच्या कैदेंत ( १७४-१८३ ) वाळीनें खोड मोडली व रग जिरविली ( १८४-१८९ ); मारुतीची जन्मकथा–सूर्य खाऊं पहाणाऱ्या त्याची हनु मोडते–त्यास ऋषींचा शाप ( १९०-२०५ ); वालि व सुग्रीव यांची उत्पत्तिकथा ( २०६-२११ ); रावणाची वैरभक्ति ( २१२-२२१ ); मारुति वगैरेंची बोळवण ( २२२-२२७ ); पुष्पकास आज्ञा ( २२८-२३० ); रामराज्य ( २३१-२३४); लोकापवाद ऐकून सीतेचा लक्ष्मणाकरवीं त्याग ( २३५-२४४ );

( ५९४-५९६ ); रामलक्ष्मण यांची भेट–लक्ष्मणाचा गौरव–बिभीषणाचें भाषण ( ५९७-६०४ ); लक्ष्मणादिकांची मलमपट्टी ( ६०५ ); शोकसंतप्त रावण सीतेला मारणार ( ६०६-६१० ) तों रामाचा अद्भुत पराक्रम ( ६११-६१६ ); रामरावणांचा शेवटचा भयंकर संग्राम (६१७-७०४):–लक्ष्मणाची मूर्छा–मारुतीनें आणिलेल्या दिव्यौषधीनें तो सावध होतो ( ६४८-६७० ); मातलि व रथ यांची जोड ( ६७२-६७३ ); रामास अगस्त्य भानुहृदय शिकवितो ( ६९२-६९३ ); सर्वत्र रामाभिनंदन ( ७०५-७११ ); रावणाच्या पारलौकिकार्थ अनुज्ञा ( ७१२-७१४ ); बिभीषणाचा शोक ( ७१५-७१९ ); रावणस्त्रियांचा विलाप ( ७२०-७२९ ); रावणाचें और्ध्वदेहिक व बिभीषणास लंकादान (७३०-७३१); सीतेला आणल्यावर 'तुज सर्वथैव मीं न शिवें ' असा रामाचा निश्चय ( ७३२-७३८ ); सीतेचा अग्निप्रवेश व देवादिकांच्या साक्षी ( ७३९-७४६ ); दशरथ हि स्वर्गांतून उतरून मुलांस भेटून योग्य उपदेश करितो ( ७४७-७५७ ); वानरांचें पुनरुत्थान ( ७५८ ); जयजयकार ( ७५९-७६० ); देवांची बोळवण ( ७६१ ); मातलीचा सत्कार ( ७६२ ); रामाचें ऐवजीं त्याचे आज्ञेवरून बिभीषण सैन्याची पूजा करतो ( ७६३-७६७ ); पुष्पकारूढ होऊन राम सर्वांसह परत निघाला ( ७६८-७७२ ); सीतेला सर्व दाखवीत दाखवीत मध्यें तारा वगैरेंना बसवून घेऊन राम भारद्वाजाश्रमांत उतरला ( ७७३-८०१ ); मारुति गुहाला व भरताला रामागमनाची वार्ता कळवितो ( ८०२-८०६ ); भरताचा हर्षातिरेक पाहून ( ८०७-८०९ ) मारुति त्यास पुढील रामचरित्र सांगतो ( ८१०-८१९ ); भरत निघाला–गुहाची भेट ( ८२०-८२१ ); राम व भरत कडकडून भेटतात ( ८२२-८२८ ); सर्वांचा सत्कार ( ८२९-८३४ ); रामास राज्याभिषेक ( ८३५-८३९ ); भरत युवराज ( ८४० ); इंद्राचा अहेर ( ८४१ ); लोकांचे अहेर ( ८४२ ); परत अहेर ( ८४३ ); मारुतीला सीता मुद्दाम हार देते–मारुतीचे उपकार ( ८४४-८५४ ); सर्वांची बोळवण ( ८५५-८५७ ); रामराज्य ( ८५८ ).

**उत्तरकांडः**–( १४० ). रामदर्शनार्थ आलेल्या अगस्त्यानें केलेली रामप्रशंसा ( १-४ ); रामाचें उत्तर व प्रश्न ( ५-८ ); अगस्त्य रावणाचा पूर्वेतिहास वर्णितात ( ९-१८९ ):–पुलस्त्य–त्याचा विश्रवा–त्याचा शंकरमित्र व लंकापति कुबेर ( ९-१४ ); विश्रवसाला कैकसीपासून रावण, कुंभकर्ण, बिभीषण व शूर्प-

णखा हीं अपत्यें होतात ( १५-२३ ); कुबेराचें वैभव पाहून चिथावलेले रावणादि बंधु उग्र तप करतात (२४-२७); रावणास सर्वाभयत्ववरप्राप्ति (२८-३५); बिभीषणास अमरत्वादि ( ३६-४० ) व कुंभकर्णास अखंडनिद्रादि वरदान ( ४१-४४ ); उन्मत्त रावणाला बापाचे सांगीवरून कुबेर लंका खालीं करून देतो ( ४५-५१ ); लंकानाथ रावणादिकांचे विवाह (५२-५७); कुंभकर्णाची स्थापना ( ५८ ); रावणाची क्रीडा ( ५९ ); कुबेराचा धिक्कार ( ६० ); पुष्पकहरण ( ६१-६३ ); शरवणांत अडलेलें पुष्पक-नंदीचा शाप ( ६४-६८ ); कैलास उपडूं पाहणारा रावण रडकुंडीला येतो (६९-७२); शिवभक्ति व वरप्राप्ति ( ७३-७५ ); वेदवतीवर बलात्कार, तिचा शाप, पुनरुत्पत्ति, ती च सीता होत्ये (७६-८८ ); इंद्रजिताचा जन्म ( ८९ ); मरुत्ताचा यज्ञ ( ९०-९२ ); रावणाचे मांडलिक ( ९३ ); अनरण्याचा रावणास शाप ( ९४-९५ ); नारदानें चिथावल्यामुळें रावण यमाशीं युद्ध करतो ( ९६-१०४ ); वासुकीचा पराभव ( १०५-१०६ ); निवातकवचांशीं युद्ध व सख्य ( १०७-१०८ ); शूर्पणखीपतीचा वध (१०९); वरुणपुत्रांचा पराजय ( ११०-१११); बळीनें खुबीनें रावणाचा गर्व उतरून त्यास खजिल केले ( ११२-१२४ ); सूर्य 'जितोऽस्मि' म्हणाला ( १२५ ); मांधात्याशीं युद्ध ( १२६-१२८ ); चंद्र वांचतो ( १२९ ); रावण कपिलाकडून थप्पड खातो ( १३०-१३४ ); देवस्त्रीहरण व शापप्राप्ति ( १३५-१३६ ); शूर्पणखेची समजाविसी ( १३७ ); शुक्राकडून इंद्रजिताचे पराक्रम व वरसंपादनादि श्रवण करून संतुष्ट झाल्यावर ( १३८-१४६ ) बिभीषण त्यास मधूची दांडगाई ऐकवितो ( १४७-१५१ ); मध्यस्थीमुळें मधूशीं सख्य ( १५२-१५५ ); रंभानामक सुनेवर बलात्कार व शापप्राप्ति ( १५६-१६२ ); इंद्रजित इंद्रास पकडतो-ब्रह्मदेव लाडीगोडीनें त्यास वर देऊन इंद्रास सोडवितो व पूर्वपापाची आठवण देतो ( १६३-१७३ ); सहस्रार्जुनाच्या कैदेंत ( १७४-१८३ ) वाळीनें खोड मोडली व रग जिरविली ( १८४-१८९ ); मारुतीची जन्मकथा-सूर्य खाऊं पहाणाऱ्या त्याची हनु मोडते-त्यास ऋषींचा शाप ( १९०-२०५ ); वालि व सुग्रीव यांची उत्पत्तिकथा ( २०६-२११ ); रावणाची वैरभक्ति ( २१२-२२१ ); मारुति वगैरेंची बोळवण ( २२२-२२७ ); पुष्पकास आज्ञा ( २२८-२३० ); रामराज्य ( २३१-२३४); लोकापवाद ऐकून सीतेचा लक्ष्मणाकरवीं त्याग ( २३५-२४४ );

भृगुपत्नीवधाबद्दल हें विष्णूस प्रायश्चित मिळणार इ. भविष्य पूर्वी दुर्वासाकडून कळलेलें सुमंत्र लक्ष्मणास सांगतो ( २४५-२५६ ); सीतेचा परिपाळ वाल्मीकि करतात ( २५७-२६० ); प्रजापालनतत्पर राम नृगाची कथा लक्ष्मणास सांगतो ( २६१-२६६ ); कुत्रा व यति यांच्या तंट्याचा निवाडा ( २६७-२७५ ); गृध्र-घूक यांच्या भांडणाची तोड ( २७६-२८२ ); ब्राह्मणांच्या प्रार्थनेवरून ( २८३-२९० ) लवणासुराला मारण्याकारितां पाठविलेला शत्रुघ्न वाल्मीकीकडे उतरतो व कुशलवांचा जन्म ऐकतो ( २९१-२९८ ); संधि साधून लवणासुराचा वध करतो ( २९९-३१२ ); पुनः वाल्मीक्याश्रमांत रामायण ऐकून घरीं येतो ( ३१३-३१६ ); मृतपुत्रक ब्राह्मणाचें रामास मर्मभेदक भाषण ( ३१७-३२५ ); नारदाकडून कारणाचा उलगडा ( ३२६-३३१ ); तप करणाऱ्या वर्णाचारविरोधी शूद्राचा वध ( ३३२-३३८ ); ब्राह्मणपुत्र उठतो ( ३३९ ); अगस्त्यकृत सत्कार ( ३४०-३४१ ); ब्राह्मणाचा आशीर्वाद ( ३४२ ): राजसूय राहवून अश्वमेध ( ३४३-३४५ ); यज्ञांत कुशलव रामायण ऐकवितात, पण आपली ओळख लागूं देत नाहींत ( ३४६-३५२ ); वाल्मीकीकडून सर्व वृत्तांत कळतो ( ३५३-३६२ ); पुनः दिव्य केल्यावर सीता पृथ्वींत गुप्त होत्ये ( ३६३-३७० ); उदार भविष्य (३७१); कौसल्यादिकांचीं निधनें ( ३७२ ); भरतलक्ष्मणादिकांच्या स्थापना ( ३७३-३७७ ); काळाचें मूळ ( ३७८-३८४ ); रामाला भेटावयास आलेल्या दुर्वासाचे कोपामुळें लक्ष्मण रामाचा एकांत मोडतो ( ३८५-३९६ ); दुर्वासास अन्नदान (३९७-३९८); कराराप्रमाणें लक्ष्मणाचा त्याग (३९९-४०१); लक्ष्मणाची अवतारसमाप्ति ( ४०२-४०३ ); भरत व कुशलव यांची स्थापना (४०४-४०५); लोक बरोबर येतात व ह्या नेतो ( ४०५ ४०७ ); शत्रुघ्नसुग्रीवबिभीषणादि येतात ( ४०८-४१३ ); बिभीषणाची पाठवणी ( ४१४-४१७ ); मारुतीस निरोप ( ४१८-४२० ); जांबवंतास निरोप ( ४२१-४२३ ); कुशलवांची पाठवण ( ४२४ ); श्रीरामाचें निर्याण ( ४२५-४२९ ).

**उपसंहार** ( १-१३ ); संस्कृत समाप्ति. एकूण पद्यसंख्या **१९१३**.

| नांव | पृष्ठांक | पद्यसंख्या |
|---|---|---|
| २ बालमंत्र | १७४ (प्रत्येक कांडीं ३९ प्रमाणें) | २७३ |
| ३ मंत्रमय | १९६ | २५ |

| नांव | पृष्ठांक | | | पद्यसंख्या |
|---|---|---|---|---|
| ४ मंत्रगर्भ | १९९ (प्रत्येक कांडीं १३ प्रमाणें) | | | ९१+१ |
| ५ रम्यमंत्र | २०७ (प्रत्येक कांडीं १३ प्रमाणें) | | | ९१+९ |
| ६ दोहा | २२७ | | | ८४ |
| ७ घनाक्षर | २३२ | | | १३३+३ |
| ८ विबुधप्रिय | २६१ | | | १०७ |
| ९ सवया | २७९ | बाल | ६ | १४९ |
| | | अयोध्या | ८ | |
| | | अरण्य | ९ | |
| | | किष्किंधा | ३ | |
| | | सुंदर | ८ | |
| | | युद्ध | ३९ | |
| | | उत्तर | ७६ | |
| १० श्रीरामचरितभरितश्रीरामचंद्र-प्रार्थना | ३०३ | | | ४० |
| ११ परंतु | ३०६ | बाल | १८ | २५० |
| | | अयोध्या | १९ | |
| | | अरण्य | २९ | |
| | | किष्किंधा | ९ | |
| | | सुंदर | २४ | |
| | | युद्ध | ६२ | |
| | | उत्तर | ८९ | |
| १२ रामायणअभंग | ३२८ | | | १७५ |
| १३ आर्यागीतिमुक्तामाला | ३३५ | | | १०९ |
| १४ मत्तमयूर | ३४५ | | | ४७ |
| १५ पंचचामर | ३५० | | | ९१ |
| १६ पुष्पिताग्राश्रीरामायण-कल्पलता | ३६५ | | | ५४ |
| १७ कविप्रिय | ३७० | | | १९ |

| नांव | पृष्ठांक | पद्यसंख्या |
|---|---|---|
| १८ श्रीप्रिय | ३७३ | १०९ |
| १९ रमणीय | ३८३ | ८० |
| २० हररमणीय | ३९० | ४८ |
| २१ सु | ३९५ | १११ |
| २२ श्री | ४०५ | ५१ |
| २३ विचित्र | ४१४ | २१+१ |
| २४ सद्भक्तसर्वस्व | ४१७ | १६० |
| २५ प्रहर्षण | ४४३ | ८६ |
| २६ श्रीगुरु | ४५० | ८६ |
| २७ सीता | ४६१ | १८७+१ |
| २८ हनुमद्रामायण | ४८२ | १४१ |
| २९ रामायणपंचशती | ४९५ | ५०५ |


## सूचना

१. पद्यसंख्येंतील अधिकचिन्हापुढील १ हा आंकडा अनुष्टुप् सांच्यांतील श्लोकाचा दर्शक समजावा.

२. शुद्धिपत्रांत मुद्रणदोषांबरोबर शक्य ते अर्थदोष हि दुरुस्त करून दिले आहेत, हें वाचकानीं लक्षांत ठेवावें.


# शुद्धिपत्र

| पृष्ठ । पंक्ति | शुद्ध. |
|---|---|
| १०।२० | विघ्न |
| ११।१२ | बाळावर |
| १३।१७ | पौराग्रहासि |
| १८।४ | कार्यं |
| ७३।९ | रजनीचर ज[illegible]था |
| २२।७ | [illegible]यवरज |
| ३१।२४ | सुकंठ |
| ३५।२५ | पुरीसमीपं |
| ३८।३७ | समैते |
| ३९।२ | नियोगानें |
| ४३।६ | सुरसा मुख |
| ४३।१५ | लाहें.' १३ |
| ४७।२८ | विंशतिनेत्रो |
| ४८।२६ | मातृतुल्यभाववदिति |
| ६६।८ | गिरिशिख० |
| ६७।१७ | मातें |
| ७०।२८ | अश्वरिपवो महिषाः |
| ७३।२७ | परार्ध |
| ७५।२९ | १२. अतिपुंड |
| ८४।६ | 'नाहीं |
| ८७।२१ | विरिंचिवर० |
| ९५।१५ | काळदंडातें. ४२२ |
| ९५।२२ | रण+उपरत |
| ९८।२२ | पंक्तितुंड, |
| ९९।१७ | अत्यद्भुतबळरावणपाद |
| १०३।११ | स्वभुजच्छेदासमान |
| १०३।१२ | 'हा वीर! |
| १०३।२२ | ऋषभ वहिनी • |

| पृष्ठ । पंक्ति | शुद्ध. |
|---|---|
| १०७।१२ | औषधिगंधमयमरुत्स्पर्शे |
| १०९। २२ | मोहोभ० |
| ११२।११५ | बळरिपुकीर्तींदु० |
| ११५।४ | श्रीमद्रामबळें |
| ११७।५ | रघुराज |
| ११७।२३ | हर्षें |
| १२१।३ | चळवळ, |
| १२२।१५ | महिषी |
| १३४।२१ | पडलेल्या |
| १३५।१३ | 'चतुरा० |
| १३५।१८ | वेदांतसारवेत्ता |
| १३५।२० | वैश्रवणनाम |
| १३६।५ | वित्तपमित्र कामसंहर्ता. |
| १३६।११ | नीळा पयो० |
| १३६।२५ | ध्रुवीकृतविभीषणः। |
| १५१।१८ | दे. १९१ |
| १५८।२८ | ५: परगृहहरणनिमित्त. |
| १५८।२४ | गृध्र |
| १६५।११ | कार्याकार्यविचार |
| १६९।२४ | 'वातकुमारा! |
| १७०।५ | 'वीरा! |
| १७०।६ | निरत.' |
| २०९।१३ | मर्त्येश |
| २१७।२५ | पुढें |
| २४२।४ | देवगोब्राह्मणताप |
| २५०।२१ | मुद्गर |
| २५०।२१ | करिघंटांस |
| १५०।२२ | बा! |

| पृष्ठ । पंक्ति | शुद्ध. |
|---|---|
| ३३९।२ | कार्याकार्यविचारत्यक्त |
| ३४७।७ | भक्ता शबरीतें. १३ |
| ३४८।११ | हरि |
| ३४९।६ | वेदब्रह्मशिवे० |
| ३४९।२० | यशोलाभरतातें. ४४ |
| ३५०।१८ | सार सारसौक्ष |
| ३५५।३ | रावणादि०बुद्धिकर्ण |
| ३६०।१५ | पुन्हां |
| ३६५।८ | मुक्तिसुंदरी |
| ३६८।२ | 'वर्णा |
| ३७२।२० | प्रमोहनग |
| ३७९।६ | तोलवे. |
| ३७९।१३ | जड |
| ३८७।५ | मत्ता गजांहीं |
| ३८८।२६ | कुबेर |
| ४१५।१० | महिर्गा हि; |
| ४१५।१३ | नैर्भूषित न |
| ४१५।१८ | ७. तिलोदकाची इच्छा करणारा (मृत्यूनें ओढलेला). |
| ४१९।१४ | सत्कथेहुनि |
| ४२०।११ | गुरुसत्य |
| ४२०।१८ | फटवी, |
| ४२०।२६ | ५. दशरथवचन. |
| ४२७।२१ | राम राज्या |

| पृष्ठ । पंक्ति | शुद्ध. |
|---|---|
| ४२७।२२ | लेश |
| ४३८।१२ | पवनजा ! |
| ४४०।११ | सन्मति दीर |
| ४४३।८ | कविमतमुक्तितें |
| ४४३।२४ | दे तिस प्रमोदा. |
| ४४४।२ | तन्नासाश्रुति |
| ४४६।१७ | भ्रमवि |
| ४५५।२८ | हत्तीवर |
| ४५५।२७ | [illegible]गायक्ष |
| ४५७।१२ | धीरहेमां |
| ४५७।१४ | धात्या वर |
| ४५८।२६ | तीव्रतापा |
| ४८९।३ | मद्दुर्दशार्थ |
| ४९०।१९ | तदवस्था |
| ४९६।२८ | १. पौर्णिमेचे चंद्र. |
| ५०२।१३ | हां.' |
| ५०३।२४ | २. मयरूप अंगुली. |
| ५०६।२४ | राक्षस वृक |
| ५०९।२ | अपराध |
| ५१०।८ | चंद्रा, |
| ५१३।६ | न मीं श्रीस |
| ५१७।२८ | २. टीप रद्द |
| ५२०।११ | काळा भेका |
| ५२२।८ | यशा हंसासि |



C. S. P.

कविवर्य मोरोपंतांचें उपास्य दैवत.

## कविवर्य मोरोपंतकृत

# अष्टोत्तरशत रामायणें

## मंत्ररामायण[1]

### ( गीतिवृत्त )

### परिभाषा

श्रीमन्महामंगलमूर्तये नमः । श्रीमत्कुलदेवतायै नमः ।

श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुचरणाभ्यां नमः ।

**श्रीमद्गणेश[2]गुरुपदनखशशिकांतिच्छटा जयंतुतरां[3].**
**प्रतिभा[4]रत्नं लब्धं[5] यासु[6] मये[7]दं[8] मनस्तमोघ्नीषु[9]. १**
**ज्यांच्या हृत्कासारीं[10] होय गुणस्नेह[11]बिंदु ही फार,**
**सारज्ञ, असूयोज्झित[12], त्यांला माझा असो नमस्कार. २**
**मंत्रप्रयुक्त रचिलें चारित्र भावें चि रामरायाचें;**
**म्हणवूनि 'मंत्ररामायण' ऐसें नाम ठेविलें याचें. ३**

---

१. ह्या रामायणांत ' श्रीराम जयराम जयजयराम ' हा तेरा अक्षरी मंत्र साधिला आहे. २. सौभाग्यशाली गजानन आणि गुरु ह्यांच्या किंवा श्रीमद्गणेश ( पाध्ये ) गुरूच्या पायाच्या नखरूपी चंद्राच्या कांतीचे समूह. ३. पूर्ण जय पावोत. ४. कवित्वस्फूर्तिरूप रत्न. ५. लाभलें. ६. नखशशिकांतिच्छटांच्या ठायीं. ७. म्यां. ८. हें. ९. अंत:करणांतील मल म्हणजे पाप त्याचा नाश करणाऱ्या. हें 'यासु' ह्याचें विशेषण. १०. हृदयसरोवरांत. ११. गुणरूप तेलाचा थेंब सुद्धां. तेलाचा थेंब पाण्यावर पसरून मोठा होतो हा अनुभव सर्वांस आहे च. १२. दुसऱ्याच्या गुणाविषयीं दोष काढण्याच्या मनोभावास 'असूया' म्हणतात; या मनोभावानें टाकिलेले—अर्थात् ज्यांच्या अगीं ही खोड नाहीं असे.

श्रीकारापासुनियां मकारपर्यंत वर्ण जे तेरा,
ते राघवचरितांतीं ग्रथिले, हें रामभक्त हो ! हेरा[1]. ४
हा मंत्र बाळकांडीं आरंभीं स्पष्ट सर्व आर्यांच्या.
त्याच्या[2] विलोकनानें[2] आनंद असो मनांत आर्यांच्या; ५
आर्येच्या प्रथमदलीं[3] दुसरा तो मंत्रवर्ण समजावा
दुसऱ्या कांडापासुनि, षट्कांडीं हा चि मार्ग उमजावा. ६
एका मंत्रगुणीं मीं आर्यामुक्ता चि गुंफिल्या तेरा;
ते रामचरितमाळा कंठीं घालूनि मुक्तिसुख हेरा. ७
शिशुकांडाच्या अंतीं सप्तार्यायुक्त एक मंत्र असे;
एक अयोध्याकांडीं एका आर्येंत पूर्ण मंत्र वसे. ८
संक्षिप्त कांडपंचक अतिविस्तरयुक्त कांड तो सावा;
त्या युद्धकांडपर्वी तृप्त हि कविचित्तभृंग बैसावा. ९
केवळ उत्तरकांड श्रीरघुपतिमंत्ररत्नमंजूषा[4];
पूषा[5] खळघूकांचा[6], अतिसुखदा सर्वसाधुची भूषा[7]. १०
देहीं आत्मा, तैसा आर्यांतीं मंत्रवर्ण सांग वसे;
सूक्ष्मदर्शावांचुनियां[8] कथापराला[9] चि तो कसा गंवसे[10]? ११
श्रीकारें[11] असे पूर्वी सर्वग्रंथांतरांत रा जाणा,
अंतीं मकार, एवं श्रीराम असें तरी मनीं आणा. १२
सर्वत्र एक आत्मा, म्हणउनियां वंदिती जसे ज्ञानी,

---

१. पहा. २. खोडलेला पाठ—**त्या वर्णपंचकानें**. ३. पहिल्या चरणांत. ४. पेटी, करंडा. ५. रविः—**पंत**. ६. दुष्ट हे च घुबड त्यांचा. ७. लेणें. ८. सूक्ष्म दृष्टि ज्यांची आहे अशांशिवाय. ९. गोष्टीवरच चित्त ठेवणाऱ्यास. १०. सांपडे. ११. श्री, रा, म. ‘ श्री ’ शब्द लक्ष्मीवाचक. ‘ रा ’ ‘ रै ’ म्हणजे लक्ष्मी असा सस्कृत शब्द आहे. त्याचें प्रथमेचें एकवचन ‘ रा ’ असें होतें; तेंव्हां ‘ रा ’ हा हि शब्द लक्ष्मीवाचक होय. ‘ म ’ ‘मा ’ म्हणजे लक्ष्मी तर प्रसिद्ध च आहे. तेंव्हां ‘ मा ’ चे ऐवजीं ’ ‘मकार’ अशी पदरचना केलेली आहे. अर्थात् हा अवघा ग्रथ श्रीयुक्त म्हणजे मंगलप्रद आहे असा ध्वनि (?).

हा ग्रंथ मंत्रगर्भित, यास्तव नमिजेल सर्व सुज्ञानीं. १३
मंत्रास्पद[1] यास्तव हा ग्रंथ कवींला असे सदा हितसा,
गरुडास रमापतिपदपद्मांकितमूर्धकालिया[2]हि तसा. १४
नृपमुद्रांकित पत्र प्रजेशि होतें जसें शिरोधार्य,
प्रभुचरित मंत्रचिह्नित, यास्तव धरितील मस्तकीं आर्य. १५
आर्यकथाछंदानें[3] आर्याछंदें[4] चि जन्मलीं सरलें;
याणें माझें तनुवाक्कर्ममनःपाप सर्वथा सरलें. १६
गीर्वाणशब्द[5] पुष्कळ, जनपद[6]भाषा चि देखतां थोडी,
यास्तव गुणज्ञ लोकीं याची घ्यावी हळूहळू गोडी[7]. १७
प्राकृतसंस्कृतमिश्रित, यास्तव कोणी म्हणेल जरि कंथा,
भवशीतभीतशांतस्वांताला[8] दाविला बरा पंथा[9]. १८
कोठें दूरान्वित पद, कोठें चुकली असेल यतिमात्र[10];
'अतिमात्र दोष' ऐसें न वदोत कवी समस्तगुणपात्र. १९
ग्रंथीं अष्टादशशत आर्या, आणीक ही पुढें ऐशी;
चतुरूनसार्धशतमित[11] मंत्र हि, संख्या विलोकिजे ऐशी. २०

इति श्रीमन्मंत्ररामायणे श्रीरामनंदनमयूरेश्वरकृतौ परिभाषामंगलसर्गः प्रथमः ।

---

# बालकांड

श्रीकांतपौत्र नारद भगवत्पदपद्मभृंग, सद्योगी,
आला वाल्मीकिमुनिस्थानाला तो जगद्धितोद्योगी. १
'राघवचरित्र भावें गावें' ऐसा करूनि उपदेश,

---

१. मंत्रस्थान. २. श्रीकृष्णचरणकमलाचें चिन्ह असलेलें मस्तक ज्याचें तो कालिया सर्प. सर्प आणि गरुड ह्यांचें शत्रुत्व प्रसिद्ध आहे च. ३. श्रेष्ठ जो रामचंद्र त्याच्या चरिताच्या नादानें. ४. आर्यावृत्तें. ५. संस्कृत शब्द. ६. देशी भाषा. ७. गोधडी. ८. संसाररूप थंडीनें भिऊन स्तब्ध झालेल्या मनास. ९. मार्ग. १०. विरामस्थान. ११. चार कमी दीडशें अर्थात् एकशें शेचाळीस. मूळ पोथींत १४६ आंकडा घातला आहे.

गेला हरिगुणकीर्तनपरवश तो निर्जरर्षि, वरदेश. २
मग वाल्मीकिमुनीश्वर निजशिष्यजनासमेत तमसेला[1]
माध्यंदिननियमार्थ स्वधर्मनिष्ठ, प्रबुद्ध[2], तो गेला. ३
जगतीसुर[3] तो, जाउनि तमसातीरीं, स्मरेषुविद्धातें[4]
क्रौंचखगातें पाहे, निजपत्नीप्रीतिपाशबद्धातें. ४
यमतुल्यें निष्करुणें, रति करितां, क्रौंच तो निषादानें
वधितां, करुणाब्धि द्विज वदला तेथें असे विषादानें:– ५

मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः ।
यत्क्रौंचमिथुनादेकमवधीः काममोहितं ॥

रागें वदतां, जाली प्रकट छंदोमयी[5] असी वाणी;
तेव्हां विस्मित मुनि तो नियम करुनि हें च मानसीं आणी. ६
मनन करी मुनिवर तों, त्याच्या स्थानासि येउनी धाता[6]
सांगे, 'नारदकथित प्रभुचरित वदें' म्हणोनि वरदाता. ७
'जगदीशचरित वर्णी, तच्छ्रवणें सर्व तरतिल प्राणी;
यास्तव वाल्मीके! तुज म्यां हे छंदोमयी दिली वाणी. ८
यक्षवैरानुजारिपुचें[7] रामाचें चरित नैक[8]पद्याहीं
हृद्याहीं[9] वर्णावें; त्वत्कृति नमिजेल ते सुविद्याहीं.' ९
जलजोद्भव[6] तो ऐसें वदोनि जातां, तद्दीयवरदानें
रामायणाख्य रचिलें काव्य मुनीनें, सुखप्रकरदानें[10]. १०
'यश विभुचें पढवावें कवणाशि?' म्हणे 'बहुश्रुताशि' कवी;
तों नृपसुत कुशलव तो, कुशल विलोकूनि, त्यांशि हें शिकवी. ११
रात्रिंदिव मधुरस्वर इतस्ततः[11] प्रीतियुक्त ते गाती;
तें ऐकुनि, रघुवीरें नेले स्वसभेशि बंधु सांगाती. १२

१. नदीविशेष. २. ज्ञानी. ३. भूसुर; ब्राह्मण. ४. कामशरताडित अशातें ५. वेदरूप किंवा श्लोकरूप. ६. ब्रह्मदेव. ७. यक्षांचा स्वामी जो कुबेर त्याचा कनिष्ठ बंधु रावण त्याच्या रिपूचें म्हणजे रामाचें. ८. न+एक=नैक=अनेक. ९. मनोहर अशानीं. १०. सुखसमूह (अत्यंत सुख) देणाऱ्यानें. ११. इकडे तिकडे.

मणिमयभद्रासनगत राम स्वजनांशि काव्य आयकवी;
त्यांशि म्हणे, 'तें गा हो! जें वदला सर्वविप्रराय कवी.' १३
श्रीरघुनाथनिदेशें कथिता जाला जसें कवीन[१] मुनी,
कुशलव कुशलवचनपटु गाती, गुर्वंघ्रिला[२] मनीं नमुनी. १४
राजप्रिया अयोध्या कोसलदेशीं यथार्थनामा जी,
तीतें अजसुत दशरथ पाळी, जो ख्यात या जनामाजी. १५
मखवनप्रौढकरें, धर्मपरें, देवकार्यसिद्धिकरें
दशरथनृवरें केलें त्रिभुवन धवल स्वसद्यशःप्रकरें. १६
जगतीपतीस होत्या सार्धत्रिशत प्रिया अजश्रेष्ठा;
कौसल्या, कैकेयी आणि सुमित्रा तयांत ही श्रेष्ठा. १७
यमनियमें, पुत्रार्थे, क्षितिपें, सुरपूजनाद्यधीनमनें,
इच्छादानें, मानें, तोषविले मंदधी, सुधी नमनें. १८
राजास सौख्य कांहीं प्राप्त न जालें चि पुत्ररत्नाचें;
यास्तव चिंताकुळ तो मानी वैफल्य सर्व यत्नाचें. १९
'मनुवंशीं जन्मुनियां, जालों अनपत्य मीं, न लोक[३] मला;
यास्तव हयमेधीं हे द्यावी द्विजहस्तकीं' म्हणे 'कमला'. २०
जनपति मग यज्ञास्तव वसिष्ठमुखभूसुरांशि तो प्रार्थी;
त्याहीं तोषविला बहु आशीर्वादें नृपाळ पुत्रार्थी. २१
'यजनाचें साहित्य क्षिप्र करीं' यापरी अनुज्ञा ते
करुनि, यथागत[४] गेले वसिष्ठमुख भूमिनिर्जर[५] ज्ञाते. २२
जयशाली भूप म्हणे मंत्रिजनाला, 'समस्त संभार[६]
सरयूतीरीं करणें, तुम्हांवरी हा असे महाभार' २३
यत्नें साहित्य तदा करूनियां ते प्रधान यज्ञाचें,
आनंदविती मानस कौसल्यांजानिचें[७], नयज्ञाचें. २४
राजेंद्रासि म्हणे तों सुमंत्रनामा प्रधान अनवीन[८],

१. कविश्रेष्ठ. २. गुरुपदाला. ३. गति. ४. आले तसे. ५. ब्राह्मण. ६. तयारी.
७. कौसल्या आहे जाया ज्याची त्या दशरथराजाचें. ८. जुना.

‘आज्ञा असेल तरि मीं हितकाम तुज्या पदास विनवीन. २५
मनुजाधीशा! वदला भविष्य पूर्वीं सनत्कुमार मुनी;
तें आइकिलें ऋषिजनवदनें मीं, तत्पदांबुजीं रमुनीं.’ २६
श्रीविधिनंदन वदला, ‘आद्ययुगीं कीं विभांडकर्षिसुत,
मुनि ऋष्यशृंगनामा होइल, सद्वृंदवंद्य, लोकनुत[1]. २७
राष्ट्राच्या क्षेमास्तव त्याला नेईल लोमपाद[2], तदा
होईल वृष्टि, तेव्हां देइल शांता सुता स्ववांछितदा[3]. २८
मनुवंशज दशरथ नृप असेल अनपत्य, लोमपादसख;
तो त्या मुनिप्रसादें पावेल अनन्यलभ्य पुत्रसुख. २९
जननार्थ नंदनाच्या प्रार्थुनि तो ऋष्यशृंग आणावा;
अनपत्यतासुखद्रुम मुनिप्रसादें समूळ खाणावा.’ ३०
यजमानें अजपुत्रें हें ऐकुनि, जाउनीं, पदीं नमुनी,
सत्कारुनि, शांतेसह नगरा नेला कृपानदीन[4] मुनी. ३१
राघवधृतपद, काश्यपपुत्रवसिष्ठप्रभृत्यवन्यमर[5]
हयमेधासि, यथाविधि, संपादिति वेदनीरजभ्रमर[6]. ३२
मग पुत्रेष्टी करितां, हविराहरणार्थ, भूमिवर लेख
आले विधि, सुरनायक, चूडारत्नीकृतक्षेवरलेख[7]. ३३
[8]जगदीश्वरनिजनाभीसरोवरोद्भूतपद्मजनितातें
म्हणती रावणपीडित जन ‘रक्षावा स्वकीयजन तातें. ३४
यमसम पीडा करितो तो खळ; आम्हांसि मरण ही नाहीं;
तद्बळपराजितांहीं किजे कसें [9]त्यासम रण हीनांहीं[10]?’ ३५
जलजोद्भव, हें परिसुनि, जाय सुरांसहित सिंधुकूलातें[11];

---

१ लोकांनीं स्तविलेला. २. राजविशेष. ३. स्वमनोरथपूरकास. ४. कृपासागर. ५. अवनि+अमर=भूसुर=ब्राह्मण. ६. वेदरूपी कमळांतील भुंगे. ७. शिवः—**पंत.** शिरोभूषण केला आहे चंद्र ज्याणें. ८. जगदीश्वराच्या स्वतःच्या नाभिरूप सरोवरापासून उत्पन्न झालेल्या कमलापासून जन्म आहे ज्याचा असा ब्रह्मदेव त्यातें. ९. त्याजबरोबर. १०. हतवीर्यांनीं. ११. समुद्र-(क्षीरसमुद्र)-तीराला.

तेथें स्तविता जाला श्रीशातें, सज्जनानुकूलातें. ३६
यजितां, अजित प्रकटुनि देवांला दर्शनें सुखी करवी
शरणागतजनसंसृतिभीतिध्वांतप्रभंजनैकरवी.[1] ३७
राजीवलोचनें त्या देवोक्ताचें करूनियां श्रवण,
'मा भैष्ट'[2] अशा शब्दें तोषविले स्वांघ्रिपंकजप्रवण. ३८
मधुमथन म्हणे, 'जन्मुनि दशरथदारोदरीं, जगद्वेषी
मारीन; तुम्हीं व्हावें स्वांशानें वानरर्क्ष[3] सद्वेषी.' ३९
श्रीकांत, वदोनि असें, अदृश्य होतां स्वयें, तदा ज्ञाते
ब्रह्माद्यमर यथोक्त प्रवर्तले, नमुनियां तदाज्ञा, ते. ४०
राशि तपाचा काश्यपमुनि पुत्रेष्टी करी, तदा निकट
प्राजापत्य[5] पुरुष, त्या कुंडापासूनि, जाहला प्रकट. ४१
मनुजेंद्रकरीं देउनि पायसपरिपूर्णहेमपात्रातें,
'दे भार्यांशि' म्हणे 'हें होइल भवसागरीं नृपा! त्रातें.' ४२
जन्म सफळ मानुनि, तो स्वपायसाचे करूनि युगं[6] भाग,
कौसल्येला देउनि, कैकेयीला हि दे महाभाग. ४३
यद्यपि भूपें न दिला भाग सुमित्रेसि, तरि हि त्या तीतें
निजभागार्ध समर्पुनि, आनंदविती अपार नृपतीतें. ४४
राय, यजनावसानीं, विभांडकसुतादिभूसुरसभा जी,
मणिहारादिविभूषानिवेदनें,[7] नतिपुरःसर, संभाजी.[9] ४५
महिषी अंतर्वत्नी[10] होउनियां, त्या तनुप्रभानिकरें
चिंतातमासि जिंकिति, नृपसुखपृष्ठासि थापटूनि करें. ४६
जनकल्याणद शोभन काळीं त्या प्रसवल्या नरेशस्त्री;
ते वेळा जाली तैं बंधनविच्छेदनक्षमा शस्त्री.[11] ४७

---

१. शरण आलेल्या लोकांच्या संसारभयरूप अंधकाराला नाश करणारा सूर्य. २. भिऊं नका. ३. वानर आणि आस्वल. ४. उत्तम प्रकारें नटलेलें. ५. प्रजापति देवता ज्याची असा. ६. दोन. ७. समर्पणें; देणगीनें. ८. (अमरद्वीप). ९. पूजी. १०. गर्भवती. ११. तरवार.'

यज्ञेश्वर कौसल्येपासुनि पावे सदिष्ट[1]जननास,
ज्यास्तव होणार जगीं सज्जनकल्याण, दुष्टजननास. ४८
जन्म ज्येष्ठसुताचें मध्याह्नीं, चैत्रमाससितपक्षीं
जालें, कर्कटलग्नीं, नवमीदिवसीं, पुनर्वसुनृक्षीं. ४९
यमळें[2] सुमित्रा प्रसवे यमलक्षण जे असाधुलोकांचे,
एकातें कैकेयी, नृप करि संस्कार सर्व तोकांचे. ५०
राम असें दशरथ नृप अन्वर्थ ज्येष्ठसूनुचें नाम
ठेवी; भरत असें तो कैकेयीजास, लब्धनिजकाम. ५१
महदानंदें दशरथ भूप सुमित्रासुतांशि सुविधानें
लक्ष्मण शत्रुघ्न असीं ठेवी सारीं यथार्थ अभिधानें. ५२
श्रीसूर्यवंशमणि तो करि पुत्रांचीं यथोक्त[3] उपनयनें[4];
संतत अतृप्तचित्तें सेवी तन्मुखरुचीस नृप नयनें. ५३
राक्षसपीडाव्याजें कौशिक मागोनि दशरथाजवळी,
हृदयीं रामाभिधनिजपुण्यफळातें[5] महासुखें कवळी. ५४
महामर बलातिबला[6] विद्या दे क्षुत्तृषार्तिहरणार्थ[7];
अर्पी धनुःश्रुतीतें[8], सज्जनरक्षार्थ, दुष्टमरणार्थ. ५५
जन्य[9] कराया, रोधी मुनिच्या मार्गासि ताटका चंडी[10]
विश्वामित्रानिदेशें तीस वधी सर्वलोककोदंडी. ५६
यश जोडाया, जाउनि सानुज विभु आश्रमास, यज्ञाचें
त्राण करी; असुरवधें मन सुखवी मंत्रसंचयज्ञाचें[11]. ५७
राजा जनक मुनीतें, स्वक्रतुसिद्ध्यर्थ, धाडुनी मंत्री,
'दर्शन देउनि मातें धन्य करावें' म्हणूनि आमंत्री[12]. ५८

---

१. साधुजनांस आवडलेल्या जन्मास. २. जुळें. ३. यथाशास्त्र. ४ व्रतबंध. ५. राम नांवाच्या स्वतःच्या पुण्याच्या फळास. ( श्रीराम म्हणजे केवळ आपल्या पुण्याच मूर्त फळ च असा भाव ). ६. विद्याविशेष. ७. भूक आणि तहान ह्यांचा त्रास नाहींसा व्हावा म्हणून. ८. धनुर्वेदातें. ९. ( अमरटीप ). युद्ध. १०. क्रोध-युक्त. संस्कृत रूप 'चंडा' असें आहे. ११. मंत्रसमूहास जाणणाऱ्या विश्वा-मित्राचें. १२. पाचारण करिता झाला.

मर्त्याकृतिला विभुला नेतां, मार्गी कथी पुरावृत्ता;
चरणें मुनिपत्नीतें उद्धरवी, कामसुखपरावृत्ता. ५९
जनकपुरा मग जाउनि, भंगुनि भवचापदंड बाळपणीं,
कौशिकमुनिप्रसादें, जिंकी रघुवीर जानकीस पणीं. ६०
यतचित्तें त्या जनकें, धाडुनि शिबिकारथेभवाहातें,
दशरथ, पूर्णमनोरथ, सांतःपुर, आणिला विवाहातें. ६१
जनपदजन बहु तेव्हां मिळते जाले कवि प्रभूपर्यमीं;
गंधर्व, यक्ष, चारण, किन्नर, सुरलोक, विप्र, भूप, यमी. ६२
यज्वा जनक, स्वौरस कन्या जे उर्मिला, तिचा पाणी
लक्ष्मणवीराकरवी धरवी; तें लोक फार वाखाणी. ६३
राजाचा अनुजन्मा, कुशध्वजाख्य प्रसिद्ध, तो कन्या
श्रुतकीर्ति रिपुघ्नाला दे; भरताला हि मांडवी धन्या. ६४
महदुत्सवें विवाहीं अर्पी नृप जांवयासि नगरांशी
पूजुनि पंक्तिरथातें, आज्ञा दे जावयासि नगराशी. ६५
श्रीकंठशिष्य भार्गव, शिवचापध्वंसकुपित, आला जो,
हरिलें तद्यश रामें जें, त्याला कां न चंद्रमा लाजो? ६६
राग मनांतिल पहिला जातां, दुसरा चि राग मग जाला;
महदानंदें भार्गव गेला, विनवूनि कपटमनुजाला. ६७
जयशाली राघव तो करी अयोध्यापुरीं प्रवेशास;
यत्न न करितां जिंकुनि बाहुजकाळास, विप्रवेशास. ६८
राजा, पुत्रचतुष्टयलाभें, अनुरूपतद्वधूलाभें,
'मत्सम सुखी न कोणीं लोक' म्हणे 'मृत्युचें हि न मला भें[12].' ६९
जन, हृत्पद्मीं पावे सुखवृद्धीतें, तसें तसें फार

---

१. गौतमजाया–**पंत.** २. स्त्रियांसह. ३. विवाहीं–**पंत.** ४. योगी. ५. भूषण-समूह. ६. दशरथातें. ७. ह्या मंत्राच्या रचनेसंबंधानें परिभाषेंतील आठवी आर्या पहावी. ८. प्रेम, प्रीति. ९. दिसण्यांत मानव जो त्या रामास. १०. क्षत्रिय-काळ–**पंत.** ११. दिसण्यांत मात्र ब्राह्मण, पण वस्तुतः परमात्मस्वरूप अशा परशु-रामास. १२. भय.

यश ही वाढे सर्व्वीं, रघुवीर जसा जसा महोदार. ७०
जगतीहृत्तापातें हळूहळू [1]कीर्तिभाधिपें विझवी;
यत्नेंकरूनि गुरुजन चित्तातें सच्चरित्र तो रिझवी. ७१
राज्यसुखाहुनि दशरथ पुत्रसुखें हृष्ट पुष्ट जाला; जे
मर्त्यैतर त[2]त्पति ही कश्यप ही त्याशि सुप्र[3]जा लाजे. ७२

इति श्रीमन्मंत्ररामायणे श्रीरामनंदनमयूरेश्वरकृतौ बाळकांडे षष्ठोमंत्रः ।
मंत्राः षडत्र विज्ञेया बालकांडेऽमृतप्रदाः । विलोकनीयाः सततं
दोषज्ञैर्दोषवर्जितैः ॥ श्रीरामचंद्राय नमोस्तु नित्यं ।

---

# अयोध्याकांड

स्व श्री ज्येष्ठसुतातें द्यावी हें मानसांत नृप आणी;
दिधलें वसिष्ठमुनिनें अनुमोदन, ऐकतां असी वाणी. १
सा रा सारविचारप्रवीण मुख्य प्रधान जे होते,
पुसतां हें, नृपतीतें म्हणती ‘लोकेष्ट’ सर्व ही ‘हो’ ते. २
क्षमा मं[4] र वसिष्ठ पाहे, हर्षातें आवरूनि, योगा[5]तें;
अभिषेकाचें करवी साहित्य, करूनियां नियो[6]गातें. ३
अ जँ[7] सुतचिकीर्षितातें जाणुनियां, शीघ्र मंथरा दासी
कैकेयीला सांगे; तों ते पावे महाविषादासी. ४
स्वी य सुतातें राज्यप्राप्ति असावी म्हणूनि, मानवंती
रामाभिषेकसमयीं विघ्न करी; त्या[8]सि देवें[9] मानवती. ५
त्या रा जेंद्रें केले जाउनि, सामाद्युपाय, जे असती;
तरि समजेना, जडली तीस पिशाची च मंथरा अस[10]ती. ६

---

१. चंद्रें–पंत. कीर्तिरूप कांतीश चंद्र त्यायोगें. २. इंद्र. ३. उत्तम संतती ज्याला आहे अशा दशरथास. ४. भूदेव, ब्राह्मण. ५. ग्रहादि सुयोगातें. ६. आज्ञेतें. ७. दशरथाच्या इच्छितातें. ८. मानिनी कैकेयी. ९. देवांस हें विघ्न पसंत पडलें. १०. दुष्टा.

‘दे म त्सुतासि पृथ्वी, अटवी रामासि,’ हें वदोन, वरें
सत्यप्रतिज्ञ मूर्छित केला, मागोन हे च दोन वर. ७
नि ज सुतवियोगविह्वळ, सत्यच्युतिभीत, तो असा विनवी,
‘ कैकेयि! तुझा ठाईं निर्दयता हे असी नसावि नवी. ८
व य माझें बहु गेलें, पुत्रोत्पत्त्यर्थ यत्न बहु केला;
त्यासीं वियोग करितां, न कसी धरिसी मदं[2]तशंकेला? ९
तु ज राज्य सर्व दिधलें, आणिक ही माग जें अभीष्ट तुला;
गुणवदपत्यवियोगक्लेशासि जगत्त्रयीं नसे चि तुला. १०
का य तुजा रामानें केला अपराध? सांग गे प्रमदे!
कां माज्या बळावर करिशी हा कोप? सांग गे श्रमदे! ११
हा रा ज्ञि! पुत्र माझा सुकुमार, कुमार, बहुविनीत, कृती,
त्वत्पदलीन, तरी ही याविषयीं कां तुझी अशी प्रकृती? १२
कां म ति धरिली नंदनवियोगवह्नींत कांत होमाया?
कां मज वृद्धावरिली कैकेयी! त्यागिली अहो! माया? १३
हे, श्री पतिप्रसादें, वृद्धपणीं पुत्र जाहले च्यार;
हें जाणुनि, हें वर्तसि, जाला तुज काय भूतसंचार?’ १४
त्या रा यें कैकेयीगुणें, करुनियां तदा विलापातें,
स्त्रीतें, पुत्रवियोगें होणार प्रांत, दाविला पा[3]तें. १५
तों म[4] ध्यममातेच्या गृहासि जावूनि जों पहातात
राघवलक्ष्मण, मूर्छित जनक विलोकूनि, म्हणति ‘ हा तात!’ १६
तें ज ननीला पुसतां मूर्छेचें कारण स्वयें राम,
पूर्वकथा सांगुनि ते प्रकट करी आपुला मनःकाम. १७
आ य कतां राम म्हणे, ‘माते! देवा[5]रिचा रिपु त्रा[6]स
सत्यविनाशापासुनि कां धरितो निर्मुनीं हि पुत्रास? १८
हा रा ज्यभार सारा भरतें घ्यावा शिरीं, जरी श्रम ही;

---

१. पति. २. मला मरण येईल ह्या भीतीला. ३. [मूर्च्छित] पडण्यानें. ४. कैकेयीच्या. ५. दैत्यांचा. ६. भीति.

पितृसत्यत्राणास्तव[1] मीं सेवावी सुखें अरण्यमही.' १९
स्व म त प्रकट करुनियां, रघुपति तीतें करूनियां नमन
गमन करी धैर्यार्णव, ज्याचें तिळमात्र भंगलें न मन. २०
नि ज मातेला सांगे राघव भरतप्रसूचारित्रास;
तें ऐकतां, धरी ते पतिसुतदुःखें मनीं पारित्रास. २१
अ य शोकासह हृदयीं रामासि धरूनि, माय फार रडे;
बाष्पोदकें सचैल स्नपन[2] तदा त्या रघूतमासि घडे. २२
'म ज ही समागमें ने; तुजवांचुनि ही पुरी मला कारा[3];'
ऐसें वदोनि हृदयीं घट्ट धरी ते सुनिर्मळाकारा. २३
श यें[4] जोडुनि राम म्हणे, 'जननि! उपेक्षूं नको पिता माजा;
कैकेयीशब्दशरक्षत[5], मद्विश्लेषविकळ[6], हा राजा.' २४
हा रा ज्ञी सुतशब्द श्रवण करुनि, होय ते विगतहारा[7];
'हा राम!' म्हणोनि करी उरीं प्रहारासि वर्जिताहारा[8]. २५
न म न करुनियां निघतां, न सके माता सुतास वरजाया[9];
जाया हि निघे त्याची, लक्ष्मण ही सिद्ध जाहला जाया. २६
ते श्री काय पुरीची, सीताव्याजें[10], रघूत्तमास हित
जाणोनियां निघाली, निवारितां ही, प्रियोत्तमासहित. २७
हें रा यासि कथाया, कैकेयीच्या स्वकीयगेहातें
जाउनि, सुमंत्र वाक्यें[11] कळवि, नमुनि तातपदयुगें हातें. २८
सु म ति सुमंत्र हि विनवी कैकेयीतें अनेकवचनांहीं;
परि तद्दुरुक्तिबाणें[12] न फुटे ऐसें जनीं कवच नाहीं. २९
'तु ज वनवास बरा कीं ताताला नरकवास?' हें अदया,

---

१. पित्याचें वचन खरें व्हावें म्हणून. २. स्नान. ३. बंदिशाला. ४. कर. ५. कैकेयीच्या वाग्बाणानें दुखवलेला. ६. माझ्या वियोगानें विह्वळ. ७. हाररहिता. येथें 'हार' ह्या शब्दाच्या योगें 'भूषणें' असा अर्थ घ्यावा. ८. टाकिलेलें आहे खाणेंपिणें जिनें अशी. ९. प्रतिबंध करावयास. १०. सीतेच्या मिषानें, सीतेच्या रूपानें. ११. म्हणणें. १२. त्या कैकेयीच्या दुरुक्तिरूप बाणानें.

निर्लज्जा कैकेयी रामासि पुसे महादृषद्धृदया.[1] ३०

रा य असें आयकतां, 'हाय!' म्हणे 'बायको न हे, कृत्या;[2]
काय करूं? जाय वना, बा! यश जोडीं, करूनि सत्कृत्या.' ३१

तों रा क्षसी तसी ते रामातें 'वल्कलें' म्हणे 'धरणें;
चवदा वर्षे विपिनीं राहोनि स्वात्मतात उद्धरणें.[3]' ३२

श्र म न गणुनि सावरजें रामें केलें तिच्या मनासारें;[4]
वल्कें धरितां भिजली पुरभू जननेत्रजीवनासारें.[5] ३३

ग ज गति सुकुमार असीं तिघें निघालीं वनासि पदचारें;
स्वरथ दशरथ प्रेषी, सुमंत्रमंत्रिप्रयुक्तसुविचारें. ३४

तो य जपत्राक्षातें[6] तो यजमानाचिया निदेशाला[7]
कथुनि, प्रार्थुनि, यानीं[8] स्थापुनियां, ने तद्दिष्टदेशाला.[9] ३५

भि ज विति सज्जन पौर क्षोणीला बाष्पजीवनासारें;
जाती रामासह तें; पुर भासे त्यांसि पितृवनासारें.[10] ३६

पा य धरुनियां म्हणती, 'रामा! आम्हीं तुझे चि सांगाती.'
रडती, पडती, पढती स्तोत्रें, त्याच्या चि कीर्तिला गाती. ३७

पौ रा प्रहासी जाणुनि, निजल्या स्थानीं, करूनियां मंत्रें,[11]
आमंत्रण[12] न करुनियां, वंचुनि, निशि जाय राम ससुमंत्र. ३८

अ म रनदीच्या तीरीं गेला रघुवीर शृंगिबेरातें;
तेथें गुहनाम वसे निषादपति, जो हसे कुबेरातें. ३९

तो श्री दशरथनंदन आला, हें ऐकतां चि, सप्रकृती[13]
येउनि करी सपर्या[14] वृत्तश्रवणें सखेद, सुप्रकृती.[15] ४०

'सा रा विभव[16] तुजा-मीं दास' म्हणे 'ये पुरासि भवनाला;

---

१. प्रचंड पाषाणाचें हृदय आहे जीचें. २. तामसदेवताविशेष. ३. सोडविणें मुक्त करणें. ४. मनासारखें. ५. लोकांच्या नेत्रोदकाच्या अतिवृष्टीनें. ६. कमळपत्राप्रमाणें नेत्र असणाऱ्यातें. ७. आज्ञेला ८. रथीं. ९. त्या रामास रुचणारा जो प्रदेश त्याप्रत. १०. स्मशानासारखें. ११. मसलत. १२. न विचारितां. १३. प्रधानासह. १४. पूजा. १५. भला; चांगल्या मनाचा. १६. संपत्ति.

राज्य प्राज्य[1] करावें, यान[2] करावें कदापि न वनाला.' ४१
सा म पुरःसरवाक्यें राम म्हणे, 'या मदीय नेमातें
रक्षावें धर्मज्ञा !; तोषविलें त्वां सुहृज्जनें मातें.' ४२
र ज नी पादपमूळीं[3] वाहुनि, पावोनि या प्रभाताशी,
वंदी रविला, ज्याची नित्य तमाला महाप्रभा ताशी[4]. ४३
'जा य' सुमंत्रासि म्हणे राघव 'रघुवंशभवनदीपाशीं[5];
सुखरूप वसें.' आपण गेला हरिपादभवनदीपाशीं[6]. ४४
तो रा म सुरनदीतें मग गुहनौकाश्रयेंकरूनि तरे;
मायानदीस जैसा जन याच्या भक्तिसंश्रयें[7] उतरे. ४५
'ने म जला सांगातें, लक्ष्मण जैसा तसें चि मज लेख[8];
हें वदतां तो वारी गुहासि सामोत्तरें मनुजलेख[9]. ४६
द्वि ज तरुलताढ्य आश्रम रामाच्या दे नितांत मोद मना;
जेथ भरद्वाजरुचि प्रकाशितां भू हसे तमोदमना[10]. ४७
न य कुशल राम वंदी शिरीं भरद्वाजपादकमळातें;
तो हृदयीं आलिंगुनि वर्षे सानंद बाष्पकमळातें[11]. ४८
पू ज न करूनि, आज्ञा, आशीर्वादासमेत, दे सुमुनी;
तत्तापासह राघव गेला, तेथूनि, तत्पदें नमुनी. ४९
भ य वर्जित, जाउनियां, वसवी[12] तो चित्रकूटशैलास;
जैसा सेनानीचा तात, शिवानाथ[13], देव, कैलास. ५०
थो रा श्रमें सुमंत्र हि, जाउनि नगरीं, अजात्मजास नमी;

---

१. मोठें. २. जाणें. ३. वृक्षतळीं. ४. क्षीण करी. ५. रघुकुलरूपी गृहांतील दिव्याजवळ. ६. विष्णूच्या पदापासून उद्भव असणाऱ्या नदीजवळ अर्थात् गंगेपाशीं. ७. भक्तीच्या आधारानें. ८. गण, मान. ९. नरदेव. १०. सूर्यास. ११. नेत्राश्रु. संस्कृत प्रयोग 'बाष्पांबु' पहा. 'कमल' शब्दाचा अर्थ येथें 'पाणी' असा करणें. १२. पर्वतावर वसति करिता झाला. 'वसवी' हा प्रयोग ध्यानांत ठेवण्याजोगा आहे. हल्लीं प्रायः 'स्थापन करणें' असा अर्थ होतो. उदाहरणार्थ, 'नगर वसविणें.' १३. भवानीपति श्रीशंकर.

नृप त्यास म्हणे, 'दुःखें जालों बा! आज यमपथासन[1] मीं. ५१
तो म त्पुत्र सुखी कीं जो म्यां पापें वनास घालविला?
हें काय योग्य केलें? बापा! आनंददीप मालविला! ५२
हे[2] श्री भारावह मज, यश गेलें, रात्रिंदिन मनीं झुरतों;
जलदाभकाय, पंकजनयन न येतां घरास, मीं मरतों. ५३
मि[3] श्री म्हणोनि वदनीं निजहस्तें घातली पहा सिकता;
कैकेयीस वरुनियां, वश जालों, नीति शिकविता शिकता. ५४
त्या रा जीवदलाक्षें कथिलें मज काय? सांग तद्वृत्ता;
सौमित्रि काय वदला? सीता आहे कसी सुसद्वृत्ता?' ५५
या म नुजेंद्रोक्तीतें श्रवण करुनि, तो सुमंत्र त्यास म्हणे,
'वज्रहृदय मीं निर्दय कथितों तें सर्व ऐक राजमणे!. ५६
तु ज वंदुनियां येथुनि गेला रघुवीर शृंगिबेरातें;
जाला पूज्य गुहातें, जैसा गौरीपती कुबेरातें. ५७
प य फळ भक्षुनि, रचिल्या वटदुग्धें[4] त्या स्थळीं जटा रामीं;
त्या देखिल्या सुहृज्जनहृदयाच्या भेदित्या कटारा मीं. ५८
ते रा जसुता सीता सेवितसे प्रेमयुक्त कमळाक्षा;
जीचे, वनसंचारें, दिसती पद रक्त, जरि नसे लाक्षा[5]. ५९
ग म नश्रम न गणुनि, तो लक्ष्मण दृढ मानसीं, जसी अशनी;
स्वकरकृताग्रजशयनाजवळ चि जागे निरिच्छ जो अशनीं[6]. ६०
स ज लघनश्याम मला 'जा' ऐसा करुनियां नियोगातें,
गंगेला उतरुनियां गेला, देऊनियां वियोगातें.' ६१
आ य कतां हें मूर्छित जाला नृपती; तयास कौसल्या
जलवातकरस्पर्शीं सावध करि, दावुनि स्वकौशल्या. ६२
अ ज सुत रात्रीं स्मरतां स्वकर्म, महिर्षीस सर्व निजवृत्त

---

१. मरणाच्या वाटेंत बसलेला. २. परिभाषा—गीति ८ उत्तरार्ध पहा. ३. मिश्रीति देशभाषायां शर्करानाम—**पंत**. ४. वडाच्या चिकानें. ५. लाख, अळिता. ६. आहारांत, खाण्यांत.

सांगे, कौसल्यांकस्थितमस्तक, अस्तशक्ति[1], सद्वृत्त[2]. ६३

'तो य जदलाक्षि ! पूर्वी मीं, मृगयालुब्ध, एकदा रातीं
सरयूतीरीं होतों, शरपाणी, एकटा, मृगाराती[3]. ६४

नी रां दानागतमुनिपात्ररवाकर्णनें[4] अजाणानें,
तापस गजभ्रमानें वधिला मीं, शब्दपाति[5] बाणानें. ६५

म म बाणविद्ध तापस ' हा तात ! ' असें म्हणोनि आरडला;
तों मीं धांवत जाउनि विलोकिला तो, धरेवरी पडला. ६६

'हा श्री मुने ! तुजा मीं निष्कारणशत्रु वध्य; सकृपा ! हें
हस्तिभ्रमें चि घडलें पाप, अयोध्यापतीस मज पाहें. ' ६७

हें, रा ज्ञि ! वाक्य ऐकुनि, ' जननीजनकासमीप ने मातें '
ऐसें सशल्य[6] तापस वदतां केलें तदीय कामातें. ६८

हें म दुष्कृत जाणुनि, अंधें, वृद्धें, सकोप, तत्पितरें
म्हणती, ' त्वां ही मरणें सुतशोकें यापरी च तहतरें. ' ६९

म ज तें इष्ट चि शापप्रदान गमलें तदानपत्याला;
मग वृद्धांसह दिधला तद्वाक्यें वह्नि मीं वनीं त्याला. ७०

भ य तें चि मनीं होतें, केवळ माजें च कर्म मज फळलें;
या सुतशोकें घडतें मरण, मला निश्चयें चि हें कळलें. ' ७१

हें रा ज्ञीला सांगुनि, पुत्राचें करुनि मानसीं स्मरण,
' हा राम ! राम ! ' ऐसा विलाप करितां चि पावला मरण. ७२

या म रणीं, च्यार जरी पुत्र, तरी एक ही न याजवळी;
तेव्हां होता सानुज भरत नृपाज्ञेकरूनि आजवळीं. ७३

द्वि ज वर वसिष्ठ ठेउनि तैलद्रोणींत[7] भूपदेहातें;
' दे हातें पत्र ' म्हणे ' भरतासि, ' सुमंत्र कारि, वदे[8] हा तें. ७४

---

१. नष्ट झाल्या आहेत सर्व शक्ति ज्याच्या असा. २. सुशील. ३. सावजांचा शत्रु. ४. पाणी आणण्याकरितां आलेल्या मुनीच्या भांड्यांत पाणी भरताना होणारा शब्द ऐकून. ५. ज्या ठिकाणीं आवाज झाला असेल तेथें अचूक जाऊन लागणाऱ्या. ६. बाणाग्र हृदयीं ज्याच्या असा. ७. तेलाचे कढईत. ८. वसिष्ठ.

नं  य विचार प्रे[1]षुनि, न कळत आणूनि म्हणति भरतातें
　　‘केलें स्वर्गमन, तुला अर्पुनियां सर्व भूमिभर तातें.’ ७५
हें ज ननीचें चरित श्रवण करुनियां, सखेद, फार रडे;
　　दंडाहत भुजग तसा कोपें मातेकडे तदा मुरडे. ७६
‘प्रि य वधिला पापिष्ठे! धाडुनि विपिनासि सद्गुणकरंडा;
　　केली अकीर्ति, आपण जालिस, पा[2]पाशये! स्वयें रंडा. ७७
मा रा वें तुज पापे! परि म्हणतो रामराय ‘माय’ तुला;
　　यास्तव उपाय नाहीं; गरळाची तूज योग्य काय तुला? ७८
य म कार्यकारिणी तूं कृत्या, मोहूनि यास विश्वास
　　पत्नी होउनि गिळिला राजा, माजा पिता, सविश्वास. ७९
[3]ही श्री दया जयाचा ठाई, जो स्तुत्य या जनामाजी,
　　त्याला वनास धाडुनि केली तूं काय कामना माजी? ८०
तूं रा क्षसीपरीस हि अधमा, जे निजकुटुंब खातीस;
　　मीं ही पाप तुजा सुत,’ हें बोले, होय पार[4]खा तीस. ८१
वि म ना भरत क्लेशें कौसल्येच्या पदावरी लोळे;
　　डोळे उघडुनि, हृदयीं धरुनि, रडे, राम मानसीं घोळे. ८२
भि ज वी नेत्रजळानें कौसल्या तस सूनुचा काय;
　　ता[5]तोग्रजविश्लेषज्वलनप्रशमार्थ वर्षली काय? ८३
‘श य न तुज्या तातानें केलें, रुसला खरा जनावरता;
　　याला समजावीसा कोण असे बाळका! सु[6]भावरता!? ८४
त्या रा घवें पुरीला वियोग दिधला, नृपें हि धरणीला;
　　ईर्ष्या पुत्रासह ही केली कीं दाखवूनि करणीला. ८५
ग म न रघुवरें केलें कैकेय्याज्ञेकरूनि अटवीला;
　　काळाज्ञेनें जाउनि भूपें स्वर्गासि लोक फटवीला. ८६

---

१. नीतिज्ञ दूत. २. दुष्टमते. ३. विनय, मर्यादा. ४. विमुख, परका. ५. पिता दशरथ व वडील भाऊ श्रीरामचंद्र ह्यांच्या वियोगानें उत्पन्न झालेल्या अग्नीच्या शांतीकरितां. ६. उत्कृष्ट शीलाचे ठायीं तत्पर अर्थात् सुशील अशा!

सांगे, कौसल्यांकस्थितमस्तक, अस्तशक्ति[1], सद्वृत्त[2]. ६३

'तो य जदलाक्षि ! पूर्वी मीं, मृगयालुब्ध, एकदा रातीं
सरयूतीरीं होतों, शरपाणी, एकटा, मृगारातीं[3]. ६४

नी रें[4] दानागतमुनिपात्ररवाकर्णनें अजाणानें,
तापस गजभ्रमानें वधिला मीं, शब्दपाति[5] बाणानें. ६५

म म बाणविद्ध तापस 'हा तात !' असें म्हणोनि आरडला;
तों मीं धांवत जाउनि विलोकिला तो, धरेवरी पडला. ६६

'हा श्री मुने ! तुजा मीं निष्कारणशत्रु वध्य; सकृपा ! हें
हस्तिभ्रमें चि घडलें पाप, अयोध्यापतीस मज पाहें.' ६७

हें, रा ज्ञि ! वाक्य ऐकुनि, 'जननीजनकासमीप ने मातें'
ऐसें सशल्य[6] तापस वदतां केलें तदीय कामातें. ६८

हें म दुष्कृत जाणुनि, अंधें, वृद्धें, सकोप, तत्पितरें
म्हणती, 'त्वां ही मरणें सुतशोकें यापरी च तत्तरें.' ६९

म ज तें इष्ट चि शापप्रदान गमलें तदानपत्याला;
मग वृद्धांसह दिधला तद्वाक्यें वह्नि मीं वनीं त्याला. ७०

भ य तें चि मनीं होतें, केवळ माझें च कर्म मज फळलें;
या सुतशोकें घडतें मरण, मला निश्चयें चि हें कळलें.' ७१

हें रा ज्ञीला सांगुनि, पुत्राचें करुनि मानसीं स्मरण,
'हा राम ! राम !' ऐसा विलाप करितां चि पावला मरण. ७२

या म रणीं, च्यार जरी पुत्र, तरी एक ही न याजवळी;
तेव्हां होता सानुज भरत नृपाज्ञेकरूनि आजवळीं. ७३

द्वि ज वर वसिष्ठ ठेउनि तैलद्रोणींत[7] भूपदेहातें;
'दे हातें पत्र' म्हणे 'भरतासि,' सुमंत्र कारि[8], वदे हा तें. ७४

---

१. नष्ट झाल्या आहेत सर्व शक्ति ज्याच्या असा. २. सुशील. ३. सांवजांचा शत्रु. ४. पाणी आणण्याकरितां आलेल्या मुनीच्या भांड्यांत पाणी भरताना होणारा शब्द ऐकून. ५. ज्या ठिकाणीं आवाज झाला असेल तेथें अचूक जाऊन लागणाऱ्या. ६. बाणाग्र हृदयीं ज्याच्या असा. ७. तेलाचे कढईंत. ८. वसिष्ठ.

नें य विचार प्रेषुनि,[1] न कळत आणूनि म्हणाति भरतातें
'केलें स्वर्गमन, तुला अर्पुनियां सर्व भूमिभर तातें.' ७५
हें ज ननीचें चरित श्रवण करुनियां, सखेद, फार रडे;
दंडाहत भुजग तसा कोपें मातेकडे तदा मुरडे. ७६
'प्रि य वधिला पापिष्ठे! धाडुनि विपिनासि सद्गुणकरंडा;
केली अकीर्ति, आपण जालिस, पापाशये![2] स्वयें रंडा. ७७
मा रा वें तुज पापे! परि म्हणतो रामराय 'माय' तुला;
यास्तव उपाय नाहीं; गरळाची तूज योग्य काय तुला? ७८
य म कार्यकारिणी तूं कृत्या, मोहूनि यास विश्वास
पत्नी होउनि गिळिला राजा, माजा पिता, सविश्वास. ७९
[3]ह्री श्री दया जयाचा ठसई, जो स्तुत्य या जनामाजी,
त्याला वनास धाडुनि केली तूं काय कामना माजी? ८०
तूं रा क्षसीपरीस हि अधमा, जे निजकुटुंब खातीस;
मीं ही पाप तुजा सुत,' हें बोले, होय पारखा[4] तीस. ८१
वि म ना भरत क्लेशें कौसल्येच्या पदावरी लोळे;
डोळे उघडुनि, हृदयीं धरुनि, रडे, राम मानसीं घोळे. ८२
भि ज वी नेत्रजळानें कौसल्या तस सूनुचा काय;
तातोग्रजविश्लेषज्वलनप्रशमार्थ[5] वर्षली काय? ८३
'श य न तुज्या तातानें केलें, रुसला खरा जनावरता;
याला समजाविसा कोण असे बाळका! सुभावरता![6]? ८४
त्या रा घवें पुरीला वियोग दिधला, नृपें हि धरणीला;
ईर्ष्या पुत्रासह ही केली कीं दाखवूनि करणीला. ८५
ग म न रघुवरें केलें कैकेय्याज्ञेकरूनि अटवीला;
काळाज्ञेनें जाउनि भूपें स्वर्गासि लोक फटवीला. ८६

---

१. नीतिज्ञ दूत. २. दुष्टमते. ३. विनय, मर्यादा. ४. विमुख, परका. ५. पिता दशरथ व वडील भाऊ श्रीरामचंद्र यांच्या वियोगानें उत्पन्न झालेल्या अग्नीच्या शांतीकरितां. ६. उत्कृष्ट शीलाचे ठायीं तत्पर अर्थात् सुशील अशा!

भु ज निर्जितारिवृंदें, वत्सा ! जनकें तुज्या चि उद्दंड[1]
एकाच्या अपराधें केला सर्वांसि सारखा दंड. ८७
क य करूं ? वैधव्यज्वलनज्वाळांतरीं तनू न जळे !
न कळे पातक केलें कोण, असा शोक ज्यामुळें उजळे[2] '. ८८
ति ज ला वसिष्ठ पितृसम, जाउनि, समजाउनि, क्षण क्रमुनी;
भरताकरवी करवी भूपाच्या और्ध्वदेहिकास मुनी. ८९
प्र थ[3] त प्रधान पौर, प्रजा वसिष्ठासवें तयावर ते,
मुकुटाभरणासाटीं प्रार्थुनियां, जाहले तया वरते. ९०
पौ रा दिकांसि तेव्हां भरत म्हणे, 'हें नको मला राज्य;
आज्यनिषेकें जैसा वह्नि, तसा शोक कां करा प्राज्य ? ९१
व म नासमान माज्या मनास हें राज्य देतसे विकृती,'
ऐसें वदोनि भरत स्वाग्रजपदपूतमार्ग सेवि कृती. ९२
जे श्री स्वयें चि आली, यत्न न करितां, अशीस ही वरजी;
तातादिकांसि मारुनि दुःखें संपादिती महीवर जी. ९३
धी रा ग्रणी, महात्मा, सेनेसहवर्तमान सप्रकृती[4],
भरत समातृक, गेला अटवीला, शोकविह्वळप्रकृती. ९४
अ म रनदीतें उतरुनि, गुहसंगें, अग्रजांघ्रिलाभरतें,
मग, चित्रकूटपर्वतवनवासी राम वंदिला भरतें. ९५
कं ज दलायतलोचन[5], वल्कलवासा, जटी महालिंगी[6],
जयशाली, दलशाली, राम प्रेमेंकरूनि आलिंगी. ९६
पा य वसिष्ठमुनीचे वंदुनि, जननीजनास तो वंदी
मंदीकृतवनवासक्लेश, महाधीर, वीर, आनंदी. ९७
पौ रा मात्यनतांघ्री ऐके जों राम तातमरणातें,
तों ये मोह मनासीं, नेत्रासीं ही महातम, रणातें[7]. ९८
श म वी वसिष्ठ राघवशोकज्वलनासि बोधभुवनानें[8];

---

१. मोठा. २. दृष्टीस पडे, अनुभवास येतो. ३. पवित्र. ४. प्रजासहित. ५. कमलपत्राप्रमाणें नेत्र आहेत ज्याचे अशा. ६. ऋषिरूपधारी (?). ७. शब्दातें. ८. ज्ञानोदकानें.

भुवनानेकाभीष्टद[1] तर्पी तातासि तो विभु वनानें[2]. ९९
अं ज लि रचूनि, भरत, स्तवुनि, म्हणे, 'मैथिलीश्वरा! ज्यातें
जें योग्य तें चि द्यावें; तूं चि विभो! योग्य विश्वराज्यातें. १००
न य निपुणा! धर्मज्ञा! नाहीं लोकांत तूजपरि वेत्ता;
क्षोणीवरणें होइन, तुज परिवित्ती[3] करूनि, परिवेत्ता[4]. १०१
भ ज न तुज्या चरणाचें, हें राज्य प्राज्य दे मला देवा!;
न मज वियोगज्वलनीं होमीं हो! मीं करीन पदसेवा. १०२
का य हि तुज्या वियोगें दुर्वह, भूभार हा कसा वाहूं?
काय कृपा ज्ञाली ते? कां तूं त्यजितोसि लोकसा बा! 'हूं[5]' १०३
हा [6]रा यिताश्रुधारें, 'हा राम!' असे विलाप त्या भरतें
केले जे तच्छ्रवणें आलें प्रभुच्या दयाब्धिला भरतें. १०४
'श्र म लासि; जा पुरीला; येइन सरतां चि वर्ष चवदावें;
ताताज्ञानिरतातें मातें, भरता! अणीक न वदावें.' १०५
तों श्री सीतापतिला भरत म्हणे, 'न करितां कृतावधिला,
शपथपुरःसर कथितों, होइल लोकांत अनुज तों वधिला. १०६
ता रा वयासि मजला, दुःखसमुद्रांत पादुकातरणी,
तरणिकुलालंकारा! दे, ज्या करितात पापघात रणीं.' १०७
का म पुरवितां रामें, गुर्वाज्ञा म्हणुनि भरत तो परते;
पर तेथ चि रघुपतिपदपद्मीं तच्चित्त भृंगरूप रते. १०८
'भ र्ज कामरद्रुमा! तूं मजला विसरूं नको!' म्हणूनि रडे;
भरत क्लेशें गेला, परि मन त्याचें न सर्वथा मुरडे. १०९
तो य तिसमानधर्मा नंदिग्रामीं वसे, न साकेतीं;
वल्की, जटी, फलाशी, भूशायी, प्राण ठेवि संकेतीं. ११०

---

१. अनेकलोकमनोरथपूरक. २. जलानें. ३. (अमरटीप). परिवेत्त्याचा बंधु. परिवेत्ता=ज्येष्ठ बंधूपूर्वी विवाहित असा कनिष्ठ बंधु. ४. (अमरटीप). ५. हूंमिति रोदनानुकरणं—**पंत.** ६. हाराप्रमाणें आसवांची धारा आहे ज्याची अशा. ७. तूं—**पंत.** ८. भक्ताच्या कल्पद्रुमा!

का रा गृहगतसम तो, सामात्य सदैव पादुका अर्ची;
शिंपी विवेकनीरें[1], परि न शमे शोकवह्निची अर्ची[2]. १११

स्व म नीं राघवमूर्ति, स्थापुनि भद्रासनीं[3] हि सद्योगें
रघुवीरपादुकांला, पूजुनि पाळी प्रजेसि तद्योगें[4]. ११२

र ज नीचरकाळ हि तो सज्जनवृंदाचिया शुभवनातें
अवलोकित विभु गेला सानुज, सस्त्रीक, अत्रिभवनातें. ११३

न्या य पथें चि मुनीतें वंदी जो मान्य या त्रिभुवनातें;
पूजुनि विभुला मानी, कैवल्यानून[5] अत्रि भुवनातें. ११४

नि ज भूषणें समर्पुनि सीतेला मायसी च मुनिभार्या
आर्या अनसूया ते सत्कारी, जे सतींस सत्कार्या[6]. ११५

क्ष य राक्षसलोकांचा करावया, तो उदंड कारुण्य
हृदयीं धरूनि, पावे, अत्रिस वंदूनि, दंडकारण्य. ११६

वा रा वयासि राक्षसतिमिरातें राम तो महातरणी
गेला शत्रुजनांतीं, ज्याचा शरदानकाम हात रणीं. ११७

क म ळायमानलोचन, पावे जावूनि दंडकारण्य;
भक्तमयूरावरि करि करुणाघन तो उदंड कारुण्य. ११८

इति श्रीमन्मंत्ररामायणे श्रीरामनंदनकृतावयोध्याकांडः । २

दिङ्मंत्राः संत्यत्र । साधूनां स्ववृक्षाः ॥

---

# अरण्यकांड

दिव्य श्री मंडित तो, राम जसा[7] दंडकावना गेला,
पूजुनि मुनि म्हणति, 'तुज्या पदें विसावा दिला चि गंगेला.' १

अम रा धिपापरी तो जाला विप्रांसि पूज्य सुखराशी,

---

१. विचाररूपी पाण्यानें. २. ज्वाला. ३. सिंहासनावर. ४. त्या पादुकांच्या आज्ञेनें. ५. मोक्षाहून कमी नव्हे अशा. ६. आदरास योग्य अशी. ७. जेव्हां.

प्रखरासिबाणपाणी[1]; लाजे रवि तत्पदांब्ज[2]नखराशी. २

आश्र म वासी मुनि ते सत्कारिति सुस्वभाव सुमतीला;

त्या काळीं बहु लाजे गतप्रभा विधिसभा वसुमतीला[3]. ३

तों द्वि ज शत्रू राक्षस विराध आला, गिरी जसा ढळला;

सीतेला हरुनि पथीं, 'आहार' म्हणे 'बरा चि आढळला.' ४

निर्भ य दोघे बंधू, करितां युद्ध, स्वबाहुनीं कवळी;

स्कंधीं वाहुनि निघतो जाला तो सर्वयात्वनीकबळी[4]. ५

प्रखं रा[5] सी तों छेदिति, असतां स्कंधीं च, बाहुदंडातें;

ते पुष्पवंत[6] जाणों, दोघे करिताति राहुदंडातें. ६

तो, अ म रप्रभ दुसरें देह धरुनियां कथी सुसद्वृत्त

रंभालिंगनकुपित, द्रविणप्रदलब्धशाप हें वृत्त.' ७

सानु ज राम तयाचा आच्छादी देह, करुनियां प्रदरं,

स्वर्गोत्सुकशरभंगस्थाना गेला हरूनि विप्रदर. ८

विन य पुरःसर नमिला मुनि तो ही, पूजुनि प्रमोदानें;

गेला स्वर्लोकातें, तर्पुनियां पावकाशि तनुदानें. ९

मग ज गदीश, सुतीक्ष्णद्विजाश्रमाला करूनियां काशी[8];

गेला अगस्त्यमुनिच्या स्वस्थानाशि द्वितीयनाकाशी. १०

आम्ना[9] य मूर्तिला त्या 'रामोऽस्मि[10]' असें कथूनियां वंदी;

वंदी[11] होय अगस्त्य हि, आघ्राण करी शिरीं महानंदी. ११

सत्का रा नंतर, दे आशीर्वादासवें धरेशासि

---

१. तीक्ष्णतर वाग्बाण आहेत हातांमध्यें ज्याच्या असा. २. त्याच्या पादकमलनखाला. ३. पृथ्वीला. (कारण, पृथ्वी ही सीतेची माता होय). ४. यातु + अनीक + बळी=राक्षससेनेमुळें बळवान् असा. ५. प्रखर आहे खड्ग ज्यांचे असे ते रामलक्ष्मण. ६. सूर्यचंद्र—**पंत.** ७. इत्युक्त्वा लक्ष्मणं रामः प्रदरः खन्यतामिति । तस्थौ विराधमाक्रम्य कंठे पादेन वीर्यवान् ॥ गर्त—**पंत.** खळगा. ८. आपल्या आगमनानें काशिक्षेत्राप्रमाणें पवित्र करून. ९. वेदमूर्तीला. १०. मी राम आहें. ११. स्तुतिपाठक.

ब्रह्मास्त्र, विष्णुकार्मुक, शक्रेषुधियुग्मरत्न, कोशासि. १२

प्रण म न करूनि मुनिला, गेला तेथूनि राम वल्कपटी
गोदावरीतटीं त्या पंचवटींतें वधावया कपटी. १३

तेथें श्री [1]कंठनिजश्यालोच्चतनू जटायुगृध्रातें
पाहुनि, सीता मानी निजचित्तीं पक्ष[2]वन्महीध्रातें. १४

मग रा घवासि पुसतां, 'दशरथनृपमित्र मीं,' म्हणे 'गृध्र;
संपात्यवरज, कश्यपवंशज, नामें जटायु, न महीध्र.' १५

विश्राम पावला बहु, जटायुला दिवस होय [3]पर्वें तसा;
'पंचवटींत वसा' हें सांगोनि उडे सपक्षपर्वतसा. १६

अनुं ज कृतच्छ[4]र्दसदनीं, सदनिष्टविना[5]शदक्षपादरज;
दर जगतींचें हरितो हरितोषद, कोसले[6]शजोदरज. १७

हृ[7]च्छ य विकला प्रार्थी शूर्पणखा राघवास अविद[8]र्ग्धा;
मृगजळपूरास जसी वनहरिणी, दावपा[9]वकविदग्धा. १८

रुचि रा क्षी हेमंतीं, रघुनाथाला म्हणे, 'मला वरणें;
आवरणें स्मरवैरी, रक्षीं वीरा ! भुजां[10]मलावरणें.' १९

तों साम युक्त वाक्यें राम म्हणे, 'मीं असें सदार जनीं;
अस्त्रीक बंधु माजा; त्याला युग होतसे सदा रजनी. २०

जा, तु ज वरील बलवान् मजहुनि तो योग्य, हें मला वाटे;'
ऐसें वदोनि, अंतस्मित लावी एकदा तिला वाटे. २१

ते जा य लक्ष्मणाप्रति, धरूनियां रम्यरूपवेश स्त्री;
तीस विलोकुनि मानी रामानुज तो मनीं जसी [11]कौक्षी. २२

---

१. महादेवाचा स्वतःचा मेहुणा जो मैनाक पर्वत त्यासारखा उंच देह आहे ज्याचा. २. पंख असलेल्या पर्वतानें. ३. पर्वणी, सुदिन. ४. छद=पान; सदन=घरः छदसदनीं=पर्णकुटींत. ५. साधूंच्या अकल्याणाच्या नाशाविषयीं दक्ष आहेत चरण-रज ज्याचे असा. ६. कोसलाधिपतीपासून जन्मलेलीच्या उदरांतून जन्म पावलेला (कौसल्यापुत्र). ७. मदनवशा. ८. मूर्खा. ९. वणव्यानें होरपळली. १०. भुजाविव स्वच्छाच्छादनं तेनेत्यर्थः—**पंत.** बाहुरूप शुद्ध आच्छादनानें. ११. तरवार.

'वित्त ज शराग्निदग्धा मीं सुविदग्धासि तूज जलदासी,
आलयें शरण शरण्या ! रक्षावी स्वाधरामृतें दासी.' २३
'मी तों य जमुखि ! राघवदास ' म्हणे 'मज कशास वरतीस?
जा तुज वरील राम; त्यजुनि अरण्या क्षमेस वर ' तीस[1]. २४
असि रा क्षसी अनार्या, तेथें ही पावली न कामातें;
पुनरपि रामास म्हणे विनउनियां कीं, 'त्यजूं नका मातें.' २५
[2]अभि म तकाम न होतां, शूर्पणखी क्रूरदेहरूपा, हे
क्रोधस्मराभितप्ता, वैदेहीतें स्वयें हरूं पाहे. २६
मातृ श्री भ्रातृस्त्री भीतां व्याघ्रीपुढें जसी हरिणी,
लक्ष्मण तीतें केशीं धरी, हरी जेंवि माजली करिणी. २७
मग रा मावरजानें श्रुतिसहें[3] तीच्या हरूनि नाकाशी
तोषविलें, हांसविलें, भय ही दिधलें, क्षणांत नाकाशी. २८
पर म क्रोधें मग ते शूर्पणखा, जाउनी जनस्थाना
खरदूषणादिकांला सांगुनि, करवी ससैन्यप्रस्थाना[4]. २९
ते र ज नीचर, चवदा सहस्र नक्तंचरांस वेगानें
घेउनि रणासि येतां, वायस करिती शिवासवें[5] गानें. ३०
हाका य थेष्ट मारिति, म्हणती, 'मारा, धरा, चिरा, भाजा;'
[6]अचिराभा जाली ते धाकें, अजपुत्रसूनुची भाजा[7]. ३१
मग 'रा जकन्यकेला रक्षावें ' हें कथूनि भावाला,
ध्वांतीं सूर्य, तसा तो दावी रक्षोगणां प्रभावाला. ३२
जें स म राला आले राघव त्यांचें करूनियां शमन,
शर्मननगर[8] भरुनि करी क्रव्यादांचें[9] हि पूरिताशं[10] मन. ३३

---

१. हें 'म्हणे' ह्याचें कर्म. २. पूर्णमनोरथ. ३. कानांसह. ४. प्रहम्रादिभिः पूर्ववर्णे गुरुत्वं पाक्षिकमिति ज्ञेयं–**पंत.** प्र ह्र म्र इत्यादींच्या पूर्ववर्णाचे ठायीं गुरुत्व विकल्पानें असतें. ५. कोल्ह्यांसह. ६. विद्युल्लतेप्रमाणें क्षणांत नाहींशी झाली कांति जिची. ७. भार्या. ८. यमपुरी. ९. मांसभक्षकांचें. १०. पूर्ण झाली आहे इच्छा ज्याची असें.

त्यांत ज नस्थानाला शूर्पणखी मात्र निरूपा पाहे,
दशवदनास हि जाउनि सांगे संपूर्ण वृत्त पापा हे. ३४
संक्ष य खरादिकांचा, भगिनीनासाविनाश मर्त्यकरें,
यास्तव मानी दशमुख मानुनि बहु दुःख, कोपला निकरें. ३५
जेव्हां ज नकसुतेचें शूर्पणखी रूप भाग्य वाखाणी,
हृदयवनीं स्मरसूकर[1] विवेकवल्लीस तेधवां खाणी. ३६
निश्च य करी स्वचित्तीं, हरावया स्त्री च रामरायाची;
अनिवार्य बुद्धि ऐशी, उपजे रात्रिंचरा मरायाची. ३७
मग रा क्षसेंद्र जाउनि मारीचाला म्हणे, ‘स्वयें हरण
कनकाकृति होउनियां, करणें त्वां जानकीमनोहरण.’ ३८
विक्र म रघुनाथाचा मारीच तदा स्वयें वदे, वारी;
पारि तें स्वहित न मानी तो विपरीतस्वभाव देवारी. ३९
मातृ श्री चें घडतें दर्शन हा निश्चय स्वयें केला;
गत्यंतरविरहास्तव[2], गेला मारीच पंचवटिकेला. ४०
असु रा धिप हि जलदपथें[3] निहितरथ जपे निजेष्ट साधाया;
खरतर विषरस सेउनि पामर इच्छीतसे जसा धाया. ४१
तो हे म हरिण होउनि, मारीच, न लावितां हि घटिकेला,
गेला सभयमनानें, रावणवाग्बद्ध पंचवटिकेला. ४२
त्याला ज सें विलोकी वैदेही साभिलाष तों च, पळ
अवकाश न करितां बहु वेगें, गेला पळोनि तो चपळ. ४३
स्त्रीप्रि य जाणुनि, उटजीं ठेउनियां लक्ष्मणासि त्या मार्गें,
शरकार्मुकधर राघव गेला विपिनीं मृगांकिया[4] मार्गें. ४४
रघु रा जसिंह नेला, लोभउनीं, फार दूर वीरमणी;
रमणीयाकृतिलोभें धांवे, आनंदवावया रमणी. ४५

---

१. मदनरूपी डुक्कर. २. गत्यंतराभावात्–**पंत**. दुसरा इलाज नाहीं ह्यामुळें. ३. आकाशामध्यें स्थापिला आहे रथ ज्यानें असा. ४. मृगपदमुद्रांकितेन मार्गेणेत्यर्थः–**पंत**.

मग म मर्मभेदिराघवशरविद्ध क्ष्मातळावरी पडला;
'हा तात!' असें रामध्वनिसंनिभ आर्तरूप भारडला. ४६
तो, र ज नीचररूप प्रकटोनि, पडोनि, कांपवी अटवी;
फटवी रामासि असा दशतुंडाला महासुखें नटवी[1]. ४७
हा आ य कोनि शब्द, व्याकुळ होऊनि, दाशरथिजाया,
पतिजीवहानिभीता, सीता, निजदेवरासि कथि जाया. ४८
तेव्हां ज नकसुतेला सौमित्रि म्हणे, 'न सत्य; हे माया;
त्रैलोक्यांत हि नाहीं वीर, रणीं जो वधील रामा या. ४९
तूं भ य मनांत कांहीं न धरावें; हे पलाशजनमाया;
रघुवीराला पीडी ऐसा कोणीं नसे चि जनमाया[2].' ५०
हें दी रा चें वाक्य श्रवण करुनियां म्हणे, 'तुजा काम
कळला मज, दुर्बुद्धे! पारि मत्तनुनाथ एक रघुराम.' ५१
ऐसें म होग्र वदतां, लक्ष्मण कारि कर्णपाणिसंगतिला[3];
'शिव! शिव!' म्हणोनि वंदी दुर्वाक्यश्रवणकंपितांग तिला. ५२
'हा हा श्री राम!' असें दुःखाकुळ तो वदोन कर जोडी;
सीतेसि म्हणे, 'माते! पापाची तूं वृथा न कर जोडी. ५३
माते! रा हें स्वस्था; जातों; त्वत्पादपंकजा नत मीं;
साग्रज सत्वर येतों; मग्न करावें स्वचित्त तूं न तमीं[4].' ५४
प्रण म न करूनि गेला, नेला प्रभु ज्या पथें चि मारीचें;
तों यतिवेषें दशमुख हरण करी त्या धराकुमारीचें. ५५
व्याघ्रें ज सी कुरंगी, तसि नेतां राक्षसें धरूनि करें,
'हा लक्ष्मण! हा रघुवर!' अशि सीता आरडे, रडे, निकरें. ५६
'जैसा य वन वधाया नेतो धेनूसि, हा तसा चि खल;'
ऐसें वदोनि रडती वनदेवी; तों पडे वनीं चिखल[5]. ५७
तों त्या रा नीं होता दशरथनृपमित्र, गृध्रराज, बळी;

---

१. नाचावयास लावी. २. उत्पन्न व्हाया. ३. पाणिभ्यां कर्णावाच्छादितवान्–**पंत.** कानांवर हात ठेविले. ४. दुःखांत. ५. कर्दमनाम–**पंत.**

सीताविलाप ऐकुनि, जाय नभीं पंक्तिकंधराजवळी[1]. ५८

पक्षी, महापराक्रम, जटायु त्याला म्हणे, 'अरे चोरा !

हो, राजकन्यकेला सोडुनियां, दूर, वाष्कळा ! घोरा ! ५९

कां तूं ज मृत्युवदनप्रवेश रुचला? गतत्रपा! सून

माझी सोडीं; लंका होऊ विधवा न आजपासून. ६०

हें काय दुष्टबुद्धे ! मूढा ! नीचा ! निशाचरापसदा !

स्वकुळसमुच्छेदकर व्यर्थ चि संपादितोसि पाप सदा.' ६१

ऐसें जरि हित कथिलें, तें रावण सर्व वाक्य परिसून,

तैसा चि जाय गर्वें; जटायुची सोडिली न परि सून. ६२

मग य मैंदंडाशनिनिभनिजचंचूपक्षपादनखरांहीं[2]

मोडुनि रथ, गृध्र म्हणे, 'मदायुधें पाहिलींस न खरा ! हीं.' ६३

मग रावण अन्यायें, खड्गें छेदूनि गृध्रपक्षतिला,

अन्यरथीं स्थापुनियां, घेउनि गेला मनुष्यभक्ष तिला. ६४

नेतां महासती ते पाहे दूरून ऋष्यमूक नग;

सुगलादि[3] कपी देखे; सोडी कौशेयबद्ध[4] त्यांत नगं[5]. ६५

आत्मश्रीनाशास्तव, नेउनियां जानकीस लंकेला,

ठेवी अशोकवनिकागर्भी, न धरूनि पापशंकेला. ६६

स्वशरानें मारुनियां, तो राम वनांत ताटकातनुज,

मागें फिरोनि येतां, कांतारीं भेटला स्वयें अनुज. ६७

प्रणमन करूनि लक्ष्मण, प्रभुला सीतोक्ति सर्व आयकवी;

तच्छ्रवणें व्याकुळ बहु जाला चित्तांत सुज्ञराय कवी. ६८

तों निज उटजा येतां, मार्गी होती अनेक अपशकुन;

हानीतें सूचविती निजदेहस्फुरण, मृग, शिवा, शकुन[6]. ६९

आलय जाउनि पाहे, तों सीता राघवासि भेटेना;

त्या समयाहुनि दारुण मृत्यु असें लक्ष्मणासि वाटेना. ७०

---

१. रावणाजवळ. २. यमदंडवज्रतुल्य जी आपली चोंच, पंख व नखें त्यांहीकरून. ३. सुग्रीवप्रभृति. ४. रेशमी वस्त्रांत बांधिलेले. ५. दागिने. ६. श्वापदें, कोल्हे व पक्षी.

‘हाचि रा क्षी नाहीं कीं, वत्सा ! हें अन्यगेह वाटतसे;
इतर स्थळासि आलों, चुकती अनभिज्ञ लोक वाट, तसे. ७१
वत्सा! म ज जरि म्हणसी, ‘सीतेची हे च होय दलशाला;’
तरि मीं च रामनामा नसेन; साध्वी दिसेल काशाला? ७२
ते म ज वांचुनि नाहीं गेली गोदावरीविहारातें;
क्षण मद्विरहें तीतें युग होतो; भार भावि[1] हारातें. ७३
ते प्रि य तमा न हिंस्रें वधिली; नाहीं च रक्त भूवरतें;
नेली च राक्षसानें;’ म्हणोनि शोधी स्थळ क्षमावर[2] तें. ७४
‘कोठें ज नकसुते! तूं गेलीस? धरासुते! प्रिये! जाये!
न करीं विनोद; जाला व्याकुळ अत्यंत देह माजा; ये. ७५
तूं का य कोप धरिला अपूर्व मृग नाणिला म्हणून मनीं?
तरि चंद्रमृग हि आणुनि देइन, हें तूं असत्यसें न मनीं. ७६
श्वशु रा ला परलोकीं गेलिस जरि तूं करावया नमना,
पुसल्यावांचुनि कैसी सीते! जालीस आज यानमना[3]? ७७
न्यावें म ज ही तेथें, श्वशुराची प्रार्थना करून, सती[4]!
भरत करू राज्यातें, तुजवांचुनि वांचुनी, सुखें नसती. ७८
राज्य श्री हरुनि जरी कैकेयीनें वनासि पाठविलें;
तरि तव योगें तें मीं नाहीं कांहीं मनांत आठविलें. ७९
मज रा जकन्यके! तूं वरूनियां पावलीस न सुखातें
खातें हें चितातें; सांगों कोणास मीं स्वदुःखातें? ८०
हा क म लाक्षि! तनूदरि[5]! सुंदरि! जाये! प्रिये! सये! सदये!
विधुमुखि! पिकगर्वापह[6], अमृताहुनि गोडसें, स्वयें वद; ये. ८१
पंक ज, विधु, हरि, गज, पिक, चमरीमृग, कीर जिंकिले होते;
त्वन्मित्रातें मातें, त्वद्वैरें, पीडितील सखि! हो! ते. ८२
हा प्रि य तमे! वियोगज्वलनमुखीं होमिलेंस कां मातें?

---

१. गणी. २. पृथ्वीपति (रामचंद्र). ३. प्रयाण मनो यस्याः—**पंत.** गमनोत्सुक. ४. संबोधनम्—**पंत.** ५. कृशोदरि. ६. कोकिलांचा गर्व दूर करणारें अर्थात् सुस्वर.

वैरी संतोषविले, टाकुनि यातें वनीं सकामातें.' ८३
ऐसा रा त्रिदिव ही विलाप करि शोकपर, जसा कोक[1];
कोकनदाक्ष[2], सुमित्रातोकसहित, तो करी विकळ लोक. ८४
शोधी म दिराक्षीला कांतारीं, तों स्वतातमित्रातें
पाहे जटायुतें तो; मानी आकाशनष्ट मित्रातें[3]. ८५
मग ज वळ जाय; पाहे; तों शस्त्रच्छिन्नपक्षती पक्षी
आसन्नमरण होउनि राममुखातें स्वलोचनें लक्षी. ८६
'माझ्या य शासवें ते सीता नेली दशाननें रामा!'
ऐसें वदोनि पावे अन्यजनालभ्यनित्यनिजधामा[4]. ८७
सानु ज राघव तेव्हां, 'हा तात!' असें रडोनियां त्यातें,
स्वपित्यातें दुर्लभ जें, तें दे जळ, दाह करुनि चुलत्यातें[5]. ८८
तो तो य जाक्ष अगमृगनगभृंगपतंगभुजगसंघातें[6]
'सीता विलोकिली कीं?' म्हणुनि पुसे मूढ कामशरघातें. ८९
ऐसे रा नीं फिरतां, अयोमुखीनाम राक्षसी, नीचा,
लक्ष्मणशस्त्रें, पावे, स्वगुणें, गतिला दशास्यभगिनीच्या. ९०
ते अ म तां क्रौंचवनीं, यथार्थनामा कबंध दोघांतें
कवळी योजनभुज तो, सिकतासेतू जसा जलौघांतें. ९१
तेव्हां श्री कंठगलश्यामासियुगें[7] धरूनियां धीर
कदलीकांड तसे ते प्रचंड भुजदंड खंडिती वीर. ९२
मग रा क्षस निजशाप, स्थूलशिरोविप्रदत्त[8], आयकवी;
सुग्रीववानरर्षभमैत्री करणें प्रियार्थ हें शिकवी. ९३
'हा म म देह करावा दग्ध' अशी प्रार्थना करी, विनवी;
आज्ञा घेउनि, गेला निजलोकातें, तनू धरूनि नवी. ९४

---

१. चक्रवाक. २. कमलनेत्र. ( अमरटीप ). ३. सूर्यातें. ४. दुसऱ्या लोकांस न मिळणारें जें अविनाशी निजपद त्यातें. ५. पितृव्यायेनि—**पंत**. ६. वृक्ष, हरिण, पर्वत, भ्रमर, पक्षी, सर्प ह्यांच्या समूहास. ७. शिवाच्या कंठाप्रमाणें काळ्या अशा तरवारीच्या जोडीनें. ८. स्थूलशिरानामक ब्राह्मणानें दिलेला.

दनु ज कबंध ज्वलनीं होमुनियां, ते दयानिधी जाती;
तों शबरी करि भावें, मतंगविप्राश्रमांत, पूजा ती. ९५
भावें य शोनिधीतें पूजुनि, हर्षे तपस्विनी शबरी;
सद्भक्तितुष्ट होउनि, अर्पी गति तीस जानकीश बरी. ९६
सत्का रा च्या ग्रहणें, स्वदर्शनें, करुनियां विशुद्ध तिला
आज्ञा घेऊनि पुसे रघुनायक ऋष्यमूकपद्धतिला[1]. ९७
'अभि[2] म तदानधुरीणा! मजवरि केली अपार अनुकंपा;
शंपाजितचापलता[3]! जाउनि आधीं विलोकिजे पंपा. ९८
निज ज नकल्पतरो!· तूं, तेथुनियां, सर्वलोकनगरा[4] जा;
मग पाहें सुग्रीवप्लवगाश्रय ऋष्यमूकनगराजा. ९९
नित्य य शश्चंद्र तुजा दूर करू साधुविप्रतापातें;
वृध्दि असो करिशुंडाजितदोर्दंडद्वयप्रतापातें[5]. १००
'या नि ज पददासीचें स्मरण असों दे' म्हणोनियां, नतिला
शबरी करी, तदा प्रभु निघता जाला, स्वयें पुसोन तिला. १०१
निर्द य कामशिलीमुख[6]विद्धहृदय राम पावला कंपा,
तैसा चि विविधशुकपिकबकशिखिकोकादिसंकुला[7] पंपा. १०२
रघु रा ज तेथ जाउनि, पंपातीरीं करी प्रवेशातें,
तों स्मरमार्गणगण ही रामहृदब्जीं करी निवेशातें[8]. १०३
तेथें म यूर-सारस-हंस-पिक-क्रौंच कीर-कोकांतें
सस्त्रीकांतें पाहुनि, मानी प्रभु धन्य पक्षिलोकांतें. १०४

इति श्रीमन्मंत्ररामायणे श्रीरामनंदनमयूरेश्वरकृतावरण्यकांडः । ३
वनकांडे वसुमंत्राः । मुनिचेतःपरतंत्राः ॥

---

१. ऋष्यमूकमार्गातें. (अमरटीप). २. इच्छित देण्याविषयीं अर्थात् इच्छित पूर्ण करण्यामध्यें अग्रणी अशा. ३. शंपायाः विद्युतः जितं चापलत्वं एतादृशी चापलता यस्य संबोधनं—**पंत**. ४. सर्वे च ते लोकाश्च तेषां नगरं जगन्निवास इत्यर्थः—**पंत**. ५. हत्तीचे सोंडेस अजिंक्य जें भुजद्वय त्याचा जो प्रताप त्यास. ६. बाण. ७. इत्यादिकांची गर्दी आहे जेथें अशी. ८. घरातें.

# किष्किंधाकांड

पंपेची श्री पाहुनि राम म्हणे लक्ष्मणास, ‘ कां मातें
सीता टाकुनि गेली स्नेहासह काननीं सकामातें? १

या पुष्क रा परीस हि, सीतेचें नेत्रयुग्म बहु रुचिर,
दैवें तिजसीं मजसीं योग न राहूं दिला सख्या! सुचिर. २

मातें के[1] म लमृणालें विलोकितां स्मरति युवतिच्या सुभुजा,
प्रणयक्रोधें मजला बद्ध करायासि सर्वथा विभु ज्या. ३

अलि[2]पुं ज देखतां, मज सीतेचे केश लक्ष्मणा! स्मरती;
तत्क[3]बरीसम हे शिखिपिच्छकलाप स्वमानसीं भरती. ४

मद्वृंद य हंसपक्षी पीडिति गतिभाषणेंकरून वनीं;
नवनीतकोमलांगी सीता दिसते मला मनोभवनीं. ५

वत्सा! ध रां[4] रुहांतें वेष्टुनि वल्ली जशा चि आहेत,
सीतालिंगित होतों ऐसा, परि तो न पूरला हेत. ६

वत्सा! वि म ळ जसें हें पंपाजळ यापरीस हृदय तिचें;
यतिचें व्रत मज दिधलें तद्विरहें; क्रौर्य सुसह न नियति[5]चें. ७

पुष्पव्र ज हा मातें स्मरमार्गणवृंदसा चि जाचितसे;
हा वायु विरहशिखिला दीप्त करुनि, मत्तनूसि पाचित[6]से. ८

पिक का य बोलते हे सीतेचे शब्द ऐकिल्यावरि ? तें
मधुरोक्त्यभ्यासार्थ प्रांजलि तीच्या पदांस कीं वरितें. ९

कीरद्वि[7] ज नासेला सीतानासोपमान साजेना;
तें नाक नाक[8] माज्या चित्ताचें, हा विमूढ लाजेना.’ १०

रघुना य क ऐसा बहु विलाप तेथें करी वियोगानें;
नानोपायें लक्ष्मण समजावी पादभक्तियोगानें. ११

१. कमळाचे देंठ. २. भ्रमरसमुदाय. ३. तिच्या वेणीसारखे. ४. वृक्षांतें. ५. दैवस्येत्यर्थः—**पंत.** दैवाचें. ६. शिजवितो आहे. ७. पोपटपक्ष्याच्या नाकाला. ८. स्वर्ग.

सुग्रीव रा घवांतें पाहुनि, धारि वालिचारशंकेला[1];
वायुसुतासि म्हणे, 'त्वां जाउनियां शोध पाहिजे केला.' १२

तेव्हां तो म रुद्रात्मज मुनिवेषातें धरूनि[*], सद्वृत्त,
विनयें मधुरोक्तीनें, जावूनि पुसे तयांसि तद्वृत्त.

'कोठें हो श्री मंत ! प्रयाण करितां? स्वनाम कळवावें;
स्वकुशलकथनसुधेनें मत्कर्णांच्या क्षुधेसि पळवावें. १४

खड्गशं रा सनपाणी[2], वीरमणी, मान्य सर्वलोकांहीं,
वल्की, जटी, मुनी हीं, दिसतां; नाहीं च समजलों कांहीं. १५

तुम्हीं अ म रपती कीं भूभारोद्वहनदक्षभुजदंड[3]?
आखंडलविष्णूसे[4] गमतां, देतां प्रहर्ष उद्दंड. १६

करुणा ज लधर दोघे[5], श्यामतनू, चित्रचाप, तापहर[6];
देहद्वयधारी कीं, एक त्रिपुरघ्न सुप्रताप हर[7]. १७

मीं तन य मारुताचा; नाम हनूमान् असें असे माजें[8];
सुग्रीवदूत आहें; वृत्त वदा, इष्ट कर्णकामा जें. १८

मीं वान रा कृतीतें आच्छादुनि अन्य वेष आदरिला;
तुमच्या स्वदर्शनानें माजा हृत्ताप सर्व संहरिला. १९

वालीना म कपीश्वर, तदनुज सुग्रीव ऋष्यमूकदरीं
वसवितसे धाकानें; अग्रज जो तो च जाहला तदरी.' २०

वातात्म ज वाक्याचें श्रवण करुनि, राम ही वनामाजी
सांगे स्वकथा, इच्छित होता तो आंजनेयनामा जी. २१

पादद्व य रामाचें वंदुनि माथां भवांबुनिधिपोत[9],
सुग्रीवासि तराया, घेउनियां जाय अंजनापोत[10]. २२

वंदी प्रां ज लि राघवपदपद्मातें सुकंठ बहुमानें;

---

१. वालीचा दूत असावा ह्या संशयाला. २. तलवार आणि धनुष्य धारण करणारे. ३. पृथ्वीचा भार धारण करण्यास समर्थ आहेत भुजदंड ज्यांचे असे अर्थात् चक्रवर्ती. ४. इंद्र व विष्णु यांसमान. ५. इदमुभयपरं—**पंत.** ६. इदं रामपरं—**पंत.** ७. इदं लक्ष्मणपरं—**पंत.** ८. मारुती. अंजनीपुत्र. ९. संसारसागरनौका. १०. पुत्रः—**पंत.** * अन्य पाठ—**मुनिवेष धरुनि, परम.**

सानुज रघुपति हृदयीं आलिंगी त्यासि बाहुयुग्मानें. २३
पूजुनि य थोक्त केलें, शिखिसाक्षिक[1] सख्य दीनबंधूसीं;
शरणागतजनरक्षणदक्षासीं सत्कृपैकसिंधूसीं[2]. २४
मग वीरां[3] भूषणमणि राम कथी स्वात्मवृत्त सुगळाला;
दुःखकथा ते त्यातें मोही, जैसी महाभुजगळाला[4]. २५
त्यावर म हामती तो पूर्वकथा कथुनि रामरायातें,
कौशेयबद्ध[5] गगनच्युत भूषणपुंज दाखवी यातें. २६
त्या काळीं श्री राघव अवलोकुनि भूषणांसि नयनाहीं,
हृदयीं धरुनि म्हणे, 'हा विधे! तुला लेशमात्र नय नाहीं.' २७
तीं संस्का[6] रा वांचुनि मळलीं होतीं म्हणूनियां काय
प्रक्षाळी नेत्रजळें दाराभरणें समस्त रघुराय? २८
ऐसा स म यीं लक्ष्मण रघुनाथाला नमूनि समजावी;
आपत्काळीं धीरें हृदयीं धृति सर्वथा धरित जावी. २९
रघुरा ज वैरकारण सुग्रीवातें पुसे; तदा तो ही
रामासि म्हणे, 'वदतों पूर्वकथा; ऐक धर्मसेतो! ही. ३०
पूर्वी ज य शालीशीं वाळीशीं युद्धकाम मायावी
दुंदुभिसोदर दानव[7] आला नामेंकरूनि मायावी. ३१
वालिप रा क्रमभीतप्राणत्राणार्थ तो वरी विवर;
बिळवदनीं मज ठेउनि, शिरला मत्पूर्वज[8] प्रवीरवर. ३२
बिलधा म द्वारीं त्या होतों मीं वालिमार्ग पाहात;
तों बहु दिवसां आला आंतुनियां रक्तपूर वाहात. ३३
तेव्हां म ज गमलें कीं, गेला वाळी कपींद्र परलोका;
शोकाकुळ मीं जालों; मायावीचा हि लागला धोका. ३४
चित्तीं भ य बहु होतें मायावीचें, म्हणोनि बिळवदनीं

---

१. अग्नि समोर असतां झालेलें. २. उत्तमकृपारूप अद्वितीय समुद्र त्याशीं. ३. वीरालंकारसर्वस्व अर्थात् वीरशिरोमणि. ४. मोठ्या सर्पाची गरळ. ५. अरण्यकांड गीति ६५ पहा. ६. उजळा नमल्यानें. ७. मयपुत्रः—**पंत**. ८. वडिल बंधु.

ठेउनि महाशिळेला, तेथुनि आलों सशोक निजसदनीं. ३५
कपिरा[1] ज पारलौकिक केल्यावर, त्या प्रधानलोकांहीं
राज्याभिषेक केला, परि मीं चित्तीं न तोषलों कांहीं. ३६
वाळी ही य त्नानें मारुनियां दानवासि तो परते;
पाहे शिळा बिळाच्या वदनीं; फोडी भुजाबळें पर ते. ३७
तो नग रा ला येउनि, पाहे भद्रासनीं मला वाळी;
अत्यंत क्रोधानें सहज विवेकासवें तदा वाळी. ३८
मीं निज म स्तक त्याच्या राज्यासह अर्पिलें जरी चरणीं,
केला निश्चय त्याणें परंतु अत्यंत माजिया मरणीं. ३९
किष्किंधा श्री रामा! मजला जाली जसी च संयमनी[2];
यमनिभ[3] बंधु हि जाला; प्रवृद्ध भय तत्क्षणीं च होय मनीं. ४०
त्राण क रा या तनुचें, गेलों जेथें पळोन मीं रामा!
तेथें तेथें आला हा वाळी कोपयुक्त संग्रामा. ४१
त्यावर म तंगमुनीच्या पदप्रसादें, त्यजूनि धाकाशी
या गिरिगुहेंत वसतां, येउनि केलीस तूं बुधा! काशी. ४२
येथें कं ज दलाक्षा! वाळीपासूनि भीति मज नाहीं;
त्याचें कारण कथितों, तें ऐकावें तुम्हीं च सुजनाहीं. ४३
बहु[4] मा य महिषरूपी, दुंदुभिनामा, महोग्र, जयशाली
दानव युद्धासाठीं येतां, त्यातें वधी बळी वाळी. ४४
त्या असु रा ला मारुनि, वाळी गर्वें तदीयदेहातें,
लघुतूलपुंजसंनिभ[5], उडवी कवळूनि आपुल्या हातें. ४५
तें शव, म हीध्रसंनिभ[6], मतंगविप्राश्रमासमीप पडे;
तद्रक्ताचे जाले त्या मुनिराजोटजांगणांत[7] सडे. ४६
तें तो द्वि ज अवलोकुनि, कोपें तापोनि यापरी शापी:

१. वानरराजाचें उत्तरकार्य. २. यमपुरी. ३. यमासारखा. ४. अत्यंत कपटी. ५. कापसाच्या लहानशा गोळ्यासारखा. ६. पर्वततुल्य. ७. मतंगऋषीच्या पर्णकुटेच्या आंगणांत.

'ज्याचें कर्म असें, तो येतां या पर्वतीं मरो पापी.' ४७
हा निश्च य जाणुनियां, येथें येऊनि रक्षिले प्राण;
शरणागतजनरक्षणकुशला! आतां करीं परित्राण.' ४८
हें सह ज कृपासागर ऐकोनि म्हणे तयासि रघुवीर,
'किष्किंधा तुज देतों, मारुनि पापी कपी; धरीं धीर. ४९
हा प्रत्य य सुग्रीवाला यावा, याकारणें महाधीर
पादांगुष्ठें उडवी दुंदुभिदेहासि तत्क्षणीं दूर. ५०
परि हा रा नट वानर न धरी विश्वास, म्हणुनि एकशरें
छेदूनि सप्तताली[1], पर्वत ही फोडिला रघुप्रवरें. ५१
हस्तासि म स्तकासह रामपदीं अस्तभीति[2] तो लावी;
किष्किंधेला जाउनि, मग वाळीला रणास बोलावी. ५२
तो वीर श्री कांत, प्रचंड भुजदंड, धांवला वाळी;
दोघांचें कोपानें जालें भुजयुद्ध तीव्र त्या काळीं. ५३
रघुवी रा नें त्यांचा भेद दिसेना, म्हणोनियां बाण
नाहीं च करीं धरिला, रक्षाया मित्रबंधुचे प्राण. ५४
गुल्मद्रु[3] म वल्लीगणअंतर्हित तो रघूद्वह त्राण
करिल म्हणुनि सुग्रीव हि रण करि, जों होत कंठग प्राण. ५५
रघुरा ज मुक्त मार्गण मार्ग न दावी रिपूसि नाकाचा;
याम्तव जीवितरक्षणपर तो परतोनि जाय कपि काचा. ५६
अपज य लज्जित कपि तो पळोनियां जाय ऋष्यमूकातें;
भरताग्रज समजावी सुग्रीवातें, अतीव मूकातें. ५७
'तूं त्रान रा धिनाथा! पुनरपि करणें अशा च कलहातें;
मीं शर सोडुनि त्याच्या हृदयाचें निर्मितों शकल हातें. ५८
मीं, प्रथ म युद्धकाळीं भेद दिसेना, म्हणूनियां बाण

---

१. सात ताडांचीं झाडें. २. गेली आहे भीति ज्याची असा, निर्भय. ३. कांड नसोन मुळांत ज्याला खाद्या फुटल्या आहेत असे वृक्ष आणि वल्ली यांच्या आड राहिलेला.

नाहीं हस्तीं धरिला, रक्षायाकारणें तुजे प्राण! ५९
ऐसें तो ज गदीश्वर सांगुनि, त्याच्या गळयांत वल्लीला
बांधी; बाणनिवारणनिपुणौषधिची च ते धरी लीला. ६०
भेदकं[1] य शोनिधानें रामें ऐसें करूनि कपिकंठीं,
पाठवितां तो गेला, जे किष्किंधापुरी, तदुपकंठीं[2]. ६१
तो क्रोध ज नक वाक्यें बोलोनि, रिपूसि शीघ्र पाचारी;
स्वाधिक्षेपश्रवणें ये युद्धाला अपत्रपाचारी[3]. ६२
त्या काळीं य त्नानें तारा वारी, धरून चरणातें,
वाळीसीं; म्हणे, 'जावें सुग्रीवासीं स्वयें नच रणातें. ६३
दिव्यप रा क्रम राघव, खरदूषणताटकाविराधारी,
सुग्रीवमित्र जाला, समानसुखदुःख चापशरधारी. ६४
त्वद्विक्र म निर्जित तो पुनरपि आला करावया आजी;
याचें भय मज भासे; समरा जाऊं नको स्वयें आजी.' ६५
दोर्वीर्य[4] श्री गर्वें वाळी हांसोनियां म्हणे, 'तन्वि!
मातें रणांत जिंकी, ऐसा भूमंडळीं नसे धन्वी. ६६
धर्मज्ञ रा जनंदन, सज्जन, सद्विद्य, तो कुळीन, सति!
वैर हि त्यासीं नाहीं, शंका चित्तीं धरूं नको, नसती.' ६७
या परि म हिषी तेव्हां समजाउनि, जाउनी, महाबळ हा
खळ हानिला न चिंती, सुग्रीवासीं स्वयें करी कळहा. ६८
दोघे भु ज युद्धातें प्रवर्ततां, परमतीव्र तत्काळ
गुल्मांतरित रघूद्वह सोडी दूरूनि बाण तत्काळ. ६९
केवळ य मदंडासम लागे जावूनि बाण तो यातें;
हृदयीं करी क्षतातें, सेवाया वालिप्राणतोयातें[6]. ७०

---

१. भेद दाखविणारें. २. पुरिसंमीपं—**पंत**. ३. लज्जाविरहित आचरण आहे ज्याचें असा. ४. भुजपराक्रमाच्या गर्वानें. ५. तस्य वालिनः काळ इति—**पंत**. ६. प्रह-ग्रेभ्यो न गौरवं इत्येके द्वितीयं हेमप्राकारं कुर्वद्भिरिव वानरैरिति रघुवंशे प्रयोग-दर्शनात्—**पंत**.

क्रूरश रा हतवक्षा वाळी सोडूनि शीघ्र भावातें,
पडला धरणीवरता वर तारेचा, तरू जसा वातें. ७१
तारारे[1] म णमुखी ते तारारावें[2] रडोनियां, त्यातें
तारा म्हणे, 'कपींद्रा! तारावें दुःखसागरीं मातें. ७२
हा नाथा! ज न्मदशा जाली कां अप्रदक्षिणा[3] माजी?
तुजला काळभुजंगें गिळिलें वीरा! कसें क्षणामाजी? ७३
रामा! का य कपींद्रें केला तूझा वधार्ह अपराध?
नव्हे हा खर दूषण, नव्हे त्रिशिरा कवंध, न विराध. ७४
कां सह ज दया त्यजिली? सागर जाला क्षणांत मरुधन्व[4];
माजा ठाईं जालें कां हें यमदंडतुल्य तव धन्वें[5]? ७५
जोडावें य श मज ही पतिसीं योजूनि ताटकाराते!'
ऐसे करी विलाप, प्रियास हृदयीं धरूनि, तारा ते. ७६
तेव्हां ता रा लोचनजलसेकें लब्धसंज्ञ[6] तो वाळी,
कांतेला समजाउनि, निजहस्तें अंगदासि कुरवाळी. ७७
कांचन म य माला दे दुःखावनतानुजास, तोकासें[7]
रामकरीं, काळकरीं जीवित, शोकास आप्तलोकास. ७८
त्या काळीं श्री रघुवर करवी त्याची क्रिया यथायुक्त;
मग किष्किंधाश्रीसीं केला सुग्रीव तो हि संयुक्त. ७९
तो युव रा जा केला अंगद रामें; तदा प्लवंगानीं
मानस आनंदविलें सीतापतिचें तदीयगुणगानीं. ८०
पुर्यांग म नाथें कपि प्रार्थी प्रभुला तदंघ्रिजलजाली[8];
ते प्रार्थना तयाची, भरताची प्रार्थना तसी जाली. ८१
'सरतां ज लधरकाल, त्वदीयपादांबुजद्वयाधीन;
धाडुनि कपिसेनेला, सीतादेवीस शीघ्र शोधीन.' ८२

---

१. तारावल्लभ जो चंद्र त्याप्रमाणें मुख आहे जिचें अशी. २. उच्च स्वरानें. ३. प्रतिकूल. ४. वालुकाप्रदेश, अरण्य. ५. धनुष्य. ६. सावध. ७. अपत्यास—अंगदास. ८. त्याच्या पदकमलावरील भुंगा.

हा निश्च य केल्यावर कपिला प्रभु तो म्हणे, 'स्वनगरा जा;'
वनकाळीं गृह केला रामें प्रस्रवणनाम नगराजा. ८३

कामश रा कुळ राघव कंदरसदनीं[1] वसे सखेदमना[2];
मदनास म्हणे, 'करिशी, कां बाणगणें स्मरा! सखे! दमना?

वत्सा! श्र म ला आत्मा, हा वर्षाकाळ काळसा जाला;
गगनच्युत जलधारा या धरिती काळकूटसाजाला[3]. ८५

सप्राणा ज नकसुता असेल? मीं काय तीस पाहीन?
स्त्री हारऊनि रडतों, ऐसा कोणीं नसे त्रपाहीन. ८६

नर रा य देत असतां, अभाग्य हा मीं न पावलों कमलां[4];
कांतेला हारविलें; हांसत असतील सर्व लोक मला.' ८७

ऐसा वि ज नीं राघव, वर्षाकाळीं, करी विलाप वनीं;
ज्याला स्पर्श करुनियां, नवा नवा खेद दाविला पवनीं. ८८

वर्षल्या य त वासर, वर्षाकाळीं, जसे तसे सरले;
गगनापासुनि सचपळ[6] हळूहळू सर्व मेघ ओसरले. ८९

पद्मां क रा स शारद काळ हि आला, परंतु न हरीनें;
यास्तव अनुजास म्हणे प्रभु, 'आतां प्लवगजीवन हरीन. ९०

कपि का म लुब्ध जाला; निजप्रतिज्ञातवाक्यनिर्वाहीं
यत्न करीना केवळ कृतघ्न हा दुष्ट निंद्य सर्वाहीं. ९१

किष्किंधा श्री लाभें जाला मदमत्त; नाठवी मातें;
सौमित्रे! जाउनियां धाडावें त्यास काळधामातें.' ९२

हें वाक्य रा घवाचें ऐकुनियां, दिव्यचापशरधारी
लक्ष्मण किष्किंधेला गेला सक्रोध तो विराधारी. ९३

लक्ष्मण म त जाणुनियां, प्लक्षप्रभनामक प्रधान कृती

---

१. गुहागृहीं. २. खेदयुक्त मन ज्याचें. ३. विषाच्या सांठ्याला. ४. राज्यलक्ष्मी. ५. वर्षासारखें दीर्घ. ६. विद्युल्लतेसह. ७. शुभ्र कमलांचा जो समुदाय त्याचा मित्र. [ शरदृतूंत शुभ्र कमलें फार होतात हें प्रसिद्ध आहे च ]. ८. प्लवंगराज सुग्रीव. ९. आपण केलेलें प्रतिज्ञावाक्य पूर्ण करण्याविषयीं.

सुग्रीवातें करिती बोध, तदा होय निर्मळप्रकृती. ९४
लक्ष्मण ज सा स्वकार्मुकगुणघोषातें करी पुरीपाशीं;
तों तारेसि म्हणे कपि, 'सांपडलों सुभ्रु! आज यमपाशीं.' ९५
कपि ना य कवाक्यातें ऐकुनियां शीघ्र जाय ते तारा;
सौमित्रीतें विनउनि म्हणे, 'प्रभो ! किंकरासि या तारा. ९६
रामें श रा सि सोडुनि, वाळि[1]व्यसनाशि नाशिलें धीरा!
चापगुण[2]ध्वानें तूं कामव्यसनासि खंडिलें वीरा! ९७
येतां श्र म लासि पथीं, पूजेसह हा कपीश घे देवा!
सुग्रीवातें द्यावी, अभयासहवर्तमान, पदसेवा.' ९८
सांत्वन ज लें चि तारा, सौमित्रिक्रोधवह्निला शमवी;
सुग्रीव[3]शिरःषट्पद लक्ष्मणपदपंकजांतरीं रमवी. ९९
स विन य बद्धांजलि तो सुग्रीव र[4]घूत्तमांघ्रियुगलीला
वंदी, तों धरि तीतें राघवपदसालिपद्म[5]युगलीला. १००
तो बद्धां ज लि विनवी, म्हणे, 'विभो ! आज वाततनयानें
अखिल[6]कुलाचलनिलय प्लवंगबल आणिलें [7]ततनयानें. १०१
तूं विज य पावशील स्वबळें मारूनि रावणास रणीं;
सामात्यपुत्रबांधव, तो दुष्ट धरील यमपुरीसरणी. १०२
शोधाया रा जसुता, कपिसेना प्रेषितों दिगंतातें;
याला आज्ञा द्यावी, स्वस्थस्वांतेंकरूनियां, तातें.' १०३
आज्ञा न म नपरांतें देतां सुग्रीव 'जा' म्हणे 'तूर्ण;
मासातिक्रम होतां, दंडीन, शिरें करीन शतचूर्ण.' १०४
नमुनि श्री रामातें, लक्ष्मण सुग्रीव वंदुनी, [8]विनत
पूर्वदिशेला गेला, कपिसेना घेउनि स्वयें विनत. १०५

---

१. वालिरूप संकटास. २. धनुष्याच्या दोरीच्या टणत्कारानें. ३. सुग्रीवमस्तकरूपी भ्रमर. ४. रामपादद्वया. ५. भ्रमरयुक्त कमलद्वयाचे सौंदर्यातें. ६. सर्वकुलपर्वतवासी. [ महेंद्रो मलयः सह्यः शुक्तिमान् ऋक्षपर्वतः। विंध्यश्च पारियात्रश्च सप्तैते कुलपर्वताः ॥] ७. विस्तृत नयनेत्यर्थः—**पंत**. ८. वानरनामविशेष.

गेला नी रां धीश्वरदिक्प्रांताला सुषेण वेगानें;
उत्तरदिशेसि शतबळि गेला रविसूनुच्या वियोगानें. १०६
सांगद म रुदात्मज हा, कुमुदकनळनीळजांबवत्सहित
दक्षिणदिशेसि गेला, करावया सर्वसाधुलोकहित. १०७
धनदं ज लेशसुराधिप यांचया सर्वत्र शोधुनी आशा,
मासातिपात न करुनि, आले कपि, ते न पूरली आशा. १०८
गेले जे, यं मकाष्ठा शोधाया, वातजादि कपि वीर,
सीतोपलब्धि नाहीं, यास्तव धरिती न मानसीं धीर. १०९
वानर रा जा, अवधि क्रमितां, दंडील सर्वथैव करें;
यास्तव सचिंत शोधिति विपिनें, गिरिगह्वरें, सुभीतिकरें. ११०
फिरतां म हा वनांतीं, राक्षस पाहूनि, अंगदें स्वकरें
त्या दशमुखभ्रमानें, वधिला, कोपोनियां मनीं निकरें. १११
जातां ते ज ल कामी कुहरीं शिरले, तदा स्वयें अर्ची
त्यांतें सावर्णिसुता, स्वयंप्रभाख्या, तपोग्निची अर्ची. ११२
आज्ञा हो य तिची, मग जाती कपि विंध्यपर्वतापाशीं;
सीतोपलब्धि नाहीं, यास्तव धरिती अखर्वतापांशीं. ११३
'हा मास ज री गेला, तरि तो दंडील विभु; कसें करणें?
धरणें' म्हणती 'अनशनसद्व्रत, येथें चि सर्वथा मरणें. ११४
भाग्योद य गृध्राचा जटायुचा थोर, जो स्वयें च, रणीं
विक्रम करूनि जाला परलोकीं पूज्य निर्मलाचरणीं. ११५
आम्हांस रा घवाची सेवा कांहीं च पुण्यदा न घडे;'
हें वदतां, विंध्यगुहागतसंपातिश्रुतीत शब्द पडे. ११६
विकळ म ना संपाति स्वानुजमरणास ऐकतां जाला;

---

१. नीरं उदकं तस्याधीश्वरः स्वामीवरुणः तस्य दिक् प्रतीची–**पंत.** २. सुग्रीवाच्या. ३. कुबेर, वरुण, इंद्र. ४. दिशा. (अमरटीप). ५. दक्षिणदिशा. ६. सुतरां अत्यंत भयंकर–**पंत.** ७. सावर्णिमनूची कन्या. ८. महातापास. ९. विंध्यपर्वताच्या गुहेंत राहिलेला जो जटायुबंधु संपाति त्याच्या कानीं.

'काळव्यालें केवळ, न कळत, गिळिलें' म्हणे 'मम भुजाला.'

मग तो श्री रघुपतिच्या दूतांसि म्हणे, 'निजाभिधान कथा;
वदतां मृ[1]तिवृत्तयुता, जटायुची शोकसं[2]निधानकथा.' ११८

गृध्रव  रा तें कथिती पूर्वकथा प्लवग ते; तदा हाँ[3], तें
ऐकोनि, पावला बहु शोकाग्नीकरुनि चित्तदाहातें. ११९

'हा वत्सा! म रण तुला आलें; केलेंशि तुष्ट परलोका;
व्याकुळ मीं बहु जालों; टाकुनि गेलासि कां मला तोका!?' १२०

गृध्रद्वि  ज अनुजातें करी नि[4]र्वापांजलिप्रदान, मनीं
शोकाकुळ होउनि, तो स्वदशा तेव्हां सुखप्रदा न[*] मनी. १२१

मग 'आ य का' म्हणे 'ही पूर्वकथा; एकदा स्वबळगर्वें
सूर्यरथाप्रति गेलों, तों केला दाह फार हरिदश्वें[5]. १२२

सूर्यक  रा च्या स्पर्शें गगनपथीं देहदाह बहु जाला;
तेव्हां, निजपक्षा[6]धः स्थापुनि, संरक्षिलें चि अनुजाला. १२३

अग्निसँ  म अभ्रकरें[7] जाले अत्यंत विह्वळ प्राण;
जळलें मत्पक्ष, परी केलें मीं बंधुचें परित्राण. १२४

सानुज  ज सा तसा मग खालें उतरोनि फार तळमळलों;
धूळींत लोळतां मीं, बहु आलिंगूनि भूमितळ, मळलों. १२५

तों, सद  य स्वांतें त्या, निशाकरें मुनिवरें, क्षणामाजीं,
करुणानिशाकरानें[8] निवारिली दाहवेदना माजी. १२६

त्याणें म  ज ला पूर्वीं भविष्य सारें निवेदिलें होतें
तें पाहिलें; स्ववृत्त हि आतां सांगोनियां दिलें हो! तें. १२७

मत्तन  य सुपार्श्वाभिध भक्ष्याचा शोध काननीं करितां
पाहे महेंद्रगिरिच्या निकट दशास्यें बळें वधू हरितां. १२८

---

१. मरणवर्तनानयुक्त. २. शोककारक वृत्त. ३. संपातिरित्यर्थः—**पंत.** ४. तिलाञ्जलीचें दान. (अनरटीप). ५. सूर्यें—**पंत.** हिरवे आहेत घोडे ज्याचे असा सूर्य त्यानें. [सूर्यास 'हरिदश्व' म्हणतात]. ६. आपल्या पंखाखालीं. ७. अग्नितुल सूर्यकिरणें. ८. दयाचंद्रानें. * न मानी क्रिया—**पंत.**

स्वकुमा रा नें मारें हें कथिलें; ते च दाशरथिजाया
आहे अशोकवनिकास्थानीं; करितां विलंब कां जाया?' १२९

हें[1] गृध्र म णी सांगुनि गेला, होऊनि पक्षबळपूर्ण,
जाती महेंद्रगिरिला सिंधुतटीं ते प्लवंग ही तूर्ण*. १३०

कपि ते श्री सीतेचा ऐकुनियां यापरी समाचार,
जाले मुदित मनीं, परि त्यांसि गमे सिंधु रिपुसमा[2]चार. १३१

'या साग रा सि कैसें तरणें? याच्या पलीकडे लंका;
यातें विलंघिल्यावर, दिसेल सीता सती गतक[3]लंका. १३२

कैसें सा म र्थ्य असे कोणातें? कोण लंघितो यातें,
मार्गप्रत्यू[4]हातें, नदीपतीतें, अगाधतोयातें?' १३३

स[5]रसि ज भवजृंभोद्भव, ऋक्षपती जांबवान् वदे त्यांस,
'मारुति नौका असतां, चिंतासिंधूंत जीवदे त्यांस; १३४

हा तन य मारुताचा, याच्या ऐका अपारवीर्याला;
भक्षित होता परिणतफळमतिनें उपजतां चि सूर्याला. १३५

हे[6]मध रा ला ही हा सलील झेलील तूलकंदुकसा;
याच्यापुढें धरीना गोष्पदसमतेसि आज सिंधु कसा? १३६

व्यर्थ चि म नांत धरितां चिंता, पावोन सेतुला याला;
ओजस्तेजें यासम कोणी प्राणी नसे तुलायाला. १३७

याचे भु ज दंड पहा प्रचंड यमदंड दंडदक्ष महा;
हा वज्रदेह केवळ सुरशत्रुपराजयप्रद क्षम हा. १३८

हा विज य वीर्यशाली, दु[7]र्धर, दु[8]र्धर्ष, सर्ववीरमणी;
लंघुनि नदीपतीतें, शोधील नृपाळसूनुची रमणी.' १३९

ऐसें कं ज भवात्मज वदतां तो मारुती महाकाय

१. मूळ पाठ—**हें गृध्रमणिप्रोक्त श्रवण करुनि घेउनी तदाज्ञा ते। गेले महेंद्रगिरिला सिंधुतटीं सर्व ही तदा ज्ञाते॥** २. रिपूसारखी अर्थात् विरोधी करणी ज्याची असा. ३. निर्दोषा. ४. मार्गांत आलेल्या विघ्नातें. ५. कमलोत्पन्न ब्रह्मदेवाच्या जांभईपासून उत्पन्न झालेला. ६. मेरुपर्वताला. ७. ज्याला अडथळा करितां येणार नाहीं असा. ८. ज्याशीं झगडणें कठिण असा. * शीघ्र—**पंत.**

वाढे महेंद्रशिखरीं, वामन बळिराज्यकाम हा काय ? १४०

कपिना थ कप्रमोदासह मारुति वाढला स्वजयकामें;
तद्गौरवें महेंद्रासह लवले ते प्लवंग एकामें. १४१

तो मक रा लयलंघनलीलारंभीं म्हणे प्लवंगातें,
'अचळापरि अचळ असा, करुनि महेंद्राद्रिशृंगसंगातें. १४२

मीं जातों म करालय लंघुनि, देखावयासि त्या सतिला;
जैसा मयूरपक्षी सामोरा जाय मेघसंहतिला.' १४३

इति श्रीमन्मंत्ररामायणे श्रीरामनंदनमयूरेश्वरकृतौ किष्किंधाकांडः । ४
रुद्रा मंत्राः । अत्र ज्ञेयाः ॥ .

---

# सुंदरकांड

मतिवीर्य[2] श्री भाजन मारुति जेव्हां उडे, तदा शिखरी
स्वशिरोभंगें भावीदशमुखगति दाखवी तयाशि खरी. १

तों सलिल रा शिवाक्यें प्रकटे शिवदारबंधु[3] तो, यातें
विश्राम द्यावयाला, पक्षें भेदूनि सिंधुतोयातें. २

वक्षःस्थळें म रुत्सुत पाडी मानूनि विघ्नशं केला;
मैनाकासि गमे कीं, इंद्रें वज्रप्रहार हा केला. ३

'घेऊनि आं ज नेया! विश्राम, पुनः प्रयाण योजावें;
अब्धिप्रेषितहिमवत्सुत आप्त असें मनांत समजावें.' ४

हें आंजने य ऐकुनि, संमानुनि, तोषऊनि मैनाक,
गेला तसा चि चापच्युतशरसा; तुष्ट होय तें नाक. ५

परम त्व रा करुनियां, जाय महाकाय दीर्घ लांगूळ;
दशयोजनतनु हनुमान् स्वजवें चि करी पित्यासि पांगूळें. ६

---

१. सर्व मिळून एकदम. २. बुद्धि, पराक्रम व संपत्ति यांचें पात्र. ३. शिवपत्नी पार्वती तिचा भाऊ मैनाकपर्वत. ४. सोडलेला पाठ—**मारुति**. अन्य पाठ—**कपितो**. ५. लंगडा. आपला पिता वायु त्याला हि वेगांत मागें सारिलें असा भाव

धृतपक्ष म हीध्र तसा गरुडानिलवेगवान्, महाकाय,
जातो काळ दशाननगरग्रासैककाम[1] हा काय. ७

तों नागांची ज ननी सुरसा, सुरसाध्यसिद्धगणलपितें,[2]
वीर्यपरीक्षेसाटीं, विघ्न करी सागरीं महाकपितें. ८

वीततन[3] य दश गावें सुरसामुख वीस योजनें वासी,
राक्षसरूप धरुनियां भय दावी त्या प्लवंगदेवासी. ९

रोधूनि अं ज नीच्या तनयाचा सर्व मार्ग ते, अतुला
'विधिवरदान असे मज, भक्षीन' म्हणे 'बळें चि आज तुला.'

मारुति न य निपुण तिला स्वकथा सांगे, म्हणे, 'धरादुहिता
दशवदनानें नेली, केली दुष्टें मनःप्रियें[4] रहिता. ११

दशरथ रा जसुतातें, केलें संतप्त बहु वियोगानें;
शोधावया सतीतें जातों तद्दूत तन्नियोगानें. १२

करुनि न म स्कार तिला जाउनि सांगेन राघवाला हें;
मग येईन, तदा तूं मज भक्षुनि काम आघवा[5] लाहें. १३

यापरि[6] तो श्री मारुति बहु विनवी, परि नये दया तीस;
म्हणुनि दशकक्रमें मग वपु गुरु करि, होय योजनें तीस.

मारुति[6] तो रा गानें वाढे दशकें चि योजनें नवती;
शतगावें सुरसा करि मुख, तैं दोघांसि देव मानवती. १५

१. लंका गिळण्याची आहे मुख्य इच्छा ज्याची असा. २. देवादिकांच्या भापणावरून. ३. मूळ पाठ—**आनन आयत केलें, तत्संख्या योजनें बहु अशीति। असितीक्ष्णदंतदंष्ट्रा सुरसा व्यापी नभोंतर अशी ती ॥ ९** [ पूर्वचरणाच्या उत्तरार्धाचा "**तत्संख्या वीस योजनें अशिती**" असा अन्य पाठ आहे. ] ४. मनसा तु शुद्धेत्यर्थः—**पंत**. मनःप्रिय अशा गोष्टीपासून अर्थात् रामापासून वियुक्त. ५. सगळा—**पंत**. ६. मूळ पाठ—

**असि सांगे श्रीराघव कथा तथापि स्वकीय वदनाशी**
**सुरसा पसरी, दावी पर्वतशिखरासमान रदनासी. १४**
**वीर समीरात्मज तो होउनि अंगुष्ठसम शिरे वदनीं,**
**जाय निमेषार्धानें उडोनि गगनीं ग्रहर्क्षगणसदनीं. १५**

अंगुष्टसे[1] म तनूतें करुनि, शिरे मारुती तिच्या वदनीं;
जाय निमेषार्धानें उडोनि गगनीं [2]ग्रहर्क्षगणसदनीं. १६

तेव्हां प्रभं ज नात्मज देवाहीं वर्णिला महासुरसा;
आशीर्वादासह दे मार्गातें तोषवूनियां सुरसा. १७

तों वैनते य सा कपि जातां छायाग्रहें गृहीतगती
केला चि [3]सिंहिकेनें, जीपासुनियां न [4]विग्रही लगती. १८

वदनद्वा रा वाटे तीच्या देहांतरीं शिरोन, खरें
नखरें मर्मं छेदुनि मारी, तिसं हें च योग्य दान [5]खरें. १९

तेथुनियां म ग मारुति उडोनि गेला समुद्रतीराशी;
प्याया शत्रुयशोब्धि, प्रभुप्रतापाग्निची च ती राशी. २०

दिग्वक्त्र[6]रा ज धानीसमीप जातां चि, सूर्य तो यातें
शत्रुप्रतापगतिला सूचवि जाऊनि सिंधुतोयातें. २१

दशमुख य शोब्धिवाडव मारुति जातां पुरीं शिरायास,
लंकाधिदेवता तों आली याशीं कली करायास. २२

दैवें परा ज य दिला तीजकडे, कीं कपी न मारु तिला;
ते आज्ञा दे, भाविस्वविनाशातें वदोन मारुतिला. २३

शुभ्रांशू[7]दं य होतां, जाउनियां शत्रुच्या पुरीमाजी,
'मा जी रघुवंशाची, कोठें ते स्वामिनी' म्हणे 'माजी?'

तदुपरि रा क्षसराजप्रासादीं तो शिरे, जसा नरकीं;
[8]नरकिन्नरकिंपुरुषाद्यमरार्थ प्राप्तकाळ वानर कीं. २५

---

१. मूळ पाठ—

**सुरसेला मग कपि तो म्हणे, 'तुजा आननांत शिरलों कीं'**
**तों अमर पुष्पवर्षें पूजित जालें हरींद्रशिर लोकीं. १६**

२. ग्रहनक्षत्रसमुदायाच्या स्थानीं. ३. राहुमातेनें. ४. प्राणी. ५. मूळ पाठ—**हें मृत्युचें निदान खरें.** ६. एकंदर दिशा दहा म्हणून 'दिग्वक्त्र'=दशवदन=रावण. ७. शुभ्रांशु=चंद्र. ८. नर=मानव. किन्नर=मानवाचें धड पण तोंड घोड्याचें असणारा प्राणिवर्ग. उ०=तुंबर. किंपुरुष=घोड्याचें तोंड पण मनुष्याचें धड असणारा प्राणिवर्ग. म्हणून मानव, गंधर्व व देव ह्यांच्यासाठीं.

राक्षस र  म णीयतनूरमणीगण सुप्त देखिला, पर ते
सीता न पाहिली, मग तोषाध्याक्रांतचित्त[1] तो परते. २६
तो हृदयीं  श्री मद्रघुनाथपदातें नमूनि, लंकेला
पाहे; लघुदेहातें घेउनि, सर्वत्र शोध बहु केला. २७
तेथुनि, नि  रा श होउनि, मारुति गेला अशोकवनिकेला;
तेथें असेल सीता, ऐसा निश्चय मनोभवनिं केला. २८
कुरबक,  म रुबक, वंजुल, तिलकामलक, प्रियाल, हिंताल,
माकंद, कुंद, तिंदुक, चंपक, चांपेय, केतकी, ताल, २९
वट, कुट  ज, लकुच; पाटल, पनसाश्वत्थद्रु, सरल, पुन्नाग,
बकुल, तमालोदुंबर, चंदनक, लवंग, बिल्वतरु, नाग, ३०
ऐसे संच  य तरुचे अवलोकुनि, हेमशिंशपा[2] पाहे;
तीवरि चढोन देखे, तों रक्षस्त्रीगणीं अपापा हे. ३१
मलिनांत  रा सुरींच्या मध्यें सीतेसि देखतां, कपिला
केवळ अनुचित भासे, जैसी कीं गर्दभीगणीं कपिला[3]. ३२
चित्तीं म्हणे  म रुत्सुत, 'दैवें तूं राक्षसीसवें तुळशी;
अनुचित केवळ जालें, मसणीं भांगेमधें जसी तुळशी. ३३
शिव! शिव! ज गन्निवासा! कैशी गति जानकीसि या घडली!
श्रीशालिग्रामशिला यवनाच्या शून्यमंदिरीं पडली!' ३४
हें आंजने  य चिंतुनि, जाला संतप्त जेंवि शिखिकुंड;
तों रात्रिचरमभागीं[4] आला तेथें सकाम दशतुंड. ३५
तो पापपुं  ज निस्त्रप, निर्मर्याद, स्मरार्त बडबडला;
तें अश्राव्य, अवाच्य, श्रवण करुनि, मारुती हि गडबडला.
सीता तें आ य कतां, स्थापुनियां अंतरीं तृणासि करें

---

१. संतोष व मनोव्यथा यांहीं व्यापिलें आहे चित्त ज्याचें असा. २. सुवर्णाची सिताफळ. ३. कामधेनु; अन्यार्थ एकरंगी गाय. अशी गाय सौभाग्यदायी आहे अशी समजूत आहे. ४. रात्रीच्या शेवटल्या भागीं म्हणजे पहांटेस.

खळदर्शनकंपिततनु यापरि बोले पराङ्मुखी[1] निकरें: ३७
'कां पापाचा रा नें जासी नरकीं सुहृज्जनासहित?
अमृतरसातें टाकुनि, म्हणसी कां क्ष्वेडसेवनासें[2] हित? ३८
लोकपिता म ह तूजा कुळगुरु पौलस्त्य, बंधु वैश्रवण[3];
श्रवण करुनि हे तूझे गुण होती तप्त पूर्वजश्रवण. ३९
दुष्प्राप्या हे श्री निजदैवें संप्राप्त जाहली अतुला;
क्षीर जसी भषणाला[4], तैसी न जिरे अमंगळासि तुला. ४०
कां परदा रा संगति निजचित्तामाजि मानिशी सारा?
सारावा न वृथा तूं पुण्यायुर्द्रव्यकोष हा सारा. ४१
रामकरीं म ज देउनि, मस्तक ठेवीं तयाचिया पादीं;
सुखकारिणी, समुचिता, लोकहिता तत्कृपा चि संपादीं. ४२
न तमःपुं ज कदापि हि जिंकील रणांगणीं महारविशी;
बलवद्वैरें केवळ वृथा चि निजजीवनासि हारविसी. ४३
काकुत्स्थसा य कांची जरि तवहृच्छोणितांबुधारांहीं
होणार पारणा तरि, वारिल तुज कोण? कीं बुधा! राहीं.'
ऐसें असु रा धिप तो ऐकुनि, कोपोनि, निस्रपाचारी
निर्दयकृत्या[6], कृत्या, दुर्वृत्ता राक्षसी चि पाचारी. ४५
'मासयुगीं म ज होतां वश, न्यावी केलिमंदिरीं धाया;
किंवा महानसातें[8] न्यावी हे प्रातराश[9] साधाया.' ४६
कल्मषभा[10] ज न रावण ऐसें बोलोनियां, निशांतातें[11]
गेला अकृतार्थमनें, संनिधि जाणोनियां निशांतातें[12]. ४७

---

१. परपुरुषमुखावलोकन न करणें हा पतिव्रतेचा धर्म; मग त्याशीं बोलण्याचें नांव कशाला? पण सीतादेवीस दुर्दैवानें बोलण्याचा तर प्रसंग आला. करितां 'काडी' आड धरून व तोंड फिरवून ती बोलती झाली. २. विषपानास. ३. कुबेर. ४. कुत्र्याला. ५. खोडलेला पाठ—**तूझ्या हृदयरक्त**. ६. नाश करण्यांत आनंद मानणाऱ्या. ७. मूळ पाठ—**त्यांस म्हणे**. ८. स्वयंपाकगृहातें. ९. सकाळचा फराळ, न्याहारी. १०. पापाचें घर. ११. गृहातें. १२. रात्रीची अखेर अर्थात् प्रभातकाल त्यातें.

त्या राक्षसी　य माच्या बहिणी जाल्या; 'धरा, चिरा, भाजा,
　　चावा, खा ' म्हणती तों, कांपे ते भूपसूनुची भाजा. ४८
तेव्हां सह　ज सुशीला त्रिजटा ते राक्षसींस त्या वारी;
　　स्वप्न कथी राम[1]यश:शुभ्राब्ज रिपु[2]प्रतापशिखिवारी. ४९
वरटा[3] वा　य ससंघीं, तैसी ते राक्षसीगणीं सीता;
　　तेथें त्रिजटा जाली, मधुरोक्तें कोकिळा चि सुविनीता. ५०
'जानकि! धी रा सि धरीं; अविलंबें हा त्वदीय कांत रणीं
　　तरणी शत्रुध्वांतीं होइल, चिंतानदींत ही तरणी.' ५१
ऐसें ते स　म जावीं; तेणें तो दुःखघन[4] उभे वारे;
　　परि दुष्टभापणें त्या सीतेला सूटलें[5] उभें वारे. ५२
क्षितिकन्या श्री रघुवरयुवति करी तेथ फार आकांत
　　निश्चितमरणा सीता म्हणे, 'प्रभो! रामचंद्र! हा कांत!'
मारुति ध　रा रुहावर बैसुनि, उपजावयास विश्वास,
　　राघवगुणांसि वर्णी, जे देती नित्य तोप विश्वास. ५४
तों सीता द्रु　म शिखरीं मारुतिला देखतां म्हणे, 'मातें
　　पडला कीं दुःस्वप्न, क्षेम[6] असो बंधुयुक्तरामातें. ५५
चिंतेनें नी　ज नसे, स्वप्न नव्हे, हा नखाक्ष[7] मायावी
　　कपिरूपें आलासे पीडाया; यास कां क्षमा यावी?' ५६
ऐसी ते भ　य मानुनि, सीता पडली धरून मोहातें;
　　तेव्हां मारुति तीतें, सावध होतां, करी नमो[8] हातें. ५७
मारुति क　रा सि जोडुनि सीतेसि म्हणे, 'धरूं नको शंका;
　　मीं रामदूत हनुमान्, तुजसाठीं सर्व शोधिली लंका. ५८
माते! दिन　म णिवंशप्रभवें वीरें सलक्ष्मणें रामें

---

१. रामयशोरूप निष्कलंक चंद्रमा. २. शत्रुप्रतापाग्नीस उदक. ३. हंसी. (अमरटीप). ४. त्यायोगें जे दुःखाचे उमाळे-उभे (उठले होते) [ ते ] वारे म्हणजे थांबले. ५. उभें वारे सूटलें=तळमळ लागली; चैन पडेना. ६. क्षेमशब्दोऽदंतोपि—**पंत**. (अमरटीप). ७. विंशतिनेत्रो रावण इति—**पंत**. ८. नमस्कार.

कुशळ तुला पुशिलेंसे, त्वद्विश्लेषज्वराचिया धामें.[1] ५९
रामांघ्र्यंबु ज भृंगें, सुग्रीवें, वानरेश्वरें, प्रणतें
कुशल तुला पुशिलेंसे, ज्याचें मन 'धिक्' स्वशक्तिला म्हणतें.
घे अंगुली य कातें, रामानें धाडिली तुला मुद्रा;[2]
मजसीं स्वकिंकरासीं वद कांहीं गोड, सोड हे मुद्रा.[3]' ६१
एवं प्रभं ज नात्मज वदतां, सोडूनि दीर्घ निश्वास
विश्वास मान्य ऐसें बोले सीता धरूनि विश्वासः ६२
'मत्प्राणप्रि य राजा कैसा आहे वनांत वीरमणी?
ज्याची दशकंठहृता क्षणक्षणीं दुःख आठवी रमणी. ६३
लक्ष्मण ब रा असे कीं? जो मातें मानितो सुमित्रा[4]सी?
ज्याचा सज्जनतोषद सद्गुण रिपुला करी श्रमी, त्रा[5]सी. ६४
जालें संग[6] म न कसें सुग्रीवासीं मनुष्यरायाचें?'
ऐसें पुसतां, मारुति सांगे तिस वृत्त सर्व ही याचें. ६५
विकचाब्ज[7] श्री वदना सीता तेव्हां म्हणे 'मनामाजी
ऐशी आहे मारुततनया! अत्यंत कामना माजी. ६६
रामानें मा रा वें, येथें येऊनि, राक्षसापसदा;
हा उद्वेग[8] करितसे, लोकांसि जसा घरांत साप सदा. ६७
हा रक्षोध म मीं निजपातिव्रत्यानळांत होमीन;
परि इच्छा आहे कीं, जन रामयशोर्णवांत हो मीन. ६८
तनुजानु ज मितांसह, रक्षःपतिचा गुडासम ग्रास
काळानें केल्यावर, पावेन सुखास मीं समग्रास. ६९
हा रघुना य कहस्तें मरेल रिपु तेधवां, धवासहित
जाइन पुरीस तेव्हां, होइल सांकेतसौधवास[9] हित.' ७०

१. तुझ्या वियोगानें झालेल्या मनोव्यथेच्या घरानें. २. खूण. ३. स्तब्धताचिन्ह. ४. मातृतुल्यभाववति—**पंत**. ५. भययुक्त. ६. भेट. ७. पूर्ण उमललेल्या कमळाच्या शोभेसारखी शोभा आहे मुखीं जिच्या अशी. ८. थरकांप. ९. अयोध्येंतील राणीवसा. 'सौधवास'=राजस्त्रियांचा महाल. ( अमरटीप ).

वाक्य असें रा ज्ञीचें ऐकुनियां, मारुती म्हणे, ‘ सां*धु;
साधू[1] काम तुजा प्रभुयशःसमुद्रीं चरित्रवासा[2] धू. ७१
परमोत्त म हें माते ! कुलशीलानुगुण सन्मताचरण;
हें मज न मानतें तरि, दशमुखनाशार्थ जन्मता[3] च रण. ७२
हा पलभो ज न गूर्थीं[4] जसा कृमि, अघीं तसा रमे; यातें
मीं पळमात्रें वधितों, जैसा मृगकांत सारमेयातें[5]. ७३
पारि राम य शश्चंद्र प्रम्लानद्युति[6] नसो, म्हणून मनीं
धरिला चि धीर सीते! दुष्कर दशकंठनाश हें न मनीं. ७४
चिंता बाहु[7] ज मणिला भ्रमवी, जैसा कुलाल चाक वळें;
ऐकावें सप्राणा[8] तूं हें रामें स्मराग्निच्या कवळें. ७५
विश्वास हो य ऐसें, पूर्व अभिज्ञान[9] दे उपायनसें;
अर्पीन रामचरणीं; तत्तोषातें दुजा उपाय नसे.’ ७६
वायुकुमा रा ची अशि वाणी ऐकोनियां, कथा यातें
विदित कराया, सीता आरंभ करी स्वयें कथायातें. ७७
‘बा ! एकदा म दंकीं मस्तक ठेऊन चित्रकूटवनीं
राघव निजला असतां असतांचा[10] शासिता लताभवनीं, ७८
राममुख श्री सक्ता मीं होत्यें तों शरासमान खरें[11],
मद्धृदयीं धाराधर[12], वासविवायस[13], करी क्षतें नखरें. ७९
तेव्हां रघु रा ज, जवें कुशरूप कुशेशयासनास्त्रातें[14]
सोडुनि, हारिता जाला निमेषमात्रें तदेकनेत्रातें. ८०
घ्यावा चूडा[15] म णि ही; हीं दोन तुला दिलीं अभिज्ञानें;
जा[16] आतां रामातें[16] आणावें शीघ्र तूं अभिज्ञानें[17].’ ८१
ऐसें वदतां ज लि तो मारुति ऐकोनियां, करी नतिला;

---

१. पुरवो. २. चरित्ररूप वस्त्रांस. ३. युद्ध च जुंपलें असतें. ४. विष्ठेंत. (अमरटीप) ५. कुत्र्यातें. (अमरटीप). ६. निस्तेज. ७. बाहुभ्यां जातः क्षत्रिय इत्यर्थः—**पंत.** ८. जीवंत. ९. खूण. १०. दुष्टांचा. ११. तीक्ष्णें. १२. मेघरूप. १३. ऐंद्रकाक. १४. ब्रह्मास्त्रानें. १५. शिरोभूषण. १६. अन्य पाठ—**आतां श्रीरामातें**. १७. सुज्ञें. * योग्य.

चूडामणिसह आज्ञा घेऊनि, निघे स्वयें पुसून तिला. ८२

सीतांघ्रिद्व य वंदुनि जातां, करुनी मनीं विचाराशी,
मोडी अशोकवनिका मारुति बळशौर्यदीप्तिचा राशी. ८३

करितां प रा क्रमानें अशोकवनिकातरुप्रभंजन, तो
मारुति असुरांशि गमे क्षयकर्ता देहवान् प्रभंजन तो. ८४

कथिती प्र[1] म दवनक्षय तद्रक्षक राक्षस क्षमापतितें;
म्हणती, 'अशोकवनिका विनाशिली वानरें महापतितें.' ८५

राक्षसकुं ज र रावण तेव्हां नक्तंचरांसि पाचारी;
येती बळिप्रहस्तप्रधानपुत्रादिक क्षपाचारी. ८६

'कैंचा निर्भ य वानर आला? त्याला स्वयें निवारा जा;'
ऐशी करूनि आज्ञा, प्रेषी असुरांशि तेधवां राजा. ८७

पुत्रें प्रभं ज नाच्या मारुनि बळयुक्त जंबुमालीला,
केली वडवाग्नि[2]समें अंतकचेत[3]:सुखक्षमा लीला. ८८

असुरक्ष य करितां तो जाला सर्वामरांशि सुख काळ;
लंकाद्वारीं मारुति जातां भासे पलाशजनकाळ. ८९

तेव्हां कोपें रा वण पंच प्रवसाद्यमात्य तो धाडी;
'जीवंत धरा वानर; घाला जाऊनियां' म्हणे 'धाडी.' ९०

ते सचिव म न्युतप्त स्वायुधनिकरें परासुहानिकरें
वर्षति, धरा[4]धरावर धारा[5]धरसे, मरुत्सुतीं निकरें. ९१

बलशाली श्री मारुति तो रणरंगांत यातुधानांतें
तोरण[6]परिघें मारी दशवदनाच्या निजप्रधानांतें. ९२

रणतृट्[7]प रा जयास्तव, रावणसचिवस्वजीविनोदक पी,
हांसे, उडे प्रहर्षें, धावे, ऐसे करी विनोद कपी. ९३

स्वसचिव म थनश्रवणें आली सक्रोध अक्षमा राया;

---

१. राजस्त्रियांचें क्रीडोद्यान त्याचा नाश. २. मूळ पाठ—**कक्षाग्निसमें**. ३. मृत्युचित्तास सुख देणारी. ४. पर्वतावर. ५. मेघाप्रमाणें. ६. दाराच्या अडसरानें. ७. युद्धतृषा शांत व्हावी म्हणून.

धाडी, बळाबळाचा विचार न करूनि, अक्ष मारीया. ९४

मरुदात्म  ज प्रतापें जाला तो सबळ अक्षम रणातें,
ज्वलनीं पतंग तैसा, पावे जाऊनि अक्ष मरणातें. ९५

अक्षा[2]सुक्ष  य दक्षप्लवंगवक्षें पडे पुरीवरणें[3],
वरणें[4] करी तद्रेणु द्युनदीचें, करूनि भानुभावरेण[5]. ९६

दशकंध  रा स अक्षक्षयवार्ता जाहली, जसी अशनी;
मग इंद्रजितासि म्हणे, 'शैघ्र्य[6] करीं वानराचिया अशनीं[7]; ९७

तूं अप्रति  म पराक्रम इंद्रजिता ! करुनियां स्वयें आजी
प्रायः प्लवगाधम तो जीवंत धरूनि आणिजे आजी.' ९८

ऐशी निज  ज नकाज्ञा होतां, वंदूनि मेघनादानें[8],
केलें प्रयाण, तेंव्हां भरलें नभ वीरसंवनादानें. ९९

वायुतन  य आनंदे रणांगणामाजि मेघनादानें,
जैसा मयूरपक्षी हर्षे विपिनांत मेघनादानें. १००

पंचास्य[9] ग  ज समूहीं, पवनात्मज तेंवि यातुधानगणीं;
*धैर जलधरधारांला, तद्वद्रिपु शस्त्रवृष्टिला न गणी. १०१

शूलासिसा  य कादिक शस्त्रें पडती अनेकलक्ष तदा;
आयुधवृष्टि न जाली परि पवनसुतासि एकलक्षं[10]तदा. १०२

ब्रह्मास्त्रानें  रा वणसुत मारुतिला करी निबद्ध रणीं;
विध्यस्त्राचा महिमा रक्षी, सामर्थ्य जरि तदुद्धरणीं[11]. १०३

होतां पिता  म हास्त्रें बळसागर मारुती निबद्ध रणीं;
धरणीतळीं पडे, परि योजी यत्नासि सुरविपदुद्धरणीं[12]. १०४

निष्क्रिय[13] तो श्री मारुति होतां, आत्यंतिकप्रमोदानें;

---

१. रावणपुत्राचें नांव. २. अक्षाचा प्राणान्त करण्यांत तत्पर अशा वानराच्या अर्थात् मारुतीच्या हृदयानें. ३. नगरीचा तट. ४. आवरण, आच्छादन. ५. सूर्य-कांति झांकून. ६. त्वरा. ७. भक्षणीं. ८. इंद्रजितानें. ९. सिंह. १०. एकक्षतदापि नाऽभूत–**पंत**. ११. त्या ब्रह्मास्त्रांतून मुक्त होण्याविषयीं. १२. देवांची विपत्ति दूर करण्याविषयीं. १३. स्तब्ध. * भूधरः–**पंत**.

शणरज्जूं[1]करुनि बळें बांधविला शीघ्र मेघनादानें. १०५
मग नग रा मध्यें तो नेला, जैसा स्वकाळ चाळविला[2];
लूता[3]तंतुनिबद्धस्तंबेरमसा धरूनि चालविला. १०६
रावणस म क्ष नेला वातात्मज जेधवां बळनदीप,
त्याच्यापुढें दिसे तो दशकंधर दीन, जेंवि दिनदीप[4]. १०७
तिमिरीं [5]अं ज न पर्वत दशशिखर जसा, तसा महाकाय;
केवळ पातकसंचय, सर्व[6]तमस्तोमधाम हा काय! १०८
मशकप्रा य दशानन पवमानसुतें विलोकितां गणिला;
कपिमिष काळ असा तो मारुति भासे पलाशजनमणिला.
मारुतिला रा त्रिंचरपतिप्रधान प्रहस्त सुविचारी,
'तूं कोण? कोठिचा? कां वन मथिलें?' हें समस्त हि विचारी.
तेव्हां म्हणे म रुत्सुत, 'दशकंठा! मीं तनूज पवनाचा;
सेवक सुग्रीवाचा, वाल्यनुजाचा, प्रतापभवनाचा. १११
रविवंश ज दशरथनृपसंतानक्षीरसिंधुचंद्राचा,
गाधिजमुनिमखनाशकराक्षसमथनक्रियावितंद्रा[7]चा, ११२
श्रीकंठ[8]सा य कासनभंगकुपितभार्गवस्मयहराचा,
गौतमभार्या[9]शापक्लेशमहाघांधकारमिहिराचा, ११३
सत्यव्रत ज नकाज्ञात्राणार्थत्यक्तराज्यकामाचा,
त्वद्भगिनीवैरूप्यक्रुद्धखराद्यसुरबळविरामाचा[10], ११४
कांचनका य मृगच्छल[11]हृतकांताविरहतप्तदेहाचा,
निजभार्याचोरासुक्षयप्रतिज्ञाविलासगेहाचा, ११५

---

१. अंबाडीच्या दोरानीं. २. चिडविला. ३. कोळ्याच्या सुतानीं बांधिलेल्या गजाप्रमाणें. ४. दिवसा लाविलेला दिवा. ५. काजळाचा पर्वत. ६. सर्व अज्ञान-समूहाचें स्थान. ७. अवितंद्र=निरलस. ८. शिवधनुष्य मोडल्यामुळें संतप्त झालेल्या भार्गवाचा गर्व परिहार करणाऱ्याचा. ९. गौतमाची पत्नी जी अहल्या तिला झालेल्या शापक्लेश व महापापरूपी अंधकाराचा जो सूर्य, त्याचा. १०. नाशकर्ता त्याचा. ११. छल=कपट.

तावकप   रा क्रमार्य[1]मराहुप्रभवालिवीरकाळाचा,
अभिमतवितरणहर्षित[2]सुग्रीवादिप्लवंगपाळाचा, ११६
[3]वैराविक्र   म मंडितभुजदंडनिहितचंडचापदंडाचा,
मीं दूत राघवाचा, [4]त्वद्विधदुष्टैककाळदंडाचा. ११७
वाल्यनुजें   श्री सीता शोधायाला प्लवंगयूथपती
पाठविले, ते गेले जेथवर ब्रध्नपाद[5] हे तपती. ११८
मीं पारावा[6]   रा तें आलों लंघूनि एक त्यामाजी;
सीतेला अवलोकुनि, जाली हे दृष्टि निर्मला माजी. ११९
दशकंठा!   म द्वाक्यें, रघुपतिला जानकी समर्पावी;
रामशरक्षतवक्षःक्षतजें क्षिति राक्षसा! न तर्पावी. १२०
वाताश[7] भु   ज ग परि तो, गरुडश्वासानिळीं[8] न धरि कामा;
परदाररता! मरसी, धरूनि रामांगनाशचि रिकामा. १२१
रामेषुचं[9]   य ज्वलनीं निजवंशाचा करीं न होमासी;
सच्चरितामृतपानीं तुझी कथा हे जनीं न हो मासी. १२२
ठेवीं स्वशि   रा सह तूं सीतेला राघवाचिया चरणीं;
न करीं पापाचारें वंशक्षय आघवा[10] चि या च रणीं. १२३
प्रभुला न   म न करीं, जरि केला दंडार्ह मंतुचा[11] विसर[11];
विसर पडेल नृपाला, तन्मानस मानसाख्य जेंवि सरें[12]. १२४
माजा वाक्यें ज   रि तूं न देशि नृपसिंहनिजकळत्रास,
तरि घडतो तुज पापा! काळापासूनि अविकळत्रास. १२५
नं   करुनि   य त्न विमूढा! मीं च तुला मारितों पळामाजी,
रामाज्ञा परि नाहीं; वेदस्मृति ते च केवळा माजी. १२६

१. अर्यम=सूर्य. २. इच्छित दिल्यानें आनंदित. ३. उत्कृष्ट पराक्रमानें अलंकृत जो भुजदंड त्यांवर ठेविलेलें आहे भयंकर धनुष्य ज्यानें त्याचा. ४ तुझ्यासारख्या दुष्टांचा केवळ मृत्यु असा त्याचा. ५. रविकिरणः—**पंत.** ६. समुद्रातें. ७. वायु-भक्षक. ८. गरुडाच्या श्वासवायूच्या ठायीं. ९. चय=समूह. १०. संपूर्ण—**पंत.** ११. अपराधसमूहः—**पंत.** १२. तटाकः—**पंत.**

मीं निजभु   ज बळलेशें क्रीडा केली वनीं पलाशगणीं;
आलोंसें कळवाया अंतीं हे वक्रता जसी सगणीं[1]. १२७
भावि  प्रल  य कथाया, वांचायाचा उपाय दावाया,
आलों; पारि तूं कांहीं न वदसि कां सांग दुर्मदा! वाया?
स्वहितक    रा ला बंधन केलें लूतागुणा[2]समान गुणें;
यमपाशबद्ध हो तूं, वाढे सत्पात्रदान भूरिगुणें[3]. १२९
सेवीं  पर  म सुखावह रामाचे पाद दासुरतरुचे,
परदाररता! तुजला निजकांतेसीं च कां न सुरत रुचे? १३०
आयुःकीर्ति श्री क्षय कां करिशी? निजगुणें चि विपरीतें,
इच्छिसि चिता निजाया, मूढा! कंटाळलासि उपरीतें[4]." १३१
हें ऐकुनि  रा गें तो सांगे दासांसि देवरिपु राजा,
'कपि मारा, भाजा, खा, किंवा हा द्या सुळावरि, पुरा जा.'
हें ऐकतां  म हात्मा बिभीषण प्राज्ञ तो म्हणे, 'राया!
दूत अवध्य नयज्ञा! योग्य नसे हा प्लवंग माराया.' १३३
मानी अनु  ज वचन; मग मानी दशकंठ तो म्हणे, 'धांवा;
घृततैलसिक्तवस्त्रें मर्कटपुच्छाग्रभाग बांधावा. १३४
लावा अग्नि  य थेष्ट, प्रहार दंडादिकें करा, करवा;

---

१. यथा सगणेन्ते वक्रता तद्वन्मय्यपि आदौ सरलता पश्चात्तवदुष्टत्वाद्वक्रतानाम क्रूरत्वमिति यावत्–**पंत.** भावार्थ–ज्याप्रमाणें सगणामध्यें आधीं दोन सरळ रेषा व अंतीं एक वक्र रेषा असते त्याप्रमाणें मी आधीं सरळपणानें सांगतों. तथापि तुझ्या दुष्टपणामुळें मला अखेरीस वक्रतेचा म्हणजे क्रूरतेचा अवलंब करणें घडेल. [आजपर्यंत 'सगणीं' ऐवजीं 'श्वगणीं' असा पाठ छापला गेला आहे व त्यावरून च कसातरी अर्थ लावला आहे. तथापि प्रस्तुतच्या उदाहरणावरून, व्याकरण कां शिकावें याचें उत्तर "स्वजनः श्वजनो माऽभूत" असें जें एके ठिकाणीं दिलें आहे तें च कवीची मूळ प्रत च कशाला पाहिजे असा कोणी प्रश्न केल्यास त्याला हि देतां येण्यासारखें आहे]. २. कोळीकीटाच्या सुतासारख्या दोरानें. ३. अनंतपट. ४. प्रासादः–**पंत.**

लंकापुरींत मारामार करित हा घरोघरीं फिरवा.' १३५
आज्ञा होतां, रा क्षस पेटविती आंजनेयलांगूळ;
वेष्टिति जसे पिपीलिक, खदिरांगाराशि मानुनी गूळ. १३६
हें ऐकोनि म हीजा, दासस्वस्त्यर्थ, वह्निला विनवी;
चित्तीं म्हणे, 'मला कां चिंता प्रतिकूळ दैव लावि नवी?'
नंदन नि ज मित्राचा, सीतेचा भक्त, देवकार्यंकर,
पुच्छाग्रकेशशिखरीं, म्हणुनि वसे वह्नि जेंवि शीतकर. १३८
पुच्छाग्रा ल य पावक, मणिदीप तसा, करी न तापातें;
असुरांपासुनि हरि तो उडता जाला, न हालतां पातें. १३९
पारिघें, भु ज दंडानें, निर्मुनि नक्तंचरप्रमथनातें,
अनळें प्रदीप्त केली, लंका जैसें पुर प्रमथनाथें. १४०
'हा तात! मा य! पुत्रा! मित्रा!' म्हणती कितीक 'हा सीते!'
अनळग्रस्ता लंका जाली, जैसें स्मशान, तैसी ते. १४१
आत्मकुमा रा भिलषित पुरवाया भेटला शिखीस गेंडी;
अंगारपूर्णनगरी काळाची काय कांचनी सगडी? १४२
अग्निमुखां म र सुखउनि, घेउनियां जानकीनिदेशाला,
सागर लंघुनि, गेला वालिसुताधिष्ठितप्रदेशाला. १४३
दिव्य मुख श्री पाहुनि, त्यांला कळलें कृतार्थ आला हें;
जांबवदंगदमुख कपि आलिंगिति मारुतीसि लवलाहें. १४४
भेटुनि ता रा पुत्रप्रभृतिप्लवगांसि, आंजनेय कवी
जलराशिलंघनाद्यरिनगरीदाहांत सर्व आयकवी. १४५
मग हर्ष म य चित्तें, प्रियवार्ता राघवाशि कळवाया,

---

१. शेंपटाच्या टोंकावर राहणारा. २. त्रिपुर. ३. 'प्रमथ' हें शिवगणांपैकीं एका वर्गांतील गणांचें नांव आहे; त्यांचा अधिपति शंकर त्यानें. ४. अग्नीस. ५. मित्रं पावकसहायो वायुरित्यर्थः—**पंत**. ६. अंगारधानिका—**पंत**. शेगडी. ७. अग्नि आहे मुख ज्यांचे असे देव. [अग्निहुत देवांस पोंचतें हें प्रसिद्ध आहे च].

निघती कपिपंचानन[1], रघुवरशोकद्विपाशि पळवाया. १४६

रामांघ्र्यंबु ज सदृस सेवूं जातां, प्लवंगमधुपानीं

मुखेंधावन[2] केलें कीं, त्या मार्गी मधुवनस्थमधुपानीं[3]. १४७

मधुनिल[4] य मधुवनातें मर्दुनि, मनुवंशमानवेशाला

मारुतिमुख मर्कटमणि नमिती मुनिच्या समानवेषाला. १४८

मारुति क रा शि जोडुनि, 'आहे जीवंत जानकी देवी'

ऐसें वदोनि, चूडामणिसह शिर राघवांघ्रिवर ठेवी. १४९

"देवा! चूडा म णि हा सीतेचा घे, मदीयकर्णपथा

आली ब्रह्मास्त्रद्युति[5]नष्टैकदृग्जयंतकाककथा. १५०

मीं बहुयो ज न सागर लंघुनियां, सर्व शोधिली लंका;

सीता विलोकिली मग अशोकवनिकांतरांत अकलंका. १५१

गरुडाल य गा नागी, तैसी सीता असे अशोकवनीं;

रावणवाक्शरभग्ना, मग्ना आहे अपारशोकवनीं[6]. १५२

त्वत्पदर ज मीं देवा ! देता जालों नमूनि तिस मुद्रा;

जाली ते तरि[7] तीचा हृदयास तरावया स्मृतिसमुद्रा. १५३

सीतेचें प्रि य हें कीं, त्वां स्वशरांहीं दशाननास रणीं

मारूनियां भरावी रात्रिचरांहीं परेतराट्सरणी[8]. १५४

'दशकंध रा सि सत्वर मारीं, किंवा मला तरी स्वकरें,'

ऐसा निरोप तुजला सीतेनें धाडिला असे निकरें. १५५

भवदाग म नविलंबें दुर्वह अत्यंत देहभर तीतें;

नाहीं उतार कांहीं तीच्या चिंतासमुद्रभरतीतें.' १५६

इति श्रीमन्मंत्ररामायणे श्रीरामनंदनमयूरेश्वरकृते सुंदरकांडे द्वादशो मंत्रः।

सुंदरकांडे द्वादशमंत्राः ॥ पूतहृदां ये स्वस्तरुकल्पाः ॥ १ ॥

---

१. वानरसिंह अर्थात् वानरश्रेष्ठ. २. मुखशुद्ध्यर्थं धावनं। धावुगति शुद्ध्योः इति धातोः—**पंत.** ३. मधुवनांत असलेल्या मद्याच्या प्राशनानीं. ४. मद्यस्थान जें मधुवन त्यातें. ५. ब्रह्मास्त्राच्या तेजानें नष्ट झाला आहे एक नेत्र ज्याचा असा जो ऐंद्र-काक त्याची गोष्ट. ६. शोकजलें—**पंत.** ७. नौका. ८. यममार्ग.

# युद्धकांड

मुदितमना श्री राघव सीताकौशल्य ऐकतां जाला;
अर्पी दुर्लभ सुखकर आलिंगन गंधवाहतनुजाला. १
उपकृतिपा रा वारीं नौका नाहीं, म्हणोनियां काय
आलिंगिला नृपाळें सिंधुतरणदक्ष कपि महाकाय ! २
राम म्हणे, 'म म दुःखध्वांतीं जाल्यासि मारुती ! तरणी;
सीतेशि तारिलें त्वां, होउनियां शोकसागरीं तरणी. ३
सखीकाला म ज ला वांचाविलें शत्रुकीर्तिविधुराहो[1] !
तुझिया पराक्रमानें लंका रक्षोवियोगविधुरा[2] हो. ४
तवबळप[3] य स्विनीच्या पूरें खळलोक वृक्षविध[4] वाहो;
असुरेंद्रराजधानी, तुज्या प्रतापेंकरूनि विधवा हो.' ५
इत्यादि तो न रा धिप मारुतिचें स्वाननें करी स्तवन;
मुदितकपिकुलध्वानें[5] गमलें तें सिंधुसें समस्त वनं[6]. ६
'कसि नगरी म द्रिपुची ? मार्ग कसा ? वीर किति ? कसी सेना ?
मजला नदीपतीतें उतरायालागि युक्ति गवसेना.' ७
मारुति म्हणे, 'ज नेंद्रा ! शतयोजन वारिधी असे पहिला,
ज्याला चुंबिति सरसा[7] स्वयंवरा गोत्रकन्यका[8] महिला[9]. ८
त्याहुनि पुढें य मालयकल्पा[10] लंका, सुवर्णप्राकारी[11],
गंभीरनीरपरिखा[12], गुप्तद्वारा, सुरांगनाकारी[13]. ९
पूर्वद्वारीं वि ज यी राक्षस शस्त्रास्त्रविद्वळी अयुतें[14],

---

१. शत्रूच्या कीर्तिरूप चंद्राला [ग्रासणारा] राहु असा. २. राक्षसवियोग-दुःखिता. ३. नदीच्या. ४. वृक्षाप्रमाणें. ५. शब्दानें. ६. उदक. ७. जल किंवा प्रेम त्यानें युक्त अशा. ८. पर्वतकन्या. ९. स्त्रिया (नद्या). १०. यमालयसदृशा लंका—**पंत**. अन्य पाठ—**यमालयतुल्या**. ११. सुवर्णाचा कोट जिला आहे अशी. १२. (अमरटीप) खंदक—**पंत**. खोल पाणी आहे ज्यांत असे खंदक जींत. १३. देवस्त्रीबंधनालयं—**पंत**. १४. दहा सहस्र—**पंत**.

तितुके च असुर पश्चिमदिग्द्वारीं वसति शौर्यशक्तियुत. १०
असिशूलसा य कासनशरकर संख्येकरूनियां नियुत,[1]
यमयक्षपदिग्द्वारें[2] रक्षिति निद्रेकरूनि जे वियुत.[3] ११
पादातकुंज[4] रा श्वस्यंदनपूर्णा, प्रदोषचरसेना;[5]
वीर्योदीर्णा,[6] यमसमवर्णा, स्थळ जीस तेथें[7] गवसेना. १२
दुर्गम दुर्ग म हाद्दढपर परमक्रूर परि परीतमती[8]
मज[9] ते तवप्रतापज्वलनाची स्वर्णवेदिका[10] गमती. १३
त्रिपुर जसें श्री कंठें स्वशरें केलें क्षणांत भस्म रणीं,
तसि तव दासें लंका जाळुनि केली क्षमा पुरस्मरणीं.[11] १४
प्रभु! तव प रा क्रमाग्निस तृणसंहति इंद्रजिज्जनकलंका;
वधिशिल रणांगणीं त्या दशानना सर्वसज्जनकलंका.' १५
ऐसें ऐकुनि म ग तो राम म्हणे, 'मारुते! महाबाहो!
रावण मारिन ऐसा आहे तो सत्य काम हा बा! हो. १६
काशि ते धनं जं[12] यमुखीं वीरा! त्वां होमिली स्वयें लंका?
जनकर्णामृतधारा राहो तव कीर्ति नित्य अकलंका. १७
हा मकराल य दुस्तर, याहुनि ही जानकीवियोग मतें,[13]
गमतें संकट सारें; तुमचीं कैशीं अहो! प्लवंग! मतें? १८
वानरकुळ रा ज म्हणे, 'सिद्धि असे धैर्यबलनयोत्साहें,
साहें वियोगदुःख, क्षयिष्णु[14] आहे जगन्निवासा! हें. १९
तव सेवक म यांदा विलंघनीं मात्र हो! न हे सकती,
प्लवग, तवांघ्रिप्लवगत,[15] तरले भवसिंधु, हा समुद्र किती?२०

---

१. लक्ष–पंत. २. दक्षिण आणि उत्तर दिशांकडील द्वारें. ३. विरहित. ४. पायदळ, हत्ती, घोडे, रथ यांही पूर्ण. ५. राक्षससेना. ६. पराक्रमपूर्ण. उदीर्ण=फुगलेली. ७. लंकेंत. ८. नाहींशी झाली आहे बुद्धि जिची अशी अर्थात् बुद्धिहीन. ९. प्रदोषचरसेना. १०. सुवर्णाचें स्थंडिल. ११. त्रिपुराचें स्मरण जिच्या ठायीं अशी. १२. अग्नीच्या मुखांत. १३. मजला. १४. नश्वर. १५. तुझ्या पादरूप नौकेचा आश्रय केलेले.

राम म्हणे,'वि ज [1]याभिध मुहूर्त आहे बरा प्लवंगपते !
आज निघावें, जय मज घडतो, मरतील दुष्ट कोणपे[2] ते.२१
जे गज[3] गव य गवाक्ष प्लवंग चालोत ते पुढें सबळ,
उत्तरदक्षिणपार्श्वीं ऋषभ, दुजा गंधमादन प्रबळ. २२
कपिराया! तूं ज [4]घनीं राहुनियां सावधान संरक्षीं,
पाळूत वेगदर्शी सुषेणसह जांबवंत हे कुक्षी[5]. २३
कपिकुलना य क नील स्वबळें रक्षू समस्तसेनेला,
सावध वर्तो, अतिबळ रिपु, तो अंतासि पाहिजे नेला. २४
मीं वायुकुमा रा च्या स्कंधीं बैसोनि चालतों कटकीं;
वालिसुतस्कंधीं तूं अनुजा ! चढ, जेंवि अद्रिच्या कटकीं[6]. २५
अल्पपराक्र म दुर्बळ जर असतील प्लवंग, तर त्यांतें
किष्किंधानगरींत स्थापुनि, घे शत्रुसिंधुतरत्यांतें.' २६
वचन असें श्री रघुकुलतिलकाचें ऐकतां चि यूथवर[7],
जयशब्द करिति, ते ध्वनि शिरते जाले दिगंत जेथवर.२७
वंदुनि रघु रा यातें उठती, घेती करीं शिळा विटपी[8],
शतबळि शरभ दरीमुख, पनस, गजार्क, प्रजंघ, दंभ, कपी.
गरुडस्कंधीं म धुरिपु[9], जेंवि मयूरद्विजावरि[10] स्कंद[11],
तैसे अधिष्ठिती ते दाशरथी वायुजांगदस्कंध. २९
बहुकोटि ध्व ज तैसे, कपि करिती पुच्छसंघ ते वरते;
तेव्हां गमती जाणों जाती यमदंड राक्षसांवर ते. ३०
गोरे, नीळे तो य[12] दवृंद तसे, रक्त किति कपी, बाळे,
पिवळे, प्रवाळ[13]संनिभ, किति धूमाभ, प्लवंग किति काळे.
ते चलितध रा धरसे पीन, प्लवगप्रवीर, बहुसंख्य;

१. विजय नांवाचा. २. राक्षस. ३. गज वगैरे नांवांचे. ह्या व पुढील गीतींत कोणकोणाची स्थापना कशी कशी करून सेनाव्यूह रचिला तें सांगितलें आहे. ४. मध्यभागीं. ५. बाजू, कूस. ६. कड्यावर. ७. समूहपति. ८. वृक्ष. ९. विष्णु. १०. मयूरपक्ष्यावर. ११. कार्तिकस्वामी. १२. मेघसमूह. १३. पोवळ्यासारखे.

गर्जति घनसे, म्हणती, 'शीघ्र घडो रावणासवें संख्यें[1]. ३२

परिघ[2]प्रति　म भुजांतें, ताडिति हसती किती कपी उडती;

धांवति कांपविति क्षिति, पाडिति तरु, पर्वतांवरी चढती.

जैसा प्रलय　ज लनिधी, कपिबळ तैसें सुरासुरासह्य

गेलें रामासह तें सागरतीराशि उतरुनी सह्य[3]. ३४

क्षो उत्तरतो　य निधी, प्लवगचमूचें करूनियां छद्म[4],

गेला दक्षिणसागरविजिगीषु, क्रोधवह्निचा सद्म. ३५

रघुपति　नि ज सेनेसह जाउनियां पावला समुद्राशी;

सुग्रीवातें सांगुनि, कपिबळ उतरी स्वदास[5]मुद्राशी. ३६

कपि तेथें आ य कतां, दशरथनृपसूनुच्या विलापाला,

फळजळसेवन कैचें? एकानें ही न चाविला पाला! ३७

'हा सीते! रुचि रा क्षी! तुजविण जाली सदा तनू कारा;

कां राक्षसें मला ही नेउनि संपादिलें न उपकारा? ३८

तुजसह　क म लाक्षि! मला जालें होतें च केलिगेह वन;

स्मर करितो मत्तनुचें तुझिया विश्लेषपावकीं[6] हवन. ३९

विद्रुम[7]बिंब श्री हरतवाधरामृतरसैकतृष्णानें,

मधुदुग्धेक्षुरसादिक गणिलें नाहीं च मीं सुदर्पानें[8].' ४०

जल[9]निधितीरा　वासी राघव राजा असे विलाप करी,

जैसा कर्दमनिपतित, कुलच्युत[10] ग्राम्यहृत[11]करेणु, करी. ४१

तेव्हां सुगल म रुत्सुतलक्ष्मणतारासुतादि वीरमणी

म्हणति, 'विभो! भेटेल क्षितिजेसह कीर्ति ही नवी रमणी.'

ऐसे ते सांत्व ज लें शमविति तापासि वारिवाह तसे;

---

१. युद्ध. २. खांबासारख्या बाहूंतें. ३. सह्यपर्वत. ४. सोंग, रूप. ५. स्वजनानंदराशिरित्यर्थः—**पंत**. ६. वियोगाग्नींत. ७. पोवळी, तोंडली (अमरटीप).—**पंत** ८. अतिगर्विष्ठानें. ९. समुद्राच्या कांठावर स्थान आहे ज्याचें असा. १०. कळपांतून चुकलेला. ११. ग्रामवासी लोकानीं हरिली आहे हत्तीण ज्याची असा.

त्यांच्या हि नयनरंध्रें प्रवृद्धदुःखाब्धिवारि वाहतसे. ४३

पापरत, प्रि य साहस, रावण ही काळवह्निचा कवळ,
नगरीं पुसे विचार प्रधानसुतबंधुसैनिकांजवळ. ४४

'सर्वांचा हि प रा जय करूनि, न धरूनि मृत्युभयशंका,
एका च मर्कटानें, सागर लंघूनि, जाळिली लंका. ४५

आतां निर्भय म नुज, प्लवंगबळ घेउनि, प्रियेकरितां
येईल सिंधु लंघुनि; कैसा याचा विचार हो! करितां?' ४६

हें ऐकुनि, र ज नीचर म्हणती, 'राया! सलीला[1]जितलेखा!
लेखें[2] न धरीं, त्यांचा, ते मर्त्य महानसीं च सिजले खा. ४७

मर्कटसहा य, दुर्बळ, रक्षोभक्ष्य[3], स्वलोकसंत्यक्त;
भक्तजनास अनुज्ञा दे, वधितों सबळ मूढ तो व्यक्त.' ४८

रावणतनु ज महाबळ घननाद[4] हि तो म्हणे, 'अहो तात!
आज्ञा द्यावी, ते नर, कपिसह यमलोकपांथ[5] होतात.' ४९

ऐके निद्राप्रि य तो, सचिवमुखें, कुंभकर्ण हे वार्ता;
येउनि निजाग्रजाला म्हणे, 'धरीं धीर मानसभवार्ता[6]! ५०

अनुचित हें रा क्षसपति! केलें, जे आणिलीस परमहिला;
मंदोदरीस टाकुनि, बापा! भुललासि काय परम हिला? ५१

नव्हे हें उत्त म तुज लोकीं रघुवीरकामिनीहरण;
हरिन परंतु तयाचे प्राण रणीं, मीं हरीन[7], तो हरिण.' ५२

हें ऐकुनियां श्री मान् बिभीषण प्राज्ञ मंद हास्य करी;
प्रोत्साहन करुनि म्हणे, 'नेतां हरिच्या पुढें दशास्यकरी. ५३

ज्याच्या खरना[8]रा चज्वलनीं खर करुनि संगर जळाला;
त्या बाणानळशमनीं सामर्थ्य न सप्तसागरजळाला. ५४

जे दुःसह य म दंडप्रचंड शर वज्रगर्व हरणार,

---

१. सहज जिंकिले आहेत देव ज्यानें अशा हे रावणा! २. गणना, हिशेब, ३. राक्षसांचें भक्ष्य. ४. इंद्रजित्. ५. यमपुरीचे वाटसरू. ६. कामपीडिता! [दप्तरांतील एका प्रतींत **चित्तजभवार्ता** असा अशुद्ध पाठ आहे]. ७. सिंहश्रेष्ठ. ८. तीक्ष्णबाणाग्नींत.

काळाग्निज्वाळसखे व्याळप्रभ त्यांत काय मरणार? ५५
शाखामृगरा[1] ज महाप्रताप विख्यात जो अनेकबळ;
त्या वाळिचा हि केला क्षणमात्रें राममार्गणें कवळ. ५६
हा मकराल य दुस्तर शतयोजन गोष्पद क्षणें केला;
एका च वानरानें वह्निमुखीं होमिलें चि लंकेला. ५७
ऐसे च वान रा धिप अगणित एकापरीस एक बळी;
येतिल उघडायाला बहुकाळ[2]जिघत्सुमृत्युची कवळी[3]. ५८
रघुनाथातें म[4] हिषी द्यावी, आतां करूं नये अनय;
धन यश जीवन रक्षा, शरणागत जा, धरूनियां विनय. ५९
गरुडस्त्री भु ज गानें तैसी हारिली बळें नरेशस्त्री;
दशवदना ! तूं हृदयीं भरिशी मरणार्थ कांचनी शस्त्री[5]. ६०
दुस्तरनिर[6] य प्रद हा कुलवृक्षकुठार, कीर्तिशशिराहू;
परदारकाम सोडीं; पुलस्त्यमुनिचा स्ववंश चिर राहू.' ६१
ऐसें निजानु ज न्मा वदतां विहित, स्वलोककीर्तिहित,
अहित गणूनि, अहितसा फिरला बंधूवरि क्षमारहित. ६२
अंगार[7]संच य प्रभदृग्दशमुख तो शुभस्वभावास
भावास म्हणे, 'करितों इतराच्या आज अस्वभावास[8]. ६३
बहु बहु प रा शि वर्णिसि, मज निंदिशि यातुधानजननीचा!
कां तुज घडलें नाहीं गर्भापासूनि पतन जननीच्या? ६४
राक्षसभक्ष म नुष्य, स्वजनत्यक्त, प्लवंगसख, यास

---

१. वानरराज. २. फार दिवसांचा भुकेलेल्या अशा मृत्यूची. ३. दंतपंक्ति. ४. स्त्री. 'महिषी' हा शब्द 'दासी' असा आहे; रावणानें सीतेस चोरून नेऊन अटकेंत ठेविली होती ह्या दृष्टीनें ती 'दासी' होऊं शकेल; संस्कृतांत 'स्त्री' असा अर्थ नसून 'पतित स्त्री' असा आहे; पण येथें पंतानीं 'स्त्री' किंवा 'राणी'—(पट्टराणी नव्हे; कारण, रामचंद्रास अद्यापि राज्याभिषेक झालेला नव्हता)—अशा अर्थीच हा शब्द योजिला असावा. ५. सुरी. ६. कठिण नरकास देणारा. ७. इंगळांसारखी कांति झाली आहे ज्याच्या डोळ्यांची असा. ८. प्राणांतः—**पंत.**

स्तविशी, निंदिसि बंधुस, राजास, प्रभुस, गुरुस, सखयास.
हरिवरुण[1] श्री दयमज्वलनश्वसनग्रहेशसोमातें
मीं जिंकिलें; अशातें उपदेष्टा काय तूं शिशो ! मातें ? ६६
मीं त्रिभुवन रा जा, मीं शास्ता, मीं वंद्य, रत्नभोक्ता मीं,
मीं ज्ञानी, मीं मानी, मीं प्रभु, मीं स्तुत्य, मीं तुजा स्वामी.
तूं दुर्बळ, पा म र खळ, पंडितमानी, भयाज्ञतागार[2];
क्लीबा ! तेजस्विकुळीं अयोग्य, रत्नाकरीं जसी गार. ६८
तूं रिपु अनु ज च्छद्में, ज्ञातींचा कोण धरिल विश्वास ?
दायाद व्यसनातें इच्छिति, हें ठाउकें चि विश्वास. ६९
मच्छत्रुविज य इच्छिसि, दुष्टा ! बंधुत्व हें तुझें जळलें;
बहु सांत्वन केलें तरि, असती स्त्री टाकिती, मला कळलें.
त्या रामपाम रा ला तरवेल विशाळ सिंधुपाळ कसा ?
दुसरा मद्बळसागर ? मज हारिला तो कुरंगबाळकसा. ७१
ज्या मस्तकक म ळातें धरिता जाला शिरीं स्वयें शिव, तें
मनुजाधमचरणातें कैसें रे ! मृत्युच्या भयें शिवतें ? ७२
जिंकुनियां भु ज वीर्यें सुर, त्रिलोकी क्षणांत वश केली;
रामा वनेचरी जरि हारिली, तरि हे समस्तनृपकेली.' ७३
यापरि अन्या य प्रिय रावण कोपस्मरज्वरें बरळे.
सरळे चि वक्र दिसती, काळानें दृष्टि जेधवां तरळे. ७४
केवळ अग्र ज वाक्यें अवमान सभेंत जेधवां जाला,
तो मानधन बिभीषण जाय शरण शीघ्र रामराजाला. ७५
शिखिदीप्ताल[3] य जैसें त्यजिती प्राणार्थि लोक, हा हि तसा,
सचिवचतुष्टय घेउनि, जाय पुरींतून वह्निदाहितसा[4]. ७६
सिंधूत्तरतीं रा तें, जाउनियां तो नभीं उभा राहे;

१. इंद्र, वरुण, कुबेर, यम, अग्नि, वायु, सूर्य, चंद्र, यांतें. 'श्रीद' यावर अमर-टीप. २. भय आणि मूर्खत्व यांचें घर. ३. अग्नीनें पेटलेलें घर. ४. अग्नीनें भाजणाऱ्याप्रमाणें.

तों अवलोकुनि, वानर म्हणती, 'आले अमित्र, मारा हे.'
तेव्हां महाद्रु म शिला घेउनि, उडती अनेक हरि[1] वरते;
क्षितिजाहरण[2]कुपितहिमधरणीध्रतनूज काय गिरिवर ते? ७८
त्यांस म्हणे तो 'श्री मद्भास्कर[3]कुलदुग्धसिंधुचंद्रातें,
शरणार्थी मीं, ऐसें सांगा जा शीघ्र, रामचंद्रातें. ७९
नरवरदा रा चोरत्यक्त, दुरित[4]कृद्वियोगसंतुष्ट,
दास, बिभीषण राघवपददेवांचा चि होय संपुष्ट[5]. ८०
दे रघुपति म हिषी, हें हित कथितां, त्यास भासलों अहित;
निंदुनि मज अनुजाला त्यजिलें, जाला नयक्षमारहित.' ८१
हें जाउनि अ ज पौत्र प्रभुला प्लवगप्रवीर जाणविती;
करुणाब्धी दाशरथी सुग्रीवमतेंकरूनि आणविती. ८२
नय बळ, ज य जीवन, यश, ते, कीं लंकाधिदेवताप्राण,
आले शरण प्रभुला; सहाय कीं धाडिले यमें बाण. ८३
नतिमज्जन रा[6] मकृपाहृदिं करुनि शिरीं हि घेति पादरज;
सीताहरण[7]दुरितशिखिकवळितलंकाटवीपलाशगज. ८४
रजनीचर[8] म धुकर भव[9]काशकुसुमसंगवंचित भ्रमले,
भ्रमले, मग गुण[10]गंधाकृष्ट प्रभुपादनीरजीं रमले. ८५
वंदुनि बद्धां ज लि तो बिभीषण क्षोणिजावरास[11] वदे,
'भक्तभ्रमरासि मला स्वपदा[12]ब्जयुगार्हणावरासव दे. ८६
सदयहृद य हो देवा! माझा ठाई धरूं नको शंका;
रंकास मला तूझे चरण अलंकार हे च ते लंका. ८७

---

१. वानर. २. पृथ्वीची मुलगी सीता तिचें हरण केल्यामुळे क्रुद्ध झालेले हिमालयपर्वताचे पुत्र. ३. सूर्यवंशरूपी क्षीरसमुद्रास चंद्र अशा (रामातें). ४. पाप्याच्या वियोगानें संतुष्ट. ५. ढवी. ६. रामकृष्णरूप डोहांत. ७. सीताहरणामुळें झालेल्या पापरूप अग्नीनें वेष्टिलेले. ८. मूळ पाठ—**भवकाशसुमसमागमवंचित रक्षोमधुव्रत भ्रमले.** ९. संसाररूप दर्भपुष्पाच्या संगानें फसलेले. १०. गुणसुगंधानें ओढलेलें. ११. सीतापतीस. १२. आपल्या पादकमलाची पूजारूप उत्तम मकरंद.

शरणागत　ज नपाळा! पापहरा! दुःखनाशना! चतुरा!
धार्मिक सदय यशस्वि प्राज्ञ कवींचा अनर्घ्य[1] तूंच तुरा.
केवळ विष　य रसिक तो दशमुख जाला अमार्गचाटसुर;
केले फार उपप्लुत[2] धरणीसुरसंघ, यज्ञवाट[3], सुर. ८९
त्वद्रत्नतस्क　रा ला केला मीं बोध, फार आरडलों;
अंधभसितबधिरीं[4] तें दीप हवन गीत, कीं वनीं रडलों.
हित कथितां　म ज त्याणें सभेंत अवमानिलें त्रपारहितें;
मग तवपदोडुपें हीं जालीं दुःखाब्धिपात्रपारहितें[5]. ९१
इक्ष्वाकुकुल　श्री चय्म, करुणेच्या पूतकीर्तिचा सद्मा!
रक्षावें मज ' ऐसें प्रार्थुनि वंदी नृपाळपदपद्मा. ९२
लंकानगरी　रा ज्यप्रदानसंकल्प जो तयासहित,
हृदयीं धरिला रामें बिभीषण प्राज्ञ मान्यदास हित. ९३
सत्वर मग　म करालयजळ आणउनि, स्वदासनंदिकरें[6],
शरणागतासि केला लंकाराज्याभिषेक बंधुकरें. ९४
निजपदभ　ज नसुकृतफळ दाखविलें भक्तकामसंतानें,
रविसंतानेंद्रानें, रामानें, साधुवनवसंतानें. ९५
पुसतां उपा　य सागरतरणाचा, कैकसीतनूज[7] म्हणे,
'निजपूर्वजकृत[8] सागर विनवीं, देईल मार्ग वीरमणे!'
कैसें काय क　रा वें? चिंतित होता असें धरावर जें,
तें संकट हारिलेंसें केलें त्या पंक्तिकंधरावरजें. ९७
सुगलादिसं　म तें तो त्यक्ताहार स्वयें कुशास्तरणीं[9]
तरणिकुलमणी बैसे संकल्प करूनि सिंधुसंतरणीं. ९८
तों निशिचर　ज नपतिला सांगे जावूनि दूत शार्दूळें[10]

---

१. अमोल. २. त्रस्त. ३. यज्ञमंडप. ४. आंधळा, भस्म व बहिरा ह्यांच्याठायीं. ५. दुःखसमुद्राच्या पात्राच्या पैलतीरास जाण्यास हितकर. ६. आपल्या भक्तांस आनंदित करणाऱ्यानें. ७. बिभीषणः—**पंत**. ८. आपले पूर्वज जे सगरपुत्र व भगीरथ यानी केलेला. ९. दर्भासनावर. १०. राक्षसविशेष.

'कपिबळ घेउनि आला सिंधुतटीं राम भूपशार्दूल. ९९
काय शिलोच्चय[1] आले सहाय रामासि सागर भराया,
कीं जलधिशोषणक्षम घन ते जाले प्लवंगनिभ राया! १००
बळ दशयो ज नपरिमित सिंधुतटीं उतरलें असे बहुत;
जाणों त्याच्या जठरज्वलनीं होतील सर्व लोक हुत. १०१
जाला कपिना य क तो सहाय पूर्णाभिमानसह यातें;
गिरिशि खरतरुशिलायुध कपि नाचविती स्वमानसहयांतें.'[2]
ऐसें ऐकुनि रा वण राघवसेनेंत भेद योजाया,
शुकराक्षसासि सांगे सुग्रीवाच्या समीप तो जाया. १०३
त्यास म्हणावें,'म जसीं व्यर्थ चि करिशी कशास कळहातें?
जा मार्गे, नाहीं तर, मरतां कां माजिया सकळ हातें? १०४
स्वभुजबळें श्री हरिली देवांची, शत्रु जिंकिले सारे;
त्यांचा यत्न न चाले प्लवगा! करिशील युद्ध कैसा रे!?१०५
मीं रामाची दा रा हरिली, तरि काय हे तुजी हानी?
हा! निर्बळ दुर्मति हो! क्रव्यादें[3] तर्पितां स्वदेहानीं[4].' १०६
निशिचरर म णें ऐसा सुग्रीवातें निरोप सांगाया
पाठवितां, शुक गेला, तों ओळखिती कपी विहंगा या.१०७
शत्रुशुकद्वि ज रूपी धरूनि म्हणती, 'खळासि या चिरडा;
सत्पीडक राक्षस हो! कृतापराधें मरा, असे चि रडा.'१०८
तो शुक सद य स्वातें रामानें, दूत म्हणुनि, वांचविला;
घेता जाला हा ही रघुनाथगुणामृताचिया चविला. १०९
होतां विमुक्त रा क्षस दशकंठाच्या कथी निरोपाला;
तें ऐकुनियां कपिवर सुग्रीव वदे धरूनि कोपाला. ११०
'मद्व्यसनश म नपटुतें छळिलें दीनाचिया सहायातें,
त्या पापविपाकातें[5] युद्धीं सारे चि या सहायांतें[6].' १११

---

१. पर्वत. २. हय=घोडा. ३. राक्षसमंडळी. ४. खोडलेला पाठ— **स्वमांसानीं.**
५. पापाच्या परिणामातें. ६. सहनार्थ—**पंत.**

हें बोलुनि, र ज नीचर बांधविला, धाडिला न लंकेला,
[1]रात्रित्रयोपवासिप्रभुकाम न मूढसागरें केला. ११२
मग रघुना थ क सोडी प्रखरशरप्रकर सागरामाजी,
'शुष्क तुला करितों मीं' म्हणे 'अनुज्ञा न मानिली माजी.'
त्या बाणगणें ज लचर जाले संतप्त ते महाकाय,
म्हणती, 'सर्वांबुधिला प्राशितसे वाडवाग्नि हा काय?' ११४
पुनरपि सा य क रामें चतुर्मुखास्त्राभिमंत्रित प्रखर
चापीं नियोजिला, तो वमे मुखें वह्निचे कणप्रकर. ११५
ब्रह्मास्त्र साग रा च्या करील अर्धक्षणांत आचमना,
हें जाणुनि सुर म्हणती, 'रामा! येऊ दया तुझ्या च मना.'
ते मुनिजना म रव्रज रामातें वर्णिती, जसे बंदी,
तों [2]यादोवृंदासह सागर येऊनि नृपतिला वंदी. ११७
जलधि म्हणे, 'श्री रामा! मीं ब्रह्मास्त्रापुढें जसा बिंदु;
बंधु तुजा सागर, हें जाणुनि, रक्षीं मला दयासिंधु! ११८
त्वां मिथ्या न क रा वी मर्यादा जे विनिर्मिली विधिनें.
तरशील सबळ मातें हर्षानें, मीं वदेन त्या [3]विधिनें.' ११९
राम म्हणे,'हा म च्छर अमोघ सोडावयासि दे जागा,
जा गा! शोषित नाहीं, समयीं जालासि तूं बरा जागा.'
सिंधु म्हणे 'म ज सिवती [4]द्रुमकुल्यस्थानवासि चोर सदा;
असदाचारपरांतें, त्यांतें, तूं मार [5]साध्वसाध्वसदा! १२१
रामानें,तो सा य क सोडुनि, वधिले [6]सतस्कराभीर,
'व्रणकूप' त्यास म्हणती, जें बाणें छिद्र होय गंभीर. १२२
तें मरुकांता रा ख्य, द्रुमकुल्यस्थान जाहलें [7]अवनें,

१. त्रिरात्र उपवासी राजा राम त्याची इच्छा. २. जलचरसमूहासह. ३. उपायानें. ४. वृक्षयुक्त जी लहान नदी तेथें रहाणारे. ५. साधु+असाध्वस+दा= साधूंस अभय देणारा. ६. चोरांसह अभीर म्हणजे वंजारी, कोळी इ. जातीचे लोक. ७. नास्ति वनं जलं यत्र तथाभूतं इत्यर्थः—पंत. निर्जल.

त्या देशाचें केलें परि, वर देऊनि, राघवें अवन. १२३
जलधि म्हणे, 'म नुनाथा! नळवानर ठाउका असे तूतें,
हा विश्वकर्मनंदन करील माझ्या जळांत सेतूतें. १२४
त्या नळकरें ज ळांतीं पडेल वृक्षोपलादि जें कांहीं,
तें म्यां धरिजेल शिरीं, त्वत्पदरज जेवि भक्तलोकांहीं.
निजशत्रुक्ष य करिशिल, मज तरशिल, तारिशील लोकास,
सज्जनसह मज्जन तुज़ होइल सुखसागरीं विशोकास.'
रघुपति स ज लधिनें हा सांगुनि उतरावया उपाय नतें,
चरणीं समर्पिलें, जें होतें सद्रत्नमय, उपायन तें. १२७
रामपदद्व य वंदुनि, सिंधु म्हणे, 'तूं करून सेतु जला,
उतरुनि जा लंकेला, दुर्घट कांहीं च हें नसे तुजला.'१२८
जलनिधिला रा घव तो आज्ञा देऊनियां, नळाकरवीं
करवी सेतु समुद्रीं भास्करसंतानपंकजैकरवी. १२९
सर्वनृपोत्त म वाक्यें, द्विनवें[1] महापद्म ऋक्षें[2] वानर ते
सेतु कराया जाती, अशनीं कोणीं हि तेधवां न रते.
ताल, तमाल, श्री फल, वट, सरलाश्वत्थ, नारिकेर नग,
वानरकरें समुद्रीं पडले, शिखरें, शिला, कितेक नग.
तृणतरुध रा धरांतें वाहति पवनात्मजादि कपि सारे;
ते नळपाणिस्पर्शें तरति समुद्रोदकांत तारिसा रे! १३२
तो सेतु प्रथ म दिनीं चवदा गावें[3], दिनांतरीं वीस;
मग एकवीस, बेविस, पंचम दिवसीं समाप्त तेवीस.
एवं शतयो ज न तो आयत[4], विस्तीर्ण[5] ही दहा गावें;
गावें चरित्र विभुचें, अद्भुत हें कर्म काय सांगावें ?
शतयोजना य ताद्भुत सेतू दशयोजनें हि विस्तीर्ण,
द्विनव महापद्म कपी जाले त्रिदिनें समुद्रनिस्तीर्ण[6]. १३५

---

१. अठरा. २. अस्वल. ३. योजनें. ४. लांब. ५. रुंद. ६. समुद्रपार.

सेतुपथें पा रा ला उतरुनियां पावले सुवेळातें[1];
विभुनु[2]तिपरसुरमुनिजनहृदयाला हर्षवी सुवेळा ते. १३६
सर्वप्लवंग म बळें वेष्टुनि वसती सुवेळनगराजा;
रामनिदेशें सोडुनि सुग्रीव म्हणे शुकास, 'नगरा जा.' १३७
तो शुक, मनु ज पतीतें वंदुनि, गेला दशाननापाशीं;
नमुनि म्हणे, 'मीं जाउनि सांपडलों वानरांचिया पाशीं.
हा वरुणाल य दुस्तर, परि निर्मुनि सेतुला शिलातरुनीं,
अगणित कपिबळ घेउनि, आला रघुवीर, सिंधुला तरुनीं.
कपि, ऋक्ष ते,ज से गिरि तेवि महाकाय, फार बळकट कीं;
भूरुहपर्वतशिखरें ऐशीं हीं आयुधें प्रबळ कटकीं. १४०
सकल प्रल य ज्वलनप्रतिम प्लवगप्रवीर बहुसंख्य;
त्या अंतकतुल्यांसह न घडे देवासुरांस ही संख्ये[3]. १४१
दाशरथी वी रा धिप, त्यासीं कोणीं नसे तुळायाला;
यालागिं राक्षसेंद्रा! युद्धेच्छा हे नसो तुला याला[4]. १४२
रघुनाथाची म हिषी सोडावी, हे च मूळ कलहाला;
हा लाभ मुख्य रामप्रीतिसुधा पी, त्यजीं विषयहाला[5].'
वरसामर्थ्य श्री मदमत्त दशानन म्हणे, "शुका! मातें
'दे सीता' हें कथितां त्रिदिवेश[6] न पावतील कामातें. १४४
वानरसख रा घव नरसगररचितनीरकुंड[7] तरला हो!
अप्रतिम मद्बळार्णव जरि लंघिल तो, जयास तर लाहो.
मूर्ख सकळ म र्कट ते जाले बहुमत्त सेवितां पाला;
आले मरावयाला, नेणुनि माझ्या महाप्रतापाला." १४६
यापरि तो र ज नीचर वदोनि, शुकसारणांसि लवलाहें
आणुनि, म्हणे, 'पहा जा कपिवंश फळेंकरूनि लवला हें.'

---

१. पर्वतविशेष त्यातें. २. स्तुतिपर (अमरटीप). ३. युद्ध (अमरटीप). ४. रामाला. ५. मदिरा–पंत. ६. देव. ७. मनुष्य जे सागर त्यांनी केलेल्या उदककुंडास अर्थात् समुद्रास.

निजहस्तद्व य जोडुनि, शुकसारणनाम ते सचिव राया
वंदुनि, वानररूपें गेले कीं बंधनास चि वराया. १४८
वानररूपें रा क्षस शिरले कपिसैन्यसागरीं कपटी;
श्रोत्रियसभेंत जैसे यवन, मुनिव्याज धरुनि, [1]वल्कपटी.
राक्षस कृत्रि म वानर फिरती कटकीं जसे प्लवंगपती;
त्यांस बिभीषण बांधी; श्वान कसे सिंहमंडळीं लपती?
दशकंठानु ज वाक्यें, बांधुनियां, ताडिती कपी सारे;
म्हणती, 'तुम्ही अमंगळ हरिवेष विटाळिलात कैसा रे!?'
त्यांहीं स्वाभिप्रा य प्रभुला कथितां, करूनि नमनातें;
रक्षी त्यांसि दयार्णव राघव, ज्याच्या विकार न मनातें.
तेव्हां रघुरा ज म्हणे, 'बिभीषणा! यांसि हिंडवा कटकीं;
मग सोडा, दूतांला वधितां अत्यंत धर्मसंकट कीं.' १५३
ग्रामांत लु[2]ला य जसे देवीप्रीत्यर्थ फिरविती लोक,
सैन्यांत हिंडउनि ते विसर्जिले दूर, ज्यापरी [3]ओकें. १५४
कटकीं रघु रा ज सदा सुखी, यशस्वी असो महाकाय;
दृग्दोष न हो म्हणउनि वोवाळुनि सांडिले पशू काय?
शुकसारण म ग जाउनि, कारिती स्वस्वामिला नमस्कार;
कथिती वानरकटकीं जो जाला आपणासि सत्कार. १५६
म्हणती, 'सिंधु[4]श्री मदतस्कर कपिसैन्य तें असंख्यात,
ज्यांत रघूत्तमलक्ष्मणसुग्रीवबिभीषणादि विख्यात.' १५७
ऐसें ऐकुनि, रा वण तो [5]प्राकारीं चढोनियां पाहे;
तों देखिली तयानें वानरसेना समुद्ररूपा हे. १५८
'आले रणार्थ म जसीं, सिंहासीं आज वाजिचे [6]रिपुसे;
त्यांचीं नावें संख्या सांगा' हें त्यासि तो सुरारि पुसे.

---

१. वल्कलवस्त्र धारण करणारे. २. महिष–**पंत.** रेडे. ३. उद्रान्तमिव दूर–**पंत.**
४. समुद्राचा ऐश्वर्यमद चोरणारें अर्थात् समुद्रास होणारा ऐश्वर्यगर्व हरण करणारें.
५. कोटावर. ६. अश्वरिपवो: महिष:–**पंत.** (अमरटीप).

तेव्हां सचिव ज सें जें विलोकिलें आणि ऐकिलें होतें,
जवळ उभे ठाकुनियां, दशवदनाला निवेदिती हो! तें.
'कपिकोटित्र य नायक गजनामा पातला असे वीर;
दुसरा शतबलि वानर आलासे अयुतकोटिबळ धीर. १६१
आला आहे ता रा जनक सुषेणाख्य वाळिचा श्वशुर,
बळ तीन कोटि ज्याचें, निर्बळ ज्याचापुढें रणांत सुर.
जो दुर्मुखना म कपी, त्याची ही दोन कोटि कीं सेना;
दधिमुख दशकोटिपती, दुःसह कांहीं तयास भासेना.
पवनतनु ज तो आला सहस्रकोटिप्लवंगबळपाळ;
अकरा सहस्र सेना रंभाची, जो समस्तरिपुकाळ. १६४
देवासुरभ य दायक [1]नळकपिबळ ही[1] सहस्रशतकोटी;
ज्याणें सेतु विनिर्मुनि, सेना संतारिली अशी मोटी. १६५
शाखामृगकुं ज र तो नील हि शतकोटिसंख्यसैन्यपती;
चाळीस लक्ष सेना शरभाची, ज्यापुढें गिरी लपती. १६६
कुमुद गव य वह्नि असे तीन असंख्यातसैन्यपति वीर,
दशकोटिऋक्षनायक, आलासे जांबवान् महाधीर. १६७
कपिवर ता रा भिध ही आलासे पंचकोटिबळशाली;
अंगदसेना दशशत पद्में, आणीक शंकुशत आली. १६८
जो पनसाख्य म महाबळ त्याचें ही तीन कोटि कपिसैन्य;
ऋक्षसहस्र[2]युगाधिप धूम्र, सुरांला हि ज्यापुढें दैन्य. १६९
कोटिसहस्त्रें श्री मान् वीर हनूमत्पिता स्वयें आला;
कपिकेसरी महात्मा, नाम असे केसरी असें ज्याला. १७०
बहुबळ ता रा भिध तो, सुग्रीवश्वशुर ही रुमा[3]तात;
त्याचे कोटि[4]त्रयमित कपि गमनें भूमिकंप करितात. १७१
शौर्यबलोद्दा म महाधीर गवाक्ष प्रतापमय सूर,

---

१. खोडलेला पाठ—**नळसेना जे.** २. सहस्रयुग म्हणजे दोन हजार. ३. सुग्रीवस्त्री रुमा हिचा बाप. ४. तीन कोटींना मोजलेलें.

कोटिसहस्र तयाचे आले आहेत इंद्रसम शूर. १७२
कोटिसहस्र ज याची सेना, नामें दरीमुख ख्यात;
मैंद द्विविद हि बंधू आले, ज्यांची चमू असंख्यात. १७३
राघवसहा य आला, घेउनियां प्लवगसैन्य शत कोटी;
वीर मरुण्वान बळी, जयापुढें इक्षुतुल्य शतकोटी[1]. १७४
जो वीर वान रा धिप नामानें गंधमादन प्रबळ,
द्वादशसहस्रकोटी त्याचें आलें असे प्लवंगबळ. १७५
शाखामृग[2]र म ण बळी, नामें जो इंद्रभानु तो राया!
एकादशकोटिपती आलासे राक्षसांसि माराया. १७६
श्वेत महाभु ज आला, सहस्रकोटि प्लवंगबल याचें;
कपि आठ लक्ष आणिक, मर्दन करितील भूमिवलयाचें.
क्रोधन नामा य त्नें आला, नृपकार्यसिद्धिचा घटक[3];
त्याचें पर्वतशिखरप्रहरणधर[4] साठ लक्ष कीं कटक. १७८
रघुपतिवि ज यासाटीं, सहस्रलक्षप्लवंगबल राजा!
आला असे प्रमाथी रामाची सोडवावया भाजा. १७९
विक्रमानिल य महात्मा सन्नादन आणि दूसरा चंड,
या दोघांचें आलें प्रचंड सैन्य प्रसिद्ध उद्दंड. १८०
विंध्यगिरिव रा वासी यूथपती फार वीर आहेत;
हे तरुनि सिंधु आले, युद्धाचा धरुनि मानसीं हेत. १८१
सुग्रीवाचे सु म ति प्रधान संख्येकरूनि शतवृंदें[5];

---

१. इंद्राचें वज्र. २. वानरपति. 'रमण' ह्याचा अर्थ 'पति' अर्थात् नवरा असा आहे; पण येथें 'अधिपति' 'नायक' ह्या अर्थीं पंतांनी तो शब्द योजिला आहे. ३. घडविणारा, कर्ता. ४. पर्वतशिखररूप आयुध धारण करणारें. ५. संख्येविषयीं मूळ वाल्मीकिरामायणांत पुढील श्लोक आहेत—

शतं शतसहस्राणां कोटिमाहुर्मनीषिणः । शतं कोटिसहस्राणां शंकुरित्यभिधीयते ॥
शतं शंकुसहस्राणां महाशंकुरिति स्मृता । महाशंकुसहस्राणां शतं वृंदमिहोच्यते ॥
शतं वृंदसहस्राणां महावृंदमिति स्मृतम् । महावृंदसहस्राणां शतं पद्ममिहोच्यते ॥

शंकुसहस्र अणीक हि, सहस्रकोटिप्लवंगजनवृंदें. १८२

बलनिलय, श्री मंत, प्रवीर सारे सहाय रामाचे;
राया ! हे देवांश, प्लवंग मात्र प्रसिद्ध नामाचे. १८३

राक्षससेना रा जा ! सहस्रशत[1] लक्ष, ते हि शतकोटी;
दशशतकोटिशतातें संज्ञा शंकू असी असे मोटी. १८४

गणकजन[2] म तें ऐसें परिगणितां[3] उत्तरोत्तर प्राज्ञा !
संज्ञा होती नव[4], त्या कथितों स्वामी ! असेल जरि आज्ञा.

रजनीचर ज जननाथा ! एक महाशंकु[5] बोलती सर्व;
वृंद, महावृंद, तसें पद्म, महापद्म, खर्व, अतिखर्व. १८६

पाहिला च नि य म धरुनी, समुद्र, अणखी महौघ हीं नामें;
कोटीपासुनि सारीं अकरा होताति गणकविश्रामें. १८७

मंदोदरीव रा ! तूं यावरुनि प्लवगवाहिनीसंख्या
ध्यानामध्यें धरणें, मग करणें तर सुखें करीं संख्या[6]. १८८

आले असती म कैट सहस्रकोटी सहस्रशंकु तसे;
पंक्तिशतें[7] महाशंकू, शतवृंदें ही महागिरींद्र जसे. १८९

आणिक हीं तु ज कथितों, सहस्र आलीं प्रभो ! महावृंदें;
शतपद्में ही दिक्शतगणित[8]महापद्मसंख्य कपिवृंदें. १९०

---

शतं पद्मसहस्राणां महापद्ममिति स्मृतम् । महापद्मसहस्राणां शतं खर्वमिहोच्यते ॥
शतं खर्वसहस्राणां अतिखर्वमिति स्मृतम् । अतिखर्वसहस्राणां शतं समुद्रमुच्यते ॥
शतं समुद्रसाहस्रं महौघमिति विश्रुतम् ॥

एकापासून महौघ हें अठ्ठावन्नावें स्थान येतें. एक लक्ष महाशंकु म्हणजे एक वृंद होय.

१. वरील टीप पहा. २. गणितवेत्त्यांच्या मतें. ३. गणना केली असतां, मोजूं लागल्यास. ४. नऊ स्थानें. ५. १८६ आणि १८७ ह्या गीतींत संख्यास्थानें दिलीं आहेत. कोटीपासून तीं अकरा होतात. कोटि, शंकु, महाशंकु, वृंद, महावृंद, पद्म, महापद्म, खर्व, अतिखर्व, समुद्र आणि महौघ. हल्लीं प्रचारांत कोटि, दशकोटि, अब्ज, खर्व, निखर्व, महापद्म, शंकु, जलधि, अंत्य, मध्य आणि परार्ध अशीं अकरा होतात. ६. मागें १४१ वी गीति पहा. ७. दहा शंभर अर्थात् एक हजार. ८. दिशा १० आहेत म्हणून ‘ दिक्शत ’ म्हणजे एक हजार.

शतखर्वे  ज य शाली सहस्र तैसीं च कीं महाखर्वें;
कोटि, समुद्र, महौघ हि, कोटि असीं पातलीं बळें गर्वें. १९१
रविसुतनया,[1]  ज ह्नुसुता, सिंधु, विपाशादि, फल्गु, पर्णाशा,
ऐश्या सरिता त्यजिल्या कपिनीं, जैशी फलांबुपर्णाशा. १९२
सह्य, हिमाल य मंदर, कनकाचळ, पारियात्र, कैलास,
इत्यादि गिरिस्थानें सोडुनि, आले त्रिकूट शैलास. १९३
दृढतरं[2]श  रा सनासिप्रखरेषुधर प्रचंडदोर्दंड,
कोदंडवेद[3]पंडित, ते दाशरथी प्रतापमार्तंड. १९४
तूजा अनुज  म हात्मा, शरणागत, सुज्ञ, म्हणुनि रामानें,
लक्ष्मणसुग्रीवासम मानुनि, सत्कारिला बरा मानें. १९५
क्षीरसमुद्रें  श्री तें अर्पुनि केला मुकुंद जामाता;
भूमिपते ! रामाला सीता दे हे हि भूमिजा माता. १९६
हा कलह  ब रा नाहीं, ज्याची स्त्री, त्यास दे समाधानें;
निर्भय राज्य करावें लंकेचें राघवानुसंधानें.' १९७
हें ऐकोनि अ[4] म र्षें तो रावण पातकी दुरभिमानी
मानी सचिवांसि रिपू, स्वहितकरांला हि फार अवमानी.
दाखवितां म ज ला भय, नरवानर वानितां, जसे बंदी;
घालीन मीं न धारितां परवा परवाहिनीसि त्या बंदीं.'
ऐसा  रक्षोना य क वदोनि, वर्जी निजप्रधानांतें;
कपिसेना शोधाया, धाडी शार्दूलयातुधानातें. २००
शार्दूल नाम  रा क्षस रावणवाक्यें करूनियां, च्यार
चार सर्वे घेउनियां, करी कपींच्या बळांत संचार. २०१
सैन्यसमुद्रा  म ध्यें शिरला शार्दूळ तो विशंक बळी;
तें जाणुनियां त्यातें बिभीषणग्राह[5] तेधवां कवळी. २०२

---

१. यमुना, भागीरथी, सिंधु, विपाशा, फल्गु, पर्णाशा ह्या सर्व महानद्या आहेत. २. अधिक बळकट धनुष्य, खड्ग व तीक्ष्ण बाण यांस धारण करणारे. ३. धनुर्वेद-प्रवीण. ४. क्रोधानें. ५. विभीषणरूपी नक्र.

सोडवितां अ जं[1] पौत्रें, सांगे दशकंधराशि बोभाट;
वानरऋक्षपतींतें, वर्णी शार्दूल, जेंवि तो भाट. २०३
तरणितन य सुग्रीव प्लवंगराजा स्वयें प्रतापरवी;
परवीर्यनाशनक्षम, सैन्योद्योग स्वयें चि जो करवी. २०४
अनळ[2]तनु ज नीळाभिध, गीष्पतिसुत[3] तार वीर मतिमंत;
पर्जन्यपुत्र शरभ, प्रभंजनाचा तनूज हनुमंत. २०५
कपि आश्विने य नंदन मैंदाभिध एक, दूसरा द्विविद;
नळ विश्वकर्मसुत तो, जाणतसे शिल्पकौशलें विविध. २०६
ज्योतिर्मुख सू[4] रा चा सुत, दुसरा श्वेतनाम रणदक्ष;
वैवस्वतज[5] गवय, गज, गवाक्ष, यांचीं बळें बहुत लक्ष. २०७
दधिमुख सो म[6] स्वात्मज, सुषेण अणि हेमकूट वरुणाचे;
विधिपुत्र जांबवंत प्रवर्या[7], परि संघ वधिल तरुणांचे. २०८
प्लवगवर श्री[8] दात्मज, बळशाली गंधमादन ख्यात;
अंगद महेंद्रनप्ता[9], आणिक यूथेंद्र कपि असंख्यात. २०९
आले, युद्ध क रा या राया ! ऐसे कितेक कपिवीर;
नीरधिला गोतर्णकपद[10] गणिलें; उतरले महाधीर. २१०
यमसम स म रसमर्थ, प्लवंगबळ उतरलें, असे निकट;
प्रकटविकट कटक गमे, प्राशिल सिंधूसि या पुरीसकट.'
ऐसें शार्दूळ ज सा वदला तें ऐकतां चि दशतुंड,
कुंड[11]प्रतिमाक्ष धरी मति सीतावंचनार्थ उद्दंड[12]. २१२

---

१. अजाचा मुलगा दशरथ व त्याचा मुलगा रामचंद्र, ह्या अजाचा नातु ह्यानें. २. अग्निपुत्र–**पंत**. ३. बृहस्पति–**पंत**. ४. सूर्याचा. ५. यमपुत्रपंचशरभगंधमादनादयः–**पंत**. ६. चंद्रपुत्र. ७. ( अमरटीप ) वृद्धः–**पंत**. ८. कुबेरपुत्र–**पंत**. ९. जयंतपुत्रोऽङ्गदो शक्रपौत्रः नातु इति–**पंत**. १०. गाईच्या वासराचें पाऊल. ११. 'कुंड' म्हणजे कोणत्या हि देवतेप्रीत्यर्थ केलेला खळगा; जसें 'होमकुंड.' प्रायः 'कुंडा' च्या कल्पनेशी 'अग्नी 'ची कल्पना येते ह्यावरून 'कुंड' ह्या शब्दाचा अर्थ 'अग्नि' असा लक्षणेनें घेतां येतो व तसा च येथें आहे. अग्निकुंडाप्रमाणें डोळे ज्याचे असा. १२. **आतिपुंड=बहुपुंड** इति वा पाठौ–**पंत**.

तो दशमुख य त्नानें विद्युज्जिह्वासि[1] सिकउनी माया,
आज्ञा करी त्वरेनें राघवकोदंडतुंड निर्माया. २१३
विद्युज्जिह्वक रा नें करउनि विभुचापवदन मायावी
गेला सीतेपाशीं, कीं स्ववशाला[2] वधूत्तमा यावी[2]. २१४
सीतेसि म्हणे,'म जला आतां तरि जानकि ! स्वयें वर हो !
वर होता तो वधिला. मत्संगें धन्य तूं महीवर हो. २१५
माज्या सचिवें ज ळनिधितीरीं वधुनि प्लवंगसेनेला,
मारुतिसुग्रीवासह, राघव तूझा यमक्षया[3] नेला. २१६
बहु कीशक्ष य केला, रात्रीं जावूनियां प्रहस्तानें,
लक्ष्मण पळोनि गेला, राम तुजा मारिला स्वहस्तानें.'
यक्षवरानु[4] ज ऐसें सांगुनि, विकळा करी धरांबा[5] हे,
बाहेर असुर होता, त्याला धाडूनि राक्षसी बाहे. २१८
विद्युज्जिह्व श यीं[6] पुटीं घेउनि ये रामवदनचापाशी,
दशकंठानुज्ञेनें स्थापी रघुवीरयुवतिचा पाशीं. २१९
सीतेसि म्हणे रा वण, 'पहा पुढें तन्वि ! सुभ्रु ! मृगनयने !
नय नेणसि आतां, तरि नाशाला आपुला चि अविनय ने.
सीते ! त्वत्पति म स्तक हें, कार्मुक हें, पहा खरें लटकें;
हठ केंवि करिशि मुग्धे ! भज मज, मर्दीन पंचशरकटकें.'
ऐसें ऐकोनि, श्री सीता पाहे स्वकांततुंडातें,
तों उद्दीपन जालें, बहु तीच्या शोकवह्निकुंडातें. २२२
'हा ! रघुवर ! रा जमणे ! हा ! प्रिय ! हा ! प्राणनाथ ! हा ! कांत !
कैकेयि ! हो सकामा !' ऐसा करि भूम्यपत्य[7] आकांत. २२३

---

१. या नांवाच्या रावणाच्या प्रधानाला. २. हातीं यावी. ३. यमसदनास. ४. कुबेराचा धाकटा भाऊ रावण. ५. धरा भूमिरंबा माता यस्याः सा सीतेत्यर्थः—**पंत.** ६. पाणिपुटे—**पंत.** ओंजळींत. ७. भूकन्येत्यर्थः—**पंत.**

तो विपरीत म ती खळ मंत्रार्थ[1] निमंत्रिला प्रधानाहीं,
'हितअमृत पाजितां,' निज सचिवांसि म्हणे, 'तृषा क्षुधा नाहीं.' २२४
दशकंधर ज ननी जे, नामानें कैकसी तिणें हि तदा
केला बोध सुताला, परि त्याला भासली न ते हितदा.
'वृद्धामात्य न य ज्ञ प्राज्ञ यशस्वी अविद्ध[2] जें बोधी,
तो धीमंद दशानन, तें मानीना चि सज्जनविरोधी. २६
हितकर ब रा प्रहस्तप्रधान कल्याणहेतु जें बोले;
तो लेश ही न मानी; न नीरमन्नोपलासवें तोले. २२७
रावणमाता म ह बहुहितकारी माल्यवंत उपदेशी;
'दे[3]शीतेशि' म्हणे, परि, न गणी तो मूढ मृत्युविपदेशी.
रावण जातां, ज गतीसुतेजवळि ये निशाचरी सरमा[5];
सर मार्गीं तृषिताला, तशि जाली कीं अकिंचनास रमा.
'रामांगने! प्रि य सखि ! स्वस्था हो, शोक हा विसर माते !
आहे सुखी रघूत्तम,' ऐसें सांगे यथार्थ सरमा ते. २३०
रामशिरोंबु ज आहे, सौमित्र्युत्संगपीठतळानिष्ठ[6];
यमुनानदीप्रवाहीं इंदीवरसें तयासि न अनिष्ट. २३१
कोदंड हि अ य थार्थ चि गेलें, सखि ! तेधवां च विलयातें;
ऐशी च रावणाची गति होत्ये; कोण वांचविल यातें ?
सौमित्रिसँपे रा जत्रातदयानंदबळनिधानातें,
नज्ञानार्जनमंत्रक पावेल कसा चि सन्निधानातें ? २३३
रघुकुलर म णभुजभुजगवेष्टितकोदंडचंदनास कसा
क्षुद्र अमंत्रज्ञ करें शिवतां न मरेल असुर बेडुकसा ? २३४
मुदित असे श्री रघुपति; चिंता कांहीं करूं नको, पाहीं;

१. मसलत करण्याकरितां. २. नामविशेष. ३. सीताशब्दस्तालव्यादिरपि-पंत. ४. मृत्यूच्या विपत्तीस. ५. बिभीषणपत्नी. ६. लक्ष्मणाच्या मांडीरूप आसनावर असलेलें. ७. लक्ष्मणशेषरक्षित जो दया, आनंद व बल ह्यांचें स्थान राम त्यातें. ८. ज्ञानांजनमंत्र ज्याला नाहीं असा. ९. उत्तम प्रकारच्या ठेव्याला.

दशकंठ भस्म होतो, तुमच्या या अग्न्य[1]नूनकोपांहीं. २३५
आज्ञा मला क रा वी रामाच्या आणिलें समाचारा;
अप्रतिहतगति आहे' तूझा ठाईं सखी[2]समाचारा.' २३६
ऐसें ऐकोनि म हीसुता, म्हणे धरुनि धीर सरमेला;
'जा शोधीं, काय बरें करित असे तो खळाग्रसर[3] मेला[4]?'
ते सरमा रा उँ सुतावाक्यें जावूनि सचिव लोकानीं
बोध विफळ केला तो, येउनि सांगे सखीचिया कानीं.
"सरसिजन य ने! तुजला अर्पायालागिं रामचंद्रकरीं
सचिवांहीं कथिलें; परि राक्षस म्हणतो, 'कदापि हें न करीं.'
समर चि क रा वयाला, दुर्ग[6]बळासहित जाहला सज्ज;
सज्जनपीडक परि, तो 'मरेल' हा शब्द सुज्ञपरिषज्ज[7].
इच्छितसे स म रगरल, हितवागमृतीं हि न रुचि, राक्षस हा;
रुचिराक्ष सहाय तुजा, भय न धरीं, विरह मासपक्ष [8]सहा.
जीवनदात्री ज ल[9]धरघटा, जसी भानुतापितक्षितिला,
सरमा परमाप्ता ते तसि वारुनि ताप तूर्ण[10] राखि तिला.
रघुकुलना य क राम हि अर्पाया दशमुखासि संत्रास,
प्लवगर्क्षयूथपांसह, करिता जाला जयार्थ मंत्रास. २४३
दशकंठानु ज तेव्हां रामातें वन्याविप्रवृत्तीतें,
सचिवांपासुनि ऐकुनि, लंकेच्या जाणवि प्रवृत्तीतें[11]. २४४
'माझे अमात्य य लें लंकेमध्यें प्रवेशले होते;
खगरूप धरुनि सारे अवलोकुनि कुशल पातले, हो! ते.
युद्ध कराया रा वण जालासे सज्ज सज्जना[12]राती;
सर्वत्र गुप्ति[13] केली लंकेची, रक्षितो दिसा[14]रातीं. २४५

---

१. अग्नीपेक्षां उणें—कमी—नाहींत अशा लोकानीं. २. सखीसारखी वागणूक जिची अशी. ३. दुष्टाग्रेसरः—**पंत.** ४. गालिप्रदानं मेलेति—**पंत.** ५. सीतेच्या सांगीप्रमाणें. ६. कोट आणि सैन्य ह्यांसह. ७. भविष्यज्ज्ञसभाजनितो मया श्रुतः स तुभ्यं कथित इत्यर्थः—**पंत.** सुज्ञांच्या सभेमध्यें झालेला. ८. सहन कर. ९. मेघसमूह. १०. शीघ्र. ११. वृत्तान्तातें. १२. अराति=शत्रु. १३. रक्षण. १४. दिवसा व रात्रीं.

पूर्वद्वारीं स  म रप्रवीण सचिव प्रहस्त वर्ततसे;
दुर्लंघ्य वीर त्याचे, बहुतृणपिहितास्य[1] वन्यगर्त तसे. २४७
वसत असे  श्री दग्दिशाद्वारीं[2] शुकसारणासवें राजा;
पश्चिमदिग्द्वारीं तो प्रबळ भ्रातृव्य[3] जागतो माझा. २४८
यमदिग्द्वारीं  रा वणसचिव महापार्श्व[4] दूसरा हि तसा;
हित साधिता महोदर[5], अमात्य आहे, बिळीं महाहि तसा.
वसतो मध्य  म गुल्मीं[6] वीर विरूपाक्ष[7] बहुबळासहित;
महितपराक्रम याचे भट, जे गमताति रावणास हित.
दशशतग  ज योधी ते, रथी हि आहेत अयुतसंख्यात[8];
अयुतयुग[9] हयारोह[10] हि, सपादकोटी[11] पदात ही ख्यात. २५१
निशिचरना  य कबळ हें, चतुरंग[12] सुरासुरांसि अनिवार;
यांत सहस्र सहस्र हि एकैकाचा स्वकीय परिवार. २५२
कर्पूरतूल  रा शि ज्वलनातें, असुर हं तसे तूतें;
रिपुबळसिंधु विलंघूं धरूनि तुज्या चि बाहुसेतूतें.' २५३
राम म्हणे, 'अ[13]  म राधिपदिग्द्वारीं नीळ यूथवर जावा;
मारुतिनें पश्चिमदिग्द्वारीं वधितां न शत्रु वरजावा. २५४
वाळीचा तनु  ज बळी अंगद रोधील दक्षिणद्वार;
उत्तरदिग्द्वारीं मीं, सानुज मर्दीन ते द्विषद्द्वार[14]. २५५
मध्यमगुल्मीं  य लें सुग्रीवासहित जांबवंतातें

---

१. पुष्कळ गवतानें आच्छादित आहेत मुखें ज्यांचीं असे रानांतील खळगे. २. उत्तर दिशेकडील वेशीवर. ३. पुतण्या इंद्रजित. ४. हा रावणाचा सापत्न भ्राता असून अमात्य होता. ५. हा रावणाचा सापत्न बंधु असून सचिव होता. ६. पंचेचाळीस पायदळशिपाई, सत्तावीस घोडेस्वार, नऊ रथ आणि नऊ हत्ती असणारी सैन्याची तुकडी; येथें 'सैन्य' इतका च अर्थ घेणें बरें. ७. रावणाचा सेनापति. ८. गणतींत दहा हजार भरलेले. ९. वीस हजार. १०. स्वार. ११. सवा कोट १२. हत्ती, घोडे, रथ आणि पायदळ असें चार प्रकारचें सैन्य. १३. देवेन्द्रदिशेकडील अर्थात् पूर्वेकडील. १४. रिपुसमूहाः–**पंत.**

घेउनि बिभीषणा ! तूं कर जाउनियां क्षपाचरांतातें. २५६
प्रातःकाळीं नि ज भुजबळ खळलोकांसि वीर हो! दावा;
दावाग्निसे रिपुवनीं शिरा, खरा हा करा बरा दावा.’
कौसल्यातन  य असें सांगुनि लंकापुरी पहायास,
या सकळ बळासह तो सुवेळशिखरीं चढे रहायास. २५८
दशवदन  रा जधानी, प्रांशुमणी[1]सौधमंडिता लंका
मुकुट त्रिकूटगिरिचा, ऐशी धरिती कपी मनीं शंका. २५९
लेखेश[2]वन  म हितें[3], परि, लंकोपवनासवें न तें [4]लेखे;
दे खेद काम[5] रामस्वांतातें, त्यासि जेधवां देखे. २६०
‘जयति[6]तरां  श्री रामः सुग्रीवो जयति लक्ष्मणो जयति’
ऐसे कपि गर्जति, तों लंका कांपे धरूनियां भय ती. २६१
रात्रि सुवेळीं  रा हुनि, योजनयुगलोच्च[7]शृंग आसादी[8];
सादी[9] अश्वी तैसे, चढले मारुतिसुकंठपनसादी. २६२
तेथें प्लवंग  म र्षभ, गर्जति संवर्त[10]निर्मिते घनसे;
घनसेना दुस्तर, ते तैसा कल्पांतसागरौघ नसे. २६३
दशकंठ स्व  ज नासह चढे कनकगोपुराचियां[11] शृंगीं;
भासे हेमांबुज तें, अधिष्ठिलें काय मातल्या भृंगीं. २६४
हरिनील[12]का  य शोणित[13]चंदनलिप्तांग तो दशग्रीव,
संध्याभ्रसा[14] दिसे तैं कोपे पाहूनि फार सुग्रीव. २६५
खगकुल[15]व  रा समान क्षिप्र उडे तो कपी महाप्राण[16];
रावण वधावयाला रामानें काय सोडिला बाण. २६६

---

१. उंच अशा रत्नखचित राजवाड्यानीं शोभलेली. २. इंद्रोद्यान, नंदनवन. ३. पूज्य. ४. साम्य पावे. ५. मदन. ६. अतिशय जय पावतो. ७. योजनद्वयप्रमाण उंच शिखर. ८. गांठी. ९. स्वार. (अमरटीप) —**पंत.** १०. जगत्प्रलय करणारे. ११. सुवर्णखचित नगरद्वाराच्या. १२. हिरवट निळा असा आहे देह ज्याचा तो. १३. रक्तचंदन लाविलेलें आहे अंगास ज्याच्या असा. १४. सायंकाळच्या अभ्रा-प्रमाणें. १५. गरुडाप्रमाणें. १६. महाबल.

तो कपिनाथ   म हाभुज गेला सक्रोध रावणाजवळ;
कवळ कराया आला, यमसें मानी पलाशलोकबळ. २६७

सुगळ म्हणे, ‘ज नकसुता दे, दुष्टा! पामरा! मरायास
कां इच्छितोसि आणुनि कोप प्रबळास रामरायास?

मीं कीशांचा ना य क, रामाचा दास, वाळिचा बंधु.
तूजा काळ, बळाचा सिंधु, द्विट्[1]सिंधुरास अने[2]बंधु.’ २६९

ऐसा वाल्यनु   ज वचनवज्राहत पंक्तिकंठ पापनग,
वनगज तसा उसळला, सुगळावर मोडुनि क्षमाख्य[3]नग.

‘ऑं[4]: पाप! विन य हीना! वनेचरा! होय दूर, मर्कटका!
कटकासह भक्षिन तुज, मरावया धांवतोसि एकटका?’

ऐसें वदोनि   रा वण धिक्कारी जों प्लवंगराजाला,
तों सुग्रीवें केला प्रहार, रण तेधवां बरा जाला. २७२

दोघे ही विक्र   म पटु कटुवचनक्रुद्ध युद्ध[5]बद्धरस,
धरस[6]म समर करिति, तों, तनुपासुनि वाहती अशु[7]द्धरस.

कपिरमण[8]   श्री दानुज[9] सुकंठदशकंठ शिष्ट[10]दुष्टपती,
विष्ट[11]पतिलकस्त्र्यर्थं अन्योन्यातें वधावया टपती. २७४

निजबाहुप   रा क्रम, तो वानरवर दाखवी महाभाग;
भा गर्व हरुनि रिपुचा म्हणे मनीं, ‘स्वामिचा चि हा भाग.’

सांडुनियां स   म रोत्तर असुरास, धरी नरेंद्रपादास;
स्वादास पद्ममधुच्या घेतो आळि, कीं दिसे तसा दास.

‘साहस हें तु   ज अनुचित, एकाकी कां रणास गेलास?’

---

१. शत्रुरूप-गजास. २. निर्जलकूप इवास्मि रिपुगजदुस्तर इत्यर्थः–**पंत.** ३. सहनशीलतारूप वृक्ष. ४. क्रोधार्थी अव्यय. ५. युद्धाचे ठायीं धृतप्रीति. ६. पर्वततुल्य. ७. रक्तस्राव. ८. वानरांचा आवडता सुग्रीव. ९. कुबेराचा धाकटा भाऊ, रावण. १०. शिष्टपति=सज्जनश्रेष्ठ सुग्रीव; दुष्टपति=खलेश रावण. ‘पती’ हें द्विवचन आहे. ११. विष्टप+तिलक+स्त्री+अर्थं=जगांत श्रेष्ठ जो राम त्याच्य स्त्रीकरितां.

ऐसें वदोनि रामें हृदयीं आलिंगिला सखा दास. २७७
'जरि तूझा ल य होता, तरि मर्दुनियां दशाननास रणीं,
सर्व हि टाकुनि, सखया! धरितों मीं सर्वथा तुझी सरणी[1].
ऐसें त्वां न क रा वें, यावरि तरि, घेउनि स्वयें कटका,
युद्धीं शुद्ध यशातें साधीं, जाऊं नको चि एकटंका[2].' २७९
ऐसें वदोनि म ग, तो राघव लंकेशि जावुनीं वेढी;
ते ढीग वानरांचे अवलोकुनि, जाहली पुरी वेडी. २८०
त्या सेनेचें रें[3] ज तें दिवसासि करी निशा असें बहुळें[4];
सिंधूची काय कथा? स्वर्गंगानीरें जाहलें डहुळ[5]. २८१
[6]गाढे ते निर्भ य कपि, असुरांचे भंगिती बळें वाडे;
जालें तें लंकेचें [7]कटक [8]कटक, कटकट क्षणें वाढे. २८२
रघुवीर रा ज नीतिप्रवीण तो अंगदासि दूतत्वें,
सत्वेंकरूनि धाडी, निजरिपुपाशीं, कथूनियां तत्वें. २८३
तो अंगद न य निपुण प्रभुला वंदूनि जाय लंकेला;
केला प्रवेश रावणसभेंत, सोडूनि भीतिशंकेला. २८४
सारे मदांध रा क्षस कुंजर, शिरला अशांत हरितोक;
[9]हरितो कवण तयाला? जाला तो चित्रतुल्य रिपुलोक.
अंगद म्हणे म नीं, 'जरि न वदावें न पुसतां असें आहे;
बाहेर तें असो मत; कार्यार्थें [10]अधिष्ठिली खळसभा हे.
हा दशकंठ श्री मदमत्त, न मद यासमान आसव दे;
कार्यार्थ मीं वदावें,' करुनीं ऐसा विचार यास वदे. २८७
'हे रात्रिंचर रा जा! रामाचा दूत अंगदाभिध मीं;
कोणीं मला पुसाना, कोण असें, काय बैसलों अधमीं?
वैदेहीच्या र म णें वीरें करुणाकरें जगद्रीतें,

१. पद्धति:—**पंत**. २. एकाकीत्यर्थः—**पंत**. २७१ वी गीति पहा. ३. धूळ. ४. पुष्कळ. ५. गढूळ. ६. मजबूत. ७. सैन्य—**पंत**. ८. (अमरटीप). 'कड' ३०—**पंत**. ९. निवारितो. १०. आश्रयिली; [ सभेंत ] आलों.

पाठविलें मज, त्याच्या ऐकें कल्याणहेतु सद्गीतें[1]. २८९

चतुरानन ज गदीश्वर, त्याचा तूं पौत्र भूतपतिदास[2],
श्रुतसंपन्न[3], नयज्ञ, ब्राह्मणसुत, पावलासि सुपदास. २९०

सुरभूसुर य लानें पूजावे, धर्मसेतु[4] रक्षावे,
निर्मळ यश जोडावें, व्यसनानाचार ते उपेक्षावे. २९१

या विहिताचा रा तें, सोडुनि धरिलीसि वृत्ति जननीचा[5];
अनुसरलासि दशास्या! पक्षाला तूं स्वकीयजननीचा[6].

विधिवरसा म र्थ्यानें, होउनि मदमत्त वन्यकुंजरसा,
धर्मद्रु मोडिले हे, केली ध्वस्ता चि वेदकुंज रसा[7]. २९३

विप्रामरभ[8] ज नीय स्तुत्य, तयांशीं च लाविलें वैर;
कैरवपतिनिभ[9]पूर्वजयश मळवायासि वर्तसी स्वैर. २९४

शम दम न य भय लज्जा सोडुनि, हरिशी परांगनावित्त,
वित्तमें[10] होउनि निरयप्रद मार्गीं काय ठेविलें चित्त? २९५

स्वकुळात्र अं ज न जो लावी, तो पुत्र न, प्रसूविष्टा[11],
शिष्टाचरणीं यास्तव नित्य असावी यशःप्रदा निष्ठा. २९६

करिशी अन्या य बळें, हितोपदेष्टा तुला गमे द्वेष्टा,
स्वेष्टांसि[12] मंतुवांचुनि[13] धिक्कारिशि, हे बरी नव्हे चेष्टा. २९७

जनकमहा रा जसुता रविकुलतिलकाजसूनुची सून,
तूं न कळत नेली, तरि दे, हो सद्वृत्त आजपासून. २९८

अपराध हा म हाजननिंद्य तसी हे जनाधमा! केली,
अद्यापि मीं पुलस्त्यद्विजाकडे पाहुनि क्षमा केली. २९९

---

१. सद्वाणीमिति—**पंत.** २. शिवभक्त. ३. विद्यालंकृत. ४. धर्ममर्यादा. ५. जगांत निंद्य अशी. ६. रावणाची माता कैकसी ही सुमालीनामक राक्षसाची कन्या होय. ७. वेदा एव कुंजा यस्यामेतादृशी या रसा पृथ्वी सा तथा—**पंत.** वेदरूपी झाडी आहे जिच्याठायीं. ८. सेवनीय, वंद्य. ९. चंद्रतुल्य. १०. विदज्ञाने—ज्ञानसंपन्न—**पंत.** ११. मातेची विष्ठा. १२. आपल्या आप्तांस. १३. अपराधावांचून.

रघुकुलज श्री मंत प्राज्ञ प्रबळ क्षमादयानिलय,
शरणागतवत्सळ हे, ख्यात जनीं, शत्रुचा करूनि लय.
रविवंशज रा जांची बहुसरळा भ्रूलता[1] हि चापलता[2];
ते वक्रा जाल्यावर, चालेना जिष्णुंची[3] हि चापलता[4].३०१
नाहीं तुजसीं म जसीं वैर, तथापि प्रियावियोग मला
दिधला, यावरुनि तुजा स्वभाव विपरीत सर्वथा गमला.
वैदेहीला तूं ज रि आणुनि देशील आझुनीं मजला,
मीं ही लंका जीवन अभय, समर्पीन तत्क्षणीं तुजला.
नाहीं तरि सा य क हे, हे भुज, हा खड्ग, हें धनूरत्न,
मीं सज्ज जयधनातें, तूं निधनातें स्वयें करीं यत्न.' ३०४
यापरि तुज रा जेंद्रें कथिलें, आतां करूं नको उशिर,
सीतोपायन[5] घेउनि, ठेवीं ये तत्पदांबुजीं स्वशिर. ३०५
तूं करुनि स म र न मर; अमरसम रघूत्तमांघ्रिनवपद्मीं
रम, रस घे, अमर चि हो, भ्रमरहित स्वस्थ नांद निजसद्मीं.
दे उत्तर, नि ज लासा, बहिरासा, मूकसा, नको राहूं;
याहुनि हित काय वदों? न वदसि कां आझुनीं हि चोरा! 'हूं?'
अनलानिळ य म यक्षप[6] वरुण विधु ब्रध्न[7] सर्प गंधर्व,
सर्व पराजित केले; परि रामासीं करूं नको गर्व. ३०८
राम प्रणत ज नाचा त्राता, रिपुलोककाळ, यापाशीं
चेष्टा करितां दुष्टा! भ्रष्टा! पडशील मृत्युच्या पाशीं.३०९
राम धनंजय[8] य, तुम्हीं कापुर तृण तूल काष्ठ घृत तैल,
शैल हि पिचविल[9], हें तुज नुमजे; तूं मातला जसा बैल.
यतिवेषें चो रा नें, बाटउनीं रामचंद्रदळकुटिला,
कुटिलानें रत्नातें नेलें, तो शत्रु पाहिजे कुटिला. ३११

---

१. भ्रुकुटी अर्थात् दृष्टि. २. धनुष्यरूप वेल. ३. अजिंक्याची. ४. चपलतैव चापलता—**पंत.** ५. सीतारूप नजराणा. ६. कुबेर. ७. सूर्य. ८. अग्नि. ९. जाळून भस्म करील.

गिरिदलन म स्तकानें, स्वशिरोभंगार्थ दुर्मते! करिशी;
[1]करिशील तूं मदांधा! नरकपुरी इच्छितोशि लौकरिशी.
तूं मुकलासि श्री स्त्रीसौख्ययशःप्राणपुत्रमित्रांतें,
[2]आत्मौर्ध्वदेहिकातें तरि करिं, तुज कोण या जनीं त्रातें?"
ऐसें ऐकुनि रा गें दशकंठ म्हणे, 'धरा धरा धांवा,
हा [3]धृष्ट पुष्ट मर्कट मारुनि हिरवा चि खा, न रां[4]धावा.'
ते सचिवाध म चौघे धरिती तारातनूजदो[5]र्दंड,
तों दंडिती गिरीतें, प्रहार करितात काय वेतं[6]ड? ३१५
अंगद अंड ज वैंरसा, वरसामर्थ्यें उडोनि भुज झाडी,
पाडी प्रासादासह सचिवांतें, मृत्युच्या घरा धाडी. ३१६
जाउनियां पा य नमी स्वामीचे, सर्व वर्तमान वदे
मानवदेवा, रिपुचा आग्रह तिळमात्र ही न तानर्व दे.
मग तो रघु रा ज म्हणे, 'कथिले सामाद्युपाय जे कांहीं,
तत्क्रममार्गातिक्रम न करावा नीतिनिष्ठ लोकांहीं. ३१८
यास्तव नीति म तानें नियोजिलें पंडितास तुज सामीं;
कैसा वर्तो गाधिजवासिष्ठमुनिराजशिष्य सहसा मीं?३१९
सामर्थ्यें दंडा, ज रि मानीना राक्षसापसद साम;
ग्राम [10]विमर्दा सारा, मारा रिपुला, करूनि संग्राम.' ३२०
आज्ञा होतां,'ज य ति श्रीराम' असें म्हणोनि यूथपती,
स्वस्वबळें घेउनियां निघती, तेव्हां रविप्रभा लपती.३२१
म्हणती, 'हा र ज नीचर आचारभ्रष्ट दुष्ट पापिष्ट,
[11]विष्टपकंटककष्टद शिष्टद्वेष्टा, धरा, करा पिष्ट.' ३२२
ते एकदा चि य मसे, प्राकारीं [12]वेघले, तदा लंका

---

१. हत्तीसारखा स्वभाव ज्याचा असा. २. स्वकीय उत्तरकार्यातें. ३. दांडगा. ४. शिजवावा. ५. अंगदाचे बाहु. ६. (वैजयंतीकोशटीप)—**पंत.** हत्ती. ७. पक्षिश्रेष्ठ गरुड त्याप्रमाणें. ८. तानवं तनुत्वं लाघवं इति यावत्—**पंत.** ९. अपसद=अधम. १०. मोडून टाका. ११. जगाचा कांटा आणि दुःखकर्ता. १२. चढले.

सालंकारा गिळितिल, अशि रात्रिचरांसि जाहली शंका.

कल्पांतीं मंक[1] रा लयनीर जसें एकदां चि खळबळेंत,
भूमि[2] ग्रासायास्तव तैसें मानी दशास्य खळ बळ तें. ३२४

दशमुख ही म त्तद्विपरथाश्वपादातबहुल सेनेला
धाडी रणास, तेव्हां कपिनीं बहु राक्षस क्षया नेला. ३२५

त्रिपुर जसें श्री कंठ[3]ध्वजिनीनें वेष्टिलें, तसी लंका
रणपटुमर्कटकटकें निरोधितां, होय फार सातंका[4]. ३२६

वानरवर रा क्षसवरसेना एकत्र जाहल्या भारी;
अद्भुत रण होय, तसा करिते जाले न वृत्रजंभारी[5]. ३२७

जाला निरुप म समर, प्लवगगणीं आणि यातुधानगणीं;
कोणीं कार्यक्षयभय[6] परप्रहार श्रम क्षुधा न गणी. ३२८

क्षुर[7]नाराचां ज लिकप्रासगदाकुंतशूलतरवारी
वर्षति निशिचर कपिंवर; जलधर जैसे प्रभूततर[8] वारी.

रक्षःसमुदा य शिरीं कपि वर्षति भूरुहाद्रिशिखरांहीं;
मारिति चपेट लत्ता, मुष्टि छेदूनि दंतनखरांहीं. ३३०

अंगद कपि रा वणसुत, नील निकुंभ, प्रजंघ संपाती,
प्रतपन नळ, सुग्रीव प्रघस, असे युद्ध करिति अतिपाती[9].

सौमित्रीनें स म रीं वधिला एका शरें विरूपाक्ष;
सुप्तघ्नाला[10] राघव, जलंधराला जसा विरूपाक्ष[11]. ३३२

पवनतनू ज हनूमान् मारी युद्धांत जंबुमाली[12]ला,

---

१. समुद्रजल. २. मूळ पाठ—**तैसें कपिसैन्य दिसे तेव्हां धावे दशास्य-खळबळ तें.** ३. शंकरसेनेनें. ४. तापयुक्ता इति—**पंत.** ५. वृत्रासुर आणि जंभासुर यांचा शत्रु जो इंद्र तो. ६. देहनाशभय. ७. वस्तऱ्याप्रमाणें फळ ज्याला बसविलें आहे असा बाण=क्षुर. नाराच=लोहमय शर—**पंत.** अंजलि=हाताच्या ओंजळी-प्रमाणें रुंद वर्तुलाकार पातें असलेलें शस्त्र. प्रास=फेंकण्याचें आयुध. कुंत=भाला—**पंत.** ८. अतिशय, पुष्कळ. ९. अडथळा करणारे, अर्थात् झगडणारे. १०. रावणपक्षीय वानर त्याला. ११. शंकर. १२. प्रहस्त राक्षसाचा पुत्र त्याला.

अशनि[1]प्रभप्रमथनीं द्विविदें[2] हि दावी अनुत्तमा लीला.
मैंदानें[3] प्रल य पळें केला त्या वज्रमुष्टिचा समरीं;
अन्य[4]निशाचरजीवनरस[4] नेला राममार्गणभ्रमरीं. ३३४
नीळानें स्वभु ज बळें निकुंभ दमिला,[5] कपीश्वरें प्रघस;
नलशमित प्रतपन रणयज्ञीं जाला शिवागणीं[6] विघस.[7] ३३५
अंगद विज य श्लाघी इंद्रजितासीं करूनियां समर,
गुरुतरतरुप्रहारें विरथ करी, फार हर्षवी अमर. ३३६
मग रात्रिच[8] रा धिपसुत, मायावी गुप्त होय तत्काळ;
व्याळमयाशुगपाशीं बद्ध करी राघवेंद्र[9] निजकाळ. ३३७
राघव नाग म याशुगनिबद्ध केले विरिंचवरदानें;[10]
मर्मीं खरशर निकरें खिळिले अत्यंत मेघनादानें. ३३८
पुष्पितपर्ण[11] श्री धर, ते दोघे रक्तसिक्ततनु[12] जाले;
आलेख्यचित्र[13] तैसे निष्क्रिय[14] होतां, समस्त कपि आले.
अवलोकुनि रा घव ते निश्चेष्टित बाणतल्पतलें[15]सुप्त,
रिपुमथनातें धांवति, परि तो रात्रीस जाहला गुप्त.३४०
सारे प्लवंग म रणीं रामावस्थेशि पाहतां रडती,
पडती कितेक भूवरि, 'हा! राम!' असें म्हणोनि आरडती.
तों तो रिपु अं ज लिकें[16]क्षुरप्रनिकरेंकरूनियां ताडी;

---

१. अन्य पाठ–**अशनिप्रभमथनीं तो.** २. सुषेणवानराचा कनिष्ठ मुलगा. ३. सुषेणाचा ज्येष्ठ पुत्र त्यानें. ४. खोडलेला पाठ–**अन्यासुरहृदयांबुज.** ५. खोडलेला पाठ–**वधिला.** ६. कोल्ह्याच्या समूहीं. ७. पिशाचादिकृतयज्ञशेषभोजनशेषरूपः –**पंत.** ८. मूळ पाठ–**तो असुराधिपसुत.** ९. राम व लक्ष्मण. रघुसंततींतील श्रेष्ठ. १०. ब्रह्मदेवाच्या वर देण्यामुळें. ११. फुललेल्या पळस (पर्ण) वृक्षाची शोभा धारण करणारे. १२. रक्तानें भिजलेला आहे देह ज्यांचा असे ते. १३. 'आलेख्य'=रंगीत तसबीर; 'चित्र'=थक्क करणारी गोष्ट; तेव्हां 'आलेख्यचित्र'=थक्क करणारें-अद्वितीय-चित्र. १४. निश्चेष्ट. १५. बाणशय्यातलीं निजलेले. १६. गीति ३२९ वरील टीप पहा. 'क्षुरप्र'=अर्धचंद्राकृति बाण.

पाडी विविधायुधगण, घनकश्मल[1] ही कपिव्रजीं धाडी.
रावणतनय म्हणे, 'रे! अशी च गति मीं करीन सर्वांची;
नरमर्कटकटकांहीं कथा वदावी न वीर्यगर्वाची. ३४३
केला शक्रपराभव, सेवक जाले सदेवगंधर्व;
गर्व धरुनि मर्कट हो! निष्कारण मृत्यु पावतां सर्व.'
ऐसें वदोनि मग तो जाउनि सदनासि वर्धमानयशा[2]
जयशाली तातातें कथि, तो मानी दिशा सुनिर्भयशा.
रावण तो त्रिजटेला म्हणे, 'तिला शीघ्र पुष्पकामाजी[3]
घालुनि मृतपति दावीं, म्हणजे होईल कामना माजी.'
'आज्ञा' म्हणोनि यें[4] क्षपयानीं सीतेशि बैसवुनि तूर्ण,
त्रिजटा रणांगणातें नेउनि, दावी क्षणांत संपूर्ण. ३४७
खरतरभुजगशरार्चितसर्वतनू[5] पंजरांतरीं शुकसे,
रक्तार्द्रदेह सद्यश्छिन्न[6] वसंतीं सपुष्पकिंशुकसे[7]. ३४८
अथवा, प्रलयज्वलनज्वालाकवलीकृतेंदुभास्करसे[8],
वज्रच्छिन्नकनकनगशृंग[9] तसे, सिंहनिहतकुंजरसे[10]. ३४९
अवलोकुनि राघववर वरदेवर[11], भूमिवर रजोध्वस्त[12],
अस्तधृति[13] त्रस्तमना[14] सीता ठेवी स्वमस्तकीं हस्त. ३५०
'हा! नाथ! हा! रमण! हा! लक्ष्मण! हा! तात! हांबे[15]! हा! दिष्टे[16]!
विष्टपनायक काळें गिळिला, केलें मला चि अवशिष्ट.
निजला काय श्रीमान् वसिष्ठ भगवान् भवत्कुलाचार्य?
आर्यसुता! स्वर्गातें गेलाशि, कसा न होनि कृतकार्य?

---

१. गाढ मूर्च्छा. २. वाढतें यश आहे ज्याचें असा. ३. पुष्पक नांवाच्या विमानांत. ४. कुबेराच्या पुष्पकविमानांत. ५. अति तीक्ष्ण अशा सर्पबाणांनीं व्याप्त आहे देह ज्यांचा असे ते रामलक्ष्मण. ६. नुकते च तोडलेले. ७. पळसाप्रमाणें. ८. प्रलय-कालच्या अग्नीच्या ज्वालांनीं ग्रासलेले चंद्रसूर्य त्यांसारखे. ९. वज्रानें तोडलेल्या मेरुपर्वताचीं शिखरें. १०. सिंहानीं मारिलेल्या हत्तीप्रमाणें. ११. पति व दीर. १२. धूलिलिप्त. १३. धैर्यहीन. १४. भीतमना. १५. हा+अंब=अग आई! १६. दैवा!

हा ! दशरथ　रा जमहिपि ! कैशी तूं साहशील सुतशोक ?
　　कैकेयि ! तोक गिळिला, म्हणेल तुज काय हा बरें लोक ?
कौशिकगौत　म काश्यपवसिष्ठजाबाल्यगस्त्यविप्राशीः
　　जाल्या विफळा कैशा ? मज्जीवन काळ कैंवि न प्राशी ?
हा ! देवर ! तु ज ला मीं पंचवटीमाजि गांजिलें, बापा !
　　न वदावें तें वदल्यें, म्हणउनि रुसलासि काय निष्पापा ?
त्रिभुवनभ　य हि न हारिलें, [1]स्वैरलहरदस्यु मारिला नाहीं;
　　मज टाकुनियां गेलां स्वर्गाला कार्य न करुनी कांहीं. ३५६
तातासि विचा रा या गेलां दोघे हि धर्मसंकट कीं;
　　'सत्वर पुनरपि येतों,' ऐसें कथिलें नसे कसें कटकीं ?
त्यजिलें जरि　म ज, तरि हें राहो, तुज विषयरुचि नसे, शांता !
　　त्यजिली कशि धर्मज्ञा ! वृद्धा [2]विधवैकनंदना माता ?'
यापरि [3]बाष्प　ज लाविलनेत्री धात्रीसुता विलाप करी;
　　त्रिजटा तेव्हां तीतें समजावी, लोचनें पुसूनि करीं. ३५९
'निजशत्रुक्ष　य करुनि, त्वद्दुःखातें हरील हा राम;
　　हारामध्यें मणिशी तुजला हृदयीं धरील सुखधाम. ३६०
राघव सानु　ज सावध होउनि देईल [4]शर्मसंदोह;
　　जो हत, तन्मुख [5]विद्युति, हा न तसा, पावला असे [6]मोहें.
शत्रुपराज　य करितां, पडती ऐसे चि आयुधाघातें;
　　पुनरपि सावध होउनि संहारिति वीर दुष्टसंघातें.' ३६२
सर्वज्ञा चतु　रा ते त्रिजटा बोधी यथार्थ वचनांहीं;
　　दुःखापासुनि देहत्राणीं धृतिवांचुनीं कवच नाहीं. ३६३
भूमिसुता प्र　म दवनीं, नेउनियां ठेविली तिणें मग ती;

---

१. आपलें स्त्रीरूप रत्न हरण करणारा चोर. २. विधवा आणि एकुलता एक च मुलगा असणारी. ३. अश्रुजळानें रुद्ध झाले आहेत नेत्र जिचे अशी. ४. सुखसमूह. ५. निस्तेज. ६. मूर्च्छा.

जग तीस शून्य भासे, खर[1]खदिरांगारपूरिता जगती.
कपिवर हि श्री रामव्यामोहें करुनि पावला ताप;
आपद्ग्रस्त व्याकुळ, जाला अत्यंत जेंवि कृतपाप. ३६५
वानरवर[2] रा जातें बिभीषणें नीति शिकविली हृद्या[3];
विद्या[4]भिमंत्रितांभें, दृष्टि हि केली क्षणांत अनवद्या[5]. ३६६
सद्विद्यापूता[6] म ळ जळ राघवलोचनांस ही लावी;
मग विभु नेत्रें उघडुनि, बिभीषणाला समीप बोलावी.
'मारुनियां र ज नीचर, करूनि तुझिया अधीन लंकेला,
तव मस्तकीं स्वहस्तें, नाहीं राज्याभिषेक मीं केला. ३६८
सुग्रीवा! बहु य त्न हि केला, साधावयासि मत्कार्य;
आर्यमणे! तूं मजहुनि, रविवंशाला सदैव सत्कार्य. ३६९
मत्संकट वा रा या, सहाय जालासि तूं जरी आर्य,
दुर्दैवमित्र[7] कोणीं होत नसे या जनांत कृतकार्य. ३७०
सारीं प्लवंग म बळें घेउनि जा स्वस्थळासि वेगानें;
माझ्यापरि तूं ही निजलोक नको तापवूं वियोगानें. ३७१
मीं रविवंशीं ज न्मुनि, निजपूर्वयशः समस्त हारविलें;
सौमित्रे! बंधुमणे! व्यर्थ तुला या रणांत मारविलें. ३७२
गुरुभक्ता! न य निपुणा! तुजसम कोणीं नसे विशुद्ध मनीं;
धर्[8]नी दिसती तूझ्या, या माझ्या शोकवह्निच्या धमनी[9].'
तेव्हां कपिरा ज म्हणे स्वश्वशुराला सुषेणनामाला,
'किष्किंधेला नेउनि, रक्षीं सौमित्रियुक्त रामाला. ३७४
दशकंठक्ष य करणें, किंवा मरणें वरूनि शरतल्प[10];
कल्पक्षय होवू परि, माझा मिथ्या नसे चि संकल्प.' ३७५

१. तीक्ष्ण अशा खैराच्या इंगळांनीं पूर्ण. २. सुग्रीवातें. ३. गोड, मनास पटणारा. ४. विद्येनें अभिमंत्रित अशा उदकानें. ५. निर्दोष. ६. चांगल्या विद्येनें पवित्र आणि स्वच्छ झालेलें. ७. अभागी मित्र आहे ज्याचा असा. ८. (अमरटीप) —**पंत**. शिरा. ९. फुंकणीति प्रसिद्धिः—**पंत**. १०. बाणांची शय्या.

तेव्हां रुमाव[१] रा तें म्हणे सुषेण, 'प्रभो! धरीं धीर;
क्षीरसमुद्रतटातें धाडीं पवनात्मजादि कपिवीर. ३७६

केलें अमृत म थन ज्या स्थानीं, तेथें चि दोन गिरिवर्य[२];
अर्यमसम[३] निशि दिसती ओषधितेजें, असे महाश्चर्य. ३७७

विधुतरणि[४] श्री तस्कर, चंद्रद्रोणें[५] प्रसिद्ध ते शिखरी;
त्यांपासुनियां औषधि, आणुनि द्यावी रघूत्तमाशि खरी.

हरितिल सा रा ताप प्रभुचा, संरक्षितील कीं प्राणा;
संजीविनी[६] विशल्या[७] ऐशा त्या दोन औषधी आणा. ३७९

दैत्यांसह स म र करुनि जाले होते अमर्त्य[८] निर्जीव;
जीवन देता जाला, त्या ओषधिच्या बळें तदा जीव[९]. ३८०

ऐसें वदतां ज वन[१०] श्वसनाहुनि[११] वैनतेय[१२] तो आला;
व्यालारिदर्शनानें नागांहीं सोडलें चि रामाला. ३८१

अहिमयसा य क पळती, गरुडागमनें चि भीत्यधीनमनें;
जैसीं भक्तजनाचीं पापें रघुनायकांघ्रिच्या नमनें. ३८२

जाले विमुक्त रा घव अहिपाशांतूनि अर्धलवमात्रें;
गात्रें स्पर्शोनि करें, केलीं बळसौख्यकांतिचीं पात्रें. ३८३

ज्याचें निजना म हरी, वज्राच्छेद्यादिसिद्ध[१३] भवबंध,
तो, 'प्रत्युपकार मला न दिसे, जालों' म्हणे 'जसा अंध.'

'तूं गमशी म ज दशरथवासिष्ठमुनिकौशिकासमान मनीं;
श्रमनिर्दलन! श्रमहर! हे स्तुति करितों असें कदा न मनीं.

सदयहृद य तूं कोण? स्वाख्या[१४] वद.' यापरी पुसे राम;
हा मग म्हणे, 'तुझा मीं सखा, गरुड हें प्रसिद्ध मन्नाम.'

---

१. रुमापति सुग्रीव त्यातें. २. पर्वतश्रेष्ठ मंदर आणि द्रोणागिरी. ३. सूर्यासारखे. अर्यमन्=सूर्य. ४. सूर्यचंद्र ह्यांच्या शोभेतें हरण करणारे. ५. चंद्र आणि द्रोण नांवाचे. ६. मृतांस जिवंत करणाऱ्या. ७. बाणाग्रांची पीडा निवारण करणाऱ्या. ८. देव. ९. गुरु:-**पंत.** बृहस्पति. १०. वेगवान्. ११. वायूपेक्षां. १२. गरुड. १३. वज्रानें तुटावयाचा नाहीं असा आदिसिद्ध (स्वयंभु). **१४**. आपलें नांव.

आलिंगुनि भु  ज युगळीं, दोघांशि म्हणे, ‘ स्वशत्रु माराल;
कारालयगत निर्जर सोडउनि स्वाप्तलोक ताराल.’ ३८७
ऐसें खगना  य क तो वदोनि घेवूनि राघवाज्ञेला,
गेला; जयशब्द तदा हर्षें कपिसैन्यसागरें केला. ३८८
पुनरपि ते  रा गानें जाउनि, गुडराशिला पिपीलिकसे,
लंका व्यापुनि म्हणती, ‘खळ हो ! अद्यापि वांचलेत कसे ?’
पाषाणतृण  म[1] हीरुह धूळीनें भरुनियां महापरिखा[2];
हरि[3] खाणिती पुरीतें नखदंतांहीं धरुनियां हरिखा[4]. ३९०
कपिनिनदें[5]  श्री[6] दानुज पावे तत्काळ मृत्युची शंका;
आतंकाकुळ[7] जाला, हरिसैन्यें वेष्टिली जशी[8] लंका. ३९१
अतुळबळी  रा घव तो आला सेनेकरूनि संयुक्त;
[*]अहिपाशांपासुनियां सौमित्रीसहित जाहला मुक्त. ३९२
दशमुख हें  म हदप्रिय, ऐकुनियां, फार जाहला खिन्न;
स्विन्नतनू[9] नतकंधर[10] सस्रोत[11] जसा महीध्र पविभिन्न. ३९३
राघवपरा  ज यास्तव धाडी धूम्राक्षनाम रणदक्ष;
दक्षघ्नावरि[12] अंधक[13], तेंवि जयाचे प्रवीर बहुलक्ष. ३९४
जेवि धनंज  य विपिनीं कपिसैन्यामाजि तो तसा गमला;
गिरिशिखरकरकमारुतिघनाघनें[14]करुनियां रणीं शमला[15].
तदनंतर  रा क्षसवरवचनानें वज्रदंष्ट्रनाम रण
प्लवगांसह करुनि बळें, अंगदहस्तें चि पावला मरण. ३९६

---

१. वृक्ष. २. मोठे खंदक. ३. वानर. ४. हर्षनाम—**पंत.** ५. वानरांच्या शब्दामुळें. ६. कुबेराचा धाकटा भाऊ रावण. ७. भयाकुल—**पंत.** ८. जेव्हां. ९. घर्मयुक्ता तनुः यस्य—**पंत.** १०. वांकली आहे मान ज्याची असा; अधोमुख. ११. प्रवाहयुक्त. १२. शंकरावर. १३. दैत्यनाम. ह्याच्या रक्तापासून दुसरे अंधक उत्पन्न होत. श्रीशंकराचें अंधकासुराशीं अवंतिदेशांत घोर युद्ध झालें. १४. पर्वतशिखरें, गारा, मारुति, वृष्टि करणारा मेघ यांच्यायोगें. १५. विझला, मेला. * खोडलेला पाठ—**अहिपाशांपासुनियां जाला सौमित्रिसहित संयुक्त.**

तदुपरि स    म र कराया अकंपनाला दशानन प्रेषी;
मारुतितरुप्रहारें पावे मरणासि तो सुरद्वेषी. ३९७

दशमुख नि    ज प्रधान प्रहस्त जो, त्यास ही रणा धाडी;
त्याचें जीवनधन, तो नील हरी, घालुनि स्वयें धाडी.

सचिवांचा क्ष    य होतां, जाला दशकंठ शोकभयमग्न;
भग्नमनोरथ ज्याचें मानस चिं[1]तांकपीठसंलग्न. ३९९

मग रक्षःकुं    ज र तो, घेउनि सेनेसह स्वपुत्रास,
वानरबळासि, येउनि, देता जाला जगद्रिपु त्रास. ४००

ते दुंदुभितो    य दरवं, दरवर वीणा मृदंग वाजविती;
गजहयरथचक्रध्वनि भ[2]टसिंहध्वान भुवन गाजविती.

कांपे धरा थ    रा रां, गिरि चळती, अब्धि होय संक्षुब्ध;
पां[3]शु प्रांशू[4]ष्णांशुद्युति चोरुनि, होय सुरनदीलुब्ध. ४०२

प्रां[5]शुध्वज हे    म मय, द्विप गिरिसे, रथ विमा[6]नसंकाश;
खगपतिगति हय ऐसें, सैन्य करी निरवकाश आकाश.

वासव[7]नील    श्री तो, कवची, खड्गी, गदी, शरी, चापी,
प्रा[8]सी, शूली, कुंती, मुसली दशकंठ पातला पापी. ४०४

कपिबळपा    रा वारीं दशमुख शिरला जसा महामकर;
'मा[9]मकरक्षोवृंदीं' म्हणे 'कसा शर धरील रामकर?'

तो समर लो    मं[10] हर्षण केला, त्याला तुळा नसे कांहीं;
केशाकेशि, नखानखि, मुष्टी[11]मुष्टि प्लवंगलोकांहीं. ४०६

१. काळजी हें चिन्ह ज्या स्थानाचें त्याशी युक्त अर्थात् चिंताव्याप्त. २. वीरांचा सिंहनाद. 'सिंहनाद'='हर हर महादेव' ह्यासारखा 'रणशब्द'. ३. धूळ. ४. उंच असणारा प्रखरकिरण जो सूर्य त्याचें तेज. ५. (अमरटीप) उच्च—**पंत.** ६. विमानासारखे. ७. इंद्रनीलवत् श्रीः—**पंत.** ८. भाल्यासारखें एक शस्त्र आहे त्यास 'प्रास' म्हणतात, त्यातें धारण करणारा. ह्याला 'सांग' असें हि म्हणतात. ९. माझ्या राक्षससमूहावर. १०. अंगावर कांटा उत्पन्न करणारा. ११. अन्येषामपि दृश्यते इत्यनेन दीर्घः सर्वत्र योज्यं—**पंत. मुष्टामुष्टि** असा अन्य पाठ आहे.

नानायुधव्र[1] ज क्षत कपि कोपें पादपाद्रिशिखरांहीं,
रात्रिंचरसेनेला मर्दिति पदमुष्टिदंतनखरांहीं. ४०७
मृतगजह य देहातें हातें उचलूनि मारिती रिपुला,
क्षतरक्षः[2]क्षतजांच्या क्षितिपृष्ठीं वाहती नदी विपुला.
दुर्बुद्धिमंदि रा तें दशकंठाच्या कठोर हृदयातें,
मुष्टिद्रुमोपलांहीं मारुति ताडी रणांत अदयातें. ४०९
मग निरूप म रण केला नीलानें राक्षसेश्वरासहित,
अहितनय तसा दंश हि करिता जाला वधावया अहित.
दश[3]मुखभु ज भुजगाशुगदंष्ट्राविद्धांग नील मोहातें
पावे, तों करि लक्ष्मण शलल[4]सम पंक्तितुंडदेहातें. ४११
दशवदनें य[5]मनियमें विधिच्या चरणीं धरूनि आसक्ति,
भक्तीनें मेळविली, ते सौमित्रीशि अर्पिली शक्ती[6]. ४१२
यमदंष्ट्रा भु ज गी कीं, ते शक्ति प्रलयवह्निची ज्वाळा,
मूर्च्छेसह येउनियां सेवी सौमित्रिवीरहृच्छाळा[7]. ४१३
बंधुपराज य होतां, राम हि चित्तांत पावला कोप,
तो पवनसुतस्कंधीं बैसे, उदयाचळीं जसा गोप[8]. ४१४
तेव्हां तो असु रा वर राव[9] रघूंचा शरव्रजें वर्षे,
स्पर्शे जो शर रिपुला, तो त्याच्या रक्तसेवनें हर्षे. ४१५

---

१. अनेक प्रकारच्या शस्त्रसमूहानें जखमा झाल्या आहेत ज्यांस असे. २. जखमी झालेल्या राक्षसांच्या रक्तांच्या (क्षतज=जखमेंतून निघणारें रक्त). ३. रावणाचे भुज हेच सर्प त्यांच्या बाणरूप दाढानीं घायाळ केलें आहे अंग ज्याचें असा. ४. सायाळ इति ख्यातस्य—**पंत.** ह्या जनावराचें अंग कांट्यानीं भरलेलें असतें व आपला बचाव करण्याचे वेळीं तो ते कांटे बाणाप्रमाणें अंग फुगवून फेंकतो. ह्या कांट्यांस ‘ साळपीस ’ म्हणतात. अर्थात् रावणाचें शरीर शरव्याप्त केलें असा भाव. ५. अष्टांगयोगसाधनांपैकीं पहिलीं दोन साधनें; इंद्रियदमन व व्रताचरण यांच्यायोगें. ६. अस्त्रविशेष. ७. हृदयस्थान. ८. सूर्य—**पंत.** ९. रघूंचा राव=राघवश्रेष्ठ.

राम गमे प्र म[1] थपती, रावण भासे रणांत अंधकसा,
रघुवर म्हणे, 'दशास्या! स्वार्थें जालासि मूढ अंध कसा? ४१६
पापें विगत श्री तूं जालाशि, सदा जगद्विनाशरत,
शरतल्पीं तुज निजविन, परत खळा! त्वरित हो रणोपरत[2].'
ऐसें वदतां रा गें रावण धांवे प्रमत्त[3]कासरसा;
गिरिविपिनासह कांपे, भिवूनि लंकाधिनायकास रसा.
रावण पर म क्रोधें विशिखें वर्षे जसा महांबुधर;
धरसा[4] निश्चळ भासे, राघवराजा महेषु[5]चापधर. ४१९
रामशरव्र ज विद्ध, क्षणदाचर तो दिसे जसा शल्य[6],
शल्यव्याकुळ होउनि, विसरे संपूर्ण युद्धकौशल्य. ४२०
रामहरिद्ध[7] य मार्गणकिरणांहीं असुरघूक तो त्रास
पावे, कीं रावणगज साहेना राघवेषुतोत्रास[8]. ४२१
घेउनि धिक्का रा तें, जय देउनि रामबाहुदंडातें,
यातु[9] गृहीं जाय, गणी कोदंडातें चि काळदंडात. ४२२
हृदयीं म्हणे, 'म हेंद्र प्रतापसूर्यें करूनि तापविला;
पविला गणिलें नाहीं, शीतार्दितसा[10] सुरौघ कांपविला. ४२३
पूर्वीं मीं स्वभु ज बळें कैलासाख्य क्षमाध्र हालविला,
निश्वासमारुतानें[11] सुरप्रतापप्रदीप मालविला. ४२४
नर कपि, भ य सोडुनियां, करिती सर्वत्र पारणा, माजी
सेना मारुनि, यास्तव मातें जाली त्रपा रणामाजी. ४२५

---

१. शंकर. शिवगणांस 'प्रमथ' म्हणतात. २. रण+अपरत=रण सोडलेला असा; युद्धपराङ्मुख. ३. मत्तमहिषवत्–**पंत**. ४. गिरिवत्–**पंत**. ५. महाबाणधनुर्धारी. ६. (अमरटीप) द्वे सहीति ख्यातस्य । श्वानं विध्यतीति–**पंत**. श्वावित् आणि शल्य हीं दोन नांवें 'सही' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या प्राण्यांचीं आहेत. ७. राम हा च हरिद्धय म्हणजे सूर्य (हरित्=हिरवे आहेत हय म्हणजे घोडे ज्याचे असा) त्याचे बाणरूप किरण त्यांहीं. ८. (अमरटीप) 'वासाडा' लोके–**पंत**. वेळु. ९. राक्षसः–**पंत**. १०. थंडीनें पीडिताप्रमाणें. ११. श्वासवायूनें; फुंकरानें.

विधिपासूनि ज र्धीं मीं, दुर्लभवर पावलों तर्धीं चुकलों;
नर कपि गणिले नाहीं, सर्वस्वाला म्हणोनियां मुकलों.
केला अविन[1] य पूर्वीं, कपिमुखनंदीश्वरास[2] मीं हसलों;
‘कपिकृत कुलक्षय’ ऐसा, शाप हि पावोनियां उगा बसलों.
रविवंशज रा जर्षी अनरण्य प्राज्ञ बोलिला, ‘तुजला;
मत्कुलज वीर मारिल’ तें हें संप्राप्त जाह्लें मजला. ४२८
रिपुपासूनि म हद्भय आलें, आतां सहाय धैर्य मतें[3];
अर्यमतेज[4] विपत्तमशमनीं[5] चित्तस्थिरत्व आर्यमतें.’ ४२९
ऐसें तो नष्ट श्री चित्तीं चिंतूनि, रात्रिचर अयुत
आणुनि म्हणे, ‘करा जा मदनुज निद्रेकरूनियां वियुत[6].’
मग सत्वर रा त्रिचर गेले तो कुंभकर्ण उठवाया,
पाठविले दशवदनें जे तन्निद्राधनासि लुटवाया. ४३१
त्याच्या निकट म धुरुधिरघट शतसंख्याक ठेविती पूर्ण;
मत्स्यवराहमहिषमृगमांसांचे राशि निर्मिती तूर्ण. ४३२
विंध्य तसा, नि ज ला तो; वदनदरीमाजि निबिड आंधार
फार भयंकर भासे, पाताळाचें चि काय तें दार! ४३३
श्वासानिलरं[7] य पतित क्षणदाचर तूलतुल्य ते भ्रमती;
नासाप्रवेशनिर्गमगतागतें[8] मशकसे किती श्रमती. ४३४
‘हे कुंभकर्ण! रा जा बलावितो’ मारिती अशा हाका;
हा कांहीं च वदेना, निद्राप्रिय इंद्रशत्रुचा[9] काका. ४३५
एकसहस्र म हारव दुंदुभि संताडिले कितेकांहीं;
मुंद्गरमुसलें[10] कारिती ताडन, परि लागती न ते कांहीं.

---

१. दांडगेपणा. २. वान(र)तुल्याननतों सर्वगणाध्यक्ष सन्मती नंदी इति वक्ष्यमाणत्वात् उत्तरकांडे—**पंत.** ३. मातें, मजला. ४. मागें ३७७ वी गीति पहा. ५. संकट आणि अंधकार ह्यांचा नाश करण्यांत. येथें ‘अर्यमतेज’ आणि ‘चित्तस्थिरत्व’ असा अनुक्रम घेणें. ६. विरहित. ७. वेग—**पंत.** श्वासवायूच्या वेगामुळें पडलेले. ८. नाकांत जाण्यायेण्याच्या हेलपाट्यानें—येरझाऱ्यानें. ९. इंद्रजित रावणपुत्र. १०. ‘गुर्जे’ इति ख्यातस्य—**पंत.** मोगरी आणि मुसळ ह्यानें.

शतसंख्याक ज ळाचे कुंभ हि आणूनि रिचविले[1] कानीं;
केशोन्मूलन जालें, केले निजकंठ शुष्क हाकानीं. ४३७
चाउनियां का य बळें धांवति आंगावरूनियां, हसती;
मृतवन्यगजास जसे, वायसगण वेष्टिती तसे दिसती.
दशशत ग ज देहावर चालविले, ताडिला शिळाशिखरें;
निद्रापराजयास्तव केलें त्याहीं प्रसिद्ध युद्ध खरें! ४३९
ऐसा बहुता य तें जागा केला, जसा महाकाळ.
मधुलोहितें[2] घट घटघट सेवी मांसासमेत तत्काळ. ४४०
क्षुत्तृट्परिहा रा तें करूनि निद्रालस[3]स्वभावानें,
क्रव्यादांसि म्हणे, 'मज ऊठविलें किंनिमित्त भावानें?'
ते म्हणती, 'स म रीं बहु रामानें मारिलें पलाशबल;
शवलक्षें[4] धरणीतळ केलें शाखामृगव्रजें शबल[5]. ४४२
यास्तव राजा श्री मान् वांछितसे आज तूज देखाया;
वीरमणे! रिपु मारुनि, मांस शिवावायसांसि दे खाया.'
तो कुंभकर्ण रा क्षस ऐसें ऐकोनि करुनियां स्नान,
ध्यान धरुनि, शीघ्र करी विंशतिशतकुंभमितसुरापान.
कलशश्रुति[6] म दिरामदमत्त महाकाय वन्यकुंजरसा;
दशकंठाप्रति जातां, पादन्यासें करी सकंप रसा. ४४५
हांसति केश ज याचे, जलदव्याप्ताग्रपारियात्रास[7];
यात्रा[8] सदैव ज्याची देवांसह दे शचीप्रियां[9] त्रास. ४४६
कपिसेनेला य मसा गमला, मग लागले पळायाला;
कारण जाले यूथपं[10] रामाला वृत्त हें कळायाला. ४४७
रघुपति श रा सनातें घेउनि युद्धांगणीं उभा ठाके;

---

१. ओतले. २. मद्य आणि रक्त ह्यांच्या घागरी. ३. निद्रेमुळें आळशी ज्याचा स्वभाव असा, त्यानें. ४. प्रेतांच्या लाखानें. ५. व्याप्त—**पंत.** ६. कलशाप्रमाणें कान आहेत ज्याचे असा 'कुंभकर्ण.' ७. मेघवेष्टित आहे शिखर ज्याचें असा पारियात्र पर्वत त्यास. ८. गमन. ९. शची आहे प्रिया ज्याची त्या इंद्राला. १०. सेनाग्रणी, सरदार.

या केवळ विकटाला[1] अवलोकुनि, तत्क्षणीं मनीं धाके.
'प्रचलितहि[2] म गिरिसम हा कोण?' असें तो बिभीषणासि पुसे;
'रिपुसेनेवांचुनि हे कां कपि पळती भय[3]श्लथद्वपुसे?' ४४९
दशकंठानु ज तेव्हां म्हणे, 'विभो! हा अनंतबळसिंधु,
सिंधुरगति[4] सुप्तोत्थित[5] निद्रालस कुंभकर्ण मद्बंधु. ४५०
बहुलोकक्ष य याणें उपजत केला, तधीं शतक्रतुला
मुनिजन कथिती, तेव्हां क्रोध धरी कीं नसे जयास तुला.
अमरपति ज यंतपिता यातें वज्रें करूनियां ताडी;
हा ही शत[6]कोटिकठिनमुष्ट्याघातें चि जिष्णुला पाडी.
आत्मपराज य इंद्रें कथितां, ब्रह्मा म्हणे, 'असा पापी;
हा पीडाकर राक्षस मृत[7]कल्प सदा निजो असें शापी.' ४५३
त्या समयीं तो रा वणधृतपद विधि, 'हा निजोनि सा मास,
जागो एक दिवस' हें बोले, पुरवी प्रपौत्रकामास. ४५४
हा तो चि पिता[8] म हमुखलब्धमहाशापदग्ध घटकर्ण;
अर्णव महाबळाचा, येतो पानीयभृद्घटा[9]वर्ण. ४५५
हा घटकर्ण श्री मान् बलवान् रणदक्ष युद्धकामानें;
रामा! नेणुनि तुजला, ऊठविला पंक्तिकंठनामानें. ४५६
विधिशापप रा जित हा येईल बळें करावयास रण;
यास रण[10]त्पत्र तुझे शर देतिल जानकीप्रिया! सरण[11].' ४५७
अग्रजपादीं म स्तक ठेवी जाऊनि तूर्ण घटकर्ण;
पुसतां जागरकारण, त्यास म्हणे पंक्तितुंड, '[12]आकर्ण.

---

१. भयंकराला. २. चालत्या हिमालयपर्वताप्रमाणें. ३. भयानें विकल झाले आहेत देह ज्यांचे अशांप्रमाणें. ४. गजगति. ५. निजून उठलेला. ६. वज्रासारख्या कठिण मुष्टिप्रहारानें. ७. मेल्यासारखा. ८. ब्रह्मदेवाच्या मुखांतून प्राप्त झालेल्या महाशापानें जळलेला. ९. पाण्यातें धारण करणाऱ्यांच्या (मेघांच्या) समूहाप्रमाणें कान्ति आहे ज्याची असा. १०. सूं सूं शब्द करणारे पंख आहेत ज्याला असे. ११. अन्त्ययानं नरयानं—**पंत.** चिता. १२. ऐक.

राघव सानु ज आला, समुद्र तरला, करून सेतूतें;
रक्षःप्रवीर वधिले, हें कांहीं ठावुकें नसे तूतें. ४५९

तुजवांचूनि य शस्वी त्याला वारी असा नसे कोणीं;
शोणित पी, जा, नरकपि मारुनि, कर शत्रुवार्जित क्षोणी. ४६०

तो कुंभकर्ण रा गें म्हणे, "तुला बोध जाहला पहिला;
अहिलाळनलीलासी, सोडावी शीघ्र शत्रुची महिला.

बोध असा स्व म नीं तूं न धरुनि, धरिले सदा स्मरक्रोध;
जो धर्म तो त्यजुनियां, केला सत्सेव्यमार्गसंरोध. ४६२

हरुनि बळें ज नकसुता, रामासीं लाविला वृथा दावा,
दावानें गृह गिळिलें, मग म्हणशी 'कूपयोग्य भू दावा.' ४६३

जीवित[1]संश य जाला, हित कथिलें तें न मानिलें कानें;
आतां काय करावें भावानें वा स्वकीय लेंकानें? ४६४

रामापासुनि ज य तों दुर्लभ, परि मीं करूनियां युद्ध,
क्रुद्ध[2]क्षितिजेशशरज्वलनीं होईन जाउनीं शुद्ध." ४६५

ऐसा तो अन्या य स्थापुनि निजबंधुच्या शिरीं सत्य,
अत्यद्भुतबळ रावण पाद स्वशिरीं धरी जसा भृत्य.

लंकेश स्वक रा नें अर्पी अनुजासि कुंडलें कटकें;
कटकें देवूनि म्हणे, 'जा विजयी हो वधूनि मर्कटकें.' ४६७

तो कुंभकर्ण म ग बहु कटकें घेवूनि जाय समरातें;
तेव्हां अतिभय जालें, कपिवीरांतें तसें चि अमरांतें.

कल्पांत[3]शिखि श्री तो घटकर्ण निघे धरूनियां शूळ;
गर्जे बळवत्तर, तों वानरकटकीं उठे शिरःशूळ. ४६९

नगरीप्राका रा तें लंघुनि आला असा महाशूळ[4];
नासाश्वासें त्याच्या उडती कपिवीर ते, जसा तूळ. ४७०

---

१. प्राणांवर बेतली. २. कुपित जो सीतापति त्याच्या बाणाग्नींत. ३. प्रलय-कालाच्या अग्नीप्रमाणें देखावा आहे ज्याचा असा. ४. प्रचंड आहे शूल—आयुध-विशेष—ज्याचा असा.

हरिल प्राण म हारिपु, म्हणउनि पळती भयार्तचित्त हरी;
हरिणांसम कपि गमती त्यांमध्यें एक कुंभकर्ण हरी.
तो दुर्धर र ज नीचर शतशः प्लवगांसि आननीं [1]वैरी;
करपदशूळाघातें मर्दी रघुवीरवाहिनी[2] वैरी. ४७२
अंगदगव य गवाक्षप्रजंघनळनीळमारुतिप्रमुख
समजाउनि सैन्यातें, फिरविति जीं जाहलीं भयें विमुख.
घटकर्णशि रा वर ते मारुतिनें टाकिले बळें शिखरी;
शूळाघातें त्यांचें रज[3] कलश[4]श्रोत्र भूतळीं विखरी. ४७४
भार[5]सहस्र म य महाशूल क्षेपी[6] मरुत्सुतावरतें,
वरचेवर तें झेलुनि, मारुतिनें भंगिलें नियुद्धरतें[7]. ४७५
खदिरकुट[8] ज धवसरलस्यंदनतरुबिल्वतालसालवट
वर्षति घटकर्णावर कपिवर होऊनि सर्व एकवट. ४७६
उच्चशिलोच्च य शिखरें घटकर्णाच्या शिरावरी पडती,
कंदुकसे इंदुकमळबांधवपर्यंत[9] खांगणीं[10] उडती. ४७७
बहळक्षत[11] ज समुक्षित कपिबळगत ससुमपर्णवनवर्ण[12],
अर्णवकुक्षिगवाडव, तैसा भासे प्रचंड घटकर्ण. ४७८
वृक्षशिलोच्च य सहित प्लवगबळांतें गिळी महाकाय;

---

१. चिक्षेपेत्यर्थः—**पंत.** ‘ तांदुळ वैरा ’ हें वाक्य सर्वांच्या नित्य ऐकिवांत येतें च. २. सेना. ३. चूर्ण. ४. कुंभकर्ण. ५. भारप्रमाण १॥ ४॥ ८।॥ ३। १—**पंत.** (?) हजार भार (वजनानें) भरणारा. भारवजनाचें प्रमाण १ भार=३४॥ मण, ८ शेर, २ तोळे, ४ मासे. ६. फेकी. ७. ‘नि’ ह्या उपसर्गानें ‘आधिक्य’ व्यक्त होतें म्हणून ‘नियुद्ध’ =रणकंदन, त्यामध्यें चूर असणाऱ्यानें. ह्याचा अर्थ ‘बाहुयुद्ध’ असा हि आहे. मागें गीति ४८६ पहा. ८. खैर, कुड्याचें झाड, धावडा, देवदारु, तिवसाचें झाड, बेल, ताग, साग आणि वड. ‘ स्यंदन ’=रथ. हल्लीं हि तिवसाच्या लाकडाची चाकजोडी उत्तम समजतात. ९. चंद्र आणि सूर्यापर्यंत. सूर्यविकासी कमलें सूर्योदयीं उमलतात, तेव्हां ‘ कमलबांधव ’=सूर्य. १०. आकाशरूपी मैदानांत. ११. पुष्कळ रक्तानें भरलेला. १२. कुसुमितपलाशवनतुल्य इति—**पंत.** अन्य पाठ—**फुल्लपर्णवनवर्ण.**

नासाकर्णद्वारें असतां, त्या वानरांसि भय कीय ? ४७९

गंधोर्वें रुधि रा च्या प्रमत्त होऊनि आत्मपरसेना
मर्दी, कमळवनाला वारणसा, वारणासि परिसेना. ४८०

केला प्लवंग म क्षय, अंगदनळनीळमारुतिप्रमुख,
स्वमुखज्वलनपदकरद्रुमगिरिशिखरादिकीं करी विमुखें.

तदुपरि तो श्री लक्ष्मण त्यास म्हणे, 'रे! निवार बाणातें;
हा खंडितों तुज्या मीं हृदयासह हेमवारबाणातें.' ४८२

तो कुंभकर्ण रा क्षस धांवे सौमित्रिला वधायाला,
वसुधा यालागिं भयें कांपे, दे शाप अविबुधा याला. ४८३

संग्राम पर म तुमुळ क्षणदाचरलक्ष्मणासवें जाला,
ज्याला तुळा चि नाहीं, कोप तदा ये प्लवंगराजाला. ४८४

उचलुनियां ज गतीधर घटकर्णाच्या शिरावरि क्षेपी,
ते पिष्ट सर्व जाले, तें रज खँसरिज्जलार्करुचितें पी.

दोघे हि विज य कामुक नियुद्ध करिती जसे प्रमत्त करी,
विंध्य स्वर्णाद्री कीं, ऐशी शंका मनीं निवास करी. ४८६

ते दोघे रुधि रा द्रं प्रोच्चमहादेह भासती समरीं;
पुष्पितपर्णवनावृत पर्वत, कीं दाववह्निदीप्त गिरी. ४८७

करितां संग्रा म असा, अशनिकठिनमुष्टिताडनें हरिला
मूर्छित भूवरि पाडुनि, नियुताधिक वीरसंघ संहरिला. ४८८

त्या असुरकुं ज रानें सैन्यसमुद्रीं करुनियां क्रीडा

---

१. निवारण्यास. २. श्रवणं न कृतं—**पंत.** ३. आपल्या मुखांतील अग्नि, पाय, हात, वृक्ष आणि पर्वतांचीं शिखरें यानीं. ४. पराङ्मुख. ५. ( अमरटीप ) स्वर्ण-कवचं—**पंत.** ६. 'अवि'=मेंढा, एडका. 'बुध'=शहाणा. एडक्यासारखा शहाणा अर्थात् अविचारी. 'याला (कुंभकर्णाला) [तो] अविबुधा [म्हणोनि] शाप दे' असा अन्वय. ७. गंगाजल आणि सूर्य ह्यांच्या कांतीतें पी. अर्थात् त्या धुळीनें गंगाजल मलिन—खडूळ—झालें आणि सूर्य झांकून गेला, असा भाव. ८. पपौ—**पंत.** ९. अत्युच्च—**पंत.** १०. दहा लक्षांपेक्षां अधिक.

कपियादोगण मथिले, तें दिङ्मातंगे[1] पावले व्रीडा. ४८९

'कपिसमुदा य स्वामी सुग्रीव करीतसे बळत्राण;

याला न्यावें म्हणजे होइल हें सैन्य निर्गतप्राण.' ४९०

कुंभश्रुति नि ज चित्तीं ऐसें चिंतूनि वानरेशाला

घेउनि नगरामध्यें जातां दावी मृगारिवेषाला. ४९१

तों वानरना य क तो सावध होवूनियां महाप्राण,[2]

घ्राणश्रुतियुगळातें घेऊनि उडे, करी यशस्त्राण. ४९२

कोपें असा प रा भव घटकर्णाचा करूनियां सहसा,[3]

कंदुकसा जाय नभीं, सांगे देवांशि काय 'यास हसा.'

तेव्हां निश्चित म रण क्रोधें घेऊनि परिघ तो परते;

भक्षी रगडी ताडी हरिंला, युद्धासि न टळती पर ते.

त्या समयीं तो श्री मान् सीतापति कार्मुकासि धरुनि करें

निकरें घटकर्णातें ताडी शतकोटितीव्रशरनिकरें.[4] ४९५

कोपांधनेत्र रा क्षस निजपरसेना रणांगणीं रगडी;

काळानें पाठविला तो बहुधा आपुला च वीर गडी. ४९६

तो समर लो म हर्षण, जाल्या जेथें असंख्य रक्तनदी,

वाहति ज्यांत धरारुहकपिरथरक्षःक्रमेलकाश्वरदी.[5] ४९७

वानरकर[6] ज रदद्रुमगिरिशिखराघातविक्षतांग रिपु

करि पुष्कळ हरिपुंगवमर्दन,[7] भरि पूर्ण तत्क्षणीं हरिपू.[8]

जाणों रघुना य क हरि, कलशश्रुति तो मदांध वन्यकरी;

---

१. पृथ्वी सांभाळण्याकरितां आठ दिशांस ठेविलेले हत्ती. त्यांचीं नांवें:—

ऐरावतः पुण्डरीको वामनः कुमुदोऽञ्जनः ।

पुष्पदन्तः सार्वभौमः सुप्रतीकश्च दिग्गजाः ॥

२. महाबल. ३. नेटानें. ४. वज्रासारख्या तीक्ष्ण बाणांच्या समुदायानें. ५. वृक्ष, वानर, रथ, राक्षस, क्रमेलक (=उष्ट्र—**पंत**. उंट), घोडे आणि हत्ती. ६. वानरांनीं नखें, दांत, वृक्ष, पर्वतशिखरें ह्यांच्या साहाय्यानें दिलेल्या तडाख्यानें ढिलीं झालीं आहेत गात्रें ज्याचीं असा. ७. वानरश्रेष्ठांचा नाश. ८. यमपुरीत्यर्थः—**पंत.**

कीं रामवासवासीं तो कलशश्रोत्र जंभ युद्ध करी. ४९९
त्याच्या दक्ष क रा तें परिघासह राम मार्गणें छेदी;
भेदी वाम भुजातें, अभय तयाच्या पदास ही नेदी. ५००
रामप्रहित म हेषुच्छिन्नकलशकर्णपाददोर्दंड
चंड[1]महांडजगति ते हरिति हरिप्राण जेंवि यमदंड. ५०१
अर्धद्वि[2]जरा ज निभ क्षुरप्र सोडूनि मस्तकासि हरी;
हरि तेव्हां आनंदें गर्जति, जैसे हते[3]भराज हरी. ५०२
'रघुराजो ज[4] य तितरां' ऐसें कपिसंघ गर्जती समरीं;
अमरीं जयध्वनीनें नभ भरिलें तत्पदांबुजभ्रमरीं. ५०३
रावण अनु ज विनाश स्वभुजच्छेदास मान तो भावी,
'हा! वीर! शक्रदुःसह मर्त्यकरें हे तुझी दशा व्हावी?
ज्याला हरिह[5] य मुख हे सुर चळचळ कांपले सुविक्रांत,
श्रां[6]त कसा तो जाला नरकपियुद्धीं न लावितां प्रांत[7]?'
भयशोकप रा धीनस्वांत पलाशेंद्र तप्ततनु जाला,
तनुजांला चौघांला धाडी तो, कोप ये अतनु[8] जाला.
अद्भुतविक्र म चौघे, देवांतक एक रावणप्रकृती[9],
अतिकाय दुजा, त्रिशिरा तिसरा, चवथा नरांतकाख्य कृती.
दोघे भ्राते सु[10] श्री, जे यु[11]द्धोन्मत्तमत्तनामधर;
ते प्रेषिले रणाला सर्व महाकाय, काय भूमिधर? ५०८
युद्धीं महोद[12] रा ला, गिरिप्रहारें स्वयें वधी नीळ;
होय महापा[13]र्श्वाभिधतूळीं तो ऋषभवह्निची कीळ[14]. ५०९
मारुतिहस्तें म रण त्रिशिरा देवांतकासवें पावे;

---

१. प्रचंडगरुडगति. २. अर्धचंद्रासारखा. ३. मारिले आहेत गजाधिप ज्यानीं असे. ४. अतिशय जय पावतो. ५. इंद्रप्रमुख. ६. दमला अर्थात् मेला. ७. पूर्ण शेवट. ८. विपुल—**पंत.** ९. रावणाचा नमुना अर्थात् प्रतिरावण. १०. तेजस्वी. ११. 'युद्धोन्मत्त' आणि 'मत्त' ह्या नांवांचे. १२. 'युद्धोन्मत्त' हा रावणाचा सावत्र भाऊ. १३. महापार्श्व नांवाचा राक्षस हा च कापूस त्याचे ठायीं. १४. ज्वाला.

यावेगळा नरांतक वधितां, तारासुतासि जय फावे. ५१०
वचनें[1] प्रभं ज नाच्या, जाणुनियां शत्रुजीवनावधिला,
विध्यस्त्रें रामाच्या अनुजें अतिकाय संगरीं वधिला. ५११
पुत्रभ्रातृक्ष य हा ऐकुनि, दशकंठ जाहला विकळ.
'कळतचि रिपुवह्निमुखीं स्वकरें मीं होमिले' म्हणे 'सकळ.'
पौलस्त्य घाव रा हा बरा चि जाला स्वपुत्रशोकानें,
लोकानें कथिल्यावर अप्रिय हें ऐकतां चि तो कानें. ५१३
जे दुर्जय अ म रांला, ते केले वानरव्रजें भग्न;
विघ्न न होतां सागर लंघुनि जालेत गोष्पदीं मग्न. ५१४
इंद्रजितानें ज नकस्वांताला तेधवां दिला धीर;
वीर प्रतापशाली, बोले तो योधमंडलीहीरें[2]. ५१५
'हा शरसंच य माझा, हे महोर्दंड, हा महाचाप;
ताता! पद्मभवाचा वर असतां, पावलासि कां ताप?
विजय परा ज य दोनीं पर्यायें[3] भेटताति सकळांला;
यालागि धीर टाकुनि, तूं घ्यावा व्यर्थ शोक न जळालीं[4].'
पौलस्त्यतन य ऐसें वदोनि वंदी स्वतातचरणातें
दशकंठ म्हणे, 'पुत्रा! तूं हो जा हेतु शत्रुमरणातें.' ५१८
तो पंक्तिकंध रा त्मज शरकिरण प्रकट करुनियां त्वरित,
हरितहयरथाच्यापरि[5], जाय द्विट्[6]जीवनासि संहरित. ५१९
समरीं पिता म हास्त्रें इंद्रजितें त्या हुतानळें प्रबळें
कपि सप्तषष्टिकोटि प्रसिद्ध वधिले, दुर्जी असंख्य बळें. ५२०
इंद्रजितानें श्री महारथी ते हि विधिवरें खिळिले;
मारुतिबिभीषणांतें सोडुनि, मोहें प्लवंगपति गिळिले. ५२१

---

१. 'ह्या अतिकायास ब्रह्मदेवानें वर देऊन अवध्य कवच दिलें आहे; करितां ह्याचा छेद ब्रह्मास्त्रानें कर' हें मारुतीचें वचन. २. हिरा, श्रेष्ठ. ३. अनुक्रमानें. ४. जळाव-यास. ५. हिरवे घोडे आहेत रथाचे ज्याच्या अशा सूर्याप्रमाणें. ६. शत्रु हें च उदक त्यास; (पक्षीं) शत्रूंच्या प्राणांस.

वानरजन रा जसुगळनळजांबवदंगदादि यूथपती
सुपतीवरं[1] निजलेसे दिसती, देहीं शराननें खुपती. ५२२
राक्षसकपि म ज्जास्थिक्षतजपलल[2]पूर्णमेदिनीशयनीं
शरवस्त्रावृत[3] पडले, उन्मीलन ज्यांचिया नसे नयनीं. ५२३
ऐसा सुररा ज रिपु ब्रह्मास्त्रेंकरुनियां रणीं क्रीडा
रामादिकांसि जिंकुनि गेला, देऊनि साध्वसव्रीडा[4]. ५२४
पवनतन य त्या काळीं बिभीषणासहित भूतसुखदात्री[5]
धात्री[6] शोधुनि, पाहे मूर्छित सुगळादिकांसि तो रात्रीं. ५२५
तो जांबवंत रा त्रीं पडला होता धराधरावाणी[7];
राक्षसपति[8]प्रयत्नें सावध होतां, अशी वदे वाणीः ५२६
'कुशळ असे म रुदात्मज बिभिषणा! तूं विलोकिला आजी?
माजी कठिनावस्था; सलते देहीं महेषुची राजी[9]. ५२७
दशकंठानु ज तेव्हां स्वयें पुसे तेथ जांबवंतातें,
'सुग्रीव राम टाकुनि, हनुमंत कसा विचारिला तातें[10]?'
यापरि संश य याला जाला, त्याला करावया दूर
विधिसुत म्हणे, 'नसे भय, कल्याण जरी असेल तो शूर.
जारि एक अं ज[11] नासुत जीवंत असेल, तरि समस्तांतें
शत्रुसमुद्रीं बुडतां, देइल तो जीवदानहस्तातें. ५३०
बळ अप्र[12]मे य ज्याचें, शौर्योत्साहाद्यनंतगुणशाली,
त्या लीलाकपितनुची स्मृति म्हणउनि येधवां मला जाली.
तों वायुकुमा रा नें क्षतविक्षतजांबवत्स्वदेहातें
हातें केला स्पर्श, प्रभू[13]तमूर्च्छाविलासगेहातें. ५३२

---

१. गादीवर. २. मांस–**पंत**. ३. बाणरूप वस्त्रांनीं आच्छादित. ४. भयलज्जा –**पंत**. ५. प्राणिमात्रांस सुख देणारी. ६. पृथ्वी. ७. पर्वततुल्य. ८. बिभीषणप्रयत्नें. ९. पंक्ति. १०. जांबवान् हा ब्रह्मदेवाचा पुत्र आणि बिभीषण हा नातु म्हणून 'तातें' असें बिभीषणानें म्हटलें आहे. ११. मारुति. १२. निरुपम. १३. अति-मूर्च्छेचें क्रीडास्थान अशा (देहातें).

नंदन पिता म हाचा वायुसुताला म्हणे, 'महाबाहो!
सर्वांसि[9] वांचवाया, या काळीं सानुकंप तूं बा! हो. ५३३

पवनसुता! श्री कंठश्वशुराच्या[1] निकट शीघ्र सुमते! जा;
ओषधिपर्वत[2] तेथें असे, दिसे रात्रि सूर्यसमतेजा. ५३४

त्याचा ठाइं वी रा! ओषधि आहेत या चि अभिधानीं
संजीविनी, विशल्या[3], सवर्णकरणी[4], तशी च संधानी[5].

या च्यार पर म यत्नें आणाव्या ओषधी सुदुष्प्रापा.
बापा! तुजला कांहीं दुष्कर नाहीं च कार्य, निष्पापा!

येथें ओषधि ज रि तूं घेउनि येशील शीघ्र, तरि आज
हा जनमान्य बळासह विज्वर होईल तरणिकुलराज.'

हें परिसोनि य शस्वी मारुति घे जांबवन्निदेशातें;
रामाशि नमुनि गेला, उडोनि तुहिनाचलप्रदेशातें. ५३८

त्या वायुकुमा रा नें करितां उड्डान तें त्रिकूटशिर
शिरलें महींत भारें, जाला तो काळ भूमिला शिशिर[6].

वातखगेंद्र म नोगति मारुति उसळे करूनि भुभुकार;
आग्नेयौषधतेजें[7] यंत्रोत्थितलोहगोळकाकार[8]. ५४०

पावे ओषधि ज गतीधरास, तों आपणासि नेयाला
आला, म्हणउनि ओषधि अदर्शनें कोप आणिती याला.

दीप्तस्वाहाप्रि[9] य निजशिखा तशा नूत्नपल्लवें लवल्या
तिमिरतमालकुठारा[10], त्या ओषधि तत्क्षणीं च मालवल्या.

म्हणऊनि अं ज नासुत कोपोनि म्हणे गिरीस, 'रे! मूढा!
गूढा[11] केल्या ओषधि; नेणाशि रामाशि दुर्नयारूढा!?

---

१. हिमालयपर्वताच्या. २. हिमालयाच्या ऋषभ आणि कैलास या दोन शिखरांमधील पर्वत. ३. शल्यपीडा दूर करणारी. ४. तत्सदृशकरिणी. ५. त्रुटित नाडीस सांधणारी. ६. तदा भूश्चकंपे इत्ययं भाव:—पंत. हिंवाळा. ७. सोरा, गंधक आदिकरून पदार्थांच्या प्रभावानें. ८. तोफेंतून सुटलेल्या लोखंडी गोळ्याप्रमाणें. ९. पेटलेल्या स्वाहापति अग्नीच्या ज्वाला. १०. अंधकाररूपी वृक्षाच्या कुऱ्हाडी. ११. गुप्त.

तुज रघुना    य कभजनीं, मूढा! नाहीं च भक्ति तिळमात्रा;
पात्रापात्रविचारत्यक्ता! करितोशि विफल मं[1]द्यात्रा?

तारि तुज पा    रा वारीं पिष्ट करुनि टाकितों क्षणामाजी;
पारि कार्यगौरवास्तव रक्षितसें, शक्ति हे पहा माजी.'

बोलोनि असें    म ग तो ओषधिगिरि कंदुकासमान करें
उंचलिला मारुतिनें, रघुपतिमुखवीरजीवदानकरें. ५४६

अतुळबल    श्री मारुति घेउनि ओषध्यगासि येकटका,
शंभुप्र[2]हितौषधिकरनंदीश्वरसा चि शीघ्र ये कटका. ५४७

पीयूषाच्या धा    रा तैसा तो होय अद्रिचा वारा;
ओषधिगंधभराचा, निर्झरजलबिंदुचा हि जो थारा.

ओषधिगंधें[3]    म यमरुत्स्पर्शें रामासवें प्लवंगबळें,
सुप्तोत्थितापरी तीं उठलीं, पहिल्यापरीस ही प्रबळें.

पवनसुतें    ज गतीधर नेला असता तसा चि जरि ठाया
तरि कार्या येतें, परि उतरी रामादिकांशि भेटाया. ५५०

राम म्हणे, 'का    य तुला होऊं बा! मीं जनांत उतराई?
प्राणप्रदान ही तव उपकारगिरीपुढें गमत रांई[4].' ५५१

ऐसें श्रीरघु    रा जा वदोनि भेटे स्वभक्तरत्नातें;
यत्नातें वाखाणी, गणी मनीं 'जिंकिलें सपत्नांतें[5].' ५५२

यातायातश्र    म तो रामें आलिंगुनि क्षणें हरिला;
'गिरिला स्वस्थानीं ने,' ऐसा केला निदेश त्या हरिला.

पवनमनो    ज व मारुति ठेवी त्या आद्रिला निजस्थानीं,
प्रस्थानीं[6] संस्तविला देवामीं वातपुत्र खस्थानीं. ५५४

बहु[8]योजना    य ताध्वक्रमणश्रम न प्रकंपनभवातें,

---

१. माझें येणें. २. शिवानें पाठविलेल्या ओषधि ज्याच्या हातांत आहेत असा नंदिकेश्वर. ३. मूळ पाठ–**ओषधिगंधमयमरुत्स्पर्शा घ्राणादिकें समस्त बळें.** ४. राजिका–**पंत**. ५. शत्रूंतें. ६. निघतांना. ७. गगनस्थैः–**पंत** ८. पुष्कळ योजनें लांब मार्ग चालण्याचे श्रम.

हे शक्ति व्यक्त करी क्षितिजापतिपादभक्तिविभवातें.
पुनरपि र ज नी असतां, फिरोनि आला रघूत्तमाजवळ;
जव लक्ष्मणाग्रजांसह देखत होते प्लवंगराजवळ. ५५६
सुग्रीव म्हणे, 'य त्नें लंकेचें भस्म जा करा राती[1].'
तों उल्मुकांशि[2] घेउनि जाळिति नगरी क्षपाचराराती.
तेव्हां राक्षस रा जें कुंभनिकुंभाख्य कुंभकर्णसुत
पाठविले समराला, देउनि चतुरंगिणी चमू बहुत. ५५८
वाल्यनुजानें म थिला कुंभ, निकुंभ प्रभंजनात्मभवें;
[3]नमुचि जसा सुरनाथें वधिला, कीं अंधकासुराख्य भवें.
ऐसा विजय श्री मद्रामाला प्राप्त होय त्या काळीं;
कालिंदींदीवर[4]सम जाली दशकंधराननें काळीं. ५६०
रक्षोनाथ स्व रा त्मजमकराक्षातें रणार्थ आज्ञापी;
पापी तो रामातें सोमातें दुष्टराहुसा व्यापी. ५६१
आग्नेयास्त्रें तो म ग मकराक्ष जळे सहायुध[5]ग्राम;
रामज्वलनीं राक्षस पतंग जाले करूनि संग्राम. ५६२
पौलस्त्यदेह ज न्मा इंद्रजिदाख्य प्रतापमार्तंड;
खरतरशरकिरणगणें शोषी कपिजीवनासि उद्दंड. ५६३
प्रलयसम य तो भासे, संवर्तांभोद[6]तुल्य शरधारा
हा राक्षस वर्षे, तों 'हा! राम!' म्हणे चमू निराधारा.
तों वानराधि रा जाद्विविदांगदवातपोतनीळनळ
जन लक्षावधि वधिती, ग्रीष्मीं विपिनांतरीं जसे अनळ.
रक्षःप्लवंग म क्षतविक्षत फुलले वनीं जणों पळस;
पळ सभयांला सुटला; पळसहँ[7] भू पाहतां चि ये चिर्ळस[8].
शतशः क्षत ज नदी त्या मिळती, तों होय सिंधुपति शोणें[9];

---

१. रात्रीं. २. कोलितांसि. ३. हिरण्यकशिपुभगिनी सिंहिका हिला विप्रचित्ति दानवापासून झालेल्या तेरा पुत्रांपैकीं एक. ४. यमुनेंतील नीलकमलाप्रमाणें. ५. शस्त्रसमूहासह. ६. प्रलयमेघतुल्य. ७. मांसमय. ८. विकृतिः—**पंत**. ९. तांबडा.

कोण प्राज्ञ म्हणेना, 'काळाचा रक्तपूर्ण तो द्रोण'? ५६७
मग मायाम य सीता आणुनियां रावणात्मजें कपटें,
मारुतिसमक्ष वधितां, झांकिति नेत्रांसि देवलोक पटें.[1]
'जी वैराचें बी ज, प्राज्ञ पिता मोहिला जिणें, असिला
मारुनि कलहप्रशमप्रसिद्धयश आज मीं दिलें आसिलों.[2]'
पौलस्त्यतन य ऐसा मोहुनि गेला प्लवंगसेनेला,
तें ऐकुनि राम म्हणे, 'हा माजा प्राण शत्रुनें नेला.'
सीताशोकप रा ला रामाला आणि सर्व सेनेला
पौलस्त्य[3] म्हणे, 'क्षितिजाजीव लयाला खळें नसे नेला.
हें सारें माया म य, याचें कापट्य जाणतों हो! मीं;
मोहुनि, निकुंभिळेलों[4] जाउनि बसला असेल तो होमीं.
होमांतीं दिव्य श्री स्यंदन जन्मेल भव्य कामगम;
मग मर्त्यामर्त्याला दुर्जय होईल, तो महानिगम[5]. ५७३
हें पूर्वी चतु रा नन वदला, 'हवनीं करील जो विघ्न
रावणपुत्रा! तूजे होतील प्राण जाण तन्निघ्न.[6]' ५७४
यास्तव पर म त्वरित प्रत्यूह[7] करा, तयाशि उठवा हो!
वाहोत रक्ततटिनी, सौमित्रे! चाल तूं महाबाहो!' ५७५
वाक्य असें नि ज कर्णीं पडतां वर्णी तयाशि रघुराजा;
सौमित्रिप्रभृतींतें शीघ्र म्हणे, 'त्या खळाशि वारा जा.'
तेव्हां कौसल्ये य प्रहितप्रबळप्लवंग गिरिकल्प,

---

१. देवानामपि मोहाभवदिति महाश्चर्यं इति भावः–**पंत.** २. खङ्गायेत्यर्थः–**पंत.** ३. विभीषण. ४. निकुंभिळा ही लंकेच्या पश्चिमवर्ती असलेली इंद्रजिताची अभिचारकर्मभूमि. ५. महान्निगमो मंत्रप्रयोगो यस्याऽसौ तथा–**पंत.** निगम म्ह० मंत्र; येथें निगम हा शब्द पंतांनीं 'मंत्रप्रयोग' या अर्थी योजिला आहे. मोठा आहे निगम म्ह० मंत्रप्रयोग ज्याचा तो महानिगम रथ. ६. तदधीनास्त्वत्प्राणा भविष्यंति इति सत्वां वधिष्यतीति भावः–**पंत.** निघ्न म्ह० अधीन; त्याच्या अधीन तुझे प्राण होतील अर्थात् तो तुझा वध करील. ७. विघ्न.

कल्पक्षय करितिलसे गमती, करितां चि युद्धसंकल्प.
पौलस्त्यकु[1]मा रा ध्वररक्षकरक्षःक्षयस्पृहावंत,
अंतकनिभ प्लवंगम गेले रिपुहस्तिचे महा[2]वंत. ५७८
ते गगनग म ग अगनगधर वानर वीर नीरदासारे,
वर्षति अध्वररक्षणदक्षासुरसंघमस्तकीं, सारे. ५७९
शाखामृग र ज नीचर करिती संग्राम देवदानवसे;
नवसेवकसम दुःखीं स्वस्वामिसमीप एक ही न वसे.
मांसाचे संच य किति, रक्ताचे वाहती महापूर;
शूरजनक्षय जाला, भू रजहीना, द्रुमाद्रि ही चूर. ५८१
विघ्न असा य ज नाला होतां चि उठे सचापशरधारी;
सन्नद्ध[3] युद्धबद्ध[4]श्रद्ध क्रुद्ध प्रसिद्ध विबु[5]धारी. ५८२
पूर्ण न होतां य ज्ञ क्रोधें धांवे रथी धनुर्बाणी;
[6]शर्वाणीशावर गज दैत्य तसा ये रणाशि निर्वाणीं. ५८३
चावे निजाध रा तें दांतें, हातें स्वहस्त तो चोळी;
पोळी अस्त्राग्नीनें, शर सोडी, ज्यांस तुच्छ दंभो[7]ळी.
[8]हरिजिन्निःसी म बळ प्लवगांत, जसा मृगांत शार्दूळ;
शूळप्रासगदाशरमुसळें करि पर्वतांशि निर्मूळ. ५८५
वटसरल श्री फलधवतालतमालाम्रनारिकेरांहीं
कांहीं पर्वतशिखरें, ताडुनि म्हणती कपी, 'उभा रांहीं.'
जाले वानर रा क्षस हरिजित्सौमित्रिमार्गणाग्निहुत;
क्षोणीवर कोणी भट, शोणिततटिनींत वाहती बहुत.
समरीं मत्त म तंगज, कीं दोघे व्याघ्र कीं मृगाधिपती,
कीं वृष, कीं घन, कीं ग्रह, कीं नग, कीं अंधक स्मरारती.
श्रीमद्रामानु ज निजभुजभुजगशिलीमुखैकरदविद्ध

१. इंद्रजितयज्ञाचें रक्षण करणाऱ्या राक्षसांचा नाश. २. महात. ३. सज्ज. ४. युद्धीं धृतप्रीति. ५. देवशत्रु. ६. पार्वतीपतीवर. ७. वज्र. ८. हरिजित्=इंद्रजित. ९. लक्ष्मणबाहुरूप सर्पाच्या बाणरूप एकदंतें विद्ध.

घननाद मोह पावे; पुनरपि युद्धार्थ होय तो सिद्ध. ५८९
मारुततन य बिभीषण, ताडिति बहु पंक्तिकंठतोकाला;
तो कालाकुलमति खल होउनियां विरथ जाय ओकाला[1].
पुनरपि तो रा गानें आला होऊनियां रथारूढ;
खरतरशरवरतिमिरीं करि हरिबळ दीर्घकाळ दिङ्मूढें[2].
ऐसें जालें स म र त्रिदशजनाला हि जें गमे भीम;
श्रीमत्सौमित्रीशीं इंद्रजिताशीं त्रिरात्र निःसीम. ५९२
मग रामानु ज वेगें, माहेंद्रास्त्राभिमंत्रिताग्निशिखें[3]
इंद्रजिताचें छेदी मस्तक, पातें न हालतां, विशिखें.
तेव्हां जयज य शब्दें गर्जति मुनि सिद्ध देव गंधर्व;
पर्व अपूर्व तयांला जालें; आनंद पावले सर्व. ५९४
ते दुंदुभि वा ज विती, धिमिधिमिधिमि देवलोक आनंदें;
गंधर्व कारिति तननन; तत्थैथैथैय्य अप्सरोवृंदें. ५९५
तो प्रावृट्[4]सम य गमे, पुष्पांची वृष्टि, वाजती भेरी[5];
चपळा सुरांगना त्या तन्वंगी नाचती नभीं गौरी[6]. ५९६
जाउनि रघु रा याच्या चरणीं सौमित्रि जाहला लीन;
पीनभुज प्रभु हृदयीं आलिंगी बंधुला दयाधीन. ५९७
राम म्हणे,'श्र म जाला वत्सा! तुज, नाहलासि रुधिराहीं;
द्व्यंगुळ हि स्थळ देहीं रिपुबाणांहीं न चुंबिलें नाहीं. ५९८
तुजविण जे श्री स्त्री तनु, हें सारें सर्वथा मला वमन;
सांगुनियां कुशळाला, चिंतातटिनीतटास लाव मन.' ५९९
तेव्हां रघुवी रा ला नमुनि म्हणे तो दशाननानुजनी[7],
'तुज नीरदाभदेहा[8] जय जाला धर्मशर्महेतु जनीं. ६००
रावणपुत्र म हेंद्रद्वेष्टा दुष्टाग्रणी रणीं सबळ

१. गृहाला. २. भ्रमिष्ट; दिशाभूल झालेले. ३. इंद्रास्त्राभिमंत्रित अग्निज्वाला ज्याच्या ठायीं अशा. ४. वर्षाकाळ. ५. नौबदी. ६. स्त्रिया. ७. बिभीषण:–**पंत.** ८. मेघतुल्यदेहा.

सौमित्रिनें त्रिनेत्रें अंधकसा मर्दिला प्रभो! सबळ.[1] ६०१
याच्या निजभु ज भुजगें शरदंष्ट्रें कार्मुकाननें सकळ
दंश करुनियां शत्रु क्षितिपृष्ठीं आज पाडिले विकळ.' ६०२
ऐशी स्वविज य वार्ता ऐकुनि राजा म्हणे, 'अहो! मातें
सर्वांहीं तोषविलें, करुनि शराग्नींत शत्रुहोमातें. ६०३
चिंतांबुधिती रा ला पावायाला मला तुम्हीं सेतू;
हे तुमचे बळशाली भुज भद्र असोत नित्य जयहेतु.' ६०४
राम अस स म स्त हि सत्कारुनियां, सुषेणकौशल्यें
सौमित्रिप्रमुखांचीं काढविलीं मर्मपीडकें शल्यें. ६०५
रावण तनु ज विनाशें भिजवी बाष्पोदकें सुहृद्धस्त;[2]
ध्वस्तप्रभ तो जाला गभस्तिमाली[3] जसा तमोग्रस्त. ६०६
'वत्सा! हरिह य शत्रो! महाभुजा! इंद्रनीळसंकाशा![4]
काशास तूं अकाळीं बापा! धरिलीस अन्यलोकाशा? ६०७
शस्त्रास्त्रें कंज जें[5] वर बळारिपुकीर्तींदुराहुबाहुबळ[6]
जालें कैसें, स्वप्नप्राप्तार्थ तसें चि, हें वृथा सकळ? ६०८
तुमचा संक्ष य जीस्तव, तीच्या रक्तें तुमांसि तर्पीन;
तन्मांसाचे पिंड श्राद्धीं सकळांशि आज अर्पीन.' ६०९
ऐसें वदोनि रा वण धांवे घेऊनि तीव्र तरवारी,
सीतावधोद्यताला त्यालागिं सुपार्श्व तीव्रतर वारी. ६१०
मग अप्रति म बळातें प्रेषी, त्यांशीं करूनि राम रण,
अर्पी हर्ष सुरांला, जय चापाला, निशाचरां मरण. ६११
रथ मथिले श्री रामें, एकुणतिस लक्ष, कोटि ही सात;
तेरा कोटी विंशतिसहस्र दशलक्ष गज हि विख्यात. ६१२
जे तुरगवं रा रोहध्वजिनी वधिली रघूत्तमें मोटी;

---

१. ससैन्य इत्यर्थः–**पंत**. २. मित्रांचे हात. ३. सूर्य. ४. सदृश अशा. ५. ब्रह्मदेवाचा वर. ६. इंद्रकीर्तिचंद्रास राहुरूप बाहुबल ज्याचें असा. ७. रावण-सचिव. ८. अत्यंत शीघ्रतेनें. ९. घोडेस्वारांची सेना.

ते षष्टिसहस्राधिक विंशतिलक्षोत्तर त्रिदशकोटी. ६१३
रजनीचर म थिले जे, त्यांची संख्या हि वर्णिली ऐशी,
ते एकशतक पंचेचाळीस हि कोटि लक्ष ही ऐशी. ६१४
आणिक ही र ज नीचर वीर जगच्छत्रु धीर जयवंत;
प्रभुशरवानरगिरिवरतरुनिकरें[2] फार पावले अंत. ६१५
एवं रघुना य क तो युग्ममुहूर्तांत संहरी कटकें;
लटकें कसें म्हणावें? काय न कीजेल त्या जगद्भटकें? ६१६
ऐसें ऐकुनि रा वण शोकें जाला विसंज्ञ एकघडी;
मग दीप्तवह्निकुंडप्रभ विंशतिसंख्य लोचनें उघडी. ६१७
त्यावरि शीघ्र म होदर वीर महापार्श्व आणि विरूपाक्ष
राक्षस हे पाचारुनि, करवी बळ सर्व सज्ज नखरांक्ष[3]. ६१८
साग्र[4]नियुत ज वनाश्व स्यंदन, नियुतत्रय द्विप प्रबळ,
हय षष्टिकोटि, अगणित पत्ति, असें शीघ्र सज्ज होय बळ.
मणिहेमम य स्यंदन, अष्टाश्व विमानतुल्य विस्तीर्ण,
आणविला दिक्पाळकमृगसिंह[5] अनेकशस्त्रसंकीर्ण[6]. ६२०
रथचक्रें ग ज हय भट काहळें[7] वीणा मृदंग दरभेरी
वाजति, तेव्हां जाली केवळ ते राक्षसी चमू [8]भेरी. ६२१
रावण विज य श्लाघी कनकरथीं बैसला महाकाय;
तो भासे कार्तस्वरगिरिशृंगारूढ[9] मेघ कीं काय. ६२२
त्या पंक्तिकंध रा ला जातां जाले अनेक अपशकुन;
बसले ध्वजशिखरावर येउनि तात्काळ गृध्र बक शकुन.
तों रुधिर धूं म योनी[10] वर्षे, भू कांपली, रडे भालु[11];
हा लुब्ध दुष्ट नुमजे, कालग्रस्तायु मूढ पतयालु[12]. ६२४

---

१. अशीतिर्लक्षाणि—**पंत.** २. समूहानें. ३. विंशतिनेत्रः—**पंत.** रावण. ४. संपूर्ण लक्ष. ५. अष्टदिक्पातिरूप मृगांस सिंहरूप (रावण). ६. अनेकशस्त्रयुक्त. ७. वाद्यविशेष. ८. शब्दग्रहणाक्षमा—**पंत.** ९. सुवर्णगिरीच्या शिखरावर चढलेला. १०. मेघ. ११. कोल्हीण. १२. पतनशील: म्रियमाण: इति यावत्—**पंत.**

सलिलधर[1] श्री सोदरकांतिध्वजिनीसमेत जों चाले,
जाले उल्कापात, श्वसन[2] पुढें, काक मागुनीं आले. ६२५
धूळीच्या निक रा नें पडला सर्वत्र निबिड आंधार;
कांय रजःपटलानें भूमि करी निर्जरांशि आधार? ६२६
कीं गगनस्था[3] म रजनकांतांची धूळिमय तिरस्करिणी[4];
संमर्द[5] सोसवेना, म्हणुनि पळे कीं रजोमिषें धरणी. ६२७
त्यातें रघुरा ज तदा अवलोकुनियां करीं धरी चाप;
तों पर्वतशिखरशिलातरुकर[6] ते धांवती कपिक्ष्माप[7]. ६२८
बहुतरतो य दपटलें, तैशीं दिसती बळें पलाशांचीं;
गमती प्रकंपनासम समरीं वृंदें प्रचंड कीशांचीं[8]. ६२९
जाले मिश्रित रा क्षस वानर जैसे करींद्र पंचास्य;
हास्य करी हर्षानें लास्यप्रिय काळ पसरुनीं आस्य. ६३०
एकैकातें स म रीं शत्रूतें शतशत प्लवंगपती,
अगनगरदपदमुष्टिप्रहार करुनीं वधावया जपती. ६३१
शरनाराचां ज लिकप्रासगदाखड्गशूलपरिघांतें
हातें धरूनि राक्षस ताडिति कीशांसि निष्ठुराघातें. ६३२
कपि पादद्व य धरुनि क्षितिवरि रजनीचरांशि आपटिती;
उठती जों तों दुसरे ताडिति गिरिपादपादिकें[9] झटिती. ६३३
उंचलुनी ग ज हयरथ, गरगर फिरवूनि उडविती गगनीं;
अंगनिष्पिष्ट[10] कितीक हि कदन असें करिति कपि पलाशगणीं.
निशिचर सा य कशक्तिप्रासगदाशूळखड्गनिकरानें
ताडुनि किति कपि गिरि तरु, वारुनि संचूर्ण करिति निकरानें.
शूर प्लवंग रा घिट विकट कठोर प्रचंडभुज धीट;
नीट प्रहार करुनी, शत्रूतें रगडिती, जणों कीट. ६३६

---

१. मेघशोभातुल्य कांतिसेनेसहित. २. वायु. ३. आकाशस्थ देवांगनांची. ४. (अमरटीप) 'पडदा' इति ख्यातस्य–**पंत.** ५. नाश. ६. हातीं ज्यांच्या असे. ७. कपिराजाः–**पंत.** ८. वानराणां–**पंत.** ९. पर्वतवृक्षादिकांनीं. १०. पर्वतांचें चूर्ण.

तो अतुल लो म हर्षण रण जेथें शोणितापगापूर;
राक्षस कर्पास तैसे, जैसा दीप्तानळास कापूर. ६३७
यापरि तेव्हां श्री मद्राबळें राक्षसी चमू वधिली.
विजयें सुरांसि मांसक्षतजें [1]क्रव्यादकांसि तुष्टि दिली. ६३८
युद्धीं महोद रा भिध आणि विरूपाक्षनाम हे दोघे,
मोघेप्सित [2] करुनि बळें, यांच्या प्राणांशि कीशपति [3] तो घे.
वायुसुतानें [4] म थिला वीर महापार्श्व संयुगीं [5] गोत्रें [6];
स्तोत्रें करिति सुर, तदा कोपे दशकंठ, गज जसा तोत्रें [7].
क्षणदाचर ज ननाशें रावण नानाविधायुधस्तोमें
वर्षे कपिसेनेवर, उद्गार तधीं दिला यमें* व्योमें [8]. ६४१
रघुकुलना य क सायकनिकरें रिपुशस्त्रवृष्टिला वारी,
वारिदसम बाणगणें तों तों वर्षे समस्तदेवारी. ६४२
तों तामसास्त्र [9] रा गें केलें मंदोदरीधवें प्रकट;
सिंहव्याघ्रवृकादिश्वापदमुख [10] बाण जन्मले विकट. ६४३
रघुवंशोत्त म त्यातें आग्नेयास्त्रें क्षणांत निर्दाळी;
वाळिप्राणारि रिपुध्वजिनीला प्रळयवह्निसा जाळी. ६४४
वैश्रवणानु ज तेव्हां मयरचितास्त्रासि योजिता होय;
शर शक्ति शूळ मुशळ प्रास गदा वर्षती जसें तोय. ६४५
गांधर्वास्त्रें साय क अभिमंत्रुनि सोडिले यशोधामें;
इंद्रें पविप्रहारें पर्वतसा शत्रु ताडिला रामें. ६४६
शस्त्रास्त्रांचा व्र ज मग सोडुनि दशकंधरें महापातितें

---

१. मांसाहाऱ्यांस. २. निष्फलेच्छ. ३. सुग्रीव. ४. मूळ रामायणांत 'अंगदानें' असें वर्णन आहे. त्या दृष्टीनें 'वालिसुतानें' ऐवजीं 'वायुसुतानें' असें नजरचुकीनें लिहिलें गेलें असावें. ५. युद्धीं. ६. पर्वतेन—**पंत**. ७. (अमरटीप) तोदनदंड—**पंत**. ८. काळानें आकाशरूपी मुखानें उद्गार (ढेंकर) दिला—म्हणजे मोठा कडकडाट झाला. ९. तमोग्रह (राहु) आहे देवता ज्याची असें अस्त्र. १०. इत्यादीचीं मुखें ज्यांस असें. * या ठिकाणचा खोडलेला शब्द—**नभें**.

आच्छादिलें रवीतें, विधुंतुदाचेपरी[1] धरापेतितें[2]. ६४७
सौमित्रिनें प्र य त्नें छेदुनि दशकंठचापलतिकेला
अशनिप्रभबाणानें सारथिमूर्धापहार ही केला. ६४८
मंदोदरीव रा च्या स्यंदनसंबद्धवाजिसंघातें
मारी स्वयें बिभीषण धाउनियां तेधवां गदाघातें. ६४९
कालभुजंग[3] म वज्रज्वलनज्वालांतकोपमा शक्ती
बंधुवधास्तव हस्तीं धरिली दशकंधरें महाशक्ती[4]. ६५०
तेव्हां त्वरित श्री मालक्ष्मण निःसीमवीर्यचंचु[5] कवी
रिपुला मोहुनि बाणें, मित्राला[6] शक्तिपासुनीं चुकवी. ६५१
जनरावण[7] रा वण तो सौमित्रिस त्या च शक्तिनें ताडी;
दुःखार्तदेवलोचनजलवृष्टिसह क्षमातळीं पाडी. ६५२
अशनिच्छिन्न म हीधरशिखरासम रामचंद्रबंधु पडे;
वेगें प्रभंजनाच्या समूळ जैसा महातरू उपडे. ६५३
राम जघन्य[8] ज पातें, 'हा! वत्स!' म्हणोनि पावला शोक;
याचें हि हृदय जालें भिन्न असें मानिती तदा लोक. ६५४
बंधुहृदाल य वासी राम हि शक्तीस काय सांपडला?
लक्ष्मणहृदयच्छेदें, नातरि मोहाननांत कां पडला? ६५५
शक्तीतें स्वक रा नें उद्धरितां[9] राघवाशि बाणगणीं
मर्मस्थानीं रावण ताडी, परि राम दुःख तें न गणी. ६५६
जैशी भुजंग म स्त्री वल्मीकबिळांतुनीं अहिग्राही[10]
काढी, तैशी रामें उद्धरिली शक्ति ते समग्रा ही. ६५७
सुगळप्रभं ज नात्मज सौमित्रीचें करावया त्राण

---

१. राहूप्रमाणें. २. रामातें–पंत. ३. काल, सर्प, वज्र, अग्निज्वाला व यम यांची उपमा जिला अशी. ४. मोठें बल जिचें अशी. ५. निःसीमवीर्यख्यात इति–पंत. ६. विभीषणाला. ७. लोकपीडक. ८. कनिष्ठ बंधु लक्ष्मणाच्या पतनानें. ९. ओढून काढितां. १०. गारुडी.

ठेउनि, रामें रिपुवर आ[1]शीविषतीव्र सोडिले बाण. ६५८
जीवितसंश य होतां, विरथ दशग्रीव रामशरभग्न
गेला पळोनि मार्गे चिंताभयशोकमोहसंमग्न. ६५९
मग राघुरा ज फिरोनि त्वरित चि येऊनि बंधुदेहातें
हातें शिवोनि पावे 'हा! वत्स!' असें म्हणोनि मोहातें.
अनुजविल य भीतातें रामातें तो सुषेण समजावी;
'सौमित्रिमृत्युशंका हृदयापासूनियां' म्हणे 'जावी.' ६६१
'या वायुकुमा रा चा दो[2]र्विक्रम सुखद काय वानावा?
संकटसिंधु तराया आम्हांला याचिया [3]भुजा नावा. ६६२
मारुति या स म र्थी त्या दिव्य विशल्यौषधीस आणील;
मोहतरूतें चिंतालतिकेसहवर्तमान खाणील.' ६६३
ऐसें वदतां, श्री मद्रामानें ल[4]क्ष्मणात्मशयनानें,
अवलोकिलें मुखांबुज मारुतिचें अश्रुपूर्णनयनानें. ६६४
तेव्हां रघुवी रा ला वंदूनि, उडे तनूज पवनाचा;
जाला अतिथि मुहूर्तें महौषधींच्या विलासभवनाचा. ६६५
त्यास विशल्या म ग ते, न कळे म्हणवूनि न करितां उशिर,
ओषधिगिरिस चि नेउनि ठेवी रामाचिया पदीं स्वशिर.
तव तो भेष ज वेत्ता सुषेणनामा विशल्यकरणीला
शोधी, मग तीणें त्या धर्मसुताचा स्वहस्त प[5]रिणीला. ६६७
तच्या अना[6]म य प्रद गंधाचें करवितां चि आघ्रा[7]ण,
शल्यक्षतरहिततनू लक्ष्मण जाला क्षणांत सप्राण. ६६८
रूप रघुवी रा नें लक्ष्मण आलिंगिला भुजायुगळें;
केला जयशब्द सुखें मारुतिनें अंगदें नळें सुगळें. ६६९
ओषधिवास म हीध्र स्वस्थानीं स्थापुनीं प्रभंजनजें,

---

१. आशी म्ह० दाढ तिच्यामध्यें विष आहे ज्याच्या अशा सर्पाप्रमाणें उग्र. २. बाहुपराक्रम. ३. आबंतोपीत्यर्थः। भुजाबाहाबाहौस्यात् इति त्रिकांडशेषः-**पंत**. ४ लक्ष्मणशरीरस्य शय्याभूतेन-**पंत**. ५. स्पर्शिला. ६. आरोग्यदायी अशा. ७. हुंगणें.

केलें कर्म सुदुष्कर बलवज्जनसर्वगर्वभंजन जें. ६७०
पुनरपि रा ज मणी तो युद्धाला सिद्ध होय त्या काळीं;
अन्यरथावरि बैसुनि दशकंठें दाविलीं मुखें काळीं. ६७१
तेव्हां हरिहॅ[1] य निजरथ देउनि धाडी सवेग मातलिला;
विभुहस्तें वधवाया दुष्टचमूला उदंड मातलिला. ६७२
मातलि मनु ज वरातें भेटे तत्काळ उतरुनी महितें[2];
शरशक्तिकवचयुत रथ रामें स्वीकारिला जगन्महितें. ६७३
सुरजनज य दरथावर बैसे भुवनैकवीर राजमणी;
त्रिपुरांतक शिव, किंवा तिमिरस्तोमापहारक द्युमणी.
मग समरीं रा क्षस तो सोडी सर्पास्त्र राघवावरतें;
रामें सौपर्णास्त्रें[3] निवारिलें, अन्यथा न आवरतें. ६७५
काय भुजंग म राघवकृष्णागुरुगंधलुब्ध ते आले;
व्यालेश्वरांशि पारि त्या सुपर्ण मध्यें चि भक्षिते जाले.
कनकमय श्री मद्ध्वज तोडुनियां जिष्णुच्या तुरंगांतें
पीडी खरविशिखांहीं, सिंह नखांहीं जसा कुरंगांतें. ६७७
मातलि रुधि रा र्द्रतनू भासे, रविच्या रथीं जसा अरुण;
कनकविकृतशरनिकरें[4] राम गमे अर्यमा[5] जणों तरुण. ६७८
राम अरिंद म बाणें छेदी रिपुचा क्षणांत रथकेतु;
ते तुमुळ युद्ध करिती राक्षसमनुजेंद्र नाशजयहेतु[6]. ६७९
रावण म्हणे, 'ज याची वांछा धरितोशि वानराधारें;
उडुपें सागर तरणें, त्याहुनि ही कर्म हें नरा! धारें[7]. ६८०
तूज यमक्ष[8] य वांछा जाली, म्हणवूनि धांवलास रणा;
सरणावर निज निजजनसह, जा सहजानयें शिवा[9] शरणा.
आतां तुला प रा सु क्षणांत करितों.' असें वदोनि खल

---

१. इंद्र. २. पृथ्वीवर. ३. गरुडास्त्रें. ४. सुवर्णभूषित बाणसमूहें. ५. सूर्य. ६. शत्रुनाश व स्वजय यांला कारण. ७. क्षुद्र. ८. यमगृहनिवासेच्छा. ९. कोल्ह्यांना.

सोडी शूळ, तदा प्रभु खंडी हरिशक्तिनें चि तें निखळ[1].

बाणें छेदुनि म मीं केला सिंदूरपर्वतावाणी;
तेव्हां 'जयति श्रीमान् राम' अशी जन्मली नभीं वाणी.

दशवदनें ज यकामें सोडुनि शरपंक्तिला अहीनेला[2]
शोणितवर्षिघनाच्या तुळेशि[3] [4]खरवायुचा[3] अही नेला. ६८४

जाले सुर भ य परवश, उत्पात हि फार पावले जनन;
जन न करी जयनिश्चय, म्हणती 'भासे भविष्य आज न न.'

राम म्हणे, 'तुज असतें बळ, जरि मजसीं करावयास रण,
तरि जनकसुताहरणीं धरिताशि किमर्थ तस्कराचरण?

तुज निःसंश य काळें विलोकिलें, म्हणुनि मूढ जालास;
ज्याला समीप यम ये, तो मानी सत्य इंद्रजालास[5].'

ऐसें वदोनि रा घव तीव्रशरांचा क्षणें करूनि पट[6],
पापादर्शनकामें[7] झांकी जाणों स्वशत्रुला निपट. ६८८

वानर हि द्रु म शिखरें आच्छादिति यक्षपत्यवरजाला;
जालावृत[8] मत्स्य जसा, तैसा दशकंठ भासता जाला.

मूर्छित नष्ट श्री तो सारथिनें राक्षसेंद्र पळवीला;
प्लवगबळें सिंहरवें जय कैलासीं शिवाशि कळवीला. ६९०

संज्ञा[9] पावुनि रा गें रावण निंदी स्वकीयसारथिला;
त्याणें 'मूर्छितरथिला रक्षावें' हा स्वधर्म संकथिला. ६९१

पुनरपि स म राकांक्षी रावण येतां, अगस्त्यमुनि सदय
रघुनाथाला शिकवी येउनि, जयकारि भानुचें हृदय[10]. ६९२

रविहृदय ज प नृपाळें त्रिवार केला धरूनि विश्वास;
'शत्रुं जहि राम[11]!' असें वदोनि दे हर्ष सूर्य विश्वास. ६९३

---

१. निखिलमिति—**पंत**. २. गुर्वी—**पंत**. ३. मूळ पाठ—**समते रिपुवायुचा**. ४. खरराक्षसरूपी वायूचा. ५. मिथ्याभासास. ६. पडदा. ७. दुष्ट रावणाचें दर्शन न व्हावें म्हणून. ८. जाळ्यांत सांपडलेला. ९. शुद्धि, सावधता. १०. आदित्य-हृदयनामक स्तोत्र. ११. हे राम! शत्रूला जिंक.

मग रघुना य करावण हे द्वैरथयुद्ध[1] तेधवां करिती;
शस्त्रास्त्रांच्या निकरें द्यावाभूम्यंतराशि[2] ही भरिती. ६९४

केलीं राक्षस रा जें, परि रामाशीं न चालिलीं कपटें;
होइल निबद्ध कैसा प्रज्वलितज्वाल वह्नि नैकपटें[3]? ६९५

रामपराक्र म पावकदग्धाखिलराक्षसाटवीमाजी
उठतां क्षणीं कबंधें, गमती तीं स्थाणुची[4] जणों राजी. ६९६

युद्धीं रघुरा ज करें सार्थक जालें म्हणोनि काय सुखें
नाचति रणीं कबंधें, हांसति विच्छिन्नकंठनाळमुखें. ६९७

रथसूतह य विवर्जित विरथ पदाति क्षपाचराधिपती,
द्विप तीव्रहारिनखक्षत, कीं प्रभुसूर्यें तदीक्षणें दिपती. ६९८

खरविशिखें ज गदीशें रामें जें छेदिलें दशास्यशिर,
तें तें जालें प्रकट ब्रह्मवरानें न लावितां उशिर. ६९९

दशमूर्धतो य जें तीं, शतवार च्छेदितां नृपें निकरें;
दशमुख पद नमुनि जणों 'पुरे' असा प्रार्थिला शिरोनिकरें[5].

मग तो रघु रा ज बळी संहारायाशि निर्जरद्वेषी,
ब्रह्मास्त्रें अभिमंत्रुनि अगस्तिदत्ताशुगाप्रति[6] प्रेषी. ७०१

तो शर पर म प्रखर ज्वलनाशनिदीप्ति[7] काय यमदंड?
अंडजपतिपवनगती[8] धांवे रिपुला करावया दंड. ७०२

तो सुविचित्र[9] श्री शर जाला दशकंठहृच्छिलैकघन[10];
रामयशःक्षीरधिविधु[11] सुरसंघमनोमयूरहर्षघन[12]. ७०३

रघुवीरश रा घातें भिन्नहृदय तो पडे गतप्राण;
रिपुजीवनधन घेउनि, पुनरपि तूणीं[13] प्रवेशला बाण.

---

१. दोन रथानीं प्रवर्तित अथवा दोन रथांचें. २. स्वर्गपृथ्वीचे अंतरास. ३. अनेक वस्त्रानीं. ४. जळलेल्या वृक्षांचीं खोडें त्यांची. ५. मस्तकसमूहें. ६. मागें ६९२ गीति पहा. ७. अग्निवज्रकांति. ८. गरुडवायुगती. ९. विलक्षण तेजस्वी. १०. रावणहृदयरूप शिलेस घणासारखा. ११. रामकीर्ति समुद्रास चंद्ररूप. १२. देवसमूहाच्या मनोरूपी मयूरास हर्षरूपी मेघ. १३. भात्यांत.

विगतप्राण म हासुर पडतां सवनाकरा[1] धरा सारी<br>
कांपे चळवळ, नसतां नाविक अनळें जळीं तरीसारी. ७०५

रावणतनु ज गतीवर, रामावर देवपुष्पवृष्टि गळे;<br>
बाष्पें निशाचरांचे अमरांचे जाहले निरुद्ध गळे. ७०६

'रघुनाथो ज य ति' असें गर्जति सुर सिद्ध, हर्षले सर्व;<br>
दुंदुभि वाजति, नाचति वराप्सरा, कीर्ति गाति गंधर्व.

राक्षसतिमि रा पहरघुराजयशश्चंद्रचंद्रिकाजालें[2]<br>
तापविवर्जित भुवन, प्रकटसुधापूर्णकुंभसें जालें. ७०८

सुप्रभ दिन म णि जाला, अतिशीतळ मंद गंधवह वाहे;<br>
त्या पर्वीं ब्रह्मांड प्रभुकीर्तिक्षीरसागरीं नाहे. ७०९

सर्व कपि प्रां[3] ज लि ते स्तविती रामास शर्मधामास;<br>
गाती नाचति भेटति शत्रुविरामास पूर्णकामास. ७१०

तेव्हां सविन य वंदी बिभीषण प्रेमपूर्ण देवास;<br>
उठउनि निजभक्तातें भुजांतरीं रामचंद्र दे वास. ७११

त्याला रघुरा ज म्हणे, 'स्वबंधुच्या पारलौकिका[4]शि करीं;<br>
क्षाळीं विवेकनीरें, स्वाशांचा शोककर्दम स्वकरीं.  ७१२

करणें क्रिया य थोक्त, त्वद्बंधु जसा तसा च हो माजा;<br>
मरणान्त मात्र वैर, क्षिप्र ज्वलनीं तयासि होमा जा.

दशमुखदा रा सकळा जाल्या वैधव्यपावकें विकळा;<br>
कर त्यांचें सांत्वन हो! शिव! शिव! त्यांला हि मरणकाम न हो.

रविवंशोत्त म वाक्यें जाउनि तो बंधुतें परेतातें[5]<br>
आलिंगूनि म्हणे, 'हा! केले सुरकाम तां पुरे तातें. ७१५

तव हृदय श्री कंठीं, 'शिव शिव' म्हणशी सदैव तूं वदनें;<br>
म्हणुनि जणों तुज वधिलें, शिवदग्धें अन्यदुःसहें मदनें.

कीं राज्यमदें रा जा! शिवाशि विसरूनि सेविला काम;

---

१. अरण्यें आणि खाणी यांसहित. २. चांदण्याच्या जालानें. ३. हात जोडलेले.
४. उत्तरक्रियेतें. ५. मृतातें.

या अन्यायें क्षोभ स्मरारिपुचा जाहला महोद्दाम. ७१७
वसुधासुरा म रांशीं केला तूं द्रोह, पीडिला धर्म;
कर्म अमंगळ करितां [1]भूतारिपू कोण पावला शर्म? ७१८
पापाचारें नि ज जन नरवानरहस्तकें चि मारविला;
[2]मारविलासतमानें गिळिलें तुज राक्षसोत्तमा! रविला.’
यापरि सद य स्वांतें विलाप केले बिभीषणें, तंव ती
युवती दशाननाची धांवत आली वियोगशोकवती. ७२०
दशमुखदा रा पतिला आलिंगिति शोकतापधृतकंपा;
प्रावृट्काळीं गगनीं जयापरी धूम[3]योनिला शं[4]पा. ७२१
शोकग्रस्त प्र म दा, ‘हा नाथ!’ असें म्हणोनि त्या रडती,
[5]उररीकृतशोकभरा [6]कुररीसम एकदा चि आरडती. ७२२
म्हणती, ‘कां नि ज लाशि क्षितिवरि? उठ, ये [7]स्वकेलिशयनातें;
सप्रेम एकदा तरि पाहें, उघडूनि रम्य नयनातें. ७२३
हे महिषि म य कन्या राज्ञी मंदोदरी स्वयें आली;
आलिंगुनि तुज देवा! समजावितसे तुजी प्रिया आली.’
तव पदभ ज नावांचुनि, नेणों आणीक हे तुझी आण;
प्राणपते! हें वदतों, मिथ्या कीं सत्य तें मनीं आण.
अपराध का य जाला? रुसवा केला दयानिधे! कां जी!?
अमृतप्राशन करउनि पाजावी काय सेवटीं कांजी? ७२६
सेवक अम रा दि तुजे, कांचनमय दुर्ग मुदि[8]तजनवर्ग,
भर्ग प्रसन्न जाला, अधिक तुला काय भासला स्वर्ग?
त्याच्या करीं स म र्पण करणें, जो पुत्रतुल्य रक्षील;
आम्हांशि शोकहस्तीं दिधलें, हा या क्षणीं च भक्षील.’

---

१. प्राणिद्रोही. २. कामक्रीडारूपी राहूनें. ३. धूम आहे योनि (उत्पत्तिस्थान) ज्याची तो मेघ असा शब्दार्थ. ४. वीज. ५. अंगीकृत शोकभर ज्यांनीं अशा. ६. कुररीनामक पक्षिणीसारख्या. ७. सखी–**पंत.** ८. आनंदित आहेत लोक ज्याच्या ठायीं असे. खोडलेला पाठ–**मुदितपुरवर्ग.**

ऐशा विगत **श्री** त्या विकळस्वांता द्विषन्निहतकांता[1]
कांता दशाननाच्या करिती तेव्हां अनेक आक्रांता. ७२९
त्या पंक्तिकंध **रा** ला संस्कार बिभीषणें स्वयें केला,
समजाउनि पाठविले, ते सारे बंधुदार[2] लंकेला. ७३०
भक्तसुरद्रु **म** राघव अंबरमणिवंशपुंडरीकरवी[3]
लंकाख्य पारितोषिक दे पौलस्त्याशि लक्ष्मणाकरवी. ७३१
जनकसुता **ज** गतीवर मनुजेंद्राज्ञप्त[4] वायुपुत्रघन
उठवी रोमांचांकुर जयवागमृतें[5] हरूनि ताप घनें[6]. ७३२
दशकंठक्ष **य** वार्ता ऐकुनि सीता म्हणे, ‘मरुत्पोता!
दावीं आतां राजा मजला, चिंतामहासरित्पोता[7]!’ ७३३
हा काम समी **रा** त्मज सांगे, तेव्हां दयाळु दाशरथी
‘जा, आण जानकीला’ ऐसें स्वमुखें बिभीषणाशि कथी.
प्रभुवचनें **म** ग त्याणें स्नाता धृतभूषणा जगन्महिता,
बैसउनीं नरयानीं अतिहर्षें आणिली, धरादुहिता. ७३५
कौसल्यातनु **ज** म्हणे, ‘सीते! दशकंठ पावला निधन,
जो तस्कर लंकेला आला माझें बळें हरूनि धन. ७३६
अपवादाल **य** जो जन, त्याला लोकांत भेटती न शिवें[9];
वसलीसि परगृहीं तूं म्हणउनि तुज सर्वथैव मीं न शिवें.
निंदेसह तु **ज** ला मीं वरितां दोघांस ही नसे शर्म;
मर्मच्छेदक जनवाग्बाण निवारावया नसे वर्म[10].’ ३७८
यापरि अप्रि **य** वदतां, आलें दुःखाब्धिनीर नेत्रांस;
गात्रांस कंप सुटला, सीता बहु पावली मनें त्रास. ७३९
अघशंका वा **रा** या प्रत्यय उपजावया, विशुद्ध सती,
शपथपुरःसर दीप्तज्वलनज्वालांत जाहली घसती[11]. ७४०

---

१. शत्रूनीं मारिला पति ज्यांचा अशा. २. भावजयी. ३. सूर्यवंशकमलविकासक सूर्य. ४. रामानें आज्ञापिलेला. ५. जयवाणीरूप अमृतें. ६. मोठा. ७. चितानदींतील नौकाच अशामारुते! ८. पालखींत. ९. कल्याणें. १०. कवच. ११. निर्भय प्रवेश करणारी.

जाणों विरह म याग्नि क्षितितनयेला असह्य तो जाळी;
तापें ताप हरावा, म्हणउनि अनळीं प्रवेशती जाली. ७४१
हेमांबुजिनी[1] श्री मत्सरस्वतीच्या हृदीं तसी साजे;
ज्वलनाधिदेवता कीं, त्रिलोकपूज्यी[2] जगन्निवासा[3] जे. ७४२
कीं स्वच्छपद्म[4] रा गग्रावविरचितालवाल हेमलता
माणिक्यदर्पणांतःस्वःस्त्रीप्रतिबिंब[5] हें म्हणो भलता. ७४३
धृतमूर्ति तो म रुत्सख[6] सीता आणूनि राघवाशि म्हणे,
‘क्षितिजास्पर्शें जालों विशुद्ध मीं, हीस घे नृपाळमणे!’
हरशक्रांबु[7] ज जन्मप्रभृतित्रिदशर्षिदेवगंधर्व
म्हणती, ‘रामा! सीता निर्दोषा सत्य बोलतों सर्व. ७४५
तुजला प्रत्य य दिधला, स्त्रीचा स्वीकार निर्विशंक करीं;
हे श्री, तूं पुरुषोत्तम, धर आतां जानकी विपंक[8] करीं.’
देवर्षिप्रव रा ज्ञा रामें स्वीकारिली वधूसहित;
तों दशरथ ही आला, स्नेहें सांगावया सुतास हित. ७४७
उतरोनियां म हीवर दशरथ धरि नंदनाशि हृत्संगीं[9];
हुंगूनि उत्तमांगीं, स्थापि प्रेमाश्रुमार्जितोत्संगीं[10]. ७४८
श्वशुरपदीं ज नकसुता नमन करी, जेवि कश्यपास रमा,
आशीर्वादें तीतें नृपनाथें तुष्टि अर्पिली परमा. ७४९
दुसरा तन य सविनय प्रणमन करि तातपादजळजातें;
माथां क्षाळूनि जटा, आर्द्र करी दिग्रथाश्रुजळ ज्यातें. ७५०
नृपति म्हणे, ज ळजाक्षा! वत्सा! सीता सती सुनिष्पंका
लंकानाथारातें! पापाची तूं धरूं नको शंका. ७५१
जनकनृप[11] य जनजनना जननाथा! हे पतिव्रता धन्या

१. सुवर्णकमलिनी. २. खोडलेला पाठ—त्रिजगत्पूज्या. ३. जगताचें आश्रयस्थान अशी. ४. शुद्ध माणिकरूप दगडाचें केलें आहे आळें जीस अशी. ५. देवस्त्री. ६. वायुमित्र अग्नि. ७. शिव, इंद्र, ब्रह्मदेवादि, देवर्षि, देव आणि गंधर्व. ८. निष्कलंक. ९. हृदयाजवळ. १०. प्रेमाश्रूंनीं ओल्या झालेल्या मांडीवर. ११. जनकयज्ञोत्पन्ना.

जाली प्राप्त तुला, जशि हरिला पूर्वीं पयोधिची कन्या[1].
हे मानसंचा[2] रा ची वाङ्मुक्तांची सदैव रसिका[3] कीं,
नृपहंसा! तव हंसी; न धरी मन पंकभक्षित्या काकीं.
क्षितिकन्येस, म हीस; श्रीमदयोध्येस, कुळगुरूक्तीस,
पाळीं ज्ञातिस सर्व, प्रजेस, निजधर्मविप्रभक्तीस. ७५४
आस्थिरता जे श्री ची, ती तूझ्या शत्रुजीवनीं राहो;
संतत कल्याण असो, विपक्षलोकप्रतापरविराहो! ७५५
जे सोदरपौ रा सप्रधानजननीवसिष्ठमुख रामा!
यांला प्राणासम तूं मानावें, सद्गुणद्रुमारामा[4]!' ७५६
ऐसें स्वहित म नःप्रिय ऐकुनि, सीतापती करी मान्य;
मग सकळांशि विचारुनि, गेला स्वर्गासि तो जगन्मान्य.
ऋक्षप्लवंग ज न जो मृत, तो रामप्रियार्थ [5]देवेशें
ऊठवितां, पूर्वस्थिति नेणुनि, गर्जे रणस्पृहावेशें[6]. ७५८
सुरजन ज य जयशब्दें गर्जति, वाद्यें अनेक वाजविती;
पुष्पांहीं[7] वर्षतुसि, चपळांसि वराप्सरा हि, लाजविती. ७५९
सांद्रानंदभ रा नें[8] तेव्हां प्लवगेंद्रसंघ ते लवले;
लवं[9] लेखर्षिस्वांतीं[10] दुःख नसे, तापदीप मालवले. ७६०
गर्गादिक अ म र सुखें स्वर्गा गेले पुसोनि रामाला;
रघुपतिगुणमुक्तांची शोभे सर्वांचिया गळां माला. ७६१
मातलिला वि ज योत्तर पूजुनि नाकाशि पाठवी राम;
तामरसं[11]प्रभवाला जैसा हर तो पुरत्रयविराम. ७६२
तो दशकंठ[12] य वीयान् प्रार्थी पूजावयास रामातें;

१. समुद्रकन्या लक्ष्मी. २. मानससरोवरीं फिरणाऱ्याची. ३. अनुरागिणी, प्रीतिकरा. ४. सुगुणवृक्षाच्या उपवना! ५. इंद्रें. ६. युद्धेच्छेच्या आवेशानें. ७. मूळ पाठ—**सुमवर्षें.** ८. अतिहर्षाच्या भरानें. ९. किंचित्. १०. देवर्षींच्या मनांत. ११. तामरस=कमल. ब्रह्मदेवाला. (त्रिपुरनाशसमयीं ब्रह्मदेव शंकराचा सारथि झाल्याची कथा येथें अनुसंधेय आहे). १२. बिभीषण.

त्यास म्हणे प्रभु, 'पूजन भरताविण नेष्ट वा[1]सरा ! मातें.
कपिसैन्यपू ज नानें पूजित मीं, यांत अन्यथा नाहीं;
तूं जयधन बहु दिधलें, आतां इच्छा मनीं नसे कांहीं.
कैकेयीतन य मला चिंतितसे जीवनाद्युदासीन;
वल्की जटी फलाशी भूशायी दर्भसंस्त[2]रासीन. ७६५
मच्चिंतैकप रा तें जातों भेटावयाशि भरतातें;
आज्ञा केली त्याचा, उतराया, भूं[3]रि शोकभर तातें.' ७६६
हें रघुसत्त म वदतां, बिभीषणें सर्व पूजिलीं कटकें;
दिधलीं हा[4]टकमणिमयसत्पदकें हार कुंडलें कटकें. ७६७
तदुपरि तो श्री दा[5]चें पुष्पकयान क्षमासुतेशाला
अर्पुनि म्हणे, बिभीषण, 'याणें जावें स्वकीयदेशाला.'
तेव्हां यानव रा वर सानुज सस्त्रीक रामभद्र चढे;
स[6]तडिन्मेघाधिष्ठितरत्नाचळमौळिसीं च साम्य घडे. ७६९
राज्याभिषेक म[7] हसुखकाम प्लवगेंद्रराक्षसाधिप ते
म्हणती, 'आम्हांस हि ने साकेताला समस्तलोकपते!'
मग राजरा[8] ज यानीं, त्यांस हि कटकासमेत पूजुनि घे;
परमोत्सवें सवेग, श्रीमत्सीतेसवें नरेंद्र निघे. ७७१
'वीर्यें देवाल[9] य जो हरिला होता दशाननें पहिला,
महिला सोडुनि जातो,' तो म्हणती प्राकृतांचिया महिला. ७७२
सीतेशि म्हणे रा घव, 'रिपुकटकें या रणांगणीं शमलीं;
सुमुखि ! मदीयशरानळवदनीं सारीं पतंगशीं भमलीं. ७७३
शतयोजन मे[10] करालय मारुति तुज शोधितां स्वयें तरला;
तर लाधलों तुला मीं, होती मद्बुद्धि जीवनीं तरलो[11]. ७७४

---

१. वत्सा ! २. दर्भासनस्थ. ३. बहुत. ४. सुवर्ण. ५. कुबेराचें. ६. विजेसहित मेघानें अधिष्ठिलेल्या मेघशिखराशीं. ७. (अमरटीप) उत्सवः—**पंत.** ८. यक्षराज कुबेराच्या विमानांत. ९. स्वर्ग. १०. समुद्र. ११. मरणकामोऽहं तदाभवमितिभावः —**पंत.** चंचला.

बाष्पजळें भि ज ली क्षिति, येथें माझ्या सरोजपत्राक्षी!
सौमित्रि कीं मदात्मा, याहुनि दुःखाशि त्या नसे साक्षी.
सांपडला तो य धिच्या तीरीं मजला बिभीषणाख्य मणी;
मत्पूर्वजकृत सागर या स्थानीं भेटला मला रमणी! ७७६
हे सुगळरा ज धानी किष्किंधा, या स्थळीं असे तारा;
वालिवियुक्ता सुभगा, चंद्रवियोगाकुळा जसी तारा.' ७७७
तेंव्हां स्वहृद य पतिला स्वानंदें जानकी म्हणे वाटे,[1]
'न्याव्या ताराप्रमुखा वानरकांता पुरीस हें वाटे.' ७७८
रामें प्लवंग रा जा धाडुनियां सर्व वानरप्रमदा
आणविल्या तारेसह यानीं सीतास्वचित्तविश्रमदा.[2] ७७९
त्या खांस कुसु म यानीं, स्थापुनि जातां नभःपथें सकल
योजनसमुच्च पर्वत, केवळ दूरूनि भासती सकलें.[3] ७८०
त्वरिततर श्री दाचें विमान जेंव्हां नभःपथें चाले,
तेंव्हां दिसती प्रभुला सामोरे वृक्ष भूध्र[4] कीं आले. ७८१
कांतेशि म्हणे रा घव, 'हा दिसतो ऋष्यमूकनाम नग;
येथें मजला तूझे सुग्रीवें अर्पिले स्वकीय नग. ७८२
वाल्यनुजाचें म स्तक, येथें राज्याभिषेकनीरानें,
मेघें गिरिशिखर तसें, भीजविलें या तुझ्या चि दीरानें. ७८३
हे पंपा पुण्य ज ळा येथें तुजला स्मरोनि मीं रडलों;
सौमित्र्यंकावरता[5] मुहूर्तपर्यंत कश्मलें पडलों. ७८४
निशिचरना य क जेथें आला होऊनि दंभसंन्यासी;
तुज नेऊनि मज दिधलें दुःख, जनीं जें असह्य अन्यासी.
ज्या स्थानीं रुचि रा क्षी! तूं चि उभी हें मनांत माज्या ये,
आलिंगिले लताद्रुम, विद्रुमबिंबप्रभाधरे![6] जाये! ७८६
दिसतो आश्र म तो हा, जेथें तुज शोधितां सये! जाये!

१. वाटेंत. २. सीतेच्या व आपल्या चित्तास आराम देणाऱ्या. ३. अन्य पाठ—शकल. ४. पर्वत. ५. मूर्च्छेनें. ६. पोंवळें, तोंडलें यांच्यासारखी अधरकांति जिची.

शतवार सानुजें म्यां, केलें गोदावरीस ये जा ये. ७८७

वाढविले निज हस्तें, जे तूं सुत[1]निर्विशेष भूपुत्री!
ते हे उटज[2]स्थानीं, मृग शुक शिखि हंस सारिका पत्री[3]. ७८८

पंकजदलाय ताक्षि! स्वकरें तूं शिंपिलीस जी लवली[4],
ती ही फळभारानें, भाग्यानें सज्जनापरी लवली. ७८९

जे त्वां द्विजराजमुखि[5]! स्वकरें पूजार्थ लाविली तुळशी;
तत्सेवनें मदंकीं सांबुदविद्युल्लतेसवें तुळशी. ७९०

आवालवल[6]य निर्मुनि जे चूताजवळ[7] लाविली जाती[8]
पुष्पवती ते त्यातें, आलिंगाया स्वयें पहा! जाती. ७९१

निर्भीक हे धरासुर करिती विविधक्रिया अनादि सती!
मुदितस्वांतें शांतें, कांते! हीं श्वापदादिकें दिसती. ७९२

वंद्यावें गौतममुनिकीर्तिस गोदावरीस भावानें,
तरलों विपत्समुद्रीं, जीच्या तटसेवनप्रभावानें. ७९३

शशिजलज[9]श्रीजितमुखि! तो हा नग चित्रकूट, जेथ मला
येउनि अर्पित होता भरत प्रार्थूनि मेदिनीकमळा[10]. ७९४

हीरकशिख[11]रा भदति! त्वत्स्मित[12]रुचिपुंजशुद्धतोयवहा
त्वदलका[13]निभयमुनेशीं संयुक्ता जाह्नवी पहा भवहा[14]. ७९५

या क्षितिवरि मत्पूर्वें भगीरथें आणिली महानाव
यास्तव हीचें लोकीं, प्रसिद्ध 'भागीरथी' असें नांव.

हे मम पूर्वजदत्ता, मौक्तिकमाळा चि होय पृथिवीची;
हीच्या अघगिर्यशनी[15] शोभति कुंदेंदु[16]कांति पृथु[17] वीचीं[18].

---

१. पुत्रतुल्य. २. पर्णशाळेंत. ३. पक्षी. ४. लताविशेष. ५. चंद्राननें! ६. आळें. ७. आंब्याजवळ. ८. जाई. ९. चंद्र आणि कमल यांची शोभा जिंकली मुखें जिच्या. १०. राज्यलक्ष्मी. ११. हिरकणीसारखे दंत जिचे. १२. तुझ्या हास्यकांतितुल्य निर्मल उदकें वाहणारी अशी. १३. तुझ्या केशतुल्य यमुनेशीं. १४. संसारभयनाशिनी. १५. पापरूपी पर्वताचें भक्षण करणाऱ्या. १६. कुंद व चंद्र यांप्रमाणें कांति असलेल्या. १७. मोठ्या. १८. लाटा.

सुंदरि! गंगा य मुनासंगम हा हर्ष देतसे थोर,<br>
मिश्रित[1]मुक्तामरकतमणिमयहारद्वयप्रभाचोर. ७९८

कर जोडुनि रा ज्ञि! करीं प्रणति, त्रिजगद्भवाब्धिनौकेला,<br>
हीणें कपिलें[2]हताखिलसगरसुतोद्धार तत्क्षणीं केला. ७९९

भारद्वाजाश्र म हा, जावूं त्याच्या नमूनि पायास,<br>
आम्हां तिघांसि पाहुनि पूर्वीं आली महाकृपा यास.' ८००

ऐसें वदतां, ज गती[3] पावे संयोग पुष्पयानासीं,<br>
मग रामशिरोंबुज हीं मुनिपादांसीं दयानिधानासीं.८०१

पवनतन य मग रामें भरतातें स्वागमाशि कळवाया<br>
पाठविला दूत पुढें, लोकांचा सर्व शोक पळवाया. ८०२

तो पवनात्म ज मार्गीं सांगोनि गुहा[4]शि 'राम आला' हें,<br>
नंदिग्रामीं गेला, मनुजाकृतिला धरूनि लवलाहें. ८०३

मणिहेमम य श्रीमद्रघुनंदनपादुकार्चनाधीन,<br>
मीन जळाविण तैसा, मारुतिनें भरत देखिला दीन.८०४

'आला राघव रा जा, तापापह मेघ तो जसा मोरा,<br>
तत्सेवालाभरता भरता! ये त्यास आज सामोरा.' ८०५

ऐसें अमृत म योक्त श्रवणीं पडतां, प्रभंजनात्मज[5]नीं<br>
भरतासि भासला तो विग्रहधारी महाप्रमोद[6] जनीं. ८०६

आलिंगुनियां श्री मन्मारुतिला कांचनासनीं अर्ची,<br>
प्रार्थुनि म्हणे, 'कृपाळा! मालिविली शोकवह्निची अर्ची.

मद्दुःखसाग रा चा अगस्त्य तूं, काय बा! तुझें नाव?<br>
चिंतानदींत बुडतां, दैवें कोठूनि धांवली नाव? ८०८

रामचरित्र म यामृत पाजावें त्वां महातृषाक्रांता,

---

१. मिश्रित मोत्यें व पाचू यांच्या दोन हारांची शोभा हरण करणारा. २. कपिलानें मारलेल्या सर्व सगरपुत्रांचा उद्धार. ३. विमान खालीं उतरलें. ४. या किरातानें वनवासारंभीं रामादिकाना नावेंतून भागीरथीपार नेलें होतें. ५. मारुति. ६. मूर्तिमान् अत्यानंद.

बाळाला स्तन्य[1] जसें देत्ये माता कृपाकुळस्वांता.' ८०९
मारुति म्हणे, 'ज सा तूं घेउनियां पादुकांशि आलास;
तैसा चि विरह रामें समर्पिला चित्रकूटशैलास. ८१०
मग रघुना य कवासें शोभे गोदावरी सपंचवटी;
चवदा सहस्र राक्षस, तेथ मुहूर्तांतरीं प्रभू निर्वटी[2]. ८११
तों रावणचो रा नें नेली सीता हरूनि लंकेला;
तच्छोकाकुळरामें विलापसह शोध काननीं केला. ८१२
पंपेसमीप म जला केलें निजपादपंकजीं भृंग;
मग ऋष्यमूकगोत्रीं सुग्रीवें राम पावला संग. ८१३
शाखामृगरा ज बळी वाळी मारूनि, सर्व तद्राज्य
सुग्रीवाला देउनि, कपिसैन्यें तेथ आणिलीं प्राज्य. ८१४
शोधावयास य लें कपि पाठविले सतोस त्यांमाजी;
यात्रा[3] सफळा जाली, प्रभुप्रसादेंकरूनियां माजी. ८१५
मग शतयो ज न जलनिधि दुस्तर म्हणवूनि निर्मिला सेतु;
प्रस्तर[4] तरले उदकीं, येथें रामप्रताप तद्धेतु. ८१६
राक्षससंक्ष य केला, बिभीषणाला समर्पिली लंका;
विजयी राघव आला, घेउनि सीतासती गतकलंका. ८१७
सुग्रीव वान रा धिप राक्षसराजा बिभीषण ख्यात;
आले प्लवग निशाचर तुजला भेटावया असंख्यात. ८१८
मीं रघुसत्त म पदरज आज्ञेसह मस्तकीं धरायाचा;
नामेंकरूनि हनुमान् मारुतसुत दूत रामरायाचा.' ८१९
हें ऐकुनियां श्री मद्भरत त्वरित प्रमोदपूर्णमना,
पौरप्रधान माता घेउनि करि राघवाकडे गमना. ८२०
विश्वंभरासु[5] रा ची आज्ञा घेऊनि राम ही वाटे
भेटुनि गुहाशि येतां अमृतस्नाता तसी मही वाटे. ८२१
रामसमाग म समयीं भरत प्रेमेंकरूनियां नाचे;

१. दुग्ध. २. नष्ट करी. ३. गमन. ४. दगड. ५. ब्राह्मणाची.

त्वरित हि येतां भावीं[1], मंद चि ते वेग पुष्पयानाचे. ८२२
शिखि[2]चातक  ज लदातें विलोकिती ते तसे चि रामातें;
ठाकति बाहु उभारुनि आलिंगायाशि शर्मधामातें. ८२३
‘आबा[3]ळप्रव  य स्कप्रजाप्रमोदाश्रुसिक्तभूवरता
जळसेकें[4] करा ’ ऐसें सांगावें लागलें नसे भरता. ८२४
वाद्यांच्या प्रक रा नें मागधबंदिस्तुतिस्वनें[5] कांहीं
ब्रह्मांड रिक्त होतें, तें भरिलें सर्व देवलोकांहीं. ८२५
भ्रमर कुसु  म गण वर्षति, तननन करिती समस्त गंधर्व;
सर्वत्रांला जालें आनंदाचें चि तें महापर्व. ८२६
उतरुनियां  ज गतीवर पुष्पक, रामें सबाष्प भरतातें
आघ्राणें[6] करुनि माथां, हृदयीं धरिलें सुतासि कीं तातें.
रघुरमण  य थायोग्य, प्रधानगुरुमातृपौरसद्विप्र
सप्रेम तोषउनियां नंदिग्रामाशि जाय तो क्षिप्र. ८२८
मग राजरौं  ज संनिधि पुष्पक धाडूनियां, अनंतर तें
भरतादिजटाधारण दुःखासह वारिलें अनंतरतें. ८२९
स्नानाउपरि  य थारु चि सर्वांला अर्पिले अळंकार;
आपण ही स्वीकारें केला त्या भूषणांशि सत्कार[9]. ८३०
कौसल्येनें सा रा वानरकांताजन प्रमोदानें
स्नानोत्तर भूषविला नानालंकारसत्क्रियादानें. ८३१
मग साकेता  म ध्यें प्रवेशला जेंवि हर्ष लोकमनीं;
कमनीयरूपपानें कोणी ही पौर तृप्तिला न मनीं. ८३२

---

१. मानी, समजे. २. मोर व चातक पक्षी. ३. आबालवृद्ध प्रजांच्या आनंदाश्रूनीं भिजलेल्या भूमीवर. ४. शेक=शिंपडणें. ५. स्वन=शब्द. ६. वास घेणें. (हें प्रेमातिशयद्योतक आहे). ७. मागें गीति ७७१ पहा. ८. असंख्या रसा निरता यस्मिन् रामे स तथा सर्वप्राणिमनोरंजन इत्यर्थः–**पंत**. ९. रामस्य भूषणधारणं तत्सार्थक्याय नत्वात्मशोभार्थं इति भावः–**पंत**. रामानें भूषणधारण हें भूषणसार्थक्यार्थ समजावें; आत्मशोभार्थ नव्हे, असा भाव.

शुभसदनीं श्री रामें सुग्रीव बिभीषण प्रमोदानें
संस्थापिले यथोचित[1]दानधुरीणें दयापयोदानें. ८३३

आपण मग रा ज गृहीं शिरला देहांत जेवि चैतन्य;
धन्य जनाला केलें, साकेत दिसे क्षणांतरीं अन्य. ८३४

त्यावरि उत्त म समयीं, भरत वसिष्ठ प्रधान सप्रकृती[2],
राज्याभिषेककामें, प्रार्थिति रामासि पौर विप्र कृती[3].८३५

कपिजन रा ज निदेशें, शतपंचक सिंधुनीरसंपूर्ण,
ऋक्षेश[4] वेगदर्शी, पवनात्मज कुंभ आणिती तूर्ण. ८३६

वासवदिक्तो[5] य धिचें जळ हेमघटें सुषेण तो आणी;
नळ शातकुंभकुंभें[6], घेउनि ये उत्तराब्धिचें पाणी. ८३७

यमदिग्जळ रा शिजळें ऋषभानें आणिलीं प्रमोदानें;
पश्चिमसमुद्रनीरें गवयानें ही जसी पयोदानें. ८३८

रघुसत्तम म स्तक मग, पुण्यमुहूर्तीं स्वयें वसिष्ठानें
अभिषेकिलें विधीनें, हरिशिर जैसें जगद्वरिष्ठानें[7]. ८३९

मग युवरा ज पदीं ही भरताला स्थापिलें महोदारें;
तेव्हां संपन्मोदक्षेमाहीं[8] शीघ्र उघडिलीं दारें. ८४०

हेमांबुजम य माळा मुक्तामणिहार वायुच्या हातें,
इंद्रें समर्पितां घे, गुणभूषित पूर्णकाम ही हा[9] तें. ८४१

रघुनाथाच्या ज नपदंजन[10] पदपद्मीं उपायनें चित्तें
आधीं अर्पुनि भावें, मग करिती लोकरीति ही वित्तें.

जनसमुदा य प्रभुनें भूषणदानेंकरूनि गौरविला;
लाजवि नानामणिगणहेमपिनद्धांग[11] लोक तो रविला.

---

१. यथोचित दान देण्यांत अग्रणी. २. प्रजाजनासह. ३. (अमरटीप). कुशल—**पंत**. ४. जांबवान्. ५. इंद्रदिशेच्या–पूर्वेच्या–सागराचें. ६. शतकुंभनामक पर्वतावर झालेल्या सुवर्णाचे कुंभानें. ७. यथा पुरा ब्रह्मणा शक्रे राज्याभिषेकः कृतस्तद्वत्—**पंत**. ज्याप्रमाणें पूर्वी ब्राह्मणानीं इंद्राला राज्याभिषेक केला त्याप्रमाणें. ८. संपत्ति, आनंद व कल्याण यानीं. ९. राम. १०. देशवासी लोक. ११. अनेक सुवर्णरत्नानीं भूषितांग असा.

मुक्तामणिहा रा तें सीता घेऊनि हस्तकीं होती,
तों सर्वज्ञवराला कळली तच्चित्तकामना हो! ती. ८४४

राम म्हणे, 'प्र म दे! या लोकीं जो योग्य हार हा देया,
त्याला देतां राज्य, प्राण हि नाहींत सर्वथा प्राज्य[१]. ८४५

जैसी तूं तैसी श्री भरत जसा हा तसे चि हे प्राण;
ज्याणें मातें दिधले सीते! तो पूज्य सर्वथा जाण.' ८४६

एवं रघुवी रा च्या वाक्यें जाली प्रहृष्टरूपा हे;
माता जसी सुतातें, तैशी ते मारुतीकडे पाहे. ८४७

शिरकरक म ळें चरणीं समर्पितां, मारुतीस ती सीता
देवी मणिहारासह दे हृदयाभीष्ट भक्ति सुप्रीता. ८४८

'तूं निर्मळ नि ज गुणमणिभूषित वत्सा! सदैव परि हार
कंठीं' म्हणे 'असो दे, मद्विस्मृतिचा करील परिहार

तुझिया हृद य सरोजीं स्मरण असो आणि हार हा कंठीं;
मुदितमनें काळातें आत्मज्ञानें पहा, रहा, कंठीं.[२] ८५०

आम्हां उपका रा चा सागर लंघावया नसे नाव;
धन्य वदान्यामध्यें घ्यावें पहिलें सदा तुझें नाव.' ८५१

सकळजनीं म रुदात्मज पावे ब्रह्माद्यलभ्यसत्कार,
[३]स्फार प्रेमाश्रुप्लुत[४]लोचन भावें करी नमस्कार. ८५२

पवनतनु ज हेम[५]प्रभ सितमुक्ताहार घालितां कंठीं
भासे [६]कनकाद्रीच्या बळाक[७]माळा चि काय उप[८]कंठीं. ८५३

पवनतन य त्या हारें म्हणतों तो शोभला तसा शूर;
जरि [९]रत्नसानुगोत्रीं होते दोन [१०]स्वरापगापूर. ८५४

जेव्हां नृपति ज नाला आज्ञा दे जावयाशि गेहातें;

---

१. मागें गीति ७१४ पहा. २. घालीव. ३. फार. ४. प्रेमाश्रुपूर्णनेत्र. ५. मूळ पाठ—**नीलप्रभ**. ६. मूळ पाठ—**बलाहकाच्या**. मेघाच्या. ७. बगळ्यांची पंक्ति. ८. समीप भागीं. ९. मूळ पाठ—**इंद्रनीळगोत्रीं**. १०. गंगेचा ओघ.

विरहासहिष्णु रडती, म्हणुनि म्हणे त्यांस तो 'उगे' हातें.[1]
'वसतों हृद य गृहीं मीं तुमच्या, तुम्हीं हि माजिया सकळ;
कां बंधुहो! वृथा मग, मानूनि वियोग होतसा विकळ?'
ऐसें वदोनि रा क्षसवानरराजे ससैन्य पाठविले;
मणिपदकप्रतिबिंबछद्में[2] हृदयांत काय सांठविले. ८५७
रघुवर हे म नगावर सतडिद्धनसा[3] नृपासनीं साजे;
सेवकमयूर नाचति, चातकसे सर्व भासती राजे. ८५८

इति श्रीमन्मंत्ररामायणे श्रीरामनंदनमयूरेश्वरकृतौ निजपदप्राप्तौ पट्षष्टितमोमंत्रः समाप्तश्चायं युद्धकांडः । ६

षट्षष्टिमितसन्मंत्ररत्नभूषाकरंडकः । युद्धकांडोस्तु सततं साधूनां चेतसो मुदे ॥ १ ॥

---

# उत्तरकांड[4]

रामप्रेक्षाकामें[5] श्री मदगस्त्यादि पुण्यकीर्ति मुनी,
येती त्यांला पूजी राजा, निजमस्तकीं पदें नमुनी. १
म्हणती, 'त्वद्विध रा जा पूर्वी आम्हीं न देखिला कोणी;
दारुण शत्रु निशाचर मथिला, केली सुखाकरा[6] क्षोणी.[7]'
क्षाळायाला जन म ळ भगीरथें आणिली चि देवधुनी;

---

१. स्वयमपि तद्वियोगबाष्पनिरुद्धकंठो वक्तुमक्षमो रामस्तत्पाणिसंज्ञया रोदनं मा कुरुतेति वारयामासेति व्यज्यते—**पंत**. राम हि त्यांच्या वियोगानें गळा दाटून आल्यामुळें बोलण्यास असमर्थ होऊन हाताच्या खुणेनें च 'दुःख करूं नका' असें सांत्वन करूं लागला. २. रत्नखचित पदकांत पडलेल्या प्रतिबिंबाच्या मिषानें. ३. विद्युल्लतेसह मेघाप्रमाणें. ४. या कांडांत पहिल्या पन्नास व पुढें १२५ ग्या गीतींत कांहीं 'रघुपतिमंत्ररत्न' व कांहीं भगवन्नामें साधलीं आहेत (मागें उपोद्घात गी. ११ पहा). गीति १ पासून १० पर्यंत पुढील मंत्र साधला आहे—

**रामो दाशरथिः शूरो लक्ष्मणानुचरो बली ।**
**काकुत्स्थः पुरुषः पूर्णः कौसल्येयो रघूत्तमः ॥**

५. रामदर्शनाच्या इच्छेनें. ६. सुखाची खाण. ७. पृथ्वी.

चंद्रांशूपरि कीर्ती विनिर्मिली त्वां हि सुररिपू वधुनी. ३

विमलगुणा! तु ज वांचुनि सूक्ष्मदृशांला[1] न देखणा[2] ठाव;

अनुदिन तव चरणाब्जीं, म्हणउनि त्यांचा द्विरेफ[3]सा भाव. ४

हें ऐकुनि विन य ज्ञ प्रभु वंदुनियां म्हणे, 'अहो! स्वामी!

बहुमानकीर्तिशाळी भवत्प्रसादें करूनियां आम्हीं. ५

लंकेश निशिच रा धिप मेला तुमच्या तपःप्रभावानें;

[4]कारुण्याकुळहृत्स्थळ मजला स्तवितां स्वपुत्रभावानें. ६

हा दशमुख अ म रांचा रिपु दारुण जन्मला कसा दुष्ट?

दोर्घनिधीला याला, वरदाता कोण जाहला तुष्ट? ७

हें पूर्ववृत्त म ज ला सांगा, आकर्णनस्पृहा[5] आहे.'

ऐसें पुसतां हर्षें अगस्त्य सांगे कथा तयाला हे. ८

चतुरास्यतन य रामा! पुलस्त्यनामा अखंडितज्ञान.

वेदाब्धि पावकौजा[6]; सत्कैवल्येक्ष[7] गेयविज्ञान[8]. ९

संसारसिंधुचें ज ळ केलें लंघूनि जेवि तृणबिंदु[9]

त्या सत्तमाशि मग दे कन्या राजर्षिनाथ तृणबिंदु. १०

त्यालीं[10] जाला तन य ख्यात मुनी विश्रवा गुणें हृद्य[11],

वेदांत्तसारवेत्ता, सर्वजनामाजि मान्य सद्विद्य[12]. ११

तद्वनिता रघु रा या! सती भरद्वाज[13]कन्यका जाली;

यक्षप सुंक्षेश्वरसख[14], शंमधन[15] वैश्रवणनाम सुत ख्याली.

---

१. सुंदर. २. स्थान. ३. ज्याच्या नांवामध्यें दोन रेफ–रकार–आहेत त्या भ्रमरासारखा. ४. दयायुक्त हृदय ज्यांचे असे [ तुम्ही ]. ५. ऐकण्याची इच्छा. ६. अग्नितेज–पंत. ७. ब्रह्मद्रष्टा. ८. प्रशंसनीय विज्ञान ज्याचें असा. ९. गवताच्या टोकावरील पाण्याचा थेंब. १०. गीति ११ पासून १७ पर्यंत पुढील मंत्र साधला आहे–

वेदान्तवेद्यो यज्ञेशः पुराणपुरुषोत्तमः ।

जानकीवल्लभः श्रीमानप्रमेयपराक्रमः ॥

११. प्रिय. १२. उत्तमविद्यालंकृत. १३. देववर्णिनी नामक. १४. शिवमित्र. १५. शांतिधन–पंत.

त्याप्रति लंकाना  म क पुरातन स्थान अर्पिलें तातें,
द्रविण[1]स्वामित्वासह, पुष्पक विधि दे स्वभक्तिमंतातें. १३
भव पुरकाळ[2]  श्री गळें[3] गौरीगुरु भक्तकामनाकर्ता
जाला शूळविषोरगधर वित्तपमित्र[4] कामसंहर्ता. १४
त्यावरि सुमालि रा क्षस, जाणुनि जनगीतकीर्ति विश्रवस,
कन्येशि म्हणे, 'कैकसि! सल्लक्षण विप्र हा भजोनि वैस[5].'
गेली प्रदोपस  म यीं दैवानें विप्रसत्तमाजवळी;
अर्कश्रीस शिखीपरि, तत्सेवा प्रीतिमान् मुनी कवळी[6].
अतिबळ तनु  ज प्रथम चि जाला तीतें, उमेशि गुह काय?
नीळापयोधरासम शक्र तसा वीर तो महाकाय. १७
दुसरा ही तन  य बळी कैकसिका प्रसवली विशाळशिर;
तो लोकप्राणांतें तत्काळ हरी, करी च ना उशिर. १८
तिसरी कृत्रिम[8]  रा शि च शूर्पणखी योग्य ठेविलें नाम,
जीचें सतृष्ण मानस मनुष्यमांसाशनीं महोद्दाम. १९
ध्रुव ज्यापरि वि  म ळचरित, मेधावी[9] सुकृतपुंजसा चरम[10]
अविलंबित[11] धर्मी रत, सदभीष्ट[12] अदोषवृत्ति गुणपरम[13].
जो सुरजन  पू ज नरत, सामग्री शांतिभक्ति हे ज्याची,
वाहे न नंदनेच्छा, करील वार्ता किमर्थ राज्याची? २१
जो प्रथमतन  य त्याला दशमुख हें विश्रवा करी नाम;
तो कुंभकर्ण बळिवर विग्रह[14]कर्ता दुजा महोद्दाम. २२
तिसरा जो आत्म ज तो बिभीषणाख्येंकरूनि गौरविला;

---

१. धनाधिपत्वासह. २. त्रिपुरादि. ३. विषकंठ. ४. कुबेरमित्र. ५. भजत ऐस. ६. अंगीकारी. ७. गीति १८ पासून २३ पर्यंत पुढील श्लोक साधला आहे—

**रावणांतकरः कृष्णो ध्रुवीकृत बिभीषणः ।**
**सुग्रीवानंदकर्ता यो वालिहर्ता परःपुमान् ॥**

८. कपटराशि. ९. बुद्धिमंत. १०. शेवटला. ११. निरलस. १२. साधुजनाना प्रिय. १३. गुणश्रेष्ठ (बिभीषण). १४. वैर करणारा.

तो परम पुण्यकर्मा, मतिमान् धीर प्रसिद्धकीर्ति भला.
जनक[1]पदद्व थ नमना समस्तयक्षेंद्र एकदा आला;
गुर्वाज्ञेला घेउनि जाय महात्मा स्वकीयवासाला. २४
त्यास विलोकुनि रा क्षसकन्या चित्तीं अ[2]खर्व खेद धरी;
सापत्नभाव लक्ष्मी; वैभवकामें सुतासि बोध करी. २५
मग विश्वसृ[3]ट् स म र्चुनि, तुष्टि कराया महाह[4]ठस्थितिनें,
अ[5]त्यंततनुश्रमकृत्तप करि दशकंठ भू[6]तिच्या रीतिनें. २६
गोकर्णी ते सारे, श्री विधिला तोषवावया तपती;
केवळ निरशन होउनि, भुवनपतीतें स्वमानसीं जपती.
दि[7]क्शतसमा नि रा कुल निर्वाह करूनि निश्चयें धीर,
कार्यज्ञ एक मस्तकतोयज होमी दशास्य तो वीर. २८
वर्षें अयुत स म थें[8], धैर्याच्या पर्वतें अशीं नेलीं;
पं[9]चाग्निसाधनस्थें आतपहिमवृष्टि तुच्छसीं केलीं. २९
दशमशिरोंबु ज हवनीं, समजुनियां तं[10]च्चिकीर्षितासि तदा;
हरिनंदन विधि आग्रह, वारूनि म्हणे 'स्वयोग्य माग पदा. ३०
ओ[11]जःसंपन्न प्रि य परमोदार त्वदीय बळ राहो;
आकृति असो यथास्थित, वर मागायासि सिद्ध वीरा! हो.'
शुभवचनें तो रा क्षस, अ[12]नातिक्रमितां चि बोलिल्या विधिला;

---

१. येथून गीति ३० पर्यंत पुढील श्लोक साधला आहे:—

**सर्वात्मा सर्वसाक्षी वै सृष्टिस्थित्यंतकृद्विभुः ।**
**सर्वाश्चर्यमयः सर्वः सच्चिदानंदविग्रहः ॥**

२. बहुत—**पंत**. ३. ब्रह्मदेव. ४. हठादिकरून योगसाधनानीं. ५. देहाला अत्यंत श्रम देणारें असें तप. ६. संपत्तीच्या आवडीनें. ७. एक हजार वर्षें. ८. स्वस्थ. ९. चारी दिशांस चार व मस्तकावर मध्याह्नीचा सूर्य असें तपाचरणासाठीं केलेले पांच अग्नि. यांचीं नांवें गार्हपत्य, आहवनीय, दक्षिण, आवसथ्य आणि सभ्य अशीं आढळतात. १०. रावणाच्या इच्छिताला. ११. गीति ३१ ते ३३ पर्यंत '**ॐ नमो भगवते वासुदेवाय**' हा मंत्र साधला आहे. १२. न उल्लंघितां.

सांग समर्चीं वन्यें[1]; तेव्हां 'अमरत्व दे' म्हणे विधिला.
द्रुहिण म्हणे, 'अम राच्या भावाला[2] पात्र अन्य जन नाहीं;
सुखकर वर देतों, घे, वाचे वद होय योग्य जें कांहीं.
'[3]यक्षसुपर्णभु ज गसुरदितिदनुसुतराक्षसादि जे कांहीं
यांपासुनि मरण नसो, नरादिकीं भीति' तो म्हणे 'नाहीं.'
ऐसें ऐकुनि तो य जभव त्यासि म्हणे, 'दिलें प्रपौत्राला;
[4]अन्यदुरासदता घे. समर्पिली कामरूपता[5] बाला!' ३५
मग जलरुह[6] ज न्मा तो बिभीषणाला म्हणे, 'पुरे शांता!
पंचसहस्र[7]समा तप केलें सत्वव्रतस्थिता! दांता![8] ३६
सूर्यालोकननि य में केलें संपूर्ण हायन[9] प्राज्ञा!
माग वरातें सुमते! वत्सा! मीं देतसें स्वयें आज्ञा.'
विनउनि चतु रा त्यातें म्हणे, 'असो हर्ष साधुच्या भजनीं;
दे ब्रह्मास्त्र [10]अशिक्षित सुरेश्वरा! हा चि मुख्य लाभ जनीं.'
त्याला म्हणे पिता म ह, 'फार बरा काम हा तुजा साधो,
राक्षस असोनि शुभमति, यास्तव अमरत्व ही दिलें साधो!' ३९
तदुपरि गेला श्री विधि घटकर्णाला वराशि देयातें;
'दुष्टाशि वरसमर्पण अनुचित' म्हणती अमर्त्य तों यातें.
मग मुखविव रा मध्यें घटकर्णाच्या सुरार्थ ते वाणी[11]
शीघ्र पितामहवाक्यें शिरे गुहेमाजि चंचलेवाणी[12]. ४१
घटकर्णाला क म ळज, 'माग' म्हणे 'जें अभीष्ट तें सारें;

---

१. पुष्पादिकानीं. २. देवत्वाला. ३. गीति ३४, ३५, व ३८ ते ५० पर्यंत **राम राम हरे राम राम राम हरे हरे । हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।** हें भजन साधलें आहे. हें साधित असतां कवीच्या वार्णांतून ३६ व ३७ या गीतींत '**हरे राम**' असा सहजोद्गार निघाला आहे! ४. अन्यापासून भय न हो–**पंत**. ५. इच्छित रूप घेण्याची शक्ति. ६. ब्रह्मदेव. ७. (अमरटीप) वर्षे. ८. जितेंद्रिया! ९. वर्ष. १०. उपदेशाशिवाय अवगत व्हावें असें. ११. सरस्वती. १२. विद्युल्लतावत्–**पंत**.

अयुताब्दकाळ[१] दुःसह नियम बरे पाळिले निराहारे.'
दशवदनानु ज तेव्हां व्यामोहदभारतीहृतस्वांत[२]
सर्वसुरेशासि म्हणे, 'निद्रा दे, जाहलों तपःश्रांत.' ४३
वर देउनि तो य जभव जातां संध्यापयोदसमवर्ण[३]
सुरकृतवंचन जाणुनि सोडी निश्वास उष्ण घटकर्ण. ४४
मग मातामह[४] रा क्षस सुमाळिनामा दशाननास म्हणे,
'वर साधिले बरे तरि, घे लंकास्थान शीघ्र वीरमणे!' ४५
तेव्हां प्रहस्तना म क दूत द्रविणाधिपाकडे[५] प्रेषी;
प्राकृत[६] परस्वहरणीं सतृष्ण दिक्तुंड तो जगद्द्वेषी. ४६
त्या घटकर्णाग्र ज निजदूतोक्ताचें करूनियां श्रवण
विकृति[७] न धरितां बोले, सौभ्रात्रीं[८] जो सतृष्ण वैश्रवण.
'मीं अग्रज तन य तसा, तूं मज एका स्थळीं कृतस्नेह
पवमानकृष्णवर्त्मा[९] तसे वसों ये, तुझें चि हें गेह.' ४८
हें दूतमुखें नि ज मत, कळवी अनुजाशि, तो हठप्रकृती
त्या उत्तरेश्वराशीं, इच्छीना स्नेह निर्दयोपकृती[१०]. ४९
तातास[११] यक्षना य क एकांतीं हें समस्त आयकवी;
सस्नेह भूसुरेश्वर, तें ऐकुनि सूनुला असें शिकवीः ५०
'हा दुष्ट परम रा क्षस निवारितां ही करीतसे दावा;
दे लंका सोडुनियां, त्वां तरि माझा निदेश वंदावा.'
तातनिदेशें तो म ग, कुबेर गेला हिमाख्यशैलास
वसवी दुर्गाशंकरचरणाब्जस्पर्शपूत कैलास. ५२
तो दशवदन श्री दत्यक्तपुरीमाजि जेधवां वसला,
त्रिभुवनलोकमनीं ही, तेव्हां भययुक्त ताप ही बसला.

---

१. दहा हजार वर्षें. २. मोहक वाणीनें ज्याचें चित्त हरिलें असा. ३. कोपशोणिम्ना श्यामस्य तथात्वमितिभावः—**पंत**. ४. आजा (कैकसीचा पिता). ५. कुवेराकडे. ६. क्षुद्र, नीच. ७. राग. ८. उत्तम बंधुत्वाविषयीं. ९. वायु आणि अग्नि यांसारखा. १०. निर्गता दया उपकारश्च यस्मात्—**पंत**. ११. पिता विश्रवा ऋषि त्यास.

विष्णुभयद्रुत[1] रा क्षस पाताळाहूनि याकडे आले;
राज्याभिषेक होतां दशकंठाला, महासुखी जाले. ५४

शूर्पणखीला दे म ग विद्युज्जिह्वाख्यकालकेयातें[2];
मंदोदरी स्वकन्या, दिधली भावें मयासुरें यातें. ५५

दशवदनान ज नीनें घटकर्णानें मनःप्रिया शांता
वैरोधनदौहित्री[3] वज्रज्वाळा हि साधिली कांता. ५६

गंधर्वलोकना य क शैलूष स्वात्मजा सती सरमा
अर्पी बिभीषणाला, तो पावे प्रीति तद्गुणें परमा. ५७

निद्रा सतत क रा या अनुजाला एकगांव विस्तीर्ण
योजनयुग्मायतगृह करूनि दे हेमरत्नसंकीर्ण. ५८

दशकंठें वर म त्तें क्रीडा आरंभिली अपार जनीं;
ते सुरयशःसितांबुजवृंदाची होय वार्षिकी[4] रजनी. ५९

हें सर्व राजरा ज श्रवण करुनियां स्वबंधुला वारी;
हित कथिलें परि तो खळ,अहित चि मानी मनांत देवारी.

मग तो दिग्विज य स्पृह आधीं जिंकी धनेश्वरास रणीं;
पुष्पक हरूनि भिजवी, त्याची पळतां तदश्रुनें सरणी[5]. ६१

पळउनि अग्र ज राजा दशमुख तो 'धन्य मीं' म्हणे 'आजी;
माजी शक्ति न जाणुनि, दुर्बळ आला करावया आंजी[6].'

सकळ धनेंद्र .य शःशशिराहु दशग्रीव पुष्पकीं वेघे;
विधिवरसामर्थ्यानें, अनन्यलभ्यप्रमोद दैवें घे. ६३

दुर्गेसहित ह रा ची वर्तत होती जया स्थळीं केळी;
त्या शरवणांत[7] पुष्पक जातां गति कुंठित क्षणें केली. ६४

---

१. पळालेले. २. विद्युज्जिह्वनामक कालकेयवंशांतील दैत्यविशेषातें. ३. विरोधनपुत्र बली त्याच्या कन्येची कन्या. ४. पर्जन्यकाळची रात्र. ५. मार्ग. ६. युद्ध. ७. विभाषौषधिवनस्पतिभ्यः इत्यनेन णत्वं। इह वनस्पतिशब्देन वृक्षमात्रमुपलक्ष्यते। अत्र च लिंगं। लुपियुक्तवदितिसूत्रे व्यक्तिवचनम्।—**पंत**. 'विभाषौषधिवनस्पतिभ्यः' या सूत्रानें 'शरवन' शब्दांतील 'न'चा 'ण' झाला. या सूत्रांतील 'वनस्पति' शब्द वृक्षवाचक आहे. असें च उदाहरण 'लुपियुक्तवदिति' या सूत्रांत आढळतें.

चाळवितां परम म वळें निष्फळयत्न क्षपाचर श्रमले;
शिवपदरतजनपीडक दृष्टांतीं या स्थळीं मला[1] गमले. ६५
तेव्हां तेथें आला, श्री कंठध्यानसक्त आनंदी;
वानरतुल्यानन तो सर्वगणाध्यक्ष सन्मती नंदी. ६६
दशसंख्यकंध रा ला नंदी आज्ञा करी फिरायाला;
'शिरतां विपिनीं येइल कोप' म्हणे 'सर्वलोकरायाला.'
हांसे वरवीर्यं म दें कपिमुखनंदीस रात्रिचरपाळ;
तेव्हां शिवदास म्हणे, 'कपी च होतील रे! तुजे काळ.'
हें परिसुनि र ज नीचर, समूळ उपडावयाशि कैलास
विंशति भुजपरिघ[2] तळीं, घालुनि उचली क्षणांत शैलास.
गण सर्व सभ य जाले, गिरिकंपें पार्वती धरी कंपा;
आलिंगी पतिला, तों भासे शरदंबुदीं जणों शंपा. ७०
गिरिमस्तकीं ह रा नें चरणांगुष्ठें चि घालितां भार,
नगमूळबद्धभुज[3] खळ निर्बळ दशकंठ तो रडे फार. ७१
दिक्शतवर्षें श्र म ला, 'अद्यापि' म्हणे, 'नये चि मृत्यु कसा ?'
बाष्पांबुपल्वलांतीं[4], रडतां भासे दशास्य, बेडुकसा. ७२
सदय अमर ज न म्हणती, 'गौरीपतिचे मनीं धरीं पाय;
दशकंठा! हा केवळ तुज कथिला मुक्तिचा महोपाय.'
शंकरपदतो य ज तो यजिता जाला धरूनि विश्वास;
त्या देवें सोडविला, जो पाळी आशुतोष[5] विश्वास. ७४
त्यावरि मनसि[6] ज रिपु तो देउनियां चंद्रहासनामासी[7];
'रावण' हें अभिधान स्थापुनि, पुरवी स्वभक्तकामासी.
शिवचरण द्व य वंदुनि तुहिननगीं[8] जाय पुष्पकारूढ;
तेथें तपस्विनीतें, पाहुनि जाला स्मरार्त तो मूढ. ७६

---

१. कवीला. २. बाहुरूपी स्तंभ. ३. पर्वतमूळीं सांपडले बाहु ज्याचे असा. ४. अश्रुरूपी डबक्याचा नाश होत असतां. ५. शीघ्रसंतुष्ट (शिव). ६. कामशत्रु (शिव). ७. चंद्रहासनामक खड्गाला. ८. हिमालयीं.

वृत्त तिचें असु रा धिप, पुसतां मग त्यास ते म्हणे युवती,
'मीं गुरुपुत्रकुशध्वजकन्या नामेंकरूनि वेदवती. ७७
वेदोच्चारणस म यीं जाल्यें मीं वाङ्मयी[1] प्रभावानें;
विष्णुप्राप्त्यर्थ वनीं, तप करित्यें नित्य शुद्धभावानें. ७८
मज्जनकमनीं श्री पतिहस्तीं द्यावी सुता असें होतें;
दैत्येंद्रें[2] शंभूनें वधितां ताताशि राहिलें हो! तें. ७९
हरिहुनि दुस रा वर मज न रुचे, म्हणवूनि हें सदाचरण;
निजजनकल्पतरूचे चित्तीं मीं पूजित्यें सदा चरण.' ८०
श्रवण करुनि म दनातुर रावण तीतें म्हणे, 'अहो! जाये!
मजहुनि काय अधिक हरि? होउनि पत्नी गृहाशि माज्या ये.' ८१
यापरि खळ र ज नीचर वदतां, पावे अनल्प धिक्कार;
वेदवतीकेशांतें धरुनि करी दुष्ट तो बळात्कार. ८२
अलकांचा संच य ती करकरवालें[3] चि तत्क्षणीं छेदी;
सुकृतक्षयभय जालें, म्हणउनियां शापदान ही नेदी.
मग ती निशाच रा ला 'वधीन जन्मांतरीं तुला हो! मीं;'
ऐसें वदोनि तनुला त्या समयीं दीप्तपावकीं होमी. ८४
वेदवती ते क म ळीं जन्मे तों तीस दुष्ट तो पाहे;
मग दशवदनें बेली लंकेला देवगर्भरूपा हे. ८५
रावणमंत्री ति ज ला अवलोकुनियां म्हणे, 'अहो स्वामी!
टाकावी हे कन्या, न वसावी सर्वथा तुजा धामीं.' ८६
सचिवोक्तानें तो ब धिजठरीं नेवूनि टाकिली धन्या;
ते जनक[4]सवायतनक्षमोदरीं लांगलें[5] निघे कन्या. ८७
हलपद्धतींत[6] ज न्मे यास्तव 'सीता[7]' असें तिचें नाम;
ते रामा! तव रामा, क्षमादयासत्वकीर्तिचें धाम. ८८

---

१. वाणीरूप. २. खोडलेला पाठ—**दैत्यक्रुद्धहरानें**. ३. हस्तरूपी तरवारीनें. ४. जनकाच्या यज्ञाच्या गृहभूमीच्या पोटांत. ५. नांगरानें. ६. नांगराच्या मार्गांत. ७. नांगराची रेषा. ( हिला तास असें म्हणतात ).

उपजे दिग्विज य कर प्रथम जसा काम यास उद्दामें[1];
तैसा चि पुत्र जाला, अन्वर्थ चि मेघनाद तन्नाम. ८९
त्यावरि मरुत्त रा जा करीत होता जया स्थळीं यज्ञ;
रणकाम धरुनि तेथें गेला तो पंक्तिकंठ अनयज्ञ. ९०
मग रणसज्ज म रुत्त क्रोधावेशें करील संवर्त[2]
यास्तव सैवासमाप्तिच्छद्में[3] वारी तयाशि संवर्त[4]. ९१
देवेंद्रसमान श्री मरुत्त परते, गुरूक्तिला मानी;
भ्याला म्हणूनि फिरला, हें भावी मूढ तो महामानी.
समयज्ञ अन्य रा जे देती दशकंधराशि एक कर;
समरीं कितेक अर्पिति तनुधनगृहकामिनीयशःप्रकर. ९३
अनरण्यनाम म नुकुळकमळार्क महर्षिमान्य राजर्षी
होता साकेतीं तों, त्यातें हि बळें रणार्थ आकर्षी. ९४
कपट करुनि ज नपतिला अनरण्याला वधी महापापी;
'मत्कुळजरामहस्तें मरशील' असें खळाशि तो शापी.
नारद मुनिना य क तो त्या दशकंठाशि भेटला वाटे;
त्याला म्हणे दशानन,'बळिष्ठ तुज कोण या जनीं वाटे?'
तो मुनि म्हणे,'ध रा पति दुर्बळ, हे काय जिंकिशी धीरा!?
यमपारिभवें जगत्रय निर्जित होईल सर्वथा वीरा!' ९७
मुनिवचनें य म लोकीं गेला दशकंठ पुष्पकावरणें;
तों नारकिजन[5] म्हणती, 'सोडुनि आम्हांशि कीर्तिला वरणें.
निरयमुखीं नि ज पापें पचलों, संताप पावलों राया!
करितों बहु परिदेवन[6] परि देव न ये चि दीन ताराया. ९९
तूं तरि हा निर य श्रम वारुनियां हो शरण्य बा! आजी;
असत्राण न होतां, घडेल कैशी यमासवें आजी?'१००
एवं त्या नारकि ज नवचनार्हीं राक्षसाचिया हृदया

---

१. मोठा. २. प्रलय. ३. यज्ञाच्या असमाप्तिमिषें. ४. बृहस्पतीचा भ्राता.
५. नरकलोकसंबंधीं. ६. दुःख.

वज्रीं मृदुता तैशी, आली आश्चर्यहेतु फार दया. १०१
पापिविमोक्षें तो य म, युद्ध करी सप्तरात्र कोपानें;
अन्योन्यबळें करिती परस्परांच्या चि शोणितें पानें.
मग काळदंड रा गें दशमुखमरणार्थ घेतला स्वकरीं,
तों विधि म्हणे, ' यमा ! मज वरदाशि जगत्रयीं मृषा न करीं.
विधिवचनें य म समर त्यागुनियां गुप्त होय तत्काळ;
बाळमति क्षणदाचर म्हणे, ' पळाला भयामुळें काळ.'
लंकेच्या नाथें जो श्रीकंठाच्या स्वकंठिंचा हार
तो वासुकि जिंकुनियां, युद्धीं केला भुजंगसंहार. १०५
वासुकि जिंकुनि रा वण वेढी जावूनि मणिमयाख्यपुरी,
संपूर्ण वर्ष तेथें निवातकवचांसवें रणाशि करी. १०६
अमितपराक्र म सारे, सर्वांची ही जनीं पेरा[1] भूती[2];
वर्षसहस्रें न घडे, अन्योन्यातें रणीं पराभूती. १०७
यास्तव पंकज ज न्मा संधि करी त्या परस्परांसहित;
सामेंकरूनि सांगे निवातकवचक्षपाचरांस हित. १०८
तेथें वसोनि हा य न दशकंधर जाय अश्मनगराला[3];
शूर्पणखी[4]पतिसह तो संहारी कालकेय[5]निकराला. १०९
वरुणालयास रा वण जातां वंदी जगन्नुता सुरभी[6],
जीच्या दुग्धें जाला क्षीरधि, हरिनाभिपंकजें सुरभि[7].
दशकंठानें स म रीं वरुणाचे पुत्र जिंकिले सर्व;
तेव्हां ऐकत होता पाशी विधिच्या सभेंत गांधर्व. १११
वैरोचनि दिति ज बळी जिंकावा हा धरूनि संकल्प
गेला, ज्वलनपराजयकामें खद्योत काय अत्यल्प? ११२
वैरोचनि विस्म य सह दशकंठाला धरूनियां हांसे;

---

१. उत्तम. २. संपत्ति. ३. मणिमयनगराला. ४. मागें ५५ वी गीति पहा. ५. कालकेयनामक दैत्यसमूहाला. ६. कामधेनु. ७. सुगंधी. ८. वरुण. ९. मायन.

कर्पूरमूर्तिसम तों स्मित[1]भापूरांत रात्रिचर भासे. ११३
[2]नामान्वय प्रयो ज न आगमनाचें, बळी तयाशि पुसे;
तों निशिचर तिलकदशक घर्मजळाच्या भरेंकरूनि पुसे.
दशमुख [2]अन्व य नाम [3]प्रमाण सांगोनियां म्हणे, 'राया!
आलों हारिला जिंकुनि, तूझ्या भयबंधनाशि वाराया.'
हें ऐकुनि असु रा धिप, हांसोनि म्हणे, 'भला भला मित्रा!
मीं त्राण इच्छितां तूं आलाशि [4]सुहृद्विपत्तमोमित्रा! ११६
आतां या [5]चक्रानें म र्दीं मद्बंधदुःखहेतूतें;
मग पूजितील हर्षें सारे ही दैत्यलोक हे तूतें.' ११७
[6]बळितेजोभग्न श्री रावण चक्राशि उंचलायाला
बळ करितां पडला, तों पाहुनि दैत्येंद्र हांसला याला.
'त्रिजगन्नाथप रा जयकर्तव्याच्या धरूनि कामातें
या च बळें दशवदना! करणार विमुक्त काय तूं मातें?
जिंकित होते स म रीं अमरपतीतें करूनियां पण जे
ते ज्या हरिनें वधिले लीलालेशें चि आमचे [7]पणजे. १२०
होता जो मत्पूर्व ज हिरण्यकशिपु प्रसिद्ध नामानें
त्याचें हें कुंडल, जें जालें गुरु तूज मेरुच्या मानें. १२१
नुचले कुंडल य लें ज्याचें, तत्काळ मारिशील कसा?
गगनस्थविधुग्रहणीं इच्छा धरितोशि काय बाळकसा?'
बळिवाक्यानें सा रा रावणगर्व क्षणांतरें शमला;
लंकेशि जावयाला प्रार्थुनियां 'दे' म्हणे 'निदेश मला'.
दैत्याधीश महा म ति आज्ञा दे रावणाशि जायाला;
वरमहिमा रक्षाया द्वारीं न [8]मुरारि भेटला याला. १२४
दिनमणिपरा ज यातें मग जाय दशास्य चंडकोदंडी;

---

१. हास्यकांतिपूरांत. २. नाम, वंश. ३. (आगमन-) हेतु. ४. मित्रदुःखांधकारसूर्या! ५. चक्राकृति कुंडलानें. ६. बळीच्या तेजानें निस्तेज असा. ७. हिरण्याक्ष व हिरण्यकशिपु. ८. विष्णु.

क्षुद्रमतीप्रति रविनें 'जितोऽस्मि' म्हणवूनि धाडिला दंडी.[1]
पर्वत मुनिना य क, जो ज्ञानाचें पीठ ज्यापरी धाता,
त्याणें दशकंठाला कथिला राजा समर्थ मांधाता.[2] १२६
मुनिवचनें र ज नीचर युवनाश्व[2]सुतासवें करी समर;
तेव्हां जय कोणातें घडेल हें नेणती स्वयें अमर. १२७
गालव पुलस्त्य य लें वारिति येवूनि शीघ्र दोघांस;
म्हणती, 'तुमच्या मरणें निजजन शोकाग्निचा न हो घांस.'
मग [3]अमृतक रा संगें रण करितां, येउनीं सुरांसहित
विधि दशकंठास म्हणे, 'विधु रक्षीं, हा असे जनास हित.'
तदुपरि पश्चि म सिंधुद्वीपीं कपिलासमीप तो गेला;
श्वानें अंगारचैयीं[4] मांसोचय[5]निश्चय भ्रमें केला. १३०
अवलोकुनियां श्री तें हरावयाचा मनीं धरी लोभ.
तों भग्नदर्प रावण पडला, जाला महर्षि[6]चा क्षोभ. १३१
कौशिक[7] दिवाक रा च्या तेजें जैसा, तसा चि तो भ्रमला;
अमलात्मा प्रभु उठवी, तदा पुनर्जातसा क्षणें गमला.
दशकंठ म्हणे, 'म जला तूं मृत्यु श्लाघ्य या जनामाजी,
वांचविलें तरि देवा! स्मृति तवपादांबुजीं असो माजी.
स्तवुनि नमुनि ज गदीश्वरचरणातें सर्वलोकशरणातें,
आज्ञा घेउनि गेला दशमुख गंधर्वदेवशरणातें. १३४
तो निर्भय दुर्न य खळ सुरगंधर्वांगना बळें चि हरी;
हरिणीसम त्या गमती, हरि! हरि! दशकंठ ही तयांत हरी. १३५
त्या मग निशाच रा ला देती कोपें पतिव्रता शाप;
म्हणती, 'सत्वर पावो स्त्रीकृतमरणाशि हा महापाप.'
लंकाप्रवेशस म यीं ऐकुनि निजकांतमृत्युची वार्ता,

---

१. सूर्याचा द्वारपाळ. २. मंत्रभा. नव. गी. ७८–८५ पहा. ३. चंद्राशी. ४. निखाऱ्यांत. ५. मांसनिश्चय (या व मागील ठिकाणीं 'चय' याचा 'समूह' हा शब्दार्थ घेतला च पाहिजे असें नाहीं ). ६. कपिलऋषीचा. ७. घुबड.

शूर्पणखी बहु निंदी बंधुशि, वैधव्यदुःखदावार्ता. १३७

समजाउनि नि ज भगिनी, खरनामकराक्षसासि ते निरवी;

पाहे निकुंभिळांतीं[1] सुतें[2], जो भासे प्रभेकरूनि रवी. १३८

करकमळद्व य जोडुनि नमन करी मेघनाद तो यातें;

तात मुखें आशीतें, वर्षे नेत्रें प्रमोदतोयातें. १३९

प्रथमाश्रमी[3] द्वि ज[4] र्षभ तत्समवेषेंकरूनियां काय,

केलें कर्म? सुता! तूं तेजस्वी क्षीण ही दिसे काय.'

उशनां[5] म्हणे, 'न य ज्ञें त्वत्पुत्रें सिद्धि साधिली अतुला;

अग्निष्टोमानंतर केलें विध्युक्त वैष्णवक्रतुला. १४१

केला हयमख रा या!, यजिलें गोमेधराजसूयाहीं;

माहेश्वरयज्ञानें जाला प्रीत त्रिनेत्र ही पाहीं. १४२

रथ दिधला का म गम त्र्यक्षें आणीक तामसी[6] माया;

दुर्जय अस्त्र शरासन अक्षयशर तूणयुग्म ही राया! १४३

ऐसे त्वत्पुत्रातें श्री कंठें अर्पिले अलभ्य वर,

यासम कोणीं नाहीं, स्वर्गांत रसातळांत भूमिवर. १४४

स्वभुजबळें वी रा धिप हा जिंकिल संगरीं शतक्रतुला;

याच्या यशोमृताची पावेना देवकीर्तितक्र तुला.' १४५

हें परिसुनि अ म रारि स्वतनय आलिंगुनि प्रहृष्ट करी;

जलदाशि जलद भेटे, किंवा कलभांस[7] मत्त वन्यकरी.

सुरगंधर्वस्त्री ज न घेउनि लंकेशि जाय तुष्टमनें;

तेथें बिभीषणादिक करिती दशकंधरांघ्रिला नमनें. १४७

अमरपराज य केला, स्त्री हरिल्या, हें दशाननें कथिलें,

तेव्हां म्हणे बिभीषण, 'मधुनें[8] हि त्वद्यशोब्धिला मथिलें.

हरिल्या सुरदा रा तूं, यास्तव कुंभीनसी[9] बळें हरिली,

---

१. लंकेच्या पश्चिमद्वारदेशीं असलेल्या उपवनांत. २. इंद्रजित्. ३. ब्रह्मचारी. ४. ब्राह्मणश्रेष्ठ. ५. शुक्र. ६. अंधकार उत्पन्न करणारी. ७. हत्तीच्या छाव्यास. ८. दैत्यविशेषानें. ९. ही रावणाच्या चुलत मावशीची मुलगी.

करुनि पराजय माजा, मधुनें तूझी स्वसा स्वयें वरिली.
प्रभु! तव माता म ह जो सुमालिनामा प्रसिद्ध नामानें;
तज्ज्येष्ठ माल्यवंत भ्राता, सर्वांशि वंद्य जो मानें. १५०
त्याची कन्या जे तु ज जननीतुल्या सदैव पूजाया,
पुष्पोत्कटाभिधाना[1] मधुनें नेली तिची सुता राया!' १५१
ऐसें परिसुनि य मसा दशकंठ धरी मनांत राघास;
'वास' म्हणे 'मधु माजा होइल अनळासि ज्यापरी घांस[2].'
मधुमथनार्थ ज वानें मधुनगराच्या समीप जों गेला,
कुंभीनसीस कळतां सत्कार तिणें स्वबंधुचा केला. १५३
'मत्कांतप्राणव्य य न करीं, दे मौक्तिकाशि[3] खळकाला!
द्यावें अभय दयाला! कुंकुमतिलकाशि आणि अलकाला.'
भगिनीवचनें रा वण मधुशीं मैत्री करुनि दे रत्नें;
गेला त्रिविष्टपालों[4] पुनरपि जिंकावयाशि सुर यत्नें. १५५
नलकूबरना म क जो धनपतिसुत तन्मनःप्रिया रंभा
अवलोकिली दशास्यें, कनकाची काय चालती रंभा[5].
दशवदनाला श्री शी गमली, मग वृत्त तो पुसे सारें;
तीणें 'स्नुषा तुझी मीं,' हें कथिलें भाषणें सुधासारें[6]. १५७
मदनातुर तो रा क्षस रंभेला वारितां, बळें भोगी;
नवकेतकीसुमातें वेष्टुनि काळा जसा महाभोगी[7]. १५८
दशकंठें मद म त्तें वनीं यथाकाम मर्दिली रंभा;
जैशी निरंकुशानें वन्यगजानें फळानता रंभा. १५९
मग ते रंभा नि ज पतिजवळ करी फारफार आकांत;
तेव्हां रोदनकारण पुसता जाला स्वयें तिचा कांत. १६०

---

१. माल्यवंताच्या कन्येचें नांव 'अनला' असें आढळतें. तसें च 'पुष्पोत्कटा' ही सुमालीची कन्या म्हणून प्रसिद्ध आहे. २. गवत. ३. नथेला. 'नथ' हा सौभाग्य-सूचक अलंकार आहे. ४. स्वर्गाला. ५. केळ. ६. सदृश—**पंत**. ७. मोठा सर्प.

तो स्वपितृव्यान्या[1] य स्त्रीनें कथितां मनीं धरी ताप;
पापप्रियेस[2] ऐसा धनदाचा पुत्र दे महाशापः १६१
'यापरि परदा रा जरि भोगील बळें दशास्य पापिष्ठ;
तरि तच्छिर मच्छापें होवू शतधा फुटोनियां पिष्ट.' १६२
दशकंठें जसि म थिली रंभा, तैशी चि मेघनादानें
सुरपतिसेना दमिली; तैं राक्षस नाचती प्रमोदानें. १६३
बांधुनि सुररा ज निजस्थाना नेला; तदा सरोजभवें
स्तवनें संतोषविला तो रावणपुत्र दिव्यवाग्विभवें[3]. १६४
'वर हृदयप्रि य वत्सा! मजपाशीं माग, शक्र हा सोड;
कोड स्वपूर्वजाचें पुरवीं' ऐसें विधी[4] वदे गोड. १६५
'देशी अमरत्व ज री, तरि हा मानीन बोल देवाचा;
दे वांचाया वर मज' ऐशी घननाद तो वदे वाचा. १६६
'हें अमरत्व न य ज्ञा! दुर्लभ, आणीक माग एक वर.'
ऐसें वदता जाला अमृताहुनि गोड सर्वलोकेंवर. १६७
'रथवर सम रा रंभीं प्रकटावा दिव्य कामगम होमीं;
त्या यानीं चढल्यावर अमर असावें रणांगणीं हो! मीं.
यापरि करितां म ख, जरि होइल मध्यें चि विघ्न कार्याला
तरि मग असो विपर्यय[5]' हें मागे मेघनाद आर्याला. १६९
हें परिसुनियां श्री विधि 'दिधलें' ऐसें वदे, तदा बळहा[6]
प्रभुच्या हस्तीं अर्पुनि, पावे आनंद मूढधी खळ हा. १७०
रावणिदत्तप रा जयखिन्नेंद्रातें म्हणे सरोजजनी,
'गौतमभार्याधर्षणपातकफळ पावलासि आज जनीं.'
अनुचित कर्म म दांधा! केलें त्याचा विपाक[7] हा साचा;
अंजनपथभजननिरत[8], भाजन होतो जनोपहासाचा.

---

१. आपल्या चुलत्याचा (रावणाचा) अन्याय. २. पापप्रिय अशा रावणास. ३. उत्तमभाषणचातुर्यानें. ४. ब्रह्मदेव. ५. उलटें. ६. बलासुरनाशक इंद्र. ७. परिणाम. ८. अंधकारयुक्त मार्गाचा आश्रय करणारा.

शक्राशि म्हणे कं ज ज, 'निजनगरीला विशंक आपण जा;'
ऐसें वदोनि गेला स्वस्थानाला सुरारिचा पणजा. १७३
जिंकायातें हैहै[1] य रावण माहिष्मतीस[2] सेनाहीं
वेष्टी, तों म्हणती जन, 'अर्जुन दशकंधरा! पुरीं नाहीं'.
मग नार्मदती[3] रा लों[3] जाउनि दशकंठ तो विहार करी;
तेथें क्रीडत होता अर्जुन जैसा करेणुयुक्त करी. १७५
दशशतबाहु म हीपति आलिंगी नर्मदाप्रवाहातें;*
तेणें मागें मुरडे, जळ पाहे दुष्ट तेधवां हा तें. १७६
मेकलगिरिरा[4] ज सुता वरिती जाली महार्णवाला,[5] जे
मागें फिरतां त्राटे, भूपें आलिंगितां मनीं लाजे. १७७
अर्जुन कुंवल य नायक, कुवलयनयनांगनागणीं[6] केली
रेवोदकीं[7] करी, तों दशकंठें युद्धकामना केली. १७८
मग अर्जुन र ज नीचर दोघे करिती अपूर्वसमराशी;
जाल्या शोणिततटिनी, मांसाचे ही महीध्रसम[8] राशी.
कृतवीर्यतन य युद्धीं जिंकुनि दशकंधराशि बद्ध करी;
कारागारीं ठेवी, जैसा आरण्यक प्रमत्त करी. १८०
बहुदिन तो का रा गृहवासीं होता विमूढ दिक्तुंड;
करुणार्णवें पुलस्त्यें सोडविलें त्राणहीन नातुंड. १८१
ऐसें जाल्यावर म ग दशकंठानें अनंतबळशाळी
दक्षिणसागरतीरीं संध्या करितां विलोकिला वाळी.
केली रक्षोनाथें श्री मद्वाळीसवें तदा चेष्टा;

---

१. सहस्रार्जुन. २. एतन्नामक नगरीस (महेश्वरास). ३. मूळ पाठ—**मेकल-कन्यातरिरा** * नर्मदा—**पंत**. आरंभीचा **मग यमुनातीराला** हा पाठ हरताळून च तेथें हा घातला आहे ४. मूळ पाठ—**सकलद्विजराजसुता**. हा हि पाठ मूळचा कांहीं हरताळून च लिहिला आहे. ५. धरा—**पंत**. ६. कमलनयना स्त्रियांच्या समूहीं. ७. अन्य पाठ—**यमुनोदकीं**. हा पाठ खोडावयाचा राहिला असावा. ८. पर्वताएवढे.
* **भानुजाप्रवाहातें** हा पाठ हरताळून तेथें **सोमजाप्रवाहातें** असा मूळ पाठ आहे.

निजगर्वनाशदक्षा सर्वजगद्वासहेतु नीचेष्टा. १८३
मागुनि जाउनि रा वण घाली कक्ष्यांतरांत हातातें;
तैसा चि तेथ धरिला रगडुनियां अंगदाचिया तातें.
तो कक्ष्यालोमाश्र[1] म भासे जडली तदस्रलोभा[2] ऊं[3];
घर्मोष्मपाचिताकृति[4] नारकिंचा[5] काय हा सखा भाऊ?
वानरकुलरा ज करी सर्वांबुधिमज्जनाशि तों चिरडे;
श्वासविरोधव्याकुळ केवळ दशकंठ तो मनीं चि रडे.
तो कपिजनना य क मग किष्किंधेला चि जेधवां आला,
तेव्हां कक्ष्येपासुनि सोडी याला परेतकल्पाला[6]. १८७
कक्ष्याकारागारीं रा वण अत्यंत पावला ताप;
हरिपतिच्या[7] यात्रेसह या दुष्टाचें हि संपलें पाप. १८८
प्लवगवरास म वेत क्षणदाचर सख्य साधिता जाला;
याला तारापतिनें, आज्ञा दिधली पुरीस जायाला. १८९
यापरि कथा द्वि ज[8] र्षभ वदला, ते ऐकिली सुधासारा;
राम म्हणे, 'मारुतिचा उद्भव ही सांगिजे, बुधा! सारा.'
लोपामुद्रेचा प्रि य तेव्हां हें जानकीवरास वदे,
'तूं सेवीं स्वस्थमनें, अन्याला ही कथावरासव दे.'
कपिरमण अं ज नीपति जो नामें ख्यात केसरी राया!
पवनापासुनि पूर्वीं प्रसवे या मारुतास तज्जाया. १९२
हा पवनतन य पूर्वीं शिशु असतां, अंजनी फळाहरणा
गेली होती तेव्हां, करिता जाला महाद्भुताचरणा. १९३
उदितप्रभाक रा ला क्षुधित मरुत्पुत्र पक्क फळ मानी;
मुदित उडे गगनीं, तों हानि गणी राहु तो महामानी.

---

१. काखेंतील केसांत रहाणारी. २. त्या वालीच्या रक्ताच्या आशेनें. ३. ऊ इति महाराष्ट्रभाषया यूकानाम—**पंत.** ४. घाम व उकाडा यानीं शिजून निवाला आहे देह ज्याचा. ५. नरकस्थ जीवाचा. ६. प्रेतवत् झालेल्याला. ७. वानराधिप लीच्या. ८. ब्राह्मणश्रेष्ठ अगस्त्य.

'दिल्हें कां अन्याला म द्रक्ष्य?' असें पुसे सुरेशाला;
ऐसें अद्भुत ऐकुनि अवलोकायास इंद्र ही आला. १९५
ज्या काळीं तो आला श्री मानैरावताधिरूढ हरी;
रवि सोडुनि फळमतिनें फिरला ऐरावताकडे[1] चि हरी.
स्वगजत्राणप रा नें इंद्रानें टाकितां चि शतकोटी[2]
तुहिननगीं कपि पडला; तों जाले भग्न वृक्ष शतकोटी.
पविभग्नहनु म रुत्सुत मृतकल्प पडे; तदा स्वतोकाला
अंकीं घेउनि रडतां, त्यजी जगत्प्राण[3] सर्व लोकाला. १९८
वातपरित्यक्त ज नीं जाला सर्वत्र मूत्रमळरोध;
तेव्हां सर्व सुरांसह, याचा केला चतुर्मुखें शोध. १९९
हिमवद्गुहाल[4] य स्थित पवमान प्रार्थिला पयोजभवें;
हस्तस्पर्शें केला मारुति जीवंत त्या जगत्प्रभवें. २००
देवांसह चतु रा स्यें नाम हनूमंत ठेविलें याचें;
शस्त्रास्त्रावध्यत्व हि चिरजीवित्वासवें दिलें साचें. २०१
त्यावरि अप्रति म बळें मारुतिनें बाळकस्वभावानें
मुनि पीडिले, तदा ते शापिति ऐसे तपःप्रभावानें:
'बळमत्ता! मुनि ज न तूं पीडिशि, ऐसा अशांत दुःशील;
अन्यें कथिल्यावांचुनि निजवीर्यज्ञानहीन होशील.'
ऐसा वाततन य हा शापातें पावला म्हणून बल
याचें यास कळेना, अन्यें कथिल्याविना असें नवल.'
हा पवनतनु ज संभव आइकिला कुंभजाननें रामें
सुग्रीववालिवानरजन्मकथाकर्णनस्पृहाधामें. २०५
'वालिसुकंठाह्व[5] य कपिसंभव ही सांगणें' म्हणे राम;
भगवान् कुंभसमुद्भव कथिता जाला कथा यथाकाम.
"विधिलोचननी रा चा बिंदु पडे भूतळीं, तदा जाला

---

१. मूळ पाठ—**ऐरावणाकडे**. २. वज्र. ३. वायु. ४. हिमाचलाच्या एका गुहेंत जाऊन बसलेल्या. ५. वालीसुग्रीवनामक कपींची उत्पत्तिकथा.

ऋक्षरजानाम कपी, पाळी सुततुल्य आत्मभू ज्याला.
मेरूत्तरपार्श्वीं[1] म ग फिरतां पाहे स्वबिंब कासारीं;
रिपुमतिनें पडला, तों अंगें स्त्रीरूप पावलीं सारीं. २०८
त्या स्त्रीरूपालोकें श्री शक्राकाँशि जाहला काम;
एकीवर दोघे ही पडले येवूनियां महोद्दाम. २०९
केशीं अमर व रा चें शुक्र पडे, तो चि जाहला वाळी;
कंठीं भास्करवीर्यें जन्मे सुग्रीव हा यशःशाळी. २१०
प्राप्तस्वरूप सु म ती ऋक्षरजा पुत्रयुक्त, धात्यातें
वंदुनि वृत्त वदे, तों किष्किंधाराज्य दे पिता त्यातें.
आतां कथितों तु ज मीं सीतेचा हरणहेतु देवास
कर्णद्वारें नेउनि चित्तागारीं कथेशि दे वास. २१२
जो विधिचा तन य मुनी सनत्कुमार त्रिलोकनुतपाद
त्यासीं दशकंठाशीं जालासे मुक्तिहेतु संवाद. २१३
'जे हरिच्या स्वक रा नें मरती जन वैरभक्तिसंपूर्ण[2],
ते श्वेतद्वीपातें पावुनि जातात मुक्तिला तूर्ण.' २१४
ऐसें विधिसुत म त तो दशमुख ऐकोनियां विरोधाला
तुजसीं करूनि समरीं मरूनि अमृतें जगद्गुरो[3]! धाला.
नारद नाम द्वि ज वर पूर्वीं वदला दशाननें पुसतां,
'श्वेतद्वीपनिवासी केवळ बळवंत मान्य सर्वसतां[4].' २१६
हें ही परिसुनि य त्नें, तेथें जातां चि राघवा रामा!
पीडिति दशाननाला त्या श्वेतद्वीपवासिनी रामा[5]. २१७
तेथें द्रुहिणात्म[6] ज मुनि हांसे म्हणवूनि तव करें मेला;
श्वेतद्वीपजनाशीं तुळणा पावावयाशि तो गेला. २१८
तो विमळहृद य केवळ दशकंधर मोक्षकाम रघुराया!
केला विरोध तुजसीं, जाया नेवूनि, मुक्तिला जाया.

---

१. पार्श्व=भाग. २. मूळ पाठ–**भक्तिवैरसंपूर्ण**. ३. हे रामा! ४. सर्व साधूंना. ५. स्त्रिया. ६. ब्रह्मदेवपुत्र नारद.

तुज जगदात्मा रा मा! पावायाच्या धरूनियां कामा,
सीता जैशी माता, तैशी नेली दशाननें रामा!" २२०
ऐसें अगस्त्यना म द्विजपति सांगोनि आश्रमा गेला;
जनकादिकांशि रामें मग बहु सत्कार आदरें केला. २२१
जे जे आले होते, श्री वैदेहादि भूप पूजाया
त्यांला सत्कारुनियां, आज्ञा दे ताटकारिपू जाया. २२२
पूजुनियां रघु रा जें अंगदसुग्रीवजांबवत्प्रमुख,
पाठविले स्वस्थाना, देउनि निजभक्तिरूपनित्यसुख. २२३
हृदयीं धरुनि म रुत्सुत रामें केला निदेश जायाला;
दिधलें चिरजीवित्व प्रायः स्वपदांबुजें भजायाला. २२४
मारुति म्हणे, 'म ज क्षण विस्मरण नसो तुला जपायाचें;
मन्निकट अप्सरांहीं सद्यश गावें तुज्या चि पायाचें. २२५
यावत्काळ तुजें य श, तोंवर तवपाददास वांचावा;
त्वच्चरितामृतसद्रस हृदयघटामाजि नित्य सांचावा.'
हें पवनकुमा रा तें मुक्तामालासमेत दे हातें;
मारुति जातां आलें बाष्प प्रभुतें मनुष्यदेहातें. २२७
पुष्पक धनदें[1] म णानें पाठविलें तें मनुष्यवचनाहीं
येउनि रामाशि म्हणे, 'तुजविण लोकीं शरण्य मज नाहीं.
द्रविणेंद्रानें म ज ला आज्ञा केली तुला चि वाहाया;
यास्तव आलों रामा! तुझिया पायांसमीप राहाया.'
नृपति म्हणे, 'तूं य क्षपनिकट यथापूर्व जा वसायाला;
कार्यांतरीं स्वचित्तीं आठवितां, येत जा बसायाला.' २३०
रघुसत्तमभु[2] ज विक्रमपरिहृतरक्षोमहाभरक्षोणी
द्रोणी[3] सुखामृताची जाली, प्राणी नसे श्रमी कोणी. २३१
प्रभु अयुतहा य नें तो राज्य करी भूमिनंदिनीसहित;

---

१. कुबेरानें. २. रामाच्या बाहुबलानें हरण झाला आहे राक्षसभार जिचा अशी पृथ्वी. ३. डोण.

महितचरित्रें त्याच्या लाभे अत्यंत मेदिनीस हित. २३२

गर्भवती मग  रा त्री जाली तीतें पुसे तिचा कांत;
'दोहद कैसा सुंदरि! सांग तुझें काय इच्छितें स्वांतें[1]?'

पतिवाक्य वसु म तीची कन्या ऐके असें यथार्थ यदा,
'तापसवनावलोकनदोहद जाला' म्हणे मनःप्रियदा.

तेव्हां भूकन्येला श्री राम म्हणे, 'प्रियोत्तमे! जावें;
परि तवविरहदिनातें मीं युगसम मानसांत मेजावें.'

रघुनाथ  अर्ध  रा त्रीं ऐसें बोलोनियां करी शयन;
निशिं[2]चरमभागसमयीं उठला मग शोण[3]नीररुहनयन.

रामाप्रति त्या स म यीं वंदन करिती करद्वयें चार;
त्यांला म्हणे रघूद्वह, 'कैसा आहे जनीं समाचार?' २३७

'दशमुखहृत  ज नकसुताग्रहणास्तव निंदिती तुला लोक,'
ऐसें चारमुखानें ऐकुनि रघुनाथ पावला शोक. २३८

चारजनोक्ताप  य श स्वमुखानें सर्व बांधवांस वदे;
जनकसुतात्यागाज्ञा सौमित्रीतें त्रिलोकवासव दे. २३९

वैदेहीला कांहीं रा घवसंकल्प हा नसे कळला;
द्वारीं रथाशि पाहुनि 'रामकृपांभोद' ते म्हणे 'वळला'.

रघुनाथाची र  म णी सौमित्रि सुमंत्र पाहतां हर्षे,
आनंदच्छद्मानें लक्ष्मण बाष्पोदकें[4] तदा वर्षे. २४१

अत्यंतौत्सुक्यानें ज नकसुता बैसतां रथावर ती,
लक्ष्मण सुमंत्र तेव्हां धैर्यानें बाष्पपूर थांवरती[5]. २४२

गुर्वाज्ञाभंगभ  य त्रस्तसुमित्रासुतें धराकन्या
वाल्मीक्याश्रमविपिनीं नेउनियां टाकिली जशी वन्या[6].

'अपवादभयें  ज ननि! त्यजिलें तुजला जगन्निवासानें,'
ऐसें सांगुनि लक्ष्मण रडतां झांकी मुखाशि वासानें. २४४

---

१. अंत:करण. २. पहांटेस. ३. आरक्तकमलनेत्र. ४. अश्रू. ५. आटोपिती.
६. रानट.

तुज जगदात्मा रा मा! पावायाच्या धरूनियां कामा,
सीता जैशी माता, तैशी नेली दशाननें रामा!" २२०
ऐसें अगस्त्यना म द्विजपति सांगोनि आश्रमा गेला;
जनकादिकांशि रामें मग बहु सत्कार आदरें केला. २२१
जे जे आले होते, श्री वैदेहादि भूप पूजाया
त्यांला सत्कारुनियां, आज्ञा दे ताटकारिपू जाया. २२२
पूजुनियां रघु रा जें अंगदसुग्रीवजांबवत्प्रमुख,
पाठविले स्वस्थाना, देउनि निजभक्तिरूपनित्यसुख. २२३
हृदयीं धरुनि म रुत्सुत रामें केला निदेश जायाला;
दिधलें चिरजीवित्व प्रायः स्वपदांबुजें भजायाला. २२४
मारुति म्हणे, 'म ज क्षण विस्मरण नसो तुला जपायाचें;
मन्निकट अप्सरांहीं सद्यश गावें तुज्या चि पायाचें. २२५
यावत्काळ तुजें य श, तोंवर तवपाददास वांचावा;
त्वच्चरितामृतसद्रस हृदयघटामाजि नित्य सांचावा.'
हें पवनकुमा रा तें मुक्तामालासमेत दे हातें;
मारुति जातां आलें बाष्प प्रभुतें मनुष्यदेहातें. २२७
पुष्पक धनदें[1] म णानें पाठविलें तें मनुष्यवचनाहीं
येउनि रामाशि म्हणे, 'तुजविण लोकीं शरण्य मज नाहीं.
द्रविणेंद्रानें म ज ला आज्ञा केली तुला चि वाहाया;
यास्तव आलों रामा! तुझिया पायांसमीप राहाया.'
नृपति म्हणे, 'तूं य क्षपनिकट यथापूर्व जा वसायाला;
कार्यांतरीं स्वचित्तीं आठवितां, येत जा बसायाला.' २३०
रघुसत्तमभु[2] ज विक्रमपरिहृतरक्षोमहाभरक्षोणी
द्रोणी[3] सुखामृताची जाली, प्राणी नसे श्रमी कोणी. २३१
प्रभु अयुतहा य नें तो राज्य करी भूमिनंदिनीसहित;

---

१. कुबेरानें. २. रामाच्या बाहुबलानें हरण झाला आहे राक्षसभार जिचा अशी पृथ्वी. ३. द्रोण.

महितचरित्रें त्याच्या लाभे अत्यंत मेदिनीस हित. २३२

गर्भवती मग रा ज्ञी जाली तीतें पुसे तिचा कांत;

'दोहद कैसा सुंदरि! सांग तुझें काय इच्छितें स्वांतें[1]?'

पतिवाक्य वसु म तीची कन्या ऐके असें यथार्थ यदा,

'तापसवनावलोकनदोहद जाला' म्हणे मनःप्रियदा.

तेव्हां भूकन्येला श्री राम म्हणे, 'प्रियोत्तमे! जावें;

परि तवविरहदिनातें मीं युगसम मानसांत मेजावें.'

रघुनाथ अर्ध रा त्रीं ऐसें बोलोनियां करी शयन;

निशिचरमभागसमयीं[2] उठला मग शोणनीररुणनयन[3].

रामाप्रति त्या स म यीं वंदन करिती करद्वयें चार;

त्यांला म्हणे रघूद्वह, 'कैसा आहे जनीं समाचार?' २३७

'दशमुखहृत ज नकसुताग्रहणास्तव निंदिती तुला लोक,'

ऐसें चारमुखानें ऐकुनि रघुनाथ पावला शोक. २३८

चारजनोक्ताप य श स्वमुखानें सर्व बांधवांस वदे;

जनकसुतात्यागाज्ञा सौमित्रीतें त्रिलोकवासव दे. २३९

वैदेहीला कांहीं रा घवसंकल्प हा नसे कळला;

द्वारीं रथाशि पाहुनि 'रामकृपांभोद' ते म्हणे 'वळला'.

रघुनाथाची र म णी सौमित्रि सुमंत्र पाहतां हर्षे,

आनंदच्छद्मानें लक्ष्मण बाष्पोदकें[4] तदा वर्षे. २४१

अत्यंतौत्सुक्यानें ज नकसुता बैसतां रथावर ती,

लक्ष्मण सुमंत्र तेव्हां धैर्यानें बाष्पपूर थोवरती[5]. २४२

गुर्वाज्ञाभंगभ य त्रस्तसुमित्रासुतें धराकन्या

वाल्मीक्याश्रमविपिनीं नेउनियां टाकिली जशी वन्या[6].

'अपवादभयें ज ननि! त्यजिलें तुजला जगन्निवासानें,'

ऐसें सांगुनि लक्ष्मण रडतां झांकी मुखाशि वासानें. २४४

---

१. अंत:करण. २. पहांटेस. ३. आरक्तकमलनेत्र. ४. अश्रू. ५. आटोपिती. ६. रानट.

भूतनयांघ्रिद्व य तो वंदुनि जातां पुराशि फार रडे;
नेली राजाज्ञेनें तनु परि मन तें न सर्वथा मुरडे. २४५
रामानुज नग रा ला येतां मार्गीं रडे जसा तोक;
तों कवि सुमंत्र सांगे इतिहासातें हरावया शोक. २४६
"दिग्रथ[1] एकास म यीं गेला होता पुरोहितावासा;
तेथें आला होता मुनिनाथ ज्ञानसिंधु दुर्वासा. २४७
कौसल्येच्या कांतें श्री दुर्वासा तपोनिधान मुनी
रामाच्या भाव्यर्थश्रवणार्थ प्रार्थिला शिरें नमुनीं. २४८
तेव्हां भूपकुमा रा! मुनि वदला तें च सांगतों तूतें;
ऐकें स्वस्थस्वांतें, राघवसीतावियोगहेतूतें. २४९
'हरिसंत्रस्त स म स्त हि दैत्य भृगुस्त्रीस[2] पावले शरण;
म्हणती, 'माते! रक्षीं. विष्णुकरें सर्व पावतों मरण.' २५०
परिसुनि हें द्वि ज पत्नी दे जेव्हां अभय दैत्यलोकाला,
तेव्हां हरिनें वधिली, तैं भृगु पावे सकोपशोकाला.
धरणीसुरना[3] य क भृगु विष्णूशि म्हणे, 'ममांगनाघातें
श्रीविरहानें तूं ही पावें अतितीव्रदुःखसंघातें.' २५२
तो श्रीरमण प रा त्पर जाला तव पुत्र राम हा राया!
पावेल स्त्रीविरह द्विजशापाच्या फळाशि भोगाया.' २५३
दुर्वासा विप्रोत्त म वदला जें तें चि जाहलें साचें;
हर्षें चरित्र पाहें मानुषतनुचें जगन्निवासाचें. २५४
घेउनियां मनु ज तनू संसार असार हें चि कळवाया
सृष्टिस्थितिलयकर्ता वर्ततसे भक्तमोह पळवाया." २५५
मानसशोकक्ष य पटु इतिहास असा सुमंत्र सूत कथी;
तच्छ्रवणानें जाला कांहींसा खेदहीन दाशरथी. २५६
तदुपरि मनु ज वराच्या कौसल्यासूनुच्या पदीं नमना
करुनि सुमित्रानंदन सांगे 'त्यजिली' म्हणूनि दीनमना.

---

१. दशरथ. २. स्वपुरोहितजननीला. ३. ब्राह्मणश्रेष्ठ. ४. लक्ष्मण.

ऐकुनि शोकोद   य बहु सीतेचे ते विलाप पृथु[1] कानीं
वाल्मीकिनाम मुनिला हें कथिलें वर्तमान पृथुकानीं[2].

मग तो धरासु   रा धिप वाल्मीकि तपोनिधान पूतमती
सीतेला अवलोकुनि मानी निजपुण्यसिद्धि मूर्तिमती.

जनकासम स   म जाउनि आणी पुण्याश्रमासि वसतीतें;
'[3]नवदलशालेमध्यें' म्हणे, 'हराया श्रमासि वस' तीतें.

साकेतीं बंधूंतें   श्री राम म्हणे, 'प्रजापरित्राणीं
जो अप्रमत्त धर्मीं, तो लोकीं शर्म पावतो प्राणी. २६१

पहिला नृगाख्य   रा जा होता, जो दान[4]शौंड जनमान्य;
ऐसा भूपति कोणीं पूर्वी सूर्यान्वयांत न वदान्य. २६२

गोदानें अत्युत्त   म दिधलीं ज्याणें असंख्य विप्रकरीं;
जो लाजविता जाला तारा[5]पतिला [6]यशश्छविप्रकरीं. २६३

प्रथम दिली द्वि   ज हस्तीं ते सुरभी ये पळोनि कळपाला;
नेणुनि पराशि देतां, शापी भूदेव भूमितळपाला. २६४

शापानें नरना   य क जाला तो घोररूप [7]कृकलास;
म्हणउनि सावध वर्ता, ऐसें कथितों हितार्थ सकलांस.

गुरुसुरविप्रा   रा धन करितां बहु सावधान [8]आचरणें,'
ऐसें कथिलें रामें, हरिला जनदोष ज्याचिया चरणें. २६६

त्यावरि एका स   म यीं [9]भिन्नशिरा [10]सारमेय रामातें
येउनि म्हणे, 'यतीनें दोषावांचूनि दंडिलें मातें.' २६७

धाडुनि सेवक   ज न तो संन्यासी आणिला नृपाळानें,
पुशिलें वृत्त समस्त प्राणित्राणक्षमें कृपाळानें. २६८

'मार्गांत सारमे   य स्पर्शेल म्हणोनि वारिला परता.
पर ताडिल्याविणें हा दूर न जाला विभो! [11]अपापरता!

---

१. मोठे. २. मुनिशावकैः—पंत. ३. नूतन पर्णशालेंत. ४. दात्यांमध्यें श्रेष्ठ. ५. चंद्राला. ६. कीर्तिरूप कांतीच्या समूहीं (सतेजपणांत). ७. सरडा. ८. खोडलेला पाठ—वर्तावें. ९. डोकें फुटलेला. १०. कुत्रा. ११. पापरहिता.

यास्तव रामा! म ज ला आला कोप क्षणांत उद्दंड;
क्षुधितें भिक्षान्नधरें केला दंडेंकरूनियां दंड. २७०
शांतिक्षमादया य मनियमें यतिनें सदैव वागावें;
परि दैवें अघ घडलें, तें तुज रामा! यथार्थ सांगावें.
शासन मला क रा या धर्मज्ञा! योग्यता तुला आहे,'
ऐसें तो यति वदतां, कुकुरवदनाकडे प्रभू पाहे. २७२
तेव्हां तो श्वा क्रोधें म नुजेंद्राला म्हणे, 'अशा यतिला
सांगावा धर्मज्ञा! रामा! धर्माधिकार दुर्मतिला.' २७३
हें परिसुनियां श्री मद्राम म्हणे, 'दंड हा कसा? यास
वस्त्रें वेष्टा म्हणशी, जो योग्य चि रज्जुनें [1]कसायास.' २७४
[2]भषण म्हणे, 'श्री रा मा! होता धर्माधिकार मजला हो!
तेणें श्वयोनि घडली, अविवेकी हा अशी च गति लाहो.'
हा सारमेयसं म त दंड यतीतें रघूत्तमें केला;
त्यावरि [3]गृध्रहृतालय घूक हि रघुनायकाकडे गेला. २७६
गृध्र म्हणे, 'मनु ज पते! मद्गेहातें उलूक हा हरितो.'
घूक म्हणे, 'माजें गृह; अन्याय चि गृध्र सर्वथा करितो.'
ऐसें ऐकुनि न य पटु राम म्हणे, 'लागला कधीं दावा?
केव्हांपासुनि तुमचा [4]गेहव्यवहार तो निवेदावा.' २७८
गृध्र म्हणे, 'रघु रा या! जाली मनुजावृता जधीं अवनी,
तेव्हांपासुनि आहें भवनीं, आतां समर्थ तूं अवनीं.'
'जेव्हां क्षिति वृक्ष म यी तेव्हांपासूनि नांदलों भवनीं;
भवनिर्दलना! रक्षीं,' घूक म्हणे,' तूं नयज्ञ या भुवनीं.'
राम म्हणे, 'मनु ज मग, प्रथम द्रुम, गृध्र चोर, घूक खरा.'
तेव्हां कविनीं स्तविली कौसल्यासूनुची मति प्रखरा.
करुनि परालं[5] य हृतिमिष रघुनाथाच्या करांबुजस्पर्शें,

१. बद्धुमित्यर्थः–**पंत.** २. कुत्रा. ३. हृतं आलयं येन स गृध्रः–**पंत.** ४. घराची वहिवाट. ५. परगृहहरणनिमित्त.

गौतमशापापासुनि सुटला तो ब्रह्मदत्त[1] नृप हर्षें. २८२
यमुनावासि द्वि ज जन आला रामाशि दुःख सांगाया;
पूजुनि त्यांशि म्हणे विभु, 'कळवा जी! कोण हेतु भागाया?'
मुनि म्हणती, 'भ य हरिलें सर्वांचें तूं, परंतु या काळीं
मधुनंदन लवणासुर मारुनि, रामा! द्विजातिजन पाळीं.
मधुनामकासु रा ला पूर्वीं जो अर्पिला शिवें शूळें[2];
तत्सामर्थ्यें जाला लवणासुर तो जगच्छिरःशूळ. २८५
राजेंद्रा! ज्या काळीं म धुपुत्राच्या करीं असे शूळ
तेव्हां केवळ दुर्जय, तद्वर्जित काळ मृत्युचें मूळ. २८६
भक्त्युत्कर्षप्रीतें श्री कंठें अर्पिलें महाशूळ;
तद्वीर्यें लवणासुर दहन त्रिदशादि हे जसा तूळ. २८७
लवणासुर मा रा या काळ चि तो, जेधवां नसे शूळ
वधितां त्यातें, आह्मीं आशीर्वादें तुला चि अनुकूळ.२८८
अतिसत्वर श म वावा मधुवनवासी[3] महाबळी लवण,
वीरांतराशि हा खळ दुःसह, जैसें क्षतांतरीं लवण.
मृगमहिषद्वि ज मांसीं घेतो सद्विप्ररक्त कालवण;
काल वनस्थांचा हा मारावा लोकनायका! लवण.'२९०
त्या काळीं रघुना य क वंदुनियां तेधवां च विप्राज्ञा;
शत्रुघ्नाशि म्हणे, 'जा लवणवधें, लोक वांचविं प्राज्ञा!
मधुकैटभ मा रा या हा शर नारायणें स्वयें केला,
याणें लवणाशि वधीं; पराजयाच्या धरीं न शंकेला.'
आज्ञा घेउनियां म ग गेला शत्रुघ्न त्या मुनींसहित;
मार्गीं जातां भेटे वाल्मीकिनिवास जो जगन्महित.

---

१. कालगौतमनामक मुनीच्या शापानें गृध्रयोनि पावलेला एक प्राचीन राजा.
२. न स्त्रियां शूळः—**पंत**. हा रुद्रदत्त शूल मधूनें मरणसमयीं लवणासुरास दिला.
३. मधुवन हें यमुनातीरीं असून येथें च मधूनें तप केलें, त्या वनांत राहणारा.

भरताच्या अनु[1] ज निला वाल्मीकि स्वाश्रमांत दे वसती;
प्रसवे सुतद्वयातें, त्या रात्री ते मनुष्यदेवसती[2]. २९४
वाल्मीकिनामधे य ब्राह्मण हें आयके महाभाग;
तेव्हां मध्यें छेदुनि कुशमुष्टीचे करी द्विधा भाग. २९५
क्षितिजेचे तनु ज तदा जाउनियां प्रोक्षिलें[3] स्वकीय करें
बाळ[4]ग्रहोपशांतिप्रज्ञाबळकांतिकीर्तिशातकरें. २९६
जो प्रथम तन य मुनिनें मंत्रजळें प्रोक्षिला कुशाग्राहीं
तो 'कुश' कुश[5]मूळोक्षित 'लव' जाणावें असें समग्राहीं.
हें परिसुनियां रा त्रौ पावे शत्रुघ्न हर्ष अतिमात्र;
पात्र सुखाचा जाला, सात्विकभावाष्टकैकहृतगात्र.२९८
वाल्मीकिपादक म ळें प्रातःकाळीं नमूनि यमुनेला,
गेला शत्रुघ्न बळी, जेथें लवणें क्षयासि जन नेला. २९९
सारी सेना तेव्हां श्री भानुसुतेचिया तटीं स्थापी;
राघव[6] विप्राशि म्हणे, 'मारावा केंवि वा महापापी?'
मुनि म्हणती,'वी रा! तूं आधीं धाडूनियां भले चार,
शूलरहितलवणाचा या स्थानीं आणवीं समाचार. ३०१
मग जाउनियां म र्दीं, नाहींतरि याशि जिंकितां धाता,
जय पावेना, याणें पूर्वीं वधिला समर्थ मांधाता.'३०२
त्या शत्रुघ्नें द्विज ज नवचनें जे शीघ्र धाडिले चार,
ते कथिती 'शूलरहित गेला मृगयार्थ' हा समाचार.
त्या समयीं नारा य णनिर्मितशरचाप घेउनि क्षिप्र,
जातां लवणवधाला शत्रुघ्नें वंदिले शिरीं विप्र. ३०४
आसिकवचश रा सनधर गेला शत्रुघ्न मधुपुरद्वारा,
वारावयासि रिपुला, विपुलाभ्रगणासि ज्यापरी वारा.

---

१. शत्रुघ्नाला. २. सीता. ३. उदकसिंचित केलें. ४. मुनिकरस्य तस्य वा विशेषणं—पंत. बालग्रह, शांति, बुद्धि, बल, कीर्ति, शांति, सुख यांतें करणारा (अशा हातानें). ५. दर्भांच्या मूळानीं सिंचन केलेला. ६. शत्रुघ्न.

मृगया करुनि म हाबळ लवण स्वपुरासमीप जों आला,
याला पाहुनि पसरी आ, लालसचित्त भक्षणीं जाला.

करकर तो द्वि ज चावी, फिरवी तप्तायसप्रभें बुबुळें,
इच्छी सेवायातें भरतानुजकंठशोणितांबु बळें. ३०७

संध्यासमयीं तो य द जैसा मधुपुत्र तो तसा गमला,
शत्रुघ्नाशि म्हणे, 'कां आलाशि मरावयाशि सांग मला?'

प्रज्वलितधेनं[1] ज यनिजहेतिगणाकीर्ण ज्यापरी कुंड,
तैसें मधुसुत पसरी शत्रुघ्नाला गिळावया तुंड. ३०९

शत्रुघ्नें खरसा य क सोडुनि वर्मीं च ताडितां लवण
सौमित्रिला वधाया तो मोडी आम्रशालतालवन. ३१०

भूरुहवृंदध रा धरशिखरांहीं वर्षला परंतु खरें
रघुनाथदत्तबाणें मारुनि केलें स्वकीय नाम खरें. ३११

त्या मधुवनांत म धुरी[2] वसउनि बहु वित्त लोक रक्षुनि घे;
द्वादश वर्षानंतर विभुला वंदावया ससैन्य निघे. ३१२

साकेताला येतां, श्री वाल्मिक्याश्रमीं करी वास;
पूजी नानारत्नें त्या निर्लोभास भूमिदेवास. ३१३

सीतेच्या पुत्रांहीं रा त्रौ वीणास्वरादियोगानें
सौमित्रिचित्त हरिलें मुनिकृतरामायणाचिया गानें. ३१४

वैदेहीपदक म ळें अवलोकावीं असें मनीं होतें;
परि रामलोकभीतें[3] केलें नाहीं च राघवें हो! तें. ३१५

प्राचेतसासि अं ज लि जोडुनि तेथें क्रमूनियां राती
साकेतीं रामाला वंदीं जावूनि मधुसुताराती. ३१६

तेथें द्विजतन य मरे, तेव्हां त्याचा पिता करी शोक;
तो कष्टें दुःखानें ठेवी रामासमीप मृत तोक. ३१७

विप्र म्हणे, 'रघु रा या! यामार्गे बाळमृत्यु पितरांहीं

---

१. प्रदीप्तअग्निज्वाळासमूहानें व्याप्त. २. शत्रुहंतृत्वाच्छत्रुघ्नत्वं तदन्वर्थीकृतमिति-भावः—पंत. (?) ३. रामाला व लोकांला भ्यालेल्यानें.

नाहीं विलोकिला, परि तव राज्यें देखिजेल इतरांहीं.
आधीं वैवस्वत म नु, अंतीं अजपुत्र पंक्तिरथ जाला,
तद्राज्याचा ठाईं दुर्लभ तें येथ लभ्य मनुजांला. ३१९
तुजसम नृप ज गतीवर असतां, रामा! प्रजेशि काय उणें?
स्वगुणें मत्तुल्यजनत्राण चि करिजेल सर्वथा निपुणें.
संपादिलें बरें य श, धर्मात्मा धन्य तूं भला राजा!
हे तव गुण गायाला, गेला स्वर्गाशि बाळ हा माजा.
हा! हा! वत्सा! मीं तु ज एकाकी धाडिलें कसें नाकीं?
परि येइल भेटाया यावरि बहु लोकतोकसेना कीं. ३२२
तुझिया राष्ट्रीं तो य द नलगेत, सदैव लोकबाष्पांहीं
रामा! भिजोनि पृथ्वी शोभेल विचित्रसस्यशष्पांहीं.[1]
त्रिदशजनांच्या[2] रा मा गौरीशापें अलब्धवत्समुखा
मनुजापत्यें धाडुनि रामा! देशी तयांशि पुत्रसुखा. ३२४
स्वर्गांच्या सौख्यातें म र्त्यापत्यांसि दाविशी राया!
चिरकाळ सुखी राहें, आम्हांवरि फारशी तुझी माया.'
गतपंचप्राणें[3] श्री सुतशव ठेवूनियां नृपद्वारीं,
ब्राह्मण विलापबाणें ताडी रघुवल्लभासि जिह्वारीं.[4] ३२६
समजावूनि, ध रा सुरनेत्रातें आपुल्या करें पुशिलें;
नारदमुनिला द्विजसुतमृतिकारण जानकीवरें पुशिलें.
तो देवर्षि महा म ति विभुशि म्हणे, 'प्रश्न हा बरा केला;
वर्णाचारविपर्यय[5] जाला म्हणवूनि विप्रसुत मेला. ३२८
धर्मज्ञा! श्रीरामा! ज गतीवर वर्णकर्म शोधावें;
केलें असेल शूद्रें तप तें वारावयाशि तूं धावें. ३२९
हें वर्णचतुष्ट य जरि निजधर्माचा करील परिहार[6];
तरि परधर्माचारें, होतो ऐसा चि लोकसंहार. ३३०

---

१. अनेक प्रकारच्या धान्यतृणानीं. २. देवस्त्रिया. ३. गेली प्राणशोभा ज्याची. ४. मर्मी. ५. जातिधर्माचें उल्लंघन. ६. त्याग.

यास्तव शोध क रा वा, स्वाचारभ्रष्ट लोक दंडावा;
डावा[1] चाप असो तुजें, जातां द्विजशोक शीघ्र खंडावा.'
ऐसें रघुसत्त म तो ऐकोनि सुरर्षिला करी नमनें;
स्मरतां पुष्पक आलें, त्यावर बैसोनि जाय दीनमनें. ३३२
दशरथसुत ज गतीवर सर्वत्र करूनि शोध पापाचा
दक्षिणदिशेशि गेला, करुणाघन सर्वलोकतापाचा. ३३३
तों एक नैकतो[2] य जमंडित कासार सारसावास[3]
अवलोकिला नृपाळें घ्राणें सेवूनि सारसा[4] वास. ३३४
तेथ अधोमुख ज टिल द्रुमशाखालंबमान[5] रामानें
धूमप्राशन करितां विलोकिला शूद्र धर्मकामानें. ३३५
त्याप्रति नामान्व य जों राम पुसे, तों म्हणे, 'अहो स्वामी!
मीं शंबूक जघन्यज[6] तप करितों स्वर्गलोकसुखकामी.'
ऐवं वचनवि रा मीं[7], त्याचें धर्मकपाळकें रामें
खड्गेंकरूनि मस्तक तत्काळ च्छेदिलें दयाधामें. ३३७
१ करूनि अ म रपुरीं भोगेच्छा ही करावया पूर्ण
देवांसह पाठविला शूद्र प्रभुनें दयाघनें तूर्ण. ३३८
धर्मत्राणानंदें श्री कंठद्रुहिणशक्रमुख देव
'घे वर' म्हणतां, मागे द्विजनंदनजीवनासि नरदेव. ३३९
येतां निजनग रा ला मार्गीं पाहे घटोद्भवावास[8];
तेथें जाउनि वंदी आनंदें राम भूमिदेवास. ३४०
रामप्रतें विप्रोत्त म तेव्हां अर्पी अमूल्य आभरण;
मग येउनि साकेतीं रघुवीर करी सुखें प्रजाभरण. ३४१
सुखोत्थितसम नि ज सुत उठतां द्विज तो अतिप्रमोदानें
गेला गृहाशि, विभुला तर्पुनि आशीर्धनाचिया दानें.

---

१. तवकार्यसिद्धिर्भवत्विितिभाव:—**पंत.** २. अनेककमलयुक्त. ३. सारसपक्ष्याचें वसतिस्थान. ४. श्रेष्ठसा. ५. वृक्षाच्या खांदीस लोंबणारा. ६. शूद्र. ७. ह्या बोलण्याच्या अखेरीस. ८. अगस्त्याश्रम.

मग राजसू    य यज्ञप्रारंभाची उठे स्पृहा रामीं;
भरत म्हणे, 'इच्छींना सुततुल्यक्ष्मापतिप्रहारा मीं. ३४३

जरि राजसूय    रा जा! रामा! करिशील तरि जनामाजी
पीडा घडेल यास्तव, न करावा हे च कामना माजी.' ३४४

कैकेयीतनय    म तें हें सारें मानिलें नयज्ञानें;
आरंभिलें तयावर, यजावया वाजिमेधयज्ञानें. ३४५

त्या यज्ञाचा ठाईं ज नकसुतापुत्रयुक्त आद्यकवी
येउनिया शिष्यांतें, 'रामायण गात जा' असें शिकवी.

'हें मत्कृत रामा य ण ऐकुनि बाहेल राम जरि गाया,
तरि गा. याचा कर्ता पुसतां, आज्ञा असे चि सांगाया.

पुसतां जननी    ज नक प्राज्ञाहीं सर्वथा न सांगावें;
वाल्मीकिशिष्य म्हणवा, निस्पृह सर्गां विसां दिसा गावें.'

ऐसा तो मुनिना य क वदतां, वंदूनियां तयाशि, कृती
कुश लव दोघे गाती साकेतीं ते नवीन विप्रकृती[1]. ३४९

काव्यश्रवण क रा या नेले रामें करूनि सत्कृतिला;
पंडितजनांत गाती कुश लव बंधू यथोक्त सत्कृतिला[2]. ३५०

आकृतिवर्णस    म त्वें नृपचिह्नें राम पुत्रसे समजे;
परि ते किमपि न वदती, गुरुवचनीं अचळ पर्वतासम जे.

'नेणों मातातात श्री मद्वाल्मीकिचे खरे छात्र;
पात्र तदीय दयेचे, न कळे' म्हणती 'अणीक तिळमात्र.'

वदती धराव    रा नें पुसतां ऐसें चि ते, तदा राजा
भरताशि म्हणे, 'वत्सा! मुनिला आणावया उदारा! जा.'

मग मुनिसत्त    म आणुनि, नमिलें युग विप्ररायपायांचें;
रामें विचारिलें कीं, 'ताता! कुळनाम काय पां यांचें?'

प्राचेतसमुनि    ज लरुहनयनातें रामचंद्रनामातें
हांसोनि म्हणे, 'वत्सा! आतां पुसतोशि काय गा! मातें?

---

१. वाल्मीकीची काव्यरूप कृति. २. सुकवितेला.

त्वां त्यजिली जे प्रि[1] य ता अपवादभयें वनांतरीं रामा,
त्या साध्वीचे कुशलवनामक दोघे तनूज हे रामा!
[2]सुतनिर्विशेष रा या! त्वत्सुत मीं रक्षिले यथाशक्ति;
सीतेसह याणीं ही माजी केली सदैव सद्भक्ति. ३५७
जनकनृपोत्त म कन्या पंक्तिरथाची स्नुषा सती धन्या
अन्यायें चि वदान्या! वन्यासी टाकिली कशी मान्या?
दिव्य दिलें कीं तु ज ला प्रत्यय चित्तांतरांत उपजाया,
जाया परि संत्यजिली; कोणीं नव्हता समर्थ वैर[3]जाया?
अंतर्वत्नी पत्नी य शस्विनी धर्मचारिणी आर्या,
कार्याकार्यविचार न करितां, तूं टाकिली कसी भार्या?
विपिनीं रडतां ज नकक्षितिनाथसुता विलोकितां रागें
शापित होतों परि मज आत्मविवेकें चि काढिलें मागें.
आतां दोघे तन य स्त्रीसह धर्मेंकरूनि सांभाळीं;
भोगावांचुनि न सरे, जें असतें कर्म आपल्या भाळीं.'
राम म्हणे, 'मुनि रा या! ते पूता हें मनीं समजलों कीं;
सीता प्रत्यय दावू, नातरि हसतील तीस मज लोकीं?
मीं तवपदक म ळाची आज्ञा धरिली शिरावरी नमुनी;
पुनरपि दिव्य करावें, मग सीतेला खरा वरीन मुनी!'
यापरि वदतां, श्री मुनि सीतेला आणवी सभेमाजी;
राम म्हणे, 'दिव्य करीं, पुरवीं वांछा रविप्रभे! माजी.'
ऐसें परिसुनि रा ज्ञी मुनिवृंदाला करूनियां नमनें,
पतिचरणांसि विलोकुनि आलिंगी भर्तृभक्त्यधीनमनें.
जोडुनि करकं म ळातें, अवनिसुता कांतभक्तिपरमा ते
क्षितिला म्हणे, 'मला घे उदरीं शुद्धा असेन तर माते!'
सीतेच्या वाक्यांतीं ज गतीला होय तत्क्षणीं विवर,
मूर्तिमती भूदेवी येउनि घे कन्यकेशि ऊरुवरें[4]. ३६८

---

१. शुद्धा. २. पुत्रतुल्य. ३. निवारण्यास. ४. उत्संगे स्थापितवतीत्यर्थः—पंत. मांडीवर.

कांचनमणिम य रविनिभ सिंहासन आणिलें तयावरती
सीता बसोनि जाली भूम्युदरामाजि गुप्त त्यावर ती.
त्या समयीं रघु रा जें धरिला भेदावया शर क्षितिला;
तेव्हां बोध करुनियां रघुनाथाला सुरेश[1] रक्षि तिला.
उत्तर भविष्य म ग तो ब्रह्माज्ञेकरुनि आयके सकळ;
न पडे परंतु सीताविरहाकुळराममानसास कळ[2]. ३७१
रघुपतिच्या ज्या ज ननी कौसल्यादि त्रिविष्टपीं मान्या
आयुष्यांतीं स्वर्गीं दशरथसंयोग पावल्या धन्या. ३७२
भरतें कोटित्र य मित काळास्त्रेंकरुनि दुष्ट गंधर्व
सप्ताहोरात्रांतीं रामनिदेशें चि मारिले सर्व. ३७३
तक्षा[3]भिध जो नि ज सुत तक्षशिलाख्या पुरी तयाशि करी
पुष्कळनामसुतातें निर्मुनि दे पुष्कळावती[4] नगरी. ३७४
रामाज्ञेनें तन य स्थापुनि नगरद्वयांत तो भरत
साकेताला आला, अग्रजपदपद्मभक्तिलोभरत. ३७५
लक्ष्मण रघुवी रा च्या आज्ञेनें दोन सत्पुरी वसवी;
कारपथाभिधदेशीं, सुत अंगद चंद्रकेतु हे बसवी. ३७६
सो चंद्रकेतु ना म क, त्याची ते चंद्रकांतकाख्य पुरी;
मग अंगदीयनगरीं अंगद ही तातदत्त राज्य करी. ३७७
तदुपरि आला श्री मद्रामाप्रति विप्रवेषधर काळ;
सत्कारुनियां त्यातें, 'काय' म्हणे 'वांछितोशि ?' नरपाळ.
विप्र म्हणे, 'रघु रा या! मंत्र[5] करावा असा असे काम;
ऐकेल तो वधावा, जरि होइल बंधु मित्र सुत नाम.'
रघुवीरें त्या स म यीं द्वारीं सौमित्रि ठेविला त्राणीं;
'वाणीश्रवणागस्कृत[6] वध्य, न कोणी असो' म्हणे 'प्राणी.'
मग एकांतीं द्वि ज तो रामाशि म्हणे, 'त्रिलोकजनका! मीं

---

१. विधिः-पंत. २. चैन, उतार. ३. भरताचा तक्षनामक पुत्र. ४. गांधार देशाची राजधानी. ५. मसलत. ६. भाषणश्रवणाचें पाप करणारा.

ब्रह्मनिदेशें आलों, काळ त्वत्पादपद्मनतिकामी. ३८१
त्रिभुवन निर्भ  य केलें, खळ वधिले, धर्म रक्षिले सर्व,
शर्वमनोधामा[1]! तूं कल्पतरूंचे हि नाशिले गर्व. ३८२
संसृतिसिंधु त  रा या भक्तांसि दिली स्वकीर्तिसत्तरणी;
तरणि विभेदुनि गेले, जे जाले त्वच्छरें निकृत्त[2] रणीं.
आतां तूं सकला म  रमुकुटमणे! ये स्वकीय धामातें;
ऐसें तुज विनवाया पाठविलें कंजजें बुधा! मातें.' ३८४
इत्यादि काळकं  ज जवचनें जों लोकबंधुला प्रार्थी,
तों दुर्वासा आला द्वारीं रघुनाथदर्शनान्नार्थी. ३८५
ज्वलितधनंज[3]  य वर्चा दुर्वासा वंदिला सुमित्राजें;
अवलोकिलें मुनीचें तेज, न साहे क्षणार्ध मित्रा जें.
'वद रे! तवाग्र[4] ज न्मा कोठें? मीं पातलों पहायाला'
ऐसें पुसोनि घडवी रघुनाथाज्ञाविलोप हा याला. ३८७
सौमित्रि म्हणे,'का य स्वामी! आज्ञा असे मला कळवा;
एकांतीं नृप आहे, अवकाश दिजे दयानिधे! पळ वा.'
ऐसें परिसुनि  रा गें विप्र म्हणे, " रे! भला भला अनया!
दुर्वासा आला हें जाणुनि मातें म्हणेल काय न 'या'?
कोठें ही वारण  म ज घडलें नाहीं, परंतु तूं केलें;
भाग्यमदानें तुमचें ज्ञान मला वाटतें लया गेलें. ३९०
हरिहरइंद्र  श्री दब्रह्मार्कयमेंदुवह्निमुख मातें
प्रत्युद्गमनें[5] पूजिति, हें श्रुत नाहीं च काय रामातें?
तरणिकुळींचे  रा जे दशरथपर्यंत देखिले सारे;
परि हा दुर्नय कोठें नव्हता, तो जोडिलात कैसा! रे?
मार्गीं गमनें श्र  म लों, आलों भेटावया स्वयें, पर तो
राघव दर्शन नेघे, म्हणतो, 'कां पातला वृथा? परतो.'

---

१. शिवाचें मन हें च आहे घर ज्याचें अशा. २. तुटलेले. ३. अग्नीप्रमाणे कांति असलेला. ४. तुझा वडील भाऊ (राम). ५. सामोरें येऊन.

आला दुर्वासा द्विज हें सत्वर सांग जा, उभा आहें;
किंवा तापसकोपज्वलनाचें वीर्य लक्ष्मणा! पाहें." ३९४
ऐसें ऐकुनि न  य पटु सौमित्रि म्हणे मनीं, 'स्वनाश घडो;
परि मुनिकोपाग्निमुखीं शलभासम सर्व लोक हा न पडो.'
वंदुनि कोपप[1]  रा ला, गेला रामासमीप सद्वृत्त
द्वारींचें नृपतीतें सांगे अत्यंत शीघ्र तो वृत्त. ३९६
कृतकार्य काळ  म ग तो गेला रामाचिया पदीं नमुनी;
प्रभुनें समर्चिला बहु दुर्वासा सत्तपोनदीन[2] मुनी. ३९७
विप्र म्हणे, 'मीं तु ज ला आलों स्नेहेंकरूनि देखाया;
दशशत वर्षें तपलों, क्षुधित असें, दिव्य अन्न दे खाया.'
भोजन करुनि  य थागत मुनि गेला, षड्रसाशनें धाला;
मग लक्ष्मणासि पाहुनि जालें बहु दुःख सत्यसंधाला[3].
वंदुनियां अग्र  ज पद सौमित्रि म्हणे, 'रघूत्तमा! राया!
सत्यप्रतिज्ञ हो तूं; चिंता न करीं मनांत माराया.' ४००
होतो विधिनें[4] प्रि य जो वध्य, परित्याग तो चि वध याचा;
म्हणउनि रामें केला त्या काळीं त्याग बंधुरायाचा ४०१
मग सरयूतीं  रा तें गेला वंदूनि रामरायासी,
धरिला संकल्प मनीं सौमित्रीनें खरा मरायासी. ४०२
करुनि प्राणाया म त्यजिलें सरयूतटांतरीं काय;
स्वर्गप्रयाण केलें, श्रीशांशाला अशक्य हें काय? ४०३
लक्ष्मणविरहें  श्री मान् स्वर्गमनाचा धरूनियां काम,
'राज्य करावें,' म्हणतां भरतें वंदूनि वारिला राम. ४०४
कुशनामकुमा  रा तें कोसलदेशांत अर्पिलें राज्य
उत्तरकोसलविषयीं[5] स्वामित्व लवास ही दिलें प्राज्य.
होतां स्वर्गमन  म ना करिती येऊनियां प्रजा नमना,
म्हणती, 'नाकीं गमना करितां आम्हांशि ने विपच्छमना!

---

१. रागीट दुर्वासाला. २. सुतपःसमुद्र. ३. सत्यप्रतिज्ञ रामाला. ४. दैवें. ५. देशीं.

'नेडून सकळ ज नाला' ऐसें सांगोन तोषवि प्रकृती,
तेव्हां जयजयशब्दें करिती अत्यंत घोष विप्र कृती.
करुनि विनिश्च य ऐसा शत्रुघ्नाला हि आणवायाला
पाठविले चार भले, जालें हें वृत्त जाणवायाला. ४०८
हें सकळ हि चा रा स्यें ऐकुनि शत्रुघ्न घाबरा जाला;
रामवियोगें कांहीं वाटेना देह हा बरा जाला. ४०९
मग झडकर म थुरेचें सुबाहुला राज्य अर्पिलें तातें;
वैदिशनगरीं स्थापी श्रुतसेनातें कनिष्ठपोतातें. ४१०
स्थापुनि तनुज, ज वानें आला रामासमीप बाळकसा;
सोडावा सुज्ञाहीं संसार धरूनि विश्वपाळ कसा? ४११
सुग्रीवें सविन य तो अंगद अभिषेचिला गुणग्राम;
राम प्लवगजनासह साकेतीं वंदिला स्वविश्राम. ४१२
राक्षसजनरा ज हि तो आला तेथें बिभीषण त्वरित,
रघुपतिनामोच्चारणशब्दाहीं मूढ लोक उद्धरित. ४१३
राम म्हणे, 'निर्भ य तूं यावचंद्रार्कभूमदीयकथा
तावद्बिभीषणा! हें राज्य करावें धरूनि साधुपथा.
संतत मला स्म रा वें, विषयांच्या सेवनाशि विसरावें,
सज्जनपदीं भजावें बिभीषणा! आपुल्या पुरा जावें.'
हें सांगुनि सप्रे म प्रभु आलिंगूनियां म्हणे, 'प्राज्ञा!
गा! मज, उगा उगा, गा, गांवा जा, जाहली तुला आज्ञा.
समजाउनियां श्री शें पाठविला राक्षसेंद्र लंकेला;
मग आलिंगुनि मारुति, धन्य प्रभुनें जगत्रयीं केला.
वातकुमारा! वी रा! जोंवर राहेल हे कथा माजी,
तुष्ट चिरंजीव असें, तावत्सद्भक्तिच्या पथामाजी. ४१८
संतत मीं तुज म ध्यें, तूं ही बा! वर्ततोस मजमाजी;
नाहीं वियोग कांहीं, सत्योक्ति बरी मनीं समज माजी.'
ऐसें वदतां अं ज ळि जोडुनि 'विसरो नको' म्हणे 'मातें';

जातां श्रीरामातें मारुति बहुधा[1] करी प्रणामातें. ४२०
तों जांबवदाह्व य ही ऋक्षाधिप सांत्विला परिष्वंगें;
संगें त्याच्या जाली अमृतानें क्षाळिलीं तसीं अंगें. ४२१
वीरा! तूं या लोकीं रा हें, चित्तांतरीं मला स्मरत;
कलिच्या प्रवेशसमयीं स्वपदीं होशील सर्वथा निरत.
अश्रुप्लुताक्ष[2] तो म ग विभुला वंदूनि ऋक्षपति गेला;
तेव्हां देवाचे पद गमले व्याले चि काय गंगेला. ४२३
कुशनाम तनु ज रामें कुशावतीला ससैन्य पाठविला;
श्रावितनगरीला लव धाडुनि निजलोकशोक आटविला.
सज्जनसमुदा य युत श्रीसरयूच्या तटासि विभु गेला;
तों त्रिदशांहीं नानावाद्यध्वनि पुष्पवृष्टिसह केला.४२५
राघव करुणा ज लधर अवलोकुनियां प्रसन्ननयनाहीं,
भक्तमयूरेश्वर बहु नाचति, ज्यांला त्रितापभय नाहीं.
हरविधिशक्र य मार्यमविधुवसुवरुणाग्निसर्पगंधर्व
चारणकिन्नरसिद्धत्रिदशर्षिसमाज पातले सर्व. ४२७
नाचति वराप्स रा बहु, गाती गंधर्व, वाजती वाद्यें;
आरंभिलें प्रयाण स्वर्गांशि जसें समस्तदेवाद्यें. ४२८
श्रीगोप्रतारना म क सरयूतीर्थीं प्रजेसवें राम
स्नान करुनियां गेला स्वस्थाना पूर्णकाम सुखधाम.४२९

इति श्रीमन्मंत्ररामायणे श्रीरामनंदनमयूरेश्वरकृतायुत्तरकांडे त्रयस्त्रिंशत्तमो मंत्रः । ७

---

१. अनेकदा. २. अश्रुपूर्ण नेत्र ज्याचे.

# [ उपसंहार ]

( श्लोक )

'श्रीमंत्ररामायण' रत्नमाला समर्पिली श्रीरघुसत्तमाला;
प्रसाद कंठीं प्रभुसेवकांहीं घ्यावा, नसे भूषण अन्य कांहीं. १
वाल्मीकिविप्रोत्तमकाव्यपद्म, श्रीरामलीलामकरंदसद्म;
तेथें मयूरेश्वर भृंग जाला, सेवावया नित्य सुखें रसाला. २
रामाचें रचिलें चरित्र मुनिनें वाल्मीकिनें संस्कृतीं,
नाहीं हानि कदापि अन्यकविहीं तें वर्णितां प्राकृतीं;
मुक्तांचा रचिला चि हार पहिला जो रेशिमाच्या गुणें,
तो कार्पासगुणेंकरूनि करितां काय प्रभेला उणें? ३
केलें पात्र सुवर्णाचें, कीं विरूपाशि खापरी;
लावितां तेथ संहारी तम, दीपशिखापरी. ४

(गीति)

खळ निंदिति म्हणुनि बुधें टाकावी काय हरिगुणासक्ति?
दीरनणंदाजाचें साध्वी न त्यागिती स्वपतिभक्ति. ५

(श्लोक)

श्रीवाल्मीकिप्रभृतिमुनिहीं वर्णिली रामलीला;
मादृक्षाहीं[2] मुदितहृदयें काय गावें न तीला?
श्रीकंठेंद्राद्यमरपरिषत्सेव्यगंगाप्रवाहीं[3]
संध्यास्नानादिक न करणें काय या मानवांहीं? ६
अळंकारें युक्ता रघुपतिकथा शोभत असे,
अळंकारें हीना जरि म्हणति कोणीं न विलसे;
कृताभ्यंगस्नाना कनकमणिभूषाविरहिता
विराजे सिंदूरें धवळवसनें भूपवनिता. ७
सच्चेतःकैरवांतें[4] विकच[5] करि, जगत्ताप संपूर्ण टाळी,

---

१. कर्पटे-पंत. २. माझ्यासारख्यानीं. ३. शिवेन्द्रादिदेवसभासेव्य गंगोदकांत. ४. साधुचित्तरूप चंद्रविकासी कमलाना. ५. विकसित.

अज्ञानध्वांत सारें हरि, रसिकचकोरांशि अत्यंत पाळी;
नानावस्तु प्रकाशी, कविहृदयपयोराशिसंतोषहेतु,
काव्येंदु[1] स्वप्रभेनें खळविरहिजनीं होतसे धूमकेतु. ८
विशुद्धस्वांताला रुचति गुण पीयूषसम जे,
परि[2] त्यांतें दुष्ट स्वमनिं विष ऐसें चि समजे;
घृतें क्षीरें होती प्रमुदित मखीं निर्जर[3] खरे,
परी त्यांला तापप्रद रसें[4] जयांला ज्वर खरे[5]. ९
जाले जे तृप्त भास्वत्कुलतिलकरघूत्तंसलीलारसानें[6],
सारासारज्ञ साधु स्वमनिं अमृत ही मानिती फार सानें[7];
पीयूषें सोदरेंदुक्षय[8] हि न हरिला, त्यागिलें ही पित्याला[9],
राहूचा घात केला विषसहजनिला कोण सेवील त्याला? १०
गीर्वाणें राघवाचें यश रसिकजना लागतें फार मिष्ट
तैसें न प्राकृतानें अचतुर म्हणती, मानिती तें न शिष्ट;
पीतां गोक्षीर कार्तस्वरमणिचषकें[10] देतसे जे चि गोडी,
सारज्ञाला पलाशद्रुमदलपुटकें[11] सेवितां ते न सोडी. ११
जसे होती देव प्रमुदित शचीनायकवनीं[12],
तसे सारज्ञाते बुधजन मयूरेशकवनीं;
महाराष्ट्रग्रंथीं रसिक कवि जे ते च रमती,
परंतु ज्ञात्याची पळ हि न असावी चर[13] मती. १२
माझी सत्कृति दूषिली जरि खळें उच्छृंखळें आग्रहें,
सेवावी च परंतु नित्य रसिकें हे सद्गुणाच्या गृहें;

---

१. मूळ पाठ—**स्वोदयानें**. २. मूळ पाठ—**तयांला ही**. ३. देव. ४. मूळ पाठ—**परम ज्यांला**. ५. जिभेवर आलेले कांटे. ६. सूर्यकुलतिलकरामकथारसें. ७. लहान. ८. स्वबांधव जो चंद्र त्याचा क्षय. ९. समुद्राला. १०. सुवर्णरत्नखचित पेल्यांतून. ११. पळसाच्या द्रोणांतून. १२. नंदनवनांत. १३. चंचल.

**चंडाळ त्रिदशापगेंत[1] वमला कीं धेनुला स्पर्शला,**
**त्यांचें श्रोत्रियदेवसेव्य[2] पयें[3] ही, त्या ही सदा निर्मळों[4].** १३

श्रीमत्कुशलवगीत–श्रीमदाद्यकविमहामुनिराजवाल्मीकिकृत–श्रीसच्चिदानंद-घन–दशरथनरनाथवंशदुग्धसिंधुचंद्र–गाधिजमखरक्षणपटु–त्र्यंबकचापखं-डन–जानकीरमण–पितृवाक्यनिरत–वनवासरसिक–भरद्वाजादितपो-निधितपःफळ–विराधकाळ–पंचवटीनिलय–खरदूषणादिचतुर्दशस-हस्रनक्तंचरवनदवानळ–सीतावियोगविधुर–सुग्रीवसख–वालि-मथन––सकळवानरगोपुच्छर्क्षदळसमाराधितपद––समुद्रबंधन–विभीषणशरण्य–कुंभकर्णादिरावणांतकर–महायशोनि-धानायोध्याधिराजमहाराज–श्रीवैदेहीहृदयसरोजमार्तंड–भरतलक्ष्मणशत्रुघ्नमनःसंतोषनिधान–श्रीराम-चंद्रचरिते श्रीरामनंदनमयूरेश्वरविरचिते श्रीम-न्मंत्ररामायणे उत्तरकांडे महानंदप्रासाद-कलशः सर्गः ।

श्रीमद्रघुनाथपदांबुजार्पणमस्तु ।

त्रयस्त्रिंशन्मिता मंत्रा दिवि देवा इवानिशं ।
वसंत्युत्तरकांडेस्मिन् भजतां वांछितप्रदाः ॥

१. गंगेंत. २. अग्निहोत्री व देव यांस विहित. ३. पाणी, दूध. ४. पंतांच्या दप्तरांत मंत्ररामायणाच्या साग्र अशा दोन पोथ्या असून यांशिवाय युद्धकांडाची तिसरी एक प्रत आहे. पंतांनीं मूळ प्रत तयार केल्यावर या नकला त्यांच्या च देखरे-खींखालीं तयार झाल्या आहेत, असें जागोजाग त्यांच्या हातचे जे शोध व ज्या टीपा दिसून येतात यावरून कळून येतें. अर्थात् ह्या सर्व प्रतींच्या आधारें प्रस्तुतचें रामायण छापलें आहे.

# बाल[1]मंत्ररामायण

## बालकांड

श्रीगणेशाय नमः श्रीगुरुभ्यो नमः श्रीसरस्वत्यै नमः
श्रीशंकरनारदवाल्मीकिव्यासेभ्यो नमः ।

श्रीमान् दशरथ राजा, शतमखसख[2], पुण्यकर्मपथसक्त,
ख्यात रविकुळीं झाला, हरिहरगुरुगोद्विजातिजनभक्त. १
रामा[3] बहु होत्या, परि पुत्र नसे, होय वृद्ध तो साधी[4];
विधिसुत[5]कथितसुमंत्रप्रोक्तोपायें महामखा साधी. २
मखमुख्यवाजिमेधीं भागग्रहणार्थ देव जे आले,
ते म्हणति, 'विधे! दशमुख आम्हांवरि नित्य घालितो घाले. ३
जिण्या अक्षम आम्हीं, त्याच्या नाशा उपाय योजावा;
अनपत्य दशरथ हि कीं याचा जो काय आधि तो जावा.' ४
यज्ञेशातें ब्रह्मा प्रार्थी, सुयशें जगासि ताराया;
'देवा! दशरथसुत हो, दुष्टा दशकंधरासि माराया. ५
रावण, नरकपि न गणुनि, इतरांपासूनि अभयवर याची.
करिसील हानि युद्धीं होउनि तूं श्रीनिवास नर याची.' ६
मधुमथन 'अवश्य' म्हणे. त्यावरि पुत्रेष्टि ऋष्यशृंग करी.
तत्तेजें, मंत्रबळें, नृपभाग्यें, होय कर्मसिद्धि बरी. ७
जळजांचा बंधु तसा शिखिकुंडांतुनि निघे पुरुष भव्य.
तो हेमपात्र राया दे, पायस ज्यांत अमृतसें नव्य. ८

---

१. या रामायणाची रचनापद्धति मंत्ररामायणाप्रमाणेंच आहे. विशेष हा आहे कीं, प्रत्येक कांडाची मंत्रसंख्या निश्चित म्हणजे तीन आहे. हें 'मंत्ररामायणा'पेक्षां 'बाल' असल्यामुळें याला **बालमंत्ररामायण** असें नांव दिलें आहे. २. इंद्राचा मित्र. ३. स्त्रिया. ४. दुःखी ५. नारद.

यज्वा म्हणे तिघींतें, 'करुनि उचित भाग तें सुपायस खा.'
सदनुग्रह जेंवि तसा कोण करिल इष्टकर उपाय सखा? ९
जगतीपतिच्या भार्या त्या प्राशुनि दिव्य पायसा धाल्या.
कौसल्या कैकेयी ससुमित्रा गर्भिणी तिघी झाल्या. १०
यम यक्षप शक्र वरुण पवन दहन रवि असे अमर जे, ते
विधिवचनें जनु[1] अंशें वानरयोनींत जाहले घेते. ११
राक्षसराजवधार्थि प्रभुला झाले सुखें सुर सहाय.
कीं नादृत[2] तो सेवारूप म्हणाविल चि मुखें सुरस 'हाय!' १२
महिषी कौसल्या ज्या शुभसमयीं प्रसवली, तया 'राम'
ऐसें दशरथ ठेवी नाम सविधि, जें सुसिद्धिचें धाम. १३
श्रीसंपन्ना प्रसवे कैकेयी ज्या सुता, तया नाम
'भरत' असें ठेवी, सुरतरुपुष्पांचें उणें करी दाम. १४
राकेशमुखी प्रसवे ज्यांसि सुमित्रा, तयां सुतां नामें
'लक्ष्मण' 'शत्रुघ्न' असीं ठेवी नृप, पूर्ण होय तो कामें. १५
मह्यमरांतें अर्पी रत्नालंकार, हेम, गज, वाजी.
भूप म्हणे, 'बळ दास्या द्या, करतिल पुत्र हे मग जवा जी!' १६
जन्मापासुनि देती निजमूर्तिस वृद्धि साधुरीतीस.
पितरांच्या इतरांच्या प्रीतिस जी कीर्ति माधुरी तीस. १७
यक्षपसख[3]प्रभावें आचार्यें साधु पढविले चवघे;
अवघे सुरगुरु गमती; अमृतरसाची च भूप तो चव घे. १८
राशि तपाचा गाधिज भेटे राज्या धनाधिपा शिवसा.
ज्या मुनिपुढें रवि तसा होय, जसा पूर्णचंद्रमा दिवसा. १९
'मन्मख रक्षाया दे राम सलक्ष्मण' असें म्हणे ऋषि, तें
दुष्कर गणिलें भूपें. द्यावें जळ आकुळें कसें तृषितें? २०
जगतीश्वरासि न रुचे, रुचलें सुतदान तत्प्रभावज्ञा
रघुकुलहिता वसिष्ठा, कीं न हिता होय सत्प्रभावज्ञा. २१

---

१. जन्म. २. न आदरिलेला. ३. शंकराप्रमाणें (बुद्धि-) प्रभाव ज्याचा अशा.

यजमाना बोधुनि तो विप्रांच्या तनय देववी राज्या.
  कीं त्या अयश नसावें, म्हणती 'उचितज्ञ' देव वीरा ज्या. २२
जयदें अस्त्रें शत दे मुनि, मग मारूनि ताटका चंडी,
  सिद्धाश्रमांत राघव मारीचसुबाहुगर्वेशिर खंडी. २३
यजन समाप्त करुनि, गुरुसह जाय प्रभु पुरासि जनकाच्या.
  मुनिदारोद्धृति रुचवी मतिस, उपनिषत्तसी च सनकाच्या. २४
राहु परार्कांचा तो शिवचाप सलील खंडिला रामें.
  अनुरूपा श्रीसीता वरिली, जैसी रति प्रिया कामें. २५
महितगुण लक्ष्मण वरी जनकाची उर्मिलाभिधा कन्या.
  भरतासि मांडवी, श्रुतकीर्ति रिपुघ्नासि पाणि दे धन्या. २६
श्रीदसमानसभाग्य क्षितिपति दशरथ मयूरसा हर्षे.
  जनकमहाराज मणिस्वर्णप्रेमाश्रु मेघसा वर्षे. २७
राहुनि, विवाह करउनि, सर्वांसि पुसोनि, गाधिसुत गेला.
  त्यावरि महा अनुग्रह, आग्रह करुनि, स्वयें असा केला. २८
मनुजेश्वर दशरथ मग, जनकासि पुसुनि, सदारसुतसहित
  मिथिलापुरीहुनि निघे, जो या विश्वांत शक्रसा महित. २९
जगदीश्वरीपितृत्वें बहु मानी सुरसभा जनकराज्या.
  पात्र दशरथा करि त्या नुतिस, सुधासुरसभाजनकरा ज्या. ३०
यतिमतविरक्ति, परि तो जनक प्राकृत तसा बरा चि रडे.
  श्वशुरा सुता निरवितां, बहु वाहुनि दुःखगिरिभरा, चिरडे. ३१
राहे पहात, पावुनि दूर पथीं, निजपुरासि मग परते;
  तो वेदांतीं, मानसकासारीं जेंवि हंस खगप, रते. ३२
मदनारिधनुर्भंगें कोपे भृगुराम; काळसा वाटे;
  फाटे दशरथहृदय त्रासें, जें जळें मुखस्थ तें आटे. ३३
जमदग्निसुत, धरुनि पथ, उग्रांचा शिष्य, उग्रमति, राहे.

---

१. सोडलेलें पूर्वपद—जाउनि. २. सोडलेला पाठ—असा. ३. भयानें. ४. तोंडाला कोरड पडली. ५. शिवाचा.

पूजाया दशरथ कुळगुरुसह ये जवळ जरि, परि न पाहे. ३४
यवस[1] क्षत्रियकुळशत यत्परशुदवानळा, तया रामा
नमुनि श्रीराम पुढें ठाके, सांगोनि आपुल्या नामा. ३५
जरि मृदुलप्रकृति प्रभु, तरि दावी राम उद्धतत्वातें.
त्या विभु कळवी, चढउनि नारायणचाप, शुद्ध तत्वातें. ३६
यतकोप[2] प्रभु, जोडुनि शर, तदनुमतें तदीय धर्मातें,
खंडी, तया अमोघें त्यास हि दे तो प्रताप शर्मातें. ३७
राग न धरुनि, वरुनि शम, भृगुराम महेंद्रपर्वता गेला.
स्वपुरप्रवेश निर्भयमोहें, मुदितें, नृपोत्तमें केला. ३८
मग आज्ञा भेटाया, शत्रुघ्नयुता प्रिया सुता भरता
मातुळसह नृप धाडी, ज्याची स्तुत्या सुरोत्तमा नरता. ३९

इति श्रीरामनंदनमयूरेश्वरविरचिते बालमंत्ररामायणे प्रथमो बालकांडः समाप्तः ।

---

## अयोध्याकांड

तो श्री मच्चूडामणि दशरथ नृप यौवराज्य रामातें
द्याया उद्यत झाला, रुचलें रघुकुळविभूतिधामा तें. १
दा रा दयिता[3] प्रभुची तीतें दुर्बुद्धि मंथरा शिकवी;
विघ्न करी अभिषेका; झाला असमर्थ सत्यराशि कवी. २
स म यज्ञा कैकेयी हित समजुनि मंथरामतिस लागे.
वन रामा, राज्य सुता, दोन असे पूर्वदत्त वर मागे. ३
नि ज सत्यरक्षणपरें भूपें बहु विनविली, परि खवळली;
स्ववशा हि न ती पतिला कैकेयी द्यावया हरिख वळली. ४
सु य शोरत राम शिरीं घेता झाला तसी तदाज्ञा ते;
धन गुरुसुतादिविप्रांप्रति वांटी; म्हणति 'हा!' तदा ज्ञाते. ५
वा रा या न शके, मग बंधुस सीतेस, उचित मानुनि, घे.
स्वगुरुजनासि पुसाया, हर्षें रविवंशपद्मभानु निघे. ६

---

१. गवत. २. क्रोधाचें दमन केलें आहे ज्यानें. ३. लाडकी.

स म जाउनि मातेसह सुमति सुमित्रेस, अनघ रागेला
न मनीं, कैकेयीच्या, तो भक्तमयूरघन घरा गेला. ७
नि ज जनका राम म्हणे, 'दे आज्ञा, पाय वंदितों बा! हे.
राहे लक्ष्मण न पुरीं, सिद्धा सीता हि जाहली आहे.' ८
भ य सोडुनि, कैकेयी निर्दयहृदया करी महा जाच.
ती श्रीरामासि म्हणे, 'चवदा वर्षें वनीं रहा, जा च. ९
द्वि ज वन्यवृत्ति जैसा, चवदा वर्षें तसा च हो; राजा
सत्यव्रत, तूं जासिल, मग जेविल; आजि भव्य हो[1]रा जा.' १०
प य देणारी विष दे, नेसाया वल्कलें पुढें ठेवी.
लोभें भ्रमली, गमली अतिकठिना राक्षसी च ती देवी. ११
ये रा ग, गुरु म्हणे, 'तें टाक चि वल्कल, न तूं मुली! नेस.
मत्सुवचन ईस नसो मान्य, असावें चि तुज कुलीनेस.' १२
न म नीं तात रडविला, कैकेयीहूनि अन्य ज्या माता.
क्षिप्र निघे जनकाचा, स्वकुळ करायासि धन्य, जामाता. १३
ने श्री रामासि रथीं राजाज्ञेनें सुमंत्र वाहून.
आबाळपौर रडले वल्कलधर सानुजासि पाहून. १४
पौ रा नुराग भारी; निजल्या ठायीं तयांसि सोडून,
त्यांतुनि हळुच निघे प्रभु, वंचितभक्तांसि हात जोडून. १५
अ म रनदीच्या तीरीं प्रभुसि सखा गुह निषादवर विनवी.
राम म्हणे, 'तातप्रिय हय तर्पीं, तृप्ति यांत बरवि नवी. १६
भ ज जा प्रभुसि च,' ऐसें म्हणुनि, सुमंत्रासि पाठवी मार्गें.
उतरी गुह गंगेतें, प्रभु त्यासि म्हणे, 'रहा पथीं जागें.' १७
जा य, भरद्वाजातें वंदुनि, तत्कथितवनपथें तरुनीं
यमुनेसि, चित्रकूटा, मुनिसह वाल्मीकितें नमन करुनीं. १८
आ रा मीं तेंवि वसे लक्ष्मणरचितोटजीं सदार सदा.
होय मुनिसभा रामा, जैसी तत्कीर्ति क[2]विसदा, रसदा. १९

१. मुहूर्त. २ कविसभेला.

स म जुनि गुहपुरुषोक्त प्रभुवृत्त, सुमंत्र फिरुनि ये, नगरीं
पिहित[1]मुख शिरे; दुःसह ताप जसा नृपगृहीं तसा नगरीं. २०
अ ज सुत, कौसल्येतें शाप कथुनि, रात्रिमाजि तो साऱ्या
व्यसु होय पुत्रशोकें; त्या गातिला शत विपत्ति सोसाऱ्या. २१
ल य होतां प्रभुचा, ज्या आप्तदशा त्या कदापि न वदाऱ्या.
आला भरत स्मरत प्रभुतें दिवसीं पुरासि चवदाऱ्या. २२
तो ज ननीतें निंदी, कौसल्येतें स्तवी, पदें नमुनी.
पितृहित करी, न महि घे, 'घे हें न पुन्हां' म्हणे 'वदेन' मुनी. २३
नें[2] य धर्मज्ञ भरत तो गुरुजननीसचिवपौरजनयुक्त
जाय विभुकडे, त्या अतिपापापासूनि व्हावया मुक्त. २४
मा रा या जातो हें मानुनि, धरि गुह निषाद वाटेतें.
काय वदावें भरता त्या स्वापयशें विषाद वाटे तें? २५
सा म गुहासीं करि, मग सेना ने तो कवि प्रयागा ती.
समजे मुनि हि भरत अतिशुचि; सोडुनि शोक, विप्र या गाती. २६
स्व श्री स भरद्वाज प्रकटी; रामानुजा सपरिवारा
पूजी; न अहंकृतिचा लागों दे मानसास पारि वारा. २७
सा रा जो विश्वाचा थारा, नेता भवाब्धिच्या पारा,
त्या भरत चित्रकूटीं भेटे रामा क्षमादयागारा. २८
तो म रण दशरथाचें ऐकुनि, सानुज सदार 'हा तात!'
ऐसें म्हणे, यदाश्रित सानंद भवीं सदा रहातात. २९
नि ज शोकें व्यसु झाला जनक म्हणुनि फार पावला शोक.
तो करि पिंडजलांजलिदानादिक, करिति जें जसें लोक. ३०
द य मानम्लानसा त्या प्रभुसि म्हणे, पाय धरुनि तो भरत;
'परत, स्वपुरा ये बा! या च पदीं मीं, पदीं दुज्या न रत.' ३१
त्या रा जीवाक्ष म्हणे, "हा धर्म नव्हे लहान, चवदावें
सरतां चि वर्ष येइन, वत्सा! त्वां म्या हि 'हा!' न च वदावें. ३२

---

१. तोंड आच्छादिलेला. २. २४-२६ या आर्या परलिखित आहेत.

श्र म राज्यभरोद्वहनें, श्रीगुरु ससचिव असे परि सहाय;
वा! लाविसिल म्हणाया कामप्रमुखा हि तूं आरिस 'हाय!'" ३३
द्वि ज रावणनिधनार्थी ज्ञाते तेथील ते हि भरतातें
म्हणति, 'वहावा चि दिला दुर्वह हि चतुर्दशाब्द भर तातें.' ३४
प्र[1] य तमति म्हणे, 'टळतां अवधि, ज्वलनांत काय होमीन.
गंगाहृदविरहातें साहुनि, वांचेल काय हो मीन? ३५
म ज ला श्रीचरणाब्जस्पृष्टा दे पादुका तरायास.
योगक्षेमसमर्था या हरितिल विरहकातरायास[2].' ३६
श्रे य प्रियभक्ताचें करि, देउनि पादुका, दयाजलधी.
कैकेयीतें हि नमुनि राम म्हणे, 'न च तुझी धरू मळ धी.' ३७
वा रा सार कहनि, तो भरत परतवूनि, ऐंद्रिकाकातें[3]
शिक्षुनि, तेथूनि निघे राम कराया प्रहृष्ट नाकातें. ३८
श म धन अत्रि प्रभुतें पूजी, त्याची महासती भार्या
सीतेसि अळंकारी, सत्कीर्ति जसी तसी च ती आर्या. ३९

इति श्रीरामनंदनमयूरविरचिते श्रीमद्बाळमंत्ररामायणे अयोध्याकांड: समाप्त: । २

---

## अरण्यकांड

भव्य श्री राम प्रभु, ज्याच्या हृदयीं उदंड कारुण्य,
प्रमुदित करी प्रवेशें तापससंकीर्ण दंडकारण्य. १
न वि रा धराक्षसास चि, हित इतरां सर्व तापसां गमला,
जो प्रभु दीनासि म्हणे, 'हरितों निःशेष ताप, सांग मला.' २
पर म भयंकर राक्षस सीतेसि धरी हरी; तया बाण
प्रभु हाणुनि सोडविति क्षिप्र करिति जानकीपरित्राणं. ३
तो त्या ज नकसुतेतें सोडी, श्रीरामलक्ष्मणांसि धरी;
स्कंधीं शिशुसे वाहे, जाय वनीं, ती सती विलाप करी. ४
सप्रि य ते दाशरथी चंद्रार्क, स्पष्ट तो गमे राहु,

---

१. शुद्धमति. २. विरहभयाचे श्रम. ३. काकरूपी इंद्रपुत्रातें.

खड्गवराहीं त्याहीं त्याचे तत्काळ खांडिले बाहु. ५
प्रभु रा[1] जराजशापापासुनि त्या तुंबरासि करी मुक्त.
शरभंगमुनिस भेटे, तो पूजी, स्तवुनि या कथी युक्त. ६
निर्धू म ज्वलनीं तनु होमुनि, मुनि दिव्यरूप तो होय.
त्या दहन तसा, च्यवना दस्रौषधिसिद्ध तें जसें तोय. ७
कंज ज शक्र विमानीं बसवुनि, त्या ब्रह्मपूर्वलोकातें
घेउनि गेले, श्रीमत्[2]प्रभुदर्शनहर्षवीतशोकातें. ८
अभ य ऋषींतें प्रभु दे, राक्षसहत विप्र बहुत पाहून.
जनकसुतेतें सांगे 'भूताहितहनन बहु तपाहून.' ९
अव्या[3] ज दय प्रभु मग, जेंवि चकोरांसि चंद्रमा निववी,
तेंवि सुतीक्ष्णमुनीतें; दर्शन याचें चि नित्य सच्छिव[4] वी. १०
विस्म य पावे प्रभुवर, ऐकुनियां वाद्यगीतनाद सरीं;
स्वर्गणिकाहीं दिधला उग्रतपा मांडकर्णि मोहकरीं. ११
प्रख रा सिचापशरधर राम प्रभु दंडकाननीं हर्षें
क्रमिता जाला, तापसजनसत्कृति वरुनियां, दहा वर्षें. १२
प्रथ म आत्यातें, मग घटजातें राम भेटला, भावें.
त्या मुनि म्हणे, 'तसें हें, जेंवि समुद्रांत बेट लाभावें.' १३
देत्या श्री रामातें हरिदत्तें सर्व वैष्णवें शस्त्रें;
जैसीं दिधलीं पूर्वीं राक्षसविजयार्थ गाधिजें अस्त्रें. १४
मुनि रा जानुमतें तो प्रभु पंचवटीस जाय, तों वाटे
पितृसख जटायु भेटे, प्रिय साक्षाज्जनकसा चि तो वाटे. १५
सप्रे म म्हणे त्यातें प्रभु, 'हें स्वकुटुंब, या जपा, सून
तुमची सीता, ईतें पाळा गहनांत आजपासून.' १६
अंडे[5] ज पतिस पुसोनि, प्रभु पंचवटींत राहिला उटजीं.
जैसा संतानींचा दिव्य मधुपराज पुष्पितीं कुटजीं[6]. १७

---

१. कुबेर. २. श्रीरामदर्शनानंदानें गेला आहे शोक ज्याचा. ३. निष्कपट (शुद्ध) आहे दया ज्याची. ४. अत्यंत कल्याण. ५. पक्षिश्रेष्ठ जटायूस. ६. कुड्याचे झाडावर.

दुर्न  य दशमुखभगिनी जी शूर्पणखा, दुराशया, रंडा,
झाली भाजन नासाकर्णयुगच्छेद या महा दंडा. १८
अम  रा रि खर, त्रिशिरा, दूषण, इत्यादि राक्षस क्रूर
चवदा सहस्र वधिले रामें, दु:सह हरीस जे शूर. १९
हेम  म य मृगामागें प्रभु दयिताप्रिय करावया लागे.
'हा सीते! हा लक्ष्मण!' ऐसें तो असुहरेषुहत गांगे[1]. २०
सीता  ज वळुनि दवडी सौमित्रिस, तों चि दशमुखें हारिली.
ती क्षण सोडवुनि, रणीं सत्कीर्ति सुगति जटायुनें वारिली. २१
निर्द  य, निस्त्रप, रावण नेउनि ठेवी तिला अशोकवनीं.
ती त्यासि म्हणे, 'यावें सुकवींच्या सुयश रे! पशो! कवनीं.' २२
स्वोट ज शून्य विलोकुनि, 'हाय!' म्हणे प्रभु, फिरे सशोक वनीं.
जो दु:खभर, सविस्तर आला वाल्मीकिच्या चि तो कवनीं. २३
'अन  य ञ्जें दशवदनें सीता!' इतुकें वदोनि जो मेला,
प्रभु त्या तातसखा जळ देवुनि, हुडकित वनीं पुन्हां गेला. २४
प्रभु  रा नांत भ्रमतां, धरि योजनभुज निशाचर कबंध.
त्याचे बाहु च्छेदुनि, करुणार्णव चुकविती नरकबंध. २५
तो सु म ति होय राक्षस, 'कोण तुम्हीं? काय या वनीं कार्य?'
ऐसें पुसे तयातें; सांगे सौमित्रि ऋजुमना[2] आर्य. २६
सांगे श्री मंतातें पुसिलें निजवृत्त तो हि, शापाच्या
अंतातें जाणुनि, दनुदानव[3] नाशार्थ शेषपापाच्या. २७
'रुचि रा कृति मीं होतों, उग्राकारें मुनींस भय भारी
देता झालों; शापी स्थूलशिरा मुनि; न रूप मज तारी. २८
हें म  म वृत्त; असा मी झालों शक्राशनिप्रहारानें;
दाहोत्तर कार्य करिन; शोधाल म्हणत पुन्हा न 'हा!' रानें.' २९
त्याचा ज गदीश करिति दाह वनीं, तों चि दिव्यरूप धरी.
बसुनि विमानीं, प्रभुला सांगे इष्टाप्तिहेतु युक्ति बरी. ३०

---

१. ओरडे. २. सरळ मनाचा. ३. दनुनामक राक्षस.

'रामा ! य मनियमवती, सुमति, मतंगाश्रमीं असे शबरी;
दे दर्शन तीस, जिला भेटि तुझी, गति तसी गमे न बरी. ३१
प्रव रा सरसी पंपा, संपाया ताप, मग पहा धीरा !
नग ऋष्यमूकनामा, जवळ चि आहे रघूत्तमा ! वीरा ! ३२
तेथें म नुजश्रेष्ठा ! वानर आहेत पांच जो सावा
सुग्रीव सूर्यसुत तो त्यासीं त्वां मित्रभाव पोसावा.' ३३
ऐसें ज लदश्यामें रामें ऐकोनि, तो दनु स्वर्गा
पाठविला; हें प्रभुचें निरुपम कारुण्य आवडे भर्गा. ३४
हृद य द्रवेल, गायिल साधुसभा आत्मपद यश बरी, तें
चरित कराया भेटे, होउनि अत्यंत सदय, शबरीतें. ३५
ती पू ज न करुनि म्हणे, "रामा ! मद्गुरु मतंग मुनि गेला
सत्यपदाप्रति जेव्हां, धन्य तुवां चित्रकूटनग केला. ३६
सुश्रे य मला गुरुनें कथिलें, तें सिद्ध जाहलें आजी.
तृप्ता केली, होती करुनि, जसी चातकी तसी, 'आ' जी." ३७
सद रा तिन्ना प्रभुला पंपापथ कथुनि, गुरुकडे जाया,
राया नमुनि रघूंच्या, होमी ज्वलदग्निमाजी ती काया. ३८
होय म हित रूप तिला प्राप्त वरविमान, सत्यलोक मग;
सानुज पंपा पावे तो श्रीराम स्वभक्तकल्पनग. ३९

इति श्रीरामनंदनमयूरविरचिते श्रीमद्बालमंत्ररामायणे अरण्यकांडः समाप्तः । ३

---

## किष्किंधाकांड

सुखदा श्री पंपेची, परि झाली प्रभुमनीं असुख रचिती;
इतराचे तों, तैशा विरहीं, तत्काळ ती असु खरचिती. १
'हा सीते ! रा कापतिमुखि ! सुख मज तव समागमीं होतें;
कोण्हीं न म्हणे, म्हणतों 'पुनरपि कर नवस, माग,' मीं हो ! तें.' २
बहु स म जावी लक्ष्मण; मग तेथुनि ऋष्यमूकगोत्रास
जाती; त्यांतें पाहुनि पावे सुग्रीव कीश तो त्रास. ३

वातात्म ज पाठविला सुग्रीवें; विप्रवेष तो यातें
भेटे, पाहोनि निवे, पांथ बहु तृषार्त जेंवि तोयातें. ४

तो आश य, वृत्त पुसे, लक्ष्मण सांगे तयासि, तो वाहे
स्कंधीं, कारि सुगळासीं भेटि, कपिप्रभु हि बहु सुखा लाहे. ५

त्या भास्क रा त्मजासीं प्रभुसीं शास्त्रोक्त सख्य जें झालें,
आलें मनास रविच्या; शक्राचें चित्त, हर्षलें, भ्यालें. ६

दोघे स म सुखदुःख, प्रिय कार्य करावया, प्रतिज्ञा ते
करिते झाले, स्वयशें सुखवाया सज्जनांप्रति ज्ञाते. ७

नेली र ज निचरें स्त्री अनुमानें जानकी असें जाणें;
अस्मच्छ्रुतींस वांटित गेली ती 'राम राम' हीं वाणें. ८

[१]रुचिच य, मणिकांचनमय, दिव्य, अळंकार उत्तरीयपटीं
बांधुनि, सोडुनि गेली, आम्हां कीशांत, या चि अद्रितटीं. ९

रामा! या [२]ज गतीधरकुहरीं ते नग तसे चि आहेत.'
प्रभु त्यासि म्हणे, 'दाखिव, आण अळंकार, पुरिव हा हेत.'

सीताप्रि य नग पाहे राम; म्हणे 'लक्ष्मणा! पहा बा! हे.'
तो 'नेणें इतर' म्हणे, 'जाणें नूपुर चि यांत हें आहे.' ११

साश्रु उ रा सीं प्रभु धरि, भिजवी शोकोदकें समस्त नग;
हारासि म्हणे, 'हा! तूं भाग्यें होतासि मजसम स्तनग. १२

बा! सांगें म ज, नेली कोणिकडे राक्षसें प्रिया-माजी?
त्या वधिन सपरिवारा. मज युग ती, येतसे त्रि[३]यामा जी.'

सुगळ श्री रामातें, अश्रु पुसुनियां, म्हणे, 'तया आरितें
नेणें; भेटविन तुज स्त्रीरत्न, करूनि यत्न, मीं परि तें. १४

माजी ही रा जसुता! स्त्री हारिली वाळिनें, तदपि धीरा
मीं कपि हि त्यजित नसें, तूं कां त्यजितोसि पंडिता! वीरा?'

त्याप्रति म नुजवर म्हणे, 'करितों बा! प्रथम मीं तुझ्या कार्या;
शोधाया मद्दयिता मग करिसील प्रयत्न तूं आर्या!' १६

---

१. शोभासमूह. २. पर्वताच्या गुहेंत. ३. रात्र.

प्रभु बी ज पुसे तैशा वैराचें; सुगळ तो असें कळवी:
"मायावी असुर, तया वाळी भंगूनि संगरीं पळवी. १७
तो सभ य शिरे विवरीं, द्वारीं ठेवूनि मज, तयामागें
सिरला वाळी हि, जसा व्याघ्र व्याघ्राचिया वधा रागें. १८
संवत्स रा उपारि ये रक्ताचा विवर भारि महापूर;
शब्द न पडतां कानीं, गमलें वधिला चि शत्रुनीं शूर. १९
शोकें भ्र म लों, विवरद्वारीं ठेवूनि गिरि[1] घरा आलों;
रडलों; अभिषेका मीं वश सचिवांच्या दुराग्रहें झालों. २०
तो वाळी, ज यशाली, ये, मज पाहुनि पदीं, भरे रागें.
'आगें मारीन' म्हणे, भ्रमलों सर्वत्र, लागला मागें. २१
हा आश्र य निर्भय नग मज; कारण सांगतों तुला याचें.
वाळी बळजळधि, मथन करि दुंदुभिनामका लुलायाचें[2]. २२
त्यातें यो ज न उडवी, तद्बळदर्पासि निंदुनि, करानें;
आश्रम मतंगमुनिचा भरला तद्रक्तबिंदुनिकरानें. २३
क्षुब्धाश य मुनि शापी, 'तो वाळी मूढ ऋष्यमूकनगीं
व्यसु हो प्रवेशतां चि, क्षम कोण मदुक्तलंघनास जगीं ?' "
वाळिप रा क्रम परिसुनि, पादांगुष्ठें शरीर दश गावें
प्रभु दुंदुभिचें उडवी, ज्याचें शेषें असीम यश गावें. २५
एकें चि म हाबाणें प्रभु भेदी सप्तशाल भूमितळ;
वालिवधीं सप्रत्यय होउनि वर्णी सुकंठ रामबळ. २६
वाळीतें श्री राम प्रभु मारायासि सिद्ध होय, मग
सुगळासि म्हणे 'हटिक, त्वदहित मद्बाणविद्ध हो यमग[3]. २७
तो सम रा येतां, प्रभु एकें चि शरें तया उरीं ताडी,
पाडी, तद्राज्यश्री स्त्री भोगायासि तदनुजा धाडी. २८
वानर म हाबळ अमित सुग्रीवें आणवूनि भेटविले.
त्यांचे प्रतापदहन प्रभुपवमानें पळांत पेटविले. २९

---

१. शिला. २. रेड्याचें. ३. मृत.

सुररा  ज दिशेसि विनत, वरुणदिशेतें सुषेण पाठविला;
धनददिशेतें शतबाळि; सुग्रीवें पण मनांत आठविला. ३०
तैसे  चि य मदिशेतें जांबवदंगदमरुत्सुतादि कपी
धाडी, मास अवधि करि, कीं प्रभु विरहार्त जळ हि नीट न पी.
शोधुनि  रा जसुतेतें विनतादिक परतले, श्रमुनि आले;
वालिसुतादि, अवधितें लंघुनि, चिंतार्त शासना भ्याले. ३२
म्हणति, 'म रावें;' दुस्तर सागर पाहोनि बोलिले 'हाय !
धन्य जटायु, प्रभुच्या जेणें कार्यार्थ वेचिला काय.' ३३
त्या, अनु ज मरण परिसुनि, कीशांसि पुसे जटायुंचा भ्राता.
संपातिनामका त्या अंगद कथि वृत्त, सुत जसा ताता. ३४
अर्पी तो  य भ्रात्या; सांगे निजवृत्त, जानकीशोध;
तो धर्मज्ञ म्हणे, 'मज साधु निशाकर मुनींद्र करि बोध. ३५
कथितां  ज नकसुतेची वार्ता तच्छोदकांसि, तुज लक्ष
दक्ष स्तवितिल, फुटतिल, रवितेजें दग्ध भव्य नव पक्ष. ३६
सीता  प्र य ता दिसती ती मज लंकापुरीं अशोकवनीं;
शत योजन पाहतसे गृध्र; करा यत्न, जा, तिच्या अवनीं.'
गृध्रव  रा नें ऐसें सांगुनि, होउनि सपक्ष, हर्षानें
केलें गमन, निववले कपि सर्व, जसे मयूर वर्षानें. ३८
मारुति  म हेंद्रशिखरीं चढला, ऋक्षप[2]कृतस्तवें फुगला;
निजबळ कळतां, सद्यश मिळतां, राहेल कवि कसा उगला ?

इति श्रीरामनंदनमयूरविरचिते श्रीमद्बालमंत्ररामायणे किष्किंधाकांडः समाप्तः ; ४

## सुंदरकांड

बळसिंधु  श्री मारुति, लंघुनि शतयोजनाब्धि तो, पारा
पावे प्रभुवरशरसा, ज्या अतिदुस्तर हि मार्ग सोपारा. १
हरुनि प  रा क्रमलेशें मारुति लंकाधिदेवतातेज्या,

१. या दोन आर्यांच्या आरंभीं कवीनें कसल्या तरी खुणेसाठीं ० असें टिंब दिलें आहे. २. जांबवत.

शिरला पुरींत; तृणसे राक्षस, देवद्विजांसि खाते ज्या. २
रावणधा म विलोकुनि, पाहे रामप्रिया अशोकवनीं.
तों तेथें तो खळ ये, तीतें प्रार्थूनि न्यावया भवनीं. ३
धिक्कारी र ज निचरा, तें, बैसुनि शिंशुपानगीं, पाहे;
मारुति मनीं म्हणे, 'हे प्रभुला योग्या महासती आहे.'
विफळप्र य त्न होउनि, दशमुख, जोडुनि महाघ रागेला;
नव्हतां वश, 'गिळिन' असें वदुनि, न पावुनि मेहा[1], घरा गेला.
विश्वास पु रा या तो, प्रभुगुण गावूनि, दे तिला मुद्रा.
चूडामणिसह देवी प्रभु आणाया निरोप दे रुद्रा[2]. ६
मथुनि प्र म दवन, वधुनि बळ, अक्ष, म्हणे मनांत, 'कां पडला
दृष्टिस न दशमुख?' रणीं दाटुनि कपि घनरवासि सांपडला.
नेला प्रभं ज नतनय बांधुनि राक्षससभेसि, बोलविला;
बोलुनि सुरमुनिमस्तक शतवार सकंपसा चि डोलविला. ८
"श्रीरामप्रि य सख हो, देतो जें दास 'दे' वदे, वद या
'शरणागता मज अभयदाता तूं,' करिल देवदेव दया. ९
प्रबळ स्त्री ज नकसुता; न शिवावें तापल्या पहारेतें.
अतिहित या ही त्या ही जे लोका आपल्या पहा रे! तें.
प्रभुचें प्रि य वस्तु कधीं न जिरे; साजे चि ना पदक चोरा;
अनुभविल केसराचें कैसें रे राक्षसा! पद कचोरा?" ११
इत्यादि ब रा रागें भरुनि वदे, तें न त्या खळा साहे,
पाहे असिस, म्हणे तों त्या तदनुज साधु, 'दूत हा आहे.'
तैलार्द्र अ म राहित वस्त्रशतें वेष्टवूनि पुच्छातें,
पेटउनि, म्हणे,'फिरवा लंकेंत, करूनि घोष, तुच्छातें.' १३
वातसुत 'श्री रामो जयति!' असें म्हणुनि तो उडे सहसा.
जाळी लंकेसि; म्हणे 'रे! राक्षस हो! रडा, मला न हसा.'
होय समी रा त्मज तो दीन श्रीरामदारदाहभयें;

---

१. आनंदा. २. मारुतीला.

विझउनि पुच्छ समुद्रीं, श्रीतें पाहुनि, निघे बहु स्वजयें. १५
पुनरपि म हितनयेतें नमुनि, तदाज्ञा, खळासि निंदुनि, घे.
तेथुनि, कीशचकोरां निववाया, तो कपींद्रइंदु निघे. १६
त्या लंघुनि ज लधीतें, गर्जोनि महेंद्रपर्वतीं उतरे.
झाले जयापुढें ते राक्षस, सिंहापुढें जसे कुतरे. १७
तो परम य शस्वी त्या वृद्धा भेटे नमूनि; आनंदीं
कपि आलिंगुनि म्हणति, 'श्रीरामनिदेश शंभु, हा नंदी.'
'म्यां शुद्धाचा रा ती प्रभुदयिता देखिली सती सीता,
गीता मुमुक्षुनें तसि, झाली मद्दृष्टिदर्शनें शीता[1]. १९
केले सुद्धु म भग्न क्षणदाचर ही, त्यजूनियां शंका;
डंका श्रीरामाचा गाजविला, ती हि जाळिली लंका.' २०
हें वृत्त आं ज नेयें कथितां, परमोत्सवें वनीं चेष्टा,
बहु करिति, उडति, नाचति, भक्तजनेष्टा चि त्या, न नीचेष्टा.
प्रभुतें प्रि य कळवाया, ते जांबवदादि उसळले खातें[2].
यश अमृतवर्ष, कपिबळ अंकुरलें शुष्क मुसळ लेखा[3], तें. २२
वानर रा ज मनःप्रिय मधुवन अत्यंत रम्य पाहून,
शिरले युवराज्याच्या आज्ञेतें, मागतां चि, लाहून. २३
राज्याचें भ य न धरुनि, वनपाळा दधिमुखासि ताडून,
पाडून फळें भक्षुनि, मधु[4] प्याले मधुवनांत झाडून[5]. २४
तो वानर रा जातें सांगे दधिमुख रडोनि बोभाट.
त्या कार्यसिद्धि समजे, वाटे सद्गुण चि वर्णितो भाट. २५
लक्ष्मण स म जे, समजे राम हि निजकार्यसिद्धि, कीं भृत्य
करितात अतिक्रम ते, करिती स्वाम्युक्त सिद्ध जे कृत्य. २६
ते विजय श्री मंडित पवनसुतप्रमुख सर्व कपि आले,
श्रीराम लक्ष्मण सुगळ यांतें साष्टांग वंदिते झाले. २७
विरहाधी रा रमा प्रभु त्यांसि पुसे, 'लागली कसी शुद्धी[6]?

१. थंड, तृप्त. २. आकाशातें. ३. माना. ४. मद्य. ५. सारेजण. ६. शोध.

सीता कोठें आहे? माझा ठायीं कसी तिची बुद्धि?' २८

ते सकळ म रुत्तनया प्रेरीति, तो प्रभुसि नमुनि मणि अर्पी.

श्रीसीतावृत्त कथी; तें त्या, रुग्णासि अमृतसें, तर्पी. २९

"जों शतयो ज नजलनिधि लंघुनि जायासि लागलों रामा!

प्रकटे, विश्राम मला द्याया तों तारकारिचा मामा[1]. ३०

मम हृद य म्हणे विघ्न, स्वडरें ताडूनि पाडितां, स्वामी!

वदला, 'त्वद्विश्रामा आलों, तव बंधु वायुसख बा! मीं.'

सांत्वुनि ध रा धरातें, पुनरपि जों उसळलों त्वरित सुरसा,

शतयोजन मुख पसरी नागांची माय खावया सुरसा. ३२

तों सोडीं मीं म नुकुलतिलका! निजनवतियोजनाकार[2];

तनु[3] होउनि, शिरुनि मुखीं, निघतां झाली प्रसन्न ती फार.

आकर्षी म ज रामा! छायाग्रह[4] सिंहिका[5]; तिच्या पोटीं

शिरुनि, हरुनि हृदय, वधिलि; तवपदपद्में कृताभयें मोटीं.

मकराल य लंघुनि, ती लंका शोधुनि, सती अशोकवनीं

देखिलि तवविरहार्ता, यत्न करीं त्वरित बा! तिच्या अवनीं.

खपले र ज निचर बहुत बा! मजसह करुनि अल्प समरमखा;

वदलों, 'दहना! लंका, जाणुनि हा दिवस कल्पसम, रम, खा. ३६

मज हा ज य प्रसादें तुमच्या, त्या ही महासतीच्या, हो!

लंकेप्रति तत्र भवद्यात्रा[6] कारण महास[7] तीच्या हो. ३७

क्रूरमति रा क्षसींत, स्मरणें तुझिया चि, धृतिमती वसती

एकांबरैकवेणी[8], तन्वंगी, व्याकुळा अतीव, सती. ३८

कुशळ सु म तिनें पुसिलें श्रीरामा! तुज सलक्ष्मणा, सुगळा;

शीघ्र निघा तत्प्राणत्राणार्थ; ग्रास हि न गिळा, उगळा[9]."३९

इति श्रीरामनंदनमयूरविरचिते श्रीमद्बालमंत्ररामायणे सुंदरकांडः समाप्तः । ५

---

१. मैनाकपर्वत. २. आपला नव्वद योजनें विस्तृत असा आकार. ३. सूक्ष्म. ४. छाया ओढणारी. ५. राहुमाता. ६. आपलें जाणें. ७. आनंदास. ८ एक वस्त्र व [ विरहद्योतक अशी ] एकपेडी वेणी (बुचडा) घातलेली. ९. थुंका.

# युद्धकांड

बहु मुदित श्री रामप्रभु होय, म्हणे, 'अगा! महाबाहो!
बा! त्वत्प्रताप सर्वां सदरिखळाश्वा लगाम हा बा! हो. १
बा! वायुकुमा रा! त्वां वांचविला सकुळबंधु हा राम.
कल्पतरूंचा आम्हां श्रांतांला भेटलासि आराम. २
कर्मसदृश म ज न दिसे प्रिय; अवितरणीं[1] कृतघ्नता पाहें;
यास्तव, आलिंगन तुज देतों सर्वस्वभूत बापा! हें.' ३
यापरि वदे ज गद्गुरु; आलिंगी वायुनंदना सुचिर;
याहुनि नित्य परमसुखकीर्तिप्रद वस्तु कोणतें रुचिर? ४
तो प्रभु विज य मुहूर्तीं हनुमत्स्कंधीं बसे, निघे तूर्ण.
सौमित्रि अंगदरथीं, चंद्र जसा उदयपर्वतीं पूर्ण. ५
जलनिधितीं रा नेल्या सुगळें बहु ऋक्षकपिचमू भारी.
राम, बिभीषण भेटे, त्या लंकाराज्य, अभय दे, तारी. ६
नतजलधि म त नळकरें सेतु करवि रामराय शत गावें.
उतरुनि, अंगदवदनें अरिस म्हणे, 'पामरा! यश तगावें.'
करिती भारी ज न्य क्षणदाचर, ऋक्ष, कीश, जे वन्य.
अद्भुत न असें अन्य त्रिदश म्हणति यांस त्यांस ही 'धन्य.'
करि अहिम य बाणानीं घननाद निबद्ध सानुजा रामा.
दावुनि सतीस रडवी; त्या व्यसनीं पक्षिराज ये कामा. ९
विकळ अनु ज, मनुजवरें, निरखूनि उरांत लागतां शक्ति,
दशमुख जिणुनि पळविला; कार्हींसी प्रकटिली रणीं शक्ति.
कपिसेनाक्ष य करितां, कपिपतिहृतकर्णनास, मत्त, महा
प्रभुनें वधितां, वदला खळ, 'हा घटकर्ण! वीरसत्तम! हा!'
सांत्वुनि ताता, रा[2]वणि, जेंवि गिळाया रवींदु राहु निघे,
दाशरथी खिळुनि, रणीं जय साधुनि, गुप्त [3]खांत राहुनि, घे.
अतिसंकटीं म रुत्सुत ओषधिनगशृंग अतिजवें आणी.

---

१. न देण्यांत, उतराई न होण्यांत. २. रावणपुत्र इंद्रजित. ३. आकाशांत.

सबळ    विभु विशल्य करुनि, पावुनि, ये; अश्रुनीं सुरां न्हाणी. १३
मग करुनि  श्री सीतामाया, रावणि, तिला वधुनि, मोही.
झटुनि अहोरात्रत्रय, वधिला शक्रारि लक्ष्मणें तो ही. १४
प्रभु, वधुनि  रा क्षसांच्या बहु शतकोटि, स्वयें रणीं पाहे
अस्त्रबळ; म्हणे, 'माजें कीं ऐसें चि स्मरारिचें आहे.' १५
दशमुख स  म रीं प्रभुच्या अनुजोरीं शक्ति दारुणा हाणी.
पुनरपि सुषेणवचनें ओषधिनगशृंग वातसुत आणी. १६
रथ देवरा  ज धाडी, त्यावरि बैसुनि, दशानना ताडी.
रण सप्तरात्र संतत करुनि, हरुनि असु, धरातळीं पाडी.
प्रभुच्या विज  य महोत्सवसमयीं दुंदुभि नभांत वाजविले.
लाजविले मेघ तिहीं; प्रतिनादाहीं दिगंत गाजविले. १८
गंधर्व अप्स  रा बहु करिती आलाप; रामरायाला
गाति, नटति, वर्णिति; जो श्रीमद, आला परा मरायाला.
त्या दिव्यकुसु  म वर्षे हर्षें शक्रादि पूजिती अमर.
'जय !    जय !' म्हणति मुनीश्वर, जे प्रभुचरणाब्जनीरजभ्रमर.[1] २०
राज्य दिलें, अ ज रामर केला, जों चंद्रसूर्य, तों वरि तो.
प्रभुनें प्रणत बिभीषण गौरविला; नत चि सिद्धितें वरितो.
अग्निस्नानें प्र  थ ता दयिता स्वीकारिली सुरवरमतें.
प्रभुयश    सेउनि कविमन, मृगमन परिसुनि जसें सुख, रमतें. २२
सुरमुनिरा  ज र्षिस्तुत दशरथ उतरे, विमान सोडून;
.    भेटे पुत्रांस, पदांवरि पडतां साश्रु हात जोडून. २३
युद्धीं[2] प्राप्तक्ष  य ते सर्व उठविले दयासुधावर्षें.
.    हें प्रभुयश अत्यद्भुत गाती गंधर्व देवता हर्षें. २४
बसला कपि  रा क्षसपतिसह राम सदार पुष्पकविमानीं.

---

१. या सामासिक शब्दांत 'अब्ज' व 'नीरज' या एकार्थी पदांची द्विरुक्ति झाली आहे. २. २४, २६ व ३० या तीन आर्यांच्या आरंभीं हि कसलीशीं हेतुगर्भ पोकळ टिंबें आहेत; तीं मागाहून कांहीं हरताळण्याच्या खुणेचीं असावीं.

त्या पुष्कर[1]यानातें मधुपाकुळ कल्पपुष्प कवि मानी. २५
प्रिय करुनि म नुष्येश्वर सीतेसि म्हणे, 'प्रिये! पहा सेतु.
त्वत्प्राप्तिस हा नळकृत, मुक्तिस गुरुकृत सुबोधसा, हेतु.
स्वसहायांचीं श्री शें नामें, कृत्यें, प्रियेसि जाणविलीं.
दाखविलीं भटरत्नें, जीं सुग्रीवें जयार्थ आणविलीं. २७
जलनिधितीं रा वनितें दावूनि, म्हणे, 'बिभीषणें आर्यें
येथें मज भेटि दिली; नेलीं येणें चि सिद्धिला कार्यें.' २८
तारा[2] रुमा[2] हि म हिला कीशांच्या पुष्पकांत घे सीता.
त्यांच्या श्रीजनकसुता, जेंवि सुधावृष्टि, दृष्टि करि शीता.
प्रभु वदला, 'ज नकसुते! हे पंपा; ऋष्यमूक सन्नग हा;
सुगळ अभय दे येथें मज, ज्या म्हणवी वियोगपन्नग 'हा!''
जी तापसप्रि य तमा, ती पंचवटी प्रियेसि दाखविली.
गोदावरीसुधा त्या श्रीच्या तृषितेक्षणांसि चाखविली. ३१
भेटे निषाद रा ज्या; तो पावे ज्या यशा, मरुत्त न या.
भरतातें कळवाया प्रभु तेथुनि पाठवी मरुत्तनया. ३२
शिष्यसम, स म य पाहुनि, राम भरद्वाजमुनिपदा लागे,
'सुरसफळसमृद्धि असो मार्गीं,' ऐसा तयासि वर मागे.
हृष्ट भरद्वा ज मुनिस करुनि वरुनि शीघ्र गति, दयाधामें
वल्कजटाकुशमलधर, कृश, सानुज भरत, निववला रामें.
गुरु सविन य नमिला; मग जननीजन, सचिव, पौर हर्षविले.
नंदिग्रामीं घेउनि वेष प्रेमाश्रु सर्व वर्षविले. ३५
कपिवर, र ज निचरवर, प्रमुदित, नररूपरम्यवेषधर,
करिती पुरीं प्रवेश प्रभुसह, बैसोनि रथकरेणु[3]वर. ३६
झाले जयज य कार प्रभुच्या राज्याभिषेकसमयांत.
देवादिजीवमात्रीं परमोत्सव होय या चि सम यांत. ३७

---

१. पुष्कर=आकाश. २. ह्या दोन सुग्रीवस्त्रिया. ३. करेणु=हत्तीण.

रा[1]ष्ट्रीं, पुरीं पु  रा तन जे नृप, कोणी हि ते न आठविले.
जेंवि पर दिगंतातें, प्रभुनें निजराज्यगुण हि पाठविले. ३८

त्या परम स  म र्थानें रंजविल्या स्वप्रजा प्रजासम या
प्रभुच्या तेजें हर्षे जन, वर्षे घन, न लंघितां समया. ३९

इति श्रीरामनंदनमयूरविरचिते श्रीमद्बालमंत्ररामायणे युद्धकांडः समाप्तः । ६

---

## उत्तरकांड

राज्यपद वारि श्री मान्सीतापति, धरुनि धर्मनीतिपथा.
परिसे घटजमुनिमुखें रावणकपिपतिमरुत्सुतादिकथा. १

मुनिवर चतु  रा ननसुत पुलस्त्य, तत्तनय विश्रवा नावें.
तत्सुत वैश्रवण, तया दे लंका तात, जीस वानावें. २

राक्षससुता सु म ति वरि, दुसरी ती कैकसी तिचे तनय
दशमुखघटकर्ण, सुता शूर्पणखाख्या, बिभीषण हि सनय.

तप करुनि कं [2]ज जवरें द्विजदेवांचा महोग्र होय अरी.
वैश्रवणाची लंका प्रथम चि मोडूनि धर्म नीति हरी. ४

धनदपराज  य करि, घे त्याचें पुष्पकविमान हिसकून;
त्या नंदीश्वर शापी, प्रभुसामर्थ्ये वधास हि सकून. ५

करि कैलास ध  रा धरचालन, भुज अडकवी तळीं रुद्र.
धर्षण करूनि पावे वेदवतीशाप हिमनगीं क्षुद्र. ६

त्यां[3] अनरण्याख्य म हिप शापी; यमभटमृगांत होय हरी;
भोगवतीतें जिंकी; असुरांसीं युद्ध करुनि सख्य करी. ७

शापी धनदात्म ज नळकूबर; शक्रासि मेघनाद धरी.
मग अर्जुन दशवदना बांधी; वाळी हि सर्व गर्व हरी. ८

निपट शिशु वि [4]यँ न्मणितें फळ मानुनि, वातसुत उडे व्योमीं
वरलाभ घटज कथि; तें यश वर्णूं काय काय बुध हो! मीं?

---

१. ही सर्व गीति पूर्वीची गीति हरताळून कवीनें तेथें नवी लिहिली आहे. २. ब्रह्मदेवाच्या वरानें. ३. हेतुगर्भचिन्हित आर्या. ४. सूर्याला.

गौरवुनियां नि ज पुरा साधु बिभीषण, सुकंठ, पाठविले.
मारुतिला स्वयश दिलें, प्रभुनें प्रिय ते त्रिकाळ आठविले.
मग गर्भिणी प्रि य तमा होय; पुसे प्रभु तदीय दोहद; या
सांगे मुनिवनदर्शन, ज्याची राहों न दे चि मोह दया.
कथितां *भद्रच रा नें पौरकृत स्वापवाद ही, राम
लोकांचा हि तिचा ही, पुरवी, त्यागुनि तपोवनीं, काम.
श्रीवाल्मीकिमुनि म नीं समजे, पुण्याश्रमीं तिला रक्षी;
लक्षी कन्यासी, ज्या सदया सुतनिर्विशेष मृग पक्षी.
सांगे स्वआत्यांस श्री पति नृगनिमिययातिशापकथा.
श्वोलूकन्याय करी; न विलंघी राम धर्मनीतिपथा. १४
लवणाख्या असु रा लें शत्रुघ्न वधी, रची पुरी, नाम
ठेवी 'मथुरा' ऐसें, पुरवी यमुनातटस्थमुनिकाम. १५
जाय फिरुनि, स म यीं ज्या श्रीमत्प्राचेतसाश्रमीं राहे,
श्रीरामायणगाते सीतासुत उपजतां हि हा पाहे. १६
उठवि मृत द्वि ज शिशुतें शूद्राचा करुनि मनुजदेव लय;
श्वेतकथा कथुनि, विभुसि अत्यद्भुत कुंभतनुज दे [1]वलय.
जो इक्ष्वाकुतन य नृप दंड, [2]कविसुताव्रतघ्न, उद्दाम,
त्या भस्म करी श्रीकवि, दंडकवन म्हणुनि जाहलें नाम.
रघुराज [3]अध्व रा तिश्रेष्ठा करि सांग तुरगमेधा त्या.
सुरमुनि बहु मानवले, [4]सत्य चि साकेतपुर गमे धात्या.
यज्ञांत परम म धुरस्वरकुशलवगीत निजचरित राम
ऐके, प्रसन्नमानस होय पुसुनि त्यांसि आदिकविनाम.
आदिकवि म्हणे 'ज रि हे सीता शुद्धा नसेल, तरि तपलों
तें व्यर्थ असो, रामा! जें यमनियमांस मीं सदा जपलों.'
[5]सीता म्हणे, 'धरे! य श हो; लज्जा पाहुं दे न देवि! वर.

---

१. कंकण. २. शुक्राचार्य. ३. अध्वर म्ह० यज्ञ त्यांमध्यें अत्यंत श्रेष्ठ अशा.
४. ब्रह्मलोक. ५. हेतुगर्भचिन्हित आर्या. * दूतविशेष त्यानें.

प्रभुहुनि जरि मन माझें अन्यत्र नसेल, शीघ्र दे विवर.’
सहसा उलली ज गती; सिंहासन चंद्रसूर्यनिभ आलें;
त्यावरि भूदेवीनें बसवुनि नेली सुता असें झालें. २१
अत्याकुळहृद य प्रभु होतां, अवतारतत्व विधि कळवी.
प्रभुचें मन, तूं विष्णू, श्री सीता, कथुनियां असें, वळवी.
दशशत वर्षें रा ज्य प्रभु हयमेधादिमख करी शतशा;
प्रकटि यशा, ज्या लाजे हिमनग, दुग्धाब्धि, विधु, करीश[1] तशा.
चवघांचे सुत म हित, स्वपितृसमगुणाढ्य, आठ जे तनय,
अभिषिक्त तक्षं[2] पुष्कळें[2] दों नगरीं स्थापिले भरततनय.
लक्ष्मण हि, मग श्री मद्रामें अभिषेचिले तनुज दोघे,
अंगद हि, चंद्रकेतु हि, बसवूनि पुरद्वयीं, सुयश तो घे.
धरि काळ भूसु रा चें रूप, प्रभुला म्हणे, ‘रहस्य असे;
वध्य द्रष्टा श्रोता हो.’ द्वारीं राघवोक्त बंधु बसे. २८
विधिवच ‘आग म न करीं वैकुंठाप्रति’ असें कथी काळ,
तों लक्ष्मणासि भिववी दुर्वासा जेंवि आखुला[3] व्याळ.२९
प्रभु निज अनु ज त्यागी, तो सशरीर त्रिविष्टपा[4] नेला,
आत्मप्रयाणनिश्चय भरता श्रुत तदनुजास ही केला. ३०
कुश लव तन य निज, तयां अभिषेचुनि दोन दे पुरें राम,
सुत सुभुज शत्रुघाती, त्यांचा पुरवी अरिघ्न ही काम. ३१
तो सुगळ वान रा धिप, निजपद देवूनि अंगदा आला;
भेटे भक्त बिभीषण, ‘लंकेंत’ म्हणे ‘सुखी रहा’ त्याला.
‘जों कलियुग, म म वचनें, तों मैंद! द्विविद! जांबवान् हे! या
भूवरि सुखें असावे, माझी आज्ञा नव्हे तुम्हां हेया!’
रघुपति सम्र ज सर्वां जीवांतें, पुरगृहें चि सोडुनि, घे;
सानुज सुगळसचिवकपियूथपसह, जेंवि चंद्र सोडु[5] निघे.
‘पवनसुता! स्व य शोमृत सेवित सुखरूप तूं रहा सुचिर,’

---

१. ऐरावत. २. नगरीविशेष. ३. उंदराला. ४. स्वर्गा. ५. सनक्षत्र.

शुचिरसिकाप्रियसद्गुण वर दे प्रभु सकृपवर असा रुचिर.
[1]आला सामर कं ज ज, बहुरम्यविमानकोटि आणून;
न्हाणून गोप्रतारीं, बसवी प्रभुचा प्रसाद जाणून. ३६
सरयूच्या स्नानें य ति सूकर, मार्जार, आखु, अहि, कुत्तरे
झाले, दिव्य विमानीं चढले, त्यांतुनि न काक ही उतरे.
त्यां संतानाख्य ब रा विधिलोकसमीप लोक शुभ केला,
क्रममुक्तिप्रद तो त्या स्थाना जन सर्व उत्सवें नेला. ३८
निजभक्तजन म यूर प्रमुदित करि सुखघन स्वयें राम,
रुद्रसहस्राब्दांतीं वसवी वैकुंठ आपुलें धाम. ३९

इति श्रीरामनंदनमयूरविरचिते श्रीमद्बालमंत्ररामायणे उत्तरकांडः समाप्तः । ७

श्रीरामचंद्रार्पणमस्तु ।

---

# [2]मंत्रमयरामायण

श्रीमान् राजशिरोमणि दशरथ, जो निजयशें बरा महित,
द्विजसेवक, यज्ञनिरत, जनभयहर्ता, [3]धरानिकामहित. १
श्रीशहरा बहुमत तो, त्याच्या [4]प्रांजलयशस्करा महिला
[5]जननी, यज्ञजपायसपानें, करि; दे सुखा बरा महिला. २
श्रीराम ज्येष्ठ तनुज, भरत यशोनिधि खरा, कुमारमणी
लक्ष्मण, शत्रुघ्न जयां नयजयरुचि, जसि हरा उमा रमणी. ३
श्रीराम प्रभु, गाधिजयज्ञावन, राक्षसांसि मथुनि, करी.
मुनि 'जय जय' म्हणती, जैं गौतमदारामहाघराशि हरी. ४
[6]श्रीगलशरासन मथुनि, जय करुनि, धरामनोऽन्यथा हारिली;

---

१. हेतुगर्भचिन्हित आर्या. २. या रामायणांतील प्रत्येक आर्येंत त्रयोदशाक्षरी राममंत्र साधिला असल्यामुळें याला **मंत्रमयरामायण** असें नांव दिलें आहे. ३. पृथ्वीचें अत्यंत कल्याण करणारा असा. ४. शुद्ध. ५. पुत्रप्रसवयत्या. ६. शिवधनुष्य.

[1]जनकयज्ञायतनजा, राजसभामद हरूनियां, वारिली. ५
श्रीकंठशिष्य [2]राम, द्विजसत्तम, अतियशा, खळविराम;
त्याच्या जगतीपाळक्षत्रियजनलयमदा पळवि राम. ६
श्री[3] रामा मग देतां कैकेयी [4]स्वजननयपरार्तिमती,
घे निजवरद्वय बळें, [5]अजतनय नराधिनाथ [6]वामगती. ७
श्रीराघवा वन, मही निज[7]कैयभवासि, दे; दरा न मनीं
धरि, जनहृदयजलरुहप्रिय ही राज्य त्यजूनियां, गमनीं. ८
श्रीराज्य त्यजुनि महें, सा[8]नुजभूतनय राघव, मनांत
सुजनांच्या भय नुरवी, स्वभुजद्वयकृतपराक्रम वनांत. ९
श्रीशवियोग [9]खरामय अजतनयप्राण हरि; [10]नरामर तो
द्विज[11]शापात्तलय, जसा पिवुनि बिले[12]शयभवा गरा मरतो. १०
श्री त्यजि, राग धरि मनीं जननीचा, यत्न करि पुरा गमना;
परि जनकयशस्कर, [13]जगदिन, नयरत, न मनि सानुरागमना. ११
श्री[14]मुदिराभ, मनोहर, जटिल, सुभगकाय, रात्रिचरमर्में
भेदी, जय पावे; द्विज यति निववि, परामया हरुनि, शर्में. १२
श्रीगोदातीराश्रम विभु, जप तप यज्ञ करि, परा मथिता;
शूर्पणखातेजक्षय, जयशाली, राक्षसां मरण कथिता. १३
श्रीस हरि रावण मदें, जपुनि यतिमिषें, वरावया मरण;
जरि अनय कळे, करि जन, धरि नच भय, वधि खरा मद चि,न रण.
श्रीवर राक्षसमथिता जटायुला तोय दे, खरा महित
जनकप्रियसख गृध्र हि; जग गाय, तरी च, सदभिराम हित. १५
श्रीश सुरा[15]त्युत्तम, जरि यज्ञभुगीश्वरहरादिमत, न बरी.

---

१. जनकयज्ञस्थानोत्पन्ना. २. भार्गवराम. ३. राज्यश्री. ४. दशरथाच्या नीतीनें परमदु:खित मति जिची. ५. दशरथ. ६. कुंठितगति. ७. भरतास. ८. लक्ष्मण-सीतेसह. ९. दारुणरोग. १०. राजा. ११. ब्राह्मणशापानें प्राप्त मरण ज्याला. १२. सर्पोत्पन्न अशा. १३. जगत्प्रभु:–**पंत.** १४. शोभायमान मेघासारखा. १५. सु+राति+उत्तम=चांगल्यांत चांगली देणगी.

तरि भजनें प्रिय जन, हा स्वाशय कथि राम, उद्धरुनि शबरी. १६
श्रीदाराहर मर्दुनि, सुगळ जगीं करि यश [1]वरामत्र.
[2]जनिलयजभयमहोर्ण्णी होय [3]धराजासुरमण सुच्छत्र. १७
श्रीस [4]चराधिप मरुदात्मज शोधुनि होय मावरा मत हा;
जपुनि यथाबळ भजतां, यश ये चि; म्हणे न राजमणिनत 'हा!' १८
श्री[5]दसख पुरार्तिमना, तेंवि करी जय करावयास मन;
[6]जनितरय, जलधिकृतभय, सेतु रची दुस्तरावसंशमन. १९
श्री राज्य नमनमात्रें अनुजसम यथार्थ मानराशि महा
रजनिचरनायकानुज अव्यय पावे वरामधें वर हा. २०
श्रीदाचा खचराधम अनुज तनयसोदरादिसहित मरे.
नैके चि, जरि नयज्ञ स्वजनप्रिय म्हणति, 'नृपवरा! शम रे!' २१
श्रीस्वीकारा मग करि, जवन वि[7]यद्यान वरुनि नभिं, राम
[8]अनुजसमय न विलंघी, जगदाश्रय, सुगुणसंपदभिराम. २२
श्री ये पुरा, महाजगदुदय चि राज्याभिषेकमहकाळीं;
स्वजनीं प्रभुनयन, जसें सरतां वय सानुराग मन बाळीं. २३
श्रीद चि पुरामधिल जन, सुज्ञान, सदय, खरा पर महर्षी;
जलदोदय वनजनयन, सर्व मयूरापरी परमहर्षी. २४
चोविस आर्यांचें हें रामायण, यासि नाम मंत्रमय.
अंतर्गतारिमारक, सार, कवि रचिल असें न यंत्र मय. २५

इति श्रीरामनंदनमयूरविरचितं मंत्रमयरामायणं श्रीरामचंद्रचरणयोरर्पितं भवतु।

---

१. श्रेष्ठ पाल—**पंत**. २. जन्ममरणज—**पंत**. ३. सीताप्राणवल्लभ. ४. गुप्त हेरांचा मुख्य. ५. त्रिपुरनाशाविषयीं मन ज्याचें तो कुबेरसखा शिव. ६. उत्पन्न झाला आहे वेग ज्याचे ठिकाणीं. ७. आकाशयान. (पुष्पक). ८. भरताजवळ केलेली प्रतिज्ञा.

# मंत्रगर्भरामायण[1]

## बालकांड

भावें सयश रामाचें । गावें जगदभिरामाचें ॥ ध्रु० ॥

श्रीरघुवंशीं ब्रह्मप्रार्थित लक्ष्मीपति अवतरला,
विश्वसहित ज्याच्या जनकत्वें कौसल्याधव तरला. १

रावि सिद्धि आश्रमीं जो तो गाधिज मागुनि ने त्या,
शिकवि बळातिबळा विद्या शत अस्त्रें विधिच्या नेत्या. २

मथुनि ताटिका सुबाहुमस्तक बाण प्रेरुनि खुडवी[2],
मारीचातें प्रभु शतगावें[3] पुंखसमीरें[4] उडवी. ३

जनकमखातें मुनिसह जातां प्रभुनें गौतमभार्या
उद्धरिली, ती पतिसह पूजी स्तवुनि अहल्या आर्या. ४

यश करि भारी भवधनु भंगुनि, हर्षे सीता बाळा;
माळा घालुनि वरिती झाली रामा त्रिजगत्पाळा. ५

राजा आणवि दशरथराया पूजी सबळा धन्या,
देता झाला श्रीरामासह चवघां चवघी कन्या. ६

महिपतिशतयम[5] भृगुराम पथीं परतुनि येतां अडवी,
कडवी दृष्टि तयाची, वृद्धा[6] क्षणभरि मोहीं रडवी. ७

जगदीश्वर त्याच्या तेजातें हरि, परि चित्त न दुखवी;
करुनि पराभव भवशिष्याचा[7] बहु सज्जनमन सुखवी. ८

यमसा क्रूर हि शांति वरुनियां गेला भार्गव, हा या
लोकीं वृत्तांत शिरे, लागे क्षत्रियमार्ग वहाया. ९

---

१. हें रामायण साकीवृत्तात्मक असून याची रचना मंत्रदृष्ट्या मंत्ररामायणाप्रमाणें आहे. २. छेदी. ३. शंभर योजनें. ४. बाणाच्या मागील भागीं असलेल्या पंखांच्या वायूनें. ५. शेंकडों राजांचा काळ. ६. वृद्ध दशरथास. ७. शंकराचा शिष्य जो परशुराम त्याचा.

जगतीपति सुतविजयें पावुनि सुख, साकेता पावे;
जन म्हणति, 'प्रभुशरभरवें जे अरिहरि ते तापावे.' १०
यद्यपि भरतवियोग क्षण ही अतिदुःसह राज्याला,
तरि हि मातुळें नेला स्नेहें भेटाया आज्याला. ११
रात्रिदिवस सद्गुण रामाचे वर्णिति हर्षें पौर,
श्यामलमूर्ति परि यश प्रसवे हरहासाधिकगौर[1]. १२
महदायक[2] राम लहानातें तेंवि जसा थोरातें,
चंद्र चकोरातें कीं, जैसा घन चातकमोरातें. १३

इति बालकांड:

## अयोध्याकांड

स्व श्री रामा द्याया दशरथ युवराज करूं पाहे,
सिकवि मंथरा कुमति; हित हि तें कैकेयीस न साहे. १
ती रा यासि म्हणे, 'वर द्यावे, त्वां जे द्याया केले;
देय न देतां सत्यभ्रष्ट प्राणी नरका गेले. २
हो म नंदन नृप, वनवासी राम चतुर्दशवर्षें,
न चुके देणें द्यायाचें तें राया! द्यावें हर्षें.' ३
'म ज ला वांचिव, सांचिव सद्यश, दयिते! मयि तेऽस्तु दया,[3]'
ऐसें बहु विनवी, परि न वळे धवळेतरबुद्धि[4] तया. ४
सु य शस्कर तें प्रभु मान्य करी सीतालक्ष्मणसहित,
महित गुरुसि करि नमुनि पुसुनि धरि वनपथ लक्षुनि अहितें[5]. ५
स्व रा करुनि नृपरथीं बसुनि विभु भेटे सख्या गुहातें,
नमुनि भरद्वाजातें सुखवी, रवि जेंवि जलरुहातें. ६
र म णीय चित्रकूटनगवरीं मुनिसा उटजीं राहे?
हें सचिवमुखें परिसुनि नृप असु रामवियोगा वाहे. ७

१. शिवहास्याहून गौर. (हास्याचा रंग शुभ्र असा कविसंकेत आहे). २. आनंददायक. ३. माझ्या ठायीं तुझी दया असो. ४. कृष्णवर्ण (कुटिल) बुद्धि जिची ती कैकेयी. ५. शत्रु.

आ ज वळाहुनि सत्वर गुरुनें[1] आणविला जो भरत,
निंदी बहु मातेतें ही कीं, तो न विषयलोभरत. ८
तो य पित्यातें दे, 'पद घे,' हें गुरुचें हि वचन मोडी,
सुखवुनि गुहा भरद्वाजा तो श्रीरामा कर जोडी. ९
अं[2] ज जनकाची ऐकुनि वार्ता 'हाय!' म्हणे, मग अर्पी
मुन्यन्नें[3]रचित पिंड तिलोदक, सुश्रद्धेनें तर्पी. १०
प्रि य भरत म्हणे श्रीरामातें जोडुनि हात, 'परतणें,
न वनीं तुवां असमर्थी साहुनि घन हिम आतप रतणें.' ११
सों[4] रा उक्ति वदे प्रभु, "सरतां बा! हायन चवदावें
येइन तुज मज गुरुधर्मवचन 'हा हाय!' नच वदावें." १२
हे म पादुका घेउनि समजे, नंदिग्रामीं राहे,
मग अत्रिस्त्रीपासुनि सीता अतिसत्कारा लाहे. १३

इत्ययोध्याकांड:

## अरण्यकांड

राम श्री मद्दंडकविपिनीं राक्षसहत मुनि पाहे,
शेषांतें[5] दे भेटि, मग मनीं त्यांच्या ताप न राहे. १
न वि रा ध नमी, अपराध करी, उद्धरि तदपि तयातें.
न जयंताच्या देववतें कृतनुतिस हि पद पितयातें. २
आश्र म शरभंग सुतीक्ष्ण घटज यांचे तो अज पावे,
ते म्हणति, 'चरण सोडुनि याचे, कल्पद्रुम न जपावे.' ३
गृध्र ज टायु 'त्वत्पितृसख मीं' ऐसें कळवी नातें,
कां वत्सलवरविभुहृद्रतगुरुशोका पळवीना तें? ४
आल य पंचवटींत करुनि विभु गोदातीरीं राहे,
शूर्पणखा सद्व्रतभंगेच्छा[6] धरितां कुदशा लाहे. ५
प्रभु रा क्षस खर जो त्या सबळा वधी जनस्थानीच्या,

१. वसिष्ठानें. २. राम. ३. देवभाताचा. ४. श्रेष्ठ. ५. उरलेल्यांतें. ६. उत्तम एकपत्नीव्रताच्या नाशाची इच्छा.

ती सीताहरणा प्रेरी त्या अधी[1]जनस्था नीचा. ६

हेम म यमृगें लोभवुनि करवि विफळ अवनयत्नातें,
उटजीं यतिसा शिरुनि खळ हरी प्रभुच्या स्त्रीरत्नातें. ७

अंड[2] ज पाडुनि नेतां, श्री नग कीशपंचकीं सोडी.
ठेवी लंकेंत अशोकवनीं. प्रभुधृति राहे थोडी. ८

हृद य प्रभुचें पितृसखघातें व्याकुळ झालें शोकें,
त्या जळ देउनि केलें दयिताविरहीं जैसें कोकें[3]. ९

जोयो ज नबाहु कबंध धरी, वारी त्याच्या शापा,
‘सुग्रीवासीं सख्य करीं’ हें सांगे विधिच्या बापा. १०

उद य होय भाग्याचा, पाहे प्रभुतें, पूजी शबरी.
भगवत्प्रसादपात्र न होतां उत्तम जाति हि न बरी. ११

बद रा शन देव म्हणे, ‘नम्रा स्पर्शुनि हनु हो माया*
ब्रह्मपदाप्रति गेली आज्ञा मागुनि तनु होमाया. १२

उत्त म रूपें बसुनि विमानीं, लज्जा दे शंपेतें
ती शबरी विधिलोका, पावे सानुज विभु पंपेतें. १३

इत्यरण्यकांड:

## किष्किंधाकांड

पंपेची श्री पाहुनि रामें आठविली निजकांता,
शांता करि लक्ष्मण पीडा त्या वीजुनि[4] सिंचुनि तांता[5]. १

मारुति रा घवसुग्रीवांसीं सख्य करी शुभलग्नीं,
नग दाखउनि सुगळ धृति आणी रामीं चिंतामग्नीं. २

प्रभुला म ग वैराचें कारण अतुळ वालिबळ कळवी,
सप्तशाल भेदुनि सुगळाचा संशय रघुपति पळवी. ३

शक्रात्म[6] ज एकशरें वधिला, सुगळ कीशपति केला,

---

१. मतिमंद लोकांत असलेल्या. २. जटायु. ३. चक्रवाकपक्ष्यानें. (या पक्ष्याचें जोडपें रात्रीं वियुक्त व दिवसा संयुक्त होतें असा कविसंकेत आहे). ४. वारा घालून. ५. श्रमलेल्यास. ६. इंद्रपुत्र वाली. * या चरणाचा अर्थबोध झाला नाहीं.

प्रभुमैत्रीनें लज्जा दिधली देवांच्या लतिकेला.[1] ४

प्रभुप्रि य तमाशोधा वानर बहु सुगळें पाठविले,
दक्षिणदिग्गतकपिनीं मरतां प्रभुचे गुण आठविले. ५

'फार ब रा मृत्यु घडेल जरि प्रभुच्या झटतां कार्या.
आर्या जटायुला हें घडलें सोडवितां प्रभुभार्या.' ६

गृध्रोत्त म संपाती ऐसी ऐके स्वानुजवार्ता;
शोची, जळ दे, निजवृत्त कथी कपिचक्रा[2] तापार्ता; ७

"जातां ते ज स्विवररविकडे तेजें पक्ष जळाले,
पोटाखालें अनुज रक्षिला, तप्तावयव गळाले. ८

पतन य इच्छेनें मज घडलें मुनिवर्याश्रमनिकट,
त्याचें नाम निशाकर, तेणें ताप शमविला विकट. ९

मातें द्वि ज वर वदला 'जेव्हां कथिशिल सीताशोध,
तो धर्म तुला पक्षद होइल नच विसरें हा बोध.' १०

मैत्तन[3] य कथी मज दशवदनें नेतां सीता पाहे,
ती शतयोजनसिंधुपलिकडे लंकेंत सती आहे." ११

गृध्रव रा ला ऐसें कथितां पक्ष पळांत चि आले,
झाले उडतां तो प्रमुदित कपि, परि जलनिधिला भ्याले. १२

ऋक्षेश म ह स्तवुनि वाढवी जगत्प्राणतनयाचें,
स्वबळपरिज्ञानोत्साहें या सिद्ध करी मन याचें. १३

इति किष्किंधाकांड:

# सुंदरकांड

जैसा वेगें श्री कंठाचा बाण त्रिपुरा गेला,
तैसा लंकेवरि तो मारुति, सदाहितरिपु[4] रागेला. १

मैनाकध रा थबकुनि पाडी, ठकवुनि सुखवी सुरसा,
वधुनि सिंहिका पावे पारा साधु विमानग सुरसा. २

---

१. कल्पवल्लीला. २. वानरसैन्याला. ३. माझा पुत्र सुपार्श्व. ४. साधूंच्या शत्रूचा शत्रु.

हरुनि श्र म लंकादेवीचा, लघुदेहें पुर शोधी,
पाहे प्रमदवनीं धीरेतें त्या हि तिला जो रोधी. ३
न गणी र ज निचरा तें पाहे, कुळ वर्णुनि, दे मुद्रा;
चूडामणि खुण घे प्रिय सांगुनि, कळवी बळ त्या क्षुद्रा. ४
सुतरुक्ष य सबळाक्ष व्यय करि, घननादाला गावे[1],
गावे ऐसे बोल वदे जे गुरुहृदया लागावे. ५
बहु कोपे रा वण, खळ पेटवि जित जाणुनि पुच्छातें,
लंका जाळुनि सद्गृह[2] रक्षुनि अघफळ दे तुच्छातें. ६
श्रीस पुसे; म करालय लंघी; बहु सुखवी युवराज्या.
झाले पात्र महा कपि, व्हावे वरुनि गतिद सुवरा ज्या. ७
ते परम ज वन पवनसुतसहित महित मधुवना लुटिती,
वनरक्षक दधिमुख जो त्यातें अंगदवचनें कुटिती. ८
सांगे अप्रि य दधिमुख, समजे सुगळ सिद्धि कार्याची,
परिसुनि मधुवनमथन सुखावे मति त्या ही आर्यांची. ९
'ते पाठीव ज वें जा' ऐसें सुगळ दधिमुखा सांगे,
कथुनि निरोप तयांसि म्हणे तो स्वमतिस, 'खिन्ना कां गे?' १०
वायुतन य सह जांबवदंगदनळनीळादि उसळले;
तद्रव अद्भुत; मंदर तेणें दिक्प्रांताब्धि घुसळले. ११
[3]वीततनुज रा जीवाक्षातें चूडामणि दे, वंदी,
आलिंगन देवुनि त्या त्याचा प्रभुवर झाला बंदी. १२
प्रेमें म्हणे, 'म रुत्पुत्रा! त्वां ऋणी राम हा केला,
सोडुनि शत कार्यें म्यां द्यावी हाक तुझ्या हाकेला.' १३

इति सुंदरकांड:

## युद्धकांड

तेजें विजय श्री साधाया सानुज ससुगळ सबळ,
राम निघे सुमुहूर्तीं द्याया स्वशरांतें अरिकबळ. १

---

१. मिळे; सांपडे. २. साधु बिभीषणाचें घर. ३. येथें मंत्रवर्णस्थानदोष आहे.

जलनिधितीं रा जातां प्रभुला शरण बिभीषण आला;
झाला प्रसन्न लंकाराज्य स्वनमनफळ दे त्याला. २

नळकपि सु म हान् सेतु रची त्या मार्गें प्रभु तो उतरे,
पतिमथनें आरि सुगळा भ्याले, हरिला जैसे कुतरे. ३

प्रभु तारात्म ज दूतमुखें त्या हित कथि, तें खळ न गणी;
त्यांत वक्रपण आधीं मध्यें अंतीं हि जसें मगणीं.[1] ४

समरीं सहा य सचिव सुत सुभट कुंभकर्ण ही खपला,
इंद्रजित्तसा मायावी ही जारे बहु विजया जपला. ५

खळबळपा रा वारातें तो प्रभुवरकुंभज भेटे,
कीं राक्षसकुळकक्षीं रघुवर तो प्रलयानळ पेटे. ६

गरुडाहूनि म रुत्सुत आला समरीं बहु कामाला;
आणुनि ओषधिगिरिशिखरातें हृष्ट करी रामाला. ७

सप्ताहोरात्रें ज न्य करुनि दशमुख तो खपवीला;
संपादुनि विजयश्री रामें दिधला तोख पवीला.[2] ८

झाले जयज य कार बहु स्तव दिव्य वाद्यरव हर्षें,
नृत्यें गीतें केलीं कल्पद्रुमकुसुमांचीं वर्षें.[3] ९

दशकंठानु ज पदीं बसविला, मग दिव्य करी सीता,
गुरु सुखउनि कपि उठउनि केली कीर्ति कविसभागीता. १०

मग वारि वि यें[4] द्यान, विभुस प्रियजन भेटे भरतातें,
प्रभु तद्वर्वह आपण घे जो दिधला भूभर तातें. ११

सहपरिवा रा सुगळा पूजी त्या ही लंकापतितें,
व्हावें शुचि रुचिरयशें ज्याच्या क्षाळुनि अंका[5] पतितें. १२

सुख निरुप म दे सर्वजनांतें राज्य श्रीरामाचें,
आधि व्याधि भव हरि ज्याच्या उच्चारण नामाचें. १३

इति युद्धकांड:

---

१. छंद:शास्त्रांत मगणाचीं तीन हि अक्षरें गुरु असतात. २. वज्राला. ३. वर्षाव. ४. पुष्पकविमान. ५. दोषा.

## उत्तरकांड

कुंभजवदनें श्री राम प्रभु दशवदनकथा परिसे,
ज्या मत्ता विधिदत्त महावर घातक झाले आरिसे. १

घे स्वाग्रजा कुबे रा पासुनि कैकस्यात्मज लंका,
कथितां हित हरि पुष्पक, उपडी हरगिरि, न धरी शंका.

वेदवतीशप्त म रुत्तक्रतुमुनिविध्वंसक खोटा,
अनरण्यातें हांसुनि शाप स्वीकारी जो मोटा. ३

जिंकी नृप दिग्वि ज यीं, भग्ना काळाच्या करि सेना;
काळ दंड आटोपी; विधिचें उक्त कोण परिसेना? ४

असुरपरा ज य मात्र न घडला, त्यांसीं विधि सख्य करी,
वासुकिवरुणपुरें तो जिंकी सर्व स्त्रीरत्न हरी. ५

भगिनीरत्नह रा मधुवरि तो कोपे परि सख्य घडे,
अक्षौहिणी सहस्रचतुष्टय घे, हरिसीं गांठि पडे. ६

घनरव [१]शत म-ख धरुनि पुरा ने, वरद विधि करी मुक्त;
अर्जुन वाळी हरिति मद, म्हणति सुर मुनि 'झालें युक्त.'

रवि राहु स्वर्ग ज फळमति शिशु वज्रें मूर्छित झाला,
क्षोभे पवन, उठवि विधि, बहु वर सुरवर देती त्याला.

हें मुनि कथि जा य, मग स्वसखे सत्कारुनि बोळाविले,
सुवरमुदितपवनजें प्रभुपदीं [२]स्वशिरोत्क लोळाविले. ९

गर्भवतीस हि ज ननिंदेस्तव यश रक्षाया टाकी,
लवणासुर मर्दुनि शत्रुघ्न प्रमुदित करि मुनि [३]नाकी.१०

मृतविप्रतन य उठवी प्रभु, हयमेधीं कुशलवगीता
स्वयशा सेवी; दिव्य करवितां क्षितिमाजि सिरे सीता.

आठां पुत्रांतें दे रा ज्यें प्रभुवर करि सत्या [४]गी,
धर्मीं अत्यादर कळवि जना, [५]इंद्रांजिदारिस त्यागी. १२

---

१. इंद्र. २. आपला केशभार. ३. देव. ४. वाणी, वचन. ५. लक्ष्मणास.

माता ताहनि अ म रस्तुतगति दे, पुरवी श्रितकाम,
संतानकलोकीं जन ने वारि वैकुंठमियधाम. १२

इत्युत्तरकांड:

मंत्रगर्भ हें श्रीरामायण रामनंदनें रामीं
नमुनि वाहिलें हृदय रमाया प्रभुच्या चरितीं नामीं. १

इति श्रीरामनंदनमयूरविरचितं मंत्रगर्भरामायणं संपूर्णम् ।

---

# रम्यमंत्ररामायण[1]

## बाळकांड

(शार्दूलविक्रीडितवृत्त)

श्री सीतापतिपादपद्म नमुनि प्रेमें तयाच्या यशा,
गातों वंदुनि पाय आदिकविचे जे व्याघ्र मोहा शशा;
श्रीदेवर्षि वसिष्ठ गाधिज भरद्वाजात्रि कुंभोद्भव,
यांतें प्रार्थुनि मागतों वर, सरो या चिंतनें मेद्भव[2]. १

रा जा पंक्तिरथाख्य भास्करकुळीं धर्मीं सदा सादर
होता, सद्गुरुची दया पळ शिवों दे ज्या न दासा दॅर[3];
झाला वृद्ध सुभार्य आर्य सकळश्री तो कॅला[4] भाविना,
वाहे आधि, म्हणे, 'वृथा उपजलों मीं तोकलाभाविना'. २

म न्युश्रेष्ठ तुरंगमेध करितां पुत्रासि हें जाणुनि,
स्वाप्तप्रोक्त सनत्कुमारवच तो शांतापती[5] आणुनीं,
आरंभी यजना, विधिप्रमुख जे घ्याया स्वयें भाग, ते,
आले, प्रार्थिति विष्णुचे चरण कीं हे स्वावनीं जागते. ३

'जं[6] न्या अक्षम देव; दाशरथि तूं हो देवदेवा! नर,

---

१. याची रचना खरोखर च रम्य झाली असें पाहून कवीनें हें नांव ठेविलें असावें. २. माझा संसारपाश. ३. भय. ४. किंचित् अंश. ५. ऋष्यशृंग. ६. युद्धाला.

नाकीं सर्व सहाय रावणवधीं होतील हे वानर.'
श्रीवैकुंठ[1] 'बरें' म्हणे; मुनि करी पुत्रेष्टि, दे पायसा
अग्नि, प्राशिति राजदार, भव भी, राजाधि तो कायसा? ४

य ज्ञेश प्रकटे सुखें सुसमयीं सत्पुत्र तो राम हा
कौसल्यात्मज, दे खळांस चि भया साधूंसि थोरा महा;
कैकेयीसुत केशवांश भरत श्रीमान्सुमित्रासुत,
नामें लक्ष्मण भव्यलक्षण दुजा शत्रुघ्न विश्वस्तुत. ५

रा[2] केशानन ते कुमार चवघे संस्कारिले, आपवा[3]
आचार्यां भजले, तयां गुरु म्हणे 'तेजें परां तापवा;'
भूपें त्यावरि रामलक्ष्मण दिले यज्ञावना गाधिजा,
दे मारीच सुबाहु विघ्न करुनि क्रौर्यें सदा आधि ज्या. ६

म र्यादापरिपालनें हरि मुनिस्वांतासि विश्वंभर,
विद्या तो हि बळा दुजी अतिबळा अस्त्रें हि दे शंभर.
मार्गीं मारुनि ताटिकेसि [4]सुभुजा सिद्धाश्रमीं पाडुनीं,
मारीच्या प्रभुबाण दूर उडवी पुंखानिळें[5] ताडुनीं. ७

ज ह्नु स्वर्गनदीपिता नृप तसा जो साधु सीतापिता,
तो वाहे स्वमखोत्सवार्थ मुनितें ब्रह्मीं मन स्थापिता;
राम 'त्र्यंबकचाप दाखिव' असें प्रार्थी, स्वयें त्यासि घे,
विश्वामित्र म्हणे 'फिरा[6]' खगमृगां, सांत्वूनि भक्तां निघे. ८

य ज्वा गाधिज निर्मृगा[7]श्रमपदीं रामा अहल्याकथा
सांगे, लावावि पादरेणु, हरवी तत्पापशापव्यथा;
पूजी गौतम दिव्यदारसहित प्रेमें तया वाडवा[8],
त्या श्रीशा मग भूप घेवुनि शतानंदासि[9] ये आडवा. ९

ज न्म प्राप्तफळ स्व मानि जनक स्नेहें सपर्या[10] करी,

---

१. विष्णु. २. चंद्रमुख. ३. वसिष्ठा. ४. सुबाहु–मारीचाचा भाऊ. ५. पृष्ठ १९९ टीप ४ पहा. ६. मागें फिरा. ७. ओसाड. ८. ब्राह्मणा–विश्वामित्राला. ९. हा गौतमपुत्र व जनकपुरोहित. १०. पूजा.

भंगी त्र्यंबकचाप राघव तया सप्रेम सीता वरी;
सामात्या सपुरोहिता दशरथा आणूनि दे ऊर्मिळा,
भावें पूजुनि लक्ष्मणासि विधिनें शक्रा हि जी दुर्मिळा. १०
य क्षार्धीश्वरसा सभाग्य जनक भ्रात्यासि सांगे, सुता
द्याया तो भरता कुशध्वज सुधी जी मांडवी श्रीयुता;
शत्रुघ्ना श्रुतकीर्ति दे, बहु धनें सर्वांसि ते पूजुनीं
प्रेमें बोळविती, दिली न बहुधा ती जांवयां भू जुनी. ११
रा गेजे भृगुराम भर्गधनुच्या भंगें, तयाच्या हरी
तेजातें प्रभु विष्णु, शांति हनु तो जातां तपातें धरी;
केला सावध वृद्ध भूपति मनीं मानी पुनर्जन्म हें,
साकेतांत करि प्रवेश [1]नमुचिघ्नाचा सखा सन्महें. १२
म त्यश श्वशुरालयासि भरता प्रेषी रिपुघ्नासह,
प्रेमें मातुळ ने तयासि समरीं जो शत्रुला दुःसह.
छंदें सत्प्रिय बाळकांड लिहिला शार्दूलविक्रीडितें
श्रीमद्रामयशोलवें परयशें केलीं बहु व्रीडितें. १३

इति बालकांडः

## अयोध्याकांड

तो श्री मानूप 'यौवराज्य वडिला द्यावें सुता' हें वदे,
ती गुर्वादिजना सुगी तसि जसी श्रांता सुधा खेंवें दे.
कैकेयी अभिषेक राहवि बळें तों मंथरेच्या मतें,
मानीना तिळमात्र जें दशरथ प्रार्थी करी साम तें. १
'दे रा ज्य स्वसुता चतुर्दश समा रामा वनीं वास' ती
झाली मागुनि दोन दुर्वर असे हे राक्षसी भासती.
मातेचें प्रिय मान्य तो प्रभु करी तें तातसत्यावना,
सीतालक्ष्मणयुक्त तत्क्षण निघे, जोडी यशा पावना. २
धा म त्यागुनि वल्कली प्रभु पित्या मातांसि वंदी पुसे,

१. इंद्राचा मित्र. २. उत्तम वाणी. ३. आलिंगन (सुख). ४. वर्षे.

कैकेयी वारि भूप तीवारि पुरी, जी तीवरि श्री रुसे;
राजाज्ञस सुमंत्र सारथि तिघां नेतां रथीं वाहुनीं,
प्राणी सर्व हि 'हाय! हाय!' वदले जातां पथीं पाहुनीं. ३
ला ज क्षोणिपतीस होय, सदन त्यागी तिचें त्या क्षणीं;
कौसल्यानिलयासि जाय, न धरी धी प्राणसंरक्षणीं;
पौरांतें निजल्या स्थळीं त्यजुनि तो गेला प्रभु स्यंदनें,
तत्पादाब्जरजें निवे गुह सखा, जैसा फणी चंदनें. ४
श्रे य[2] स्कामहिता प्रभूत्तम भजे देवापगेच्या तटा,
तेथें सानुज वन्यवृत्ति वळवी दुग्धें वटाच्या जटा;
ताताच्या सचिवा पुसोनि उतरे पारीं भरद्वाज या,
आज्ञा पूजुनि दे द्रवोनि परमा आशी हि दे ती जया. ५
धीरां[3] राध्यपदांबुज प्रभु भजे श्रीचित्रकूटा नगा,
सांगे साश्रु सुमंत्र तें परिसतां भूप त्यजी या जगा;
आचार्यें द्रुत आणिला भरत तो मातेसि गांजी, वदे,
'पापे! मारुनि नाथ तूं न म्हणसी मातें हि कां 'जीव दे'?' ६
हें म त्कृत्य नव्हे असें सशपथ प्रार्थी, रडे तो भला;
कौसल्या हि रडे, तया मग म्हणे, 'वत्सा! विधि क्षोभला.'
तैलांतूनि शरीर काढुनि करी विध्युक्त तातक्रिया,
संपादी गुरुच्या वचा न वरुनि क्ष्मा, न प्रसूच्या प्रिया. ७
ते ज स्वी भरत प्रभुप्रति पुरा आणावयाला निघे,
सर्वामात्य, वसिष्ठ, पौर, जननी आत्मप्रसूतें हि घे,
त्या नौका न दिल्या, गुहें प्रभुसखें अक्षौहिणी[4] रोधिली,
तेव्हां ती शपथातरें[5] उतारिली जैं धी बरी शोधिली. ८
गो य ज्ञानमहार्णवें मग भरद्वाजें प्रयागीं बरा,

---

१. भूप तीवारि (कैकेयीवर) [आणि] जी पुरी कैकेयी वारि तीवारि श्री रुसे—असा अन्वय. २. स्वकल्याणेच्छूला हितकर अशा. ३. धीर=शहाणे. ४. सेना. ५. शपथरूपी आतर—नोर—म्हणजे नदीपार होण्याचें भाडें.

सत्कारूनि परीक्षिला भरत कीं त्या[1] दुर्यशें घाबरा;
पावे सत्वर चित्रकूटगिरितें, रामांघ्रिपद्मीं जडे,
ताताच्या विरहें तयासि रडवी त्याच्या स्वयें ही रडे. ९

रा[2] ज न्यप्रवरा पित्यासि भगवान् श्रीराम दे पिंड तो,
यन्नामें गति देत नारद जडां लोकत्रयीं हिंडतो;
यत्पादाब्जपरागमिश्रित महानद्याख्य जें वारि तें,
स्नान स्पर्श हि एकदा हि घडतां उग्रें अघें वारितें. १०

‘मा य प्राकृतबुद्धि कृत्य न इचें चित्तीं धरीं, बा! पुरा
चाल, स्वालय शोभवीं, यश तुझें हांसो पया कापुरा.’
ऐसें पुष्कळ तो वदे भरत तों, स्वामी म्हणे, ‘हा बरा
नोहे आग्रह, सत्यधर्म गुरुचा रक्षीं, न हो घाबरा.’ ११

‘ते रा आणिक एक अब्द सरतां येतों, पुरा जा, रहा,
घ्यावा म्यां वनवास, राज्य करणें तों त्वां हि बा! भार हा.’
ऐसें ऐकुनि तो म्हणे, ‘विनवितों हें सत्य हो! मीं, नया
धर्मा दे पदपादुका, विसरतां देहास होमीन या!’ १२

का म [3]स्वामरवृक्ष पूरवुनि, दे सांत्वूनि आज्ञा तया,
नंदि[4]ग्राम वरी विराम म्हणवी साकेत ‘हा!’ ज्ञातया;
श्रीसें[5] श्रीप्रद अत्रिदारकर ते कल्पद्रुसे शोभले,
श्रीरामप्रियभक्त या दुसरिया कांडासि जे लोभले. १३

इत्ययोध्याकांड:

## अरण्यकांड

पुण्य श्री पद भव्य दंडकवनीं श्रीराम मुन्याश्रम
पाहे, ज्यांत विलोकितां खगमृगां राहे न कांहीं श्रम.

---

१. रामवनवासास आपण कारण झालों या. २. क्षत्रियश्रेष्ठ अशा. ३. भक्तकल्पवृक्ष. ४. पूर्वी अयोध्येपासून एक कोसावर असलेल्या या गांवीं च राम येईपर्यंत भरत राहिला होता. ५. या ठिकाणीं मूळांत आरंभीं पुढील मजकूर असून दुसऱ्या पत्राच्या पहिल्या पृष्ठावरील “यातूपद्रुत विप्रसंघ हृद” खेरीजकरून बाकीचा मजकूर हरताळला आहे— [पुढें चालू

भूकन्योसि विराध राक्षस महारण्यांत जातां हरी,
त्यातें मारिति वीर दाशरथि ते जैसे करीतें हरी. १
ओ था रा शरभंगशांतिस सुखी भेटोनि त्यातें करी,
भृंगा पद्म तसा सुतीक्ष्णमुनिच्या श्रीराम चित्ता हरी;
अर्पी कुंभज देवराजनिहितें चापादि दिव्यायुधें,
नातें 'मीं पितृमित्र' हें कळविलें त्या गृध्रराजें बुधें. २
वीचे म त्स्य महेंद्रपूजित तया गोदावरीच्या तटीं,
राहे पंचवटींत तेंवि उटजीं तो दीप जैसा घटीं,
क्षोभे शूर्पणखा विरूपकरणें, पावे खराख्य क्षया,
श्रीरामा चवदा हजार किति ते मुंगे तसे लक्ष या. ३
ती का ज त्यजुनि स्वबंधुसि कथी, 'स्त्रीरत्न साधावया
गेल्यें, तत्पति तो मला तुज हि बा! भ्याला न बाधावया;
माझ्या आजि अशा विरूपकरणें हानि प्रतापा यशा,
केली त्या मनुजें तुझ्या हि पर जे त्यांच्या कथा कायशा?' ४
'हा! हा य!' क्षणदाचरेश्वर वदे, मायाप्रवीणा बळें
मारीच्या शिकवी कुबुद्धि मरणा; स्वर्णैणतेच्या छळें

---

यातूपद्रुत विप्रसंघहृदयीं जो त्रास तो कंपला.
श्रीमद्रामकृपेंकरूनि च अयोध्याकांड हा संपला. १३
पुण्यश्रीपद भव्य दंडकवनीं अत्र्यादिमुन्याश्रम
पावे, पूजुनि घे नमूनि परमाशी, नाशिती ज्या श्रम.
दे कुंभोद्भव देवराजनिहितें घे राम विष्णवायुधें;
केला हृष्ट तपें सुतीक्ष्णमुनिनें तो बाणभंगें बुधें. १४

क्रमानें इतका मजकूर लिहिल्यावर दुसऱ्या पत्राच्या दुसऱ्या पृष्ठावरील **'यीं जो त्रास'** इत्यादि मजकुर हरताळला आहे व वर **"इत्ययोध्याकांडः ॥ पुण्यश्रीपद भव्य दंडकवनीं श्रीराम मुन्याश्रम पाहे, ज्यांत विलोकितां खगमृ"** इतका मजकूर लिहून **'गां राहे'** इत्यादि पुढील मजकूर हरताळलेल्या मजकुरापुढें चालू केला आहे.

१. एक दंडकारण्यवासी रामदर्शनोत्सुक महर्षि. २. मुंगळे—**पंत**. ३. सुवर्णमृग होण्याच्या कपटानें.

मोही, 'द्या च' म्हणे 'धरूनि' दयिता, मागें दयाशेवधी[1]
लागे, राक्षस फार दूर पळतां सोडूनि आशे वधी. ५

मारी रा क्षस हाक, 'हा प्रियतमे! हा लक्ष्मणा!' यापरी,
सीता निंदुनि देवरासि दवडी, तों तीस वैरी हरी.
दुष्टा भंगुनि सून सोडवुनियां सत्य प्रतिज्ञा करी,
तो गृध्रेश जटायु कीर्ति गति ही युद्धीं वरी जी बरी. ६

बळें म र्मे जटायुचें दशमुख च्छेदूनि लंकेप्रति
नेतां, वानर पांच पाहुनि नगीं टाकी नग क्षिप्र ती.
रक्षस्त्रींत अशोकनामकवनीं श्रीजानकी ठेविली,
देवेश[2]प्रहितान्नलेश दिवसीं तें एकदा जेविली. ७

'बा! आ ज क्षितिजा वनांत उटजीं कां एकली सोडिली?
त्वां माझी बहु जी मता सतत ती आज्ञा कसी मोडिली?'
सांगे लक्ष्मण तद्दुरुक्त, निलया धावोनि ये राम, 'हा!'
शोकी, श्रीविरहीं चकोर चि गमे, मानी न येरा महा[3]. ८

'हा रा[4] य प्रवरात्मजे!' म्हणत जों सर्वत्र शोधी वनीं,
ता[5]त व्याकुळ देखतां धडकला, शोकाग्नि त्याच्या मनीं;
सांगे तो पुसतां, जटायु खग, 'म्यां केलें जऱ्ही धावणें,
सीता नेलि च हाय! मद्गति असी केली खळें रावणें.' ९

बुसें ज[6]न्मलयोपमर्दिचरणा सांगोनि होय व्यसु,
त्याचें उत्तरकार्य तो कारि, म्हणे श्रीसत्सभा ज्या वसु[7].
त्या देवीस पुन्हा हि दाशरथि तो शोधी वनीं 'हा!' वदे,
संताप स्मरतां क्षणक्षण तिचा तन्मानसा हाव दे. १०

जी स्वा[8] य त्त करावया स्मरवशा रामानुजातें धरी

---

१. दयेचा ठेवा. २. इंद्रानें पाठविलेल्या अन्नांतील थोडा अंश. ३. आनंद. ४. नौमि गोपालरायमित्यत्र राजशब्दपर्यायो रामशब्दो दृष्टः—**पंत**. राजश्रेष्ठ जनककन्ये! ५. जटायु. ६. जन्ममरणनाशक म्ह० मोक्षप्रद चरण ज्याचे त्या रामाला. ७. धन. ८. आपल्या कह्यांत राहणारा.

संभोगार्थ अयोमुखी, बहु तिची ही दुर्दशा तो करी.
नासा कर्ण कुच क्षणांत असिनें खंडी खळांचा अरी,
क्रौंचारण्य अति प्रसन्न गमलें झालें तदा त्यावरी. ११
भाह्य रा थें कबंध योजनभुज क्रूर स्वभावें धरी,
बाहु च्छेदुनि सानुज प्रभु तया शापाकुळा उद्धरी;
तो सांगे हित तें मनीं धरुनियां प्रेमें मतंगाश्रमीं
भेटे श्रीशबरीस, सत्कृति तिची घे, तोष दे ती श्रमीं. १२
पंपा म न्मथपावकासि धमनी झाली प्रभूच्या तदा,
त्यातें लक्ष्मण मेघ होय अथवा सद्वैद्य जैसा गदा.
श्रीरामें चि अरण्यकांड तिसरा थोड्यांत हा आणिला,
लीलेनें चि भवप्रचंडविटपी ज्याच्या यशें खाणिला. १३

इत्यरण्यकांड:

## किष्किंधाकांड

(स्रग्धरावृत्त)

तेथूनि श्री श जातां अनुजसह नगा ऋष्यमूकासि पाहे,
त्रासे सुग्रीव, धाडी स्वसचिव हनुमान् , तेज त्यांचें न साहे;
तो भेटे विप्रवेषें पुसुनि सकळ तद्वृत्त दोघांसि वाहे,
पृष्ठीं ने, भेटवी त्या, प्रभु करि कपिसीं सख्य, संतोष लाहे. १
भूषा दा रा त्यजी, त्या प्रभुसि सुगळ तो दाखवी, बंधु 'बा! हे
नेणें कांहीं' म्हणे, 'जें नतिपरिचित हें नूपुर स्पष्ट आहे.'
राम स्नेहें उरीं ते नग धरि, भिजवी अश्रुनीं; त्यास बोधी
सुग्रीव, 'त्वत्प्रियेतें हुडकुनि कारितों भेटि मीं स्वस्थ हो धी.'
अत्युद्दा म प्रताप प्रभु कपिस म्हणे, 'जें तुझें इष्ट कार्य,
तें आधीं मीं करीन, प्रमुदित सखया! सर्व होवूत आर्य.
वैराचा मुख्य हेतु प्रथम मज कथीं.' तो वदे "एक रामा!

१. लोखंडासारखें काळें तोंड असलेली. २. मंत्ररामायण अरण्यकांड ९३–९५ पहा. ३. वृक्ष. ४. भय पावे.

मायावी नाम आला असुर धरुनि मद्बंधुच्या घातकामा. ३
आम्हीं ही ज न्यकाम त्वरित उसळलों त्या वधाया खळाला,
भ्याला दोघांसि एक, त्यजुनि समरधी राघवा! तो पळाला.
लागे पाठीस वाळी द्रुत असुर बिळीं, जाय ठेवूनि दारीं
मातें, कीशेंद्र मागें खवळुनि शिरला बा! घनीं अंधकारीं. ४
सांगों का य प्रभो! तें निरुपम विवरीं लोटला एक अब्द,
रक्ताचा पूर आला अरिबळरव हि स्वाग्रजाचा न शब्द.
मीं किष्किंधेसि शोकें रडत बिळमुखीं अद्रि ठेवूनि आलों,
मंत्र्यांच्या आग्रहानें प्लवगपतिपदीं सिक्त[1] आरूढ झालों. ५
वाळी वी रा ग्रणी त्या निवटुनि सबळा स्वाहिता हर्ष लाहे,
येतां बाहेर रामा! न मज, बिळमुखीं ठेविला अद्रि पाहे,
क्षोभे, फोडी नगातें अशनिशतदृढस्पर्शमुष्टिप्रहारें,
देखोनि स्वासनीं बा! अरि गणुनि मला हा त्यजि प्रेम सारें. ६
लागे सा[2] म र्ष मागें, 'वध करिन' म्हणे, धांवलों लोक सारा,
बा! म्यां केली क्षमा कीं प्रथमज; नग हा तैं[3] दुराधर्ष थारा,
वाळी मारूनि दुंदुभ्यसुर उडवि तैं या मतंगर्षि शापी,
'दूषी पुण्याश्रमा तो प्लवग खळ मरो येथ येतां चि पापी.' ७
वैरा बी ज प्रभो! हें, बळ हि बहु असें दों मुहूर्तांत संध्या
सर्वांभोधींत ज्याची, चिरसमय असी हे प्रतिज्ञा न वंध्या.
लीलेनें झेलितो हा गुरुगिरिशिखरें; या कसा मारिसील?
नेणें मातें कसा तूं म्हणसि परि विपत्सागरीं तारिसील? ८
जेणें जा य प्लवंगप्रम विभु कारि तें, सप्त शालद्रु भेदी;
वालीसीं गांठि घाली, प्रभु परि न वधी, होय सुग्रीव खेदी;
कंठीं बांधूनि वल्ली पुनरपि समरा त्या सुकंठासि धाडी,
ताडी राहोनि गुप्त प्रखरतरशरें कीशपाळासि पाडी. ९

---

१. अभिषिक्त. २. रागानें. ३. दुराधर्षत्वाचें कारण उत्तरार्धांत सांगितलें आहे.

निंदी सौ जन्यसिंधुप्रति मग विनवी दे स्वपुत्रासि हातीं,
वाळी जाणे दया जी रघुकुलतिलकीं सर्वदा ती न तातीं.
किष्किंधाराज्य तारा प्रभुवर सुगळा देउनि क्लेश वारी,
सीताशोधार्थ धाडी बहु कपि पति तो मेळवी सैन्य भारी. १०
जे तारेय[1] स्वयंभूसुत[2] पवनसुत प्रेषिले ते यमाशा–
शोधीं लंघूनि मासा धृतभय वारिति प्राय[3] सोडूनि आशा;
तों संपाती तयांतें निरखि, तदशना काळसा तोंड वासी,
स्नेहें शोची जटायु व्यसु परिसुनि हें तो महेंद्राद्रिवासी. ११
सांगे "सूरा[4] तितेजें अनुजेंसमवनीं[5] कीश हो! जो जळालों
तो येथें श्रीनिशाकृत्समभिधमुनिच्या[6] आश्रमीं मीं गळालों;
आज्ञा, दाहव्यथेतें हरि, करि 'वस तों या नगीं रामभार्या
जी तच्छोध प्लवंगा कथ, फुटतिल हे पक्ष, या साध कार्या.'१२
सीता श्रीमत्प्रिया ती दिसति, मज दिसे, गृध्रदृग् दूर पाहे;
जातां लंकेशि मार्गीं कठिन नवति दिग्योजनें सिंधु आहे."
ऐसें सांगोनि गेला उडुनि, पवनभू ऋक्षपें सिद्ध केला;
किष्किंधाकांड रामें लिहवुनि चवथा सर्व सिद्धीस नेला. १३

इति किष्किंधाकांड:

## सुंदरकांड

(शिखरिणीवृत्त)

उडे वेगें श्रीमान् पवनसुत दिग्योजनतनु,
गमे धन्वी स्वामी, कपि शर, महेंद्राचळ धनु;
शिरे तुंडीं, व्योमीं भरुनि, सुरसेचें मन हरी,
करी हृष्ट स्पर्शें न बसुनि हि मैनाकशिखरी. १
समुद्रीं घोरा जी वसुनि उडतां सावलि धरी,

---

१. तारापुत्र अंगद. २. ब्रह्मपुत्र (वानरविशेष). ३. प्रायोप्रवेश. ४. सूर्याच्या प्रखरतेनें. ५. धाकटा भाऊ जटायू याचें रक्षण करित असतांना. ६. चंद्रमानामक मुनीच्या.

बळें ओढी मासी पवनसुत तीचे असु हरी.
सुखें पावे पारा, [1]रजनिवदनीं तों कलि करी
पथीं लंकादेवी, पारि झटुनि ती भंग चि वरी. २

सिरे लंके म ध्यें हुडाकि लघु होवूनि भवनीं
अशेषीं, पाहे श्रीप्रति मग अशोकाभिध वनीं,
तितें रात्रि प्रार्थी दशवदन, ती धिक्कृति करी,
[2]म्हणे वृक्षीं, 'साध्वी प्रभुसि उचिता हे बहु बरी.' ३

स्तवी त्या रा ज श्रीप्रति, तिस सुविश्वासद वदे,
नमस्कारी जातां रजनिचर, मुद्रा प्लवग दे;
कथी एकांतीं तो कुशळ मग [3]संदेशें, मणि घे,
करूनि श्रीरामागमनविषयीं निश्चय निघे. ४

द्रुम ध्वंसी य लें खचरपतिसंपादित बळें
वधी युद्धीं अक्षा दशवदनपुत्रास हि पळें;
धरूं दे ब्रह्मास्त्रेंकरुनि [4]घननादा मग बळें,
वदे भावी सर्व क्षय, वदवितां दापुनि खळें. ५

प्रदीप्त, क्रू रा स्मा हसुनि, करवी पुच्छ; सहसा
उडे, जाळी लंका, कपिवर करी भूसि [5]सहसा.
पुन्हां श्रीसीतेतें पुसुनि अचळीं वेघुनि उडे,
तळीं भूच्या भारें दडपुनि, जन्ही [6]तो गुरु, बुडे. ६

महाहर्षी म म्न प्लवग कारे भेटोनि कळवी,
खळांचीं तोंडें जें करुनि तरुभंगादि मळवी,
समुत्साहें प्याले मधु मधुवनीं भक्षुनि फळें,
वनाध्यक्षा त्या ही बहु दधिमुखा ताडुनि [7]बळें. ७

पुढ ठाके, जैं ल्पे दधिमुख सुकंठाजवळि, 'तें

---

१. सायंकाळी. २. 'मारुति' म्हणे. ३. निरोप. ४. इंद्रजिताला. ५. हास्ययुक्त. ६. सीताशुद्धि करून परत जातांना मारुतीनें ज्या पर्वतावरून उड्डाण केलें तो कायमचा भूमिमग्न झाला. ७. बोले.

कपींचें सैन्य त्वन्मधु मधुवनींचें कवाळितें.'
न कोपे, सांत्वी त्या, स्वभटकृतकृत्यत्व कळलें,
म्हणे 'जा, येवूं दे, स्वबळ मज वाटे न मळलें.' ८

महेशध्ये य श्रीचरण हृदयामाजि धरुनि,
त्वरेनें आले ते कपिभट महत्कार्य करुनीं;
सुकंठा श्रीरामा अनुजसहिता वंदुनि उभे
पुढें ठेले ज्याची स्मृतिसुरभि सर्वेप्सित दुभे. ९

प्रभूच्या कं ज श्रीहरपदयुगीं तो कपि कवी,
मणि स्थापी, हा तें परम सुख जें तोक पिकवी.
तया आलिंगी श्रीरमण, करि लोभा जनकसा,
नव्हे प्रेमें दास्या जपुनि सुयशोभाजन कसा? १०

म्हणे,'मीं का य त्वत्कृतसदृश देवूं तुज कपे!
ऋणीं झालों आम्हीं; दिनमणिपुढें कोण न लपे?'
असें वर्णी प्रेमें प्रभु, बहुत लाजे सुकवि तो;
मरुत्पुत्र ज्ञाता निजनुतिस[1] यलें चुकवितो. ११

कथी विश्वा रा ध्या पवनसुत तो जोडुनि कर,
प्रियेच्या संदेशा, 'विनवुनि शशी सोडुनिकर[2]
यशा लाजो तूतें, विनविति पहायास हसती,
पुसोनि प्रेमानें शिव[3] तुज सहायासह सती. १२

निघावें त्या म त्ता वधुनि जिववाया स्वदयिता,
यशा रक्षीं, दुःखा द्रुत हरुनि निस्यातिशयिता.'
स्वयें रामें कांड स्वगुणमय हा सुंदर महा,
सुखें केला पूर्ण प्रणतवरदें पंचम पहा. १३

इति सुंदरकांडः

---

१. आपल्या स्तुतीस. २. नक्षत्रसमूहासह. ३. कुशल.

## युद्धकांड

पुसे त्या वीरा श्री रघुपति, ‘ कसें वर्त्म[1] अरिचें,
कसें सैन्य, स्थान, प्रकृतिमत[2], साहित्य वारिचें ?
कथी सारें अन्या कठिन तुज तें सर्व सुगम,
जयश्रीचा बा ! तूं रणनिपुण आहेसि उगम ! ’ १

सुलग्नीं त्या वी रा रथ कारि बसे अंगदरथीं,
सुमित्रेचा पुत्र, प्लवगबळ गर्जे बहु पथीं;
ससुग्रीव श्रीमान् जलधितट पावोन उतरे,
म्हणे त्या सिंधूतें प्रभुकटक ‘ गर्वें न उत रे ! ’ २

न मानी जो साम त्यजुनि नयधर्म स्मरवश,
तशा मत्ता त्यागी तदनुज, तया दे पद यश,
समुद्रातें त्रासी प्रभुवर महास्त्रें स्थळकरें,
तदुक्तें सेतूतें करवि शत गावें नळकरें. ३

स्वयें रक्षोरा ज प्लवगबळ पाहे उतरलें,
हतौजा[3] केला तो प्रथम चि सुकंठें सुतरलें[4],
न मानी कांहीं तें परम हित जें अंगद वदे,
तया श्रीमान्, जैसा वनगजकुळा भंग दव दे. ४

प्रवीरांचा हो य क्षय, जन्हि पुन्हां ही पुर जळे,
तन्हीं सीता द्याया परतुनि न तो दुर्मति वळे.
प्रभू दोघे बांधी घनरव, महीजाधृति गळे,
फणाभृत्पाशोग्रव्यसन खगराजेक्षित[6] टळे. ५

सुमित्रापुत्रो रा करुनि अरिशक्ति क्षत पळे,
वरी मूर्छेतें तो, रघुतिलक धैर्यासह गळे;
खळातें लीलेनें विरथ करि, दे मार्ग, ‘निघ रे !’
म्हणे, मागें जाय, द्रुत परिभवें शत्रु विथैरे. ६

---

१. मार्ग. २. प्रजेचें मत. ३. निस्तेज. ४. अत्यंत चंचल अशा. ५. नागपाशबंधरूपी उग्र संकट. ६. गरुडानें निरीक्षिलेलें. ७. गर्भगळित झाला.

स्ववक्त्रीं जो हो म प्लवगकटकाचा करि, धरी
कपीशा तो नासा श्रुतियुग जयाचें लघु हरी.
फिरे क्रोधें त्यातें स्वयश विभु गाया चिर वधी,
सुख स्वर्गीं झालें, असुख दशतुंडीं निरवधी. ७

घनध्वान[१] स्वौ ज प्रकटि, विशिखांहीं बळ खिळी,
तदस्तब्रह्मास्त्र[२] प्रभुसुगळतेजस्मृति गिळी;
महात्मा ऋक्षेशस्तुत वरयशें सर्व निववी,
मरुत्पुत्र स्वोषध्यगशिखर आणूनि जिववी. ८

बधाभासें 'हा य!' प्रभुसि जलदध्वान[१] वदवी,
रणीं दावी त्याला अनुज विभुचा मृत्युपदवी.
महीजा माराया कुमति सुतशोकें धरि असी,
सुपार्श्वें त्या केली फिरउनि परें कीर्ति न असी. ९

पुन्हां रक्षोरा ज प्रहितस्वरशक्तिक्षत बरा
विभुभ्राता केला, पवनतनयें आणुनि धरा
शिरश्छेदें भागे प्रभु बसुनि ही वासवरथीं
मथी त्या जैं[३] सांगे मुनि मंनु[४], म्हणे भास्कर, 'मथीं.' १०

दशास्याचा का य प्रभुतिलक संस्कारवि बळें,
पदीं त्याच्या भ्रात्या बसवि अभिषेचूनि सुजळें;
करी देवीं दिव्य त्रिदशपितृवाक्यें[५] मग तितें
भजे; मेल्यां कीशां उठवुनि वरी कामगतितें. ११

सखे ते घे ता रा मुख कपिवधू ही शुभरता,
भरद्वाजा भेटे, निववुनि गुहा; आशु[६] भरता;
सुलग्नीं स्वीकारी पितृपद, करी राज्य बरवें;
प्रजा मोही गाता कुशळ, हरिणां तेंवि न रवें. १२

नवांभोदश्या म स्मरशतसहस्राधिकरुचि,

१. मेघनाद (इंद्रजित्). २. त्यानें सोडलेलें. ३. वटज–पंत. ४. सूर्यहृदय–पंत.
५. देव व पिता यांच्या सांगण्यावरून. ६. त्वरित.

स्वनामें सर्वार्थप्रद करि, यशें जो जग शुचि,
तया रामें कांड श्रवणहित युद्धाख्य रुचिर
स्वयें केला पूर्ण, प्रणत सुखवायास सुचिर. १२

इति युद्धकांडः

## उत्तरकांड

(स्रग्धरावृत्त)

सांगे रामा कथा श्री घटज, सुत पुलस्त्यर्षिचा विश्रवा, या
आद्या वित्तेशमाता[1] विमळमति भरद्वाजपुत्री सुजाया;
राज्या झाले दशास्यप्रमुख सुत तिघे त्या दुज्या कैकसीतें,
उग्रत्व[2] ब्रह्मदत्तें दशवदनिं वरें होय जें ऐकसी तें. १

आर्धी लंकापहा रा करुनि, गुरुंसि[3] दे ताप जिंकूनि पापी,
त्याच्या घे पुष्पकातें, द्रविणपति तसा तो हि नंदीश शापी.
बाहू कैलासमूळीं रगडि, विनवितां आशुतोषेश[4] सोडी,
पावे तें रावणाख्या[5] दशमुख, न वधी त्यासि जो हात जोडी.

जीतें ह्मोवे सका म त्यजुनि विनय तो केवळ क्रूर पापी,
'जन्मेन त्वद्वधा मीं' गुरुतनय[6]सुता ती असें त्यासि शापी,
आत्मा वह्नींत होमी; तदुपरि खिजवी त्या मरुत्ता हि राज्या,
त्यातें संवर्त[7] वारी, वधि मख[8]मिलिता सन्मुनींच्या समाजा.

'मद्वंशोत्पन्नते ज स्विवरदशरथापत्यरामप्रतापें[9]
युद्धीं होसील भस्म स्वजनसह महादुर्मदा! तूं स्वपापें,'
ऐसें शापी महात्मा नरपति अनरण्याख्य, दिक्कंठे पाडी.
ज्यातें पाणिप्रहारें, न गणुनि हृदयीं वाक्शरानीं हि ताडी.

धाता काळ स्वकी य प्रहरणवर[10] घे, त्यासि वारी[11] विधाता,

---

१. कुबेरमाता. २. सामर्थ्य-पंत. ३. वडील भावाला. ४. शीघ्रसंतुष्ट शिव. ५. रावण' हें नांव. ६. बृहस्पतीची नात वेदवती. ७. मरुत्ताचा यज्ञोपाध्याय. ८. यज्ञासाठीं जमलेल्या. ९. दशमुख रावण. १०. आयुधविशेष. ११. आपला वर वांया जाऊं नये म्हणून वारी.

जिंकी सर्पेश्वराचें पुरें[१], मणिपुर जें होय त्यातें हि जाता;
ब्रह्मा सांगे निवातोत्तरकवच[२] बळी सख्य यांसीं कराया,
आरंभी काळकेयांसह रण भगिनीप्राणनाथा[३] मराया. ५
ऐके सत्यस्थ नी रा धिप वरुण असें, तत्सुतातें चि मोडी,
जीच्यां दुग्धाब्धि दुग्धें, निरखुनि सुरभी तो तितें हात जोडी,
पाहे ज्या रम्यरूपा दशमुख हरि त्या देवराजर्षिकन्या.
त्यातें 'हो स्त्रीनिमित्तें तव वध' म्हणति क्रोध पावोनि धन्या.
ऐके लंकेत धा[४] म प्रचुर मिळविलें मेघनादें तपोनि,
ब्रह्मादीशांसि भावें भजुनि बहु महा यज्ञकर्मीं जपोनि,
बाळा कुंभीनसी[५] ही उडविलि मधुनें स्वस्वसा, हें हि कोपें,
संगें अक्षौहिणी[६] घे खयुगशत[७]मिता लोक ज्या सर्व सोपे.
दैवें आश्चर्य ओ ज स्वि मधुसह घडे सख्य, रंभा बळानें
भोगी, भ्रातृव्य[८] शापी, 'बळरति[९] करितां या मरावें खळानें.'
देवासीं युद्ध होतां घनरव धरि, ने शक्र लंकेशि, गोडी
ब्रह्मा त्यासीं करी, दे वर मखजरथामृत्यु[१०], तेव्हां चि सोडी. ८
त्या ही बांधोनि हा य ञ्यसु वर म्हणवी अर्जुन[११] क्षोणिपाळ,
रोधी कक्षेंत वाळी प्लवगपति हि जों त्र्यंबुधिस्नानकाळ.
सेवी श्रीमारुतीचें चरित, शिशु उडे जो फळ ब्रध्न[१२] मानी.
पाडी वज्री हि कोपे पवन चुकवि ती आत्मभूप्राणहानी. ९
प्रेषी पूजूनि रा[१३] ज द्वय, पवनसुता सद्वर श्रीश अर्पी,
निंदा ऐकोनि सीता त्यजि, लवणवधें सद्यशें विश्व तर्पी,

---

१. भोगवती. २. निवातकवच. ३. शूर्पणखापति विद्युजिह्व. ४. तेज. ५. रावणाची मावसबहीण. ६. अक्षौहिणी=२१,८७० रथ; २१,८७० हत्ती, ६५,६१० घोडे, आणि १,०९,३५० शिपाई मिळून असलेलें सैन्य. ७. खयुगशत =(ख=०, युग=२, शत=१००) दहा हजार--निर्णय. ८. पुतण्या; कुबेरपुत्र नलकूबर. ९. जबरीसंभोग. १०. यज्ञोत्पन्न रथावर असेपर्यंत अमृत्यु. ११. कार्तवीर्य. १२. सूर्य. १३. सुग्रीव व बिभीषण.

शूद्रा मारी, द्विजाचा मृत सुत उठवी, श्वेत सत्कीर्ति सेवी.
[1]काव्यज्ञ स्वाश्वमेधीं कुश लव सुत दे, जाय भूमींत देवी.
[2]आठां पुत्रांसि दा य प्रभु समदय दे आठ राज्यें, तदा तें
काळें केलें सुबंधु त्यजवुनि विरस श्रीश जाया पदातें.
श्वोलूकन्यायकर्ता परम सदयधी आणवी भक्त सर्व,
प्रेमें सांत्वी प्रजांतें प्रिय करि, नुरवी काम तो जेंवि शर्व.
सर्वां जीवांसि धी रा सुलभ सुगति दे, ने प्रजा गोप्रतारीं
तीर्थीं स्नातां विमानीं बसवि, वसवि संतानकीं[3] लोकसारीं.
झाले दिव्यस्वरूप प्लवग [4]किटि खर श्वान मार्जार देही,
त्या पर्वीं पावले ती गतिखनि सरयू कीट जे धन्य ते ही.
जो ठेवी भक्तना म प्रणतसमवना जाय वैकुंठलोका,
श्रीमद्वाल्मीकिगीत स्वयश हि सकळा संहरायासि शोका,
त्या रामें उत्तराख्य द्रवुनि लिहविला सातवा कांड हा कीं,
जे प्रेमें सेवितील स्तवितिल अमृत प्राशिते त्यांसि नाकीं.

इत्युत्तरकांड:

## [ उपसंहार ]

( विविध वृत्तें )

जो अत्यद्भुत साधुगीत महिमा गंगाप्रवाहीं वसे,
प्रेमें स्वल्प कुपींत गांग[5] भरिलें जें त्यांत ही तो असे;
श्रीरामायणवर्ति सत्सुकृत या ग्रंथांत आहे तसें,
श्रीरामप्रियभक्त साधु रसिक स्वांतांत पाहे रसें. १
भावें वंदुनि रामचंद्रचरणीं ग्यां ग्रंथ हा वाहिला,
कीं या चि प्रभुनें प्रपन्न[6] जन जो तो बंधुसा पाहिला;
उच्छिष्टें बदरें महामखपुरोडाशाधिकें लक्षिलीं,
ताराया शबरीस, साधु म्हणती, अत्यादरें भक्षिलीं. २

---

१. वाल्मीकि. २. मंत्ररामायण पहा. ३. संतानकनामक श्रेष्ठ लोकांत. ४. डुक्कर. ५. गंगोदक. ६. दु:खी किंवा शरणागत.

श्रीरामायण सर्व साधुमतिस खीर्षीस माहेरसें,
कीं हो प्राकृत संस्कृत प्रिय चि तें पाहोनि पाहे रसें;
जो ऐसा प्रभु त्या जना न विचकूं दे दांत, बाहे, 'रहा
वैकुंठीं च' म्हणे, प्रसन्न चि सदा ही आंत बाहेर हा. ३
स्तन्य स्वस्थ प्रसूचें सकळ हि कारितांना च आ बाळ लाहे,
वार्ता कोणी न मानी कुशळ सुरभिचा वत्स आबाळला हे;
प्रेमें पाळी कधीं ही 'निज गुण न' म्हणे माय 'गा' बाळकाला,
न्हावा चि श्रीधरास प्रिय बहु जरि हा ग्रंथ गाबाळ काला. ४
मानील प्रभु रामभद्र हृदयीं या तोक विप्रा, कृत-
ग्रंथा वानिल, तो म्हणेल न 'वृथा गातो कवि प्राकृत';
ऐसा नित्य अति प्रसन्न दुसरा दाता न दीनावरी,
ज्याची पादभवा हि इष्टवरदा हाता नदी नावरी. ५
जसी देवा सेवा स्तुति बहु रुचे, साधु वदती.
नसे अन्या धन्या, मिळवुनि न दे क्षिप्र पद ती.
सदा नव्यें भव्यें प्रभुयश चि दे, देति सव ते
फळें आमें, नामें प्रभु चि न असे यज्ञ सवते. ६
सदा गावें सीतारमणयश हा योग बरवा,
रवीं या साधी जो जन धरि पराची न परवा;
रवा नामाच्या भी भव कळिकथा काय? गमला
मला न श्रेष्ठा ही गुरु म्हणुनि देवर्षि रमला. ७
'गावें रामचरित्र सादर सदा स्यां' हा वराया वर
श्रीरामप्रियभक्त हो! विनवितों, प्रेमा करा यावर;
जैसा वारिद चातकाप्रति सुधेचा त्या खगा आकर,
युष्मत्सद्गुण ही तसा म्हणतसे रामात्मजा 'आ कर.' ८
नामातें प्रभुच्या मयूर विनवी, "चित्ता भरीं या भरीं,
'श्रीरामायण' गाइलें तन्हि पुन्हां गावें चि ऐसें करी.

---

१. असें रूप सुदुर्मिळ आहे. २. कच्चें. ३. वेगळे. ४. दिव्य—पंत.

पापाचा परिहार फार बरवा व्यापार हा साधुनीं,
गावा यासि सदैव या मम मुखीं बापा! रहा साधुनीं." ९

इति श्रीरामनंदनमयूरविरचितं रम्यमंत्ररामायणं संपूर्णं ।

---

# दोहारामायण

(दोहावृत्त)

श्रीरामाचें चिंतितां प्रेमें पदराजीव
'वा!' वेद म्हणे, 'सर्वथा पावे न दरा जीव.' १
श्रीरामाचें वारितें, पातक सारें नाम,
सकृदुच्चारें[1] तारितें, सर्व पुरवितें काम. २
निववीतें जें पावतें बहु मानस खेदास,
पावति या प्रभुचे जसे बहु मान सखे दास. ३
पीयूषाहुनि शतगुणें रामाचें यश गोड,
याचें उदारपण म्हणे मंदारा 'कर जोड.' ४
गाधितनुजमख रक्षिला, उद्धरिले मुनिदार,
ईश्वरधनु भंगुनि दिलें सुख सीतेला फार. ५
भृगुरामाचा शमविला प्रलयानळसम कोप,
लोक स्वयशीं रमविला, करुनि असत्पथलोप. ६
गुरुसत्यव्रतरक्षणाकरितां[2] तत्क्षण राम
प्राप्त हि राज्यपद त्यजी, गतसार जसें दाम[3]. ७
सीतालक्ष्मणसह निघे त्यजुनि अयोध्याधाम,
वनवासा बहु आदरी न नवासा श्रीराम. ८
देता झाला पादुका सेवाला भरतास,
देउनि तिळजळ दशरथा देवाला, भरतास. ९

---

१. एकवेळ उच्चार केल्यानें. २. बापाचें वचन खरें करण्याकारितां. ३. पुष्पमाळा.

भरत परतला, मुनिजनीं पीडा मग पाहून,
निघे चित्रकूटाख्य जो प्रभु त्या नग[1]पाहून. १०
निववी [2]घटजप्रमुख जे सुव्रत नव नव संत,
मुनिवृंद प्रभु शोभवी, तैसें न वन वसंत. ११
वधुनि विराधा राक्षसा जो गृध्रांचा राय
पितृसख सुखवुनि तन्मतें पंचवटीला जाय. १२
तो दाशरथि प्रभु करी गोदातीरीं धाम,
नासाकर्ण छेदवी शूर्पणखेचे राम. १३
त्रिशिरा खरदूषण असे आले राक्षस शूर,
ते केले रघुनंदनें चवदा हजार चूर. १४
प्रेषी मारीचा खळा सिकवुनि राक्षसभूप,
भ्रमवी सीतानयनमन तो कांचनमृगरूप. १५
सीता प्रभुसि म्हणे, ‘पहा, कनकमृग धरा, जा च,’
कीं व्हायाचा सांपडुनि परमखळकरा जाच. १६
होय समजुनि हि ती तसी [3]एणता तसा मान्य,
क्षीण हिताहित हें जसें नेणतात सामान्य. १७
‘हा सीते! हा लक्ष्मणा!’ गर्जुनि ऐसें प्राण
सोडी तो मृग, लागतां हृदयीं प्रभुचा बाण. १८
वदली सीता, ‘लक्ष्मणा! धांव, न उटजीं ठाक,
हा! कठिना स्वस्थत्व हे ऐसी ऐकुनि हाक?’ १९
लक्ष्मण वदला, ‘देवि! हे राक्षसमाया जाण,
स्वस्थ रहा, प्रभुच्या करीं आहे कार्मुकबाण.’ २०
ती बहु कोपे, त्या म्हणे, ‘खळा! मरावा राम,
ऐसें चिंतिसि तूं मनीं माझा धरूनि काम.’ २१
लक्ष्मण तीतें करि नमन, गमन हि तेथुनि दूर,
पूर अश्रुचा आवरूं न शके तो जरि शूर. २२

१. पर्वतश्रेष्ठाहून. २. अत्रि–पंत. ३. हरिणपणा.

तों उटजीं यतिरूप दशवदन सिरे तत्काळ,
त्या स्त्रीरत्नातें हरी तो तस्कर सत्काळ. २३
केला विरथ जटायुनें तो क्षत[1]विग्रह चोर,
तत्पक्ष च्छेदुनि निघे, न गणी अधर्म थोर. २४
फिरतां मार्गे भेटला लक्ष्मण शोकें दीन,
त्यासि म्हणे, प्रभु 'बोल, कां दिससी तेजें हनि? २५
संचरती या राक्षसश्वापदसंघ वनांत,
त्यजिली कसि ती एकटी जी मृदु भीरु मनांत? २६
कसें मदाज्ञाभंग हें आलें आं[2]ग मनास?
वत्सा! कारण कोणतें झालें आगमनास?' २७
सांगे जें वदली सती तें होउनि पदलीन,
राम म्हणे, 'कदलीस ती गुणें समा, वदली न.' २८
'हाय!' म्हणत उटजाकडे जाय रघूंचा राय,
घाय विरहदुःसह उरीं, काय करील उपाय? २९
राम म्हणे, 'न दिसे, नसे या उटजाबाहेर,
वात पुरे, आंत, प्रिया! तूं उठ जा बा! हेर.' ३०
आंत हि नसतां प्रियतमा, 'हाय!' म्हणे रघुवीर,
सानुज साश्रु पुनःपुन्हा शोधी गोदातीर. ३१
करितां शोध, वनीं दिसे क्षत[1]विग्रह तो तात,
झाले शोकाकुळ तसे जसे पुत्र होतात. ३२
'केली हे गति, रावणें नेली सीता जाण.'
विकळ जटायु असें कथी तत्क्षण सोडी प्राण. ३३
तातसखाचें करुनियां दाहा[3]द्युत्तरकार्य,
सद्गति देता जाहला, व्हाया प्रमुदित आर्य. ३४
पुनरपि फिरति वनांत, तों योजनबाहु कबंध
धरि, असिनीं तद्भुज मथिति, ते हारिते भवबंध. ३५

१. भग्नदेह. २. अपराध. ३. दहनादि उत्तरक्रिया.

शबरीस बरी भेटि दे सद्गति कीर्ति हि राम,
बदरें पदरें घे तिचीं ज्याचें अमृत चि नाम. ३६
पंपातीरीं मग वसे [1]शंपाशतरुचिचाप,
संपाया धृति विरह दे कंपा उठउनि ताप. ३७
भेटे मारुति मग करी सुग्रीवाची भेट,
झाले चिंतासागरीं अन्योन्या ते बेट. ३८
[2]वाळी आल्या दुष्ट जो वाळी, त्याचे प्राण
श्रीराम प्रभु घे पळें, एक चि हाणुनि बाण. ३९
दुर्लभ तैल हि ज्यास, तो जैसा आज्यप, दास
सुगळ योग्य केला तसा प्रभुनें राज्यपदास. ४०
हटकि सुगळ, बहु भेटती [3]कीश आसाविल यास,
जे पटु अरिची न्यावया रणीं आस विलयास. ४१
धाडी सुगळ करावया जनकसुतेचा शोध,
पूर्वोत्तर पश्चिम दिशा हुडकुनि आले योध. ४२
जांबवदंगदमारुतिप्रमुख ऋक्षकपिवीर
दक्षिणदिशेसि धाडिले, बहु तेजस्वी धीर. ४३
सांगे बंधु जटायुचा संपाती तो शोध,
'लंकेंत तिचा दशमुखें केला आहे रोध.' ४४
मारुति शतयोजन जलधि लंघुनि गेला पार,
फार तयासि न वाटला दुर्घट हा व्यापार. ४५
मनीं म्हणे कपि देखतां सती अशोकवनांत,
'ग्रथिलि उपनिषत्प्राकृता कसी पशो! कवनांत?' ४६
रात्रौ पारिसे [4]शिंशपागत कवि कपि सारें च,
घे उतरूनि सतीमुखें हत[5]भविक पिसा रेंच. ४७

---

१. शेंकडों विजांच्या कांतीसारखें चाप ज्याचें असा (राम). २. टाकी. ३. खोडलेला पाठ—ऋक्ष. ४. अशोकवृक्षावर चढलेला. ५. हतभविक=नष्ट कल्याण असा.

क्षुद्रापगमावरि[1] तिला मुद्रा दे हरि खेद.
रुद्रात्मा हित कथि जसा मुद्रांशिप्रद[2] वेद. ४८
चूडामणि पाठवि जणों मूर्तिमंत अनुराग,
काककथा खुण कथि, म्हणे, ‘ अरिवरि करु धनु राग.’ ४९
कपि वन भंगुनि करि रणीं लक्ष अक्षसह चूर,
भ्रमवुनि दशमुख विधिकडे दवडि पुरीचा धूर. ५०
पुसुनि सतीस पुन्हा उडे जेंवि शर प्रभुमुक्त,
लंघुनि जलनिधि होय तो अंगदादिकपियुक्त. ५१
वंदुनि चूडामणि करीं प्रभुच्या दे कपिहीर[3],
आलिंगुनि ‘मीं तव ऋणी’ असें वदे रघुवीर. ५२
प्रभुवर भाग्यें लागतां जनकसुतेचा शोध
योध अमित घेउनि करी जवळ जलधिचें रोध. ५३
दशवदनें धिक्कारितां, प्रभुतें, वंदुनि पाय,
विनवि बिभीषण, यासि दे अभय रघूंचा राय. ५४
तो शरणागत निववला देउनि लंकाराज्य,
तें प्रेम तया वाढवी जेंवि ज्वलना आज्य. ५५
प्रार्थुनि सागर युक्ति कथि निजजललंघनहेतु,
आज्ञापुनि नळवानरा करवि प्रभुवर सेतु. ५६
प्रभु सेतुपथें उतरुनि प्रेषी अंगद दूत,
तन्मंत्रें खळ खवळला, जेंवि अतिमलिन भूत. ५७
रामाज्ञेनें घालिती त्या कपिपृतना कास,
देती राक्षस हर्ष बहु होउनि मृत नाकास. ५८
दशवदनाचे मारिले सचिव सुत हि समरांत,
अमरांत तनन[4] होय विभुजय पद्म भ्रमरांत. ५९
आकारें घटकर्ण तो केवळ पर्वत साच,
प्रभुशर निजतेजोगुण प्रकटी सर्व तसा च. ६०

---

१. नीच रावण गेल्यावर. २. आनंदराशि देणारा. ३. वानरश्रेष्ठ. ४. यशोगान.

रुद्र[1]बिभीषणयुत करी लक्ष्मण घननादांत
गुरुसत्संगाश्रित जसा षडहि[2]तहनना दांत. ६१
शक्ररथीं बैसुनि करी श्रीश समरसत्रास,
क्षण मुदित क्षण जाहले सर्व अमर सत्रास. ६२
धरणें पडे करावया यश परमा[3] या काय,
पर मायाधिपतिस करिल वश परमाया काय? ६३
कवि म्हणति विपं[4] प्रभुशरा, दशानना कालाहि,
सोसे ती दुर्व्यसनजा दशा न नाकाला हि. ६४
शंका हरुनि बिभीषणा रंका संगरधीर,
पंका[5]पहगुणसिंधु दे लंका श्रीरघुवीर. ६५
अरि वधिल्यावरि आणवी सीतेतें बाहेर,
करुनि प्रेम न आठवूं दिलें जिला माहेर. ६६
प्रभु तिस म्हणे, 'धुवावया सोडविलीस[6] यशास,
जा, त्यजिलिस परकरगता व्हाविस मला कशास?' ६७
यन्मन पतिच्या चिंतनीं स्मरणीं अनलस, तीस
दिव्य काय अवघड? शिवों न शके अनळ सतीस. ६८
दिव्यार्थ ज्वलनीं शिरे नच वचके उग्रास,
तिस तो होय तसा जसा ग्रीष्मीं जल[7]मुग्रास. ६९
शंकर विधि वदले, 'विभो! अंकरहित हें रत्न,
स्वीकारीं रघुनंदना! निष्फळ न करीं यत्न.' ७०
दशरथ हि म्हणे, 'न छळीं शुचिरुचि रुचिर सुदार
रामा! स्वीकारीं, इचा महिमा परम उदार.' ७१
शक्र म्हणे 'वधिला भला अरि करिता परभाग,
श्रीरामा! जगदभयदा! सुयशस्कर वर माग.' ७२
राम म्हणे, 'उठिव प्रभो! [8]दशशतनयना! कीश.'

---

१. मारुति. २. षड्रिपुनाशा. ३. ईश्वरास. ४. गरुड—**पंत**. ५. पापनाशक.
६. सोडिलें (मीं तुला सोडिलें). ७. मेघसमूह. ८. सहस्राक्ष इंद्रा!

उठवी वर्षुनि अमृत तो अदितितनय नाकीश. ७३
करवी दिव्य प्रभु असें लोक[1]प्रत्ययकाम,
वाम अंक मग शोभवी श्रीतें स्थापुनि राम. ७४
बसुनि विमानीं ऋक्ष कपिराक्षसपतिसह राम,
प्रमुदित भरत करावया निघे त्रिजगदभिराम. ७५
प्रभु जी अंकीं प्रियतमा सेतु लक्षवी तीस,
म्हणे, 'सुखांचे[2] अविरहीं हेतु लक्ष वीतीसें[2].' ७६
दाखवुनि स्वसहाय जे, त्यांचें सांगे नाम,
तत्तद्विक्रमसत्कथा वर्णी जगदभिराम. ७७
श्रीसीतेचें निजपुरीं अंगद कळवी उक्त.
प्लवगवरांच्या पातल्या दारा तारायुक्त. ७८
गोदावरीस पाहतां मोदा वरी सदार,
न त्यजि भुक्ति वरावया ज्याच्या अरीस दार. ७९
दर्शन देउनि निवविला तो गुहनाम निषाद,
सकळ हि पूजनसह भरत हरुनि वियोगविषाद. ८०
प्रभुचें प्रभुला नमुनि दे राज्य भरत भरतस,
स्तवि निजकुलतिलकासि तो ससि[3] जयाचे सस[4]. ८१
अभिषेकमह प्रोच्च जो इतर निपट तो खर्व,
वर्णिति पुण्ययशःसुधा तृषित ऋषि तया सर्व. ८२
श्रीराम सरस मुदिर जे भक्त सकळ नर मोर.
साकेत जसें प्रिय तसें प्रभुदृष्टिस न रमोर[5]. ८३
निउनि सुर सुखें नाचती प्रभुच्या दृष्टिसमोर,
प्रभुमूर्तिस कवि सेविती, जैसे वृष्टिस मोर. ८४

इति श्रीदोहारामायणं समाप्तं ।

---

१. लोकाना प्रत्यय यावा अशी इच्छा करणारा. २. समागमीं लक्षावधि सुखें देतेस असा भावार्थ. ३. ससि म्हणजे घोडे—**पंत**. ४ ससाश्वः सूर्यः—**पंत**. ५. लक्ष्मीचें वक्षःस्थळ.

# घनाक्षररामायण

(घनाक्षरवृत्त)

श्रीरामाच्या नामें ताप । नाशे, भंगे सारा ताप, । ऐसा अन्यत्र प्रताप । कोणा ही मंत्रीं नसे. ।। घेतां श्रीरामाचें नाम, । लाभे श्रीवैकुंठीं धाम, । होती सिद्ध ध्यातां काम, । इच्छा न स्वल्पा वसे. ॥ सिद्धी सर्वा दासी स्पष्ट, । विप्रस्वांतीं[1] मोटे कष्ट, । षड्वैरी ते स्थानभ्रष्ट, । धाकें वांचावे कसे ? ॥ नामीं निष्ठा होतां मात्र, । व्हावें स्वःसत्कारा[2] पात्र, । शक्रादि स्वर्गस्थ छात्र, । जैसे आचार्या तसे. ॥ १ ॥ श्रीसूर्याच्या वंशीं भूप । दशरथ धर्मरूप, । तदन्य कासार कूप । तैसे राजे वाटती. ।। तो श्रीवसिष्ठाचा याज्य[3] । अयोध्येंत करी राज्य, । प्रजांसि सुख दे प्राज्य, । शत्रु उरीं फाटती. ॥ शौर्यौदार्यादि उदार । ज्याचे श्रेष्ठ गुण फार, । सुधारसाहूनि सार, । त्रैलोक्यांत दाटती. ॥ ज्याच्या यशें साधु तुष्ट । तेजें नम्रग्रीव[4] दुष्ट, । अर्थी नाहीं झाले रुष्ट । कीं कामना आटती. ॥ २ ॥ प्रजावर्नी जाय काळ, । वृद्ध होय धरापाळ, । संतानचिंताग्निज्वाळ । तप्त करी त्या सदा. ॥ सुमंत्र सचिव युक्त । सनत्कुमाराचें उक्त, । सांगे होय आधिमुक्त । रघुराज तो तदा. ॥ यथाविधि हयमख । करी शतक्रतुसख, । उरीं दे पाहायास खं[5] । न विमानसंपदा. ॥ अग्नि दे पायसपात्र, । भूप रोमांचितगात्र, । पाहे योग्य नतिमात्र । ऋष्यशृंगाच्या पदा[6]. ॥ ३ ॥ पायसीं प्रवेशे अज, । जेणें उद्धरिला गज, ज्याचें पादपद्मरज । दुर्लभ विधातया. ॥ दिव्यान्नाचे तो विभाग । तिघींस दे महाभाग, । ज्यांचाठायीं सानुराग । त्या जोडिती हात या. ॥ गर्भवती होतां काय । पाहे सुप्रभ, न माय । हर्षे विश्रांत, न राय । लावी पातें पातया. ॥ जाले तयांचे दोहद । शक्रसखासि मोहद, । वाटे आपण

---

१. विप्रांच्या मनांत. २. स्वर्गीय सत्कारास. ३. यजमान. ४. खालीं माना वांकविलेलें. ५. आकाश. ६. ऋष्यशृंगाच्या योग्य पदा नतिमात्र (नमस्कार करितांना) पाहे—असा अन्वय.

लोहद । त्या सुवर्णदातया. ॥ ४ ॥ कौसल्येसि झाला बाळ । विष्णु त्रिभु-वनपाळ । तैं शुभ मध्याह्नकाळ । पुनर्वसू नवमी. ॥ होय हर्ष अतितम, । जाय हृदयींचें तम, । उत्सव उत्तम सम, । अवमीं[1] अनवमीं[2]. ॥ लंकेंत उ-त्पातशत, । राक्षस वदले,‘ बत[3]!’ । रावण चि चित्तगत । जाड्यविष[4] न वमी. ॥ मोटा आनंद पुरांत, । बहु त्याहुनि सुरांत, । वदों किती भिदु-[5]रांत, । तो काय मानव मीं ? ॥५॥ राजा होय पूर्णकाम, । कौसल्यापुत्रासि ‘राम’ । ऐसें गुरुमतें नाम । ठेवी, करी बारसें. ॥ दुजा कैकेयींचा सुत, । तो भरत साधुस्तुत, । तद्रूपशील अद्भुत, । त्या निवाला बा[6] रसें. ॥ सुमित्रेचे दोघे वीर, । लक्ष्मण शत्रुघ्न धीर; । यद्यशें न वाटे क्षीर, । अमृत हि सारसें[8]. ॥ तोकचतुष्टयें जाय । आधि ताप, बहु धाय । तत्स्पर्शें चुंबनें राय, । जैसा भृंग सारसें. ॥ ६ ॥ वासिष्ठ पढवी वेद, । ज्याहीं लया जाय भेद, । स्वर्गी-ही न राहे खेद । मग सांगे पांचवा[9].॥ म्हणे ‘करा विश्व वश, । तुम्हीं हरी, अरी शश, । शंभु[10]वर्णसख यश । शुद्ध नित्य सांचवा ॥ नमितिल जे चरण, त्रासें येतिल शरण, । करा तत्तापहरण, । सर्वथैव वांचवा. ॥ पुरवा भक्तांचें कोड, । रक्षा दीन जैसे फोड । प्रकटुनि गुण गोड, रसिकांस लांचवा[11].’ ॥ ७ ॥ विश्वामित्र तपोधन, । त्याचें तोषवाया मन, । तृषितें तृषिता वन । पीतां द्यावें ज्यापरी. ॥ गुरूक्तें दशस्यंदन[12] । राम लक्ष्मण नंदन । अर्पी क-रूनि वंदन; । चित्तीं म्हणे ‘हा!’ परी. ॥ बळातिबळाख्या दोन । विद्या दे, गुण वदोन, । प्रवास राज्यपदोन[13] । न वाटे त्याउपरी. ॥ प्रेमें अस्त्रशत-दान । दे रामा सबहुमान, । गाधिज सत्कथापान । करवी परो-परी.. ॥ ८ ॥ मुनि गुरु म्हणे ‘हाण,’ । तों चि सोडूनि सुबाण । ताटकेचे हरी प्राण, । राम लावी न क्षण. ॥ सिद्धाश्रमीं निशाचर । सुबाहुप्रमुख ‑खर । संहारी हाणूनि शर, । करी यज्ञरक्षण. ॥

---

१. कनिष्ठ प्रतीच्या लोकांत. २. अन्+अवमीं=श्रेष्ठ दर्जाच्या लोकांत. ३. खे-दार्थी अव्यय. ४. मतिमांधरूपी विष. ५. भिदुर म्ह० विद्युत् किंवा वज्र; तें रहातें जेथें तेथें म्ह० अंतरिक्षांत. ६. बाप, दशरथ. ७. प्रेमानें. ८. सारभूत असें. ९. धनुर्वेद. १०. शुभ्र. ११. लुब्ध करा. १२. दशरथ. १३. राज्यपदापेक्षां उणा.

पुंखवातें[1] महाशूर। मारीचा उडवी दूर, । दैवें झाला नाहीं चूर। तो कीं, तें विलक्षण;॥ विश्वामित्र संभाजन[2]। करी, स्तुतिस भाजन, । सर्व ऋषि सभाजन। झाले तेव्हां सक्षण[3]. ॥ ९ ॥ अहल्येचा ग्रांवभाव[4]। करी पादरजें वाव, । पांपशापदवदाव[5]। राम विश्वतारक. ॥ गौतमासि गृहधर्म। प्रवर्तवूनि दे शर्म, । म्हणति तयासि चर्म-। चक्षु नरदारक[6]. ॥ उद्धारिले मुनिदार, । वदले, 'तूं चि उदार, । उघडिलें मुक्तिद्वार, । चुकविला नारकँ[7]. ॥ पोटीं अपराध लक्ष। घालिसी सदय दक्ष, । षडरीपासूनि रक्ष। रामा! हे चि मारक. ॥ १० ॥ सेवीत त्या भूसुरास। गेला जनकपुरास, । द्याया शत्रूंच्या उरास। कंप, जय जोडुनीं. ॥ करी प्रकट प्रताप, । हरी महेंद्राचा तार्प[8], । वरी जानकीस चाप। ईश्वराचा मोडुनीं. ॥ उर्मिळादिकन्यात्रय। लक्ष्मणादिकां दे नय-। धर्मज्ञ मैथिल, भय। संसाराचें सोडुनीं. ॥ मिळाला जामाता राम। योगिजनांचा विश्राम, । नता देता मोक्षधाम। बंधलेख[9] खोडुनीं. ॥ ११ ॥ रुद्रशिष्य भृगुराम। रोधी मार्ग महोद्दाम, । रघुरामें त्याचें धाम[10]। लीलेनें चि हारिलें. ॥ मग रक्षोवधकार्य। करावें सुर सभार्य, निववावे सर्व आर्य। ऐसें मनीं धरिलें, ॥ कैकेयीचें व्हाया इष्ट। ताताचें ही सत्यदिष्ट[11]। सफळ कराया शिष्ट। मुनिव्रत वारिलें. ॥ अग्नीनें सोडावें आज्य, । तैसें, ज्यांत सुख प्राज्य, । त्यजिलें समृद्ध राज्य, । यशें विश्व भारिलें. ॥ १२ ॥ सीतालक्ष्मणसहित। वना जाय सन्महित, । करी मुनी जन्महित। तप सिद्धि नेउनि. ॥ चित्रकूटीं नगीं वास। आदरी लक्ष्मीनिवास, । वल्कल अजिनवास। आंगावरी घेउनी. ॥ स्वजनसह स्मरत। तेथें साश्रु ये भरत। म्हणे, 'श्रीरामा! परत.'। पायीं शिर ठेउनीं. ॥ तातासि दे तिळतोय, । मग सुप्रसन्न होय, । राखे सद्बंधुची सोय। त्या पादुका देउनीं. ॥ १३ ॥ अत्रि अनसूया तात। माय मानी, जोडी हात, । विराधराक्षसघात। करी

१. पृष्ठ १९९ टीप ४ पहा. २. पूजन. ३. सोत्सव—पंत. ४. पाषाणत्व. ५. पापशापवनाग्नि. ६. मानवपुत्र. ७. नरकलोक. ८. धनुष्यभंग करून रावण सीताहरण करितो कीं काय ही इंद्राची भीति. ९. पूर्वदुष्कृतभोगाविषयींचें ब्रह्मलिखित. १०. तेज. ११. सत्योक्त.

काननीं मग. ॥ महामुनी शरभंग । भेटे तयास श्रीरंग, । सुतीक्ष्णासी पुण्यसंग । साधी स्वामरनग. ॥ घटजाश्रमीं क्रमून, । काळ सद्वृंदीं रमून, । वैष्णवास्त्रें घे नमून । यशें भराया जग. ॥ धरी पंचवटीपथ । विश्वगीत पुण्यकथ, । सुखी करी दशरथ-। सख जटायू खग. ॥ १४ ॥ तेथें शूर्पणखा रांड, । म्हणे, 'रामा! सीता सांड, । मजसीं विलास मांड.' । बळें गळां पडली. ॥ बोले, 'लक्ष्मणा जा वर' । ऐसें योगिज्ञानिवर; । तो ही न बघे त्यावर । सीताघाता अडली.[1] ॥ दंडी सौमित्रि सुज्ञान, । खंडी खड्गें नाक कान, । चंडी ती त्या जनस्थान-[2] । नाथापुढें रडली. ॥ श्रीरामें ससैन्य खर । संहारितां निशाचार-[3] । पतिस सांगे, 'हे नर-। हस्तें गति घडली. ॥१५॥ आहे मनुष्यस्त्रीरत्न । तयापुढें तुच्छ प्रत्न[4], । त्वदर्थ कारितां यत्न, ऐसें केलें मानवें. ॥ लंघिलासि नरें आज, । त्याची कांहीं धरीं लाज, । साधिलें त्वां जें तें काज, । न देवें न दानवें. ॥ सोड वज्राधिक शर । मार रणांत ते नर, । हो त्या स्त्रीरत्नाचा वर, । यश जोडीं बा! नवें. ॥ उठ, बैसलासि काय? । लाव त्या म्हणाया 'हाय!' । शूरा तेज चि सहाय, । द्विजा जेंवि जानवें. ॥ १६ ॥ करी मारीचा सहाय, । मायावी राक्षसराय, । पंचवटिप्रति जाय, राहे नभीं दडुन. ॥ हेममृग होय खळ । सीतामनोमीना गळ, । ठाके एकत्र न पळ, । देवी मागे अडुन. ॥ सांगे लक्ष्मणा अवन, । सोडी उटज-भवन, । धांवे श्रीराम जवन । शरें ताडी जडुन[5]. ॥ रामापरि फोडी हाक, हंसस्वर करी काक, । घाली भूजामनीं[6] धाक । पृथ्वीपृष्ठीं[7] पडुन. ॥ १७ ॥ जानकी वदे, 'हा तात! । झाला सर्वस्वाचा घात, । धांव, जोडूं काय हात, । जा लक्ष्मणा! नीघ रे!' ॥ तेव्हां तीस तीचा दीर । सांगे तत्व, द्याया धीर, । 'माते! ढेंकुळसा हीर । जळीं काय वीघरे?' ॥ सौमित्रिच्या पाडी, कोप-। करूनीं विवेकलोप, । हाणुनि कुशब्दरोप, । हृदयास ती घरे. ॥ करी सीतेसि नमन, । साश्रु तेथुनीं गमन, । म्हणे त्या तप्तास मन । 'रामहृदीं रीघ रे!' ॥ १८ ॥ सौमित्रि जातां चि, पाप । मेघनादाचा ये

१. मनानें हट्ट धरिला. २. जनस्थानाधिपति खरराक्षसापुढें. ३. रावणास. ४. पुरातन. ५. पाठलाग करून. ६. सीतेच्या मनांत. ७. खोडलेला पाठ-तळीं.

साप, । गरुडाच्या गृहीं साप, । तैसा सिरे दांडगा. ॥ सीतेतें गोद्विजकाळ । हरी राक्षसभूपाळ, । जेंवि कुळभ्रष्टबाळ-[1] । हारिणीतें लांडगा. ॥ जटायु सोडवि सून, । न गमे विभावसून[2], । चूर्ण करी गींवसून[3] । रथ, जया सांडगा. ॥ रावण कपटदक्ष । तोडी खड्गें त्याचे पक्ष, । म्हणे, 'ये, वधूसि रक्ष, । उठ, पुन्हां भांड गा!' ॥ १९ ॥ स्कंधीं वाहोनि ने मग, । ऋष्यमूक लागे नग, । पांचां वानरांत नग । सोडी सोत्तरीय ती. ॥ बळें सीतेसि हरून, । मृत्युभय न धरून, । पावे लंकेसी वरून[4], । तो खळ, वायुगती. ॥ तेथें अशोकवनांत, । तेणें रक्षस्त्रीजनांत, । तप्त करूनि मनांत । ऐसी ठेविली सती. ॥ येरीकडे रामराय । लक्ष्मणें वंदूनि पाय । स्ववृत्त सांगतां, 'हाय!' । म्हणे व्याकुळमती. ॥ २० ॥ लंघुनियां बहु कोस । उटज देखतां ओस । लागे दयितेचा सोस, । राम हुडकी वनें. ॥ पुसे साश्रु तो अगांस, । मृगभुजगखगांस, । उच्चशिखरां नगांस, । अतिव्याकुळमनें. ॥ 'नाहीं मत्संगीं धालीस, । प्रेमें प्रवासा आलीस, । न स्मरलीस आलीस, । मोहिलीस न धनें. ॥ हा सीते! आला कां राग? । सोडिला कां अनुराग? । हा देवि! हा प्रिये! आग । काय केलें या जनें?' ॥ २१ ॥ ऐसे विलाप करीत, । धैर्य सोडित धरीत, । वृक्ष वल्ली उद्धरीत, । आलिंगुनीं जों दवीं, ॥ देखिला मूर्छित तात, । म्हणे, 'घातीं महाघात,' । घालूनि वल्कलें वात, । सिंची[6] जळाच्या लवीं[6]. ॥ सांगे वृत्त, व्यसु होय, । संस्कारूनीं त्या दे तोय, । पोषितां रसदा कोयँ[7], । तसी कथा हे भवीं. ॥ पुन्हा धुंडाळीतां वन, । अयोमुखीनासास्तन । कापी, लक्ष्मण स्तवन । हास्यें[8] वाढवी नवीं. ॥२२॥ जो योजनभुज अंध, । धरी वनांत कबंध । त्याचा वारी शापबंध, । अर्पी उत्तमा गती. ॥ तपःश्रीच्या कैंबरीस[9], । भेटे मग शबरीस, । राम तें दे त्या बरीस । जें सद्भक्त मागती. ॥ पंपाश्रीनें वाढे ताप, । प्रियावियुक्त इलाप, । करी खैणसा विलाप, । बंधु बोधी मागती. ॥ प्रभुचा पेटतां शोक, । म्हणे[10],

१. कळपांतून चुकलेल्या. २. अग्नीहून उणा. ३. पकडून. ४. अंगीकारून. ५. मनांत. ६. पाणी शिंपडून. ७. कोय लावून वाढविली असतां विपुलफलदायी आम्रवृक्ष होतो. ८. शूर्पणखेच्या वैरूप्यानें येणाऱ्या हास्यामुळें. ९. वेणीस. १०. [पंपाश्री] म्हणे.

'अयशासि ओक । झाल्यें, निंदितील लोक.' । मानी परमाग ती. ॥ २३ ॥ भेटे मारुति पंडित । व्हाया कीर्तीनें मंडीत, सुग्रीवासीं अखंडित । सख्य होय तें करी. ॥ नग कीश[1]महीवर । दावी, ये त्या गह्विर, । ज्याच्या नामें[2] वहीवर । यम खंडी[3] विखरी. ॥ मूर्त गौतमसत्यय[4] । सुगळासि दे प्रत्यय, । कांड वाळीचा अत्यय । करूनीं यशें भरी. ॥ सुकंठ राज्य लाहून । किष्किंधेमाजि राहून, । सेना आणवी बाहून । बहु कोटी लौकरी. ॥ २४ ॥ सीतेचा कराया शोध । करूनी दिग्देशबोध, । धाडी ऋक्ष कीश योध । त्यांत दक्षिणेकडे. ॥ जांबवदादि जे वीर । गेले हुडकीत धीर, । पावले सागरतीर । लंघुनीं वनें कडे. ॥ लोटला अवधिमास, । सुग्रीवाचा दंडत्रास, । जाले जीवनीं उदास, । प्रायोपवेश घडे. ॥ महेंद्रीं संपातीनाम । जटायूचा तेजोधाम । अग्रज, तयासीं रामें[5] । म्हणतां गांठी पडे. ॥ २५ ॥ शोध सांगे द्रष्टा दक्ष, । आले त्याचे दग्ध पक्ष, । स्तवें वाढे, शत्रुकक्ष- । वह्नि मारुती उडे; ॥ अत्याश्चर्यांत तैं नाक । सुरसासह[6] मैनाक । सिंहिका देवूनि हाक, । काळाच्या मुखीं बुडे. ॥ शतयोजनाब्धिपार । पावे, लंका कांपे फार, । मुद्रा देवीस दे, सार । सांगे, वाखाणी चुंडे[7]. । धैर्य सीतेसि देवून, । तच्चूडामणि घेवून, । संदेशामृत सेवून, । पाडी प्रासाद[8]हुडे. ॥ २६ ॥ मोडी वृक्ष बहुलक्ष, । मारी शत्रुपुत्र अक्ष, । जाय रावणा समक्ष, । बांधुनीं घे तो बळें; ॥ करी तत्तेजाचा लोप । हाणी उरीं शब्दरोप, । आणी निंदूनीयां कोप, । म्हणे, वांचाया वळें[9]. ॥ कल्पद्रुमपुष्पगुच्छ । तो मानुनीं कपि तुच्छ, । पेटवीलें भव्य पुच्छ । वस्त्रीं वेष्टुनीं खळें. ॥ बिभीषणाचें न घर । जाळी राक्षसनगर, । स्वर्गीं भीजवी

१. वानराधिपति सुग्रीव. २. नाम घेतलें असतां. ३. वाळू. ४. गौतमसति अहल्येचें अय म्ह० भाग्य च असा. गौतमसत्यय वाळीचा अत्यय (नाश) करूनीं यशें कांड (ब्रह्मांड) भरी--असा अन्वयार्थ. ५. जांबवानादिकांच्या तोंडून रामनाम ऐकतां च. ६. सुरसा कोण, सिंहिका कोण, हें रामायणवाचकाला सहज ज्ञात असण्याचा किंवा होण्याचा संभव असल्यामुळें लहानसान रामायणांतून त्यासंबंधीं वरचेवर टीपा देण्याचें टाळलें आहे. ७. चुडे वाखाणी म्ह० सीतेच्या सौभाग्यकंकणांविषयीं तिला निर्भय करी. ८. राजवाड्यांचीं शिखरें. ९. अनकूल हो.

सगर। पुष्कळप्रेमजळें. ॥ २७ ॥ पुरीं अग्नीसा पेटोन,। पुनः सीतेसि भेटोन,। उडे न गमे खेटोन[1]। लंघी सागरा जवें. ॥ हृष्ट अंगदादि कीश। करी, मग जानकीश,। तेव्हां वदले नाकी 'शं-[2]। मस्तु ते,' हें गौरवें. ॥ चूडामणि देतां, राम। भेटोनि पुरवी काम,। अत्यद्भुत दान साम[3]। मिळे सभाग्या नवें.॥ देवर्षि तद्यश गात। नाचे, शक्र जोडी हात,। झाला धन्य तात वात,। पूजिला स्तवें भवें. ॥ २८ ॥ भाट करावया वैन्यें[4]। निधे द्याया खळा दैन्य। सिंधुतीरासि ने सैन्य। तेजें राखे राखवी। बिभीषण ये शरण,। वारी तज्जन्ममरण,। लंकाराज्य दे, चरण-। नतिफळ दाखवी.॥ रुंद दश लांब शत-। गांवें सेतु अब्धिमतें[5],। करवी अद्भुत तत[6],। यशोमृत चाखवी.॥ ज्याचा धरुनीं आधार,। माया अंडांचा विस्तार। करी, नित्य चमत्कार। नवे नवे लाखवी. ॥ २९ ॥ नसतां उत्साहहीन,। कोणी मंद, बाळ, जीन,। तऱ्ही अहोरात्रें तीन,। उतराया लागलीं. ॥ सैन्यें रामा रक्षायास। न गणुनि लक्षायास,। फळ दळ भक्षायास। न गुंतोनि जागलीं.॥ अगांनगांतें वाहून,। तळीं नभीं ही राहून,। क्षुधा तृषा ही साहून, कांहीं च न मागलीं.॥ वीरंजनपदेशांत[7]। शिरोनि शत्रु-देशांत,। सुग्रीवाच्या निदेशांत,। एकमतें वागलीं. ॥ ३० ॥ सुवेळावरी चढुन,। क्रोधें मनांत कढुन,। शत धिक्कार पढुन[8]। सुग्रीवानें ताडिला.॥ वळें दोर्युद्ध करून,। लंकाप्राकारावरून। मुकुटसह हरून। तेज, तळीं पाडिला.॥ विलासियासि अंगद[9],। तैसा प्रिय जो अंगद,। शत्रुशतासि भंगद। तो दूतत्वें धाडिला.॥ रामें वैद्यें जसा गद,। कीं मारुतें शुष्क च्छद[10],। संदेशें रावणमद,। लीलेनें चि झाडिला. ॥३१॥ प्लवंग राक्षस क्रुद्ध। झाले आरंभिते युद्ध,। धर्मन्याया अप्रबुद्ध। दशमुख न वळे.॥ मरती तेजस्वी भट,। काळें फार केले गट,। तों तों मोटा खोटा धट,। अधिक चि खवळे.॥

---

१. खे+अट+ऊन=आकाशांत भ्रमणाऱ्या पक्षाहून कमी. २. कल्याण असो. ३. श्रमपरिहारक भाषण. ४. वेनपुत्र पृथुराजा. ५. समुद्राला मान्य असे. ६. विस्तृत. ७. वीरांच्या देशामध्यें श्रेष्ठ अशा. ८. उच्चारून. ९. बाहुभूषण. १०. पान.

नार्दे मेरु[1]कंदराग । सिंह त्रा[2]सी मंद राग । करी, भासे मंदराग । सेनासिंधु ढवळे. ॥ रामें देतां पराभव, । वाटेना त्या ख[3]रा भव । खोटा, हर्षे बरा भॅ[4]व, । यशें विश्व धवळे. ॥ ३२ ॥ इंद्रजितें व्हाया नाश, । दाशरथी नागपाश-। बद्ध केले, अ[5]जयाश । सुग्रीवादि रडले. ॥ खळ नेववी सतीस, । द्याया शोक त्रास तीस, । शोची ती त्यांच्या गतीस, । कीं निश्चेष्ट पडले. ॥ त्रिजटा म्हणे, 'न बध । मोहा, नाहीं झाला वध, । आतां होतील सावध, । मूर्छेस सांपडले.' ॥ धावोनीं ये पक्षिपाळ, । सर्वसर्पकुळकाळ, । धाकें पळाले जे व्याळ, । आंगा होते जडले. ॥ ३३ ॥ मुख्य सेनानी प्रहस्त । होतां सेनेसह ध्वस्त, । ज्याचें कर्म अप्रशस्त, । तो स्वयें करी रण. ॥ लक्ष्मणोरीं ब्रह्मदत्त । शक्ति हाणी महामत्त, । त्या भंगी होउनीं य[6]त्त । राम, न होतां क्षण. ॥ म्हणे त्या, 'झालासि भग्न, । प्राणसंकटांत मग्न, । उद्यां ये साधूनि लग्न । रावणा! बरें म्हण.' ॥ जाय पुरीं, लाजे पाप, । चित्तीं स्मरे प्राप्तशाप, । पावे मोटा अनुताप, । खोडी सोडीना पण. ॥३४॥ करवी दुर्गीचें त्राण, । उठवूनि महाप्राण । कुंभकर्ण धाडी बाण । तसा वेगें तो निघे. ॥ लंघी प्राकार पळांत, । औ[7]र्व सिंधुच्या जळांत, । तैसा त्या कीशवळांत । वनीं वह्निसा रिघे. ॥ पाहे, भंगे, जयलेश । न बळीं धरी क्लेश, । किमर्थे मिळतां देश । घ्यावे [8]चावर बिघे? ॥ शत्रुसर्पांचा सुपर्ण । जाय पुरीं घटकर्ण, । सुकंठ छेदुनि कर्ण । दोनी, तत्रासा हि घे. ॥ ३५ ॥ क्षोभे, वाटे मूर्त काळ, । त्याचे राम विश्वपाळ । बाहुपादकंठनाळ । तोडी बाणानीं रणीं. ॥ 'बिभीषणाचे न बोल । मिथ्या म्यां मानिले फोल, । मेला ज्या न लोकीं मोल, । तो वीरशिरोमणी. ॥ सिद्धीस न नेतां काज । गेला, झाली मोटी लाज, । हाय! काय करूं आज?' । म्हणे लंकेचा धणी. ॥ बोले मत्त अतिकाय, । 'ताता! मर्त्यभय कांय?। सर्वां म्हणवीतों 'हाय!' । मीं पक्षींद्र ते फणी'. ॥३६॥ अतिकायादिक शूर । पुत्र तेणें महाक्रूर । अमर्त्यव्याळांचे धू[9]र

---

१. मेरुपर्वताच्या गुहेंत राहणारा. २. सभय. ३. गाढवाला. ४. जन्म. ५. जयाविषयींची आशा नष्ट झाली ज्यांची असे. ६. सज्ज. ७. वडवाग्नि. ८. एकशेंवीस विघे. ९. भार (समूह).

महाबळ धाडिले. ॥ लक्ष्मणादिकांहीं पर, । ते जन्ही अत्यंत खर, । रणांगणीं नक्तंचर । केले व्यसु, नाडिले. ॥ मेघनादें पुन्हा वीर । ब्रह्मास्त्रें ते महाधीर । दाशरथी योधहीर । सर्व मर्मी ताडिले. ॥ बिभीषण वातजात । दोघे न पावले पात, । अन्य ऋक्ष कपिव्रात । ते मूर्छित पाडिले ॥ ३७ ॥ ऋक्षेश सांगे उपाय, । मारुति वीरांचा राय । ओषध्यद्रिप्रति जाय, । आणी त्याचें शिखर. ॥ तद्गंधें विशल्य योध । झाले स्वस्थ, लब्धबोध[1]; । शमे क्षणें अनिरोध[2] । ताप; तसा हि खर. ॥ शृंग पावूनि[3] ये तूर्ण, । करी स्वजनाधि चूर्ण, । राम म्हणे 'यशें पूर्ण । हो, हें विश्वीं विखर.' ॥ कुंभकर्णपुत्र कुंभ, । ससैन्य दुजा निकुंभ, । आले ते शुंभ निशुंभ । तसे युद्धासि खर ॥ ३८ ॥ सुग्रीव वातकुमार । त्यांचा करीती संहार, । मेळविती यश सार, । जें न प्राप्त वासवा. ॥ मकराक्ष खरजात[4], । त्याचा प्रभुबाणें घात, ॥ पाहोनीं देवर्षि गात । होते त्या महासवा. ॥ मायासीताशिर च्छिन्न । रामाचें हृदय भिन्न । सुग्रीवादि सर्व खिन्न । करूनि, शोकासवा ॥ पाजी शक्रारि हरीस, । देव भ्याले त्या अरीस, । कीं तो कल्पांतापरीस । वर्तला अवासवा. ॥ ३९ ॥ बिभीषण हरी खेद, । सांगे मायातत्वभेद, । मग त्याचा शिरश्छेद । वीर लक्ष्मण करी. ॥ पुत्रशोकें पंक्तितुंड । तापे, जैसें वह्निकुंड, । सीता माराया तो पुंड । चंड नग्नासि[5] धरी. ॥ स्मरे जानकी श्रीराम- । चरण, स्ववधकाम, अतिनिर्दय उद्दाम, । देखतां पुढें अरी. ॥ सुपार्श्व अमात्य त्यास । 'स्त्रीहत्या नरकवास । देती' ऐसी उक्ति त्रास- । हेतु ऐकवी बरी. ॥ ४० ॥ प्रेषी रावण कटक । चतुरंग तें चटक[6], । ईयेनसे विश्वघटक- । रामबाण भासले ॥ बहुकोटी बहुलक्ष । महाबळ युद्धदक्ष । भिन्न होतां शिर वक्ष । पडले ते पासले. ॥ उठले कबंध फार, । रडले राक्षसदार, । झाले देव विप्र गार, । सर्व ताप नासले. ॥ मरतां राक्षस लोक, । दशास्याच्या तो अस्तोक[8] । हृद्यांत भंग शोक, । लोहकीलसा[9] सले. ॥ ४१ ॥ शोकक्रोधपराधीन । दशास्य

---

१. मूर्च्छारहित. २. अनिवार. ३. परत पोंचवून. ४. खरपुत्र. ५. नागवी तलवार. ६. चिमणी. ७. ससाण्याप्रमाणें. ८. मोठा. ९. लोखंडी खिळ्याप्रमाणें.

विचारहीन । निघे, म्हणे 'मीं वधीन । दाशरथी या रणीं.' ॥ करितां विरथ, रक्ष । ईश्वरशक्तीनें वक्ष । लक्ष्मणाचें भेदी, दक्ष । तो न शके वारणीं. ॥ मोडी शक्तीतें काढून । राम त्या भंगी ताडून, ॥ देवदृष्टींचीं, झाडून । मद फेडी पारणीं. ॥ ओषध्यगशृंग पळ- । मात्रें आणी महाबळ, । उठोनि सजे तो खळ । रक्षोराज मारणीं. ॥४२॥ भंगाचा न धरी वीट, । पुन्हा युद्धास ये धीट, । तो उन्मत्त मानी कीट । नरकीशवर ते. ॥ राम प्रभु महीवर, । दिव्यरथीं रात्रिचर, । देखती समहेश्वर । सर्व देव वरते. ॥ प्रेषी महेंद्र स्वरथ,। तयावरी पुण्यकथ । चढे, करी त्या सव्यथ । झाले[1] रक्तक्षेरते[2]. । दोघे ही परम क्रुद्ध, । अस्त्रज्ञ मांडीती युद्ध; । अन्योन्यास्त्रतेजोरुद्ध । कोण्ही न उपरते. ॥ ४३ ॥ रघूत्तमें मग खळ । केला व्याकुळ निखळ, । क्षतांतूनि खळखळ । रक्त त्याच्या वाहिलें. ॥ असे मंत्रें जसा भूत, । स्यंदन कावी प्रभूत, । क्रोधें तेणें सुज्ञसूत- । कृत्य तें न साहिलें. ॥ सारथि धर्मस्मरण । दे, त्या तो हस्ताभरण, । न गणूनियां मरण । आरंभी जें राहिलें. ॥ सक्रोधें सिंहें करीस, । जैसें शरभें हरीस, । तैसें दशास्या अरीस । रघुवीरें पाहिलें. ॥ ४४ ॥ कुंभज मंत्र रामास । सांगे, वाढवी धामास, । मूर्त रवी हि कामास । पुरवाया दे वर. ॥ सप्तअहोरात्रें रण, । ज्यांत विश्राम न क्षण, । खळा धिक्कारुनीं, पण । करी शचीदेवर[3]. ॥ जें खंडी तें उठे शिर, । पळ न लावी उशीर, । 'शतदा असांत शीर' । म्हणे[4]; थकले वर[5] ॥ देव. 'रामा! बाण सोड, । हुं, पुन्हा मस्तक तोड,' । म्हणतां; होवूनीं खोड । पडे न कलेवर. ॥ ४५ ॥ मातलि म्हणे, 'बा! जाण, । जो ब्रह्मनिर्मित बाण । तो याचे नाशील प्राण, । त्वदाज्ञा न मोडितां. ॥ श्रीराम देतां स्मरण, । शत्रु पावाया मरण, । न करी काळहरण, । ब्रह्मास्त्रासीं जोडितां. ॥ झालें ब्रह्मांड सकंप, । तेजोजितशतशंप । उसळे म्हणत 'संप' । नादें खळा सोडितां. ॥ होय शब्द कडडड, । दिगंतांत गडडड, । दशकंठ धडडड, । पडे उर फोडितां. ॥ ४६ ॥ पडतां दशकंधर, । हतशेष निशाचर, । पळों

---

१. रामरावण दोघे हि. २. स्रवणारे. ३. इंद्राणीचा दीर (उपेंद्र–राम). ४. 'शिर' म्हणे. ५. आकाशांत.

लागले पामर, । ते कपींनीं मारिले. ॥ मत्त मद्यमांसपुष्ट, । देवद्विजांवरी रुष्ट, । ऋक्षप्लवंगांहीं दुष्ट । सर्व शत्रु सारिले. ॥ श्रीरामें मारूनीं पाप, । दशास्य राक्षसक्ष्माप, । देवगोब्राह्मण ताप, । ऐसे सारे वारिले. ॥ केले चक्षुः-[१]शास्त्रपूत, । न स्पर्शले यमदूत, । झाले पूज्य पुरुहूत-[२] । लोकीं, भवीं तारिले. ॥ ४७ ॥ झाली दिव्यपुष्पवृष्टी, । देवांची निवाली दृष्टी, । आनंदें कोंदली सृष्टी, । दिव्यें वाद्यें वाजलीं. ॥ पावलीं सहृदें मह, । नागखग-मृगांसह, । तेजें सनक्षत्र ग्रह- । मंडलें तीं साजलीं. ॥ जयजयकार शत- । कोटी प्रतिनाद तैत[३] । त्यांहीं सत्यलोकगत, । गेहोदरें[४] गाजलीं. ॥ लाजले विघ्न सकळ, । दोष जाहले विकळ, । पडे दुःखांसि न कळ, । रामोत्कर्षें भाजलीं. ॥ ४८ ॥ हर्षल्या चुकतां जाच । अप्सरा, करीती नाच, । चारणांनीं[५] स्तोत्र साच, । रामापुढें मांडिलें. ॥ गंधर्वश्रेष्ठांचें गान, । संतर्पी सर्वांचे कान, । रामयशःपानें भान । मुनींद्रांनीं सांडिलें. ॥ करुनीं राक्षसक्षय, । संपादिला महाजय, । रामें नामें भवभय- । मूळाज्ञान खांडिलें. ॥ जैसें पृथ्वीचें वैसन,[६] । तैसें दुस्तर व्यसन, । गोष्पदसें तें हसन, । करुनीं ओलांडिलें. ॥ ४९ ॥ मंदोदरीसह काय । न गणुनीं, मृदु पाय । तऱ्ही धांवल्याचि, 'हाय !' । वदत त्या बायका. ॥ म्हणती, 'तूं सिंह, शश । देव, प्रख्यात हें यश, । झाली गति ऐसी, वश । होतां पुष्पसायका. ॥ कोण तें संकट खोल, । स्ने-हाचें उडालें ओल, । काय अपराध बोल, । राक्षसांच्या नायका ? ॥ श्रोतृ-चित्त सव्यथ न । हो, सहो शोकग्रथन, । साधुरीतीचें कथन, । प्रभुच्या चि आयका.' ॥ ५० ॥ बिभीषणा दयावन । म्हणे, 'तापे माझें मन, । करीं वि-लापशमन. । समजावीं या सती. ॥ माळा तापल्या गचीस, । तशा शो-काच्या कचीस । सांपडल्या, ज्या शचीस । मान्या, दीना भासती. ॥ क्रिया प्रिया साधायास, । योग्या पापा बाधायास, । जी गती तें लाधा-यास, । व्हावी प्राप्त यास ती. ॥ 'मॅमाप्येष यथा तव,'[७] । ऐसें वदे सीता-

१. नेत्र आणि शास्त्र. २. इंद्रलोकीं. ३. मागें २९ व्या घनाक्षरांत हा शब्द पहा. ४. गृहाचें मध्यभाग—माजघर. ५. स्वर्गांतील भाट त्यांनीं. ६. वस्त्र (समुद्र). ७. हा जसा तुझा तसा च माझा हि.

धव, । ज्याच्या नामें यशें, भव- । ताप सर्व नासती. ॥ ५१ ॥ बिभीषण श्रीमदुक्त । प्रेतत्वापासुनीं मुक्त, । जें करी तें कार्य युक्त । साधी; जैसा नंदन. ॥ पूजिला मातली, पाय । वंदुनीं घेउनि जाय, । जेथें त्रिदशांचा राय, । तेथें दिव्य स्यंदन. ॥ रावणाचा साधुवर । बंधु श्रीजानकीवर- । प्रिय जो संतापहर- । गुण जैसा चंदन, ॥ लक्ष्मणाभिषिक्त पद । पावे, ज्यांत नाहीं गद, । करूनि श्रीरामपद- । पद्मा भावें वंदन. ॥ ५२ ॥ राम म्हणे मारुतीस, । 'बिभीषणानुमतीस । घेउनि जा, भेट तीस, । अवसर पाहुनीं. ॥ सुग्रीव, मीं, मदनुज । हा लक्ष्मण महाभुज । आहों कुशल नी-रुज[1], । युद्धायास साहुनी. ॥ भस्म झालें रक्षोबळ, । मेला दशकंठ खळ, । त्याला दिलें तिळजळ, । बिभीषण बाहुनीं. ॥ ऐसें सांगुनि, तदुक्त । ऐ-कोनी ये त्वरायुक्त, । जैसा हंस लब्धमुक्त[2] । मानसांत राहुनी. ॥ ५३ ॥ रामविश्लेषभीतेस, । पाहे मारुती सीतेस, । जैसा मुमुक्षु गीतेस, । गुरूप-देशावरी. ॥ सांगे प्रभुचा निरोप, । होवूं न दे वर्णलोप, । जसें कल्पद्रुचें रोप, । बहु जतन करी. ॥ संदेश श्रीराममुख । देवीस दे महासुख, । नि-र्धनां देवांचा रुख[3] । भेटतां जयापरी. ॥ त्या संदेशामृतें धाय, । म्हणे त्रै-लोक्याची माय, । 'योग्य नाहीं, द्यावें काय?' । होय प्रसन्ना बरी. ॥ ५४ ॥ मारुती म्हणे त्यावर, । 'मज आवडे हा वर, । देतां न हात आवर. । ज्यांहीं तुज जाचिलें ॥ त्या या राक्षसी मारीन, । दुःख चित्तींचें सारीन, । राहिलें पाप वारीन, । म्यां हें प्रिय याचिलें'. ॥ सीता म्हणे, 'राम! राम! । यांहीं केलें उक्त काम, । जैसें अन्न मांस आम[4] । पाचकानें पाचिलें. ॥ दासींकडे काय दोष? । यांवरी न करीं रोष, । ज्यांत दया तें चि तोष । व्हाया कर्म वाचिलें.' ॥ ५५ ॥ सदुक्त ऐकोनि, वात- । पुत्र वंदी, जोडी हात, । म्हणे, 'धन्ये! तुझी मात, । श्रुतिसीं च तोलती. ॥ युक्ता रामाची तूं धर्म- । पत्नी त्वत्स-द्यशवर्म, । विश्वाचें पावोनि शर्म, । शीलें साधु डोलती. ॥ सांग निरोप पतीस,' । ऐसें प्रार्थी तो सतीस, । जीच्या गुणांच्या तैतीस. । नाहीं कांहीं मोल ती. ॥ 'मन्मूळें ज्यां महायास, । वांछित्यें त्यां पहायास, । पायां-

१. निरोगी. २. मिळालें आहे मोतीं ज्याला. ३. वृक्ष. ४. कच्चें.

पासीं रहायास,'। ऐसें झाली बोलती. ॥ ५६ ॥ कपि सीतोक्त रामास। अर्पी तो भक्तिधामास, । कथूनीं तचिया कामास । पूरवाया आणवी. ॥ बिभीषण सरमेस । सांगे सत्य च रमेस, । अळंकार परमेस[1] । द्याया आधीं न्हाणवी. ॥ शिबिकेंत ती वाहून, । स्वयें जवळ राहून, । ये त्या प्रभूतें पाहून । पाय, आली जाणवी. ॥ तीकरवीं अग्निस्नान । करवूनीं, शुद्धज्ञान- । मूर्ति, जीचें लोक स्थान, । त्या शंकेतें खाणवी. ॥ ५७ ॥ ब्रह्मादि देव, गंधर्व, । योगी, ज्ञानसिंधु शर्व, । शुद्धत्व वर्णिती सर्व । देव व्योमीं राहुनीं. ॥ अग्नि स्वयें आणी तीस, । स्थापी रामांकीं सतीस, । शोभे शोभवी पतीस, । दिव्य प्रभा लाहुनीं. ॥ पुत्रातें सबहुमान । तात सोडूनीं विमान, । आशीर्वाद शतमान । दे, आलिंगी बाहुनीं. ॥ सीतेचें पवित्र- पण, । एणें जयप्रद रण, । पावला सिद्धीस पण, । आनंदलों पाहुनीं ॥ ५८ ॥ श्रीरामातें म्हणे शक्र, । 'उद्धरीला हस्ती चक्र- । धरें त्वां वधूनीं नक्र । जैसा, तैसा हा जन. ॥ गर्वविषाच्या रुखास, । मारूनीं दशमुखास, । देव राज्य- श्रीसुखास । केला भव्य भाजन. ॥ राघवा ! तूं सानुराग । सभाग्यांत महा- भाग, । कोणितरी वर माग, । घडो दे सभाजन. ॥ सागर तूं, अन्य कूप, । तत्किरीट दीपरूप, । त्यांहीं त्वत्पदांचें भूप । करूत नीराजन[2]. ॥ ५९ ॥ ' ऋक्ष कीश झाले प्रेत, । तेणें माझें खिन्न चेत, । ते उठीव, मृतसेत । जैसा ऊठवी घन '. ॥ ऊंठवीले जैसे सुप्त, । तद्गुण न होतां लुप्त, । होते प्रभुप्रेम- गुप्त[3] । ते, जेंवि लुब्धधन. ॥ वंदिती प्रभुचरण । ज्यांहीं वारिलें मरण. । पावे करीतां स्मरण, । विस्मया त्यांचें मन. ॥ होवूनीं आनंदा वश । गाज- वीती दिशा दश, । म्हणती 'श्रीरामें यश । दिलें' भक्त जे जन. ॥ ६० ॥ बिभीषण म्हणे, 'पाव, । माझा त्वत्सत्कारीं भाव, । भक्तवत्सळ हें नाव । प्रभो ! तुला साजतें ॥ श्रीरामा ! त्वां बळहीन । बंधुत्यक्त जैसा जैन[4] । तारिला व्यसनीं दीन, । यश विश्वीं गाजतें.' ॥ राम म्हणे, 'मद्वियोग । वत्स भरता हृद्रोग, । त्यावीणें भोगाया भोग । बापा ! मन लाजतें. ॥ मना तुझें हरि शील । केलें, फार करीशील । जें त्वचित्तीं वरीशील । इष्ट राहो आज तें. ॥ ६१ ॥

१. सीतेस. २. आरती. ३. गुप्त=रक्षित. ४. वृद्ध.

सकीश सुग्रीव पूज, । यांत मत्पूजन तूज, । सख्या! सांगीतलें गूज, । न शकें रहावया. ॥ आतां मला न होकर[1], । बापा! उपाय तो कर, । जेणें पावेन लोकर, । भरता पहावया.' ॥ करी तसें च तो धीर, । पूजी सुग्रीवादि वीर, । कीं भक्तांच्या नसे धीर, । वियोगा सहावया. ॥ यश मेळवी धवळ, । जेवीं सुधेचा कवळ, । शीघ्र आणवी जवळ । पुष्पका वहावया. ॥ ६२ ॥ रक्षःकपीशांचा हेत । जाणुनि तयांचें चेत । हर्षवी सैन्यासमेत । त्यां सख्यांतें घेउनीं. ॥ सदार सानुज राम । पुष्पकीं विश्वाभिराम, । भक्तकल्पद्रुमाराम । बैसे, स्तुती सेउनी. ॥ निजविजयाचा हेतु, । महापापधूमकेतु, । सीतेतें दाउनि सेतु, । अत्याश्चर्य देवुनि. ॥ युद्धवियोगचरीत- । सुधा कर्णांत भरीत, । जाय गुहेतें त्वरीत, । भान लया नेउनीं. ॥ ६३ ॥ श्रीचा पूरवाया काम । तारेतें आणवी राम, । मुख्यस्त्रियांसह धाम । सोडून ती पातली. ॥ वेदाचें मानिती उक्त । सर्व ज्ञाते व्हाया मुक्त, । मानूनीं प्रभूचें युक्त, । देवेरासीं[2] रातली. ॥ साध्वींच्या पंक्तींत ठाव । पावलें जयेचें नाव, । रामीं शुद्धप्रेमभाव, । भाग्यें नाहीं मातली. ॥ श्रीमत्प्रियेवें ती फार । आदरूनीयां उदार- । गुणा सहपरिवार, । पुष्पकांत घातली. ॥ ६४ ॥ श्रीतें सांगे शत्रुघूक- । सूर्य, 'तो हा ऋष्यमूक, । जेथें वियोगाची हूक[3] । सुग्रीवमंत्रें शमे. ॥ हे पंपा सरसी जाण । येथें तापले मत्प्राण, । त्वद्विश्लेषीं काम बाण । हाणी, काळसा गमे. ॥ स्वच्छ त्वच्छीलसें अर्ण[4], । पद्म त्वदाननवर्ण, । पिक तापवाया कर्णे । पंचम[5] विष वमे. ॥ कांते! हा मतंगाश्रम, । येथें गेला माझा श्रम. । शबरी उडवी श्रम, । चित्तींचा, मनोरमे! ॥ ६५ ॥ च्यार कोस ज्याचे हात, । हा त्या कबंधाचा घात, । करी तुझा दीर, वात । जसा तरूचा सये! ॥ तो हा वट, येथें तात । जटायू पावला पात, । नाकी तद्यश गातात, । जयाचा वीट नये. ॥ या गोदेतें प्रणिपात । करीं, वसे

१. बोलाव. २. दिरासीं (सुग्रीवासीं). ३. वेदना, आरोळी. (हा शब्द कोल्ह्याच्या शब्दाचा वाचक आहे). ४. उदक. ५. गजाचा निषाद, गाईचा ऋषभ, शेळ्या वगैरेंचा गांधार, मोरांचा षड्ज, क्रौंच पक्ष्याचा मध्यम, घोड्यांचा धैवत, कोकिळांचा पंचम असे सप्त स्वर आहेत.

तीर्थव्रातं[1], । इच्या पोटीं[2], म्हणे मातं[3]- । रव त्वं, महादये ! ॥ जीचें अमृता[4]-वदात । तोय सर्वदा अयात[5]- । याम पंचवटी शात- । खनी हे शुभाशये ! ॥ ६६ ॥ कुंभजाचा मनोरम, । शरभंगाचा आश्रम, । हा अत्रीचा जेथें श्रम । आमुचा न राहिला. ॥ तो हा चित्रकूटगोत्र, । ज्याचें पुण्यप्रद स्तोत्र, । साधूनीं जो अग्निहोत्र । तैसा प्रेमें पाहिला. ॥ कालिंदीतें हस्त जोड, । श्रांता इचें नाम लोड[6]. । इणें करूनियां रोड । महामोह दाहिला. ॥ ज्याचे देव-मान्य दास । भरद्वाजाचा आवास, । हा दे दोषा-जैसा त्रास । पक्षींद्र महाहिला. ॥ ६७ ॥ गंगेतें डोळे भरून । पहा नमन करून, । संकटाब्धितें तरून । आलीस इच्या बळें. ॥ सीते ! करीती हे धन्य, । भक्ता असें तीर्थ अन्य । नाहीं, ताप भवजन्य । सर्व वारिती पळें. ॥ उद्धरीती नित्य लक्ष । जीव, न म्हणतां 'रक्ष,' । लाजविलें गुंसिदक्ष । पीयूष इच्या जळें. ॥ देती पीतां मुक्तिपद, । गंगास्तवें मोहगद, । केला तेजें ध्वस्तमद, । जैसा तो कळी नळें[8]. ॥ ६८ ॥ हें गुहाचें शृंगबेर, । सीते ! तें साकेत हेर, । नमस्कारीं वाटे येर । पुर यापुढें दुजें. ॥ याचे शक्राधिकरूप । त्राते सिंधु, अन्य कूप, । लोभें झाले भग्न भूप । फार करूनीं झुंजें[9]. ॥ बहु मान्य हें हरीस, । नाकीं-च्या पुरापरीस, । वाटे वृत्राच्या अरीस । पद आपलें खुजें. ॥ देवि ! सरयूंत स्नान । करीसील सुधापान, । देसील अर्थीष्टदान । प्रिय पुरलें तुजें.' ॥ ६९ ॥ कपी पाहती उडून, । ते न भासती उडून[10], । आनंदाब्धींत बुडून । आत्म-दैव वानिती. ॥ सुग्रीव राक्षसवर[11] । नभीं गेले दूरवर, । मिळाला दुर्लभ वर । ऐसें मनीं मानिती. ॥ श्रीरामाची सेवाजोड । पूरवीती सर्व कोड, । शक्राची संपत्ति गोड । नव्हे मोटी हानि ती. ॥ म्हणती हर्षोनि जय- । कीर्तिमहालाभें नय[12]- । धर्मज्ञेशः प्रभुरय- । मेव, भाग्य वानिति. ॥७०॥ श्री-

---

१. तीर्थांचा समुदाय. २. पोटीं [असे]. ३. मातः+अव+त्वम्=आई ! तूं रक्षण कर. ४. अमृतासारखें शुद्ध. ५. अयात (गेला नाहीं) याम (प्रहर—पुष्कळ वेळ) ज्याला तें (ताजें). ६. लोडासारखें विश्रांतिप्रद. ७. संरक्षणपटु. ८. नल-राजाची कथा प्रसिद्ध च आहे. ९. युद्धें. १०. नक्षत्राहून कमी. ११. बिभीषण. १२. नयधर्मज्ञेशः+प्रभुः+अयम्+एवम्=नीति आणि धर्म जाणणाऱ्यांचा स्वामी हा, असें.

भरद्वाजाचे पाय । वंदी प्रेमें रामराय, । तो म्हणे, 'मीं करूं काय? । प्रिय सांग वासरा[1]! ॥ श्रांततृषितांहीं पान । करितां, त्या तृप्तिदान, ॥ देतां मानूनीयां हान, । वीट न यावा सरा. ॥ केलें देवद्विजकार्य, । सुखी सानुज सभार्य । आलासी, निवाले आर्य. । जोडा या न वासरा[3]. ॥ भरता शत्रुघ्ना-सह । पावा, द्या स्वाश्रिता मह, । करा दीनीं अनुग्रह, । भीतांस व्हा आ-सरा.' ॥ ७१ ॥ कल्पद्रुमाधिकसेव[2] । नता मुक्तिसुख सेव, । म्हणणारा, राम देव । सद्बंधुतें आठवी. ॥ जेंवी शंकर गुहास, । तेंवी सुसखा गुहास । सुखें कराया सुहास । मारुतीतें पाठवी. ॥ रामसेवालाभरत । निषाद तो ही भरत । सात्विकभाव स्मरत । दयाघना आठवी. ॥ असता तरी पाहून । वेगें हर्षातें लाहून । रोमांच देहीं वाहून, । तो स्पर्शता; पाठे[3]वी. ॥ ७२ ॥ पायीं मस्तक ठेवून । चित्ता आनंद देवून, । आज्ञा मुनीची घेवून, । हृष्ट कराया, बैळें, ॥ फळसमृद्धि हा वर । मागोनि, तो क्षमावर, । चढे व्योम-यानावर, । भेटे गुहातें पळें. ॥ तयासह निघे मग, । तोयद चातकखग- । सह जैसा सर्व जग । तर्पाया प्राज्यें जळें. ॥ पादुका शिरा स्मरत । सगुरु-जन भरत, । आला प्रेमाश्रु क्षरत[5] । बाष्पनिरुद्धगळें. ॥ ७३ ॥ उतरे याना-वरून, । पायीं पादुका वरून, । भेटे उरासीं धरून । त्या सानुजा[6] तापसा. ॥ नाहीं हर्षवीला चिर । वाहूनि चरणीं शीर । म्हणता 'बा! मागें फिर;' । ऐसें करि तापसा. ॥ त्याचा हरी सर्व खेद, । बोले प्रिय जैसा वेद, । नुरवी तिळ ही भेद, । बहु द्रवे बापसा. ॥ जोडी गुरुजना हस्त, । पौर तोषवी समस्त । ज्याच्या नामें होती ध्वस्त । वैरी[7] महापाप सा. ॥ ७४ ॥ नंदिग्रामीं तो श्रीरंग । भरतादिकां अभ्यंग, । सर्वलोकशोकभंग । करावया, करवी. ॥ स्वसख्यांचे युद्धक्लेश । नाशी, स्वसमानवेष । रम्यरूप मानवेश । रामचंद्र धरवी. ॥ कपिराक्षसभटांस, । संगररंगनटांस, । जयमंगलघटांस[8] । आणी शोभा बरवी. ॥ सुश्रीसुधांबु[9]-

---

१. दिवसाला. २. कल्पद्रुमाहून अधिक [फलदायी] सेवा ज्याची. ३. कार्तिक-स्वामीस. ३. स्तुति करी. ४. ऋष्याग्रहास्तव. ५. गाळीत. ६. शत्रुघ्नासह भरता. ७. षड्रिपु. ८. जयप्रद असे मंगलघट त्र. ९. रम्य शोभारूपी अमृतोदकाच्या वृष्टीस.

वृष्टीस । करी मातांच्या दृष्टीस, । राम, समस्त सृष्टीस । पुरीं जातां भरवी. ॥ ७५ ॥ सिरे साकेतीं गेहांत । दीप, कीं प्राण देहांत, । लेश न्यूनत्व स्नेहांत । न प्रवासें दाविलें. ॥ करूनीयां बहुमान, । प्रार्थूनी देवासमान, । वित्तेशाकडे विमान । रामभद्रें लाविलें. ॥ सामें कैकेयीचें मन । निववी तो दयाघन, । मंथरादुर्मतवन- । वह्निनें जें ताविलें. ॥ अभिषेचितां [1] स्वयाज्य, । देतां श्रीवसिष्ठ राज्य, । विश्वें आपुलें चि प्राज्य । भव्य भाग्य भाविलें. ॥ ७६ ॥ युवराज तो भरत । केला जो न लोभरत । ज्याचें हृदय भरत । जाय भक्तिच्या रसें. ॥ करूनीं तेजोविस्तार । हरूनीं शोकाधिभार । चित्तें हृष्टें केलीं फार, । सूर्यें जसीं सारसें. ॥ रामें प्रजा प्रजासम । पाळिल्या, न [2] त्रासी यम, । मानिती पावुनि शम, । न कैवल्य सारसें. ॥ ज्यांच्या गेहांत, [3] येदुक्त । वेद, ज्यातें ध्याती मुक्त, । तत्सुसंनिधानयुक्त । लग्न मुंज बारसें. ॥ ७७ ॥ विश्वगीत रामराज्य, । ज्यांत पुरुषार्थ प्राज्य, । जैसें सुरभीचें आज्य, । पूज्य सर्व [4] सर्पितें. ॥ [5] अमृताचें यश काय । सेवील्या म्हणवी 'हाय!' । करूनी अजर काय । देवांतें चि तर्पितें ॥ पंक्तिभेद करी खळ, । छेदवी राहुचा गळ, । विषयसेवना बळ । मत्तपण अर्पितें. ॥ नाहीं दया जया लेश, । मेल्या दावीतें [6] स्वदेश, । देतें अर्थिजना क्लेश, । साध्वमान्य [7] दर्पि तें. ॥ ७८ ॥ ऋषि भेटले रामास, । जयश्रीक्रीडाधामास, । प्रेमें त्या पूर्णकामास । कुंभसंभव स्तवी. ॥ 'देवगोब्राह्मणकाळ । मारीला राक्षसपाळ, । केला विश्वाचा सांभाळ, । कीर्ति गातील कवी. ॥ बुधा तुझी कथा माय । सुधा इच्यापुढें काय, । इतें आयके, जो गाय, । त्या हे सर्वदा नवी. ॥ धाक काळा [8] भैरवास । तुझा, आम्हीं स्वैरवास । करूं, जगा कैरवास । तूं प्रभो! शीतच्छवी [9]. ॥ ७९ ॥ उग्र रावणापरीस । मेघनाद जो हरीस, ।

---

१. आपला यजमान (रामचंद्र). २. त्रासदायक. (कोणाला अकालीं मरण येत नव्हतें हा भाव). ३. ज्या रामानें सांगितलेला. ४. वृताला. ५. येथून कवितेच्या अखेरपर्यंत रामराज्य व अमृत यांची तुलना करून अमृताचे दोष दाखविले आहेत. ६. आपण जेथून स्वर्गांत गेलें तो देश (मृत्युलोक). 'क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति' या वचनाला अनुसरून हें मत आहे. ७.मादक. ८. भयंकर अशा. ९.चंद्र.

जैसा शरभ हरीस। धरी संगरीं बळी. ॥ श्रीरामा! मीनांचा दाश[1]। लीलेनें करीतो नाश, । शत्रुकंठीं काळपाश । तो तैसा पाडी, छळी. ॥ करूनीयां सत्ता, पद । घेता शक्रदत्तापद[2], । हा दुःसहसत्तापद, । जेंवि स्वयुगीं कळी. ॥ त्याचा सुदुर्घट अंत, । करें काळाहीचा दंत । उन्मूळीला, झाले संत । या यशोंबुजीं अळी.' ॥८०॥ श्रवणीं धरूनी काम । पुसे रक्षःकथा राम, । सांगे सत्तपःश्रीधाम । कुंभभू महामती. ॥ 'ब्रह्मजपुलस्त्यसुत । तो विश्रवा साधुनुत । वैराग्यादिगुणयुत । ज्याची स्वधर्मीं रती. ॥ त्या दे कन्या भरद्वाज, । सुमाली ही रक्षोराज । ती कैकसी; मुनिजाज[3] । यक्षगुह्यकपती[4]. ॥ त्याचें नाम वैश्रवण; । दुजींचे पुत्र रावण, । कुंभकर्ण, बिभीषण; । तीसरा भला अती. ॥ ८१ ॥ दशानन निशाचर । तपें होमी शिरें खर, । ब्रह्यापासूनीं घे वर, । कपी नर न गणी. ॥ शत्रुसर्पांचा सुपर्ण । निद्रा मागे घटकर्ण, । वेगड घे, त्यजी स्वर्ण, । भ्रमवीला त्याक्षणीं. ॥ बिभीषण वरी धर्म, । पावे चतुर्मुख शर्म, । त्या पाहोनीं शुद्ध कर्म । अमरत्व दे धणी[5]. ॥ कुंभकर्णानुजा नाम । जीचें शूर्पणखा, धाम । महाबळाचें, जी काम- । रूपा होय देखणी. ॥ ८२ ॥ अग्रजाचें[6] तातदत्त । लंकापद हरी तेंत्त[7]- । दसत्कर्म करी, मत्त । होय वरांच्या बळें. ॥ विश्वकर्म्याचा[8] संपत्न । मय, त्याचें कन्यारत्न । केलें स्वकळत्र यत्न- । परें दशास्यें खळें. ॥ कालकेय जो दानव । विद्युज्जिह्वाख्य, तो धव । शूर्पणखा वरी सव[9] । भंगावे जेणें छळें. ॥ वैरोचनकन्या नाव । तिचें वज्रज्वाळा, भाव । कुंभकर्णीं धरी, वांव[11] । मानी ती अन्य स्थळें. ॥ ८३ ॥ शैलूष गंधर्वेश्वर, । तत्कन्या सरमा वर । तीचा बिभीषण, हर । शैलपुत्रीचा तसा. ॥ वंदूनि गुरूंचे पाद । पुत्राचें अविसंवाद[12] । नाम ठेवी मेघनाद, । कीं त्याचा तैसा घसा. ॥ माजे राक्षसांचा राय, । लागे कराया अन्याय, । ऐके श्रीद, म्हणे 'हाय!' ।

---

१. मच्छेमारी. २. इंद्राला दिली आहे आपदा ज्यानें. ३. ऋषिकन्यापुत्र. ४. वैश्रवण कुबेर. ५. स्वामी (ब्रह्मदेव). ६. कुबेराचें. ७. तें तें म्ह० सीताहरणादि पापकर्म. ८. देवांचा शिल्पी (त्वष्टा). ९. शत्रु. १०. हा असुरांचा शिल्पी. ११. व्यर्थ. १२. यथार्थ.

बोधी दूतास्यें असा: ॥ 'धर्में माझा सद्धा शर्व । झाला बा ! न धरीं गर्व, । अधर्में बुडतें सर्व, । नव्हे आपली रसा.' ॥ ८४ ॥ संदेशें कोप प्रभूत । पावे, मारी श्रीददूत, । नावरे क्रोधाचा ऊत, । जाय अग्रजावरी. ॥ शस्त्राग्नींत यक्षहोम । करूनीं, यक्षेश सोम, । राहु तो, पुष्पक व्योम- । यान तयाचें हरी. ॥ झालें तें विमान रुद्ध[1], । हास्यें नंदीश्वर क्रुद्ध । होय, शापी, कीं न शुद्ध- । बोधातें मनीं धरी. ॥ विश्ववंद्य जो कैलास, । तशा उन्मूळी शैलास, । रुद्धबाहु[2] त्या बैलास । चिर महेश[2] करी. ॥८५॥ भेटे स्तवें सोडी रोप, । अर्पी खड्ग[3] आशुतोष, । ज्याच्या नामें महादोष । भस्म होती तो वळे[4]. ॥ 'रावण' हें ठेवी नाम, । शापानाश्य[5] आयु वाम- । देव दे; असे न काम- । प्रद अन्य कोंवळे[6]. ॥ वेदवती सती शाप । दे, जळे दावी प्रताप, । कीं करी स्पर्शोनी पाप । अवयव ओवळे. ॥ ती श्रीसीता, तूं हि विष्णु । विश्वत्राता प्रभविष्णु[7], । त्वद्दास सदेव जिष्णु । त्वद्गुण चि सोवळे. ॥ ८६ ॥ दीक्षित[8] मरुत्त युद्ध । न करी; होउनी[9] क्रुद्ध, संवर्ताज्ञा मानी शुद्ध- । यशा भूप; तो अरी ॥ म्हणे, 'म्यां जिंकिला भूप । मीं सिंधु, हा तुच्छ कूप.' । भक्षी ऋषी काळरूप, । मोटा अनर्थ करी. ॥ गाधि, सुरथ, दुष्यंत, । गय, पुरूरवा संत । म्हणती भंगलों, अंत । त्यांचा न चित्तीं धरी. ॥ अनरण्या हांसे पाप । रावण तो दे शाप; । केली दाऊनि प्रताप । वाणी त्याची त्वां खरी. ॥ ८७ ॥ नारद रक्ष:पाळास । म्हणे 'जिंकावें काळास, । बळी सोडूनीं बाळास । मानी, वीर न छळी.' ॥ भंगी तो यमभटांस, । जैसा मुद्गर[11] घटांस । कीं सिंह करिघटांस[12], । करी काळासीं कळी. ॥ पाडी नरकांतें ओस, । ब्रह्मा सांगे, 'बा[13]! हें सोस, । माझें वाक्य न हो फोस, । राहो दंड, हा बळी.' ॥ काळ गुप्त होय, राय । राक्षसांचा म्हणे, 'काय । माझ्यापुढें अन्य जाय ? । अन्यत्र जैसा अळी. ॥ ८८ ॥

१. कुंठितगति. २. त्या वैलोवा रावणाचे हात बरा च वेळपर्यंत शंकरानें कैलासाखाली दाबून धरिले. ३. चंद्रहासनामक खड्ग. ४. कृपा करी. ५. शापानें नाश न पावणारे. ६. कोवळ्या मनाचे. ७. महाप्रतापी. ८. यज्ञकर्ता. ९. क्रुद्ध झाला तरी. १०. घण. ११. घटा=समुदाय. १२. बा यमा !

गर्व दे आत्ममतीस । जिंकूनि भोगवतीस । दुर्बळ सर्पपतीस । मानी रावण मनीं. ॥ निवातकवच योध, । करी तत्पुरीचा रोध, । पेटे त्यांचा त्याचा क्रोध । जैसा दावाग्नी वनीं. ॥ ब्रह्मवाक्यें तयांसह, । सख्य सोडूनि आग्रह, । साधी मायांचा[1] संग्रह, । मान्यता दैत्यजनीं. ॥ कालकेयांचा ही मोड । रणीं, जयाची ही जोड, । शूर्पणखाभर्त्या दोंड[2] । मारी संगरीं धेनीं. ॥ ८९ ॥ वरुणाचा पुरा जाय, । तत्पुत्रांचा समुदाय । भंगी, तेथें वंदी गाय । सुरभी, जीचा पयें ॥ झाला विशाल क्षीरोद । त्यांत श्रीसह प्रमोद- । युक्त करीसी विनोद, । रामा ! विष्णु तूं स्वयें.॥ ब्रह्म्याच्या लोकीं वरुण । ऐके हें तो निष्करुण । नेत्रें जयाचीं अरुण । वर्णे, मत्त जो जयें, ॥ देवर्षिराजर्षिनाग । कन्या हरी, जोडी आग, । शापीती, करीती राग, । न कांपे शापभयें. ॥९०॥ जोडोनी विजय थोर, । जाय लंकेंत तो घोर; । शूर्पणखा ताडी स्वोर, । रडे, वदे फार 'हा!' ॥ भ्राता म्हणे, 'वीरलोक[4] । झाला, त्याचा सोडीं शोक, । तुला शोकद हें ओक, । खरापाशीं[5] जा रहा.' ॥ जनस्थानातें ती जाय, । मावसी खराची माय, । कांहीं काळीजाचा घाय[6] । पावे परीहार हा. ॥ ऐसें दशास्याचें कर्म, । वाटे ज्या अधर्म धर्म, । धाता, वरवज्रवर्म । दे त्या तो ही मारहा[7]. ॥ ९१ ॥ श्रीशुक्रमुखें जपून । मेघनादानें खपून । सिद्धि साधिली तपून । हें ऐकिलें रावणें. ॥ म्हणे तो 'योगें चि विर्त्त । व्हावें, तप महावित्त, । कठिण निश्चळ चित्त । योगमार्गीं लावणें. ॥ कैसें सोसलें भूतल्प[9], । या फळा लागावा कल्प, । वत्साला घडलें अल्प । काळें कसें पावणें?' ॥ जाणोनी मोटा उत्कर्ष, । पावोनी अत्यंत हर्ष, । प्रेमाश्रु सोडिलें वर्ष[10], । भारी जसें श्रावणें. ॥ ९२ ॥ बिभीषण सांगे त्यास, । 'बा ! म्या केला जळीं वास, । कुंभकर्ण तो आवास ।

---

१. कपटविद्यांचा. २. द्वाड. ३. दारुण अशा. ४. वीरांस मरणोत्तर जी गति मिळत्ये ती त्याला मिळाली. ५. शूर्पणखेच्या नवऱ्यास मारिल्यामुळें रावणानें तिच्या सांत्वनार्थ तिला जनस्थानाचें आधिपत्य देऊन तें चालविण्यास खराची योजना केली. ६. घाव. ७. मदनांतक शिव. ८. प्रख्यात. ९. भूमिशयन. १०. पाऊस.

निद्रेचा चि हा सदा. ॥ योगीं यागीं नित्य मग्न । मेघनाद ध्यानलग्न, । तों झालें महत्व भग्न, । जें न भंगलें कदा. ॥ माल्यवंताची जी नात, । या घनध्वानाची आत । नेली मधूनें, या लात । हाणिली तुझ्या पदा. ॥ परस्त्री-हरणछळ, । त्याचें झालें प्राप्त फळ, । भं[1]गा पापकर्मा[2] स्थळ, । शून्य वन श्वापदा.' ॥९३॥ हें ऐकतां कोपे फार, । तो घे अक्षौहिणी च्यार । सहस्र, निघे, विचार । दुजा चित्तीं न धरी. ॥ मधुवनाप्रति जाय । कुंभीनसी धरी पाय, । द्रवे राक्षसांचा राय, । तीच्या त्रासातें हरी. ॥ तीणें भेटविला कांत, । झाला दशानन शांत, । पावोनीं कैलास प्रांत, । उतरे त्या भूवरी. ॥ नळकूबर दे शाप, । कीं न कांहीं गणी पाप, । रंभेवरी यो[3]तुक्ष्माप । तो बळात्कार करी. ॥ ९४ ॥ गेला अमरावतीस । जिंकाया शचीपतीस, । प्रार्थी विश्वा[4]-च्या गतीस, । तेव्हां वृत्राचा अरी. ॥ विष्णु म्हणे, 'त्रास सांड, । जा त्या रावणासीं भांड, । का[5]ळीं संहारीन मां[6]ड । त्याचा सारा मीं हरी.' ॥ ऐके वैकुंठाचें उक्त, । होवूनीं स्वसेनायुक्त । होय भंगशंकामुक्त, । महायुद्धातें करी. ॥ धराया राक्षसपाळ । झटे पा[7]कजंभकाळ, । मेघनाद, भेका व्याळ, । तैसा देवेंद्रा धरी. ॥ ९५ ॥ केला राक्षसांचा क्षय, । झाला दिक्तुंडाचा जय, । पावे फार स्वर्ग भय, । नेला लंकेला धणी. ॥ मोटे जंभ, वृत्र, पाक, । त्यांचा ऐसा नाहीं धाक, । भ्याला मेघनादा नाक, । जैसा पक्षींद्रा फणी. ॥ नावडे भोजन सेज, । पडलें काळिजा वेंज, । देवौ[9]घनागाचें तेज । जाय, नेतां तो मं[10]णी. ॥ ब्रह्मा म्हणे, 'शक्रा सोड, । वत्सा! इष्ट वर जोड.' । मागे 'अमरत्व गोड । हें दे, पुरीव धं[11]णी'. ॥ ९६ ॥ धाता म्हणे, "तूं सत्तोक, । 'इंद्रजित्' तुजला लोक । म्हणोत, न द्यावा शोक, । मेघनादा बा! वं[12]ळ. ॥ अमरत्व न भूवर, । देतों मीं आत्मभू वर, । बरें योजूनीयां वर, । ऐसें चि ज्याचें फळ." ॥ मागे, 'अग्नींत शं[13]तांग । जन्मो, होतां होम सांग, । त्यावरी बैसतां गांग । धवळ जैसें जळ, ॥ तैसें मिळो यश रण-।

---

१. पराभवाला. २. पापी. ३. राक्षसेश्वर. ४. विश्वाधार जो विष्णु त्यास. ५. योग्य समयीं. ६. वैभव. ७. इंद्र. ८. घरा. ९. देवसमुदायरूपी सर्पाचें. १०. इंद्ररूपी मणी. ११. हौस, इच्छा. १२. माझें ऐक. १३. रथ.

रंगीं, न घडो मरण, । शत्रूंचें प्राणहरण । घडो मोटें दे बळ'. ॥ ९७ ॥ 'तथास्तु' म्हणे लोकेश, । शक्राचा बंधनक्लेश । वारी भंगदुःख लेश-। मात्र बोधें उडवी. ॥ 'अहल्याधर्षणफळ । झालें, कर्मापुढें बळ । न चाले, न चुके पळ, । भोगें[1] तेज बुडवी. ॥ रक्षी[2] कन्यारत्नन्यास[3], । दे पुन्हां, न धरी आस, । ज्यां प्रसन्नें दिली त्यांस[4], । तुला लोभ जुडवी. ॥ काम झाल्या हि बल्लव[5] । करी, न हित तल्लव, । विवेक स्वर्द्रुपल्लव । लोभहस्तें खुडवी. ॥ ९८ ॥ पापें झाला पराभूत, । वैष्णवें[6] अध्वरें पूत । होवूनीं, तो पुरुहूत । पुन्हां स्वपदा वरी.' ॥ राम पुसे, 'जेव्हां क्रूर । रावण, तद्गर्व चूर । करी ऐसा काय शूर । नव्हता चि भूवरी?' ॥ कुंभज सांगे, "अर्जुन[7] । सहस्र-बाहू, अर्जुन । जो प्रख्यात, तो तर्जुन[8] । लीलेनें ची या धरी. ॥ शक्र म्हणे, 'झालें युक्त, पुलस्त्याचें[9] मानी उक्त, । बंधनापासूनि मुक्त, । करूनि सोडी अरी. ॥ ९९ ॥ दशास्यगर्वाची राख । करी वाळीची ही काख, । तो त्या वंदी, म्हणे 'राख, । दे अभय, हो सखा.' ॥ ऐसे पावोनी आयास, । प्रार्थी कीशांच्या रायास, । तो त्या आज्ञा दे जायास, म्हणे 'कपींतें न खा.' ॥ तो ही त्वां मारीला खळ, । रामा! रक्षीला सुगळ, त्वद्बाणा सेवी, जें बळ । नारसिंहाच्या नखा. ॥ सुखें कांडीं न मातील, । प्रेमाश्रुभरें न्हातील, । चतुर्मुखादी गातील, । या युद्धमहामखा.' ॥ १०० ॥ राम म्हणे, 'शत्रुभेक-। सर्प, तप्तसुधासेक, । हनूमान् समर्थ एक, । याणें मातें तारिलें. ॥ याच्या प्रतापें चि खर्वं[10] । करूनीं, हरूनीं गर्व, । राक्षसांचें सैन्य सर्व । रणरंगीं मारिलें. ॥ न दीलें अभयदान; । शौर्य, स्वपक्षाभिमान । तर्‍ही सुग्रीवाचें कां न । येणें दुःख सारिलें? ॥ वाटे स्वसामर्थ्य-ज्ञान । नव्हतें देहाचें भान, । व्हाया विश्वीं यशोगान, । न व्यसन[11] वारिलें.' ॥ १०१ ॥ मुनी म्हणे, 'ऋषीशाप, । तेणें याचा या प्रताप, । न समजे, जैसा साप । नेणें मंत्रें भारिला; ॥ शिशुत्वीं हा महाबळ । उडे, सूर्या मानी

---

१. विषयोपभोग २. कर्ता 'गौतम'. ३. ब्रह्मकन्या अहल्यारूपी ठेवा. ४. गौतमास. ५. स्वैपाकी अथवा गवळी म्ह० मूर्ख. ६. वैष्णवयज्ञानें. ७. संपादून. ८. तुच्छ करून. ९. हा रावणाचा आजा. १०. लहान. ११. सुग्रीवाचें संकट.

फळ; । सांगे राहु रुसे खळ, । शक्रें वज्र मारिला. ॥ पाडितां मूर्छित बाळ, । वायु क्षोभे जैसा काळ, । मोह सत्यलोकपाळ-। हस्तस्पर्शें वारिला. ॥ देवानीं वज्रशरीर । केला, हा भास्करें [1]धीर, । त्वत्प्रसादें यशें वीर । विश्रांत विस्तारिला. ॥१०२॥ शक्रादिक लोकपाळ । ब्रह्मा, तो ही कामकाळ, । वराहीं वायुचा बाळ । पूजिती, पूज्या [2]सया. ॥ विश्वकर्मा वदे, 'अस्त्र । किंवा मन्निर्मित शस्त्र । याच्या देहीं पुष्प, वस्त्र । होवू, न देवू भया.' ॥ केलें अत्यद्भुत काज, । दीली वेगें मना लाज, । [3]म्हणे, 'यशें [4]माते साज । शत्रु नेवूनीं लया.' ॥ ऋक्षवानरगणांत । ज्याचा भंग न पणांत, । झाला विजयी रणांत, । तुझी होतां बा! दया.' ॥ १०३ ॥ मुनी ऐश्या कथा फार । सांगे, करी कर्ण गार, । निघे त्यातें नमस्कार । घाली जानकीपती. । म्हणे, 'स्वामी! झालों धन्य, । या युष्मद्दर्शनें अन्य । माझ्याऐसा न राजन्य । मद्यशा नसे [5]क्षती. ॥ या सर्व अश्वमेधास, । पुन्हां हर्षवा हा दास. । साधूंच्या चि सहवास- । सुखानें निवे मती.' ॥ ऐसें प्रार्थी रघुराय, । वारंवार वंदी पाय, । पूजूनीं [6]पोंवित जाय, । ते[7] मागती ज्या गती.' ॥ १०४॥ बहुमान्य सनकास । जो त्या पूजी जनकास । वश केलें मन, कास । घालूनीं जेणें सदा. ॥ अर्ची मातुळातें राम, । जयाचें [8]युधाजिन्नाम, । राजे झाले पूर्णकाम, । गेले आपल्या पदा. ॥ कपी कपिराजसह, । राक्षस तन्नाथ मह । पावले, कीं सुखावह । यश, दे त्यांच्या [9]सदा. ॥ लेववी सर्वांतें सार । सद्वस्त्रें रत्नालंकार, । कल्पवृक्ष जे उदार । त्यांच्या लाजवी मदा. ॥१०५॥ वातवाळीपुत्र वीर । अंकीं रणरंग धीर । घे प्रेमें करुणानीर- । निधी वर्णूनीं बरें. ॥ स्वमूर्तीवरील मग । काढी भक्तकल्पनग, । लेववी तयांसि नग । दिव्य आपल्या करें. ॥ पूजिले गणेश स्कंद, । जैसे जगल्लताकंद- । रूपें स्वगुणार्हीं छंद- । उदन्वन्मुखें [10]हरें. ॥ आज्ञा जाया स्वस्थळास । बाष्पनिरुद्धगळास, ।

---

१. बुद्धिमान. २. सख्या, स्त्रिया. ३. 'मारुति' हा कर्ता. ४. अंजनीला. ५. नाश. ६. पोंचवीत. ७. मोठमोठे तपस्वी. ८. हा कैकेयीचा भाऊ. ९. सभेला–समाजाला. १०. जगल्लताकंदरूपें छंदउदन्वन्मुखें हरें=जगरूप लतेचा मूल कंद अशा व वेदसमुद्र ज्याच्या मुखीं आहे अशा शंकरानें.

दे कीशरक्षोबळास । आलिंगूनीं आदरें. ॥ १०६ ॥ हनूमान् म्हणे, 'हा वर, । देतां न चित्त आवर, । त्वद्दास दीन यावर । असावी कृपा सदा. ॥ तुझाठायीं असो स्नेह, । माझ्या भक्तीस हो गेह, । तवयशःपानीं देह- । भान, नसावें कदा. ॥ जोंवरी त्वत्कथाकार्य, । तोंवरी असावा काय, । सत्वें म्हणवावें 'हाय!' । जन्म मृत्यु या गदा. ॥ अप्सरांहीं गावें यश, । मनोमृगें व्हावें वश, । या सिंहा हो काम शश, । बा दयासुधानदा!' ॥१०७॥ 'तथास्तु' म्हणे उदार, । आलिंगी, कंठीचा हार । घाली गळां, द्रवे फार । राम, जैसी मावली. ॥ ग्रीष्मीं मरुदेशीं वाट । मध्याह्नीं क्रमीतां, पाट । जींत शीतांबुचा, दाट । न्यग्रोधाची सावली. ॥ अथवा अकस्मात्ताप । नाशाया, हराया पाप । अतिक्षम जीचें आप, । ती श्रीगंगा गावली. ॥ सोडीतां तीतें जे कष्ट । झाले तदधिक स्पष्ट, । त्यजिली सुरभी नष्ट- । भाग्याहीं, जी पावली. ॥ १०८ ॥ पुष्पक ये, कीं त्या देवें । म्हणे, 'आत्म-जेत्या सेव.' । राम म्हणे, 'माझी ठेव, । तूं चिंतितां ये बरें.' ॥ गर्भिणी विश्वाची माय । होय, तीतें रघुराय । पुसे, 'प्रिये! इच्छा काय? । तपूं कोणत्या वरें?' ॥ ती म्हणे, 'तपोवनास, । पाहावें वाटे मनास, । द्याया तेथील जनास । वस्त्रें रत्नें जीं वरें.' ॥ निंदा ऐकोनि सतीस । टाकी, तच्छुद्धमतीस । वाटे प्रार्थिलें पतीस, । म्या जें, तें केलें खरें. ॥ १०९ ॥ झाले तीन च्यार मास, । तेव्हां पावाया श्रमास, । वाल्मीकीच्या आश्रमास, । ती लक्ष्मणें पांविली. ॥ मुनि तीचा वारी ताप, । स्नेह करी जैसा बाप, । न क्षोभली, अभिशाप- । दावें जऱ्ही ताविली. ॥ विप्राधीतें वारायास, । लवणातें मारायास । जातां, आर्यें तारायास, । शत्रुघ्नातें दाविली. ॥ तो पुत्रद्वय पाहून, । रात्री आश्रमीं राहून, । निघे हृदयीं वाहून, । प्रीतिलता लाविली. ॥ ११० ॥ तो सोडूनी बाणवर्ष, । खळा मारी, विप्रां हर्ष । दे, रची मधुरा, वर्ष । तेरावें तों लागलें. ॥ प्राचेतसाचा आश्रम । पावे, तेथें जाय श्रम, । जेथें त्यक्तवैरभ्रम । सर्व सत्वें वागले. ॥ पीतां कुशलवगीत ।

---

१. समूह. २. वडाची. ३. कुबेर. ४. श्रेष्ठ ५. पोचविली. ६. लोकापवादरूपी वणव्यानें. ७. वाल्मीकीनें. ८. 'सीता' हें कर्म. ९. कुशलवविषयक. १०. प्राणी.

रामयश, झालें शांत । शत्रुघ्नहृदय, प्रीत[1] । तत्सैन्य ही जागलें. ॥ प्रभु क्षिप्र पहायास, । स्वीकरूनीं महायास, । आलें दूर रहायास, । जन्ही होतें भागलें. ॥१११॥ रामाचे वंदूनि पाय, । पुन्हा मधुरेसि जाय, । शत्रुघ्न करील काय, । आज्ञा पाळणें पडे. ॥ द्वारीं ठेवी मृत बाळ, । विप्र म्हणे, 'धरा-पाळ- । दोषें खातो प्रजा काळ,' । शोकें तापोनि रडे. ॥ श्रीनारद करी बोध, । 'राया! राष्ट्रीं स्वयें शोध, । अधर्माच्या मार्गा रोध; । शूद्रतपें हें घडे.' ॥ स्मरतां चि ये विमान, । बैसे भास्करासमान, । शोधी लंघी पवमान । तैसा अरण्यें कडे. ॥ ११२ ॥ पाहे वृक्षीं लंबमान । स्वर्गार्थ जो धूमपान, । करी शूद्र, त्याची मान । खंडी निस्त्रिंशें[3] खरें. ॥ होतां शंबूकाचा काळ, । उठे तत्काळ तो बाळ, । वर्षे पुष्पें नाकपाळ, । म्हणे, 'बा! केलें बरें.' ॥ कुंभोद्भवातें वंदन । करी श्रीरघुनंदन, । तो वदे, 'पक्षिस्यंदन[4] । तूं, हें मद्वाक्य खरें. ॥ त्वद्यश पावो न लय, । गुणचंदन-मलय- । मूर्ते! हें दिव्य वलय । अलंकारावें करें. ॥ ११३ ॥ ब्रह्मलोकवासी श्वेत । भक्षी नित्य निज प्रेतें[5], । त्याच्या उद्धारें साकेत- । पाळ विस्मया वरी. ॥ इक्ष्वाकूचा पुत्र दंड- । नामा; विरजेचें लंड[6] । तो व्रत[7] बुडवी; दंड । तात्पिता शुक्र करी. ॥ पांशुवर्षें[8] बुडे देश । मरे तो जनपदेश[9], । सत्त्व[10] सर्व पावे क्लेश, । तेथें न धैर्य धरी. ॥ दंडकारण्य हें नाम । झालें ऐशी कथा

---

१. संतुष्ट. २. कर्ता 'सैन्य' ३. खड्गानें. ४. गरुडरथ विष्णु. ५. मृतशरीर. विदर्भदेशींचा श्वेत या नांवाचा राजा होता त्यानें पुष्कळ दिवस राज्य करून नंतर आपल्या सावत्रभावास राज्यावर बसविलें व आपण वनांत जाऊन मोठें तप केलें. पुढें तो मृत्यु पावल्यावर ब्रह्मलोकास गेला; पण तेथें त्यास क्षुधा तृषा यांची बाधा सोडीना. याचें कारण त्यानें ब्रह्मदेवास विचारिलें. त्यानें सांगितलें कीं, 'तूं आपलें पोषण चांगलें केलें, पण कोणास कांहीं दान दिलें नाहीं. तेव्हां तूं पृथ्वीवर जाऊन आपलें मृतशरीर खात जा. कांहीं काळानें तुला अगस्त्यऋषीची भेट होईल, तेव्हां तूं मुक्त होशील.' त्याप्रमाणें अगस्त्याची व त्याची गांठ पडून त्यानें त्यास सोन्याचें कडें दिलें, व तेणेंकरून तो मुक्त झाला, अशी कथा आहे. ६. कपटी, उन्मत्त. ७. कौमार्यव्रत. ८. धुळीच्या वृष्टीनें. ९. राजा दंडक. १०. प्राणी.

राम । ऐके, मग आत्मधाम । पावे दुष्टांचा अरी ॥ ११४ ॥ बंधूंस पुसे विचार, । 'राजसूय यज्ञ सार, । वर्णीती ब्राह्मण फार, । मत तुमचें वदा.' ॥ भरत जोडूनि हात । म्हणे, "यांत भूपघात, । तूं या लोकां जैसा तात । तैसा पाळिसी सदा. ॥ [1]श्वोलूकांचा केला न्याय, । सांगावी त्वत्कृपा काय, । प्रजा न म्हणोत 'हाय!' । तुझ्या गावूत पदा. ॥ अश्वमेध ही तसा च, । त्याहूनी हा हित साच, । यांत तैसा नाहीं जाच, । बा दयासुधानदा !" ॥ ११५ ॥ लक्ष्मण म्हणे, 'प्रताप । अश्वमेधीं भारी; पाप । वृत्रवधें घडे, ताप । शक्रा जो त्या हा हरी.' ॥ राम वदे, 'वत्सा! साच । याचा महिमा असा च. । स्त्रीत्वदोषांतूनी हा च । [1]इळा राज्या उद्धरी.' ॥ गुर्वाज्ञा घे रघुवीर, । नैमीषीं गोमतीतीर, । तेथें यज्ञवाट धीर- । मतें भरत करी. ॥ सौमित्री फीरवी हय, । संपादी सर्वत्र जय, । कोणाला ही न दे भय, । झाले सखे जे अरी. ॥ ११६ ॥ सर्वत्र धाडिले दूत, । आले [2]आहूत नाहूत, । रक्षःकीशपती पूत । न्हाया शीघ्र पातले. ॥ धांवला शत्रुघ्न तूर्ण, । विप्र राजे जाले पूर्ण, । केले दोषनग चूर्ण । रामें सुखीं घातले. ॥ गोमतीच्या तटीं [3]वाट । वाल्मीकीचा; जेणें वा[4]टें । केली, तीणें [5]आटोकाट । सन्मुक्तीसीं रातले. ॥ तींवर्णांची कथा काय, । शूद्राचे हीं समुदाय, । रामाचे पाहूनी पाय । अत्यानंदें मातले. ॥ ११७ ॥ अत्युदार गुणपात्र, । राममूर्तितुल्यगात्र, । रामायण गाया छात्र । वाल्मीकीनें लाविले. ॥ ऐके स्वसभेंत राम । आदिकाव्य पुण्यधाम, । कर्त्याचें, त्याचें ही नाम । पुसे, पुत्र भाविले. ॥ [6]प्राचेतसातें स्वकाम । सांगे, प्रार्थी मेघश्याम, । दिव्यांत प्रकटी धाम । ती, कीं प्राण ताविले. ॥ सीता क्षमोदरीं जाय; । प्रभूनें म्हणोनीं 'हाय!' । शोकक्रोध, जेंवि काय । भोग जना दाविले. ॥ ११८ ॥ समजावी चतुरास्य, । चित्तीं आवरूनीं हास्य, । कुशा लवा सांगे दास्य । त्या शोकातें मालवी. ॥ हेमैंमयी सीता राम । पार्श्वीं घे, अन्यस्त्रीकाम । सोडी, पा-

१. मंत्रभागवत नवमस्कंध पहा. २. बोलाविलेले. ३. आश्रम. ४. रामायणरूपी मार्ग. ५. अत्यंत. ६. वाल्मीकीतें. ७. सीता क्षमोदरीं गेल्यामुळें यज्ञासाठीं स्त्री पाहिजे म्हणून सीतेची सुवर्णमूर्ति आपल्या शेजारीं राम ठेवीत.

वाया विश्राम । नाना यज्ञ चालवी. ।। ऐसें अयुतवत्सर । करी सन्मीन-सत्सर, । जे लोभ मद मत्सर । ते दिगंतीं घालवी. ।। यज्ञांत अर्थिजनास, । अर्पाया इष्टधनास, । हृष्ट कराया मनास, । यशोंचलें[1] पालवी. ।।११९।। माता पावल्या गतीस. । नाकीं भेटल्या पतीस, । झाल्या शक्राच्या सतीसें[2] । मान्या कीं त्या सासवा[3] ॥ वर्णावी तद्गति काय, । ज्याचे मुक्तिप्रद पाय, । तो करी विश्वाचा राय । उत्तरक्रियासवा. ॥ देव सांगती स्त्रियांस,[4] । 'दशरथाच्या प्रियांस । करुनीयां सत्क्रियांस । आत्मा दास भासवा. ।। वाढवूनि बहु मान, । देणारा अभयदान, । यांच्या नंदनासमान । नाहीं अन्य वासवा.' ॥ १२० ॥ चवघांचे पुत्र आठ, । शत्रुला न देते पाठ, । ज्यांला सर्व विद्या पाठ । राज्य-पदीं स्थापिले. ॥ भरतें रणीं गंधर्व । तीन कोटी महागर्व, । संवर्तास्त्रबळें सर्व । लोक वैरी कापिले. ।। तक्ष पुष्कळ कुमार । दोंपुरींत सुकुमार । स्थापुनी, शत्रूंचे वार[6] । महातेजें दापिले. ॥ जे अंगद चंद्रकेतु । रक्षिते मर्यादासेतु, । त्यांहीं देश वृद्धिहेतु । पुरद्वयें व्यापिले. ।। १२१ ।। बोले विप्ररूपी काळ, । 'मंत्र तुजसीं जों काळ, । तों जो प्रवेशेल बाळ[7] । तो मारावा;' यापरी ॥ लक्ष्मणातें सांगे राम, । विप्राचा कराया काम, । बसे त्या रहस्यधाम- । द्वारीं दुष्टांचा अरी. ।। 'यावें वैकुंठलोकास' । ऐसें दयेच्या ओकास, । प्रार्थी तों द्याया शोकास । दुर्वासा म्हणे, 'जरी ॥ वारीतोसी[8] देतों शाप, । मत्ता! पहा मत्प्रताप, । पुढें धावे तुझा बाप, । आज्ञा मस्तकीं धरी.' ।। १२२ ।। सौमित्रि त्रासे[9] शापास, । जैसा मंडूक सापास, । सांगे श्रीरामक्ष्मापास, । 'श्रीदुर्वासा पातला,' ॥ काळा निरोप देवून; । रामें धांवत येवून, । पायीं मस्तक ठेवून, । प्रेमें जेवूं घातला. ॥ मुनी जेवूनीयां जाय, । राम चित्तीं म्हणे, 'हाय! । पण त्याज्य नव्हे, काय । वधूं, न हा मातला.'।। 'सुज्ञमतें वध त्याग- । सम संकटें न भाग;' गुरु सांगे, जाणे डाग । शोक मनाआंतला. ।। १२३ ॥ काळें घडवीलें

---

१. कीर्तिरूपी पदरानें. २. इंद्राणीस. ३. राम हा इंद्राचा भाऊ; अर्थात् राममाता त्या इंद्राणीच्या सासवा. ४. स्वस्त्रियांस. ५. देह. ६. समुदाय. ७. लहान मूल असला तरी. ८. [रामाकडे जावयाला] अटकाव करितोस. ९. भ्याला.

आग, । सौमित्री न धरी राग, । करीतां श्रीरामें त्याग, । सरयूतीरीं वसे. ॥ रामभद्राच्या मनांत, । सर्वसाकेतजनांत, । जेंवि दावाग्नी वनांत, । शोक सारीखा धसे. ॥ पुढें सांजळी राहून । देव, प्रसाद लाहून, । नेती वीमानीं वाहून, । वर्णीती बंदी तसे. ॥ राम म्हणे, 'मला राज्य, । ज्वरातीला जसें आज्य, । जातों मीं ही; दुःख प्राज्य, । सुख साकेतीं नसे.' ॥ १२४ ॥ भरतातें म्हणे, 'दक्ष । आहेस, राज्यातें रक्ष.' । तो वदे, "हे पाय लक्ष- । सत्सुखांचे आ-[१] कर ॥ चातक सोडील काय । मेघांबु, देवांचा राय, । म्हणेल, 'न म्हण 'हाय!'। घे अमृत आ कर' ॥ मीं तुझ्या दास्यें चि धन्य, । नावडे राज्यादि अन्य, । सेवील सोडूनी स्तन्य । कैसा बाळ साकर? ॥ दे पादाब्जसान्निधान, । हें चि माजें सन्निधान,[२] । तुझा देतां इष्टदान । न घे आळसा कर." ॥ १२५ ॥ अयोध्यापुरींचे लोक । पावले अत्यंत शोक, । सोडूनीं स्वतोक ओक । सारे गळां पडले. ॥ दुःखें मोकलूनीं धाय, । हृदयीं धरूनीं पाय, । अंगणीं म्हणोनीं 'हाय!' । वृद्ध बाळ रडले. ॥ होणारा वियोगें, माप । ज्यांला नाहीं ऐसे ताप, । काळजा अत्युग्र साप । तैसे त्यांच्या जडले. ॥ राम अभय दे त्यांस, । तोडी संसाराचे फांस, । भरवी बोधाचे घांस । ज्यांला क्लेश घडले. ॥१२६॥ उत्तर कोशलदेश । तेथें राम मानवेश, । दोघां पुत्रांतें, न क्लेश । ज्यांत ऐसीं, दे पुरें. ॥ अहोरात्रत्रयें पूत । शत्रुघ्ना भेटले दूत, । त्या वृत्तें अश्रु प्रभूत । त्याच्या सेवीलें उरें. ॥ सुबाहु नंदन ज्येष्ठ, । शत्रुघाती नरश्रेष्ठ, । साधुनीतिकीर्तिप्रेष्ठ[३] । वर्णावे बुधें सुरें. ॥ दोघांतें राज्यें देवून, । एकस्यंदनें[४] येवून, । रामाची भेटी घेवून । म्हणे खेदातें 'नुरें.' ॥ १२७ ॥ आले ऋक्ष, कपीवीर, । सुग्रीव ही महाधीर, । बिभीषणा प्रभुहीरें[५] । म्हणे, 'तूं सुखें रहा.' ॥ मारुतीतें सांगे राम, । 'माझ्या कथांहीं विश्राम । पाव, ठेवीं मुखीं नाम । धैर्यें वियोगा सहा.' ॥ मैंद द्विविद ऋक्षेश । तयांतें करी निदेश, । 'कल्पागम तों अक्लेश । देश सोडावा न हा.' ॥ निघे सर्वांसह साम-[६] । गानें पावाया स्वधाम, । पावे सरयूतें राम । ध्याया देवातें महा.

---

१. खाणी. २. उत्तम ठेवा. ३. अत्यंत प्रिय ज्यास. ४. एकाच रथानिशीं, सड्या स्वारीनें. ५. हिरा. ६. सामवेदांतील स्तोत्रांच्या गायनानें (युक्त).

॥ १२८ ॥ आले ब्रह्मादि विमान, । गंधर्व करिती गान, । झाले दिव्यवाद्यध्वान, । नाचती वराप्सरा. ॥ करूनीं सरयूस्नान । धरूनीं श्रीरामध्यान। शोभविती व्योमयान । सर्व वरूनीं त्वरा. ॥ सुप्रसन्न पद्मनाभ । जो तो सूर्य रात्रिपाभ,[1] । झाला दिव्यरूपलाभ । श्वाना शूकरा खरा. ॥ स्वीकारी स्वायुधवेश[2] । श्रीराम देवदेवेश, । त्या काळीं सात्त्विकावेश[3] । नारदा त्या ही हरा. ॥ १२९ ॥ सरयूंत गोप्रतार । तीर्थ अत्यंत उदार, । तत्स्पर्शे दिव्य मार्जार, । आखू, सर्प, कावळे. ॥ झाले पिशाच ही नीट, । श्वपचांचा[4] नाहीं वीट, । लाजले पाहून कीट । रम्य देवजावळे.[5] ॥ ऐसें विलोकितां चित्र[6] । भासे नाकिवृंद चित्र, । यशें त्या देवर्षिमित्रं[7] । कवी केले बावळे.[8] ॥ आलें अद्भुत[9] कानांत, । ज्याच्या राहिलें ध्यानांत, । साधु स्नानांत, पानांत । हें चि स्वर्गी चावळे. ॥ १३० ॥ रम्य संतानकलोक । नित्यानंदसंपदोक,[10] । ज्यांत कांहीं नाहीं शोक, । त्यांत स्थापी ते जन, ॥ करूनीं षट्शत्रु भग्न । कीर्तिसुधारसीं मग्न, ॥ आत्मपदध्यानलग्न । करी तयांचें मन. । ठेवी देवूनीं विश्राम । तारावया दास, नाम, । सेवी श्रीवैकुंठ धाम । भक्तमयूरघन. ॥ यश साधूंच्या मतीस । वाढवावया रतीस, । जैसें शंभु दे सतीस । कल्पवृक्षांचें वन. ॥ १३१ ॥ सागरा तज्जलकण । देतां काय? भावें पण, । 'घनाक्षररामायण' । रामभद्रा वाहिलें. ॥ तुळसीचें एक दळ । वाहे वंदूनीं दुर्बळ, । रत्नपूजापुण्यफळ । त्या, हें ग्रंथीं पाहिलें. ॥ यश विश्वातें सकळ । शरणागतवत्सळ, । पापिपावन निर्मळ । हें व्यापुनीं राहिलें. ॥ चित्तीं न धरिला राग । केले सर्व महाभाग, । मोटें आत्मनिंदा आग, । तें ही श्रीशें साहिलें. ॥ १३२ ॥ कोणी समर्पिती फळ, । कोणी तुळसीचें दळ, । कोणी गोड खारें जळ, । कोणी पुष्पें चंदन. ॥ कोणी वि-

---

१. चंद्राप्रमाणें कांति ज्याची. २. स्वतःच्या आयुधानीं युक्त असा वेष. ३. स्वेदरोमांचादि सात्त्विक आविर्भाव. ४. चांडालांचा. ५. देवांचे जोडीदार. ६. आश्चर्य. ७. नारदाप्रमाणें भक्तिसुखांत रंगून जाणारे. ८. वेडे. ९. अद्भुत असें रामायणरूप काव्य. १०. शाश्वत अशा आनंदसंपत्तीचें स्थान.

ध्युक्त पूजन । करूनीं स्वन्नभाजन;[1] । अर्पिती सभाग्य जन । वाजी, हस्ती, स्यंदन. ॥ कोणी निर्मीती भवन, । कोणी करीती स्तवन, । कोणी साष्टांग, भव न । बाधावया, वंदन. ॥ सर्व हे सारखे दास, । नेतो उत्तम पदास, । वंद्य अन्य वरदास । राम रघुनंदन. ॥ १३३ ॥

## [उपसंहार]

श्रीरामासि घनाक्षररामायणपद्म[2] अर्पिला भावें,
ज्याच्या चरितांत अमृत, जैसें दुग्धांत सर्पि[3] लाभावें. १
हातीं न चित्त वित्त हि, न घडे जप तप हि, शुद्धि बुद्धि नसे,
परि हरिजन हो! प्रभुच्या हृदयीं तुमच्या हि वत्सलत्व वसे.
ज्याच्या यशापुढें, कविवर म्हणति, सुधाब्धिचा लवो वीची,
तो प्रभु नररीति धरी, तैसा हा ग्रंथ; चाल वोवीची. २

इति श्रीरामनंदनमयूरविरचितं श्रीमद्घनाक्षररामायणं समाप्तं ।
श्रीरामचरणपद्मयोरर्पितं भवतु ।

---

# विबुधप्रियरामायण

(हरिनर्तनं छंदः–पंत)

श्रीश, पद्मजऋष्यशृंगसनत्कुमारतपोबळें,
अश्वमेधवसिष्ठसत्सुकृतें, स्वकीयकुतूहळें,[4]
दिग्रथात्मज होय, च्यार धरी सुमूर्ति, समुज्ज्वळें
आदिसत्कविविश्वभाग्यभरें, दशास्यकृतच्छळें. १
कोसलेश्वरजा जया प्रसवे, तया शुभ 'राम' हें
नाम ठेवुनि, दिग्रथप्रभु, रंजवी भुवना महें;

---

१. सुग्रास अन्नानें युक्त असें पात्र. २. येथें हा शब्द पुल्लिंगी योजिला आहे.
३. तूप. ४. ब्रह्मादिकांचें तपोबळ, अश्वमेधादिपुण्य व स्वतःची इच्छा या सर्वांमुळें.
५. वाल्मीकि व विश्व यांच्या अत्यंत उज्वल भाग्यामुळें.

केकयप्रभवात्मजा 'भरत;' प्रिया तिसरी तिच्या
   भव्य 'लक्ष्मण' हें, 'अरिघ्न' असें, पदासि सुरीतिच्या. २
श्रीवसिष्ठ तयां करि[1] द्विज; आदरें पढवी श्रुती;
   गाधिजा, गुरु राम लक्ष्मण देववी, करुनि स्तुती.
दे बळातिबळा तयां मुनि, सर्व अस्त्र, पथीं, कथी;
   ताटकेसि, मखघ्न राक्षस जे तयांस हि, तो मथी. ३
गौतमर्षिवधूसि पादरजोनिळें[2] प्रभु उद्धरी;
   शंभुच्या धनुचे, पळांत चि ओढितां तुकडे करी.
जानकी, पणसिद्धि पाहुनि, हर्षुनि, प्रभुतें वरी,
   दे तिघांसि सुता तिघी, जनकासि कीर्ति मिळे बरी. ४
होय भार्गवराम हि, प्रभुदर्शनें चि तपोनिधी;
   शुद्ध शांतिमती करी, श्रुतितें जपोनि, तपोनि, धी.
हर्षली नगरी; करी, यश, फार लज्जित, कापुरा;
   सानुजा भरतासि मातुळ ने, धृतोत्कुतुका[3], पुरा. ५
दिग्रथाप्रति योजितां युवराज राम करावया,
   सप्रधान म्हणे वसिष्ठ हि, 'हा विचार बरा वया.'
मध्यमा दयिता वदे, 'वर दोन हे रुचले मना,
   मत्सुता अभिषेक; राम चतुर्दशाब्द भजो वना.' ६
राय तीस म्हणे, 'दिलें तुज राज्य; ईक्षुतुकानना[4]
   राघवा, सति! सख्य आठिव तूं, न पाठिव कानना.
मंथराहृतबुद्धि ती न वळे चि; तें कळतां निघे
   राम, सानुजदार, मातृनिदेश वेद गणूनि घे. ७
तातसत्यमहाव्रतावनकाम राम महापथीं
   चालतां, जन 'हा!' म्हणे, बसवी नरेंद्र तया रथीं.
वल्कली प्रभु, जो सखा गुह, त्यास भेटुनियां, जटा

---

१. त्यांचें उपनयन करी. २. चरणधूलीसंबंधीं वायूनें. ३. अत्यंत उत्सुक अशा. ४. नयनानंददायी वदन ज्याचें.

यत्पयें रचि साश्रु, धन्य करी निषादवरा, वटा. ८
त्या स्थळीं च सुमंत्र सोडुनि, देवसिंधुसि तो तरे,
यद्यशःकथनें गुरूस[1] हि होति संमत तोतरे.
श्रीप्रयागगत स्वतातसखा महामुनितें नमी,
चित्रकूटनगीं करी मग धन्य सर्व यमी[2] शमी[3]. ९
रामवृत्त कथी सुमंत्र, पुरासि येवुनि दिग्रथा;
ऐकवी महिषीस[4] तो, निजशापकारण जी कथा;
‘राम! राम!’ असें वदे, सुतशोकरूपमहाव्यथा
पावुनि, व्यसु होय, लंघुनि जाय संसृतिच्या पथा. १०
दूत धाडुनि, सानुजा भरता गुरु द्रुत आणवी;
भेटतां चि, तयासि ती जननी स्वकौशल जाणवी.
तो वदे तिसें, ‘धिक्! तुझें कृत लाजवील चि यातुतें[5].
हा जडे! त्यजिलें सुधाफळ; काय गे! हित या तुतें?’ ११
क्षिप्र तैलनिमग्न तातशरीर काढुनि, तत्प्रिया,
राममातृमन प्रसन्न करूनि, साधु करी क्रिया.
‘राज्य घे,’ म्हणतां, गुरूक्त हि तो विलंघुनि, अग्रजा
गाय; जाय, धरावया शिरीं पापपर्वतघ्नरजा[6]. १२
भेटतां चि सुशील तो बुध, संहरी गुहसंशया;
गौरवी मुनि, विष्णुचा समजे मनीं शुचि अंश या.
चित्रकूटनगीं नमी, गुरुची कथि प्रभुला गती;
तो पित्या जळ दे, यदंघ्रिस पद्मजादिक लागती. १३
भक्त तो विनवी दयाब्धिस, ‘दीनपा! परत; क्षणें[7]
स्वप्रजेप्रति दे चि; एक हि, मीं न पापरत, क्षण.
माय बालिशबुद्धि केवळ; काय तें धरिसी मनीं?
हाय! हे, न वसावया, मृदु पाय, योग्य नगीं वनीं. १४

---

१. बृहस्पतीस. २. जितेंद्रिय. ३. प्रसन्नचित्त, शांत. ४. कौसल्येस. ५. राक्षसातें—**पंत.** ६. पर्वतप्राय पापराशीचा नाश करणाऱ्या पायधुळीला. ७. उत्सव—**पंत.**

दे प्रभो! अभया मला, घन दे तसें खगपा[1] वनीं[2];
पाव; नाम यशस्वि हो; द्रवलासि बा! गजपावनीं[3].
पावना तव कीर्ति मोहिति, जेंवि जंतुसि आंसरा[4],
आ सरा करिती तुला जन; दे नताप्रति आसरा.' १५
साश्रु होय, वदे, तया कुरवाळुनि प्रभु बापसा,
"तापसां[5] न गमो अनुग्रह, भार हा मज बा! पसा;
कीं तुला हि, मला हि, युक्त गुरूक्तपालनधर्म हा,
शर्महानि करी, जना म्हणवी सदा परधर्म 'हा!'" १६
पादुका प्रभुच्या शिरीं धरि, 'संपतां चवदा समा,
तूं न येसिल, होमिन ज्वलनीं तनू समिधासमा.'
स्पष्ट यापरि तो वदे भरत, स्वयें परते, करी
वास बाहिर, वल्कलाजिन वन्यवृत्ति सुखें वरी. १७
जाय तेथुनि, सत्तपःफळ अत्रिचें मन लोभवी.
तत्प्रिया[6] बहु, मायसी, जनकात्मजातनु शोभवी.
जो विराध धरी, हरी हि समुद्धरी प्रभु हा तया;
जाणवी उदयार्थ जोडुनि, कीं न जोडुनि हात, या. १८
दंडकीं शरभंग आणि सुतीक्ष्ण, कुंभज, सन्मुनी,
जे स्वदर्शनकाम संतत सत्तपोरत जन्मुनी,
त्यांसि भेटुनि, तन्मतें शरणागताभयदायकें
गृध्र तातसखा जटायु हि पूजिला रघुनायकें. १९
वास पंचवटींत लक्ष्मणनिर्मितीं उटजीं करी.
यातुपत्यनुजा कुबुद्धि सुरूप शूर्पणखा धरी.
ये, गळां चि पडे रतार्थ, जसी बळें हरिच्या खरीं[7].
घ्राण कर्ण, रघूत्तमानुज तो, तिचे असिनें हरी. २०
मूढ बंधु तिचा, न जो प्रभुची धरी परवा, खर;

---

१. चातकाला. २. उदक. ३. गजेंद्ररक्षणार्थ. ४. अप्सरा—**पंत**. ५. त्रासदायक असा. ६. अनसूया. ७. गाढवी.

राम तो सदासि प्रशस्त महा गमे; पर वाखर[१].
जे सहस्र चतुर्दश क्षणदाचर त्रिदशारि; ते
संगरीं पडले, पळांत चि हारवूनि यशा रिते. २१
राम हर्षवि जिष्णुची जयफुल्लदृष्टि सभा; जन-
स्थान शून्य करी, वरी स्तव, पुष्पवृष्टिस भाजन.
ती कुबुद्धि निशाचरी दशकंधरा मुख दाखवी;
जानकीगुणरूपलक्षणसत्सुधारस चाखवी. २२
जानकीहरणार्थ युक्ति मनीं दशानन आठवी;
स्वर्णरत्नमृग क्षपाचर आश्रमीं खळ पाठवी.
श्री विलोकुनियां सुरंग कुरंग, 'हा अजि! तापसा
दर्शनें न पळो, धरा चि,' म्हणे; करी अजिता पसा[२]. २३
स्वानुज क्षितिजावना उटजांत ठेवुनि राघवें,
दूर ओढुनि ने, पळे, परि मारिला मृग लाघवें.
'हाय जानकि! हाय लक्ष्मण! धांव,' यापरि हाकली[३];
वाढवी शुचिमानसांत हि तत्क्षणीं अरि हा कली. २४
हाक आयकतां, सखी करि कांपल्या कदलीस ती.
'दे वरा मज, देवरा! द्रुत धांव,' हें वदली सती.
तो म्हणे, "कपटिक्षपाचरशब्द होय; परी महा[४]
मुख्य आश्रय देव, देवि! कधीं म्हणेल न राम 'हा!'" २५
श्री म्हणे, 'अभिलाष मद्विपयीं तुझा; प्रभुहानितें,
दुर्जना! तव दुष्ट मानस, इष्टसिद्धिस मानितें.'
साश्रु, तो उटज त्यजूनि, निघे चि बोलत 'हाय!' तें
रंध्र सांपडलें, सतीहरणा, अरातिस आयतें. २६
पूजनादृतमानसा[५], सुविरक्त भावुन, होय ती;
'स्वाश्रमांत' म्हणे, 'प्रसन्न, अभीष्ट पावुन, हो, यती.'

---

१. खुरपें. २. अंजलि–**पंत**. ३. हांका मारी. ४. उत्कृष्टा तेजास–**पंत**. ५. पूजेविषयीं सादर चित्त जिचें अशी.

तों चि दावुनि रूप, 'सुंदरि! सर्वसद्गुणसंपदे!
चाल, हो महिषी,' दशास्य असें वदे, बहु कंप दे. २७
श्री म्हणे, 'निघ रे! कधीं हि न कर्म हें शुचि, राक्षसा!
भस्म होसिल; देखिला न तुवां जगीं [1]रुचिराक्षसा.'
तो बळें चि महासतीस, घडावया खळ हानि, घे,
भग्न होय जटायुसीं करुनि [2]समयें कळहा निघे. २८
पूर्ण षष्टिसहस्रवत्सर ज्या जटायुस जन्मुनी,
सून सोडवि शत्रुपासुनि तो, असें कथि सन्मुनी.
वृद्ध गृध्र खरासिनें दशकंधरें मग ताडिला,
पक्षमूळ पळांत तोडुनि, धर्म सोडुनि पाडिला. २९
ती म्हणे, 'रघुनाथजी! करितां उपेक्षण काय हो!?
हाय! लक्ष्मणजी छळी, परि दूर न, क्षण, काय हो.
कीर्ति मीं तुमची; अहो! मज शीघ्र, धावुनि, सोडवा;
खोडवाल ललाटलेख हि, शत्रुला कर जोडवा.' ३०
'हाय! हाय!' म्हणे सती; दशकंठ तीस बळें हरी.
सोत्तरीय नग त्यजी, कपिपंचकीं अचळावरी.
ने जड स्वपुरींत, जी [3]अजिताग्निची फुणगी तितें
हात जोडितसे सुधा शतदा जिच्या [4]गुणगीतितें. ३१
रामभद्र मृगासि मारुनि, होय शंकितधी, फिरे;
साश्रु लक्ष्मण ये, नमी, कथि वृत्त; आयिकतां विरे;
येवुनि द्रुत, शून्य आश्रम पाहुनि, प्रभु 'हा!' वदे,
तो नगांस हि मोह [5]आत्तवियोगिमानवभाव दे. ३२
शोधितां गहनांत, मूर्छित गृध्र दूरुनि पाहिला;
[6]दक्षिणोरुवरि, द्रवोनि, तदीय मस्तक वाहिला.

---

१. नयनाभिराम असा राम. २. गर्वं–**पंत**. ३. अजित जो राम तो च अग्नि त्याची. ४. गुणवर्णनाला. ५. घेतलें आहे विरही मनुष्याचें सोंग ज्यानें असा. ६. उजव्या मांडीवर.

रावणें हरिली वधू, कळवूनि हें, व्यसु राहिला.
'हा!' म्हणोनि रघूत्तमें विधिनें खगोत्तम दाहिला. ३३
धुंडितां विपिनें पुन्हा हि, कबंध राक्षस मारिला,
तारिला; शबरी महामति जी, तिचा भव सारिला.
वारिला[1] हनुमन्मनोगद; तो सुकंठ हि पाळिला;
वाळिला निवटूनि, तत्सुत राघवें कुरवाळिला. ३४
बैसवी अनुज्यासि सांगुनि, कीशराज्यपदीं नता.
केंवि पाहिल [2]वज्रभृत्कपिलावराज्यप दीनता?
धाडिले हुडकावया कपिकोटि, ते श्रमले [3]मुधा.
प्राप्त शंकरहासर्से यश होय वायुसुता बुधा. ३५
दाखवी बळ, तोषवी न, बसे [4]हिमाद्रिसुतावरी,
रंजवी सुरसेसि ही, बहुयोजनें मुख जी करी.
सिंहिका वधिली पळांत चि, सावुलीस हि ती धरी,
सिंधु लंघुनि, [5]शत्रुपुर्यधिदेवताभ्रम तो हरी. ३६
रात्रि होवुनि ओतुसा हुडकी पुरींत; न देखुनीं
होय खिन्न मनीं, उणें निजदैव केवळ लेखुनीं.
तो अशोकवनीं शिरोनि विभूतितें मग पाहुनीं,
शिंशपातरुतें कपी बहुमान दे [6]नगपाहुनीं. ३७
तों दशास्य, महाविभूतिस, रात्रि ये, विनवी, 'रहा
मंदिरीं, तुज चिंतितो; इतरांसि सेवि न वीर हा.'
श्री वदे, म्हणुनि स्वमानसिं, 'राम! राम!' 'रणा रची
[7]सौद्रिसीं अहि तूं; तयापरि पामरा! मरणार ची.' ३८
प्राप्ताधिकृति रावण क्षणदाचरींस म्हणे, 'दिला
स्पष्ट [8]मासयुगावधि, त्यजितां मदुक्त, वधा इला.

---

१. मारुतीच्या मनांतील शंका. २. इंद्राच्या गाईचें (कामधेनूचें) उत्तम तूप सेवन करणाराला. ३. व्यर्थ. ४. मैनाकावर. ५. लंकेच्या मुख्य देवतेचा भ्रम. ६. कल्पतरु-पंत. ७. गरुडासीं-पंत. ८. दोन महिन्यांची मुदत.

मांस भक्षिन मीं इचें; मज मानुषी अपमानिती.
मत्तपाहुनि आपलें बहु उग्र हे, तप मानिती. १९
जाय दुष्ट, असें दटावुनि, राक्षसी अति जाचिती;
पाश घालि गळां, म्हणे क्षितिजा असूंप्रति 'जा चि,' ती.
मुद्रिका तिस दे मरुत्सुत; जानकी हि शिरोमणी;
तो महोपवना चुरी, विपि[1] होय, शत्रु करी फणी. २०
मत्त राक्षस लक्ष, अक्षकुमार ही करि चूर हा,
शूर 'हा!' वदले; म्हणे अमरर्षि 'जों[2] रवि, भू रहा.'
इंद्रजित् प्रकटी सरोजभवास्त्र; सांपडला बळें;
बोलिला गुरुसा सभेंत विशंक, बोलवितां खळें. २१
पेटवी खळ पुच्छ; पावक होय या करकां[3] पुरा
भेटवी चुलत्यासि[4], लाववि तो जसा कर कापुरा.
दोन भाग करूनि भस्म निघे, कृती स्वरिपूंस 'हा!
हा!' असें म्हणवि; प्रशांत नदीश्वरीं करि पूंस[5] हा. २२
जानकी, नमितां पुन्हां, वदली द्रवोनि, 'शमस्तु' तें
वायुजें, वरवाक्य घेउनि, शर्वशक्रयमस्तुतें,
क्षिप्र गोष्पदसा पयोनिधि लंघिला शतयोजनें.
हर्षले बहु अंगदादि, जसे सुधारसभोजनें. २३
जानकी हुडकावयास्तव, धाडिलीं बहु जीं बळें,
आपलें मधुसंज्ञ जें वन, तें तिहीं लुटिलें बळें.
ताडिला दधिवक्त्र हें कथि. कार्यसिद्धिस जाणुनीं
हृष्ट होय सुकंठ, आग मनांत लेश न आणुनीं. २४
पातले कपि, हृष्ट होवुनि, वंदुनि प्रभुतें, फणी
तेंवि मारुतिबाहु दे अतिभव्यदीप्ति शिरोमणी.
सुप्रसन्नमनें रघूत्तम भेटला पवमानजा.
त्या म्हणेल न 'धन्य' कोण, मिळे असा नव मान ज्या! २५

---

१. गरुड-पंत. २. चिरंजीव हो. ३. गारा. ४. बिभीषणाला. ५. पुच्छ.

फार भार चि वाटला उपकार हा, भवभंजना.
वातपुत्रमनाचिया, करि भेटुनि प्रभु रंजना.
होय धन्य जगत्रयीं, प्रसवोनि सन्मणि, अंजना.
कंजनाभ[1] पदाश्रितांप्रति दे यशा सुनिरंजना[2]. ४६
कोटि कोटि सुरांशसंभव ऋक्ष वानर, बाहुनीं
चंड पर्वत, तच्छिला शिखरें महाद्रुम वाहुनीं
गर्जती घनसे, महाबळ युद्धकामुक पाहुनीं,
शोभनीं समयीं निघे प्रभु, राजसंमत[3] लाहुनीं. ४७
वाहिला पवनात्मजें प्रभु राम, लक्ष्मण अंगदें;
पावलीं कटकें, पयोनिधिच्या तटा, परभंगदें.
रावणें अपमानिला, सुकृती बिभीषण पातला,
सत्सुखीं, शरणागत प्रभुनें पळांत चि, घातला. ४८
त्या स्वबंधुकरें नता, अभिषेक तो करवि प्रभु
क्षिप्र राक्षसराज्य दे, सुखवी दिवाकर विप्र भू.
अस्त्रभीत समुद्र भेटुनि, सेतुतें रचवी, रते
या यशीं जग सर्व, भीति सुदुर्जया नच वीर ते. ४९
सिंधुतें, नळनिर्मिताद्भुतसेतुरूपपथें, तरे.
राम रावणदूत सोडवि, भासले कपि जे खरे.
राक्षसासि विलोकितां चि, उडे सुकंठ, गळां पडे;
बाहुयुद्ध करी, हरी मुकुटा, मदा हि, असें घडे. ५०
ये फिरोनि कृती, करी अमृतासि नीरस हा यशें.
त्या म्हणे प्रभु, 'काय हें असतां हि वीर सहाय शें?
घातली कसि रे सख्या! उडि? उग्र तो दवसा; हसें
येतसे तुज; बा! नये मज, कांपलों तव साहसें.' ५१
रावणें प्रभुचें धनुष्य, शिरोब्ज, कृत्रिम दाविलें.
श्री हि 'हा!' वदली, मनीं क्षणमात्र सत्य चि भाविलें.

---

१. कमलनाभ. २. अत्यंत शुद्ध अशा. ३. सुग्रीव-पंत.

ये बिभीषणगेहिनी[1] सरमा, वदे, 'सखि ! आइक;
व्यर्थ शोक नको करूं. गमलें खरें, परि मायिक.' ५२
प्रेषिला प्रभुनें महामति दूत अंगद, बोलिला
धर्म तो गुरुसीं महाकविनीं प्रभुप्रिय तोलिला.
"दे जडा ! प्रभुरत्न हें; म्हणवील 'हाय !' कसा जिरे
राहुला रस ? सद्यशें रघुवीरसायक साजिरे." ५३
प्रेरुनि क्षणदाचरांसि दशास्य तो, धरवी रया;
नेणते धरिती मदांध भुजद्वयीं परवीर या.
अंगदें गगनीं उडोनि महाबळें, भुज झाडिले;
पाडिले मदमत्त च्यार, यमाकडे जड धाडिले. ५४
साम सोडुनि, मांडिलें, नय धर्म लंघुनि, उद्धतें,
युद्ध, तेंवि न ऐकिलें, करि, वर्णितां अतिशुद्ध तें.
आंत बाहिर, वीर वीररसें, निरंतर रंगले.
अंग लेखिति ते तृण, त्यजिती न संगर भंगले. ५५
नाचले समरीं कबंध असंख्य, रक्तनदीशतें.
चित्र, जें करिती निशाचरकीश ते हि तदीश, तें.
वाजिवारणमार्गरोधक मांसकर्दम सांचले.
रामलक्ष्मणसंमुखागत मानुषाद[2] न वांचले. ५६
कीश वृक्षमहाशिलाशिखरें धराधर खाणिती,
या चि भव्यनवायुधें समरीं स्वशत्रुसि हाणिती.
जे प्रहस्तमुख क्षपाचर ते बहु क्षय पावले,
काय कल्पनटापुढें नटकोटिदर्शित पावलें[3] ? ५७
मेघनाद महाखळ च्छळदक्षलक्षशिरोमणी,
राम लक्ष्मण हे प्रभू अहिपाशबद्ध करी रणीं.
श्री विलोकुनि 'हा !' वदे; त्रिजटा निवारि तदश्रु ती,
"तो हरी विपदा, जया म्हणतात 'आत्मपद' श्रुती." ५८

१. गृहिणी, पत्नी. २. मनुष्यभक्षक. ३. चाल.

प्रेरिले अयुत क्षपाचर, तत्प्रयत्नशतें मग
कुंभकर्ण उठे दिनद्वय कष्टवूनि जसा नग;
कीशपा धरि, तो सुटे, हरि नाक कान, बळा तग
ज्यापुढें न निघे, वधी प्रभु त्यास ही, सुखवी जग. ५९
ब्राह्म मेघरवें रणीं प्रकटूनि, पक्षिवरें फणी
तेंवि ते खिळिले क्षणीं, रघुवीर वीरशिरोमणी.
क्षिप्र ओषधिवन्महानगशृंग आणुनि अंजना-
पुत्र त्या उठवी, बळासह सानुजा भवभंजना. ६०
ख्यात जे अतिकाय, देवनरांतक, त्रिशिरा असे
रावणात्मज, यद्भय त्रिदशांचिया हृदयीं वसे,
वीर कुंभ निकुंभ हे, घटकर्णपुत्र हि टोळसे
जाहले प्रभुदग्दवीं, परिघासि शूळ हि, कोळसे. ६१
जानकीवध दाखवी घननाद, सत्य चि वाटला;
दाटला प्रभुकंठ ही; हृदयीं सुकंठ हि फाटला.
आटला परि शोकसागर, कुंभसंभव भेटतां,
तो बिभीषण तेंवि कीं घन, काननीं दव पेटतां. ६२
लक्ष्मणासि अहर्निशत्रय तद्वधा मग लागलें.
भागलें बहु कीशसैन्य, न भक्षिलें फळ, जागलें.
बंधुच्या विजयें प्रभूत्तम मानसीं बहु हर्षला.
तच्छिरीं, कुरवाळितां तनु, शीत दग्जळ वर्षला. ६३
घे प्रतक्ष दशास्य, जे प्रभुदार तच्छमना असी.
श्रीस वांचवि, कीर्ति जोडि, सुपार्श्व अच्छमना[1] असी.
शोक कोप न आवरे, दशकंठ फार चि बावरे.
काळसा बळिं वावरे प्रभु, त्या म्हणे 'धर आवं[2] रे!' ६४
रावणें खरशक्तिनें स्वसुतारिचें उर फोडिलें;
तों चि आणुनि शृंग तें पवनात्मजें यश जोडिलें.

---

१. स्वच्छ मन ज्याचें. २. धैर्य.

प्रार्थुनि प्रभुतें रणीं, बसवी रथावरि मातली,
 द्विट्[1]चमू झगडोनि संयमिनीपथा वरि मातली[2]. ६५
रामरावणदर्शिता, मुनि वर्णिती, परमारणा;
 काळ सप्तदिनक्षपामित लागला परमा रणा.
मस्तकें शत खंडिलीं, उठलीं नवीं, पर, मा[3]गतीं.
 ब्राह्म योजुनि, भेदिलें उर, त्या दिली परमा गती. ६६
कुंभजा, रविला हि, मातलिला हि, दे यश राम हा,
 मागुनि प्रभु आपल्या, करि, त[4]ज्ज्ञगेय शरा महा.
पारिजातसमुद्भवें कुसुमें प्रभूवरि वर्षले.
 शक्र, शर्व, सरोजसंभव, सर्व ही सुर हर्षले. ६७
दिव्य दुंदुभि वाजला; गमला महाधन गाजला;
 सद्यशें प्रभु साजला; त्रिजगीं महोत्सव माजला;
या सुरद्रुम लाजला; जनदोष सर्व हि भाजला;
 हा खळीं मह डाजला[5], नसता चि एक हि आजला. ६८
नृत्यगानकळा प्रकाशिति अप्सरा; सुरगायक
 प्रेमगद्गदकंठ होवुनि गाय निर्जरनायक;
राम चंद्र, चकोर सन्मुनि, होय त्यां सुखदायक;
 काय कल्पतरू? स्तवीं प्रभुच्या अ ये द्रुत[6] जाय क. ६९
प्रांजलि प्रभुला बिभीषण साधु तो विनवी, 'न या
 हस्त लाविन; काय गोद्विजधर्मनाशरतीं दया?
राम रावणदारसांत्वन, तत्क्रिया करवी रसें,
 'हा त्वदीय जसा, तसा चि मदीय ही,' वदला असें. ७०

---

१. शत्रुसेना—**पंत**. २. माजलेली. ३. मागून, पुनः. ४. रणपंडितानीं वाखाणण्याजोगा. ५. काळजाला झोंबला, म्हणून तर खळ अद्याप हि आढळतात; तसें नसतें तर आजला एक हि खळ दिसला नसता. ६. रामस्तवापुढें कल्पतरूला तत्काळ अल्पतरुत्व आलें—त्याला कोणी विचारीना हा भाव.

लक्ष्मणें अभिषेचिला, दर[1] हस्तकें धरिला, स्वयें
स्थापिला. स्वशिरीं पदें प्रभुभक्त तो वरिला स्वयें[2].
त्यावरि प्रभु मानसीं जनकात्मजेप्रति आठवी;
मारुतीस सतीकडे, कळवावया जय, पाठवी. ७१
श्रीस मारुति बोलिला नतकाय, 'आइ! कसी महा[3]
हानि होयिल या तुझ्या? कथुं काय आयकसी महा[4]?
पावला जय रामवारिद तो खरा वणवा सवा,
त्या हि अर्पितसे न वांचुनि तोख रावण वासवा.' ७२
बोलिली प्रियसांगत्या, 'तुज देय वस्तु नसे' असें.
तो वदे, 'परिपूर्ण मीं सति! या तुझ्या वचनें असें.
एक हा वर दे जिहीं बहु गांजिलीस, वधीन या.'
श्री म्हणे, 'अबळात्ययें[5] बुध लंघिती न कधीं नया.' ७३
सूक्त सेवुनि, नम्र होउनि, सुज्ञ मारुतनंदन
प्राप्तहर्ष पुनःपुन्हां वदतां तिर्ते करि वंदन;
'धन्य शील तुझें, जसें प्रभुचें तसें चि, महासती!
तूं चि या उचिता; न जी असि पात्र या, न महास ती.' ७४
भक्तवत्सळरामदर्शनकाम सन्मति जाणवी,
तो हि त्या प्रभुला; तिला प्रभु हि स्वसंनिधि आणवी.
आपणा न सिवावया अपवाद, दिव्य करी सती,
लोपवी स्वयशीं पयोधिस ही, न दिव्यकरीस[6], ती. ७५
शक्रसा, स्वविमान सोडुनि भेटला प्रभुला पिता,
स्थापिता शिर होय तच्चरणीं स्मरारि दापिता.
ताँपिता[7] निववी तया भरता हि, घे वर शापिता,
पापिता हरि, या यशें चि, न लावुं दे कर नापिता[8]. ७६

---

१. शंख. २. शोभन–शुभावह विधिनें–**पंत**. ३. तेजास–**पंत**. ४. उत्सवास–**पंत**. ५. अत्यय=नाश. ६. ऐरावतास. ७. तप्त अशा. ८. क्षौरांविना महापातकिनोऽपि प्रभुयशःश्रवणेन पूता इति–**पंत**.

'त्वद्यश श्रवणीं, मुखीं अमृत श्रुतज्ञ न, ओतु तें,
ओ तुतें जय देवु, घे पद वाद्य हो [1]तमओतुतें.'
पुत्रवत्सळ तात दिग्रथ यापरि प्रभुला वदे,
भाव देव तदीय वर्णिति पुण्य तच्छुभ नाव दे. ७७
सर्व ही उठवी मृत स्वकपि प्रभूत्तम दृष्टिनें,
वर्णिती मुनि, आत्मभू [2]पविभृत्कृतामृतवृष्टिनें
दे तयां यश, राम हा महिमा स्वयें बहु वाढवी,
संकटांतुनि आपणांस हि भक्तमानद काढवी. ७८
प्रार्थुनि प्रभुला बिभीषण [3]हार्द्रसद्रसभाजन
'घे' म्हणे, 'सुगळा बळासह विश्वभद्र! सभाजन.'
बोलिला प्रभु, "पूज कीशप हें[4] नको भरताविना;
तो जटाधर कष्टतो; मज काय हा[5] भर ताविना? ७९
क्षिप्र तो मज भेटिव, प्रिय हें चि पूजन बा! सरा
मानसा भजु हंस, गाय मिळो क्षुधाकुळ वासरा.
ज्यांत पाहिन त्यास, 'धन्य' म्हणेन त्या चि सुवासरा;
कीं असूंसि म्हणे सदा 'न धरूनि' तो 'परवा सरा.'" ८०
तो ससैन्य सुकंठ पूजुनि, पुष्पक द्रुत आणवी,
'क्षिप्र नेइल हें,' असें प्रभुला बिभीषण जाणवी.
रामभद्र म्हणे, 'अशा हि भजोनि यातुपते! लया
पावला जन; होय काम धनंजया तुप तेल या.' ८१
पुष्पकीं बसवी स्वयें [6]रचितस्वकार्य सखे, दया-
पात्र ऋक्ष, कपी हि; देखवती न आर्य सखेद या.
श्रीस घेउनि सानुज प्रभु तो बसे; मग नातु न
त्यांत येइल कां, सुखें यश गावया गगनातुन? ८२

---

१. अज्ञानरूपी मार्जारास पळवून लावणारें वाद्य हो. २. इंद्र. ३. प्रेमसद्रसपात्र. ४. पूजन–पंत. ५. पूजारूप–पंत. ६. आपलें कार्य ज्यानीं शेवटास नेलें अशा. ७. नारद.

श्रीस दावुनि युद्धभू कथि ज्या चमत्कृति जाहल्या.
होय तो व्यसु, जो म्हणे शमनाचिया, 'पळ जा' हल्या.
सिंधुला भव हें महापथ वेद या नळसेतुला
मुक्ति मीं म्हणतों न जी कथवे दयानळसे! तुला. ८३
या स्थळीं सहसा बिभीषण पावला; विरहाकुळा
धैर्य दे, कारि कार्य हो! मत भानुच्या चिर हा कुळा.
प्रार्थिला न वळे चि सागर, राग रम्यतनो! मला
भेटला, तंव हा हि सेतुपथा उपाय कथी भला. ८४
देवि! हा नग ऋष्यमूक, सुकंठ मत्सख या नगीं
दाखवी नग या स्थळीं, गमलीस दुर्लभ तूं जगीं.
'भेटवीन तुझी प्रिया तुज, होउनि स्थिरधी रहा,'
हें वदे, सति! दे करीं कर, मन्मनीं बहु धीर हा. ८५
वाळिचा वध या स्थळीं, सति! ती सुकंठगुहापुरी;
ते कैपीश्वरदार, ईत जैयां बहु स्तविती सुरी.'
जानकी प्रभुला कथी, प्रभु कीशपा, तिस आणवी.
श्रीपुढें तासि ती दिसे, समयींपुढें जासि ठाणवी. ८६
रामचंद्र पुन्हां कथी, बहु शोकपावक पेटला,
देवि! मारुति हा महाघन या स्थळीं मज भेटला.
सुभ्रु! हे सरसी पहा, म्हणतात 'पं' मग 'पा' इतें;
सत्पयें करिती सदा, सति! जें कारि प्रिय आइ तें. ८७
हा मतंगमुनीश्वराश्रम, पुण्यदेश; बरीस ती
होय फार बरी, मला सुख देवि! दे शबरी सती.
या वनीं वधिला कबंध; जिच्या यशें जगधौत, मीं
यत्तटाश्रित हे नमूनि पहा महासति गौतमी. ८८

---

१. ह्या चरणाचा समाधानकारक अर्थबोध होत नाहीं. २. दया करण्यांत आळस न करणारे (सीते)! ३. तारा. ४. सुग्रीव व तारा याना. ५. देवस्त्रिया. ६. लांकडी समई.

राम पंचवटीस दाखवि, तातबंधुखगालया
दावि; 'हाय!' म्हणे कसे कवि हो! सदैव न गाल या?
कुंभजात्रिमुनीश्वराश्रम चित्रकूट हि पाहवी,
सूर्यजा[१] हरिजा[२], प्रयागपदीं स्वपुष्पक राहवी. ८९
सज्जना भरताचिया प्रभु निश्चयोक्तिस आठवी.
वायुजा कळवावयास निजागम द्रुत पाठवी;
तातमित्रमुनीस वंदुनि, रामभक्तिचिया बळें
ज्ञानमुक्तिफळप्रद स्वकपींस मागुनि घे फळें. ९०
तेथुनि द्रुत रामचंद्र निघे; निषाद[३] चकोरसा
होय हर्षित, जो म्हणे इतरा मनांत नको रसा.
स्पष्ट चातकसा जगीं भरत ज्ञधीस[४] गमे, घसा
वाळवी विरहीं; प्रभूत्तम ही न कां मग मेघसा? ९१
राम धावुनि भेटला भरतासि, जेंवि कळेवरा
प्राण; हे त्रिजगांत सेवकबंधुरीति कळे वरा.
पौर हृष्ट मयूर नाचति, राम हा वळला घन;
श्रीदें[५] होय वसंत तो प्रभु, भासलें पुरतें वन. ९२
भेटुनि स्वगुरुप्रधानजनांस मातृजना मग
यातुकीशप[६] भेटवी, भरतासि हृष्ट करी जग.
बंधुच्या हि निजा हि तो करवी जटा अजटा, कवी
वर्णिती कपिराक्षसां; कथि, रूप तो अज टाकवी. ९३
जीवसा प्रभु बंधु ते असुसे प्रवेश करी रसें;
शोभलें पुरतें महापुर तें महाढ्य शरीरसें.
जानकीसह वानराधिपदार फार चि शोभले,
पौरदार तयासि पाहुनि ते हि त्यांस हि लोभले. ९४
राजवेषविराजित प्लवग द्विपावरी साजले;

१. यमुना. २. गंगा. ३. गुह. ४. ज्ञात्यांच्या बुद्धीस. ५. शोभाप्रद. ६. बिभीषण व सुग्रीव.

त्यांसि त्या परमोत्सवीं अवलोकितां नृप लाजले.
लाज[1] अक्षत पुष्पराशि पुरस्त्रिया बहु वर्षल्या
त्यांपरीस सुरस्त्रिया अतिभाग्य वर्णिति हर्षल्या. ९५
कीश पाठविले महीं सकळा[2]ब्धिपंचनदीशतें
प्रार्थुनि द्रुत तीर्थ आणिति, दे गुरूसि[3] तदीश[4] तें.
श्रीवरीं अभिषेक होय, महोत्सवें कविराज तें
वर्णिति, श्रुतिवृंद पुष्कळ यां[5]विना न विराजतें. ९६
अमरगायक गाति नाचति अप्सरा हि न राहुनीं;
अधिक भाग्य न जिष्णुचें पुरं[6] पामरा हि नराहुनीं;
विविधवाद्यरवस्तव प्रवरर्षि आदरिती महीं[7],
रघुपुरी किति दे उरों नच साधुवाद रिती मही. ९७
मुकुट सन्मणिहार पाठवि शतमख प्रभु आदरी;
करि रित्या चिर मेरुच्या बहुमत महोत्सव हा दरी;
कनकरत्नरथाश्ववारण अमित गोधन देववी,
प्रभुवर स्वकरें कपींस हि विविध भूषण लेववी. ९८
मारुतीस अमूल्य मौक्तिकहार दे महिजा सती;
गौरवी कारि धन्य धन्य जगत्रयीं निजदास ती;
प्रेम फार मरुत्सुतीं प्रभु अंगदीं हि करी; मुलें
तींवि भूषवि; अर्क दे, गणि नाकसत्तरुचीं फुलें. ९९
जांबवान् सुगळ प्लवंगप सर्व यूथप यातुप
श्रीश पूजि, तयांसि जे स्वचरित्रभोजन या तुप[9].
रामराज्य तसें जगांत न भूतपूर्व, न भावि कीं,
नित्य तें चि अभाविकीं कविगीत, जें सुख भाविकीं. १००
ज्यांत न मशक दंश[10] मत्कुण मक्षिका न उवा पिसा;

१. लाह्या. २. सर्व समुद्र व पंचमहानद्या यांकडे. ३. वसिष्ठ—**पंत.** ४. सुग्रीव—**पंत.** ५. रामाभिषेकावांचून—**पंत.** ६. अयोध्येंतील अगदीं हलक्या पुरुषापेक्षां. ७. आनंदी. ८. मांडी. ९. अन्वयार्थ? १०. डांस.

मद्यप न खळ चोर जार, न खेळता न जुवा पिसा.
व्याघ्र वृक पवनाश वृश्चिक रोग आधि जरा जन
नेणति च, सकळ प्रजा सधना महोदयभाजन. १०१
काम कोप हि सा, असे परमोग्र जे सहजारि ते
सर्व ही पडले च सोडुनि दुर्गुणा सहजा रिते.
आळ घेउनियां, कधीं हि न बाळ ही कळहा निघे.
रामराज्यपदांत केवळ वासनाबळ हानि घे. १०२
होय विप्रशिशु व्यसु प्रभु त्यासि सत्वर वांचवी;
सांचवी यश गोड तें, कविमानसें बहु लांचवी.
तीन कोटि [२]अमर्त्यगायक मारिले भरतें रणीं.
लक्ष्मणानुज [३]तार्क्ष्य होय, करी खळा लवणा फणी. १०३
दोन दोन कुमार त्या चवघांस होउनि शोभले;
तातसे चि यशें महाकवि तद्गुणा बहु लोभले.
श्रीकरें अभिषेचिले विधिनें स्वनंदन अष्ट ते;
भूभरें जरि शिक्षिले नसते, स्वयें तरि कष्टते. १०४
आदिकविवरशिष्य कुशलव रामसुत गुणशे[४]वधी
तातसुचरितगानरतमति रंजविति मुनिदेवधी.
श्रीश करि हयमेध; निजसुतगीत निजयश आपण
स्वाप्तजनसह पी; करवि न पुरे रसिकपति हा पण. १०५
त्रि[५]जगदघहरपरमसुखकरचरित रघुवर वरद या
स्तविति; सुरमुनि म्हणति करि असि पशुहिवरि नच पर दया.
अजितगुणयश सकळनतजनिमरणजलधिसि सुकविते;
अमरतरुहुनि अधिक शतगुण फळद बहुमत सुकवितें. १०६
सर्वभक्तमयूरहर्षदराममेघमहोदया
हेतु या प्रभुची च हो, दुसरी कदापि न हो दया.

---

१. वेडा. २. गंधर्व. ३. गरुड. ४. सांठा. ५. शशिकला वृत्त.

पुष्पसें 'विबुधप्रिया'ख्य चरित्र हें शुचि पाहिलें;
वंदुनि प्रभुच्या पदांवरि मस्तकासह वाहिलें. १०७

इति श्रीरामनंदनमयूरविरचितं विबुधप्रियं रामायणं संपूर्णं ।

# सवयारामायण

( मदिरावृत्त )

## बालकांड

श्रीपतितें विधि, 'रावणपीडितविश्वसुखार्थ,' म्हणे, 'नरसा हो.
वृद्ध, अपुत्र, न आधि सदा, 'दश'पूर्व'रथा'भिध भूवर, साहो.
कश्यप तेंवि, पितृत्व तुझें, रविवंशज हा शुचि सुव्रत लाहो.
या परमाश्वमखें[1] यजितां तुज, यावरि दुःख न लेश हि राहो.' १
विष्णु, 'अवश्य' म्हणे; अनलार्पित[2] पायस, जें करि कारण याला,
प्राशिति त्या नृपदार यथाविधि, तद्विमळा उदराप्रति आला.
राम दुजा भरताभिध, लक्ष्मण पुत्र अरिघ्न, चतुर्वपु झाला.
पाहुनि च्यार कुमार गुणाकर, तो अजनंदन फार चि धाला. २
ते, गुरुनें करुनि प्रथम द्विज सद्गुणमंडित पंडित केले.
गाधिसुतें मग लक्ष्मण राघव यागसमाप्तिस मागुनि नेले.
पावुनि अस्त्ररहस्य, पथीं हतताटक, हर्षित होउनि गेले.
तद्विशिखप्रकरें मखपीडक दारुण दुर्मद राक्षस मेले. ३
त्यावरि तो मिथिलेसि महामुनि जाय, पथीं प्रभु गौतमजाया
उद्धरि, पादसरोजरजें; बहु जी श्रमवी मन, ती हरि माया.
त्र्यंबककार्मुकभंग करी क्षितिजाजनकाधि लयाप्रति जाया.
कांड हि केवळ होय थिटें, अमित प्रभुचें भुजसद्यश माया. ४
श्रीजनक क्षितिपाळक, सत्वर आणवि पंक्तिरथा अतिधन्या.
तत्तनुजां चवघांस हि तो अनुजासह, दे, चवघी निजकन्या;

---

१. मोठ्या अश्वमेध यज्ञानें. २. अग्नीनें अर्पण केलेलें.

ग्रामगजा अवलोकुनि, ये बहु कोप जसा परदुःसह वन्या,
  क्रोध करी भृगुराम तसा नच तो वळता प्रभुवांचुनि अन्या. ५
भार्गवराम पराभविल्यावरि पंक्तिरथ स्वपुराप्रति पावे;
  पौर असें वदले, 'न सुरद्रुम रामभुजाधिक हे गुरु गावे.'
मातुळ ने स्वपुरा भरताप्रति, दे अनुमोदन भूपति पावे.
  हे प्रभुचे परमाद्भुत सद्गुण सोडुनि, अन्य न मंत्र जपावे. ६

## अयोध्याकांड

भूप म्हणे, 'नयधर्मविशारद राम उद्यां युवराज करावा.'
  मंथरिका मतिभेद करी, गणि केकयजा प्रभुतें हि पैरावा[1].
दे[2]यें वरद्वय मागुनि घे, 'वनवास चतुर्दशवर्ष वरावा
  ज्येष्ठसुतें, भरतें अभिषेक; न याविपर्यी हठ लेश धरावा.' १
तीस म्हणे नृप, 'राज्य दिलें, तव पुत्र करो क्षितिच्या अवनातें.
  माग दुजा वर, देवि! दया कर, पाठिव राम हठें न वनातें.'
काकुलती करि फार; परंतु न लेश वळे पतिला, 'भवनातें
  सोडुनि आजि च जावु,' असें विषसें वदली; न गणी लव नातें. २
जाणुनियां जननीप्रिय, सत्य चळों चि न दे तिळ ही जनकाचें.
  नेसुनि वल्कल, बंधुवधूसह सोडुनि धाम महाकनकाचें,
तीस, सदार पित्यासि, नमूनि, पुसोनि निघे, न करी मन काचें.
  पायिं च जाय, रथीं बसलें मग तातवचें, धन तें सनकाचें. ३
'हाय!' म्हणे रै[3]घुराय, रडे बहु, शीघ्र भजे महिषीनिलयातें.
  राजवरें निघणें वारिलें लघु, जेंवि करें भुजगीबिलयातें.
'चित्र'पदोत्तर'कूट' नगा प्रभु जाय, नरोत्तम ही विलयातें.
  त्या भरत द्रुत ये, जळ दे, पद घे न; कसें सुख दाविल या तें? ४
सर्वगुरुप्रमुखस्वजनासह रामपदाप्रति वंदुनि, भावें
  साश्रु कथी पितृमृत्यु; म्हणे प्रभु, 'हाय!' जया यतिनीं बहु गावें.
पिंड तिलोदक दे, पितृतर्पण तो करि, सादर घेउनि नावें.

---

१. परका. २. वाक्याचे होते ते. ३. दशरथ.

पाय धरी, विनवी, भरत, 'स्वपुरास तुवां वन सोडुनि यावें.' ५
राम म्हणे, 'त्यज आग्रह; येइन, वर्ष वनीं सरतां चवदावें.
देवेंवनें वसतींत जसी, तसि दाखविजेल मला चव, दावें.
बा! स्वगुरूक्त यशस्कर, केवळ वेद; तदून कदा न वदावें.
प्रेम तुझें बरवें दृढ; हें मज गायिस होय सदा नव दावें.' ६
सत्य महाव्रततत्पर जाणुनि, तो प्रभुतें वृतपादुक वंदी.
'होमिन देह,' म्हणे, 'ज्वलनीं, टळतां अवधि क्षण, होउनि बंदी.'
केकयजासुत साधु निघे, यश साधुनि घे, परते मग नंदी-
ग्रामिं वसे अतिखिन्न, जसा शिवपादसरोजवियोजित नंदी. ७
केवळ सन्निध तो गिरि, यास्तव आश्रय त्यासि करूनि न राहे;
राक्षसपीडितभसुररक्षण, हें हि मनीं जगदीश्वर पाहे.
सानुज सांगन तेथुनि जावुनि, राघव अत्रिपदीं शिर वाहे.
भूमिसुता मुनिदारकृताद्भुत देहसुखप्रद सत्कृति लाहे. ८

## अरण्यकांड

शापविमुक्त करी प्रभु, मारुनि दंडकनामवनस्थविराधा;
तो सकळा हि म्हणे, 'क्षण अर्पुनि या सुयशांत मन, स्थविरा धा.'
हर्षवि ते शरभंग सुतीक्ष्ण घटोद्भव, वारुनि संसृतिबाधा,
दे परमाभय कीं, स्थिर होउनि, जोडुनि सत्तप, सद्गति साधा. १
गृध्रवरा निजतातसखा प्रभु भेटुनि, पंचवटींत विशाला,
सांगुनियां अनुजा मनुजाधिप तो, करवी बरवी दलशाला.
शूर्पणखाश्रुतिनासिक कापवि; तापवि त्या हि खरास शशाला
सिंह तसा वधि सैनिक; एक न वांचवि, सांचवि भव्ययशाला. २
पाहुनि ती भगिनीकुदशा, खळ रावण दुर्मद फार चि कोपे,
पाठवि हेमकुरंग निशाचर; पाहुनि त्या महिजामति लोपे.
'द्या चि धरूनि' म्हणे; प्रभु पाठिस लागुनि, संहरि, कीं नच थोपे.
तो मरतां, प्रभुसा चि करि ध्वनि, ज्यास असे छळ केवळ सोपे. ३

---

१. पर्जन्योदकानें. २. अग्नीनें. ३. वरिल्या आहेत पादुका ज्यानें. ४. वृद्ध. ५. कपटें.

आर्तरवें कुशलेतर मानुनि, देवर, दुर्वच बोलुनि, सीता
तीं दवडी उटजांतुनि, कोपुनि, होवुनि पत्यसुसंकटभीता.
तों यतिरूप दशानन ये, हरि कांपलि सांपडली अति शीता.
'हा!' वदली, कदली वनवह्निस, कीं गुरुवेदपथारिस गीता. ४
त्यास जटायु करी विरथ, क्षण सोडवि सून रणीं, पण रक्षी.
श्रीस पुन्हा हरि रावण, पक्षति तोडुनि, पाडुनि मूर्छित पक्षी.
ती नग टाकि, तयांत चि, जें गिरिच्या शिखरीं, कपिपंचक, लक्षी.
ठेवि अशोकवनीं स्वपुरीं तिस, ती फळ कीं जळ लेश न भक्षी. ५
त्या हरिणासि वधूनि, फिरे प्रभु, तों करि वंदन लक्ष्मण वाटे.
ऐकुनि वृत्त, शिवादिरव, क्षति जाहलि हें प्रभुबुद्धिस वाटे.
धावुनि ये, तव शून्य दिसे गृह, 'हाय!' म्हणे, विरहें उर फाटे.
रामविलापभरें वनदैवतपक्षिमृगोरगकंठ हि दाटे. ६
शोध वनीं करितां अवलोकुनि केवळ मूर्छित तातसखातें,
'हाय!' म्हणे; हरि तत्तम सानुज शीतजळें निजवल्कलवातें.
त्या क्षतहेतु पुसे; कथि रावणकृत्य वधूहरणादिक, यातें,
प्राण मग त्यजि; राम वदे, 'मरणद्वय हें मम बुद्धिस खातें.' ७
राम तदुत्तरकार्य करी, मृगमांस खगांप्रति वाढुनि हातें.
धुंडित जाय वनीं दयिता, हरिणां करि साश्रु म्हणे बहु 'हा!' तें.
योजनबाहु कबंध धरी; प्रभु हर्षवि फार चि तन्मय घातें.
तो कथि, 'कार्य सुकंठ करील चि.' ये सुविमान तया अनघातें. ८
फार बरी शबरीमति जाणुनि, तीवरि देव करी अनुकंपा;
होमुनि देह, विमानवरीं बहु शोभलि बैसुनि ती, जसि शंपा.
तेथुनि जावुनियां अनुजासह त्या प्रभुनें अवलोकिलि पंपा;
श्री अतुळा तिचि रामधृतिस्मृतिशक्ति, तयांसि म्हणे क्षण 'संपा.' ९

---

१. धोका. २. पिसाची मूळें. ३. नाश. ४. त्यांची मूर्च्छा. ५. दशरथ व जटायु यांचीं मरणें. ६. स्त्री ( सीता ).

## किष्किंधाकांड

श्रीविरहाग्निस लक्ष्मण वारिद होय; तयावरि मारुति रामा
भेटुनि, भेटवि त्या सुगळा, नग दाखवि, जे त्यजि सन्मति रामा.
'हाय!' म्हणे रघुराय, सखा पुसि अश्रु, करूनि परोपरि सामा.
कीशप वैरनिदान पुसे, भज तो कथि, ये प्रथम प्रभुकामा. १
त्या सुगळा कपिराज्यपदीं प्रभु बैसवि, तत्क्षण मारुनि वाळी.
मेळवि तो बहुकोटि महाकपि ऋक्ष, सुरांश, पण प्रतिपाळी.
त्यांसि कथी, 'हुडका महिजा.' कपि पाठवि, अंशु जसा करमाळी[1].
अंगद मारुति दक्षिण शोधुनि, ओपिति दिग्वदना बहु गाळी. २
स्वामिकृतावधिमास विलंघुनि अक्षम दंड भवास तराया,
सिंधुतटस्थ महेंद्रनगीं कपि बैसति शोकनिमग्न मराया.
गृध्र जटायु तदग्रज तो कथि शोध न संशय यांत धराया.
सांगुनि[2]दाहनिशाकर सन्मुनिवाक्य, उडे हरि[*] हृष्ट कराया. ३

## सुंदरकांड

ऋक्षपतिस्तुत मारुति, पक्षिप तेंवि उडे; हिमवत्सुत[3] पाडी;
लाजवि त्या, सुरसेस हि, सावलि जी धरि, तीस हि तो पटु नाडी.
गोष्पदसा शतयोजन सागर लंघुनि शत्रुपुरी मद झाडी.
शोधुनि सर्व गृहें विरमे, मग त्यासि अशोकवनीं मति धाडी. १
रात्रि तरूपरि बैसुनि तो अवलोकि, धरातनयाश्रुति शूद्रा.
त्या कुमतोपगता[4] हि, सतीकृतदुर्मतिधिकृति मानलि रुद्रा.
दिग्वदनापगमावरि[5], वर्णुनि राजसुता, गुणरत्नसमुद्रा,
संशयलेश मनीं नुरवी, प्रणतिस्तुतिपूर्वक दे तिस मुद्रा. २
वृत्त अशेष हि सांगुनि ऐकुनि, खूण शिरोमणि घेउनि, तोषें
दिव्य अशोकवनद्रुम मोडुनि, सर्व दिगंतर तो भरि घोषें.
कोट्यधिक क्षणदाचर, रावणनंदन अक्ष हि, मारुनि रोषें,

---

१. सूर्य. २. आपले पंख जळाल्याची हकीकत व चंद्रमामुनीचें आशीर्वाक्य. ३. मैनाक ४. दुर्बुद्धि प्राप्त ज्याला अशा हि रावणा. ५. रावण गेल्यावर. * खो.पा.—कपि.

होय बळें घननादमहास्त्रनिबद्ध रणीं, नच मारुति दोषें. ३
तो दशकंठसभेप्रति बांधुनि नेउनि, बोलविला बहु वक्ता.
स्पष्ट तया कळवी, सकळक्षय हें फळ केवळ उत्पथसक्ता[1].
पेटवि तैलपटावृत पुच्छ. न शक्त असें खळ मानुनि शक्ता,
त्या, 'फिरवा स्वपुरांत,' म्हणे, अपमान करूनि, महाप्रभुभक्ता. ४
चालविला कपिवीर जिहीं, गुरु पुच्छ करूनि, तया बहु घोळी.
जी अतिभव्य पुरी मणिकांचनभासुरदीप्ति, तिची करि होळी.
रावण, मेघरव, क्षणदाचर सर्व हि, 'हाय!' म्हणे, कर चोळी.
'हा!' वदल्या खचरी, जळतां गृह; त्याहुनि ही लुगडें, कच, चोळी.
पुच्छ समुद्रजळीं विझवी; महिजाचरणाब्ज नमूनि उडाला.
वेष्टिति वृत्तरसार्थ[2] तया कपिवीर, पिपीलिक जेंवि गुडाला.
ते लुटिती 'मधु'पूर्व'वनीं' मधु मोडिति त्या दधिवक्त्रकुडाला.
ऐकुनि शासनलंघन, जाणुनि सिद्धि, सुकंठ सुखांत बुडाला. ६
जांबवदंगदनीळनळानिळनंदन गर्जत हर्षित आले.
कीशप, लक्ष्मण दाशरथिप्रभु यांसि महामति ते नत झाले.
वातसुतार्पित दिव्यशिरोमणि पाहुनि, राघवपक्ष्मं[3] न हाले.
दे परिरंभ[4] मरुत्तनया विभु, तें वदतां यश, जीभ न चाले. ७
राम म्हणे, 'रघुराजकुळोपरि बा! रचिला उपकार महा; या
प्राण दिले; करिसील असें बहु यावरि तूं जरि साधुसहाया!
प्रत्युपकृत्यसमर्थ चि मीं, तव नित्य ऋणी न पदार्थ वहाया.
योग्य दिसे मज, इच्छितसें स्वमनीं अधमर्ण[5] असें चि रहाया.' ८

## युद्धकांड

राम निघे दशकंठवधार्थ, विलोकुनियां विजयप्रद लग्न;
स्यंदन मारुतितें करि, लक्ष्मण वालिसुता, द्रुहिणा[6] महमग्न.
ऋक्ष, कपीश्वर, गर्जति कल्पमहाघनसे, करिती नग भग्न.

---

१. आडवाटेनें जाणाऱ्यास. २. बातमी ऐकण्याच्या उत्कंठेनें. ३. डोळ्याचें पातें.
४. आलिंगन. ५. ऋणको. ६. ब्रह्मदेवाला.

प्रेक्षिति कौतुक ते हि महामुनि, जे तनुभानविवर्जित नम्र. १
सिंधुतटीं उतरे प्रभु, तों शरणागत साधु बिभीषण, शंका
सोडुनि, जोडुनि हस्त, म्हणे, 'नमितों, अभयप्रद हो मज रंका.'
बंधुकरें करवी अभिषेक, नमस्कृतिचें फळ देवुनि लंका.
जे भवतप्त, तयां निववी, असि सं[1]स्तुत कीर्ति करी अकलंका. २
प्रेरुनि, सिंधुमतें, नळ वानर, राघव सेतु रची शतगावें.
होउनि हृष्ट, मनांत म्हणे, 'यश हें चिरकाल,' शचीश 'तगावें.'
श्रीशचरित्र चि, दे[2]त्तहृतावनिजारिवधूकुचकुंकुम, गावें.
पावुनि मानसशुद्धि सुखें, निजतत्व जडें हि जनें उमगावें.' ३
सेतुपथें उतरोनि पयोधिस, रुष्ट सुकंठ पडे दशतुंडीं;
राम मनीं धरुनि प्रतिबंधक सन्माणि जेंवि करीं शिखिकुंडीं.
छत्र किरीट हि पाडुनि ताडुनि, लेश हि तो नुरवी मद पुंडी,
त्यासि म्हणे, 'तुज निर्भय आश्रय राम चि, अन्य नसे जग धुंडीं.' ४
पाठविला प्रभुनें मग अंगद तो परभंगद राक्षसपाळा,
धर्मनयज्ञ, महाजनसंमत बोध करी सुरगोद्विजकाळा.
त्या न रुचे, विगतायुस ओखद तेंवि, बळें धरवी; परि टाळा
दे[3]वुनि जाय, म्हणे प्रभु, 'हूं! खळ सर्व वधा चि, न एक हि गाळा. ५
राक्षस वानर वीर महाबळ, वृक्षशिळाशिखरायुध, युद्ध
क्रोधभरें करिती परमाद्भुत, होति रणांत न कोणि हि रुद्ध.
प्राण तृणासम मानुनि सोडिती, जोडिति सत्प्रिय ते यश शुद्ध.
प्रेक्षक सर्व हि हारविती तनुभान, महर्षि सुरर्षि हि बुद्ध. ६
रात्रिरणीं घननाद करी अहिपाशनिबद्ध सहानुज रामा,
दाविति ते [4]सुमकस्थ सतीस खळप्रहि[5]तादयराक्षसवामा.
दे त्रिजटा धृति तीस, म्हणे 'उगि; सासु चि हे, व्यय लेश न धामा.'
त्या परमव्यसनीं, प्रियबंधु तसा, बहु ये खगनायक कामा. ७

---

१. साधुस्तुत. २. दिलें आहे रावणवधूकुचकुंकुम ज्यानें. (अवनिजारि=सीता-शत्रु). ३. रावण. ४. पुष्पकविमानस्थ. ५. रावणानें पाठविलेल्या निर्दय राक्षसस्त्रिया.

सैन्यपतिप्रमुखस्वभटक्षय ऐकुनि, रावण आपण भांडे;
कीशवरादि असृक्[1] स्रवले, कृतरंध्र जसे भरले जळहांडे.
लक्ष्मणवक्ष करी क्षत शक्ति, म्हणे तिस भू, 'परती सर रांडे!'
दे पथ भग्न करूनि तया; प्रभु भानुपुढें परतेज न मांडे. ८
जागवित्या प्रबळा कटका घटकर्ण दिनद्वय कष्टवि, जागे,
येउनि कीश बळीं, गहनीं दव जेंवि तसा, परदुःसह वागे.
वाल्यनुजा धरि, तो हरि नासिककर्ण, फिरे, कपि भक्षुं चि लागे;
त्या भुजपादशिरांप्रति खंडुनि लोळवितां, प्रभु लेश न भागे. ९
शोक करी दशकंठ, तयाप्रति तत्तनुज त्रिशिरा समजावी.
जाय सुरांतक आणि नरांतक; तो अतिकाय हि दोर्बळ[2] दावी.
त्यांसि महाबळ अंगद, मारुति, लक्ष्मण, नीळ समासिस लावी.
'हाय!' दशास्य म्हणे, 'मम संतति हे पविनें हि लयासि न जावी.'
ब्राह्मबळें घननाद पुन्हां कपिसैन्य, सलक्ष्मण राम हि, ताडी.
अद्रिगुहानन[3] कोटि वलीमुख[4] वीर करी इषुनीं व्यसु पाडी.
प्रार्थुनि वातसुताप्रति, ऋक्षप सांगुनि ओषधिपर्वत धाडी.
पर्वतशृंग चि घेउनि ये, सकळार्तिस ओषधिगंध चि झाडी.
ओषधिपर्वतशृंग पुन्हां पवनात्मज तें स्वपदाप्रति पावी.
शक्ति जसी अतुळा प्रभुची, तसि मारुतिची हि, यथामति गावी.
होय विशल्य, ससैन्य सहानुज, जो त्रिजगा प्रभुसत्तम या वी,
तो बहु पावुनि हर्ष, म्हणे, 'न जरा तुझिया सुयशा तुज यावी.' १२
कोपुनि वानरराज, म्हणे, 'भटहो! अरिचें उरलें पुर जाळा.'
पेटविलें, गमलें सुबुभुक्षुपुढें द्रुत ओगरिला गुरु थाळा.
आरडती रडती खचरी बहु, आकुळ होवुनि ताडिति भाळा,
तो शतयोजन जाय महाध्वनि; होय सुगान चि निर्जरपाळा. १३
दाहभयें पडले बहु बाहिर, त्या कपिनीं वधिले अरि सारे.
त्यांसि म्हणे हरिराज, 'असाल खळाश्रित जे जड, ते परिसा रे!

---

१. रक्त. २. बाहुबल. ३. पर्वताच्या गुहेसारखें पसरट तोंड ज्यांचे. ४. वानर.

सर्व असे चि मराल, अधार्मिक निर्दय दुर्जन, भीति न वारे.
पक्षिमहीपतिपासुनि[1] माजुनि, वांचतिल क्षण काय विखारे[2]? १५
कुंभ, निकुंभ, घटश्रुतिचे सुत पाठविले समरा बळशाली;
काळमुखीं पहिल्यास कपीश्वर, मारुति त्या दुसऱ्या मग घाली.
जो मकराक्ष खरात्मज, त्या, प्रभुपासुनि अंत्यदशा बरि आली.
ब्राह्ममहास्त्र पुन्हां प्रकटी; परि रावणिधीस विटे धृतिआली. १६
स्वस्थमनें विषयांत चि हर्षित होउनि, राक्षसदेव रमाया,
सर्वबळासह कीशवरा, प्रभुच्या अनुजा हि रणीं वरमाया[3].
होमजदिव्यरथासिस इच्छुनि हे स्वजयार्थ करी पर माया;
भूमिसुता वधि रावणि, जो विभु 'हा!' म्हणवी, रडवी परमा या. १७
यापरि मोहुनि, जेथ निकुंभिल दैवत, तें स्थळ रावणि पावे;
होम करीत बसे, रथयुक्त जयांतुनि दिव्य तुरंगम यावे.
भक्त बिभीषण तें कळवी; परकृत्रिमयोग[4] तयास चि ठावे.
नेउनि लक्ष्मण, मारवि त्या. सुख शक्रमनीं, न जगीं यश मावे. १७
नंदनशोकसमाकुल रावण, घेउनि खड्ग, महीजनिघाता[5]
जाय अशोकवनीं; अवलोकुनि आठवि राम मनीं क्षितिमार्ता[6].
साधु सुपार्श्व करी हितबोध; बळें फिरवी जलदध्वनिताता;
दाशरथिक्षयकाम, पुन्हां, बळ पुष्कळ पाठवि, संगरपाता. १८
तें बहुकोटि निशाचरसैन्य मुहूर्तयुगें करि भस्म, न भागे
राम; म्हणे, 'मदिषूंत चि, कीं त्रिपुरारिशरांत चि, हें बळ जागे.'
पाहुनियां परमाद्भुत तेज, विभुस्तवनास अशेष हि लागे
स्वर्गणिका, म्हणती, 'सखिहो! अतिदुर्लभ वीरसमागम, या गे!!'
शोक हि,-कोप हि, चित्त हरी; मग तो दशकंधर घे बळ भारी;
राक्षस वीर सुकंठ वधी बहु; रावण, मर्दुनि वानर सारी.
व्याकुळ मेघरवारिस[7] ही करि, तद्विशिखांसि रघूत्तम वारी;

---

१. गरुडापासून. २. सर्प. ३. खिन्न होण्यास. ४. शत्रूचे कपटप्रयोग. ५. सीतावधार्थ. ६. सीता. ७. लक्ष्मणास.

युद्ध नवें करिति प्रभु रावण वीर महाशरकार्मुकधारी. २०
लक्ष्मण दिग्वदनध्वजकार्मुकसारथिमस्तक खंडुनि पाडी.
तत्तुरगांसि गदीश बिभीषण धावुनि, जेवि मृगां हारि, ताडी;
बंधुवधा दशकंधर शक्तिस, कोपविली उरगी तसि, धाडी;
तोडुनि तीस महाबळ लक्ष्मण, त्या आरिचा मद मान हि झाडी. २१
रावण शक्ति धरी दुसरी, प्रभु बंधुसख्याप्रति घालुनि मागें,
होय पुढें; तदुरीं, अशनी तसि, ती अरिनें लघु पाडिलि रागें.
ओढुनि काढुनि शक्तिस भंगुनि, कोपुनियां प्रभु त्या परमागें
भग्न करी, पळवी; धरिली धृति काय जि! पक्षिप पाहुनि नागें? २२
बंधुसि मूर्छित पाहुनि, राघव साश्रु वदे, 'जरि लक्ष्मण मेला,
याविण वांचुनि काय मला सुख? दीप टिके चि न सोडुनि तेला.'
'ओषधि आण,' सुषेण म्हणे; प्रभुतें नमुनि द्रुत मारुति गेला;
शृंग चि घेउनि ये, कुशळें रघुवीर यथास्थित सावध केला. २३
युद्ध पुन्हां करिती रघुराक्षसवीर; रथ स्व तदा पविपाणी
पाठवि; सत्वर तो रणचत्वर[1] शोभवि, मातलि सारथि आणी;
त्यावरि मानद राम चढे, बहु मानुनि अग्रजवासववाणी;
द्वैरथ संगर पाहुनि, होय शिवप्रभुची, क्षण, चित्र चि राणी. २४
पाहुनि मूर्छित रावण, तद्रथ काढियला समरांतुनि सूतें;
सावध होउनि, नेवविला प्रभुसंनिध तो पलभुक्पुरुहूतें[2].
कुंभज मंत्र कथी; रवि दे वर; तैं म्हणती 'जय!' सर्व हि भूतें.
होय, नरेंद्रकृतारिशिरःशतखंडनमंडन[3], कंपद भूतें. २५
जें उडवी शर हाणुनि, तें रघुनाथ तसें चि नवें शिर, पाहे.
शस्त्रमहास्त्रविपर्यय[4] मानुनि, भानुनिभ प्रभु काळजि वाहे.
मातलि सूचवि, 'जो विधिनिर्मित कुंभजदत्त महाशुग आहे,
तो सतदस्त्र[5] परोर विदारिल; न क्षण भानुपुढें तम राहे.' २६

---

१. रणांगण. २. राक्षसेंद्रें. ३. रामानें रावणाचीं शेंकडों शिरें तोडणें व तीं लगेंच पुनः जडणें. ४. विपरीत परिणाम. ५. ब्रह्मदेवनिर्मित वाण ब्रह्मास्त्रानें च अभिमंत्रून.

श्रीरघुवीर, चतुर्मुखनिर्मित वैष्णवचापगुणीं शर जोडी,
ब्राह्मजपें अभिमंत्रुनि ओढुनि त्यासि निजश्रवणावधि, सोडी.
तो पविसा चि कठोर, शिळातळसें अरिचें दृढ ही उर फोडी,
तेंवि पडे उलथोनि, जसा तरु, ज्यामति चंड समीरण झोडी. २७
वृत्र तसा, पडतां व्यसु रावण, राक्षस होउनि भीत, गळाले,
'हाय!' असें म्हणत, भ्रमुनि स्वपुराचिकडे, हतशेष पळाले.
सांपडले, कपिसैन्यदवाग्निस ते खळटोळ समस्त जळाले.
शक्र, चतुर्मुख, शंभु म्हणे, 'जय देव! रमास्यसहस्रदळाले![1]' २८
वृष्टि सुरद्रुमपुष्पमयी बहु होय तदा, सुरदुंदुभि वाजे,
स्वर्गणिकाशतनृत्यसुगायकगीतसुवाद्यरवें नभ गाजे,
मंद सुगंध हिम प्रसरे सुखवायु, सभं[2] ग्रहमंडळ, साजे,
श्रीरघुराजयशासि हिमाचळ, दुग्धसमुद्र, सुधाकर लाजे. २९
सांत्वुनि रावणदार, विचार कथूनि, तयांसि करी सुख सस्तें;
त्या अरिचें हि, बरें करवि प्रभु, उत्तरकार्य, बिभीषणहस्तें;
देववि देयविशेष[3] दयार्णव, जीं विधिनें कथिलीं बहुशस्तें[4].
त्यावरि, सद्विधिनें वरिला अभिषेक, तया शरणागतमस्तें[5]. ३०
मारुतितें रघुवीर म्हणे, 'पुस यातुपतीस; मग प्रिय तीतें
सांग; पुसोनि तिचें मज ही द्रुत येउनि,' हें कथिलें मुनिगीतें.
जाय, नमी, कथि तो, अमृत श्रवणांत भरी, तृषिता शुभधी तें.
'देय नसे तुज योग्य,' असें वदली, नयनें अवलोकुनि शीतें. ३१
कीश म्हणे, "तववागमृतें मन हर्षविलें, नलगे धन कांहीं,
तूं वरदे! वर दे, 'खचरी वध' हा; चिर, दुःख दिलें तुज याहीं."
श्री वदली, 'असुखें, विषमाकृपकाळकृतें, घडणार चि बा! हीं.
या बटकी परवाग्वशगा, अघ यांजकडे तिळमात्र हि नाहीं.' ३२
वर्णुनि शील निरोप पुसे कपि; ती कथि सत्वर दर्शनकाम;

१. रमावदनकमलभृंगा! २. सनक्षत्र. ३. विशेष दानें. ४. फार प्रशस्त. ५. मस्तकें.

क्षिप्र पलाशपतिप्रति सांगुनि, आणवि भूजानितें प्रभु राम;
तीस म्हणे, 'अरि मारुनि सोडविलीस यशोर्थ चि; तूं परधाम
क्षोणिसुते! चिर सेवुनि होतिस; मान्य बुधा परभुक्त न दाम[1].' ३३
ती वदली, 'दहनीं शिरतां, जरि, हे शुचि मीं, तरि, हा[2] मज रक्षु;
जी उचिता शुचिता नसतां, असतां परकाम, हुताशन भक्षु.
निश्चळ भव्य सतीव्रत नित्य असेल तरि, प्रभुचें शुभ चक्षु,
प्रेम करूनि, वरूनि पुन्हां पहिल्यापरि, तापनिवारक लक्षु.' ३४
शंभुविधींद्रसमक्ष, सती करि दिव्य, कसीं उतरे सुरगीता;
बाळपणीं जनकोरुगता[3] तसि, जाहलि ती ज्वलनांत न भीता.
वाळलि माळ उटी न तिची, तनु होय हिमीं शिरतां तसि शीता.
तातनिदेश शिरीं धरुनि, प्रभु अंकपदावरि बैसवि सीता. ३५
जे मृत वानर ऋक्ष, तयां उठवी सुरनाथकृतामृतवृष्टि.
पुष्पकयान वरूनि निघे, निववी प्रभु, चंद्र तसा, जनदृष्टी;
दाखवि सेतु सतीस, कथी विरहार्तिविलाप, सुखें भरि सृष्टी.
हर्षवि फार गुहा, भरता, जसि भेटुनि वत्स सुखी करि गृष्टी[4]. ३६
वृद्ध अमात्य, सुधी भरतादिक बंधु, सखे, कपि, राक्षस, राजे,
त्यांसह, घेउनि वेष मनोहर, राम पुरीं शिरतां बहु साजे.
निर्जरगायकगानरवें, सुरवाद्यरवें हि, दिगंतर गाजे.
चंद्र चकोर, पयोधर चातक, ते प्रभु, या, करिते जन 'आ' जे. ३७
राज्यपदीं अभिषिक्त जगत्पति राम बसे, परमोत्सव तो कीं.
प्रेम करी प्रभु तेंवि जनीं बहु, जेंवि पिता चरमीं लघुतोकीं.
त्या युवराज करी भरता विभु, दुर्लभ जें विधिवासवलोकीं,
तें सुख नित्य म्हणे सकळा निजराष्ट्र पुरस्थजना अवलोकीं. ३८
'सच्चरित प्रभुचें चि सदा भरलें,' म्हणती 'तप' तापस 'रीतें.'
यांस चि भी भवताप, करी नच ज्या गुरुच्या, दवताप, सरीतें.

---

१. माला. २. अग्नि. ३. जनकाच्या मांडीवर बसलेली. ४. नुकतीच व्यालेली गाय. ५. खोडलेला पाठ—श्रीरघुराजकथेस चि भी भवताप, अशा दवताप सरीतें.

चातकपक्षिकुळ व्रत घेउनि, अन्य उपेक्षुनि आप, स[1]रीतें.
तेंवि इतें चि महाकविवृंद, दुजें यश सोडुनि, आ पसरीतें. ३९

## उत्तरकांड

दाशरथिप्रति दर्शन देउनि, पूजन घेउनि उत्तम, हर्षीं
होउनि, वर्णिति शक्रसुदुर्जयरावणमेघरवांत महर्षी.
त्यांसि म्हणे प्रभु, 'जें घडलें, तुमचें चि तपोबळ सन्मुनि हो! तें.
युष्मदनुग्रहकल्पनगीं यशपुष्प, जगत्प्रिय, जन्मुनि, होतें. १
दुर्जय राक्षसराज, सुदुर्जय रावणि, तद्वधदु्ष्कर भूतें,
ज्यां सभयें अवलोकुनि, जीं रचिलीं ह[2]रिनाभिजपुष्करभूतें.'
ऐकुनि तज्जनोक्त असें, प्रभु तत्प्रभवादि पुसे घटजा; तें
तो कथि सर्व सविस्तर त्या, मृदु[3] सेज स[3]हस्रमहाफट ज्यांतें. २
ब्रह्मतनूज पुलस्त्यमहामुनि, तत्तनयाह्वय वि[4]श्र स[4]वा हें;
तत्सुत वैश्रवणाख्य सुधी, स्वमनासि म्हणे, 'विषयांत न वाहें.'
स्त्री दुसरी खचरी, तिस दिङ्मुख पुत्र, दुजा घटकर्ण हि, रामा
शूर्पणखा तिसरी तनया, चवथा सुत साधु बिभीषण रामा! ३
विष्णुपराजित पूर्वनिशाचर सोडिति जीप्रति, ती अकलंका,
वैश्रवणा दिधली जनकें, चतुराननसंमत पावुनि, लंका.
तींत वसे, स्वपुरींत जसा सुरनायक. तातपदांसि नमाया
ये, सुसभाग्य धृ[5]तेर्ष्य दशानन होय विलोकुनि शक्रसमा या. ४
फार तपोनि, शिरें नव होमुनि, तो मुनिभू वर दुर्लभ साधी;
वर्जुनियां नर वानर, होय अवध्य, करी सुर सर्व हि साधी.
[6]स्वाप वरी घटकर्ण; तसें वदवी भ्रमवी त्रिदशस्तुत व[7]ाणी.
ब्रा[8]ह्म अशिक्षित. धर्मरती वरि साधु बिभीषण जोडुनि पाणी. ५
त्यास विधि द्रवला वदला, 'दिधलें त्वदभीष्ट चिरायु हि हो,' हें.

---

१. पावसाच्या सरीला. २. विष्णुनाभिकमलोत्पन्न ब्रह्मा त्यानें. ३. शेषशायी रामाला. ४. विश्रवा. ५. धरिली आहे अट ज्यानें असा; इरेस पडलेला. ६. निद्रा. ७. सरस्वती. ८. ब्रह्मास्त्र.

अग्रजकांचनदुर्ग हरी वरदुर्मद तो दशकंधर मोहें.
वैश्रवणास करी चतुरानन उत्तरदिक्पति, पुष्पकगामी
तो अलकाख्य पुरी रचि. शंभु म्हणे 'चिरकाळ सखा तव हा मीं.' ६
धर्म नय त्यजुनि, क्षणदाचरराज जगास करी बहु पीडा.
अग्रज दूतमुखें कळवी हित, त्या खचरा [1]मदवायसनीडा,
'बा! अनिषिद्धसुखें चि, भयप्रद होउनि साधुजना न, परा धा.
मीं तरलों, मिळता न कधीं मज शंभु सखा, करितां अपराधा.' ७
कोपुनि सांगुनि यातुजना, फळ तेंवि दशानन खाववि दूता,
जाउनियां अलकेप्रति, तो करि भग्न रणीं वाढिला अतिपूता;
पुष्पकनाम विमान हरी, [2]प्रभुकेलिवनाप्रति लंघुनि जातां,
कुंठित होय; म्हणे खळ, 'काय उपाय किजे गतिकारक आतां?' ८
तों प्रकटे कपिवक्त्र महेश्वरभक्त, तसा चि महाबळ नंदी;
तो वदला, 'प्रभुकेलिवन प्रभुसें चि अलंघ्य.' न या जड वंदी;
मत्त करी उपहास. तया कुजना शिवसेवक कोपुनि शापी
कीं, 'कपि होतिल काळ तसे तुज, 'हा!' म्हणसील चि तूं अतिपापी.'
बाहुगिरीश गिरीशतळीं दशकंधर घालि बळें उखळाया.
भी गिरिजा, [3]प्रभुराजपदांगुलिनाथभरें रडवी सुखळा या.
एकसहस्र समा श्रमला, मग मुक्त करी शिव या, स्तवनार्हीं,
रावणनाम, सुखड्ग हि दे; न म्हणे चि महाप्रभु यास्तव 'नाहीं.' १०
तो तुहिनाद्रिवरीं अवलोकुनि, वेदवती रुचिरा, तिस झोंबे,
दादुनि कूपमुखीं चरणद्वय बांधुनि [4]जीर्णगुणें जड लोंबे.
त्या अरिपासुनि ती सुटली स्वतपें, 'मजला दुसरें जनु हो, मीं
मारिन तूज,' वदोनि असें अतिरोषभरें, ज्वलनीं तनु होमी. ११
रावण विघ्न मखास करी, धरि चाप मरुत्त, तया गुरु वारी;
खाय महाध्वरवाटगत द्विज; 'हाय!' जगा म्हणवी अविचारी.

---

१. गर्वरूप कावळ्याचें वसतिस्थान च अशा. २. शंकराच्या क्रीडावनास. ३. प्रभूच्या ( शंकराच्या ) चरणांगुष्ठभारानें. ४. जुनाट दोरानें.

कण्वसुतापति ऐल तथा गय गाधि कृती म्हणती, 'जित झालों.'
ते वधिले नृप जे वदले, 'क्षणमात्र असद्वचनांत न चालों.' १२
त्या अनरण्य म्हणे 'न उतें, मद घातक हा हृदयांत नयो; ध्या;
मारुनियां तुज, मत्कुळसंभव राम यशें निववील अयोध्या.'
दुष्ट दशास्य तयासि वधी; मग नारद यासि यमावरि धाडी;
'योग्य' म्हणे 'न तुला मृतमारण,' तो, नरकस्थळ ओस चि पाडी. १३
राक्षसराजकृत स्वबळक्षय पाहुनि काळ करीं धरि दंड,
दत्तवरप्रतिपालनतत्पर, त्या विनवूनि करी, विधि थंड.
वासुकिचें पुर जिंकुनि, दैत्यपुराप्रति जाय, तयासह भांडे;
धूळि निवारुनि तो प्रभुसख्य बळें करवी भरवी दुधभांडें. १४
अश्मपुरीं असुरांसह संगर पंक्तिमुखें बहु दारुण केला,
[1]श्यालकरस्थकृपाणवरें हृतमस्तक शूर्पणखापति मेला.
बा ! परमाद्भुतसत्कविगीत पयोधि, जिच्या बहु पावन दुग्धें,
त्या सुरभिप्रति वंदुनियां वरुणात्मज ही जिणिले अतिमुग्धें. १५
जाय पुरासि हरूनि नरेश्वरविप्रसुरासुरपन्नगकन्या;
'मृत्यु बळात्कृतिनें तुज तत्क्षण येइल,' यापरि शापिति धन्या.
शुक्रमुखें घननादसुसिद्धिस ऐकुनि, त्या स्वगृहीं खळ आतां
रोधि बिभीषण त्यासि कथी, 'मधुनें भगिनी हरिली,' असि वार्ता. १६
घेउनियां बहु सैन्य निघे दशकंधर, त्या मधुनाम वनातें
जाय; तया भगिनी विनवी करि तो हि तिच्या धृतिच्या अवनातें.
सख्य घडे मधुसीं; मग शक्रपराभव वांछुनि, भोगुनि रंभा,
घे नळकूबरशाप, दिसे परिणाम न ज्यास, जसा धृतदंभा. १७
कार्यविचार पुसे अजितासि अवध्यदशास्यभयाकुळ जिष्णु,
'युद्ध करीं च' म्हणे 'समयीं सुरशत्रुसि मीं करिन व्यसु' विष्णु.
सर्वदिगीशबळांसह बा ! करितां अतिदारुण संगर तातें,
मोहुनि मेघरव स्वबळें धरि गौ[2]तमदारकुसंगरतातें. १८

---

१. मेहुणा. २. इंद्राला.

भेटुनि, मेघरवासि म्हणे विधि, 'मागुनि घेउनि इष्टवरातें,
सोड हरीस, वरू शम कश्यप, दे चि तया सुत शिष्टवरातें.'
तो वर हा वारि, 'होमसमुद्भवदिव्यरथीं समरांत बसावें;
त्या समयीं परदुःसह होउनि, म्यां सकळांसि अवध्य असावें.' १९
त्यासि 'तथास्तु' म्हणे चतुरानन, मेघनिनाद हरिप्रति सोडी.
तो 'मुनिदारवरव्रतखंडन तत्फळ हें,' कथितां कर जोडी;
वैष्णवयज्ञ गुरूदित[1] साधुनि, तेज पुन्हां पद ही निज पावे.
अर्जुन[2]वाळिकृत क्षणदाचरराजपराभव यावरि गावे. २०
स्त्रीजनयुक्त सुखें करितां जलकेलि, रणा हटकी, नरदेवा,
हैहयराज[2] सहस्रमहाभुजरुद्धगती मुरडी रंय[3] रेवा[4];
वाहवि पूजनवस्तु; दशानन कोपु[नि]यां झगडे अभिमानी.
तो करि भंगुनि बद्ध तया, मग सोडि पुलस्त्य मुनिप्रति मानी. २१
दक्षिणसिंधुतटीं करितां जप, रावण मागुनि जाय धराया,
तों धरि यासि पराङ्मुख ही कपिराज सलील, मदासि हराया.
काख भरी, करि सर्वसमुद्रनिमज्जन, ये स्वगुहेप्रति सोडी.
होउनि दीन दशास्य म्हणे, 'चिर सख्य अकृत्रिम दे,' कर जोडी. २२
मारुतिचें हि चरित्र पुसे प्रभु, कुंभज तें हि कथी, "शिशुभावें
हा गगनांत उडे, रवितें निरखूनि म्हणे 'पिकलें फळ खावें.'
राहु म्हणे, 'मम भक्ष्य कसें इतरासि दिलें ?' कपि जिष्णुस दावी;
त्या हि तमा[5] फळधी पळवी, मग शक्रकरेणुस ही फळ भावी. २३
जो हरिवाहन वारण, भव्यपयोनिधिफेननिभा धवळा या
पाहुनि, वाहुनि हर्ष मनीं, मुख वासुनि, वेग करी कवळाया.
शक्र करेण्ववनार्थ, तदा कवळी पवितें अतिसत्वर हातें,
ताडुनि पाडि नगीं शिशु मूर्छित, हें नव्हतां नच सत्व रहातें. २४
भूमिधरीं पडतां गगनातुनि, त्या शिशुची हनु भंगलि वामा[6].
'हाय!' म्हणे पवन, त्रिजगन्मळमूत्रनिरोध करी, रघुरामा!

---

१. गुरूक्त. २. सहस्रार्जुन. ३. वेग. ४. नर्मदा. ५. राहुला—**पंत**. ६. सुंदर.

वांचविलें विधिनें पवनप्रियतोक करें कुरवाळुनि, वर्षे,
जेंवि घनें मृत स[1]स्य, निवे; जग देति तया वर निर्जर हर्षें. २५
इंद्र म्हणे, 'भय लेश नसो पविपासुनि; नाम असो हनुमान् या.'
दे निजतेज, तदीय शतांश सशास्त्ररहस्य, दिवाकर मान्या.
काळ वदे पवना, 'तव नंदन नित्य अवध्य असो, मम दंडा.'
श्रीद म्हणे, 'न वधील गदा, अशनिप्रतिमा जरि हे अतिचंडा.' २६
पा[2]शजलाभय दे वरुण त्रिदशाद्भुतशिल्पनिधी, वर दे हा,
'मद्रचिताखिलशस्त्र शिवेल न यास, जसा झष धीवरदेहा.'
शंभु म्हणे, 'भय मारुतितें नच देइल शस्त्र हि अस्त्र हि माजें,'
हें बहु; पावकभास्करतेज तसें किति तें, हारि वस्त्र हिमा जें?' २७
पंकजयोनि म्हणे, 'सकळाहितमित्रभयाभयदायक हा हो;
कामगती हि, चिरायु, अजेय, रमेशसहाय महायश वाहो;
रूप धरील यथेष्ट, विषाद नसेल, असेल अनामय, माया
या न पुरेल, म[3]दंड न मोहिल या कविराजमना मयमाया.' २८
पुष्कळ सद्वर देवुनि, सामर देव च[4]तुर्मख हर्षुनि, गेला;
मारुति हा पवनें जनकें मग केसरिदा[5]रगृहाप्रति नेला.
बाळपणें करि फार उपद्रव, हा चि पितृप्रिय यासम हर्षी,
शापिति, 'शक्ति कळो स्तवनें समयीं च,' अशापरि यास महर्षी."
कुंभज यापरि सर्व सविस्तर सांगुनि वृत्त, पुसे मग जाया;
त्यासि म्हणे प्रभुराज, 'ऋषींसह द्या वर अश्वमखाप्रति याया.'
मान्य करी मुनि जाय बहु प्रभुपासुनि जें जनका धन ये तें,
दे मणिकांचनवस्त्रगजाश्वरथादिक आपुलिया तनयेतें. ३०
जाय पुसोनि नृप स्वपुरा, मग वानर राक्षस तत्पति रामें,
तत्सचिवांसह पूजुनि, फार चि हर्षविले, प्रियसद्गुणधामें.
जे भरतें स्वसहाय नराधिप आणविले स्वपुराप्रति होते,

१. धान्य. २. आपले पाश व जल यांपासून अभय. ३. मीं निर्मिलेलें ब्रह्मांड.
४. चतुर्मुख ब्रह्मा (?). ५. केसरिपत्नी अंजना इच्या घरीं.

पूजुनि बोळवितां वदले, 'तवसंस्मरणीं निरता मति हो' ते. ३१
तात तसा प्रभु, पुत्र तसे प्रिय अंगद मारुति घेउनि अंकीं,
दे सदलंकृति, वर्णुनि तत्कृत, लाजवि जो गुण चंदनपंकीं;
जे गगनोपळकाळ[1], तदा कवि जाणति यां चि असाश्रु तिघांसें,
मानिति उग्र वियोग चि सागरवाजेनुचा[2] न असा श्रुति घांस. ३२
'भक्ति निरंतर पुण्ययशश्रवणादर,' हा वर मारुति मागे.
गद्गदकंठ कृतांजलि, साश्रु, पदीं प्रभुच्या बहु लागुनि लागे;
भक्त सुकंठ बिभीषण मारुति अंगद जांबवदादिक भावें
वंदुनियां पुसती शिर चाळुनि; त्यांसि तसें चि म्हणे विभु 'यावें.' ३३
पुष्पक ये अलकेहुनि मागुति यापरि तो विनवी नरदेवा,
'दे स्वपदाश्रय, योग्य चि तूं, धनदें मज सांगितली तव सेवा.'
त्यासि म्हणे प्रभु, 'संप्रति जा; करितां स्मृति भेट: सुखें भज आर्या;
मेळविलें भरतास्ववनें[3] यश, तेंवि अणीक हि येसिल कार्या.' ३४
सत्य कथी भरत प्रभुतें, 'जन सर्व सुखाढ्य तुझ्या नवराज्यें.
तृप्ति जसी अमृतें प्रभुजी! सकळांस हि होय, तसी न वराज्यें.'
राम विहार अशोकवनीं करि; नित्य विलाससुखें बहु धाली,
भूमिकृतें नवसें चिर न्हावुनि, गर्भवती धरणीजनि झाली. ३५
तीस पुसे रघुनायक, दोहद, मोहदवांबुद[4], घेउनि अंकीं;
काम तपोवनदर्शन हा कथि, यत्स्मृति दे न बुडों मन पंकीं.
राम म्हणे, 'बहु उत्तम; जासिल देवि! उद्यां चि मुनींस पहाया;
जे मुनिदार, तयांसि धनें वसनें मणिराशि यथेष्ट वहाया.' ३६
भैद्रचरासि[5] पुसे प्रभुसत्तम, 'काय मला म्हणती जन दूता!?'
तो विनवी, 'वदतात शुभाशुभ लोक विशृंखळ बा अतिपूता!
कीशवशीकरणांबुधिबंधनरावणमर्दनसद्यश गाती,

१. आकाश, दगड व काळ या तिघांस मात्र या प्रसंगी अश्रु आले नाहींत.
२. समुद्रोदकांतून उत्पन्न झालेल्या (हालाहलविषाचा). ३. भरताचे प्राण रक्षून.
४. मोहरूपी वणव्याचा मेघ. ५. दूतविशेषाला.

बोलति हें हि, ‘ कसी सदनाप्रति आणिलि, शत्रुसि जी वशगा, ती?’
हें चि सुहृद्वदनें हि निघे; मग राम म्हणे अनुजांसि, ‘ न वारा
शासन, हा उपहास नसो; यश तेंवि, न बंधु, न देह, न दारा.
बा घननादारिपो! त्यज, पावुनि तातसखाश्रम, रक्षिल, जागा
धर्म असे, तुज दोहृदपूरक मानिल तापस, लक्षिल जा, गा!’ ३८
लक्ष्मण तीस, निशा सरतां चि, म्हणे, ‘ प्रभु पाठवितो तुज, माते!
चाल, तपोवन, साधु पहा, धन घे बहु, वांटुनि लाजिव दाते.’
वंदुनि वंद्यजनांघ्रि, निघे निजकांतरथावरि बैसुनि, हर्षे.
स्वर्धुनिपार कैवींद्रपदीं त्यजि सांगुनि; तो जळ शोकज वर्षे. ३९
भूतनया वदली, ‘जन निंदिति याकारितां त्यजिलें जरि साधो!
युक्त असे प्रभुला यश निर्मळ आत्मकुळोचित, यावरि साधो.
रोदन योग्य नसे तुज, हें मज देउनि जा; वद मन्नमनातें.
ध्यान रुचो प्रभुचें चि, जसें रुचतें शिशुच्या पय अन्न मनातें.’ ४०
साश्रु नमूनि सतीस फिरे, प्रभुतें भरतानुज तन्नति सांगे.
राम उदेश्रु म्हणे, ‘ जनते! दयिता, असतां शुचि, निंदिलि कां गे!?’
आदिकवि द्रुत येउनि पूजुनि, वृत्त तिच्या वदनें परिसून,
प्रार्थुनि, सांत्वुनि, ने उटजीं, दुहिता जसि लाडकि, कीं वरि सून.
राम कथी नृगभूपनिमिक्षितिपाळवसिष्ठकथा अनुज्यांला;
ती हि ययातिकथा, गुरुशाप घडे, सुर ही वदले ‘ नैनु ’ ज्यांला.
न्याय करूनि तया सुखवी प्रभु, जो स्वमनोगद आयकवि श्वा.
हृष्ट उलूकखगा हि करी सुयशें, निववी रघुनायक विश्वा. ४१
श्रीयमुनातटवासि महामुनि सांगति दुःख, तयांसह भावा
पाठवि तत्क्षण राघव, कीं द्विजताप लया अतिसत्वर जावा.
जाय अरिघ्न, सदाश्रम पावुनि आदिकविप्रति वंदुनि राहे.
रात्रि कुमारयुग प्रसवे महिजा, तिस तो रचितांजलि पाहे. ४२
सूर्यतनूद्भवसिंधुतटीं सकळाश्रिततापसमंगळधार्मी,

१. वाल्मीक्याश्रम. २. वाल्मीक्याश्रमीं. ३. रडतरडत. ४. आज्ञा महाराज!

'मां' पहिला मग 'धा' मग 'ता' तिन वर्ण असे गुरु ज्या नृपनामीं,
त्यासि वधी लवणासुर हा हरनिर्मितशूलधर; च्यवनानें
पूर्वकथा कथिली असि ऐकिलि रामपदाब्जसमस्तवनानें. ४४

शूळ करीं नसतां, हरिणादिक मारुनि, जों गहनांतुनि आला,
तों असुरा मुनि गांठविती, रण त्या प्रबळासह दारुण झाला;
अग्रजदत्तशरें उर भेदुनि, वीर अरिघ्न वधी लवणातें.
रावणमर्दन तेंवि, खळार्दन, न त्रिदशा गमलें कवणा तें? ५४

त्या मधुपूर्ववनीं मधुरा रचिली, भरले तंव वत्सर बारा,
ये परतोनि अरिघ्न, कवींद्रकृतादर तो परिसे कृति सारा.
भूतनयासुत साधु कुशाख्य, लवाख्य, सुधी मधुरस्वरगाते,
सेविति जे मुनि रामयशा, न मनें स्मरती अमृता स्वरगा ते. ४६

तो प्रभुपाद नमूनि निवे, हृद सेवुनि जेंवि महातपतप्त.
श्रीशनिदेश न लंघि, निघे मथुरेसि वसोनि पुरीं दिन सप्त.
द्वार धरी मृतबाळक विप्र; उपाय पुसे, प्रभु नारद बोधी;
पुष्पक ये स्मरतां चि, बसे रघुराज, अधर्मकराप्रति शोधी. ४७

आढळतां चि, वनांत तपोरत शूद्र, तया प्रभु तत्क्षण मारी,
स्वर्गसुखासि करी उचित; द्विजबाळ उठे, मह दे बहु भारी.
श्वेतकथा घटजें कथिली परिसोनि, तदर्पितसद्वलयातें
घेउनि ये स्वपुराप्रति, लाजवि तापहरत्वगुणें मलयातें. ४८

'राज'पदोत्तर'सूय' असें अभिधान जयास, तयास कराया
राम पुसे, विनवी भरत, 'क्षितिपक्षय हा तुज योग्य न राया!'
लक्ष्मण जोडुनि हस्त वदे, 'हयमेध बरा,' प्रभु ऐकुनि डोले,
'सत्य असा मख अन्य नसे, तरले इल वासव,' यापरि बोले. ४९

राम वसिष्ठमतें करवी स्थळ नैमिषनामवनीं, भरतातें
कार्य कथी; तुरगावन मेघरवारिस, यत्सुयशें जग धातें.
प्रेषुनि दूत, अरिघ्न सुकंठ बिभीषण मैथिल मातुळ राजे
आणवि, सर्वमहर्षिमहाकवितें हि; महासव तो बहु साजे. ५०

आदिकवि, प्रभुसत्कृत, शिष्यसमेत, वसे शुचिगोमतितीरीं,
तो चि कुशा सलवा कृति गाववि, हार्दे[1] उते श्रवणें रघुवीरीं;
'कोण तुम्हीं? रचिलें कवणें सुमनोहर काव्य?' असें अवसानीं[2]
राम पुसे, कथिती गुरु, तत्कृत, ज्यांस जनु क्षितिच्या नवसानीं. ५१
हर्षुनि कांचन पुष्कळ देवावि देव, विरक्त न ते लव घेती.
जाणुनि पुत्र, तदीय सुरीति, न राम चि वर्णिति हो! अववे, ती.
'प्रत्यय देउ जनास, पुन्हां करु दिव्य सती,' परि तो कवि राया
जोडुनि हस्त असें विनवी, प्रभु देविस पावुनि, शोक विराया. ५२
मान्य करी कविराज, मग प्रभुच्या निकट, क्षितिजेप्रति आणी,
'दाशरथे! शुचि हे; नसतां[3], मम सत्तप मोघ,' वदे असि वाणी.
श्री हि म्हणे, 'जरि मद्व्रत शुद्ध असेल, कळेल तुला, महि! माते!
दे उदरीं स्थळ, जे जन निंदिति, गावुत लाजुनियां महिमा ते.' ५३
तों चि उले धरणीतळ, त्यांतुनि भासुरमूर्ति निघे महिदेवी,
ती स्वसुतेप्रति भेटुनि, जें परमासन त्यावरि सादर ठेवी;
वर्षति देव तदा कुसुमें, यश गावुनि, वाजविती वर वाद्यें.
होय पळांत चि गुप्त सती; धरिलें बहु दुःख सरोजभवाद्यें[4]. ५४
कोप करी बहु भूमिवरि प्रभु, सांत्वुनि तत्व तया कथि धाता,
पद्मभवा दयिता तव, तूं हरि मानवसा खळरावणघाता.
सांप्रत येथुनि जावुनि, राहिलि पूजन घेत रमा फणिलोकीं,'
देइल भेटि निजालयगा[5] तुज, बा! निजभाव मनीं अवलोकीं. ५५
'आदिकवींद्रकृतामलकाव्य सुरांसह आयकिलें, मन धालें.
तूं हि समग्र करीं श्रवण; प्रिय हें चि सुधींस सुधाधिक झालें.'
प्रार्थुनि यापरि, जाय विधि; प्रभु सोडुनि शोक, पुन्हां सुतगीता
त्या स्वयशा परिसे, हृदयांतुनि दूर न होय पळार्ध हि सीता. ५६
यज्ञ समाप्तिस नेउनि, गौरवि राघव वर्ण मखागत सर्व,

१. हृद्गत प्रेम. २. अखेरीस. ३. नसेल तर. ४. ब्रह्मदेवाच्या हि पूर्वीचा जो राम त्यानें. ५. तूं निजधामास गेल्यावर.

प्राज्य अचिंतित दे प्रियवस्तु, हरी अखिल त्रिदशद्रुमगर्वे.
ये स्वपुरा, मग तो, अयुताब्द सुवर्णमयी दयिता हयमेधा-
माजि तसी च वरूनि, करी मखकोटि, बहु स्तवि सामर वेधा[१]. ५७
सोडुनि हा नरलोक सुखें मग कोसलराजसुतादिक माता,
दिव्य विमान वरूनि, पतिप्रति भेटति, धन्य करी प्रभु ताता.
यावरि मातुळ आत्मपुरोहित वित्त हि पुष्कळ पाठवि रामा;
तो कळवि द्विज, मत्ततरामरगायकमर्दन[२] या नृपकामा. ५८
पाठविला भरत प्रभुनें, दिन सप्त निरंतर भांडुनि मोटी
ख्याति रणीं करि, योजुनियां प्रळयास्त्र, वधी अरि तीन हि कोटी.
त्या विषयांत[३] पुरद्वय निर्मुनि बैसवि राज्यपदीं सुत दोघे,
स्वामिपदाब्जरजें चि शिरीं, बहु जाणुनि राज्यपदाहुनि, तो घे. ५९
कारुपथाभिध देश सुशोभन, त्यांत पुरद्वय निर्मुनि केले
लक्ष्मणनंदन भूपति, जे भरतात्मजसे अभिषेचुनि, नेले.
काळ धरासुररूप वदे प्रभुतें, 'तुजसीं च रहस्य वदावें;
त्या समयीं तिसरा जन येइल जो स्वसमीप, तयासि वधावें.' ६०
द्वारप लक्ष्मण, राजवरें 'वध' हा पण आपण सांगुनि, केला;
ब्राह्मण, हस्त धरूनि रहस्यगृहांत समर्चुनि, सादर नेला.
सांजलि तो विनवी, नत होवुनि, 'पाठविलें विधिनें मज काळा,
कृत्य नसे उरलें, स्वपदाप्रति ये रुचल्यास, जगत्रयपाळा!' ६१
त्यासि 'अवश्य' म्हणे जगदीश्वर, तों चि महामुनि अत्रिज आला;
'दाशरथिः क?' असें पुसतां, विनवी कर जोडुनि, लक्ष्मण त्याला,
'आसन हें, क्षण बैस मुने! प्रभु येउनि पूजिल, सांप्रत कार्यी
गुंतुनि, वा! सदनांत असे, तव दर्शन घेइल सत्वर आर्या!' ६२
चंड[४] वदे, 'त्यजिली पितृपूर्वजसंन्नति[५] होउनि मत्त, पहा! रे!
हें कुळ भस्म पळें करितों, प्रळयाग्निपुढें हि न मत्तप हारे.'

---

१. ब्रह्मा. २. अत्यंत उन्मत्त झालेल्या गंधर्वांस वठणीवर आणणें. ३. देशांत.
४. रागीट दुर्वास. ५. पाठांतर—पितृपूर्वजसन्नति सोडिलि.

तो स्वविनाश बरा, न कुळक्षय, हें मनिं आणुनि सत्वर 'तातें
शापुं नये,' विनवूनि असें, कथि अत्रिसुतागम सत्वरतातें. १३
काळ पुसोनि निघे, मग येउनि, अत्रिसुतासि नमि प्रभु राम.
प्रांजलि होउनि कार्य पुसे; कथि तो क्षुधित द्विज, भोजनकाम.
अन्न चतुर्विध अर्पुनि, तर्पुनि, अर्थिसुरद्रुम घेउनि आशी,
देउनि त्यासि निरोप, बसे हृदयांत धरूनि महासुखराशी. १४
बंधु वदे, 'सुयशस्कर मद्वध हो चि, नसो वितथा तव संधा.'
त्याग वधासम, हे स्वगुरूक्ति नृपा तासि, यष्टि पथीं जसि अंधा.
'जा त्यजिलासि' म्हणे अनुजा प्रभु, जो हरिता, स्मरतां, भवबंधा.
लक्ष्मण वंदुनि पाय निघे; त्यजि शील न, ज्यापरि चंदन गंधा. १५
जाय, वरी सरयूतट लक्ष्मण; तैं पुर सर्व हि दुःखित झालें.
तों चि विमान रविप्रभ आणुनि, निर्जरवृंद नभांतुनि आलें.
यानवरीं मग बाहुनि लाहुनि, संमद गाजत वाजत नेला,
तें अवलोकुनि सर्वजनें सुगुणस्तवयुक्त जयध्वनि केला. १६
राम म्हणे भरतास, 'नको पद, जाइन लक्ष्मण जेंवि, तसा मीं.
राज्य करीत पुरींत रहा सचिवांसह हर्षित या पितृधामीं.'
तो प्रभुभक्त म्हणे, 'तुजवांचुनि होइल हें पद तापद काया;
त्वत्पदपद्म चि भूषण, सोडिल हा न, असें वदता पदका या. १७
धाडुनि दूत, अरिघ्न सुकंठ बिभीषण हे प्रिय भक्त बहावे,
जे प्रभुजी! स्मरती तुज संतत दास, तिहीं तव पाय पहावे.'
पाठविले जवन स्पश[१], ऐकुनि दों नगरांत सुतद्वय तो ही
स्थापुनि ये भरतानुज सोडुनि राज्य; न साधुजना धन मोही. १८
अंगद बैसवुनि स्वपदीं, अतिसत्वर भक्त सुकंठ हि आला,
मारुति जांबवदादि हिं, तो हि बिभीषण रामपदीं नत झाला.
ऋक्षवर, क्षणदाचरराज, मरुत्सुत यांप्रति दे वर इष्ट,
श्रीपति पौरजन, प्लवगादिक हर्षवि, जे गमनोत्सुक शिष्ट. १९

---

१. दूत.

ते जन सर्व दयानिधिनें, त्यजुनि स्वपुरी, सरयूप्रति नेले;
मज्जन तीर्थवरीं करवूनि, सुराधिक दिव्य खरादि हि केले.
दिव्यविमानसहस्रशतास्थित गाजत वाजत साजत गेले,
पावुनि उत्तम लोक, सदा प्रभुदर्शनहर्षितमानस ठेले. ७०
श्रीरघुनाथचरित्र जना, बहु भव्य नव्य रस देउनि, तारी.
जोडुनि पातक या सुयशास चि 'रक्ष' लक्ष म्हणती नर नारी.
ये सहजांत हि जींत कसेंतरि रामनाम बरवें हितकारी;
ती सकळांस हि भेटविती शुचि उक्ति मुक्ति, करिती हित भारी. ७१
त्र्यक्ष[1]मनोहर! दीनजनावनदक्ष! पुमर्थद! साधुसभाधन!
लक्षकविस्तुत! दारुणपातककक्षदवानळ! सत्करुणाघन!
तक्ष[2]ककोटयधिकोग्रदशाननरक्षउपद्रुतविश्वभयापह!
रक्ष रघूत्तम! मामबलं[3] वृतपक्ष[4]मनाथ[5]महर्षिमहामह! ७२
पसरूनि तुला पदर प्रणती करितों शत बा! भगवच्चरिता!
तव चिंतन नित्य घडो सदया! क्षण एक हि जावु कधीं न रिता.
वर हा मज दे, तरला जन कोण न, कास भवांत तुझी धरिता?
सकळांस हि तर्पिसि, अर्पिसि; तूं, शुचि गांग तसें, हरता, हारिता.
परमाद्भुत तूं प्रभुनाम! जनीं न रमापतिहूनि उणें, नमिता
वर मागितला वरितो, म्हणसी 'चरमात्मज! देसि सुखा अमिता.'
सरमाधवसा तुज सर्व गमे शर मारुनि राम वधी अरितें.
पर [6]मारमुखादि अजेय सुखें पर मारिसि, लाजविसी [7]अरितें. ७४
[8]भालदृगार्चित काळमुखाखिलपाळ गमे नत बाळक ज्याला,
सव्यथ ज्या कळि नव्य सदा निजभव्ययशें अज अव्यय धाला.
स्फारगुण श्रुतिसार कळाजितमार रमामणिहार नमावा

---

१. शिवमनोहर. २. कोटि तक्षकांहून उग्र अशा रावणराक्षसानें उपद्रविलेल्या विश्वाचें भय हरण करणाऱ्या! ३. निर्मल जो मी त्या मला. ४. वृतपक्षम्= घेतला आहे पक्ष (पतकर) ज्यानें. ५. अनाथ महर्षींचा मोठा आनंद अशा! ६. कामप्रमुख. ७. सुदर्शन—**पंत**. ८. शिवपूजित.

श्याममनोहर, नामहतात्यघ, राम मनांत निकाम रमावा. ७५
छंद मनोहर हें, सवया म्हणती बुध यास, सहाय मला
मंदमतीस हि होउनि, सिद्धिस पावविला अभिलाष भला;
ग्रंथ रघूत्तमपादयुगार्पित हा तुलसीदलसा गमला
भक्तमयूर म्हणे 'रसिक प्रभुभक्त चि या सुयशीं रमला.' ७६

इति श्रीरामनंदनमयूरविरचितं श्रीसवयारामायणं समाप्तं।

# श्रीरामचरितभरितश्रीरामचंद्रप्रार्थना

(अनुष्टुभ् वृत्त)

श्रीरामा[1]! जलदश्यामा! देवदेवा! दयाकरा!
धाता भवीं फळें उग्रें दे, वदे 'वाद या करा.' १
जे कामक्रोधलोभादि, यांहीं मोहूनियां बळें
कर्मं करविलीं, त्यांचीं भोगावीं लागती फळें. २
विश्व त्वदश्रयें[2] खोटी पर माया सदा विती;
जीव भ्रमविती रामा! परमायास[3] दाविती. ३
सुस्वामिनें म्हणावें बा! 'कां सुदासी नको? वळें.'
हृदय प्रभुचें व्हावें कां उदासीन कोवळें? ४
दीनां गांजी मोहपाश; हा पाउल गडी लया
नेवू; रामा! अन्य कोण बापा! उलगडील या? ५
'ममैवांशो जीवलोके जीवभूत' असें स्वयें
वदलासि प्रभुवरा! सत्य त्वद्वाक्य निश्चयें. ६
त्वदंश जीव; मग कां अविद्या यास भाजिती?
तुला तों भंग मोहातें कवि ध्याया संभाजिती[4]. ७
एकदा पाय बा रामा! शरण्या! दाव, पाव कीं.
त्वद्दर्शनीं नाश अघा, अरण्या दावपावकीं. ८

---

१. हें रामायण स्तोत्रस्वरूप आहे. २. त्वदाश्रयें. ३. मोठे कष्ट. ४. पूजिती.

दिला हर्षें मखत्राणें गाधिजा, आधि ज्या महा;
गाती पूर्वज ताराया निज या विजया महा. ९
दिली गति तुवां, होतां पातकाकुळ ती सती;
रामा! करी जी, जोडूनि हात, काकुळतीस ती. १०
भंगिला प्रभुचा चाप, छात्र भार्गवराम हीं;
म्हणे, 'सीतेसि, धरुनि क्षात्रमार्ग, वरा' मही. ११
पावले शोक साकेतीं रामा! जीव नवा सदा.
मान्या तुला त्वत्ताताची रामा जी वनवासदा. १२
वटदुग्धप्रदा आली, जो गुहाख्य निषाद, या,
रामा! तुझ्या सख्या जैसी यावी, देतां विषा, दया. १३
तुला स्वशोकें मेला तो म्हणवी जारि बाप 'हा!'
दिला दुर्वह राज्याचा भरता भरताप हा. १४
दिल्या स[1]धर्मा रक्षाया, भरता पादुका न[1]या,
रक्षिती, न पडों देतां भर[2]तापा दुका[3]न या. १५
त्वां ते निवविले, ज्यांच्या मनीं ताप सदा वसे,
जे रक्षस्त्रस्तदोषांच्या वनीं तापस दावसे. १६
वाटे हेममय स्पष्ट श्रीस, जो एण तापद,
झालासि तूं हि शोकाचें बा! जसा नेणता पद. १७
श्रीतें छळें हरि, करी दशानन रसा हता.
साहिली त्वां चि देवा! ती दशा, न नर साहता. १८
या प्रसादें काय झाली शबरी न बरी यशें?
त्वां सेविलीं घेउनि तीं बदरें पदरें वशें. १९
पडों दे कळ चिंतेची ज्या न कीशास दाद, या
दिलें राज्य. तुझी दीनीं जानकीशा! सदा दया. २०
रामा! मोह न बाधों दे या बालिशमनास जें,

१. सधर्मा नया—**पंत**. २. भरताला. ३. या दुकान पादुका=दुकानी जोडा, दोन कोपरे असलेल्या पादुका.

तें कराया दीनबंधो! बा! वालिशमना! सजें. २१
माराया त्या, जगीं ज्याचें महायश, तशासि, ते
कपिऋक्ष तुला झाले सहाय शत शासितें. २२
जो समाचार सीतेचा, चूडामणि हि अर्पि, तो
कपि वाटे तुला प्राज्यें पीयूषें प्राण तर्पितो. २३
तुवां आलिंगिला प्रेमें आंजनेय महागुणी.
हर्षोत्कर्षें कंजनाभा! अंजना [1]भा धरी दुणी. २४
शरणागत जो रामा! बिभीषण, तयावरी
राज्याभिषेक केला त्वां; नम्रा तव दया वरी. २५
हें त्वद्यश म्हणे, 'स्नेही न तात वद यावरी.'
बाळा प्रसूची न जसी नता तव दया वरी. २६
निर्मिसी निववाया भूकन्यकामन सेतुला;
रामा! भक्तप्रियाहूनि अन्य काम नसे तुला. २७
लयार्के तूं, द्विषद्दुर्गसैन्य जें आडवा[2]रि तें;
सद्धर्मी प्रेम असतें, ठाकतें आड, वारितें. २८
मरती भरिती रामा! बा! [3]आज्याजिर वीर ते;
त्वच्छराग्नि तया होमीं तें आज्य जिरवी रते. २९
घनसे देव वीरश्रीपद, रावण वातसा;
न शमे जो पसारितां पदरा वणवा तसा. ३०
देवब्राह्मण रक्षाया, त्वां तो खपविला भला.
या तुज्या विजयें रामा! बा! तोख पवि लाभला. ३१
तुज्या मनीं न तम कीं रज नीच रमा वळे
शुद्धसत्वा; दुर्गुण तो रजनीचर मावळे. ३२
करी जपे चरित्राच्या जी तेजें पालनास ती
अग्निकुंडीं पुष्कराक्षा! दुष्करा क्षालना सती. ३३
कपींस स्वर्ग रुचला न पुष्पकविमानसा;

---

१. तेज. २. विहिरींतलें पाणी. ३. आजि+अजिर=रणांगण.

त्वद्यश प्रिय, नाकींचें न पुष्प कविमानसा. ३४
श्रीरामा! त्वद्वियोगार्ता राज्याचा भर तापद;
त्वद्दास्य हें चि रुचलें सद्भक्ता भरता पद. ३५
जो निंदी काय ठावी त्या तत्वाची परिटा, किली?
रामा! लोकाभिरामा! त्वां सत्वाची परि टाकिली. ३६
त्वां चि प्रजा रंजविल्या, नेणती ज्या मनोगदा;
तुझी सर्वां ही नृपाला कृपा लाजविती सदा. ३७
विमानीं वाहिले नेले पुरस्थ विरहासहें,
त्वां न केलें होय जेणें पुरस्थाविरहास* हें. ३८
त्वां सेविलें अमृतसें सार साकेत काकवी
पुरी अन्या, न तुळिती सारसा केतका कवी. ३९
बापा! भक्तमयूरांच्या तापा वारिसि तूं घना.
रामा! या मन्मुखीं स्थापीं नामा, आनंदवीं मना. ४०

इति श्रीरामनंदनमयूरविरचिता श्रीरामचारितभारितश्रीरामचंद्रप्रार्थना समाप्ता।

---

# परंतुरामायण

## बालकांड

(गीतिवृत्त)

श्रीरामचरित[1] करितें मुक्त, सकृत् किमपि सेवितां भावें.
पार न लागे शेशशतवदना[2] हि, परंतु वाटतें गावें.

---

१. या काव्याच्या प्रत्येक गीतीमध्यें 'परंतु' शब्द यथार्थत्वानें साधिला असल्यानें या काव्यास 'परंतुरामायण' हें नांव प्राप्त झालें आहे. या रामायणाची मूळ पंतलिखित प्रत अनुपलब्ध असून तिच्या ऐवजीं पंतांच्या दप्तरांत एक परलिखित प्रत आहे. तिच्या शेवटीं पुढीलप्रमाणें समाप्तिलेख आहे:-"शके १७३३ प्रजापतिनाम संवत्सरे उत्तरायणे वसंतऋतौ चैत्रमासे कृष्णपक्षौ त्रयोदशायां तिथौ मंदवासरे चतुर्थप्रहरे समाप्तं॥" प्रस्तुत रामायण छापतांना चातुर्मासे बोवांच्या प्रतीचा हि आधार घेतला आहे. २. शेषाला. * क्रुद्ध नागरिकाकडून हास्य.

संकल्पें चि सुर[1]द्विजपीडकरक्षःक्षयें स्वभजनरसा
देता; **परंतु** झाला दशरथभक्तप्रियार्थ अजें[2] नरसा. २
एका चि मूर्तिनें प्रभु करिता त्रैलोक्यकामनापूर्ती;
क्रीडार्थ **परंतु** धरी च्यार त्रिजगन्मनोहरा मूर्ती. ३
ते राम भरत लक्ष्मण शत्रुघ्न कुमार सारसाक्ष जना
दिसती बाळ, **परंतु** स्वगुणांहीं हरिति गुरुमुनींद्रमना. ४
श्रीरामलक्ष्मणांतें मागे पहिलें चि सिद्धिसदन मुनी,
गुर्वाज्ञेनें[3] नृप दे, क्षणविरहाक्षम, **परंतु**, पद नमुनी. ५
चालति मुनिच्या मागें सुकुमार **परंतु** ते कुमारमणी.
पाहुनि बहुधा वदली 'हंतें[4]!' श्रीशंभुची उमा रमणी. ६
निष्ठुर गमे **परंतु** श्रीरामा क्षुत्तृषा न बाधाया,
'विद्या बळा अतिबळा घे शीघ्र' म्हणे, 'पथांत बा! धाया.' ७
वेदनिधि **परंतु** प्रभु घे विधिनें गाधिजें दिलीं अस्त्रें.
जैसीं राजा घेतो प्रेमें स्वाश्रितजनार्पितें वस्त्रें. ८
स्त्रीवध निंद्य, **परंतु** ब्रह्मोक्तें तूर्ण ताटका मारी.
त्या प्रभुयशास मानी अमृताचें पूर्ण ताट कामारी. ९
सिद्धाश्रमांत करितां यज्ञप्रारंभ, घालिते घाले
आले; **परंतु** भस्म श्रीरामप्रभुशरानळें झाले. १०
शत योजनें उडाला प्रभुशरपुं[5]खानिळें, **परंतु** पडे.
मारीच अकूपारीं[6]; भाविबळें त्या खळा न मृत्यु घडे. ११
मुनि मिथिलेसि निघे कीं, जनक स्वाध्वरविलोकना वाहे.
नेणार, **परंतु** म्हणे प्रभु 'शिवचापेक्षणस्पृहा आहे.' १२
जातां गौतममुनिचा आश्रम लागे, पुसे कथा राम,
तत्काळ अहल्येचें चिरनष्ट **परंतु** वाढवी धामें[7]. १३

---

१. देव आणि ब्राह्मण यांस त्रास देणाऱ्या राक्षसांच्या नाशानें. २. विष्णु. ३. वसिष्ठाज्ञेनें. ४. खेदे—**पंत.** ५. पृष्ठ १९९ टी. ४ पहा. ६. सागरामध्यें. ७. मोठेपणा, थोरवी.

अतिकठिन भर्गधनु, अतिसुकुमार प्रभु, परंतु गुण जोडी;
ओढी सलील लीलानरतनु तें, इक्षु जेंवि गज मोडी. १४
जी ब्रह्मीं नृपें रामीं, भासे नरसा, परंतु ती चव घे;
दशरथ आणुनि, तत्सुत केले कन्यार्पणें सुखी चवघे. १५
निजगुरुचापध्वंसें क्षत्रांतक राम पथ धरी, कोपे,
तो प्रभुपुढें परंतु द्युमणिपुढें चंद्रमा तसा लोपे. १६
लेंक सुना करुनि पुढें दशरथ राजा प्रवेशतां सारी
मुदिता होय अयोध्या, तींत सदा श्री, परंतु हे भारी. १७
ज्यांचा वियोग घटिकाभरि हि सदुःसह परंतु आज्योला
भेटाया तो भरत प्रेषावा लागला चि राज्याला. १८

## अयोध्याकांड

साहित्य करी राजा अर्पाया यौवराज्य रामातें,
दयिता परंतु मोडी कैकेयीनाम कुमति वामा तें. १
ती पूर्वदत्त मागे वर दोन, परंतु 'राज्य तनयातें
द्यावें' म्हणे 'चतुर्दश वर्षें जो ज्येष्ठ राम वन यातें.' २
दुर्बुद्धिमंथरामतदूषितमति सर्पिणी तसी खवळे,
राजा प्रार्थी, बहुधा कर ही जोडी, परंतु ती न वळे. ३
गुरुसत्यरक्षणार्थी दारानुजसह निघे सुखें राम,
वल्कल धरी, परंतु न सोडी श्री त्या, जसी सती धाम. ४
वाइट कैकेयीतें, स्त्रैण म्हणे दशरथास ही पुर तें,
न विटे परंतु चित्त प्रभुचें, कीं शांतिसद्गुणें पुरतें. ५
पायीं च जात होता, तातप्रेषितरथीं परंतु बसे,
पौर त्यजुनि निघे प्रभु, दिसला निष्ठुर मनीं परंतु नसे. ६
भेटे निषादपति गुहनाम सखा वल्कमुग्धदेहातें,
'दे' प्रभु म्हणे, परंतु द्रुत तो त्या न वटदुग्ध दे हातें. ७

१. जनक. २. कैकेयीचा बाप अश्वपति त्याला. ३. स्त्री. ४. अनेकवार. ५. [आपलें] घर. ६. वल्कलसुशोभितदेह ज्याचा अशा रामातें.

परतोन ये, परंतु न हठ उचित असें सुमंत्र तो पाहे;
प्रभु जाय चित्रकूटीं, मुनि नमुनि अनुजकृतोटजीं राहे. ८
आला सूत परंतु न काढी वदनावरूनि सेल्याला,
साकेतीं जन शोकें नीट नसे जेविला नसे ल्याला. ९
नृप कौसल्येसि कथी मृत्युप्रद पुत्रशोक हा शाप,
सोडी प्राण, परंतु न राम सगुण, म्हणति ‘धन्य’ आशीप. १०
होता दूर परंतु द्रुत गुरुनें साधु भरत आणविला,
कैकेयीनें त्याला राज्यार्थ कृतप्रयत्न जाणविला. ११
हांसे माय, परंतु स्मृतगुरु[2] तो साधुराय ‘हाय!’ वदे,
कीं ती मूढा बुडवुनि शतखंडी, एक राज्य हा यव दे. १२
तीतें क्षमी[3] परंतु क्रोधें धिक्कार करुनि साधु निघे,
नमुनि गळां पडुनि रडुनि कौसल्येचा प्रसाद साधुनि घे. १३
सार्थक करी पित्याचें बुध भक्त, परंतु गुरुवच हि मोडी,
होय गुहभरद्वाजस्तुतसत्कृत धरुनि गुरुगुणीं गोडी. १४
तो प्रभुसि चित्रकूटीं प्रार्थी, आग्रह करी फिरायास,
सकृप परंतु न वळला कीं हरणें विप्रसुर[4]चिरायास. १५
हठ करि परंतु समजे, माथां वाहोनि पादुका परते,
नंदिग्रामीं राहे, श्रीसीं स्वप्नीं हि साधु तो न रते. १६
श्रीसीतेसि विदारुनि वक्षोज जयंत[5]काक दे त्रास,
न सुटे पळे परंतु प्रभु अस्त्रें हरि तदेकनेत्रास. १७
अति शुचि रम्य परंतु प्रभुवर तो चित्रकूट नग सोडी,
अत्रिस अनसूयेसह छात्र सुत तसा सदार कर जोडी. १८
वेणी घाली, गुंफी सत्पुष्पें, अंगराग दे भव्य
अनसूया; तत्पुण्यें सीतांगीं चिर परंतु तें नव्य. १९

---

१. दिक्पाल. २. स्मरला आहे पिता ज्यानें असा. ३. सहनशील. ४. ब्राह्मण व देव यांस फार काळपर्यंत झालेला त्रास. ५. याला ऐंद्रकाक असें हि म्हणतात.

## अरण्यकांड

दंडकवनीं विराध श्रीस हरी, ताडिती तया दोघे;
सोडुनि सीता, स्कंधीं ते काळ, परंतु बाळसे, तो [1]घे. १
तोडुनि भुज खड्गांहीं केला व्याकुळ परंतु तो न मरे,
त्यातें पुरोनि गर्तीं वदले 'भूपिहितवह्निसा[2] शम रे!' २
मथिलों[3] परंतु 'कांडीं कीर्त्यमृतनदास देवतुंब, रुतो
न तुज कण,' असें वदला उद्धारिला धनदशप्त[4] तुंबरु तो. ३
शरभंग मुनि सुरेश्वर ये न्यायाला, परंतु तो राहे,
पाहे प्रभुतें पूजी मग हो! मुनिदेह सुगतितें लाहे. ४
नाम सुतीक्ष्ण परंतु प्रेमळ तो राम मस्तकीं हुंगी,
आलिंगी चिर तत्तनु, वाटे त्या जडलि मधुरसा मुंगी. ५
राम 'महाश्चर्य!' म्हणे ऐकुनि रव[5], वृत्त[6]; मुनि परंतु सरीं
शक्रप्रियाप्सरांच्या बहु भरला मांडकर्णि[7] काम भरीं. ६
दंडकवनीं मुनींच्या रमतां भव्याश्रमांत बहुहर्षें
प्रभुहृदया अल्प दिनें, गमलीं, गेलीं परंतु दश वर्षें. ७
पी सिंधु परंतु घटज अतिसौम्य.महातपोनिधि प्रेमें
प्रभुतें भेटे हर्षे, परम अधन जेंवि पुष्कळें हेमें. ८
शक्रस्थापित शस्त्र स्वीय परंतु प्रसाद मानुनि घे,
'पंचवटींत वस' म्हणे मुनि मग तो सद्रिपुतिमिरभानु[8] निघे. ९
गृध्र जटायु परंतु स्वजनकसख म्हणुनि मानिला फार,
गार प्रभुनें केला, सीतासंगोपनादि घे भार. १०
तुच्छा परंतु गुर्वी[9] प्रभुनें सौमित्रिरचित दलशाला

१. समजे. २. जमीनीमध्यें पुरलेल्या अग्नीप्रमाणें. ३. या चरणाचा नीटसा अर्थबोध झाला नाहीं. ४. कुबेरानें शापलेला. ५. [अप्सरांचा] गीतशब्द. ६. हा गीतशब्द कोणाचा व कोठून येतो ही हकीकत. (मूळ अरण्यकांड सर्ग ११ पहा). ७. आपल्या उग्र तपोबलानें देवाना भय वाटावयास लाविलेला एक मुनि. ८. सज्जनशत्रुरूपी अंधकाराचा सूर्य. ९. मोठी.

बहु मान मृन्मया ही कनकघटाहूनि अमृतकलशाला. ११
पाहे पंचवटीतें जीच्या गोदावरी निकट वाहे,
राहे वनीं अयोध्यावासी नृपसुत परंतु सुख लाहे. १२
श्रीरत राम, परंतु त्यागुनि लज्जा रतार्थ ऐ[1] रंडा;
रसिकजन इक्षुदंडा सोडुनि चोखील कोण एरंडा? १३
रामाज्ञेनें लक्ष्मण तत्करें[2] नें परंतु कर्ण नासा हे
तदवयव घे, तयाच्या ती शूर्पणखा न वर्णना साहे. १४
भगिनीदंडें खवळे, प्रभुनाशा ये, परंतु खर चि पडे;
दिनमणिकडे पहाया डोळे होतील काय वर चिपडे? १५
ती दशवदना दावी मुख, सांगे, 'म्यां त्वदर्थ जोडावें
कां न स्त्रीरत्न? नरें हें घ्राण परंतु काय तोडावें? १६
त्वद्भगिनीचे नासा छेदुनि दोन्ही हि कर्ण कापावे,
आजुनि मदश्रु न पुससि? सुरभि पशु परंतु तर्णका[3] पावे.' १७
सीताहरणार्थ निघे जो म्हणवी आपणासि कवि, चार
सांग निगमें[4] पाठ जया, विधिचा पणतू परंतु अविचार. १८
मारीच म्हणे, "उडवी शत योजन यदिषुचा पिसारा ज्या[5]
तो मीं परंतु म्हणसी कां 'जावें'? काय तूं पिसा राज्या? १९
म्हणतोसि 'रामदयिता हरिन पुढें करुनि हेमहरिणा मीं,'
हें करिसिल राज्या! तूं म्हणसील परंतु 'हाय!' परिणामीं." २०
वदला स्पष्ट असें, तो कामांध परंतु नायके कांहीं,
भीना रामकथांहीं; भी अहि नष्टायु काय केकांहीं? २१
होय कनकमृग राक्षस, सीता हि म्हणे 'धरा' हठें मागे,
लागे प्रभु मागें, तो त्रिशिखहत परंतु रामसा गागे[6]. २२
श्रीनें रक्षक देवर शुचि भक्त परंतु दवडिला रागें;

१. ये–चातु०. २. तिचें पाणिग्रहण केलें नाहीं. ३. वत्सा. ४. वेद. ५ रामानें सुबाहूवर बाण टाकला, त्याच्या पिसाऱ्यानें मारीच समुद्रांत जाऊन पडला होता. ६. ओरडला.

आगें व्हाया भस्म क्रूरमति तितें हरी तयामार्गें. २३
अतिवृद्ध परंतु खळा विरथ करुनि तो जटायु खग तीतें
सोडवि, अरि तत्पक्ष छेदुनि घेवूनि जाय अगतीतें.[1] २४
'हा! राम!' म्हणे, करि बहु आक्रोश, परंतु ती महाबुद्धी
नग वानरांत टाकी, लागाया प्रभुसि आपली शुद्धी. २५
पावे लंकेसि, तिला ठेवी दशकंठ तो अशोकवनीं,
आहे सर्वत्र बहुत तच्छोक परंतु यों[2] नसो कवनीं. २६
प्रभु धीर परंतु करी बहु शोध विलाप सानुज वनांत,
तो जनकसखा देखे, जो क्षत झाला स्वयोषिदवनांत.[3] २७
अत्यार्त परंतु कथुनि वृत्त प्राण प्रभूरुवरि सोडी,
करि राम तत्क्रिया, कीं प्रीति पितृप्रीतिहुनि न ती थोडी. २८
दे सुगति कबंधातें शबरीतें प्रभु, परंतु पंपेतें
पाहुनि 'हाय!' म्हणे क्षण बंधुसदुक्तें[4] चि दुःख संपे तें. २९

## किष्किंधाकांड

भी सुगळ, परंतु पुढें ये भेटे पवनपुत्र विनयानें,
वाहे पृष्ठें, दे सुख देवाच्या तेंवि लेश हि न यानें.[5] १
अन्योन्य ते न देती कटक मुकुट रत्नहार निष्क पट
समदुःखत्वें नरवानरसख्य परंतु होय निष्कपट. २
प्रभुसि सुगळ देवीचे नग शोकप्रद परंतु ते दावी,
लावी राम उरासीं, स्वाधिकदुःखी सखा तया भावी. ३
तज्ज्ञ परंतु पुसे प्रभु, सौमित्रि म्हणे, 'मला कळे सेवा,
नमितां देखत होतों मीं जीं तीं हीं च नूपुरें देवा!' ४
सुग्रीव म्हणे, 'वानर हृतदार परंतु मीं नसें कष्टी,
तुज देवी भेटवितों, व्यसनीं धृति हितकरी, तमीं यष्टी.' ५
राम पुसे, सुगळ कथी वैराचें बीज, वालिबळ भारी,

---

१. अनाथ–हताश अशीला. २. प्रस्तुत. ३. आपल्या पत्नीच्या संरक्षणामध्यें. ४. लक्ष्मणाच्या चांगल्या भाषणानें. ५. विमानानें.

वारी तच्छंका प्रभु, अतिसकृप परंतु कपिवरा मारी. ६
निंदी, परंतु वाली समजे श्रीराम विष्णु, कर जोडी;
प्रभु कपिराज्यश्रीसीं तारेसीं ही करूनि दे गोडी. ७
कपिकोटिकोटि सुगळ प्रभुच्या कार्यार्थ मेळवी प्रेषी,
बहु शोधिलें परंतु न दिसली ती दिक्त्रयींत तो द्वेषी. ८
दक्षिणदिग्गत हि बहु भ्रमले श्रमले परंतु संपाती
अग्रज जटायुचा कथि लंकास्थिति राममेघसंपा[1] ती. ९

## सुंदरकांड

दुस्तर परम जलमकरनिधि[2] शतयोजन, परंतु विघ्नातें
न गणुनि मारुति लंघी, गोष्पदसें रामभक्तिनिघ्नातें[3]. १
गरुडपवनमन यांच्या दावी तो अंजनासुत रयातें,
दुस्तर परंतु होय स्मरतां भवभंजना सुतर[4] यातें. २
लंकाधिदैवत करी कटकट कपिसीं; परंतु भंगे तें,
अघ खळ हि, नदी वेगें मागें सारील काय गंगेतें? ३
भी वात हि प्रवेशीं सुरमन हि न धरि परंतु शंकेतें;
सीतेसि अशोकवनीं पाहे शोधुनि समस्त लंकेतें. ४
दशमुख विनवि, परंतु श्री धिक्कारी तयासि, तो पाहे;
वाहे रोमांच, म्हणे, 'श्रीरामा योग्य हे सती आहे.' ५
मुद्रा दे, कुशल कथी; आधीं वचके, परंतु मग हर्षे;
कुशल पुसोनि तयावरि आशीर्वादामृतें सती वर्षे. ६
'स्कंधीं वाहुनि नेतों' तो वीर म्हणे परंतु ती हांसे,
वदली, 'जाइन, पडतां काळाचे शत्रुच्या गळां फांसे.' ७
कृतकृत्य होय मारुति, घे चूडामणिसमेत संदेश,
वंदुनि निघे, परंतु स्वमनिं म्हणे, 'वदविला न मंदेश[5].' ८
बहु सुद्रुम फळभारें लवले होते परंतु ते मोडी,

---

१. रामरूप मेघाची वीज (सीता). २. सागर. ३. स्वाधीन. ४. तरण्यास सुकर. ५. मूर्ख रावणाची गांठ घेतली नाहीं असा भावार्थ.

खोडी बळें चि करि तो, झोडी, वनपाळमस्तकें फोडी. ९
बहु राक्षसकटक वधी, मारी दशकंठनंदना अक्षा;
'भक्षा' गृध्रांसि म्हणे, 'पोसाल, परंतु आपणा रक्षा.' १०
घननादब्रह्मास्त्रा वश नच व्हावा परंतु सांपडला,
सुखें* दिधलें*, अत्यद्भुत हें, हा पाशांत वात कां पडला? ११
बांधुनि सभेंत नेला वोढूनि परंतु करुनि 'आ' सोसी,
दशकंठमुखें 'हा!' हें वदावयाची च धरुनि आसोसी[1]. १२
बोले, 'प्रभुपत्नीं तव मन लुब्ध परंतु यातुपा! परतो;
दीप्त[2]ज्वलन चि चाटिल जें राक्षसकटक या तुपा पर[2] तो.' १३
व्हावें नम्र परंतु क्रोधें दुष्ट प्रदीप्त करि पूंसें[3],
पेटउनि पलाशपुरी रडवी तो वीरनायक रिपूंस १४
पुर भस्म करि परंतु ज्वलन बिभीषणगृहा स्वयें रक्षी,
भक्षी बहु शत धीवर[4] उगळी विप्रा जसा महापक्षी[5]. १५
हर्षे परंतु सीतादाहभय धरी म्हणोन पुनरपि तो
पाहे देवीस, जसा पिवुनि गुरूक्तिस पुन्हां हि सुनर पितो. १६
होते महेंद्रशिखरीं चिंताकुल कपि परंतु ते धीरें
लंघुनि समुद्र, भेटुनि हर्षविले वृत्त कथुनि त्या वीरें. १७
अनुचित परंतु शिरले प्लवग बळें दधिमुखासि ताडून,
झाडून फळें, प्याले मधु पतिमत मधुवनांत झाडून. १८
कप्यपराध दधिमुखें सकळ कळविला परंतु तो राजा
हंसुनि वदे, 'सांग तयां द्रुत भेटा, आजि साधु! होरा जा.' १९
दधिमुख तसें चि कथि, ते कृतमंतु[6] परंतु न तिळ ही भ्याले,
धाले फळमध्वशनें हर्षें गर्जेत नभःपथें आले. २०
नमिती सांगद मारुति कपि सुगळा लक्ष्मणा घनश्यामा,
सीताकुशल पुसे त्यां, प्रिय धैर्य, परंतु न धरवे रामा. २१

---

१. इच्छा. २. पर दीप्तज्वलन चि. ३. पुच्छ. ४. कोळी. ५. गरुड. (आर्याभारत आदिपर्व गरुडोपाख्यान पहा). ६. अपराधी. * अपपाठ?

मारुति चूडामणि दे खुण, काककथानिरोप आयकवी,
असकृत् पुसे, परंतु प्रभुचें तें प्रेम कथिल काय कवी ! २२
प्रभु सर्व[1]पुमर्थाधिक आलिंगन दे, परंतु वदला हें,
'वपु देवुनि हि ऋणी मीं बापा! तूं उत्तमर्ण[2]पद लाहें.' २३
बहु असति परंतु म्हणति वाल्मीकिप्रमुख विप्र 'यासम हा.'
प्रभुच्या प्रेमें पावे मारुति होवूनि वि[3]प्रयास महा. २४

## युद्धकांड

विजयपद परंतु प्रभु विजयमुहूर्तीं बसे कपिस्कंधीं
यद्वार्णीं परमदहर गुण जैसा गंधहस्तिचा गंधीं. १
[4]तारांजनातनुजरथदाशरथिसहायकपिचमूभर्ता
उत्साह परंतु अतुळ [5]कपिकटकीं जयसमृद्धिचा कर्ता. २
प्रभुसह सुगळसुरक्षित सागरतीरास पावलें कटक,
अटक परंतु पडे, 'हा!' तो हि म्हणे कपटनर जगद्धटक. ३
अरिबंधु परंतु शरण आला, त्याला शरण्यवर पावे,
दे लंकाराज्य, करी यश जेणें सर्व ताप हरपावे. ४
प्रार्थी अजित परंतु [6]न कारितां अस्त्रप्रयोग [6]कर [6]जोडी,
सागर 'सेतु रचिल नल कपि' हें सांगे, तयासि विभु सोडी. ५
रचिला सेतु समुद्रीं शतयोजन लांब रुंद दश गावें,
कटकासि परंतु थिटा होय; प्रभुचें अचाट यश गावें. ६
कपिपति सुवेळशिखरीं चढुन उडुन पडुन वारि मुकुट उडवी,
तुडवी परंतु नुमजे अंगदसूक्तें हि खळ सकळ बुडवी. ७
प्रभुचें शिर धनु दावुनि खळ रडवी बहु, परंतु सीतेतें,
सरमा परमाप्ता ये, समजावी नाथघातभीतेतें. ८

---

१. सर्व पुरुषार्थांपेक्षां अधिक. २. सावकाराचें स्थान. ३. श्रमरहित. ४. तारासुत अंगद व मारुति हे दोन रथ ज्यांचे ते रामलक्ष्मण सहाय ज्याचे तो सुग्रीव. ५. पंतांच्या दप्तरांतील प्रतींत 'कपिकुळकटकीं' असा मात्रावर्धक अर्थात् चुकीचा पाठ आहे. चातुर्मास्यांचा पाठ वरीलप्रमाणें आहे. ६. एकिलें नाहीं.

युद्धीं अहिपाशांहीं घननादें बद्ध दाशरथि केले,
रडविलि सती परंतु त्रिजटा वदली, ‘उगी, न हे मेले.’ ९
‘हाय!’ म्हणे प्रभु युगळ हि तो हि बिभीषण, परंतु खगपति तें
संकट हारि, मारविले धूम्राक्षप्रमुख बहुत मग पतितें. १०
मग सौमित्रिस पाडी, दशमुख विधिदत्तशक्तिनें ताडी,
प्रभु मद परंतु झाडी, विरथ करुनि मार्ग दे, गृहा धाडी. ११
पावे पश्चात्ताप क्षणदाचर शक्रशत्रुचा बाप,
[1]शाप स्मरे परंतु न सोडी श्रीतें धरी मनीं पाप. १२
कष्टें घटकर्णातें उठवी, ज्या भीति देव देखाया,
राम परंतु वधी त्या वांटुनि गृध्रांसि दे, वदे, ‘खा या.’ १३
घटकर्णवधें रडला, मूर्छित पडला, परंतु सत्या [2]गीं
व्हाया वरदा विधिची दशकंधर आग्रहास न त्यागी. १४
त्रिशिरा कुमति नरांतक देवांतक सुत चतुर्थ अतिकाय
मेले, परंतु न लवे; मेल्यावांचुनि फिरेल मति काय? १५
त्रासे दडे, परंतु प्रेरुनि शरवृष्टि मेघरव ताडी,
कपि [3]सप्तषष्टिकोटी दाशरथी ही रणांगणीं पाडी. १६
सर्व व्याकुळ वदले बहु ‘हाय!’ परंतु पवनसुत रक्षी,
आणुनि ओषधिपर्वतशिखर उठावि, चकित कारि [4]अजितपक्षी. १७
ओषधिगंधें झाले दाशरथि विशल्य ते हि कपि सर्व,
तें शृंग पुन्हां [5]पोंवी मारुति अतिबळ परंतु गतगर्व. १८
मेले परंतु उठले, सुटले जाळीत कीश लंकेला,
दाहत्रस्त निशाचर पळतां वधिले त्यजूनि शंकेला. १९
घटकर्णसुत महाबळ मग कुंभ निकुंभ संगरा गेले,
मेले परंतु जाणों ते रावणदेह धरुनि रागेले. २०
त्यावरि वधिला खरसुत मकराक्ष प्रभुवरें परंतु रणीं
घनरव दाशरथिवधा ये त्या भिववूनि पळवि राजमणी. २१

---

१. वेदवतीचा शाप. २. वाणी. ३. सदुसष्ट कोटी. ४. गरुड. ५. पोंचवी.

मेघरव करी मायासीतांतें[१], परंतु सत्यसा वाटे,
दाटे प्रभुकंठ महाशोकें, सुगळोर तेधवां फाटे. २२
शोक चि राहु ग्रासी जो त्या तेजस्विसत्तमा रविला,
प्रबळ परंतु उडविला बिभीषणें तो हि मत्त मारविला. २३
वज्रधरास सुदुःसह घननाद परंतु तो मखावधिला[२]
पावों न देवुनि, रणीं काळिचा श्रीलक्ष्मणें सखा वधिला. २४
अघहत परंतु दुर्मति धावे सीतावधा धरुनि असितें,
ती 'हा!' म्हणे अरिमुखें पाहुनि जीं अपयशेंकरुनि असितें[३]. २५
कोणी न पुढें ठाके, भ्याला जन सर्व ही, परंतु कवी
वारी सुपार्श्व सुसचिव तत्काळप्राप्तहानितें चुकवी. २६
रावण दाशरथिवधा धाडी बहुकोटि सैन्य चतुरंग,
उरला परंतु एक हि न द्विरद न रथ न पत्ति न तुरंग. २७
अनहंकार परंतु स्वजनांत तदा स्वयें खळविराम
'हें माझें अस्त्रबळ त्र्यक्षाचें सम असें' कळवि राम. २८
समरा निघतां झाले उत्पात, परंतु तो महामानी
घाली गांठि प्रभुसीं, न तयाच्या स्वांतका महा मानी. २९
शतमख निजरथ धाडी तदधिक मारुति परंतु तो रामें
स्वीकारिला, तयातें द्याया यश मानदें यशोधामें. ३०
रण सप्त अहोरात्रें झाला निरुपम, परंतु तो कांहीं
नाहीं श्रमला रावण, गणिला दुर्घट तदंत लोकांहीं. ३१
शतधा खंडन केलें समरीं प्रभुनें परंतु न दहा तीं
सरलीं शत्रुशिरें तरि धरिला शर दिव्यदीप्तिनद हातीं. ३२
सर्वज्ञ परंतु प्रभु ऐसें दावी जगीं मनुष्यपण,
संकल्पें चि खपविता अरितें, कुतुकें चि शर धनुष्य पण. ३३
मातलि म्हणे, 'रघुपते! शत्रुवरि पितामहास्त्र सोडावें,
वज्राभेद्य परंतु द्विषदुर एणें पळांत फोडावें.' ३४

१. वध—पंत. २. यज्ञसमाप्तीला. ३. काळीं.

घटज रविहृदय सांगे, भास्कर ‘वर घे’ म्हणे, स्वयें मागे;
किति विधिकृतअस्त्रशर? प्रभुचरित परंतु गोड हें लागे. ३५
विध्यस्त्रें अभिमंत्रुनि विधिरचित शरें उरःस्थळीं ताडी,
नव्हता पडत परंतु प्रभु उर भेदूनि दशमुखा पाडी. ३६
जो आनंद प्रसरे दशमुखनिधनोदया[1], तया माया[2]
ब्रह्मांड गुरु परंतु क्षण ही न पुरे अयातयामा[3] या. ३७
सुर पुष्पवृष्टि वाद्यध्वनि जयजयकार नृत्य नुति गानें
झालीं बहुत परंतु स्वल्पें कल्यांसि राम बहु मानें. ३८
वधिला परंतु ‘केला धन्य’ असें तदनुजासि वदला हो!
‘दे जल बा! माझा ही हा बंधु तुझा तसा चि पद लाहो.’ ३९
राजा केला होता पहिला चि, परंतु तो दयानिधिनें
लक्ष्मणकरें बसविला, भक्त बिभीषण पदीं पुन्हा विधिनें. ४०
जाणे परंतु कळवी जें तद्वत लोकसार साक्षी तें
करवी दिव्य यशोर्थे, क्षणभरि दे शोक सारसाक्षीतें. ४१
श्रीरामें गौरवुनि त्रिजटा सरमा [4]केला सुपार्श्व यशें,
भक्ति दिलि, परंतु न बहु मानियलें बहु हि साधुरीतिवशें[5]. ४२
दशरथ भेटे, समजे श्रीविष्णु असें, परंतु लोभानें
शिर हुंगी, वंदूं दे पहिलासा सोडिला चि तो भानें. ४३
युद्धमृत सुधावर्षें हर्षें उठले, परंतु ते योध
अंतरले समरमखा बहु हळहळले सदैव सक्रोध. ४४
जाते प्रभुस हि नेते साकेता सबळ ते सखे तूर्ण;
केला परंतु पुष्पकयानमनोरथ रघूत्तमें पूर्ण. ४५
राज्ञी परंतु मानी निर्जितनाका[6] पुरास दँव, तारा

---

१. “दशमुखनिधनोदयीं” असा पाठ सरस होईल काय? २. मावण्याला. ३. नवा ताजा. ४. अशोकवनांत सीतेला रामांचें कुशल कळविणारी बिभीषण-कन्या. ५. सज्जनांच्या आचाराला धरून असणाऱ्या (रामें). ६. जिंकला आहे स्वर्ग ज्यानें (असें नगर). ७. वणवा.

भेटे सश्रींका भवतप्तांचा कापुरा सदवतारा. ४६
अरस परंतु रस भरुनि विभुनें पंपाविलाप चाखविला,
सीतेला पंचवटी अन्याश्रम चित्रकूट दाखविला. ४७
तुठवे परंतु आज्ञा राम भरद्वाजमुनिस वंदुनि घे;
निववुनि गुहा, तयाचा चित्तकरीचा मनोज्ञ अंदु[1] निघे. ४८
शांतें परंतु जेणें मातेचा नित्य अनय आठविला,
[2]त्यां स्वागम कळवाया श्रीरामें पवनतनय पाठविला. ४९
दूत परंतु प्रेमें राम चि भरतागमें पवनतनया
वंदी बहुदा, भेटे, होवूं दे आपणा अवनत न या. ५०
पुरधन[3] परंतु विभु भरतात्मा हा दास रामरायाचा,
परमघनाचा चातक न धरुनि परआसरा मरायाचा. ५१
मातेसीं वत्साची भेटि प्रभुसीं तसी च भरताची
म्हणति; परंतु अधिक हें क्षण टळतां हा शिखींत [4]भरता ची. ५२
हर्षें भुलला होता बहु भरत परंतु पादुका आधीं
नमुनि, मिठी मग पायीं घाली, त्या प्रभु म्हणे 'यशें साधीं.' ५३
ऋक्ष प्लवंग राक्षस भरत सुमित्रातनूज शोभविले,
होते विकट[5] परंतु त्रिदश तिहीं रूप धरुनि लोभविले. ५४
सुश्री परंतु राम स्वीकारी राजवेष शोभविता[6],
तो तरि तद्रहित कसा प्रभु खग मृग[7] काननांत लोभविता? ५५
कौसल्या सीतेतें तारेतें यूथपस्त्रिया अन्या
त्यांतें स्वयें चि शोभवि, इतरा होत्या परंतु ती धन्या. ५६
करिती पुरीं प्रवेश प्रभुसह रथहयगजादि यानाहीं,
सुर मुनि म्हणति, 'निरखिले मह बहुत, तुळा परंतु या नाहीं.' ५७
[8]पुर शोभविलें होतें पुरसंस्कारें परंतु शोभे तें

---

१. बंधन, बिडी. २. भरतास. ३. अयोध्या आहे धन ज्याचें असा भरत. ४. शिरता. ५. विरूप. ६. येथें 'शोषविता' असा हस्तदोष झाला आहे. ७. पंतदप्तरांतील प्रतींत हें पद मुळींच नाहीं! ८. अन्वयार्थ समाधानकारक लागला नाहीं.

प्रभुच्या व्यसु प्रवेशें प्राणांच्या धरि शरीर शोभेतें. ५८
त्या श्रीमत्साकेतीं होत चि आले परंतु हा भारी
राज्याभिषेक रामप्रभुचा अद्यापि वर्णितां तारी. ५९
अतिमहित परंतु जनें न तदा वैकुंठलोक आठविला,
स्वयशोरस साकेतें सर्वां लोकांस विपुल पाठविला. ६०
संसारीं बहु आधि व्याधि सदा ही परंतु रामाच्या
राज्यांत मुक्त्यधिक सुख सर्वांसि [1]अखिलविपाद्विरामाच्या. ६१
[2]अधिकृत हि चित्रगुप्त क्षण हि परंतु न करी वहि समोर;
यमदूतास जन प्रभुराज्यस्थ तसा, जसा अहिस मोर. ६२

## उत्तरकांड

सर्वज्ञ परंतु प्रभु कुंभजमुनितें पुसे दशास्यकथा,
सांगे तो हि सविस्तर लीलामनुजेश्वरा [3]सुपर्णरथा. १
विधिसुत पुलस्त्य सुतपा, तो न स्पर्शे परंतु दक्पातें
तृणबिंदु[4]सुता प्रसवे पुत्रातें, म्हणति विश्रवा यातें. २
त्यास भरद्वाज[5]सुताकुक्षिज वैश्रवण पुत्र होय नृपा!
राक्षस[6]सुता परंतु प्रार्थी, करि विश्रवा मुनींद्र कृपा. ३
मुनि शांत परंतु स्त्री खचरी जी कैकसी तिला पहिला
दशमुख, घटकर्ण, सुता शूर्पणखा हे भयप्रदा महिला. ४
चवथा पुत्र बिभीषण राक्षस्यात्मज परंतु हा साधु,
बाळ हि म्हणे निजमना 'मळ चिंतुनि शिवमुखा सुहासा धू.' ५
वैश्रवणबंधु अग्रज लंकेश भला परंतु दशतुंडा
त्याचें भाग्य न सोसे तपतां होय प्रसन्न विधितुंडा. ६
कपि नर न गणुनि इतरां सर्वांपासूनि अभयवर याची,
घटकर्ण वरी निद्रा, श्रमवी मति गुरु परंतु पर याची. ७
राक्षस परंतु मागे सुवर बिभीषण, 'रुचो सदा धर्म

---

१. सकल विपत्तींचा नाश करणारा जो राम त्याच्या. २. अधिकारी. ३. गरुड आहे रथ ज्याचा अशा रामास. ४. गौ. ५. देववर्णिनी. ६. कैकसी.

ब्रह्मास्त्र अशिक्षित दे न घडो ज्यांत न दया असें कर्म.' ८
चिरजीवित्व सुदुर्लभ तें हि न मागे परंतु दे धाता,
दशमुख हारि लंकेतें प्रथम चि गुरुच्या[1] करी मनोघाता. ९
[2]उत्तरदिक्पति शिवसख झाला वैश्रवण, सुहितसंदेश
प्रेषी तेणें खवळे दूतासि वधी दशास्य मंदेश. १०
भंगी गुरुस परंतु न चित्तीं हि दशास्य खळ परम लाजे,
पुष्पक हरुनि म्हणे, 'ते वधिन चि मुख[3] दावितिल पर मला जे.'
पुष्पक अडे शरवणीं,[4] तिळ हि न चाले, ढळे उपायशतें
बळवत् परंतु अमृता जें येइल काय हो! तुपा यश तें? १२
नंदीश[5] म्हणे, 'मानिसि साधारण वन परंतु हें शर्वें
शरवण अलंघ्य केलें, केलिस्थळ दूर सोडिलें सर्वें.' १३
हित कथि परंतु हांसे कपिमुख नंदीश्वरास ही पापी,
शापी, 'कपि वधितिल तुज' ऐसें कीं तो तया मदीं दापी. १४
स्थानभ्रष्ट कराया प्रभुतें उपडी समूळ कैलास,
दडपी परंतु तद्भुज, रडवी चिर देव[6]देव बैलास. १५
मरता परंतु केला प्रभुनें तो मुक्त करिसम स्तवनें,
जो वेदनार्त गर्जुनि मुखरें[7] चिरकाळ करि समस्त वनें. १६
गुरुपौत्री वेद[8]वती देवी धर्षण तिचें करी पापी,
'वधिन तुज' म्हणोनि जळे, अतिशांतिमती परंतु ती शापी. १७
यज्ञांत मुनि मिळाले होते जे त्यांसि दुष्ट जो मारी
वधिता चि मरुत्त, तया संवर्त परंतु आग्रहें वारी. १८
होते गयादि राजे सुसमर्थ परंतु ते तया वळले,
बळलेश न दाखविती कीं वर विधिदत्त सन्मुखें कळले. १९

---

१. वैश्रवणाच्या. २. ह्या पद्यांत परंतुत्वाला बाध येतो. ३. हें पद दुसरांतील पोथींत गळालें आहे. ४. हें शिवपार्वतींचें हिमालयावरील क्रीडावन. ५. शिवगणांतील मुख्य. ६. महादेव. ७. शंखध्वनीनें. ८. येथें हस्तदोषानें 'देववती' असें लिहिलें गेलें आहे.

विधि जरि न वारिता, तरि काळ कसा काळदंड आवरिता?
मत्त परंतु दशानन पडता चि सरोनि सर्व आव रिता. २०
[1]प्रबळतर निवातकवच त्यासीं दशकंठ रण करी वर्ष,
चतुरानन सख्य करी, मग माया सिकुनि पावला हर्ष. २१
जे असुर कालकेय प्रख्यात कदापि सोडिते न रण,
शूर्पणखापति दशमुखखड्गें चि परंतु पावला मरण. २२
वासुकिपुर वरुणपुर हि जिंकी अरि, सुंदरी स्त्रिया कन्या
अबळा रडति, परंतु क्रोधें त्या शापिती सती धन्या. २३
घननादसिद्धि ऐकुनि शुक्रमुखें भूप पावला तोष,
पाहे परंतु यजिले स्वसुतानें स्वरिपु देव हा दोष. २४
सांगे बिभीषण, 'हरिलि भगिनी कुंभीनसी बळें [3]लवणें'
ये तों चि निघे, गिळिलें मानधन जनें परंतु हें[4] कवणें? २५
अक्षौहिणी तयाच्या त्या चार सहस्र धांवल्या मार्गे;
ती नमुनि म्हणे, 'द्यावें त्वां अभय परंतु मज महाभागें.' २६
न वळावा चि परंतु द्रवला, दे अभयदान लवणातें,
भेटे प्रेमें, ऐसें जें कर्म न आवडेल कवणा तें? २७
मग मधुवनांत योजी तो सुरविजयाचिया समारंभा.
भोगी बळें चि[5] न गणुनि धर्मन्याय स्नुषासमा रंभा. २८
तें ती रंभा कळवी; नळकूबर धनदपुत्र [6]वरशील,
क्रोधें परंतु शापी 'करुनि बळात्कारकर्म मरशील.' २९
जिष्णु पुसे विष्णु वदे, 'अति दुर्जय हा परंतु भांडावें
सांडावें न स्वव्रत वीरें जें उचित तें चि मांडावें. ३०
मथिले राक्षस वदले दुःसह पविपाणिधाम सीमा या.
नाहीं, परंतु घनरव धरि [7]हरि पसरुनि तामसी माया. ३१

१. हें पद्य परंतुत्वाला बाधक आहे. २. रावणाची चुलत मावस बहीण. ३. या ठिकाणीं 'मधुनें' असा पाठ असावयास पाहिजे. ४. भगिनीधर्षण. ५. या पदानें परंतुत्वाला बाध आला आहे. ६. उत्तम स्वभावाचा. ७. वानर.

लंकेसि धरुनि नेला घननादें हरि परंतु विधि यत्नें
सोडवि अमरत्वप्रद होमज रथ या तदिष्टवररत्नें. ३२
श्रीराम म्हणे, 'स्वामी! निर्वीरा काय तधवां क्षोणी?
अनय करि परंतु तया मदपरिहरिता न भेटला कोणी.' ३३
घटजमुनि म्हणे, 'बांधी अर्जुन राजा दशानना, रामा!
सोडी परंतु पुरवी भूप पुलस्त्या महर्षिचा कामा. ३४
वानर परंतु वाळी दडपी कक्षेत तो दशास्याला,
या होय फाल्गुन मही श्रीमंताच्या जसी दशा स्याला[1].' ३५
श्रीराम म्हणे, 'स्वामी! बळ वाळीहूनि वातजीं तिपट
होतें, परंतु कां हा सुग्रीवाजवळ अबळसा निपट[2]? ३६
होतें परंतु याला निजबळ कळलें नसे असें स्वमतें.
गमतें असेल कारण सांगा, जें निबिड नाशितां तम तें.' ३७
मुनिराज म्हणे, 'रामा! क्षुधित शिशु परंतु उडुनि हा रविला
फळ म्हणुनि जाय खाया, याच्या तेजें चि राहु हारविला. ३८
राहु पळे हरिस कळवि, तो ये तद्गज हि फळ गमे याला
पाडी वज्रें ताडुनि हनु, सुज्ञ परंतु या अमेयाला[3]. ३९
रुसुनि जगत्प्राण[4] म्हणे, 'सृष्टि लया जेंवि तनुज मम जावी.'
द्रुहिण परंतु तया शिशु शस्त्रास्त्रावध्य करुनि समजावी. ४०
करि शिशुपणें उपद्रव ऋषि वदले 'प्राकृता मुलासम जो
वर्तसि, तूं त्या निजबळ न प्राज्य परंतु बा! तुला समजो.' ४१
कथुनि कथा प्रभुसत्कृत मुनि गेला स्वस्थळा तप कराया;
जनक हि परंतु लागे रामेतर सर्व ही सपक राया. ४२
स्वसहाय कीश राक्षस गौरविले पुत्रबंधुसे रामें,
प्रिय सर्व परंतु अधिक मारुति सत्कारिला दयाधामें. ४३
निंदेस्तव गर्भवती दयिता शुद्धा परंतु मोह दया
त्यजुनि त्यजिली, त्यागा कारण केला तदीय दोहद या. ४४

---

१. मेहुण्याला. २. केवळ. ३. अगण्य अशा मारुतीला. ४. वायु.

अपवादें सदयें ही घालवितां सुव्रता हि बाहेर
रडली परंतु झाला वाल्मीक्याश्रम चि तीस माहेर. ४५
अति नीच परंतु सुखी प्रभुनें केला उलूक कुतरा हो!
'सुतरा हो संसृति' कवि म्हणति मनीं, 'अजतनूजसुत राहो.' ४६
सीतापुत्र विलोकुनि शत्रुघ्नें धावया हरिख पविला
प्रभुवचनें लवणासुर अत्युग्र परंतु तो अरि खपविला. ४७
रचुनि पुरी मथुरा तो येतां प्राचेतसाश्रमीं राहे,
श्रीसुतकुशलवगीत श्रवण करि परंतु तो न त्यां[1] पाहे[2]. ४८
भिन्न न परंतु राज्यें आठां पुत्रांसि आठ दे राम,
शूद्र वधुनि मृतशिशुतें उठवुनि पुरवी द्विजातिचा काम. ४९
प्रभु गौतमीतटीं करि योग्या सरयू परंतु हयमेधा
वाल्मीकि हि ये ज्याची विधिमेधेचें हि न धरि भय मेधा. ५०
सुर मुनि वदले, 'दिसले शक्रादि कृताश्वमेध बहु लक्ष
हा चि परंतु गुरु जनीं कोण प्रभुसम सभाग्य कवि दक्ष?' ५१
गाती स्वगुरुनिदेशें कुशलव रावणवधप्रबंधातें[3],
तृषित क्षुधित परंतु श्रवणीं न स्मरति जन अंबंधातें[4]. ५२
स्वचरित परंतु रुचलें प्रभुस, कुशलव स्वपुत्र हें कळलें.
वळलें मन बाहेर चि जें जनकृतगर्हणेमळें[5] मळलें. ५३
केलें दिव्य परंतु प्रभु लोकप्रत्ययार्थ योजी तें.
ऐकुनि मुनिसह ये ती दे दुःख जनापवाद तो जीतें. ५४
'निंदिति लोक परंतु स्वच्छा जरि मीं असेन घे पोटीं.'
भूतें विनवि असें ती श्री, जीची स्मृति हरी अघें मोटीं. ५५
उलली भू, भूदेवी आली तत्काळ, भूसुता हर्षे,
जाय जसी माहेरा, प्रभु धरि परंतु अश्रुनें[6] वर्षे. ५६

---

१. कुशलवयोः—**पंत.** २. ओळखी. ३. कथेतें. ४. अप+अंध—**पंत.** जल व अन्न. ५. दोन्ही पोथ्यांत 'गर्हणेमळें' असा स्पष्ट पाठ आहे. दप्तरांतील पोथींत तर 'मुळें' चा उकार हरताळला आहे. ६. अन्य पाठ—**अश्रुतें.**

[1]प्रभु भूवरि कोपे, त्या चतुरास्य म्हणे, 'स्वतत्त्व समजावें,
तूं विष्णु, श्री सीता; तुमच्या स्मरणें हि सर्व तम जावें.' ५७
वचके परंतु जोडुनि, शमवाया कोप, हात आठ, वदे
विनयें प्रभुस 'प्रभु तूं ऐसा पद तो पहात आठव दे.' ५८
राम म्हणे, 'दे दयितारहित सदन कोप रंतुकामातें[2];
विषय तृण; धर्मपत्नी क्रतुस वद नको परंतु कां मातें?' ५९
विरही परंतु मुनिची श्रवण सकल सुकविता करी शांत;
विधिनें समाश्रितें ने हयमेधा चुकविता करीशांत[3]. ६०
अयुताब्द राज्य, सीता कनकमयी सकळ मख करी; रमती
सुजन परंतु, न विसरे प्रभु दयितेतें जसा शरीरमती. ६१
भेटविल्या निजताता श्रीकौसल्यादि सर्व ही माता,
होता परंतु उडवी कैकेयीवरिल रोष तो धाता. ६२
कोटित्रय गंधर्व प्रबळतर परंतु मारिले भरतें,
तत्पुत्रद्वय जें घे राज्यांचा त्या चि जनपदीं भर तें. ६३
लक्ष्मणसुत कारुपथीं रामें केले पुरद्वयीं राजे,
अवघड मुलांसि वाटे, वात्सल्य परंतु फार त्या[4] साजे. ६४
यावें वैकुंठातें हें प्रार्थायासि आपल्या ताता
प्रियकर परंतु अप्रिय करवाया काळ पाठवी धाता. ६५
'वदतां रहस्य येइल पाहिल तो प्रिय परंतु मारावा,'
काळ असा पण करवी; मग कोण भयें न दूर राखावा? ६६
त्राता परंतु ज्याचे भक्त असंख्यात नाव सद्द्वारीं[5]
त्या लक्ष्मणा प्रभु म्हणे, 'बहु सावध तूं चि बा! वस द्वारीं.' ६७
स्तविला परंतु रोषें खिजुनि म्हणे लक्ष्मणासि दुर्वासा
'श्री संतति च्यार तुम्ही या क्रोधदवीं करीन दुर्वा सा.' ६८
थोर परंतु कराया कुलक्षय दोषाविना शपथ करितो,

१. ही आर्या परंतुत्वाला अपवादक आहे. २. रमण्याची इच्छा करणाऱ्याला.
३. गजेन्द्राचा नाश. ४. अन्य पाठ–ते. ५. साधुसमूहांत.

हें जाणुनि सौमित्रि स्वेतरतोषा[1] विनाश पंथकरि[2] तो. ६९
मृदुल परंतु स्वहृदय परमकठिन करुनि विश्वपाळानें
विधिवचन मान्य केलें जें कथिलें विप्रवेषकाळानें. ७०
तो लक्ष्मण जाय, कथी मुनि आला हें; परंतु अविकळ[3] तो
मृतिसंकटीं हि निश्चळधैर्य; अशा लक्षणें चि कवि कळतो. ७१
प्रभु पूजुनि भोजन दे मुनि बह्वाशी[4] परंतु पायसदा[5]
तो 'अलमलं[6]' म्हणे, जो हारविता तृप्तिचे उपाय सदा. ७२
लक्ष्मणवध प्रतिज्ञारक्षण संकट पडे, परंतु कवी
आचार्य प्रभुसि 'वध त्यागसम' असें कथूनि तें चुकवी. ७३
'जा' प्रभु म्हणे परंतु न चित्तीं सौमित्रि शुचि हि रागेला,
वंदुनि कुळांतुनि जसा पदकांतुनि भव्यरुचि हिरा गेला. ७४
समजे तत्व, परंतु स्वमनीं वाईट देव रवि मानी,
देवानीं सीतेचा नेला वाहूनि देवर विमानीं. ७५
प्रभुची हि परंतु भरत राज्याज्ञा जी करी न साश्रु तितें;
घे अग्निहोत्र ऐसें बोधी त्या मान्य यति जसा श्रुतितें. ७६
अन्यपुरीपति केले ते योग्य, परंतु कुशलव तनय ती
न दिलि निजा कीं साधुनि घे जेंवि ज्ञान कुशल वतन यती. ७७
मधुरा[7] दूर परंतु प्रहर पथीं संपवूनि चोवीस
शत्रुघ्ना दूत कथिति वार्ता, सुर म्हणति जीस होवीसे[8]. ७८
दो पुत्रां दोन पुरें दे त्यांतें प्रिय परंतु सोडूनि
एक रथें धावुनि ये भेटे रामासि हात जोडूनि. ७९
पद अंगदासि देवुनि दूरस्थ परंतु पातला तूर्ण.
सुगळ तसा चि बिभीषण केला तत्काम राघवें पूर्ण. ८०
भक्त परंतु बिभीषण पवनतनय जांबवान् हि राहविला,

१. आपणाहून इतरांच्या संतोषार्थ. २. पतकरीत्यर्थः-**पंत**. ३. निर्भय. ४. बहून् अश्नाति अश्=भोजने-**पंत**. ५. खीर देणाऱ्या रामाला. ६. पुरे पुरे. ७. अन्य पाठ-**मधुरा**. ८. हवी, पाहिजे ( असें म्हणाले ).

प्रभुनें निजबोधामृत पाजुनि विश्लेशताप[1] साहविला. ८१
प्रभुवर सदार बंधुद्वययुगळसहित निघे, जना बाहे,
रम्यें गृहें परंतु न कोणी हि तदा तयांकडे पाहे. ८२
बहु पुष्करादि तीर्थें भूमिवरि, परंतु गोप्रतारा[2] या
प्रभुनें महिमा दिधला, नेणें पशुतें हि जो प्रतारा[3]या. ८३
पौर सुरसम चि, यांचीं होतीं च परंतु जीं लवत पातीं,
गुण तो धुवुनि सुरांच्या धरुं देति न अधिकता लव तपा तीं. ८४
वसले नवे, परंतु न गमले वैमानिकांसि[4] ते नवसे[4],
जनतेज विमानावरि पडलें, संकोच तन्मनीं न वसे. ८५
विधिनें स्वलोकसंनिध संतानक[5] लोक निर्मिला बरवा,
काळ महोग्र परंतु न तेथें त्याची तयां असे परवा. ८६
वसवी श्रीसीतेसह सुखमय वैकुंठनाम निजधाम,
शोभवि परंतु तो ही संतानकलोक भक्तवश राम. ८७
थोडें परंतु रामायण रामपदीं उदंड हो भावें,
लोभावें रसिकजनें या सुयशें सज्जनांत शोभावें. ८८

( वंशस्थवृत्त )

'परंतुरामायण' रामनंदनें
द्विजें मयूरें कृतनैकवंदनें,
यशें जयाच्या बहु विश्व तर्पिलें
प्रभूत्तमा त्या विनवूनि अर्पिलें. ८९

---

१. विरहताप २. तीर्थविशेष. ३. वंचायास. ४. विमानामध्यें बसणाऱ्यांस नवखे. ५. नामविशेष.

# रामायणअभंग

यज्ञासाठीं भूमी नांगरीतां धन्या । सांपडली कन्या सीतादेवी. ॥ १
जनकाची पुत्री दुर्जना दुर्मिळा । ती भार्या उर्मिळा लक्ष्मणाची. ॥ २
जनकाचा बंधू होता येकनिष्ठ, । वयानें कनिष्ठ, श्रेष्ठ गुणें. ॥ ३
तेणें भरतासी मांडवी दुहिता । दिली, जी सुहिता दोहीं कुळीं. ४
शत्रुघ्नाला दिली दुजी श्रुतकीर्ती, । जीची गाती कीर्ती पतिव्रता. ॥ ५
चवघी बहिणी भाग्यें जाल्या जावा, । त्यांचा गीतीं गावा सुसंवाद. ॥ ६
वनवासवृत्त सीतेसी पुसती । प्रेमें त्या सुसती तिघीजणी. ॥ ७
सीता म्हणे:—ऐका वनवासकथा, । परि मनीं व्यथा न धरावी. ॥ ८
चित्रकूटाहूनि पादुका घेऊनी । वियोग देउनी तुम्हीं आलां. ॥ ९
आम्हीं ही तेथूनी तसीं च निघालों, । वनांत रिघालों तिघेंजणें. ॥ १०

---

१. या रामायणास **'सीतागीत'** असें लोकप्रसिद्ध नांव आहे. दप्तरांत या रामायणाची अनाद्यंत अशी एक कविलिखित प्रत आहे. ५३ अभंग असलेलीं पहिलीं दोन व छापील क्रमाप्रमाणें १६६ पासून अखेरपर्यंतच्या अभंगांचें एक अशीं तीन पत्रें गहाळ झालीं आहेत. शिवाय हीं उपलब्ध पत्रें हि कच्च्या स्वरूपाचीं असल्यामुळें पंतानीं चातुर्मासेबोवाना पाठविलेल्या एका पत्रांत "चि० सौ० मुलींस वाचावयास पाहिजेत" म्हणून ज्या **'रामायणअभंगां'**ची पोथी परत पाठविण्याविषयीं निकड लाविली आहे त्या पोथीवरून चातुर्मास्यानीं केलेल्या नकलेंत व कोल्हापूरच्या दाजीबाच्या हि प्रतींत असलेले ६२ व ६३, ९१ ते ९८, १०० ते १०६ हे अभंग या कच्च्या पत्रांत आढळत नाहींत. तसेंच ९९ व १२६ या अभंगांपुढें कच्च्या पत्रांत अनुक्रमें दोन आणि पूर्वमुद्रित प्रतींत १७४ च्या पुढें एक असे पुढीलप्रमाणें तीन अभंग अधिक आढळतात—

**आला मजपासीं लंघुनीं समुद्रा । दाखवीली मुद्रा सखी माजी. ॥ १**
**वीर मुख्य मुख्य अष्टादश पद्में । ऋक्षकपिच्छद्में देवसारे. ॥ १**
**श्रीराम दयेचा मेघ त्यासमोर । प्रेमें दासमोर नाचताती. ॥ १**

लक्ष्मण भावोजी मार्गे, पुढें स्वामी, । मज आहें धामीं ऐसें वाटे. ॥ ११
न बाधे चि मज उष्ण क्षुधा तृषा, । तुम्हांपासीं मृषा न बोलावें. ॥ १२
जेव्हां कांहीं वाटे चालतां मीं भागें, । मुरडोनि मागें विलोकीती. ॥ १३
बाई ! काय सांगों स्वामीची ती दृष्टी, । अमृताची वृष्टी मज होय. ॥ १४
अत्रीच्या आश्रमीं नेलें मज वाटे, । माहेर चि वाटे खरेंखुरें. ॥ १५
अनसूया सती करी वेणीफणी, । आनंदाची धणी[1] दिली मज. ॥ १६
आजवरी वोली चंदनाची उटी, । आली नाहीं तुटी माळागुणीं. ॥ १७
ऋषींतें वंदीत गेलों गोदातटीं, । जेथें पंचवटी पुण्यस्थान. ॥ १८
भावोजीनीं केली माजी बहु सेवा, । ती त्या महादेवा ठावी असे. ॥ १९
तेथें शूर्पणखी भार्या व्हाया आली, । तिला माजी भ्याली चित्तवृत्ती. ॥ २०
भावोजीनीं तीचा कर्णनासाछेद । केला, कीं ते वेदशास्त्रार्थज्ञ ॥ २१
तीचा भावू खर होवूनीयां क्रुद्ध । करावया युद्ध आला बाई ! ॥ २२
चवदा सहस्र राक्षस पापिष्ठ । रणीं केले पिष्ट स्वामीनीं ते. ॥ २३
तीणें घ्राण रक्तें मुख मळवीलें, । वृत्त कळवीलें रावणासी. ॥ २४
छळाचा उपाय मनीं आठवीला, । दुष्ट पाठवीला मायामृग. ॥ २५
स्वर्णरत्नमय मृग म्यां देखीला, । तो सत्य लेखीला मनामध्यें. ॥ २६
गृहा आणावया मार्गे हरीणा मीं, । दुःख परीणामीं नेणोनीयां. ॥ २७
मज रक्षावया लक्ष्मणा ठेऊनीं, । निघाले घेऊनीं धनुर्बाण. ॥ २८
मायामृगामागें जगदेकशूर[2], । गेले बहु दूर अरण्यांत. ॥ २९
कपटी राक्षस जाणोनियां प्राण । घ्यावयासि बाण मोकलीला. ॥ ३०
तो बाण लागतां हृदय विदारी, । दुष्ट हांक मारी स्वामीवाणी. ॥, ३१
'हा सीते ! हा बंधो ! लक्ष्मणा ! ये धांवें, । अंतकाळीं यावें, भेटावया.' ३२
मज वाटे माझ्या स्वामीची च हाक, । सिरे कंप धाक हृदयांत. ॥ ३३
मीं म्हणें, 'भावोजी ! धांवा, रक्षा प्राण, । हे घ्या चाप बाण, उठा वेगीं.' ३४
भावोजी म्हणती, 'राक्षसाची माया, । कोण रामराया पाहों शके ?' ॥ ३५
वाटलें तें वाक्य सत्य परी खोटें, । जालें दुःख मोटें माझ्या मनीं. ३६

---

१. तृप्ति. २. जगांतील अद्वितीय शूर.

न वदावें तें चि बोलिल्यें मीं कोपें, । चित्त शब्दरोपें विदारिलें. ॥ ३७
'वांछितोसि दुष्टा! अग्रजाचा घात, । माझ्या आंगा हात लावावया. ॥ ३८
हात लावीतां चि सोडीन मीं प्राण, । शिरीं पादत्राण कोण वाहे? ॥ ३९
माझ्या दृष्टीपुढें नको राहों, जा च, । नरकींचा जाच मूर्त तूं चि.' ॥ ४०
ऐसी बाई! माझी ऐकतां चि वाणी, । डोळां आलें पाणी भावोजींच्या. ॥ ४१
मातेनें दापीतां वत्स पित्याकडे । जाय, तैसें घडे लक्ष्मणासी. ॥ ४२
साधुसी गांजीतां झालें सद्या[1] फळ, । सज्जनाचा छळ करूं नये. ॥ ४३
वाटेंत धनुष्यें ओढूनियां रेघ । गेले दयामेघस्वामींकडे. ॥ ४४
तों आला रावण होवूनी संन्यासी, । न कळे अन्यासी छद्म त्याचें. ॥ ४५
भिक्षा द्याया गेल्यें रेघेच्या बाहेर, । सासुरें माहेर बुडवाया. ॥ ४६
न लंघील्यें जरी धनुष्याची रेखा, । तरी त्याचा लेखा काय होता? ॥ ४७
रेघेच्या बाहेरी जसा दिला पाय, । झाला महाकाय दशमुख. ॥ ४८
जसा हरीणीतें हरीतो लांडगा, । तसा तो दांडगा हरी मातें. ॥ ४९
त्या पाप्याच्या स्पर्शें हा देह कोमेला, । आकाशीं तो मेला रथीं चढे. ॥ ५०
'हा राम! लक्ष्मण!' ऐसी हाक माझी । जटायू मामाजी आयकती. ॥ ५१
सखे दशरथमामाजींचे आप्त, । सोडावया प्राप्त जाले दैवें. ॥ ५२
जातीचे ते गृध्र वृद्ध मोटे शूर, । रथ केला चूर रावणाचा. ॥ ५३
चंचूनखायुध गृध्र युद्धदक्ष । रावणाचें वक्ष विदारीत[2]. ॥ ५४
अन्यायें रावण छेदी त्यांचे[3] पक्ष, । मज वाटे लक्षबंधूघात. ॥ ५५
मूर्छित मामाजी पडले भूवरी, । स्कंधीं वाहे अरी मला बाई! ॥ ५६
रडतां काढीले पांचसात नग, । वस्त्रखंडीं[4] मग बांधीले म्यां. ॥ ५७
पर्वतीं वानर देखील म्यां मग, । त्यांमध्यें ते नग सोडीयेले. ॥ ५८
शतगावें सिंधु, त्यांत एक लंका, । तेथें ने कलंका लावावया. ॥ ५९
नेवूनियां ठेवी अशोकवनांत, । न शोक मनांत माये माझ्या. ॥ ६०
सहस्र राक्षसी करिती रक्षण, । चिंतातीर[5] क्षण न सांपडे. ॥ ६१

---

१. सद्यः=तत्काल. २. कच्चा पाठ–विदारीता. ३. कच्चा पाठ त्याचे. ४. फडक्यांत. ५. चिंतेचा शेवट. (एकक्षणभर हि मी निश्चिंत नव्हतें).

दिव्यान्नांचा ज्यांत नानापरी थाट। धाडी नित्य ताट शक्रभार्या. ॥ ६२
दिव्यान्नाचें ताट ये मजजवळ, । भक्षीं मीं कवळ एकदोन. ॥ ६३
फिरले घेवूनी मारीच्याचे प्राण, । दिव्यधनुर्बाणपाणी मार्गे. ॥ ६४
मार्गीं लक्ष्मणजी करिती वंदन, । श्रीरघुनंदनचरणांतें. ॥ ६५
म्हणती, 'वत्सा! त्वां कां आज्ञा मोडीली?। एकली सोडीली कां ती वनीं?'
भावोजीनीं सर्व वृत्त कळवीलें, । मुख मळवीलें अश्रुपातें. ॥ ६७
ऐकोनी बोलीले स्वामी, 'झालें खोटें, । राक्षसानीं मोटें विघ्न केलें. ॥ ६८
दोघांच्या हृदयीं धडधड करी, । आले झडकरी धावोनीयां ॥ ६९
पर्णशाळेमध्यें देखिले कावळे, । स्वामींचा मावळे धैर्यसूर्य. ॥ ७०
केला आधीं फार शोध, मग शोक, । धन जातां लोक करी जसा. ॥ ७१
शोधितां वनांत मामाजी पाहीले, । धरूनीं राहीले कंठीं प्राण. ॥ ७२
पुसती, 'बापाजी! झाली हे कां गती?'। मामाजी सांगती अर्धशब्दें[1]. ॥ ७३
स्वामींपासीं माजें सांगतां हरण, । पावले मरण शोकभरें. ॥ ७४
'हा तात! हा तात!' म्हणोनीं रडले[2], । मूर्छित पडले घडीभरी. ॥ ७५
मामाजींची[3] सांग संपादिली क्रिया, । त्या काळीं हे प्रिया नाठवीली. ॥ ७६
पुन्हां वनीं मातें रडत शोधीती, । लक्ष्मण बोधीती नाना यत्नें. ७७
आलिंगिल्या वल्ली, वियोगें भ्रमले, । शोधितां श्रमले रात्रीदीस. ७८
वनीं कबंधानें केला होता घात, । च्यार कोस हात लांब त्याचे. ७९
धरितां खड्गानीं केला भुजच्छेद, । शाप ताप खेद निवारीला. ॥ ८०
मतंगमुनीच्या आश्रमीं शबरी, । व्हाया यश बरी युक्ति सांगे. ॥ ८१
हनुमंतावरी केली अनुकंपा । या प्रभुनीं पंपासरोवरीं. ॥ ८२
सुग्रीवासीं भेटी ऋष्यमूकीं झाली, । त्याची दृष्टी घाली पाहातां ची. ॥ ८३
त्यांच्या[4] मुखें वृत्त आयकीलें मग, । आणोनी ते नग दाखवीले. ॥ ८४
सुग्रीव वानर[5] सूर्याचा तनय, । ज्या स्वप्नीं अनय नाहीं ठावा. ॥ ८५
दोषावीणें रागें सुग्रीवासी जाची, । त्याच्या अग्रजाची बुद्धी खोटी. ॥ ८६

---

१. अर्धवट शब्दानीं. २. कर्ता 'राम'. ३. कच्चा पाठ–**मामाजीची**. ४. कच्चा पाठ–**यांच्या**. ५. मूळ पाठ–**सज्जन**.

बंधुची स्त्री वाळी बळात्कारें भोगी, । सुग्रीव तो जोगी केला होता. ॥ ८७
एकें[1] वाणें वाळी स्वामीनीं मारीला, । सुग्रीव तारीला संकटांत. ॥ ८८
वानरांचें राज्य दिलें सुग्रीवाला, । तो फार निवाला उपकारें.॥ ८९
माजी वार्ता कोणां नकळे किमपी, । पाठवीले कपी शोधावया. ॥ ९०
न लागतां माझा शोध कपी सारे । म्हणती ते, 'हा रे ! दुरदृष्टा[2] ! ॥ ९१
मारील सुग्रीव लंघीला अवधी, । मरावें नवधी[3] करूं नये. ॥ ९२
समुद्राच्या तीरीं पर्वतीं रडले, । मराया पडले उपोषीत. ॥ ९३
'धिक्कार आम्हांला, झालों सेवाचोरें[4], । व्यर्थ मृत्यु थोर खेद[5] वाटे. ९४
श्रीरामाची भार्या सोडवीतां मेला, । जटायु तो गेला सद्गतीसी.' ॥ ९५
ऐसें, जे बोलीले वाणी, दे कंपा ती, । विचारी संपाती गृध्रराज. ॥ ९६
वार्ता वाटे कानीं पडतां शंपा ती, । रडला संपाती बंधूशोकें. ॥ ९७
त्याणें सांगीतली त्यांला माजी शुद्धी[6], । त्याची कविबुद्धीसम दृष्टी ॥ ९८
शतगावें बाई ! मारुती उडाला, । पुण्यें न बुडाला सागरांत. ॥ ९९
पुरी शोधी होय सशोक मनांत, । अशोकवनांत मग आला. ॥ १००
तों रात्रीं रावण प्रार्थी, बडबडे, । बुद्धी गडबडे मारुतीची. ॥ १०१
पाण्यापरीस म्यां पातळ तो केला, । मग रागें मेला असें म्हणे: ॥ १०२
'दों मासांत मान्य, न होतां हे मारा, । राक्षसी हो ! चारा मास मज.'॥ १०३
ऐसें राक्षसींला सांगोनीं तो जाय, । म्हणे 'हाय ! हाय !' हनूमंत. ॥ १०४
हळूच मारुती सद्गुणसमुद्रा । वर्णी, मग मुद्रा मज दावी. ॥ १०५
निववी हृदय प्रियसखी मुद्रा, । काय सुधा क्षुद्रा नीववील? ॥ १०६
मज म्हणे, 'चाल, बैस माज्या स्कंधीं, । तूं दूर्गा, मीं नंदी, दास तूजा.'॥ १०७
तेव्हां मीं बोलील्यें, नेसील बा ! खरें, । परी नव्हे बरें असें जाणें. ॥ १०८
युद्धीं मारीतील यां मेल्यासी[7] स्वामी, । तेव्हां सुख बा ! मीं दाखवीन.'॥ १०९

---

१. कच्चा पाठ—**एकें चि**. २. दुर्दैवा ! ३. अन्य विचार. ४. कुचराईनें चाकरी करणारे ५. येथें नक्कल करितांना दाजीबानें 'दु:ख' असा पदरचा पाठ घातला आहे. अपपाठांचें पीक असें च वाढत जातें. दाजीबाच्या प्रतींत लेखकप्रमादानें असे अपपाठ अनेक झाले आहेत. ६. पत्ता. ७. कच्चा पाठ—**रावणासी**.

मग तें अशोकवन कपी मोडी, । राक्षसांचें झोडी बळें[1] सैन्यें[1]. ॥ ११०
मारील संगरीं, रावणाचा अक्ष । कुमार, जो दक्ष रणरंगीं. ॥ १११
इंद्रजिताला तो दाटूनीं सांपडे, । हनुमंत पडे ब्रह्मपाशीं[2]. ॥ ११२
रावणें वानर मानूनीयां तुच्छ, । पेटवीलें पुच्छ जाळावया[3]. ॥ ११३
पुच्छ पेटतां ची हनूमंत उडे, । लंकेमध्यें हुडे[4] वाडे जाळी. ॥ ११४
देवानीं वदनीं घातली आंगोळी, । लंकेची रांगोळी पाहोनीयां. ॥ ११५
विचारुनी मज जाय स्वामीकडे, । पायांवरी पडे हनूमंत. ॥ ११६
माजा समाचार ऐकोनीं हर्षले, । प्रेमाश्रू वर्षले स्वामी माजे. ॥ ११७
स्वामींस मद्वृत्त करी सुप्रसन्न, । जैसें दिव्य अन्न क्षुधार्ताला. ॥ ११८
हनूमंतावरी झाली दया मोटी, । उपकार कोटी मानीयेले. ॥ ११९
निघाले घेवूनी वानरांची सेना, । धरणी दिसेना सूर्यप्रभा. ॥ १२०
रावण धर्माच्या वाटे न लागला, । सांगोनी भागला बिभीषण. ॥ १२१
नायके रावण, क्रोधानळें पेटे, । श्रीमंतांसीं भेटे सिंधुतटीं. ॥ १२२
म्हणे, 'गुणकल्पवृक्षांच्या अरण्या! । दयाळा! शरण्या! रक्षीं मज.'॥ १२३
स्वामींचें शरणागतीं प्रेम प्राज्य, । दिलें लंकाराज्य वंदीतां ची. ॥ १२४
भेटला सागर जोडुनीयां करा, । म्हणे, 'सेतु करा, तारा मज.' ॥ १२५
शतगावें सेतू समुद्रीं रचीला, । पर्वतीं खचीला मार्ग मोटा. ॥ १२६
सेतुपथें सिंधु लंघुनीयां आले, । वार्तामृतें धाले कर्ण माजे. ॥ १२७
दूत पाठवीला दुर्जनभंगद । तेजस्वी अंगद वाळीपुत्र. ॥ १२८
स्वामींचा निरोप दोहीं लोकीं पथ्य, । सांगीतला तथ्य[5], अंगदानें. ॥ १२९
खळ नेघे वाक्य स्वामींचें तोखद, । न सेवी ओखद गतायुष्य. ॥ १३०
म्हणे, 'आम्हांपुढें बोलतें वांकडें, । मर्यादा माकडें टाकीली कीं. ॥ १३१
राक्षस हो! धरा, मारा, धांवा, चावा, । पळ न वाचावा हा मर्कट.'॥ १३२
आंगासीं राक्षस झोंबले चवघे, । झाडूनीं अवघे पिष्ट केले. ॥ १३३
उडतां मोडीली स्वर्णवज्रसभा[6], । मळवीली प्रभा रावणाची. ॥ १३४

१ कच्चा क्रम-**सैन्य बळें.** २. ब्रह्मास्त्राच्या तावडींत. ३. कच्चा पाठ-**मारावया.** ४. बुरूज. ५. वास्तविक, खरा. ६. सुवर्णरत्नखचितसभागृह.

धर्ममर्यादेच्या संकोचें थोपले, । अधर्में कोपले राक्षसां[1]च्या. ॥ १३५
ज्यांला चावावया वज्राहूनी गाढा । काळाच्या ही दाढा न शकल्या. ॥१३६
ते राक्षस लक्षकोटी बळपूर्ण । वानरानीं चूर्ण नखीं केलें. ॥ १३७
रक्तनद्या तेथें शतशा वाहिल्या, । देवानीं पाहील्या डोळांभर[2]. ॥ १३८
मारिले प्रधान, रावणाचे पोर, । त्यांत बळी थोर इंद्रजीत. ॥ १३९
रावणाचा भ्राता कुंभकर्ण काळ, । तेणें कपिपाळ धरीयेला. १४०
बहीणीची तसी त्याची करी गती । स्वयें कपिपती सुटोनीयां. ॥ १४१
जसे बेरे[3][4] गेरे, बहु कपिभट । तेणें गटगट गिळीयेले. १४२
पळाया त्यां[5] वाट मिळे कर्णीं नाकीं, । मिथ्या वर्णीना कीं जानकी मीं. १४३
प्रभुनीं हरिलें तत्तेज सर्व तें, । नुरावें पर्वतें वज्रापुढें. ॥ १४४
माजे स्वामी जाले त्या तमा तरणी, । यांची मात रणीं काय सांगों? १४५
इंद्रासी असह्य इंद्रजित, परी । मारीला तो अरी भावोजीनीं. ॥ १४६
वाहुनीं मस्तकें तोषवीला भर्ग, । कांपवीला स्वर्ग कैलास ही. ॥ १४७
तो काय सामान्य? परी झाला गर्व, । त्याचें[6] तेज सर्व वांयां गेलें. ॥ १४८
मारीला प्रभुनीं सहपारिवार, । उतरिला भार धरणीचा. ॥ १४९
उर्मिळे! मूर्छित तुझे माझे धणी । जाले होते रणीं सेनेसह, ॥ १५०
वांचवीले सर्व हनूमंतें बाई! । सांगों याचे काई उपकार? ॥ १५१
ओपधीपर्वत समूळ खाणीला, । पर्डीत आणीला जसा चेंडू. ॥ १५२
हनूमंतें आम्हां दिलें चूडेदान, । ऐसा नाहीं आनें[7] आप्त कोण्ही. ॥ १५३
उठले वानर अमृतवृष्टीनें, । स्वामींच्या दृष्टीनें हें चि सत्य. ॥ १५४
शिबिकेंत मज घालूनीं आणीलें, । देह ज्यां न्हाणीलें अग्निकुंडीं. ॥ १५५
त्या काळीं देवानीं केली पुष्पवृष्टी, । आनंदानें सृष्टी कोंदाटली. ॥ १५६
आले दशरथमामाजी विमानीं, । धन्या[8] जीवीं मानीं आपणा मीं[9]. ॥ १५७
देवांची प्रार्थना, मामाजींची आज्ञा, । केली सर्व प्राज्ञां सुखवाया. ॥ १५८

---

१. कच्चा पाठ—**स्वामी माजे**. २. कच्चा पाठ—**पोटभर**. ३. बरके. ४. कच्चा क्रम—**गरे बरे**. ५. पोटांत गेलेल्या कपिभटांस. ६. कच्चा पाठ—**तेणें त्याचें सर्व गेलें वांयां**. ७. दुसरा. ८. कच्चा पाठ—**धन्य**. ९. कच्चा क्रम—**मीं आपणा**.

मांडीवरी मज घेतलें स्वामींनीं, । घनीं सौदामिनी[1] जना वाटे. ॥ १५९
भृंगपतियुक्त[2] पुष्प कवी मानी, । पुष्पकविमानीं जैं बैसले. ॥ १६०
स्वामीनीं समुद्रीं दाखवीला सेतु, । भवाब्धींत हेतु तराया जो. ॥ १६१
रुंद दहा गावें, लांब शत गावें, । पाप न तगावें जो देखतां. ॥ १६२
दाविली किष्किंधा, भेटविली तारा । सुग्रीवाची दारा, जावूबाई! ॥ १६३
स्वामींच्या मुखींच्या ज्या ज्यां आयकील्या । गोष्टी, काय कील्या सर्वस्वाच्या.
'अवधी टळेल असें नच वदा, । असेन चवदा वर्षें वनीं.' ॥ १६५
ऐसा भरतासीं शत्रुघ्नासीं बोलें[3], । प्रभुनीं तो फोल केला[4] नाहीं. ॥ १६६
संतती संपत्ती वाढे, होय हित, । प्रेमें गातां गीत श्रीरामाचें. ॥ १६७
न बाधे पर्जन्य वात उष्ण शीत, । प्रेमें गातां गीत श्रीरामाचें. ॥ १६८
धन्य धन्य होय संसारीं जीवित, । प्रेमें गातां गीत श्रीरामाचें. ॥ १६९
काळापासूनी ही नव्हे चित्त भीत, । प्रेमें गातां गीत श्रीरामाचें. ॥ १७०
अंतीं वसे स्वर्गीं अमृतातें पीत, । प्रेमें गातां गीत श्रीरामाचें. ॥ १७१
श्रीरामातें ध्यावें, श्रीरामातें गावें, । श्रीरामातें भावें आठवावें. ॥ १७२
रामाचें चरित अमृतभरित, । सेवावें त्वरित सर्वांनीं ही. ॥ १७३
श्रीरामाचें गीत गातील ज्या कन्या, । होतील त्या धन्या संसारांत. ॥ १७४
या श्रीरामदयातोयदासमोर । होय दासमोर आनंदित. ॥ १७५

---

# आर्यागीतिमुक्तामाला

श्रीगणेशो जयति

सुख तें परम न माये भुवनीं जैं रामचंद्रपर मन माये,
न रुचे मधु रामातें गातां त्याच्या कथा सुमधुरा मातें. १

---

१. रामाचा वर्ण श्याम असल्यामुळें त्याला या अभंगांत मेघाची व पुढल्यांत भृंगराजाची उपमा दिली आहे. २. कच्चा पाठ–**भृंगराजयुक्त**. ३. संकेत. ४. कच्चा क्रम–**नाहीं केला**.

दुःखतमोरवि चारी रूपें घेवूनि दिव्य रुचिर विचारी,
विलया नेउ दरातें क्षितिच्या, ये दशरथांगनाउदरातें. २
राज्ञींच्या उदराशीं लाजे रत्नाकराख्य तो मुदराशी,
नृप सुकृतव्रत तींतें मानी फलितस्वसुसुकृतव्रततींतें[1]. ३
कौसल्योदरजातें रामाख्या सर्ववंद्यपादरजातें;
कैकेयीतनयाला 'भरत' असें नाम सर्वविदितनयाला. ४
वीर्यज्ञान[2] अतनु ज्यां त्यां दोघां सुंदरां सुमित्रातनुज्यां
'लक्ष्मण' 'शत्रुघ्न' असी अभिधा, जी नुरवि शत्रुहस्तांत असी. ५
बहु अनवद्या[3] सकळा आल्या गुरुपासुनी सुविद्या सकळा;
जननी तातपदा न त्यजिती, 'फळलें' म्हणे पिता 'तप दान.' ६
पंक्तिस्यंदन चवघे अमृताची देखतां चि नंदन चव घे;
न गणी शक्रपदासी; अमृतांधःस्त्री[4] गणी न तक्रपदासी[5]. ७
राम मुनीशक्रतुला रक्षी, साहे न बुधमतें शक्रतुला;
केली बहु सदपचिती[6] जी सत्कार्यघ्न पाप जनमद पँचिती[7]. ८
बुध ज्याच्या तम जाया स्मरति रजा त्या पदें चि गौतमजाया
उद्धारितां सदयातें वर्णी सानंद देवमुनिसद यातें. ९
कृतबळमदनवधनुतें[8] भंगुनि मिथिलापुरीं क्षणें भवधनुतें,
वरिली दानवशमनें सीता, कुतुकें न हर्निदानवशमनें[9]. १०
ज्वालापुंजमदग्निप्रभ[10] जो ज्या[11] शिव गुरु, पिता जमदग्नी[11],
तो जिंकुनि कुशिक जनीं त्र्यक्षाधिक हें चि ?ाविलें रसिक जनीं. ११
गुर्वाज्ञा परमहिता पुत्रांला पुण्यकीर्ति सुख परमहिता
राज्यसमान सजाय[12] प्रभु विपिना गणुनि तुष्टमानस जाय. १२

---

१. स्वतःच्या पुण्यरूप वेलीच अशांतें. २. पुष्कळ. ३. निकृष्ट नव्हेत अशा म्ह० श्रेष्ठ. ४. देवांगना. ५. तक्रप+दासी=(ताक पिणाऱ्याची दासी) मानवी स्त्री. ६. उत्तम प्रकारची पूजा. ७. पचविते. ८. केलें आहे मदनवधार्थ बळ ज्यानें त्या शिवानें स्तुत जो राम त्यानें. ९. अर्थ? १०. भडकलेल्या अग्नीप्रमाणें प्रभा ज्याची. ११. खोडलेला पाठ–**शिष्याशिष्य वीर्यनिधि जमदग्नि.** १२. सस्त्रीक.

पुत्रास नृप कवि ‘रहा’ न म्हणे, जाणे हि मृत्युदायक विरहा;
कारि जें करवी रमणी सत्यच्युतिभीत सुज्ञवर वीरमणी. १३
माता हि अलोभरतें गतपरमार्था विनिंदिली त्या भरतें,
दे संत्रास अहि तसा पुत्र हि तिस होय दुर्गुणें चि अहितसा. १४
[1]कविमौलिहिरा ज्यातें साधिलि नृप करुनि पातक हि राज्यातें
त्यातें हि न शिवला हो! कोण न घे सुज्ञ [2]सद्भजनाशिवलाहो? १५
घेउनि वून वनातें वांछि[3], तसा या भवा भिवून वनातें
जावुनि विभुला भरत प्रणाम कारि रामपादुकालाभरत. १६
‘होइन तापस राया! किंवा दे पादुका स्वताप सराया.’
पादभजनलाभरतें ऐसा रघुनाथ तो विनविला भरतें. १७
तेव्हां सुरनरतातें स्वपादुका अर्पिल्या स्वभजनरतातें.
गेला निजनगराला; विरहाहुनि भरत तीक्ष्ण गणि न गराला. १८
दुष्ट विराध वनाशी मुनिच्या पीडी तदा धराधव नाशी;
करुनि बहु कृपा, दर जें, तें हारिलें भुवनवंद्यतमपादरजें. १९
सुखविति गोदे, वसती करुनि तटीं, सानुजन्मनरदेव सती.
पातकिसंपर्कमळा हरिति जणों, लावुनीं तिला पद्कमळा. २०
स्मरशतजितरुचिराशी, लाजवि जो सर्ववस्तुंशी रुचिराशी,
पाहोनि त्रिभु लवाया चरणीं ये रावणस्वसा भुलवाया. २१
वांछा कळवि, धवाचे सीतेच्या गुण गणूनि बहुविध वाचे.
कंठीं पडतां रंडा, हांसे प्रभु धर्मनीतिरत्नकरंडा. २२
धाडी स्वानुजनिकडे, तों गेली उडत ते वनीं विजनि कडे.
दावी स्तन, वदन, कटी; तेव्हां कारि तीस तो [4]प्रियंवद नकटी. २३
नासाछेदनकुपिता म्हणे खराला, ‘तुझा जनांत न कुपिता.
नरदंडितभगिनीच्या त्राणीं क्लीबा! [5]मृषाभिधा! [6]जगिं नीच्या!’ २४

१. ज्ञात्यांच्या मुकुटांतील हिरा असा राम. २. सद्भजनानें होणाऱ्या कल्याणाचा लाभ. ३. कर्ता ‘राम’. ४. मधुरभाषी. ५. नामधाऱ्या! ७. जिवंत रहा.

पावे दंडा असती; दंडविते, बंधु आप्त जे जे असती.
चवदा[1] सहस्र रजनीचर वधवी प्रभुकरें चि, जे प्रखर जनीं. २५
जो निशिचरराज बळी, त्याच्या जावूनि ते अवीरा[2] जवळी,
मग कानानाकाच्या वृत्ता कथि हास्यदा जना नाकाच्या. २६
पव्यहृतोरा[3] गानें सुखविति गंधर्व ज्यास, तो रागानें
रावण फार खवळला, रामावरता, जसा चि अतिविख, वळला. २७
शोकत्रास सहाया संगें घे ताटिकासुतास[4] सहाया.
आला रामकुटीला तो, आणुनियां त्रिवक्रता भ्रुकुटीला. २८
दशमुख हा मारीच्या मृग करुनी, तुष्टिदा महामारीच्या,
मोहाया त्वरितगती धाडी, माया न जेथ पळभरि तगती. २९
कपटी राक्षस कळला, परि प्रियेच्या मताकडे प्रभु वळला.
होणार कोण चुकवी? विषयें व्यसनांत पडति गुणचंचु[5] कवी. ३०
तज्ज्ञत्वा न विसरला, परि राघव तो प्रियोक्तिला अनुसरला.
याचा हि भोग सरला; श्रीमंताची प्रवृत्ति केवळ सरला. ३१
ऐसें कळवी खळ हा दूरुनि, दुष्ट प्रियोक्ति लावी कळहा.
वज्रसहा स्त्रीवाणी दुःसह कुलज्यास जठरशस्त्रीवाणी[6]. ३२
दोष स्थापुनि लटिके, गांजावा भक्त, कीं घरीं न पल टिके.
हितवाणी विषवटिके स्तववी, जेथें अनर्थ तेथें घटिके[7]. ३३
कपटें बहुयत्नपरें[8] नेतां दिवसा च विभुवधूरत्न परें,
सुर म्हणति 'समीचीन[9]' प्रभुच्या गमलें 'भ्रमें' मतिस 'मीं ची न.'
जेथें प्रीति विशिष्टा, म्हणति 'न यांचीं[10] तया स्थळीं' कवि 'शिष्टा.'
मृग मागतां सुखानें, वियोग ये हांसत प्रसन्नमुखानें. ३५
वंशज सुगुणोदार स्त्रीचा होतो खरा चि जो मंदार[11],

---

१. खोडलेला पाठ–**रजनीचर चवदा ही सहस्र वधवी.** २. विधवा. ३. वज्रानें अभेद्य उर ज्याचें अशा. ४. मारीचास. ५. गुणी. ६. तीक्ष्ण तरवारीप्रमाणें. ७. घटकाभर, अल्पकाळ. ८. मूळ पाठ–**हरितां प्रभुचें हितें वधूरत्न परें.** ९. चांगलें. १०. याचना. ११. कल्पवृक्षविशेष.

कार्याकार्यविचार त्यक्त हि जो, तेथ आधिचा संचार. ३६
शत्रुतिमिरमित्रानें केलें बहु युद्ध पंक्तिरथमित्रानें.[1]
त्या पापापासून स्वबळें रक्षावया सुरूपा सून. ३७
युद्धीं फार खवळिला, जातां मार्गीं, मधें च दशमुख वळिला.
मरणभयें कांपविला; मग तच्चंचू न लाजवी कां पविला? ३८
आला काळ, कवळिला उघडुनि; धर्मेतरें दशास्य कवळिला,
म्हणुनि नसे विजय; वया बळा विलोकूनि, देव म्हणति 'जय वया[2]!'
चोरास सुगम तिमिरीं धन; हितकर[3] दुष्टलोचना गमति [3]मिरीं
अहित चि होतें हितसें ज्या, त्याला शिकवणें अहो! तें हि तसें. ४०
ते नंदनासमवनीं ठेवी, त्रिजटादि राक्षसी हि समवनीं.
'हे [4]तवकुळविलयासी,' ऐसें दुष्टाशि कोण कळविल यासी? ४१
खगमृगअगमा लवला प्रभु, विरहें ज्ञानदीप मग मालवला.
रडला राघव; दावीं तीं विषयि[5]विडंबनें कितेक वदावीं? ४२
त्रिभुवनपाल यशोधि प्रभु कांतेला वनीं कृपालय शोधी.
मरणोन्मुख चुलत्यातें पाहे तो, विरहवह्निचा चुल, त्यातें. ४३
आला निजकार्याला, जटायुला [6]म्हणुनि बंधुभजकार्याला
तर्पि रघूत्तम जनकापरि म्हणुनि म्हणे सुधी 'तदन्य मज नका.' ४४
[7]भुजसह पातकबंध छेदुनि केला वनीं कृतार्थ कबंध.
पूजी [8]श्रमणी शबरी, तीतें दे मुक्ति तो सुरमणीश बरी. ४५
पसरुनियां 'आ' च, मनामध्यें नसती सती, तरी आचमना
करिता मृत्यू तनुच्या रामाच्या स्त्रीवियोगसंज्वरतनुच्या. ४६
मानी तो निधन धन स्वमनीं, सीतेविणें गणी भुवन वन.
जाला बहु विकळ, कळ क्षण न पडे, युवतिची उदंड कळकळ. ४७
ज्याचें चरणतळ मळे लक्ष्मीकुचकुंकुमें, असा हि तळमळे.

---

१. जटायूनें. २. हे पक्ष्या! ३. मूळ पाठ—**खळकर्णांसि हितवचें गमति मिरीं**. ४. तुझ्या कुळाचा अंत करणारी तरवार. ५. विषयी लोकांच्या फजित्या. ६. खोडलेला शब्द—**अर्थ**. ७. मूळ पाठ—**छेदुनि पातकबंध अशिं**. ८. तपस्विनी.

घडिला न तसा विधिनें, जो नाहीं ताप पावला क्षण विधिनें. ४८
संयोग मधुपवनजासम घडला सुरनुतांघ्रिशीं चि पवनज्या.
सुग्रीव विपद्[1]वधिला नेला, वाळी हि शौर्यमदपद वाधिला. ४९
जे निरुपम कीश बळें, त्यांचीं दिङ्मंडळीं त्रिलोकीश बळें
धाडी दीनप हा या मनःप्रियेला दयानदीन पहाया. ५०
मारुति तो शत गावें उडे, न जेथें शरीर लेश तगावें.
ज्याच्या लहरी[2] तरला[3], त्या यादोनिधिसि सद्बळ हरी तरला. ५१
राक्षसदेवपुरा, ती सती पहाया, धरूनि लघु वपु, राती
शोधी मारुति; पर ते न दिसे; मग तेथुनीं महामति परते. ५२
त्यजिली लंका सारा, शोध करुनि फार, धृतकलंकासारा;
खिन्न कपि अशोकवनीं पाहे, रत रामकीर्तिच्या जो कवनीं. ५३
तों अवलोकी रमणी प्रभुची; मग तीपुढें, जसा कीरमणी[4],
वर्णन करि गुणतति[5]चें रामाच्या, जें त्रितापहर अमृत तिचें. ५४
धृतिमतिनीतिसमुद्रा वर्णुनि, दे अंजनाजनी[6] तिस मुद्रा.
ते तीतें सुखवि, धुनी देवांची तें न दे, न तें सुख विधुनीं. ५५
देउनि सुख परम तिला, जाणाया रावणप्रमुखपरमतिला,
नंदन[7] सप्रभवनिका भंगी जेथें लताद्रुमप्रभव निका. ५६
रावणसुत अक्ष, महासेना घेऊनि, ये रणा अक्षम हा.
त्यातें, करुनि दृढ कली, काळमुखीं मारुती बळासह ढकली. ५७
काय वदों मी? रण जें केलें रात्रिंचरांसह समीरणजें.
क्षितिवरि बहु पळ सांचे, राक्षस ते फुल्ल तरु जसे पळसांचे. ५८
त्यावरि फांसा पडला इंद्रजिताच्या परि स्वयें सांपडला;
गुंते मारुति पाशीं, जायाला राक्षसांचिया पतिपाशीं. ५९
पीडुनि हनन्नादा[8]नें, नेला तातासमीप घननादानें.

---

१. विपत्तिरहित केला. २. लाटा. ३. चंचल. ४. उत्तम पोपट. ५. पंक्ति. ६. मारुति. ७. मूळ पाठ—भंगी अशोकवनिका, जेथें नानालताद्रुमप्रभव निका. ८. ताडनबंधन—पंत.

[१]लूतागुणबद्ध करी, तसा च कपि तो न कौतुकें युद्ध करी. ६०
बोलविला दशतुंडें तो मारुति कोपपावकाच्या कुंडें.
यद्यपि खळ कृतमंतु, हित [२]सांगे त्यासि रामभक्त परंतु. ६१
"दशवदना! परमहिला दे; शोचितसे जगत्पती परम हिला.
मानुनि मानव, दावा करितां, पुढिला प्रसंग तो न वदावा. ६२
तापहरा, परम हिमा, भक्ति तयाची, असा जनीं पर महिमा.
तुज तो रिपुयम [३]हेलामात्रें मारील; दे तदीय महेला. ६३
पाहुनि रामास रणीं, धरिशील कुटुंबयुक्त अधमा! सरणी.
[४]विप्रभवा! नरकाला न जाय; ये शरण वालिवानरकाला. ६४
पाणी प्रभु उजवा या माथां ठेवील, वंश हा उजवाया.
तच्चरणा कर वीरा! नति, देती लाज जे [५]अरुणकरवीरां[६]. ६५
भरतादिक भावु घडी न विसरती, ज्यापुढें न विधु भा उघडी,
मदन रुचि[७]मद न मिरवी, ज्या [८]नखसंक्रांतिच्या मिषें चि नमि रवी.
ज्यांचे फळ शत[९]कोटी, येती ज्या मंतुच्या शरण शतकोटी,
त्या प्रभुच्या जठराशी पहा; जनीं तें च पळवितें हठराशी. ६७
रिपुबाळकचत्वर[१०] जें, संप्रति च विलोकिलें तमःसत्वरजें;
कर त्या हृदयास गडी; न हो दशास्या! तुजी पुरी हे सगडी. ६८
लक्ष्मीचें जें शरणें[११], द्विजचरणा जाहलें स्वयें जें शरणें[१२],
तेथें कोपस्फुरण क्षण हि नसो, हें च तवकुळाचें तरण. ६९
[१३]याचकदर्शन [१४]वलयां विलया ने, दावितो जनास नवल या,
[१५]दानोदक शैत्यहर क्वचित्क्वचिज्ज्यासि रात्रि तिसरा प्रहर. ७०

---

१. कोळीष्टकानें बांधलेला. २. मूळ पाठ—**बोधी**. ३. लीलेनें. ४. पुलस्त्यपुत्रा! ५. खोडलेला शब्द—**सुरक्त चकोर**. ६. अरुण व कण्हेर. ७. सुंदरपणाचा डौल. ८. नखांचे ठिकाणीं प्रतिबिंबित होण्याचे मिषानें. ९. वज्र. १०. अंगण. ११. **गृह**. १२. त्रातें. १३. याचकानीं घेतलें आहे दर्शन ज्याचें तो राम. १४. चक्र, वर्तुल, संकट. १५. या चरणाचा समाधानकारक अर्थ लागत नाहीं.

सुरपदपाचा[1] राजा जो म्हणतो 'मागत्यांसि पाचारा जा.'
याचक देखुनि फुलतो, म्हणवुनि मणिकनकवलय तटतट उलतो. ७१
रिपु म्हणती यमदंड, स्वाधार म्हणे जयाशि हें जगदंड[2],
ते प्रभुचे भुजदंड प्रेक्षीं, त्यां न स्मरो कदा कोदंड. ७२
देती नयनें[3] मिटक्या देखुनि, गेल्यावरि[4] प्रबोधक चिटक्या,
चोळया स्त्रींच्या सुटक्या, यत्पानीं पाणिकंकणाली फुटक्या[4]. ७३
पीतां ज्यास बुधालीं[5] चित्तीं अमृतांधसांहुनी[6] बहु धाली,
हर्षवितें अनिश[7] मन स्मरण जयाचें, किशोररोदनशमन. ७४
भवसूर्यातपहा[8] या प्रभुमुखविधुलागिं ये सुशांत पहाया.
साधु 'चिरं नंद[9]' तुला म्हणो; घडो शीघ्र तज्जनानंदतुला. ७५
तापार्तांची गळंती[10], जीपासुनि अमृतबिंदु शीतळ गळती;
जीणें रिपुमद पळती, प्रभुदृष्टि पडो तुजावरी क्षण पळ ती. ७६
वल्कलधारण याचें अत्यंत क्लेशबीज जनहृदयाचें;
साकेतीं द्विजबाला गायत्री रडविती[11], धरी जे बाला[12]. ७७
ज्याकारितां द्विज टांचा घांसिति, संबंध त्या अयोग्य जटांचा,
ऐसें जाणुनि, शापें केले वट संकट[13] कुटिल जटिलें[13] निशापें[14]. ७८
राघव देवतरु चिर स्वेष्टद सेवूनि, रक्ष जीवित रुचिर.
तुल्या भक्ति नउ; शिर स्थापीं त्याच्या पदीं, न लावुन उशिर." ७९
ऐसा हितबोध मना न रुचे; मग तो म्हणे पलाशाधम 'ना.'
वस्तुविचारें मुक्ता[15] काकाला कां न दुःख देती मुक्ता? ८०
मारुतिलांगूळाला लावुनियां अग्नि, वेष्टिती गूळाला
जेंवि पिपीलिक, सारे पलाश म्हणती 'पुढें उपाय कसा? रे!' ८१

---

१. सुरतरुचा—**पंत**. खोडलेला पाठ—**जो देवद्रुमराजा**. २. अंडाकार जगत्. ३. डोळे. ४. बरोबर अर्थ लागत नाहीं. ५. ज्ञानीसमूह. ६. देवांहून. ७. नित्य. ८. संसाररूपी सूर्यतापाचा शामक. ९. चिरंजीव हो, चिरायु हो. १०. संततधारा. ११. मूळ पाठ—**अप्रिया**. १२. या चरणाचा नीटसा अर्थ उमगला नाहीं. १३. मूळ पाठ-**हे जटी समस्त**. १४. चंद्रें. १५. विरहित अशा.

तों त्यांतूनि उसळला; लंकाप्रासादमंडळांत मिसळला;
अग्नीचा परम सण; क्षणांत भासे पुरी भयंकर मसण. ८२
रक्षोवधूमळवटीं कोपुनि आणूनि शत्रुला उमळवटी[1],
लंकेची मसणवटी करूनि, कपि रामचंद्रयश एकवटी. ८३
लंका गमे हँसंती[2]; देववधू चाविती जिभेशि हँसंती[3].
धूम्या[4] गगनिं श्रेणी[5] गमे दिवंगतपुरर्धिची[6] निःश्रेणी[7]. ८४
अशि होळीकालीला[8] करूनि, तर्पूनि पशुवधें कालीला,
भेटे सीताकमना[9], ज्याच्या कीर्तीपुढें सुधा ताक मना. ८५
सीताकुशळश्रवणें प्रभुच्या आनंद साधिला जो श्रवणें,
तो काय निवेदावा? संसाराचा जयास्तव निवे दावा. ८६
‘जो कीं नासमजं[10] वळीयोग्य, न तो ये सुहृज्जनासम जवळी;
त्वद्भजनास मज वळी त्या बोध, न पापभाजना समज वळी[11].’ ८७
मारुतिची अशि वाचा परिसुनियां, दूर दवडिता अशिवाचा
‘ऊठ’ म्हणे सुगळाला, वाळी ज्याच्या शरें हतासु गळाला. ८८
अगणितकपिबळसहित, त्रैलोक्य करावयाशि केवळ सहित,
सत्वर[12] राम निघाला; क्रोधानें घातला खरा मनिं घाला. ८९
वंदी[13] राघवचरणा बिभीषण, त्यजुनि पंक्तितुंडाचरणा.
जाला अर्णवि तरणापूर्वी लंकेचिया सुपात्र वितरणा[14]. ९०
बांधुनि[15] मकरालय[15], मावर उतरी, जें गमे बळ कराल[16] यमा.
व्यापी शत्रुनगर तें; भय धरिलें तें जनें त्रिकूटनगरतें[17]. ९१
करणें सहसा महित प्राज्ञ जनीं न स्थळद्वयीं साम हित;
म्हणवुनि अंगद यानें पाठविला रिपुकडे अभंगदयानें. ९२

---

१. उमाळा (?) २. शेगडी. ३. हास्यवती. ४. धुराची. ५. पंक्ति. ६. स्वर्गीय नगरीच्या वैभवाची. ७. शिडी. ८. होळीची लीला. ९. सीतापतीला. १०. समाधानकारक अर्थ लागत नाहीं. ११. वळी—**पंत**. १२. खोडलेला पाठ—**क्रोधें**. १३. ही गीति मागाहून रचून येथें समाविष्ट केली आहे. १४. दानाला. १५. समुद्र बांधून म्हणजे सेतु बांधून. १६. भयंकर. १७. त्रिकूट पर्वतावर असणाऱ्या.

अंगदवचन न मानी काळग्रस्तायु तो दशानन मानी.
जाला सुविकळ हालापानेंसा प्रभुसवें करी कळहाला. ९३
वधिली सेना सकळा; न ठेविली लेश राक्षसेनास कळा.
मरणास चि [1]वलयोला बांधुनि येवूनि, जाति सचिव लयाला. ९४
वीर्यनिधि, [2]स्वापरती, जो हुंकृतिनें पविप्रहरणा परती,
प्रभुनें क्रोधपदमनें वधिला तो कुंभकर्ण [3]निष्कृपदमनें. ९५
आणुनियां ओषधिला, आराधी मारुती जगत्तोषधिला.
क्षतशल्यश्रमहरणीं दावी प्रभु दुष्टलोकनाश[4]महें रणीं. ९६
करुनि बळें [5]असमरणा, दे लक्ष्मण वीर इंद्रशत्रुस मरणा;
तेव्हां विजयभरवसा धरुनि, म्हणति अमर 'हरुनि आधिभर,वसा.' ९७
मग सुत्रामा [6]तळिला प्रभु सुखवायास पाठवी मातलिला.
अनुचित चि [7]अपरथातें रण, म्हणवुनि राम घे सुरूपरथातें. ९८
रावण ये संग्रामा द्याया साफल्य रामशस्त्र[8]ग्रामा,
[9]देवां कपटोग्रा मा अर्पुनियां जावयाशि काळग्रामा. ९९
[10]रामतुळापावरती नाहीं, परि दशमुखें प्रळापा वरती;
त्या [11]दुर्वाग्जनकानीं अंगुलिका [12]वसविल्या महाजनकानीं. १००
ते समरांत [13]नगमती पाहुनि चित्रापरी पुरातन गमती.
रामदशास्यसमर तें विचित्र गणिलें मनीं [14]बळप्रशमरतें. १०१
समरीं लोकेश तदा खंडी प्रतिमस्तकाशि आरिच्या शतदा;
त्यावारि [15]विजितरविशिखें वधी अगस्त्यप्रदें प्रखरतरविशिखें. १०२
तेव्हां रामा लवले सुर, ज्यांचे ताप सर्व ही मालवले.

---

१. हातांत कंकण बांधून. २. निद्राप्रिय. ३. निर्दयांचें दमन करणाऱ्यानें. ४. आनंद. ५. अपूर्व युद्धाला. ६. खालीं, भूलोकावर. ७. रथहीना. ८. समूहाला. ९. मूळ पाठ–**अनुज्याशि समग्रा**. १०. रामाच्या बरोबरीचा अत्यल्प अंश. (गंगाजमनी समास आहे). ११. दुष्ट भाषणें करणाऱ्या (दशमुखानीं). १२. मूळ पाठ–**शिरविल्या**. १३. अचलबुद्धि. १४. इंद्रें. १५. जिंकिली आहे सूर्यज्योति ज्यानें अशा.

मृत वानर वांचविले; हृदयकरंडांत गुणमणी सांचविले. १०३
यावच्चंद्रार्कमही बिभीषणा दे पुरी त्रिलोकोत्तम ही.
न गणी दिव्यश्रम ही सीता; दे हर्षे सज्जना राम मही. १०४
दे हृदया नाव रती जीचें, ती मूर्ति पुष्पयानावर ती
बैसुनि ये, भरतातें सुखवी, ज्या दीधला धराभर तातें. १०५
न्यायें सुखवि प्रकृती, गाती ज्यातें अमर्त्यमुखविप्र कृती.
जन धनदा लाजविती राघवराज्यांत, देवतरु लाज विती. १०६
राज्य करुनि अयुत समा, प्रकृती संरक्षिल्या निजापत्यसमा.
अंतीं निजधामातें नेल्या, संपूर्ण करुनियां कामातें. १०७
ऐशी ज्याची लीला, त्या रामाच्या मनोज्ञपदयुगलीला
संतत माजी विनती, 'इच्छा पुरवू यथार्ह, जी विनविन, ती.' १०८
हृदयाकाशीं राघवकरुणामेघाशि पाहतां स्वसुखानें,
आर्यागीत्यष्टोत्तरशतकेका प्रकटल्या मयूरमुखानें. १०९

इति श्रीमद्रामनंदनमयूरेश्वरविरचितरामभद्रचरित्रगुणग्रथिताष्टो-
त्तरशतार्यागीतिमुक्तामाला समाप्ता ॥ अनयालंकृतोस्तु
विद्वत्कंठः श्रीरामः ।

---

# मत्तमयूररामायण

( मत्तमयूर )

श्रीचा[1] भर्ता दिग्रथभूपात्मज झाला, कौसल्येच्या तो उदराला प्रभु आला.
त्याला ज्ञाता तात, जगत्तारक नाम स्थापी प्रेमें 'राम' असें सत्सुखधाम. १

---

१. सुंदर. २. पंतानीं संकल्पाप्रमाणें रामायणांची अष्टोत्तरशत संख्या करण्याला कंबर कसल्यानंतर प्रत्येक रामायणाची स्वतंत्र पोथी न करितां या रामायणापासून क्रमानें एकापुढें एक पत्रांक टाकून एक मोठी पोथी तयार केली आहे. ह्या पोथीचीं १ ते १७१ (दशमस्तोत्ररामायणांतील ६८ व्या गीतीअखेर) व २०८ ते २२१ पत्रें उपलब्ध आहेत. १७२ ते १७३ असे क्रमांक घातलेल्या एका जोड पत्राची

कैकेयीचा नंदन झाला प्रभु अंशें, केला भूषा तो भरत श्रीरविवंशें,
दोघे भव्या पात्र सुमित्रासुत ते, ज्या नाहीं सीमा लक्ष्मण शत्रुघ्न हि तेज्या.
वेदीं शास्त्रीं सर्व वसिष्ठें पढवीले, तेजें माथां साधुसभेच्या चढवीले,
विश्वामित्रें सानुज राम प्रभु नेला, सर्वास्त्रज्ञ स्वाध्वररक्षा[1] क्षम केला. ३
यज्ञध्वंसीं जे रत ते राक्षस मारी, पादस्पर्शें राम अहल्येप्रति तारी,
लीलेनें चि त्र्यंबकचाप प्रभु मोडी, सीता कन्या जी जनकाची तिस जोडी.
चौघांचे ही भव्य विवाहोत्सव झाले, आले तेथें जे जन ते सर्व हि धाले,
भ्याले तेजें राक्षस जे घालिति घाले, [2]व्यालेशादि प्राज्य यशःसद्रस प्याले.
क्षत्राराति त्र्यंबकशिष्य स्मय[3] सोडी, श्रीरामातें जाणुनि तत्वें कर जोडी,
दावी लोकीं शुद्धयशीं फार चि गोडी, कैकेयीचें चित्त न भू घेउनि मोडी. ६
जें ताताचें सत्य तयातें प्रभु रक्षी, राज्य त्यागी, वल्कल घे, [4]वन्य हि भक्षी;
सीता भ्राता घेउनि गेला वनवासा, राहे शैलीं पर्णगृहीं तो न नवासा. ७
शोकें मेला तात, कळे हें, पर तो न, भ्रात्याच्या ही प्रेमगुणें, ये परतोन.
कैकेयीचा पुत्र हि देहादि न पाहे, नंदिग्रामीं वल्कजटा वाहुनि राहे. ८
अत्र्यादिश्रीकुंभजपर्यंत महर्षी वंदी झाले ते मुनि जातां [5]तम हर्षी.
ताताचा जो गृध्र सखा, त्या सुख दे हा. सेवी प्रेमें पंचवटींत च्छदगेहा[6]. ९
आर्याज्ञेनें लक्ष्मण नासा श्रुति खंडी, दुःशीलत्वें शूर्पणखेतें प्रभु दंडी,
रक्षःसेना मारवि ती दुर्मति चंडी[7], वार्ता झाली वैरिजनीं केवळ थंडी. १०

---

मागाहून कोणीं तरी जोड दिली असून त्यावर सदर स्तोत्ररामायण पुरें केलें आहे. १७२ ते २०७ पर्यंतचीं व २२१ च्या पुढें असतील तेवढीं मूळ पत्रें गहाळ झाल्यामुळें अष्टोत्तरशत रामायणांपैकीं कित्येक रामायणें अनुपलब्ध झालीं असून निरोष्ठ, दाम, परंतु, मंजु वगैरे कांहीं रामायणांच्या मूळ प्रती अनुपलब्ध झाल्या आहेत. पूतरामायण अनारंभच सांपडतें, तर मंचरामायणाच्या आरंभाच्या ५४ कवितांच्या पुढील भाग चातुर्मास्यांच्या साग्र पोथीवरून पुरा करून घ्यावा लागतो.

१. आपल्या यज्ञाचें रक्षण करण्यास समर्थ असा. २. शेष वगैरे. ३. गर्व. ४. रानफळें वगैरे. ५. अज्ञान, संकट. ६. पर्णकुटिकेला. ७. उग्र स्त्री.

रक्षोराज स्वर्णकुरंग द्रुत धाडी, त्या *नाथासीं भूजनिसीं अंतर पाडी,
ने सीतेतें तो खळ, गृध्रास हि मारी, दे शोकघ्ना शोक, सुरेंद्राहित भारी.
शून्या पाहे स्वच्छदशाला, बहु शोधी; हा! हा! बोले, लक्ष्मण नानापरि बोधी.
शोकीं शोक प्राप्त दुजा दारुण होय; प्रेमें, धैर्यें, दे परि गृध्रा प्रभु तोय. १२
अत्यंतोग्रा राम कबंधा मग मारी, वारी शापा जेंवि विराधा प्रभु तारी.
भेटे श्रीचा नाथ [1]तपःश्रीकबरीतें पूजा घे, दे सद्गति, भक्ताशबरीतें. १३
पावे पूर्वी सानुज लोकेश्वर पंपा, तीच्या तीरीं आठवुनि श्री मग कंपा.
भेटे आधीं मारुति सुज्ञ प्रियवक्ता, तो सुग्रीवा भेटवि रामा हितभक्ता. १४
एकें उग्रें भेटुनि बाणें उर वाळी मारी, राम श्रीश सुकंठा कुरवाळी.
दे कीशांचें राज्य तया, तो कपि योध प्रेषी श्रीचा शीघ्र करायास्तव शोध.
संपाती दे सांगुनि; लंघी जलधीतें, शोधी लंका, मारुति मोही खळधीतें.
श्री धिक्कारी दिग्वदनातें कपि पाहे, रोमांचातें तो निजदेहीं कवि वाहे. १६
श्रीतें भेटे, देवुनि मुद्रा हरि शोका, ती वाताच्या दे निजचूडामणि तोका.
वृक्ष ध्वंसी, रावणपुत्रा वधि अक्षा, मेघध्वाना सांपडला संगरदक्षा. १७
राज्यापासीं बांधुनि नेला, कपि हांसे, सर्वांगींचे केवळ मानी तृण फांसे.
संकोचातें सोडुनियां, जें फळ भावी दुष्कर्माचें, बोलुनि तो स्पष्ट चि दावी.
कोपें बोले रावण तो, ‘ या अतितुच्छा दंडा; याच्या दीप्त करा सत्वर पुच्छा ’
लांगूलातें पेटवितां क्षिप्र उडाला, भंगी [2]रक्षोवीरबळा, जेंवि [3]कुंडाला. १९
लंकेची तो कीश मुहूर्तें करि होळी, ‘हा! हा!’ बोले रावण, कोपें कर चोळी.
श्रीरामातें भेटुनि चूडामणि दे हा, भेटे राम, श्रेय चि याच्या गणि देहा. २०
शत्रूच्छेदा राम निघाला अतितेजा, उत्साहातें देति कपींचे पति ते ज्या.
पाथोधीच्या उत्तरतीरा अज पावे, ज्याचे पाय, त्यागुनि सर्वस्व, जपावे. २१
ज्याची धर्मीं धी, अनुजन्मा, हितवक्ता जो, त्या त्यागी रावण धिक्कारुनि भक्ता.
दावग्रस्ता सोडुनियां जेंवि अरण्या यावें, तैसा ये, नमि तो विश्वशरण्या. २२
त्या दे लंकाराज्य नमस्कारपरा हा लावी दास्या राम म्हणायास परा ‘हा!’

---

१. तपःश्रीनें युक्त केशभार जिचा. २. राक्षसवीरांच्या सैन्याला. ३. कांब-ट्यांच्या अडोशाला. * मूळ–नाथांसी.

भेटे सिंधु, प्रार्थुनि तो बांधवि सेतु; प्राज्याघाला होय तराया पर हेतु. २३
पावे सेनासिंधु तया सिंधुतटाला, लेखी वाजी तो न परा सैन्यतटाला.
प्रारंभीं च प्रेक्षुनि दुष्टाप्रति ताडी, राजा खालीं तन्मुकुटा त्यास हि पाडी. २४
श्रीरामाचें मस्तकचाप भ्रमवाया दावी श्रीतें घालुनि शोकीं भ्रमवाया.
तीतें सांगे भेटुनि भक्ता सरमा, 'या मद्वाक्यातें जाण खरें, हे परमाया.' २५
राम प्रेषी वालिज जो अंगद दूत, क्षोभे मंत्रे त्या मळधी रावणभूत.
प्रासादातें भंगुनि मारी धारित्यांतें 'हा!' घोकाया लावि जयें, जे आरि त्यांतें. २६
झालीं भारी राक्षसकीशांसह युद्धें, क्रुद्धें सैन्यें राम करी मारुनि शुद्धें.
मेघध्वान व्याळमयोग्राद्भुतपाश क्रोधें घाली, वांछुनि सीतापतिनाश. २७
सीता पाहे 'हाय!' वदे तों, 'सखि घोका नाहीं,' सांगे हें त्रिजटा, त्या हरी शोका.
तार्क्ष्यें केले पाशविमुक्त प्रभु दोघे, पूर्ण प्रेमें श्रीपतिच्या सद्यश तो घे. २८
सीताभर्ता स्वाश्रितसर्वा सुखहर्ता, 'न्यायें वर्ता' जो म्हणता पद्मजकर्ता,
मारी मत्ता त्या घटकर्णा कपिकाळा, व्याळा जैसा तार्क्ष्य, जया दे यम टाळा. २९
ब्रह्मास्त्रातें योजुनि सर्वांस हि ताडी मेघध्वान, व्याकुळ रामास हि पाडी.
तेव्हां आणी मारुति ओषध्यगशृंगा, त्या स्वामी दे श्री निजपादांबुजभृंगा. ३०
मायाश्रीतें मारि खल क्षिप्र भुलाया, तत्वें मेघध्वान न लक्षि प्रभुला या.
सांगे भेद, स्वस्थ करी सर्व हि खेदी छेदी त्याचा लक्ष्मण मूर्धा, स्तवि भेदी. ३१
सीताघाता जाय धरूनि प्रखरासि, क्रुद्धा वारी त्या हि सुपार्श्व प्रखरासि.
धाडी सेना पुष्कळ रामास वधाया, धी कैंची या? कीं वारि कामासव धाया! ३२
मारी सारी राम मूहूर्तें अरिसेना, मोटा खोटा सामकथा ही परिसेना.
युद्ध क्रुद्धस्वांत करी आपण, ज्याला नाहीं काहीं भी, न वळे हा पैणज्याला. ३३
सौमित्रीच्या शक्ति उरीं रावण हाणी, तेव्हां ही तें मारुति शृंग द्रुत आणी;
शक्र प्रेषी स्यंदन, हा त्यावर वेघे, आशीर्वाद श्रीश मुनींचे बरवे घे. ३४
तो सप्ताहोरात्रमितें संतत काळें केला प्रेत क्रव्यभुगीश क्षितिपाळें.

---

१. अत्यंत पापी रावणाला. २. सैन्यरूपी जें लहानसें तट्टु त्याला. ३. गरुडानें. ४. यशें शोभा–**पंत.** ५. बिभीषण–**पंत.** ६. कामरूपी मद्य. ७. ब्रह्मदेवाला. ८. राक्षसपति रावण.

तेव्हां देव ब्राह्मण आनंदित झाले, आले होते जे, यश ते सेवुनि धाले. ३५
वाद्यें नृत्यें सुस्तवनें सुस्वरगानें श्रीरामानें सूचविलीं स्वस्वरगानें.
जो लीलेनें सर्व जगा देव वितो या, तो दिक्कंठा बंधुकरें देववि तोया. ३६
लंका त्याच्या बंधुसि दे, आणवि सीता, ती शुद्धा ही दिव्य करी लौकिकभीता.
भेटे राजा दिग्रथ, त्यातें प्रभु वंदी, ज्याचे वेद ब्रह्मशिवेंद्रादिक बंदी. ३७
युद्धीं मेलें जें, उठवी तें कपिचक्र, श्रीशें केला भव्ययशोभाजन शक्र.
स्थापी राजे सानुज आधीं, मग राम श्रीमान् बैसे पुष्पकयानीं सुखधाम. ३८
श्रीतें दावी युद्धमही, सेतुपथा या वर्णी, लागे सर्व वियोगार्ति कथाया.
किष्किंधेतें पाहुनि मागे वर राणी, रामाज्ञेनें कीशप तारेप्रति आणी. ३९
पंपा दावी त्यावरि लोकेश बरीची वर्णी रीति, प्रेमळता, त्या शबरीची.
दावी गोदा पंचवटी गृध्रवटातें, पावे हर्षें देवनदीभव्यतटातें. ४०
राम प्रेषी वायुसुतातें कळवाया, त्याच्या शोका स्वागमतोषें पळवाया.
मोही विश्वप्राणसुताला भरताची रीति श्रेष्ठा रामकथालाभरताची. ४१
वंदी प्रेमें राम भरद्वाजमुनीतें यत्कीर्तीसीं सख्य रुचे देवधुनीतें.
कौसल्येचा वासर तेथें सुत राहे, 'संधा केली त्वां चि' म्हणे 'बा! सुतरा हे.'
भेटे विश्लेषातिविपद्गीतगुहातें, वाटे स्पर्शें तो स्वखगा शीतगु हातें.
कैकेयीचा पुत्र खरा चातकसा हो! राम श्रीमान् मेघ म्हणो घात कसा हो?
स्वामी जाणे पावककुंडीं भरता तें; भेटे उक्तस्वावधिकाळीं भरतातें.
त्याच्या माथां देवविला जो भर तातें तो घे, दे जें इष्ट, यशोलोभरतातें. ४४
जो साकेतीं जीव, खरा तो सुखवासी. याच्या भाग्या ब्रह्मसभेचा मुख वासी.
भक्तिज्ञानें राज्य चि सद्या पिकवी, तें गातां देतें सद्यश अद्यापि कवीतें. ४५
श्रीरामाच्या सत्कीर्तीतें जो गातो, होतो मुक्तिप्राज्यप्रेमाजोगा तो.
भक्तिज्ञानें वातापत्या दे, वाहे अंकीं, ठावी रीति, श्रेष्ठा देवा हे. ४६

---

१. भक्तकल्पद्रुम अशा. २. मारुतीला. ३ एक दिवस. ४. प्रतिज्ञा. ५. वियोगरूपी मोठ्या विपत्तीला भ्यालेल्या गुहाला. ६. चंद्र. (गो=किरण). ७. ब्रह्मसभेचा सभासद. ८. तत्काल.

श्रीरामाच्या पादसरोजांवारि भावें केलें दासें अर्पित रामायणनावें.
हें सच्चित्ता **मत्तमयूर** द्रुत यावें, वाटावें कां न प्रभुतें लक्षुनि गावें ? ४७

इति श्रीरामनंदनमयूरविरचितं श्रीमन्मत्तमयूररामायणं समाप्तं ।

# पंचचामररामायण

( पंचचामर )

सरोजजा[1]र्थित प्रभु क्षपाचरेंद्रमारणा,
असंख्य भक्तदृष्टिची घडावयास पारणा,
अजा[2]त्मजात्मज द्रवोनि होय विश्वतारणा,
अशेषजाड्यजन्यपापशापतापवारणा. १
गुणाब्धि कोसलेंद्रजातनूज होय राम; हा
शिवादिसत्सभा तिचा उदार सोयरा महा.
भरा[3]दि ता[3]न्त नाम साधु केकयात्मजाजनि,
प्रसिद्ध बोलिले कवींद्र, आर्य भक्त ज्या जनीं. २
सुमित्रवर्णनाम जीस, तीस दोन नंदन,
श्रिताखिलातितापनाशहेतु दिव्य चंदन.
वडील लक्ष्मण, द्वितीय तो अरिघ्न सन्मती.
असे कुमार च्यार [4]सारसारसाक्ष जन्मती. ३
जन्मला पुरीं, त्रिविष्टपीं, असीम जो मह,
प्रभूतदीप्ति वाढले कुमार ते तयासह.
द्विजत्व पावले, श्रुतिस्मृतिज्ञ जाहले, शतें
गुणांचिया दिसों न देति जें शिशुत्व, लेश तें. ४
मुनींद्र कौशिक स्वयें स्तवूनियां नृपा, वदे,
‘ मखावनार्थ सानुज स्वपुत्र राम, पाव दे.’

---

१. लक्ष्मीनें प्रार्थिलेला. २. अजात्मज=दशरथ. ३. भरत. ४. कमलपत्राक्ष.

वसिष्ठ देववी बळें चि, ने न वाहतां रथीं.
सदस्त्र दे महर्षि, ताटकेसि मारवी पथीं. ५
सविघ्नयज्ञसिद्धिचा असे सदैव आधि ज्या,
करी, वधूनि राक्षस, प्रसन्न, राम गाधिज्या.
जिला शि[१]लात्व ये, प्रभु क्षणांत उद्धरी तितें.
कवींद्र गाति रामपादपद्मशुद्धरीतितें. ६
महेशचाप मोडितां चि, जानकी अजा वरी,
पडे चि रामसिंहतेज रावणा गजावरी.
दिल्या तिघी तिघांजणांसि मैथिलें सुता; तया,
प्रजा हि बोलिल्या न सद्वरार्पणें सुतात[२] यां. ७
करी, महोग्र जो, धरूनि मार्ग, वासरा महा,
हरूनि दे तया सुशांति भार्गवास राम हा.
पुरी सुखास पावली, यशें जगीं न मावली;
सुरद्रुची न सावली [३]सुतर्धि गाय मावली. ८
कुमार राम यौवराज्ययोग्य वाटला नृपा;
परंतु तत्प्रिया करी जगत्त्रयीं बरी कृपा.
स्वपुत्रभक्ति, रामकीर्ति, पाववि प्रसिद्धितें.
तिचा चि होय, हेतु, तो प्रभाव, विप्रसिद्धितें. ९
सदार सानुज, प्रभु स्वतातसत्यरक्षण
स्वयें करावया निघे, वरूनि वन्यभक्षण.
वळावया जटा वटागदुग्ध दे निषाद या,
यशोर्थ सेववी वना, जसी शिवा विषा, दया. १०
नमी प्रयागवासि तातमित्र[४]सन्महर्षितें.
गणी मनें जगांत तो कृतार्थजन्म हर्षितें.
करूनि आश्रय स्व चित्रकूटपर्वता, पसा
करी मुकुंद तेथिल स्वभक्त सर्व तापसा. ११

---

१. मूळ-जिलात्व (?). २. कन्या-पंत. ३. ऋद्धि=वैभव. ४. भरद्वाजातें.

वियोगशोकपावकीं सुदुःसहीं पिता गळे,
जळे, असें कळे; परंतु बंधुला न तो वळे.
तयासि दे स्वपादुका, पुरा फिरोनि पाठवी,
'अवध्यतिक्रमें जळेन,' हें तदुक्त आठवी. १२
म्हणे यदंघ्रिरेणु, 'दीनजन्मपत्रिके! तुतें
मृषा करीन सर्वथा,' तया हि पंत्रिकेतुतें[1],
नमूनि हस्त जोडितां, महर्षि अत्रि गौरवी.
यश क्षमासुतार्चनें सती[2] हि चंद्रगौर वी. १३
विराध भूमिजा धरी, तिला प्रभूंसि[3] ही हरी,
असा महोग्र जो अरी, तयासि राम उद्धरी[4].
महर्षि दंडकीं वनीं भयार्त जे सदा मनीं,
अभीति दे तयां धनीं तपीं स्वलोकसाधनीं. १४
सुतीक्ष्ण बाणभंग[5] कुंभसंभवादि सन्मुनी,
सुखी करी, सदैव जे स्वभक्तिनिष्ठ जन्मुनीं.
जटायु तातमित्र, त्यासि दे प्रमोद तोखदें
समागमें, महागदार्दितासि जेंवि ओखदें. १५
स्वबंधुनिर्मितोटजीं रमेश गौतमीतटीं,
वसे, प्रकाश आवरी प्रदीप तो जसा घटीं.
खळस्वसा म्हणे, 'असीस[6] लुब्ध कां? मला भजें;
कळत्र तें चि सेव्य, दे यथेष्टकामलाभ जें.' १६
समर्पि लक्ष्मणाचिया असीस नाक, कान, ती.
न त्या करील, दंडितां असीस[7], नाक[8] कां नती?
तिणें स्वबंधु धाडिला खराख्य, तो हि ताडिला,
ससैन्य गर्व झाडिला, व्यसु क्षणांत पाडिला. १७
स्वदुर्दशा दशाननासि दाखवूनि कोपवी,

१. गरुडध्वज विष्णु—राम त्याला. २. अनसूया. ३. रामलक्ष्मणांला. ४. वधून सद्गति देई. ५. शरभंग. ६. अशा सीतेस. ७. अशा शूर्पणखेस. ८. स्वर्ग.

सुवर्णएण पाठवूनि तो विचार[१] लोपवी.
करूनि दूर शूर रामलक्ष्मण प्रभु च्छळें,
बळें हरी सतीस, ती म्हणे, ‘खळा! अधें जळें.’ १८
जटायु सोडवी; परंतु युद्धधर्म मोडुनीं,
छळें चि गृध्र पाडिला रणांत, पक्ष तोडुनीं.
म्हणोनि ‘हाय! हाय!’ रामलक्ष्मणांसि बाहुनीं,
क्षमासुता रडे, मनांत शोकभार वाहुनीं. १९
सती कपींत ऋष्यमूकपर्वतीं नग त्यजी,
क्षयेंार्थ[२] गांजिली, नमावि वृद्धिदा[३] अगत्य जी.
पुरींत रोधिली अशोककाननीं महासती.
श्रमे, परंतु वाढवी सुरव्रजीं महास ती. २०
वदे निजानुजोक्त वृत्त आयकोन राम ‘हा!’
तया हि शोक दे, जसी च वायको नरा महा.
‘प्रिये! प्रिये!’ असा च शब्द विश्वनायकाननीं,
करीत दारशोध, योधराय[४] जाय काननीं. २१
जटायु मूर्छित क्षतार्त देखतां, गळां पडे,
रडे, पुसे, कथी; परंतु मृत्यु सांगतां घडे.
दडे मुहूर्त पूर्वशोक यापुढें; मनीं जडे
अडे चि धैर्य; तोय दे, निघे शुगब्धिच्या[५] कडे. २२
पुन्हा हि शोधितां, कबंध उद्धरी; तयावरी,
शबर्युपासनाप्त[६] हृष्ट मुक्तिदायका करी.
यदीयनाम युग्मवर्ण ‘पं’ अणीक ‘पां’ असें,
तिच्या तटीं स्मरे प्रियेसि; वर्णवेल तें कसें?’[७] २३
समीरपुत्र भेटतां, सखा सुकंठ होय, ज्या
करी प्रहृष्ट दर्शनें चि, जेंवि अर्क तोयज्या.

---

१. सारासार विचार. २. स्वक्षयार्थ. ३. वैभवदात्री. ४. महान् योद्धा ५. शोकसागराकडे. ६. शबरीची उपासना हाच आप्त. ७. पंपा—**पंत.**

सतीनिजोत्तरीयबद्धमुक्त दाखवी नग.
धरी तदीक्षणीं[1] च तोष, ताप, लाख वीनग[2]. २४
स्वदुःखवृत्त तें विष प्रभूसि कीश चाखवी,
प्रभु प्लवंगनायकासि कार्यसिद्धि दाखवी.
हरूनि वालिअसु, क्षणांत राज्य दे नता पदा,
[3]पिटी च रामदृष्टिवृष्टि दे उरीं न तापदा[4]. २५
कपिप्रवीर धाडिले करावयासि शोध जे,
तयांत सिंधुलंघनास वातपोत तो धजे;
वधूनि सिंहिकेसि[5], योजनें शत क्षणें उडे,
श्रमे सतीस धुंडितां, विलोकितां सुखीं बुडे. २६
अशांत ये दशास्य, ज्या न लाज, मत्त पाप हा,
वदे, 'सुभोग भोग चालु, आज मत्तपा पहा.'
पतंग तो, हितावहा तया न दीपिका सती;
चिरी नगासि[6], पोषिती नता, नदी, पिकास ती. २७
सती करूनि धिक्कृति, क्षपाचरासि कोपवी.
गमे रविप्रभा चि ती, तया दिव्यास लोपवी.
कथी निशाचरींस, "सिंधुतें वदो नेई 'सखा.'
न हे वळेल, लोटतां चि मास दोन, ईस खा." २८
पलाशराय जाय. 'हाय!' जानकी वदे. तिला
प्रमोद मुद्रिकार्पणें समीरनंदनें दिला.
सती हि दे शिरोमणी; पुसोनि वृत्त, 'या, लया
खळासि न्यावया,' म्हणे 'तुम्हीं यशोर्थ याल[8] यां.' २९
समीरजें अशोककाननस्थ वृक्ष मोडिले
दशास्यपुत्र अक्ष लक्ष दक्ष वीर झोडिले;

---

१. ते पहातांच. २. गरुडावर गमन करणारा. ३. पळवून लावी. ४. आतपा –**पंत** ५. राहुमाता ६. जी रोधका नगा भंगिती–**पंत**. ७. [सीतारूप] नदी. ८. अवश्य या.

घनध्वनीस सांपडोनि शब्दबाण सोडिले,
सभेंत रावणादिपापबुद्धि कर्ण[1] फोडिले. ३०
खळेंद्र पुच्छ पेटवी; म्हणोनि पावका सती
स्तवी; गमे पुरी कसी, म्हणोनि 'पाव,' कास ता;
सुटे, उडे कपींद्र; त्या पुरीस आग दे; वदे,
'तुम्हांसि मीं न, हें फळ, स्मरोनि आग, देव दे.' ३१
पुसोनि ईश्वरीस, ये उडोनि. जे सखेद, या
विलोकितां चि, दाविती, प्रहृष्ट ते सखे, दया.
शिरोमणीस देखतां चि, विष्टपासु[2] खेंव दे,
तया 'तुझा ऋणी असें' हि शिष्टपा[3] सुखें वदे. ३२
प्रभु प्लवंगसैन्ययुक्त सिंधुच्या तटास ये,
म्हणे, 'तुला द्विषत्पुरी महाहिची फटा, सये!
अहा! पहा वियोगदुःख शत्रुनें कसें दिलें!
भवांतरीं[4] अडांत[5] सत्व लोटिलें, न सेंदिलें.' ३३
नमी बिभीषण, त्यजूनि त्या दुराशया. दया-
निधि प्रभु स्वयें करी प्रसाद; सिंधुयाद[6] याँ[6].
तयास राज्य दे. म्हणे समुद्र ही, 'नसे तुतें
अशक्य लेश, जा तरून, बा! करून सेतुतें.' ३४
विशाळ सेतु पंचवासरांत निर्मिला नळें.
अहर्निशत्रयें परा तटासि पावलीं बळें.
असत्य रामशीर्षचाप सत्यसें चि दाखवी,
मुहूर्त जानकीस शोककाळकूट चाखवी. ३५
सुकंठ, तार्क्ष्य पन्नगीं तसा, दशाननीं पडे;
तयासह प्रसिद्ध बाहुयुद्ध देखतां घडे.

---

१. कान फोडले=कटुभाषण ऐकावयास लाविलें. २. जगत्प्राण (राम). ३. सज्जनरक्षक मारुतीला. ४. अरण्यांत. ५. विहिरींत. ६. या दयासमुद्र रामाला हा समुद्रजलचर होय.

करावया यशोर्थ साम, राम, शत्रुभंगद,
स्मरोनि नीति, पाठवी सुपूत दूत अंगद. ३६
म्हणे, 'धरा चि,' तो न सामकाम पाप तापला.
वधी खळांसि अंगद, प्रताप दावि आपला.
त्यजूनि नीति धर्मशर्मकीर्तिहेतु, उद्धतें,
हठें क्षयार्थ मांडिलें, न वर्णवे चि युद्ध तें. ३७
प्रहस्तनाम सैन्यपाळ, देवका[1]ळें, तो मरे;
म्हणे महेंद्र, 'हो असा च शेषशत्रुहोम रे!'
करि प्रभूंसि नागपाशबद्ध मेघनाद; या
खळाचिया नसे कधीं हि ठावकी मना दया. ३८
सतींस पाठवी रणांत पुष्पकांत वाहुनीं;
करी विलाप ती तशा दशेंत त्यांसि पाहुनीं.
भली 'त्रि'युक्'[2]जटा'भिधा निशाचरी परोपरी,
करूनि बोध, तो धरात्मजातिशोक ती हरी. ३९
खगेंद्र ये पळांत, ते अशेष नाग लोपले,
सुधारसापुढें जसे प्रचंड रोग कोपले.
म्हणे [3]यदीय अंतका हि 'जोड हात' दापिता,
गमे तया प्रभूसि मुक्तिहेतु हा तदा, पिता. ४०
[4]प्रयत्नकोटिभग्ननिद्र कुंभकर्ण काळसा
गमे, कपींस भक्षितां, न सोडितां हि आळसा.
हरी [5]हरीश्वर, क्षणें सुटोनि, नाक कान, ती
सुशक्ति दावितां, करील त्या न नाक कां नती! ४१
जयापुढें फिकें पडे महेंद्रवज्रवर्णन,
प्रभूत्तमाशुगें [6]उरे तसा हि कुंभकर्ण न.

---

१. शत्रु. २. 'त्रि' नें युक्त 'जटा'=त्रिजटा. ३. रामभक्त-**पंत**. ४. कोटि प्रयत्न ज्याच्या निद्राभंगास लागत असा. ५. वानराधिप सुग्रीव. ६. मरण पावे.

म्हणे दशास्य, 'सोडिला कसा सहाय[1] हा यशें?'
तसे चि बोलिले स्मरोनि त्यास 'हाय! हाय!' शें. ४२
[2]घनस्वन प्रभूत्तमादि सर्व संगरीं खिळी.
न मोह ऋक्षपा, मरुत्सुता, बिभीषणा, गिळी.
महौषधिक्षमाध्रशृंग आंजनेय आणि; ते
विशल्य जाहले ससैन्य वैरिवृक्षखाणिते. ४३
मृषासतीवधें पुन्हा हि होय[3] सर्वमोहिता.
करी कथूनि तत्व [4]तत्पितृव्य साधु तो, हिता.
झटोनि मारिला चि लक्ष्मणें अपूर्णहोम हा,
म्हणे तयासि शक्र, 'बा! तुझ्या समृद्धि हो महा.' ४४
तनूजशोकतप्त, दुष्ट जाय, ज्या न कीव, 'धा'
म्हणे असीस 'शोणितें, करूनि जानकीवधा.'
सुपार्श्व साधु होय त्या तशास ही निवारिता.
वदे, 'सुकर्म तैल बा! पडे न तूं दिवा रिता.' ४५
रणांत मृत्यु पावतां प्रधान बंधु सोदर,
स्वपाप शाप आठवी; तथापि घे न तो दर.
स्वसैन्य रामलक्ष्मणक्षयार्थ पाठवी, 'रहा'
म्हणे मरोनि तें. तऱ्ही नदे चि पाठ वीर हा. ४६
निशाचरीविलापखिन्नचित्त हा निघे; 'रणें
जथा क्षया हि [5]कीं,' म्हणे तयासि हानि 'घेरणें.'
सुरांसि होय दैन्य सैन्य तैं न्यहाळितां; त[6]ड
प्रवीर पावले भवाब्धिची, करूनि तांतड. ४७
म्हणे स्वसारथीस शक्र, 'मंत्र ऐक मातले!
दशाननादि राक्षस त्रिलोकशत्रु मातले.

---

१. या शब्दापुढें 'हाय' असा एक शब्द हस्तदोषानें लिहिला गेला आहे. २. मेघनाद, इंद्रजित. ३. कर्ता 'इंद्रजित'. ४. त्याचा चुलता (बिभीषण). ५. किती. ६. पैलतीर.

शैतांग ने, वसीव राम, काम बा ! पुरीव हा.
स्वचातुरी, प्रभूसि कीर्ति व्हावया, पुरी वहा. ४८
अशेष शस्त्रअस्त्र अॅर्जुनी च मूढ, कायशा
कथा ? न लावितील गर्जुनीं चमू ढका यशा.
तऱ्ही रथी अराति, नाथ पत्ति, हें न सोसवे;
असाधुची वढाइ सोसणें, असी नसो सवे.' ४९
सरात्रिसप्तवासर प्रसिद्ध संगर, क्षण
श्रमें न राहिला, न पाहिलें हि अंगरक्षण.
तशांत आठवूनि दे निशाचराघ वासव,
'द्विजघ्न, गोघ्न, भंगि हा पिशाच रावणा ! सव.' ५०
नटे नभांत जो रैमेशपादपद्मबंभर,
व्यसुत्व घे न, खंडिलीं शिरें जरी हि शंभर;
अगस्त्यमंत्र, तज्जपें प्रसन्न सूर्य दे वर.
स्वयें शची म्हणे, 'करू सनाद तूर्य देवर.' ५१
मैहेंद्रसूतसूचितस्वयंभवास्त्रमंत्रितें
शरें रिपूर भेदिलें अजें पैरानियंत्रितें.
पडोनि राहिल्यां म्हणे, 'मला पहा, रिघा तमीं
न, पावलों अवें मदें,' प्रजामहारि 'घात मीं.' ५२
जयें महेंद्रदुंदुभिप्रचंड नाद वाजला,
जयाचिया महाध्वनीस मेघसंघ लाजला.
प्रभूत वाद्य, नृत्य, गीत, पुष्पवृष्टि; माजला
स्तव प्रमोद; सद्यशें समस्त लोक साजला. ५३
प्रभूदितें बिभीषणें स्वयें दशाननक्रिया

---

१. रथ. २. संपादून. ३. रमापतिचरणकमलभ्रमर. (रावण हा शिवचरण-कमलभ्रमर होता या दृष्टीनें 'उमेशपादपद्मबंभर' असा कव्युद्दिष्ट पाठ असावा असें वाटतें). ४. वाद्यविशेष. ५. मातलीनें सुचविलेल्या ब्रह्मास्त्रानें अभिमंत्रिलेल्या (शरें). ६. शत्रूपासून अबद्ध अशा. ७. रामाच्या सांगण्यावरून.

करूनि, सांत्विल्या, पुसूनि अश्रु, अग्रजप्रिया.
पदीं बसोनि, सर्वदीनबंधुच्या अनुग्रहें
म्हणोनि घेतलें प्रजावतीमुखें 'अनुग्र' हें. ५४
बिभीषणासि सांगुनि प्रभु प्रियेसि आणवी,
प्रदीप्त वह्निकुंड जें, तयांत तीस न्हाणवी.
तिची विशुद्धि, दिव्य तें, सुरादिकांसि जाणवी,
'महाविभूति ती,' असें चि सन्मनांत बाणवी. ५५
रणव्यसुप्लवंगसैन्य तें उठे सुधावनें,
असें करी. भरे सरोजजांड तज्जयस्वनें.
बसोनि पुष्पकीं सखे, महाविभूतिजानि घे;
प्रहर्ष द्यावया पुरा समुत्सुका निजा, निघे. ५६
करूनि अंकवर्तिनी, प्रभू महाविभूतितें
कथा कथूनि आजिची, म्हणे, 'महावि भू,' तितें.
'भवाँब्धिअब्धितें सुत प्रबुद्ध मान सेतुतें;
मला, तसा चि तारि हा चि, शुद्धमानसे! तुतें.' ५७
स्वानुभूत ऐकवीत, दाखवीत, रंजवी
श्रीस तो, चतुर्मुखा यदीय नाभिकंज वी.
तत्प्रियार्थ पुष्पकीं सुकंठदार आणवी,
त्यांसि ती सती कपीश्वरोपकार जाणवी. ५८
हर्षवी, शबर्युदारभाव वर्णुनि, प्रिया,
राम, ते बिभीषणादि, त्या हि वानरस्त्रिया.
गौतमी, तसा च दाखवी जटायुचा वट,
प्रीतिस त्यजी न, जेंवि चावटीस चावट ५९
कुंभयोनिच्या, तसा चि दावि आत्रिच्या, पदा;

१. भावजयींच्या तोंडून. २. ब्रह्मांड. ३. त्याच्या जयघोषानें. ४. सीतापति. ५. मांडीवर बसलेली. ६. युद्धाची. ७. भवाब्धितें [जसा] प्रबुद्ध सुत [तसा] अब्धितें सेतु मान.

आपदा कधीं शिवे यदाश्रिता न, तापदा.
पापदावमेघ चित्रकूट शैल दाखवी,
लाख[1] वीतबाध[2] ज्यांत, जो सुधेसि चाखवी. ६०
दाविल्या, दिनेशविष्णुपादपद्मजा[3] नद्या
सांगती, 'यशा, स्वर्गाद्यनित्य[4] सद्म,' ज्या 'न, द्या.'
त्या प्रयागसत्पदीं मुनीस[5] हर्ष दे, वसे;
विप्र तच्छिरीं करीति पुष्पवर्ष, देवसे. ६१
भक्तवत्सळ स्वबंधुनिश्चयासि आठवी.
सूचवावया स्ववृत्त मारुतीस पाठवी.
हर्षवी गुहास, त्या हि केकयात्मजासुता,
ज्या वियोगसंज्वरांत फार भार सासुता[6]. ६२
बंधु मोर, राम मेघ, नाद होय दास[7]; हा
त्या म्हणे 'श्रमासि, देखसील तोयदा, सहा.'
वृत्त घे पन्हां, न ठेवितां उधार, साधु तो;
प्राशितो हि, आंग[8] पावला, सुधारसा[9], धुतो. ६३
पूजुनी हि पूजनास, वंदुनीं हि वंदना
तो करी; धरी, न सोडि, नाग जेंवि चंदना.
'घे' म्हणे 'सुरत्नराशि, राज्य, कन्यका मना
सांग कां गभीरभाव? काय अन्य कामना?' ६४
तो वदे, 'तुला विलोकितां चि सर्व पावलें.
नाशितील बा! तुझीं, सुरद्रुगर्व, पावलें.
रामहंसमानसा[10]! रघूत्तमालिसारसा[10]!
सार साधिलें यश; ज्ञें[11] या करीं पसा रसा. ६५

---

१. लक्षावधि. २. निर्बाध लोक. ३. यमुना व गंगा. ४. स्वर्गादि अनित्य. ५. भरद्वाजास. ६. जिवंतपणा. ७. मारुती. ८. 'धुतो'चीं कर्मे. ९. 'प्राशितो' चें कर्म. १०. हीं भरताचीं संबोधनें रामाला च भरताचा भक्त बनवितात! ११. बृहस्पति.

तृप्त मीं, तुझ्या, भजोनि, भक्तिच्या महानसा[1].
सज्जनाचिया, स्मरादि साहती, महा[2] न सा,
कीर्ति सांगती, 'त्यजूनियां सुशील हा नसों[3].'
त्वां न दास मानिला लहान ही लहानसा. ६६
पातला चि; शीघ्र रामतोयदासमोर हो,
या कपिस्वनें प्रहृष्ट होय दासमोर हो!
तो निघे, न आवरी महातपा दुकानें[4] तें.
वल्कली, जटी, शिरें, वहात पादुका, नतें. ६७
श्रीवसिष्ठ, वामदेव, मातृवर्ग, नागर,
स्वप्रधानसैन्ययुक्त शुद्धसत्वसागर
सानुजें[5] प्रभूत्तमासि जाय चिंतित क्षण;
प्रेक्षितां दिसे विमान भव्य पुण्यलक्षण. ६८
पावला न लंघितां स्ववाक्य, किं न घातक,
श्रीश मेघ, लक्ष्मणाप्रजादि[6] मोर, चातक.
प्रेम तें वदों शके न तो सुरर्षितात[7] कें,
स्वल्पबुद्धिचें हि, वर्णितां सरे चि पातक. ६९
होय, पुष्पक त्यजूनि, दास तेंवि, पत्ति; तें
जन्ममृत्युच्या, स्वकाळ भासतें, विपत्तितें.
वाटला विलोकित्यांस गाय वत्सल क्षण
श्रीनिवास; तो हि साधुराय वत्सलक्षणं[8]. ७०
लेववूनि पादुका, पदाब्जयुग्म पाहिलें
साधुनें, तयावरि स्वशीर्षराज्य वाहिलें.
हुंगितां शिरीं, दयासमुद्र अश्रु वर्षला,
भेटला सुतासि तात तेंवि, राम हर्षला. ७१
वाटला अरिघ्न तो धरूनि हांव, लेंकरूं

---

१. पाकशाळेला. २. प्रभावाला. ३. असूं नका. ४. राज्यादि पसारा. ५. शत्रुघ्नासह. ६. भरतशत्रुघ्नादि. ७. ब्रह्मा. ८. वत्सासारखा.

त्या चिरागता[1] पित्या, प्रणाम धांवलें करूं.
वंदिला वसिष्ठ, शिष्ट वामदेव. सादरें
मातृवर्ग, जो वदे सदा सशोक 'हा!' दरें. ७२
वृद्ध जे गुरु, प्रधान, ते सुखांत घातले;
पातले समस्त पौर, दर्शनें चि मातले.
भेटले बिभीषण, प्लवंगराज, सज्जना
सानुजास; पावले सुधासमुद्रमज्जना. ७३
वासवादि नंदनोत्थ[2] पुष्पवर्ष वर्षले.
देवगायक प्रभूसि गाति, फार हर्षले.
नाचल्या वराप्सरा, मृदंग वेणु वाजले,
दिव्यदुंदुभिध्वनीस मेघनाद लाजले. ७४
सप्रधान बंधु जे, तयांचिया स्वयें जटा
मोडवी, निजा हि; पावतां पणाब्धिच्या तटा.
वल्कलें करूनि[3] धन्य[3], राजभूषणा पटा
मान दे रमेश, झांकित्या तनुच्छवि[4]च्छटा. ७५
भूषवी सुकंठ, सर्व यासमान वानर.
स्पष्ट पौर मानिती न त्या समा नवा नर.
पाहतां गमे सभा हि रुंदि, लांबि, [5]भी खणा
त्या जनां गणेश[6]हर्षतुंदिलां, बिभीखणा. ७६
काळभीतितें हि भेट जी न दे, वदे, खैणी[7];
मानिती तसी निजा पुरी न देव देखणी.
निस्तुळें महोत्सवें महायशें हि दाटली,
आटली जिची न दीप्ति, मूर्त मुक्ति वाटली. ७७
रामसा बिभीषण प्रवेशला. नवा सवा

१. बहुता काळें आलेल्या. २. नंदनवनोत्पन्न. ३. विसर्जन करून. ४. शरीरकांतीचे समुदाय. ५. भिते. (?) ६. आनंदानें गणपतीसारखीं मोठीं पोटें ज्यांचीं अशा. ७. खणून काढीं.

सेविता, गमे न लेश ही निजोन[1] वासवा.
रम्यरूप, मंत्रियुक्त, भव्यभूष, शोभला;
लोभला तयास पौर, कीं तसा च तो भला. ७८
हर्षले करूनि राममातृपादवंदन,
क्रव्यभुक्, प्लवंगराज, साधु जेंवि नंदन[2].
ते सुकंठदार, त्या हि कीशयूथपस्त्रिया
पावती, जसी च जानकी तसी च, सत्क्रिया. ७९
तीर्थजीवनें महाभिषेक तो यथाविधि
श्रीवसिष्ठहस्तकें करूनि घे दयानिधि.
राज्य विश्वरंजना करी; तयांत आदरी
नादरीति[3], बोलिल्या पडोनि शून्य 'हा!' दरी[4]. ८०
होय रामराज्य रामराज्यसें चि तोखद,
व्याधि जो भवाख्य उग्र, हें तयासि ओखद.
कीं करी, प्रकाशुनि स्वसन्महा[5] निरंजन[6],
श्रीश, बुद्धिचें, हरूनि जन्म हानि, रंजन. ८१
कुंभजादि विप्र, जे सभाग्य वित्तपाहुनि,
श्रीवरासि, जाहले प्रसन्नचित्त, पाहुनी.
वर्णिति प्रताप गद्यपद्यशस्तवाद[7] या,
मागती सदा, करूनि सद्यशस्तवा, दया. ८२
कुंभजानें दशाननप्रताप[8] जे अरी,
तत्सुतानुजादि, वानरेंद्र, वातभू, हरी[9],
तत्कथा प्रधानबंधुयुक्त आयिके; धरी
तोष; शोषला गमे, सुधातिपान तो करी. ८३
धर्मनीतिसंश्रितावनें सुकीर्ति जोडिली,

---

१. आपल्याहून कमी. २. आनंददायक [पक्षीं] पुत्र. ३. प्रतिध्वनीची रीत. ४. गुहा. ५. आपल्या श्रेष्ठ तेजाला. ६. निर्दोष. ७. गद्यपद्यमय प्रशस्त भाषणें. ८. रावणतुल्य प्रतापी. ९. [इतर] वानर.

निंदितां जडें जनें, शुचि प्रिया हि सोडिली.
स्वर्णजानकी करूनि अश्वमेध साधिला;
श्वा हि मानिला; नुपेक्षिलें तशा हि [1]साधिला. ८४
'[2]व्याल', 'बाण' 'दाव' या पदत्रयांत अक्षरें,
तीन सेवटील, तें चि नाम सेविलें [3]खरें
ज्या द्विजादिशत्रुनें, तया अरिघ्नहस्तकें
मारवूनि, डोलवि प्रभु त्रिनेत्रमस्तकें. ८५
केकयात्मजासुतासि मातुलाचिया मतें,
पाठवी, तयासह प्रसिद्ध जें स्व[4]धाम तें.
देवगायक त्रिकोटि शूर मत्त मारवी,
राम; त्यां करी तम, स्वबंधुसत्तमा रवी. ८६
आठ पुत्र जे, तयांसि आठ दे पुरें पदें;
स्पर्शिले कुमार ही न भूप ते [5]मनोगदें.
आयके चरित्र आपलें चि आत्मजाननें,
ज्यां न नेणता हि '[6]ना' म्हणे कधीं मुखें, मनें. ८७
दिव्य जानकी पुन्हां करी, धरोदरीं, शिरे,
शोक कोप उद्भवोनि राममानसीं जिरे.
लक्ष्मणास हि त्यजी, म्हणे, 'दयालु हा, पण
हा पणक्षयें नव्हे असत्य[7]संध आपण?' ८८
प्रेत विप्रबाळ तो पुन्हां उठे असें करी,
सद्यशें सुधी, जसे चि इक्षुच्या रसें [8]करी.
हर्षवी, करूनि यज्ञ नाक, विप्रसिद्धिला,
[9]कामनें चि दे महामना [10]कविं प्रसिद्धिला. ८९
भाविती चकोर आपणांस चांद विप्र ज्या,

---

१. दुःखिताला. २. 'व्याल' 'दाव' 'बाण' असा क्रम अधिक उचित होईल. ३. क्रूरें. ४. अयोध्या ( अयोध्येतील लोक ). ५. चिंतेनें. ६. दूर न लोटी असा भावार्थ. ७. असत्यप्रतिज्ञ. ८. हत्ती. ९. [केवळ] हौसेनें. १०. वाल्मीकि—**पंत**.

प्रीतिनें भरूनि, तातसा चि नांदवि प्रजा.
जो मृकंडनंदनासि[1] भेट दे, वसे वटीं,
ने पुरी महागतींसि तो चि देव सेवटीं. १०
ज्या प्रभूत्तमें यशें अशेष विश्व तार्पिलें.
त्यासि 'पंचचामरा'ख्य तच्चरित्र अर्पिलें.
रामचिंतनार्थ वर्णिलें मयूरसेवकें;
मुक्ति सुंदरी वधू वरावि या चि देवकें[2]. ११

इति श्रीरामनंदनविरचितं श्रीमत्पंचचामररामायणं संपूर्णं ।

# पुष्पिताग्राश्रीरामायणकल्पलता

(पुष्पिताग्रा)

रघुनृपकुलसद्मदीप राजा[3] दशरथ, जो बहुमान्य जेंवि ओजा;
दशमुखहननार्थ तत्सुतत्वा वरि, बहु ज्या श्रुति गाति सत्सुतत्वा[4]. १
प्रथम तनय राम, दार ज्या मा; भरत दुजा वरशीलभव्यधामा[5];
पुरवि सुगुण लक्ष्मण स्वकामा तनुज तिजा; चवथा रिपुघ्ननामा. २
अनुजसहित राम, आधि ज्याचा गुरु[6], मख रक्षि सलील गाधिज्याचा.
निववि पदरजोनिळें[7] चि, तशा भजुनि शिलापण, जी मुनींद्रशासा. ३
गिरिशधनु जगन्मनोभिरामें तृणसम ओढुनि मोडितां चि रामें;
विनवुनि, चवघांसि चार धन्या जनकनृपें विधिनें दिल्या स्वकन्या. ४
उडवि, पवन पर्ण तेंवि, सर्व प्रकुपितभार्गवरामवीर्यगर्व.
स्वपितृवचनपालनार्थ सोडी पद सुसमृद्ध हि, कीं यशीं च गोडी. ५
निववि बहु तपस्विवृंदचेत[8] प्रभुवर लक्ष्मणजानकीसमेत.
रचितजट सवल्कचाप[9] सासि स्तुति वरि, होउनि चित्रकूटवासी. ६

---

१. मार्कंडेयास. २. हें च देवक ठेवून. ३. रघुराज. ४. सत्य किंवा सत्कृति हें च उत्तम तत्त्व ज्याचें त्या प्रभूला. ५. सुस्वभाव व तेजस्वी. ६. मोठा. ७. पायधुळीच्या वाऱ्यानें. ८. चित्त. ९. सखड्ग.

भरत परतवावयासि गेला; दशरथ, होवुनि शोकतप्त, मेला;
तरि न परतला; तया, धराया क्षितिभर, दे निजपादुका तराया. ७
मुदित करुनि अत्रि, दे विराधा गति; वदला[1] ‘ न भयें मनीं विरा, धा
पिवुनि निजतपःसुधानदास द्विजवर हो! कथि हा सुधा[2] न दास.’ ८
घटजमुनि, जटायु, यांसि पाहे; तदुपरि पंचवटींत राम राहे,
दशमुखभगिनी कुबुद्धि, चंडी, रतरुचि जी विधवा हि, तीस दंडी. ९
खळ खर हननार्थ सैन्य आणी, निवटि तया प्रभु चापबाणपाणी
दशमुख खवळे अदभ्र[3], मायामृग करि, पुण्ययशःपद अमाया. १०
कनकमय कुरंग दुष्ट धाडी, मरुनि हि अंतर तो तिघांत पाडी.
गिंवसुनि[4] उटजांत एकलीला हरि. उरंगी अनुमोदि भेकलीला[5]. ११
विरथ करि जटायु, तीस सोडी क्षण; मग शत्रु तदीय पक्ष तोडी.
स्वनग पळवितां कपींत टाकी हळहळले बहु हर्षले हि नाकी. १२
नमुनि अनुज साश्रु वृत्त सांगे, प्रभु हि म्हणे, ‘ कटु बोलिलीस कां? गे!’
विपयिविरहि जंतुसीं च तोले, उटज विलोकुनि शून्य ‘हाय!’ बोले. १३
प्रभु हुडकि वनीं, करी विलाप; त्रिदश वधूविरही जसा ई[6]लाप,
विकळ पितृसखा खगासि पाहे, पुसुनि निमित्त, न शोकभार साहे. १४
‘ हरिलि दशमुखें सती ’ वदे हें, त्यजि असु तो, गमला दुजा न देहें.
प्रभु पिववि, करूनि दाह, तोया, वरचारिता मनिं साधु वाहतो या. १५
धरि असुर कबंध; त्यासि मारी प्रभुवर; तद्गतशापताप वारी.
शुचिमति शबरी हि धन्य केली. प्रभुसि रुचे न कधीं हि अन्य केली. १६
करुनि वरयशासि पात्र पंपा पवनसुतीं हि करी महानुकंपा.
त्वरित सुगळताप सांग वारी प्रभुवरसख्य जसें चि गांग वारी. १७
कपि, जलधि उडोनि जाय, शोधी प्रभुदयितेप्रति, होय हा य[7]शोधी.
पवनतनय दे सतीस मुद्रा, परपुर जाळुनि हि प्रमोद रुद्रा. १८

---

१. [ऋषींस] वदला. २. व्यर्थ. ३. पुष्कळ. ४. गांठून. ५. [जणुं काय] बेडकाच्या लीलेला सर्पिणीनें अनुमोदन दिलें. ६. देव असून एखाद्या मानवी राजाप्रमाणें स्त्रीविरही झाला. ७. यशस्वी.

निरखुनि दयिताशिरोमणीतें, अति विरहासुख जें न तो गणी तें.
पवनतनुज वाटला प्रभूतें, असुद[1] चि, गौरविला स्तवें प्रभूतें. १९
जलनिधिस अपार कीशसैन्य, प्रभुवर ने बहुनाददत्त[2]दैन्य;
कारि, विटुनि अघा, त्यजूनि शंका, प्रणति बिभीषण; दे तयासि लंका. २०
प्रभु करवि पयोनिधींत सेतु, प्रबळनिशाचरराज्यधूमकेतु[3].
भिववि, उतरतां चि, शोक, लंका, तुडवि तिच्या कंपिराज तो कलंका. २१
कपिपतिसुत दूत राम धाडी; अतिपटु तो परगर्व सर्व झाडी.
नच पारि करि साम हा कदापि द्विर्प[4], जरि दे प्रभुसिंह हाक, दापी. २२
प्रथम चि वधिला प्रहस्त सेनापति, सुरसैन्य जयापुढें वसेना.
घनरव करि नागपाश, बांधी प्रभुयुग, 'हा!' हरिची[5] म्हणे न कां धी? २३
कथि जनकसुतेसि, 'यांस धोका तिळ हि नसे,' त्रिजटा, निवारि शोका.
पळवि पतगपाळ[6] सर्व सर्प, प्रथम विनाशुनि तद्विषोग्रदर्प. २४
पुनरपि कटकक्षयासि पाहे, दशवदन स्वपराभवा न साहे.
उठवुनि घटकर्णकाळ[7] धाडी, अजित तया हि रणांगणांत पाडी. २५
घनरव हरिला हि दे, ससैन्य प्रभुवर सानुज ही खिळूनि, दैन्य.
उठवि बळसमेत राघवातें पवनज ओषधिशैलशृंगवातें[8]. २६
जनकनृपसुताविनाश दावी, प्रभुस हि 'हाय!' म्हणावयासि लावी;
कळवि कपट तत्पितृव्य, वारी श्रम; मग लक्ष्मण त्या खळासि मारी. २७
स्वतनय, घटकर्ण, पुत्र, मेले; सचिव, सखे, सकळ क्षयासि गेले.
दशमुख असि घे वधार्थ, सीता निरखुनि त्या अदयासि होय भीता. २८
सचिवपवर्न या दवासि वारी, अनयपयोनिधियाद वासवारी.
प्रभुवध चि मनीं धरूनि, रागें त्यजुनि अशोकवनासि, जाय मागें. २९
प्रभु बळ वधि, शत्रु पाठवी तें, सुरमन या चि रणासि आठवीतें.

---

१. पुनः प्राण देणारा. २. मोठ्या गर्जनेनें भीति उत्पन्न करणारें. ३. नाशक ग्रहविशेष. ४. हत्ती (रावण). ५. मारुतीची. ६. गरुड. ७. कुंभकर्णरूप काळ. ८. वाऱ्यानें अग्नीचें निवारण न होतां वर्धन च व्हावयाचें; पण येथें मात्र उलट प्रकार झाला, असा भावार्थ.

'जलधिसि' वदले न कोण ? 'वणा [1]रुधिरनदीशतसंगशोणवर्णा.' ३०
मग पर बळ घे; 'प्रभावि रामा वधिन' म्हणे, 'स्वबळप्रभाविरामा.'
पिवुनि कपिबळीं सुरा रिघाला, प्रभुवरि घालि मदें सुरारि घाला. ३१
[2]स्वतनयभिदुरीं अरीश हाणी, क्षत करि, शक्ति न, भा, हरी शहाणी;
पुनरपि कपि आणि ओषधीतें, रघुपतिच्या बहु अर्पि तोष धीतें. ३२
अमरपतिरथीं बसोनि काम [3]श्रितमतिचा पुरवावयासि राम,
अनळस दिनरात्रि सप्त युद्धक्रतु करितां करि शत्रुसैन्य शुद्ध. ३३
अजित शत शिरें रणांत तोडी, तरि असु न क्षणदाचरेंद्र सोडी.
'रविहृदय' कथी अगस्त्य, जोडी रविवर, त्या स्वबळें रिपूर फोडी. ३४
वधि [4]कमळभवास्त्र उद्धतातें, सुनिधन दे, मलिना हि शुद्धता तें.
दशमुखपतनीं च पुष्पवृष्टि प्रभुवरि होय; निवे समस्त सृष्टि. ३५
स्तव जयजयकार फार झाले, प्रभुयश गावुनि सर्व साधु धाले.
प्रभुसि निरखितां न पक्ष्म हाले, विधि शिव त्या परमोत्सवांत आले. ३६
प्रकटि सकळ [5]उद्रवास वाद्य, स्तुति परिसे विधिरुद्रवासवाद्य.
प्रभुवर करि [6]उर्वशलि वेनापरि गुरुं[7] यां कसि उर्वशी लवेना ? ३७
प्रकटलि [8]रतिची सुगी, तनाना करिति हि गाति कृती सुगीत नाना.
अहिनरसुरकन्यका यशातें जपति, परें जन धन्य काय [9]शातें ? ३८
आरिस हि तिळतोय देववी तो रघुपति, जो द्रुहिणादि देव वीतो;
बसवि सुविधिनें पदीं नतातें; करि अवलोकिल या न दीनता तें. ३९
क्षणभरि करि दूर जानकीला; जिरवुं शके प्रभु तो हि ज्या न कीला,
उडवि करुनि दिव्य ती तयातें यश निववी अजिता महादया तें. ४०
उठवि रणमृत प्लवंग, ऋक्ष, प्रभु करि लज्जित सर्व देववृक्ष.
प्रियसखयुत पुष्पकीं सुचेता बसुनि, पुराप्रति राम होय येता. ४१

---

१. शेंकडों रक्तनद्यांच्या मिळण्यानें लाल रंग आलेल्या अशा. २. आपल्या मुलाला मारणाऱ्या लक्ष्मणाच्या उरांत. ३. भक्तांचा. ४. ब्रह्मास्त्र. ५. मोठा शब्द, कडकडाट. ६. अतिकठोरत्व. ७. ममाप्येष यथा तवेत्युक्तत्वात्-पंत. ८. प्रीतीची मधुर वाणी. ९. सुखानें.

परमकुतुकहेतु सेतु पाहे जनकसुता, परमोत्सवासि लाहे.
मग विनवुनि ती दयावतारा स्वपतिस, बैसवि पुष्पकांत तारा. ४२
परिसुनि शबरीकबंधपंपाचरित, वरी सुख राममेघशंपा[1],
तदनु[2] वदलि, 'ते नमोऽस्तु गोदावरि! भववर्धित ' संश्रितप्रमोदा. ४३
प्रभु कळवि जटायुच्या क्रियेतें, गहिवरवी बहु आपणा प्रियेतें.
मग घटजकथा हि राम लावी स्मरवुनि अत्रिस, चित्रकूट दावी. ४४
नमि रविजनिला, सुरापगेला, भजुनि जिला त्रिदिवीं[3] सुराप गेला.
कळवुनि गुण, लाख विप्र 'या गा' म्हणति असें कथि, दाखवि प्रयागा. ४५
स्वरत भरत भक्त आठवीला, अनिलज, तेथुनि शीघ्र पाठवीला;
पितृसख[4] मुनि फार हर्षवीला, नमुनि शिरीं तुहिनाश्रु[5] वर्षवीला. ४६
न म्हणुनि रघुवंशनायकोन प्रभु भरतेतरवृत्त नायकोन,
म्हणुनि बहु फळार्थ दे वरा, या बहु शुचि दे यश जेंवि देवराया. ४७
क्रमुनि रजनि आश्रमीं रिघाला. भरतमनीं मग तातसा निघाला.
कवळुनि निववी सख्या गुहास प्रभु, धनदा विभुचा जसा सुहास[6]. ४८
मग भरतचकोर, वीततंद्रें[7] हरुनि वियोगज ताप रामचंद्रें,
बहुत निववीला. न चातकाचा घन करि घात, वरी न शांत[8] काचा[9]. ४९
सफळ करुनि यत्न सानुजातें द्रवुनि म्हणे, गुरु रत्नसानुज्या तें;
प्रभुवर सुख दे, न माय लेंकीं तसि, सुयश त्रिजगीं न मायलें कीं. ५०
सुखवि गुरुजनन्यमात्यपौर[10] प्रभु, करि सद्यश शंभुहासगौर.
तदुपरि अभिषेक होय रामीं, 'करिन' म्हणे गति ' हा चि सोयरा मीं.' ५१
निरखिति अशुभा दशा न नारी, प्रियविरहा निरसी दशाननारी.
न करि यम वश स्वनामयांतें[11], रुचवि दयालु यश स्वनाम यां तें. ५२
स्तविति सुकवि फार रामराज्या; लव हि नसे बहुमान पामरा ज्या,

---

१. सीता. २. तदनंतर. ३. स्वर्गी. ४. भरद्वाज ऋषि. ५. थंड अश्रु (आनंदाश्रु). ६. उत्तम हास्य. ७. गेली तंद्रा (आळस) ज्याची त्या (रामचंद्रें). ८. मागें ३८ वा श्लोक पहा. ९. कच्चा. १०. वसिष्ठ, माता, प्रधान व नागरिक. ११. अत्यंत निरोगी अशा अयोध्यावासी जनाना.

प्रभु वरद तया हि, तातसा च प्रकटि, [1]करूनि दया, हिता तसा च. ५३
सुखवि सतत रामराज, गाया निज यश लावुनि सामरा जगा या.
कलियुगीं हि मयूर, हात नानापरि, करि, जोडुनि नित्य हा, तनाना. ५४

इति श्रीरामनंदनमयूरविरचिता पुष्पिताग्राश्रीरामायणकल्पलता संपूर्णा ।

# कविप्रियरामायण

(अश्वधाटी)

धाता स्तवी, अभयदाता स्वयें दशरथा तात माधव करी.
माता तिघी [2]तनयशाता; म[3]हावसति हा ताप सर्व हि हरी.
या तारका सुकवि गातात; राम [4]अघवाताहि; यापरि रसें
भ्राता जगीं भरत [5]माता न, लक्ष्मण हि, पाता अरिघ्न हि, असें. १
झाला द्विजत्वपद; आला अशांत मुनि, त्याला सहानुज दिला.
व्याला यश; स्वरिपुकालाहिताक्ष्य; गुरु धाला; निवे बहु [6]इला.
हा लावि पादरज; [7]बाला शिलेसि करि; [8]भालाक्षचाप हि चुरी.
याला समर्पि मति; माला वरी; [6]अवनिजा लाभली रति पुरी. २
धामा हरूनि, वधकामा प्रशांत भृगुरामा करी रघुपती;
धामासि ये; नृपति या मागुनी भरत मामा वरी स्ववसती;
सामात्य भूप, 'अभिरामा स्वराज्यपद रामासि देइन,' वदे.
वामा म्हणे, 'वन चि द्या, [9]माजिया चि पद,' सामा न मान लव दे.
जो डीक तेंवि, परि, जोडी नृपासि कर, सोडी प्रियानुजसह;
खोडी ललाटलिपि, गोडी यशीं च बहु, तोडी [10]श्रितानुगमह;
फोडी न गुह्य, तम झोडी, दया करि न थोडी पदानतजनीं.
मोडी न रीति, तरि होडी तसी, सुगति घोडी सजी मुनिवनीं. ४
तोका स्मरे नृपति, जो कातरत्व धरि, शोकार्तमानस मरे.

१. हिता करूनि दया प्रकटी–**पंत**. २. पुत्ररूप सुखाला. ३. मोठें स्थान. ४. पापरूपी वायु भक्षण करणारा. ५. मावता. ६. पृथ्वी. ७. स्त्री (अहल्या). ८. शिवचाप. ९. खोडलेला शब्द–**माझिजा**. १०. आश्रित सेवकांचा उत्साह.

ओकास ये भरत, लोकापवादहत तो कार्य साधुनि सरे.
ओकारि आइ सम, धोका करी बहु, अहो! काय तें पद तया?
हो कामद श्रित विलोका म्हणे प्रभुसि घोका[1] न 'हा!' म्हणु दया.
[2]व्यापास दे सदय त्यां[2] पादुका, हरुनि तापास, पाठवि पुरा.
बापास तेंवि, नमि मापाळ अत्रिस, उमापा श्रमा कारि चुरा.
सापा तसा च वश शापा विराध गतिला पाववी, [3]बहुमुनि-
व्यापारभीघ्न मुख पापारि दावि घटजा, पादपद्म नमुनीं. ६
पाहे जटायु खग, बाहे, म्हणे, 'तनय आहेस, जाण वसती
बा! हे तुम्ही च, वस,' लाहे प्रमोद विभु, राहे, निवे बहु सती.
वाहे कुबुद्धि वपु, या हेयं[4] तें; प्रभु न साहे, विरूप करवी.
[5]स्वाहेशसा चि शुचि बाहेर घालि तिस, माहेर ती न उरवी. ७
जो राक्षसेंद्र खळ, चोरा तया परमघोरा सती हि गवसे.
होरा[6] गणी कुमति तो रावण; क्षुधित मोरा मदें अहि डसे.
'भो राज्ञि! भेट च, नको राग दावुं चिर,' थोरा जनीं नच वसे.
खोरा म्हणे, 'न दृढ हो; राम, केवळ चकोरास चंद्र न दिसे.' ८
[7]अक्षीणहार्द विभु [8]अक्षि श्रितीं वसवि, पक्षी पित्यासम करी.
स्वक्षीरशुद्धयश लक्षी कबंधवधिं, न क्षिप्र सोडि शबरी.
भक्षी फळें, स्वनिधि यक्षीस दे सुगति, रक्षी पदानत हरी.
[9]प्रक्षिप्तबाण कपिवक्षीं शिरे, दहन कक्षीं तसा, असु हरी. ९
रुद्रावतार न समुद्रास भी, [10]द्विषंदसुद्रावक द्रुतगती.
मुद्रार्पणें हरुनि [11]उद्राक्षसाधि कारि मुद्राशि तो बुध सती,
[12]सुद्राक्षवाक् श्रुति न शूद्रा जिरे, सति न रुद्राक्ष[13]राजि उचिता,

---

१. मूळ पाठ—ओका. २. पाणी सुद्धां न पिणाऱ्या भरतास. ३. पुष्कळ मुनींच्या व्यवहाराची भीति नाहींशी करणारा. ४. त्याज्य. ५. अग्नीप्रमाणें. ६. सुमुहूर्त. ७. अक्षीणप्रेम. ८. डोळा. ९. जोरानें फेंकलेला बाण. १०. शत्रूंचे प्राण द्रवविणारा. ११. राक्षसविषयक मोठी चिंता. १२. चांगल्या द्राक्षाप्रमाणें मधुरभाषणी. १३. रुद्राक्षमाला. (सति रुद्राक्षराजि उचिता न).

क्षुद्रा वदे कपि मरुद्राज पाहुनि सुमुद्रा तसी च शुचिता. १०
[1]अंकातिवीर्यपरकंका मराल [2]पविटंकातितीक्ष्णनखर
डंका करी [3]शमनसंकाश, जाळि वरलंकाख्यशत्रुनगर;
रंका तसें न गणि पंकाब्धिला, त्यजुनि शंका, शिवे पारिभवा
अंका न [4]दास्यविदलंकार [5]तो हरि कलंका यशें आरिभवा. ११
श्रीराम भेटुनि समीरात्मजा, जलधितीरास जाय सबळ;
क्षीराब्धिसें यश करी, रावणानुजनिची राहवी तळमळ.
वीराद्य सेतु रचवी, राक्षसांसकट भी रावणास धरवी.
धीरा[6]र्यमौलिमणिनीराजितांघ्रि विभु ही राजरीति करवी. १२
दूता न मानि पुरुहूतारि मंदमति पूता मता नच वळे,
[7]चूता त्यजूनि वारि तूता, सुमंत्रहतभूतापरी च खवळे;
[8]लूताभवा न गज सूता धरे, प्रभु चमू तापवूनि खपवी;
धूता मळा, नमानें भू तारिता, द्रुहि[9]णसूता यशांत लपवी. १३
से[10]ना रणांत बहु सेना सदा खपति, येना कधीं जय करा.
श्येनापुढें चटकसे नाशले सुभट; वेनाधिकोद्धत खरा.
जे नाशहेतु गुरु, ते नागपाशमुख फेना अपाय हसले.
मेनासुता[11]त्तनुति देना स्वहानि, सुहृज्जे[12]नां तयास न सले. १४
हाणी पयोदरव, 'पाणी!' असें म्हणवि, न्हाणी बळ [13]क्षतभवें;
बाणीं खिळी, अगद आणी, प्रमोह नग खाणी, मरुत्सुत लवें.
[14]प्राणींद्रधी निववि वाणी समेत, शिवराणी हि 'साधु!' वदली.
गाणीं शची हि रचि, वाणी शिवार्थ कपि जाणीव शक्ति बदली. १५

---

१. महापराक्रमी शत्रुरूपी बगळ्याला. २. वज्राघातापेक्षां अतितीक्ष्ण नखें ज्याचीं असा. ३. यमासारखा. ४. दास्यज्ञश्रेष्ठ. ५. मारुति. ६. धीर व आर्यशिरोरत्न अशानीं पूजित पद ज्याचें. ७. आंब्याला. ८. कोळीष्टकाला, कोळ्यानें बांधलेल्या जाळ्याला. ९. कर्पूरगौर-**पंत.** शिवसुत कार्तिकाला. १०. साधिपति. ११. मैनाकापासून मिळविली आहे स्तुति ज्यानें. १२. बुरणुसाला. १३. रक्तानें. १४. रामाची बुद्धि.

स्वारी सबंधुसुत मारी प्रभु, स्वहत तारी, दया बहु करी.
वारी जनुर्मरण, सारी अघें, परमभारी हि दुर्मति हरी.
नारीश्वरी सुखवि, खारी सुधा गमवि, चारी यश त्रिभुवना.
हा रीति चापशरधारी असी प्रकटि सारी, बरी कविमना. १६
प्राज्यानुकंप[1] करि राज्याधिकार, बहुवाज्यादि दे द्विजजना.
आज्यासि होमि, मुनि याज्यातिमुख्य मग हा ज्या[2] न ओढि दमना.
त्याज्या न त्या भजति या ज्या प्रजा गति विभाज्या[3] तयां करि महा
आज्यादि दीक्षित धराज्यानिजित्रिदशशराज्यार्तिनाशक महा. १७
व्हावें कृतार्थजनु, जावें लयासि अघ, यावें महागतिमना.
व्यावें विशुद्ध यश, मावें जगीं न तरि, भावें दशास्यदमना
ध्यावें, स्वतत्व उमगावें, असें चि शुचि, ठावें असे गुरुमुखें;
'पावें प्रभो!' म्हणुनि नावें सदा जपत गावें चरित्र चि सुखें. १८
धाया, मयूरमतिला या यशीं सिरवि, मायानियामक बळें.
गाया तरी च गुण हा यामिनी दिवस, नायास नाकुळ खळें,
कायादि सर्व रघुराया समर्पुनि, निवाया सुबुद्धि सजले,
माया करी प्रभु चि दायादसे भजक पायां म्हणोनि भजले. १९

इति श्रीरामनंदनमयूरविरचितं कविप्रियं श्रीरामायणं संपूर्ण ।

---

# श्रीप्रियरामायण

(वैतालीयं)

कमळापति राम दिग्रथा पितृता दे, करि पावनी कथा,
उघडी प्रभु मुक्तिच्या पथा, उडवी सर्व निजाश्रितव्यथा. १
वधिली पहिली च ताटका, दिधलें सद्यश विश्वनाटका,
प्रभुनें गुरुसा चि लक्षिला, विनयें गाधिजयज्ञ रक्षिला. २
खळ राक्षस फार मारिले, मग ते गौतमदार तारिले,

---

१. अति दयाळु. २. धनुष्याची दोरी. ३. विभागण्याला योग्य.

त्रिपुरारिधनुष्य मोडिलें, यश कन्यावररत्न जोडिलें. ३
भुजविक्रमलेश दाविला, निजकर्मा[1] भृगुराम लाविला,
स्वसमृद्ध हि राज्य सोडिलें, पितृसत्यव्रत तें न तोडिलें. ४
प्रभु वल्कजटा सुखें धरी, मनु वर्षें वनवास आदरी;
गुह होय जटादिकें श्रमी, न भरद्वाज चि तत्त्वधी[2] शमी. ५
स्वसुखीं न दिसे चि तूट यां[3] वदला विध्वनि[4] चित्रकूट 'या,'
स्मरतां सुत तापस त्यजी असु राजा, करि शाप सत्य जी! ६
भरता गुरु शीघ्र आणवी, जननी त्या कृतकार्य जाणवी,
बहु निंदुनि साधु तो तिस त्यजि, बोले, 'भुजगी च होतिस'. ७
करि साधु यथोचित क्रिया विधिनें लक्षुनियां पितृप्रिया,
मग बंधुकडे चि सोडुनि क्षिति गेला द्रुत हस्त जोडुनि. ८
प्रभु त्या भरतासि युक्तिनें हितसत्यप्रियरूपसूक्तिनें
निववी, करि तुच्छ कापुरा, फिरवी देवुनि पादुका पुरा. ९
करि अत्रिस राम वंदन, स्वपित्या जेंवि सुशीळ नंदन,
बहु भूमिसुतेसि गौरवी अनसूया, यश चंद्रगौर वी. १०
परमोग्र विराध मारिला प्रभुनें तुंबुरु[5] भक्त तारिला,
शरभंगसुतीक्ष्णकुंभजप्रिय केलें, बहु रक्षिले द्विज. ११
पितृमित्र जटायु पूजिला, प्रसवे पुण्य करूनि भू जिला,
करि मान्य तिचें सुरक्षण, स्तविती गृध्रवरा सुर क्षण. १२
यश पंचवटीस दे, वसे, ऋषि ज्याचे विजयेच्छु देवसे;
वदली हृदयांत गौतमी[6], 'प्रभुपादाब्जरजें सुधौत[7] मीं'. १३
धरि शूर्पणखा कुकामना, प्रभुच्या तो न रुचे चुका[8] मना,
द्रुत कापवि नाक कान, या न सुखें गाइल नाक कां[9] नैया? १४
खर बंधु तिचा, तया खळा प्रभु मारी, निवटी रणीं बळा,

---

१. ब्रह्मकर्म करण्यास. २. तत्त्वज्ञानांत गढली मति ज्याची. ३. रामाला. ४. शब्दरहित. ५. हा वैश्रवणाच्या शापानें विराध झाला. ६. गोदावरी. ७. शुद्ध. ८. चूक, अपराध. ९. एकपत्नीव्रतविषयक नीतीला.

भगिनीवदन श्मशान[1], नें प्रियें[2] पाहोनि खिजे दशानन. १५
कपटें कनकाभ[3] तो अरी मृग मारीचनिशाचरा करी,
खळ तो हरि जानकीमती, दवडी तद्ग्रहणार्थ ती पती. १६
विशिखें हृदयांत ताडितां, प्रभुनें तो कपटैण[4] पाडितां,
प्रभुसा च वदे दयारसें खळ 'हा लक्ष्मण!' 'हा प्रिये!' असें. १७
असुसंकट सत्य वाटलें, हृदयीं शोकतमिस्र[5] दाटलें,
वदली, 'द्रुत धांव देवरा! प्रियसंरक्षण या चि दे वरा.' १८
'प्रभुतें शिव[6] नित्य सेवितें, मन जें कल्पि नसे चि देवि! तें,'
तिस तो विनवी, 'निशाचरें छळ केला, सति! जाण हें खरें.' १९
वदली, 'हृदयांत नांदतो तव माझा अभिलाष, चांद तो
प्रभु मात्प्रिय होय, आज वा न उद्यां[7] तूं रुचसील काजवा.' २०
क्षितिजा असि फार कोपली, निजदासी शुचि बुद्धि लोपली,
स्वविवेकसुदीप मालवी, उटजांतूनि बळें चि घालवी. २१
कटु ऐकुनि तो असें रडे, द्रुत जाय प्रभुसत्तमाकडे,
तव ये दशकंठ, तो यती रमला, सादरबुद्धि होय ती. २२
हरि कामसहाय[8] हा यती, वदली शापुनि 'हाय! हाय!' ती,
'अजि राघव वीररायजी! करुणा तीं त्यजिली च काय? जी! २३
त्यजिली कसि कीर्ति? या च, कीं तुमच्या दैन्य उरे न याचकीं;
अजि लक्ष्मणजि! त्वरा करा, यश द्या स्वाहितजित्वरा[9] करा.' २४
अवलोकुनि गृध्रपा वटीं यश द्याया अतिभव्य, सेवटीं,
वदली, 'निववा दयारसें अजि मामाजि! पहा, उठा' असें. २५
करि तो अरितोषहानितें[10], समरा त्या सुरवृंद वानितें,
रथ भंगुनि सून सोडवी, परि त्याचे विधि[11] पक्ष तोडवी! २६

---

१. मसणवटीसारखें भयाण. २. अप्रिय, अमंगल. ३. सुवर्णकांति. ४. माया-मृग. ५. अंधकार. ६. कल्याण. ७. आज वा उद्यां=केव्हां हि. ८. मदनानें प्रेरणा केलेला. ९. स्वशत्रूंना जिंकणाऱ्या. १०. सीता सांपडल्याचा आनंद. ११. भवितव्य.

अमृताधिकगोडवीक्षण[1] द्विज पावे, सुन सोडवी क्षण;
परि तोडुनि गृध्रपक्षती हरि अन्यायरणैकदक्ष ती. २७
कपिपंचक[2] ऋष्यमूकगीं[3] क्षितिकन्या अवलोकि, ती मग
त्यजि त्यांत चि आपले नग, स्वपुरा ने तिस, कांपवी जग. २८
कथि लक्ष्मण वृत्त, 'हा!' वदे प्रभु, त्या शोक मनुष्यभाव दे;
करि फार तदा विलाप हा, वदला[4], 'ताप न दाविला पहा.' २९
उटज द्रुत शून्य देखिलें, प्रभुनें विश्व हि शून्य लेखिलें,
बहु शोधिलि विश्वजीवनें, न दिली नेलि गजा गजी वनें[5]. ३०
रणरंगमहानटायुतें[6] स्तुत जें कर्म, करी जटायु तें;
प्रभुनें हि असें च मानिलें, दिधलें तोय[7], यथोक्त वानिलें. ३१
परमोग्र कबंध मारिला, प्रभुनें दारुण शाप वारिला;
शबरीस बरी दिली गती, स्वपदाब्जीं भ्रमरी जिची मती. ३२
यश हें सुजनांत ठेविलें, मग पंपातट साश्रु सेविलें,
पवनात्मज भक्त लक्षिला, रविचा पुत्र सुकंठ रक्षिला. ३३
नगभित्सुत[8] बंधुस च्छळी, खळ वाळी वधिला महाबळी,
सुगळा कपिराज्य ओपिता गमला राम दयाळु तो पिता. ३४
स्वकपीस म्हणे, 'सती पहा द्रुत द्याया रघुसत्तमा महा,'
शतयोजनसिंधुतें करी सहसा गोष्पद वातभू हरी. ३५
हुडकूनि पुरींत तो धरी बहु चिंताज्वर कीशकेसरी[9],
सदशोकवनांत पाहिली नियमें[10] स्वारिलयार्थ राहिली. ३६
कपि बैसुनि शिंशपानगीं निरखी, जीस तुळा नसे जगीं;

---

१. अवलोकन. (अमृताहून अधिक गोड अशा दृष्टीनें सीतेनें जटायूकडे पाहिलें). २. सुग्रीव आणि त्याचे प्रधान नळ, नीळ, जाम्बवंत व मारुति. ३. गं=असलेले. ४. मनुष्यभाव रामास अथवा राम जगास वदला—**पंत**. ५. नेली (नेलेली) गजी (सीता) वनें गजा (रामा) न दिली.=रामाला वनांत सीतेचा शोध लागला नाहीं. ६. रणांगणावर मोठा पराक्रम गाजविणाऱ्या लक्षावधि वीरानीं. ७. तिलांजलि. ८. इंद्रपुत्र वाळी. ९. वानरसिंह मारुति. १०. व्रतस्थ.

तव ये, विनवी कुधी, तया झिडकारी, न धरी सती भया. ३७
परते, पर तेज हारवी; नय सोडुनि म्हणेल 'हा!' रवी.
यश वर्णुनि तो करी नति, प्रभुमुद्रा तिस दे महामती. ३८
प्रियवृत्त पुसे, दया सती करि, चूडामणि दे तयास ती;
वन भंगुनि मर्दि अक्ष, तें पुर देहें करि भस्म अक्षतें[1]. ३९
क्षितिजोदित[2] वायुतोक पी; परते, ये द्रुत हृष्ट तो कपी,
विनयें धरि पाय, दे खुण; प्रभु आलिंगुनि फार घे गुण. ४०
'अरिची करु हानि रोप, 'हा!' म्हणवू,' सेवि महानिरोप हा,
प्रभु जाय पयोधिच्या तटा, करिती[3] नृत्य सुरर्षिच्या जटा[3]. ४१
कपिसैन्यसमुद्र गर्जन प्रलयींचें करि तेंवि तर्जन[4],
प्रभुनें पदभाक्[5] बिभीषण स्तुत केला चि न लावितां क्षण. ४२
मग सागर भेटला भयें, दिधली त्यास अभी[6] महाशयें,
दृढ सेतु विनिर्मिला नळें, तरलीं सिंधु सुखें महाबळें. ४३
सुगळें दशकंठ पाहिला, न महाकोपज वेग साहिला,
द्रुत त्यावरि घातली उडी, दिधली जी उचिता दशा कुडी[7]. ४४
प्रभुमस्तकचाप दाखवी, सतिला शोकविषाग्नि चाखवी,
सरमा परमाप्तता धरी, कळवी छद्म, तदश्रुतें हरी. ४५
भगवान् नयधर्म[8] आठवी, सुकृती अंगद दूत पाठवी,
कथि तो 'गुणपाशनाश[9] मीं हितवाक्श्री कुणपाशना[10]! शमीं[11]. ४६
शमवील कळीस साम रे!, हरिनादें हि बळी ससा मरे,
अनळास हि कंप दे सती, त्यज, संरक्षिल संपदेस ती.' ४७
कटु मत्त[12] महातपें[12] वदे, चिर[13] धी भेसि न हात पेंव[13] दे,

१. जखमी न झालेल्या. २. सीतेचें भाषण. ३. रावणवधाची वेळ जवळ आली म्हणून देवऋषि आनंदानें नाचूं लागले असा भाव. ४. भयप्रद. ५. राज्याधिकारी. ६. अभय. ७. वाईट. ८. सामदामादि राजनीति. ९. रजोगुणपाशोयमेव नाशक इति –**पंत**. १०. प्रेतभक्षका (राक्षसा)! ११. शांततेच्या कामीं. १२. मोठ्या तपश्चर्येनें माजलेला. १३. धी भेसि हात न दे, चिर पेंव दे=रावणाच्या बुद्धीनें भयाचा आश्रय न करितां उलट त्याला कायमचें गाडून टाकलें.

धरवी परवीरभंगदा अहि वीशा खळ तेंवि अंगदा. ४८
खवळे, न वळे चि दांडगा, हरिसीं जेंवि मदांध लांडगा;
प्रभुसीं करि युद्ध, मारवी बळ राम प्रभु त्या तमा रवी. ४९
स्वपरक्षयहेतु युद्ध तें कटु केलें चिरकाळ उद्धतें,
बहु ज्यांत शिरोब्जकर्तन त्रिदशागण्यकबंधनर्तन. ५०
[1]पति रक्त करूनि राहिल्या, शतशः शोणितसिंधु वाहिल्या,
क्षितिनें भयदा न साहिल्या, अमरींनीं हि न नीट पाहिल्या. ५१
घननाद करूनियां पण प्रभु जे दुर्जय रामलक्ष्मण
अहिपाशनिबद्ध ते करी, सुगळश्रीधृतिबुद्धि ही हरी. ५२
वदवे न तसी हि शोचि तें, त्रिजटा त्या घन होय [2]शोचितें,
करि पन्निप मुक्त बोधसा, कथि 'शत्रूंत सुकीर्ति हो! धसा.' ५३
मग जागविला महाबळें घटकर्ण स्वजया महाखळें;
कटका गट काळसा करी, सुगळा मोडुनि संगरीं धरी. ५४
परतोनि पुरींत जो शिरे, म्हणती त्या 'सुरकाळ होसि रे!'
तव सावध होय तो [3]हरी, हरि तच्छ्री चि जयासि, [4]मोहरी. ५५
फिरला, शिरला बळांत कोपें, गमलें केवळ तें तयासि सोपें.
भुज पाद शिर प्रभु स्वरोपें हरि, शोभे अरिधूमकेतुलोपें. ५६
करि शोक दशास्य, सोदरक्षय होतां धरि फार तो दर,
मग कुंभनिकुंभ कोपले बहु तन्नंदन, ते हि लोपले. ५७
त्रिशिरा अतिकाय ही खिजे, दशकंठात्मज संगरीं निजे;
सुत देवनरांतकादि जे, बहु त्यांच्या रुधिरें धरा भिजे. ५८
तपले, खपले, न राहिले प्रिय मोटे, भटभंग पाहिले;
घननाद कृती, तथापि त्या स्वजयाची च कथी कथा पित्या. ५९
प्रभु, लक्ष्मण, सैन्य ही खिळी; अतिमूर्छा सकळांस ही गिळी.
स्थळ ऋक्षप दूर जाणवी, अतिदिव्यौषधि शीघ्र आणवी. ६०
मरुदात्मज तो उडे जवें, यश अत्यद्भुत दाखवी नवें;

---

१. समुद्र. २. [सीतारूपी] ज्वालेंत. ३. सुग्रीव. ४. पराभवी.

वदले सुर साधु मर्त्य 'गा;' हारि [1]कैलाससमीपवर्त्यगा. ६१
द्रुत ओषधिशृंग आणिलें, व्यसन क्षिप्र समूळ खाणिलें,
परतोनि तसें चि पाविलें, बळ सेश स्वनुतीस लाविलें. ६२
विधि, शर्व सदार, मानवे, स्तव ती गाय सदा रमा नवे.
उपकारभरातें तो लवे प्रभु, कीं हा गिरिसीं न तोलावे. ६३
प्रभुची धारि [2]मुग्धभाव धी, खळ मायाजनकात्मजा वधी.
करि लक्ष्मण तळ्या रणीं, पुरवी वासवदृष्टिपारणीं. ६४
सुतशोकदवांत भाजला, क्षितिकन्याहनना न लाजला;
सदमात्य सुपार्श्व वारि त्या सुरगोब्राह्मणसाधुमारित्या. ६५
चतुरंगबळाब्धिला भरी बुडवाया रघुनायका अरी,
प्रभुमार्गणकुंभजा पुरे न जसें कक्ष दवापुढें नुरे. ६६
भट घे [3]जड वासवास जे समरा सेउनि आसवा सजे,
म्हणवी बहु 'हाय!', कांपवी कपि, भी यत्खरसायकां पवी. ६७
[4]प्रियसून्वरिचें स्वशक्तिनें दशकंठें [5]भ्रमहातभक्तिनें
समरीं मग [6]वत्स भेदिलें, भय भारी भगवत्सभे दिलें. ६८
नगशृंग पुन्हां हि तो दयाकर आणी प्रभुच्या हितोदया;
प्रभुतें भजनें करी रिणी, [7]गणि त्या भक्ति निजा शरीरिणी. ६९
कळहा बळहानिकारणा करि वाटे खळ हा निकारणा;
निरया चिर या न जावया यश दे आत्मपदा भजावया. ७०
भगवान् [8]हरिच्या रथीं चढे, बहु कोपें अरि मानसीं कढे;
वचके हारिला न वारण, त्रिदश प्रेक्षिति हा नवा रण. ७१
दिनसप्तक जाय संततें समरें, अद्भुत गाति संत तें.
तुटलीं फुटलीं पुन्हां शिरें, प्रभु 'चिंतेंत' म्हणे 'मना! शिरें.' ७२
प्रभुनें समरांत सोडिल्यां विशिखांच्या अरि तापला शतें,

---

१. कैलासाजवळच्या द्रोणागिरीला. २. मूर्च्छा. ३. कठिण, अजिंक्य. ४. प्रियपुत्रशत्रु लक्ष्मणाचें. ५. भ्रमानें नाहींशी केली आहे भक्ति ज्याची. ६. वक्षः-स्थळ. ७. राम त्या मारुतीस–पंत. ८. इंद्राच्या.

धारि रूप मधूंत होय जें कुसुमींहीं धरिता पलाशें तें. ७३
रविचें हृदय स्वयें कथी घटजन्मा, प्रभु तो तया जपे,
रविदत्तवरें परा मथी; दुहिणास्त्रें उर भेदितां खपे. ७४
अरि होय परासु वासवा हे शुभ वेळा निववी, रमा रणातें
स्तवि, कीर्ति बरा सुवास वाहे, मन दे या शिव वीरमारणातें. ७५
परमोत्सव होय देवलोकीं, नरलोकीं, भुजगांचिया हि ओकीं.
त्रिजगद्रिपु मारिला चि तो कीं, प्रभुची दृष्टि जगीं जसी च तोकीं. ७६
सुरदुंदुभि तो चि मेघ गाजे, बहु वीणामुरजादि वाद्य वाजे,
अजितीं वरपुष्पवृष्टि साजे, मुनि गातां गणिकागणीं न लाजे. ७७
मधुरस्वर, नैकरागजातीक्षम गंधर्व रघूत्तमासि गाती.
हिम मंद सुगंध वायु वाहे. स्तवितां न द्विजदेववृंद राहे. ७८
'जय राघव! राम! रावणारे!' म्हणती 'तूं हि सुधन्य रावणा रे!
प्रभुजी! भवदूनपावणा रे! खचरा! हो गतिपूज्य पावणारे!' ७९
करवी बरवी क्रिया तशाची, बहु चाड प्रभुला सदा यशाची.
न रुचे स्वशुभा कथा, पिशाला प्रभु दे सद्गतिची तथापि शाला. ८०
प्रभुच्या वचनें दशास्यभार्या समजावी कळवूनि तत्व आर्या;
शुचिबुद्धि बिभीषण स्वतापा शमवी गावुनि राघवप्रतापा. ८१
मग राम पुन्हा करी दया त्वरित प्रेरुनि लक्ष्मणा तया,
विधिनें विनयालयाश या बसवी राज्यपदीं कृताभया. ८२
शिखिदिव्य नता पतिव्रता करि; पाहे च न तापतीव्रता;
स्तविती सुर सर्व दास, ती मिरवी श्रीयश सर्वदा सती. ८३
सुरराजमतें पैरासुतातें दिधली भेटि अजा परा सुतातें,

---

१. वसंतऋतूंत. २. रावण रक्तबंबाळ होऊन फुललेल्या पळसाप्रमाणें लाल झाला. ३. पाताळांत. ४. अनेक रागरागिण्यांचे प्रकार जाणणारे. ५. संसारदु:खिताना पावणाऱ्या! ६. प्रभुशत्रो! ७. वेड्या रावणाला रामाची पावनकथा रुचत नव्हती तथापि. ८. श्रेष्ठ मंदोदरी. ९. अत्यंत विनयसंपन्नास. १०. मृत पिता दशरथ त्यानें.

‘चिर राज्य करून [1]ते जगातें’ वर दे ‘[2]जें तव बाहुतेज गातें.’ ८४
‘भरतीं भरतप्रसूवरि प्रभुची नित्य असो दया बरी.’
विनवी रघुवीर यापरि, प्रिय तें, मान्य करूनि तो करी. ८५
[3]मितें ज्यांहुनि [4]सिंधुसैकत प्रभुचे ते गुण गात ऐकत
स्वपदा नृप जाय तो महें सुविमानें, यश गाय [5]सोमें हें. ८६
वदला जगदीश, ‘देवराया! मृत कीशर्क्ष उठोत, दे वरा या.’
भजनार्थ पुन्हां सजी ‘वसा रे!’ म्हणती ते ‘भजनीं’ सजीव सारे. ८७
पलभुक्पति आग्रहें [6]अभूतें विनवी पूजन घ्यावया प्रभूतें;
कथि त्या ‘सुगळास पूज पूजा मम हे जे दिधली सुकीर्ति [7]भूजा.’ ८८
भरता भर तापवी महीचा, गमला भोग चि [8]भोग त्या अहीचा;
द्रुत भेटिव तो चि बंधु आधीं; बहु मत्पूजन हें चि हें चि साधी.’ ८९
सबळा सुगळा पुजूनि भावें वदला स्वामिस ‘पुष्पकीं बसावें.’
प्रभु त्यासि म्हणे, ‘तव प्रभावें जय हा, मत्सह बा! तुवां असावें.’ ९०
ससुकंठ [9]असाधुनिष्कलंकापति, अंकीं बसवूनि निष्कलंका
प्रभु पुष्पक शोभवी, शतातें सुगतींच्या धरि, दावि [10]वीशता तें. ९१
शतयोजन भव्य सेतु पाहे क्षितिकन्या, क्षण चित्रसी च राहे;
प्रभु [11]साधुसमागमस्थळातें कळवी, जेंवि तृषार्तिहृज्जळातें. ९२
म्हणती यति ज्या दयाघना शें ‘विझवा दुःसहकर्मदाव, तारा,’
मुदिता बहु त्या भयाघनाशें नमि तारा [12]नतशर्मदावतारा. ९३
‘मज हे विरहांत दत्तकंपा सति! आतां सुखहेतु तीच पंपा;’
कळवी शबरी मतंगशिष्या प्रभु, ज्याचें यश दे प्रकंप [13]तिष्यां. ९४
कळवूनि कबंधवृत्त मोदा प्रभु दे, त्याहुनि दाखवूनि गोदा;
वदला, ‘सति! हे पहावि शाळा रुचिरा पंचवटी महाविशाळा. ९५

---

१. अन्वय (?). २. जग. ३. मोजण्याजोगें. ४. समुद्रांतील वाळूचे कण. ५. शिव. ६. अत्यंत. ७. सीता. ८. फणा. ९. सज्जन अशा सुवर्णलंकापति बिभीषणासह. १०. गरुडभावातें-**पंत**. ११. बिभीषण, सुग्रीव वगैरे. १२. भक्तसुखार्थ अवतरलेल्या रामास. १३. कलि-**पंत**.

भरिलीं नयनें जटायुतातें, मजला पाहुनि ज्या जटायुतातें,
त्यजिले असु हि त्वदर्थ जेणें, महिचें तद्दृट हा विलोक लेणें.' ९६
घटजादिमहीसुराश्रमातें प्रभु दावी, कळवी पराक्रमातें,
मग दाखवि चित्रकूट, अंगा करि रोमांचित दाखवूनि गंगा. ९७
दयितेसह वंदि रावणारी तिस जी सर्व जगास पावणारी,
भरताप्रति मारुतीस धाडी, मुनिपादाब्जरजें नमूनि झाडी. ९८
निववी घनसा सख्या गुहास, प्रभु आणी बहु तन्मुखीं सुहास.
भरता बहु तापल्यास मोर द्रुत येतां करि आपल्यासमोर. ९९
सुखवी गुरुमातृमंत्रिपौर; प्रकटी सद्यश शंभुहासगौर;
अभिषेक करूनि घे, रवीतें यश दे, जें जग सर्व घेरवी[1] तें. १००
पहिल्या[2] चि भजे नृपासना, [3]तें वरि कीर्त्यर्थ महाकृपास नातें[3];
धरि भोग गुणा नवा नरांचा[4], प्रभुराज्यांत उणा न वानरांचा. १०१
बहु दे न कधीं च जें मिळालें त्रिजगीं तें सुख वासवा सवास[5].
प्रभुराज्य म्हणे, 'यशास माझ्या चिर मोक्षा! मुख[6] वास वास वास[6].'
बहु पुत्रवती तयांत पुत्र त्रिजगीं एक चि अंजना भला वी;
निगमस्तुत[7] ही स्तवा जयाच्या निजजिह्वेप्रति कंजनाभ[7] लावी. १०२
कथि हा गुण[8], भव्य सादर[9] देती सुर, सादास सदा निकां[10] महर्षी[11].
करि पाजुनि रामकीर्तिरूपा सुरसा, दास सदा निकाम हर्षी. १०४
सरमाधव[12] जो नमी पदें त्या परमा राम दयाप्रभाव दावी.
न रमापतिसा दयालु कोणी पर, मा[13] या प्रभुची प्रभा वदावी. १०५
शमवी, वमवी कुवासनेला, रमवी धी, गमवी स्वभक्ति भारी,
धरवी बरवी च रीति, नाम स्मरवी, हा, करवी प्रणाम, तारी. १०६

---

१. यशेंकरून–**पंत.** २. वडिलांपासून चालत आलेल्या. ३. तें राजेपणाचें नातें परम कृपाळु रामास कीर्तीच्या आशेनें वरितें झालें, असा भाव. ४. नराना नवे नवे भोग मिळत. ५. सूर्यास. ६. तोंड वेंगाडीत रहा. ७. वेदानीं स्तविलेला कमलनाभ राम हि. ८. [मारुतीचे]. ९. साथ. १०. तयार. ११. वाल्मीकि–**पंत.** १२. सरमापति बिभीषण. १३. लक्ष्मी.

सकळांसि सुलोकवास[1] तुल्यप्रियकर्ता[2] प्रभु राम दे, वदे 'हा!'
बहुमोह[3] तयांचिया विरागा रुचिरा पाहुनि कामदेव[3] देहा. १०७
प्रभुच्या चरणीं मयूर भावें 'प्रियरामायण' हें नमूनि वाहे,
यश हें चि सुखें सदैव गावें, स्थिरता या चि रसीं मनास आहे. १०८
प्रभुकीर्तन या करी कवीचें सद यागा, यम लाविना शयाला;
म्हणतें यश हें 'नसे सदा जो सदया गाय मला विनाश याला.' १०९

इति श्रीरामनंदनमयूरविरचितं श्रीप्रियरामायणं संपूर्ण।

---

# रमणीयरामायण

(सारंगवृत्त)

श्रीशीं कराया यशें धन्य विश्वास, ज्यास श्रुतिब्राह्मणांचा चि विश्वास,
केला अजाचा सुत क्ष्माप तो तात, कीं सर्व दिक्कंठसंत्रस्त होतात. १
श्रीकोसलेशात्मजापुत्र तो राम ये केकयाच्या तनूजोदरा धाम[4]
त्या तात ठेवी स्वसच्चित्तविश्राम[5], आधीं 'भ' मध्यें 'र' अंतीं 'त' हें नाम. २
जी दिग्रथस्त्री सुमित्रा तिला होय, तो लक्ष्मण स्वाग्रजाची धरी सोय[6].
शत्रुघ्न तैसा चि राहों नदे खेद, त्यान्ही जगत्पूज्य झाले, जसे वेद. ३
केले वसिष्ठें द्विज, ज्ञान वेदांत तें तों चि ये, जों न आले नवे दांत.
जाणे महानंद तो देवपुत्रास, ज्याचें षडूर्मींस[7] ही दे वपु त्रास. ४
जों भूप चित्तांत चिंती विवाहास, तों गाधिचा पुत्र मागे विवाहास[8].
यज्ञावना ने, पथीं दे तया अस्त्र, शीतातपार्तास द्यावें जसें वस्त्र. ५
जी ताटका मार्ग रोधी, तिच्या बाण वेगें उरीं राम हाणी, हरि प्राण.
सिद्धाश्रमीं जाय, रक्षोबळा 'हाय!' हें बोलवी; त्या जया सत्सभा गाय. ६
नाशी अहल्यासतीचा महाशाप; ओढूनि मोडी उमाजानिचा चाप;

---

१. वैकुंठवास. २. सर्वांचें सारखें प्रिय करणारा. ३. पुष्कळ झाला आहे मोह ज्याला असा कामदेव. ४. ब्रह्मरूप तेज. ५. स्वतःच्या व सज्जनांच्या चित्तास विश्रांतिप्रद. ६. आश्रय. ७. षड्रिपूंस. ८. गरुडवाहन–पंत.

सीता[1]मनींचा निवारी क्षणें ताप[2], दे भार्गवा शांति, जी संहरी पाप. ७
‘सोडूनि राज्यास, जावें अरण्यास,’ माता म्हणे; आवडे तें शरण्यास;
वल्की निघे लक्ष्मणा त्या हि सीतेस घेऊनियां राम विश्लेषभीतेस. ८
झाले श्रमी लोक, त्यां नावरे शोक, संपन्न जें ओक, तें भासलें ओक.
भेटे गुहाला, रडे तो जसा मुग्ध[3], मागे वळाया जटा जेधवां दुग्ध. ९
रामें भरद्वाज केला सुखी फार; तो चित्रकूटाद्रि ही तापसाधार.
शोकें चि सोडी धरेचा धणी काय, निंदी प्रसूतें स्वयें सत्सभाराय[4]. १०
संस्कारुनि क्षोणिच्या पाळका तोय दे, रामपादांबुजीं भृंग तो होय.
घे पादुका, आग्रहें तो फिरे; भक्त झाला न त्या दुर्लभीं ही पदीं सक्त. ११
अत्रीस भेटे प्रभु, ज्ञानिगीतेस[5] दे तत्प्रिया अंगरागादि सीतेस.
स्वर्गास धाडी विराधा रहायास, कीं देखवेना निराधार हा[6] यास[7]. १२
श्रीदंडकारण्य जे या पवित्रास[8] होते निषेवूनि[9]; निष्पाप, वित्रास
ते बाणभंगादि भेटोनियां सर्व केले; तयां स्वर्ग ही भासला खर्व[10]. १३
ज्याचा तपश्रीप्रियेसीं सदा रास[11] तो कुंभभू साधु पूजी सदारास.
दे विष्णु [ तो या ] दशास्यादि भंगास जो मोहनाशार्थ दे आत्मसंगास.
भेटे पित्याचा सखा गृध्र जो त्यास सत्प्रेमें हर्म्यांचिया[12] भव्य जोत्यास.
त्याच्या विचारें चि गोदावरीतीर पावोनि, तेथें वसे तो महावीर. १५
राहे; वसायास अन्यत्र आस्था न; पाहे बरें पंचवट्याख्य हा स्थान.
सौमित्रिनें पर्णशाळा बरी थोर केली, वसे तींत विश्वाहिचा दोर[13]. १६
पावे कुधी रावणाची स्वसा दंड; मेला खर क्रूरकर्मा महाचंड.
ऐकोनि झाले तपस्वी मनीं थंड, शोधी[14] जनस्थान मोडूनि तें बंड. १७
ती दुर्दशा स्वस्वसेची महामाय[15] पाहे, जळे फार कोपें, म्हणे ‘हाय!’
मायामृगें तींकडे तीन तत्काळ आधीं करी, तो हरी श्रीस तत्काळ. १८

१. सीता. २. कोणी रामेतर चापभंग करील कीं काय हें भय. ३. वेडा. ४. भरत. ५. ज्ञान्यांनीं स्तुत अशा सीतेस. ६. विराध—**पंत**. ७. रामास—**पंत**. ८. पवित्र अरण्यास. ९. आश्रय करून. १०. अल्प. ११. क्रीडाविशेष. १२. हर्म्य=वाडा. १३. विश्वरूपी सर्पाची रज्जु. १४. शुद्ध करी. १५. कपटपटु रावण.

भासे शिखी प्राशितो या तुपा, सून ती सोडवी गृध्र तो यातुपासून.
तत्पक्ष खड्गें दशग्रीव तोडून ने, विश्वमातेसि दुष्कीर्ति जोडून. १९
सीता प्लवंगांत टाकी अलंकार, 'हा! राम!' 'हा! नाथ!' ऐसें म्हणे फार.
ठेवी अशोकीं वनीं तीस लंकेंत नष्टायु दिक्कंठ तो; धी न शंकेंत. २०
सौमित्रि सीतोक्त सांगे; म्हणे 'हाय!' शोकें रघूंचा सुतेजा हि तो राय.
धांवूनि ये स्वोटजा पांच सा कोस, मोहीं बुडे राम पाहोनि तें ओस. २१
पाहे, प्रियेचा करीतां वनीं शोध, मूर्छाकुला तातमित्रा महायोध.
पाजी तया तोय तैशा हि शोकांत, तो कां तगेना सुवाद[1] त्रिलोकांत? २२
सीतेसि शोधीत जातां, धरी घोर, केली कबंधीं कृपा श्रीवरें थोर.
धन्या मतंगर्षिशिष्या वनीं होय, सेवूनियां क्षाळुनि श्रीपदें तोयें[2]. २३
पंपातटीं 'हा!' वदे, आठवी रत्न; सौमित्रि सांत्वी; 'करावा' म्हणे 'यत्न.'
सूर्यात्मजासीं हनूमान् करी भेट; तत्सख्य तें जेंवि सिंधूदरीं बेट. २४
दावी अळंकार सुग्रीव, दे हर्ष; तद्दर्शना राम मानी सुधावर्ष.
वाळीस एकें चि बाणें वधि, प्राज्य दे त्या सुकंठासि तारादि तद्राज्य. २५
प्रेषी पहायासि सीतेसि तो कीश व्हाया सखा हृष्ट राम त्रिलोकीश.
सांगितला गृध्रराजाग्रजें[3] शोध, लंघी समुद्रा हनूमान् महायोध. २६
मारूनियां सिंहिकेतें तटा जाय; लंकाधिदेवीस तो बोलवी 'हाय!'
शोधूनि लंका अशोकीं वनीं कीश पाहे सतीतें, सुधेतें जसा वीश[4]. २७
केला तिणें रावणाचा मनोभंग; तेणें निवे वायुच्या सूनुचें अंग.
दिक्कंठ जातां चि मुद्रा तिला धरि अर्पी, कथी वृत्त, तो वाढवी धीर. २८
आनंद त्या वायुजाचा निवेदीनें, तत्काळ अत्यंत जैसा निवे दीन.
पावोनियां वांछिता सन्निधानास, त्याच्या हि भाग्योदयें सन्निधानास. २९
चूडामणी दे, कथी भव्य संदेश, 'या, न्या मला शीघ्र, मारूनि मंदेश.'
वंदी, निघे साधु, पावे प्रभा, वायुसा तो हरी वृक्ष, भव्यप्रभावाऽयु[6]. ३०

---

१. सुकीर्ति. २. तें क्षाळलेलें तोय (तीर्थ). ३. संपातीनें. ४. गरुड. ५. कर्ता 'मी' (कवि). ६. मोठमोठ्या पराक्रमांनीं युक्त आहे आयुष्य ज्याचें असा मारुती.

मारी रणीं मांसभुक्कोटि; केकीश[1] सर्पांत जैसा, तसा तो टिके कीश.
गांठी दशास्यात्मजन्मा महादक्ष तो मारिला वायुच्या नंदनें अक्ष. ३१
कीशाग्नि त्या सैन्यकक्षासि चाटून तो सांपडे मेघनादासि दाटून;
हर्षोनि नेला सभेमाजि बांधून, ते बोलती, 'दुष्ट खावा न रांधून.' ३२
हाणूनि वाग्बाण दिक्कंठमर्मांत, बोले तदज्ञान जें नीतिधर्मांत;
दूषी तदभ्यास जो पापकर्मांत; देवर्षिधी तो करी मग्न शर्मांत. ३३
पाहे वधाया तया तो जसा भूत, तद्बंधु बोले, 'नव्हे वध्य कीं दूत.'
दिक्कंठ 'याचें' म्हणे, 'पेटवा पुच्छ; लंकेंत ताडीत हा हिंडवा तुच्छ.' ३४
तैसें च आरंभितां त्या खळांहीं न झाला महाकौतुकी[2] तो कळाहीन.
पोळी, पळामाजि घोळी अरिव्रात, होळी पुरी होय; चोळी कुधी हात. ३५
एवं दशास्योग्रगर्वाद्रि भंगून, वेगें करी तो मना हीन पंगून[3],
लंघूनियां दुस्तराब्धीस येवून देवास दे हर्ष ती खूण देवून. ३६
सप्रेम आलिंगिला श्रीवरें दूत, केला महाधन्य, झाला महापूत.
मानी तया सूपकारा[4], महाभार वानी, 'महोदार' ऐसें वदे सार. ३७
संगें असंख्यात घेवूनियां वीर, पाहे प्रभूत्तंस पाथोधिचें तीर.
तों या शरण्यास वंदी निवेदून तापा दशास्यानुजन्मा, निवे दून[5]. ३८
त्या राज्य तत्काळ दे राक्षसांचें, न अल्पीं म्हणे श्रीनदी तेंवि सांचेन[6];
सेना समुद्रीं तराया करी सेतु, पापार्णवीं ही प्रजाशुद्धिचा हेतु[7]. ३९
त्यातें दशास्यानुजन्मा धरी, पार जावूनि सोडी चरांतें दयाधार.
ते वर्णिती सैन्यसंख्या महायोधनामादि; दिक्कंठ ऐके, करी क्रोध. ४०
सीतेसि दिक्कंठ दावी शिरश्चाप, माया न जाणोनि पावे सती ताप.
होता जऱ्ही गोपुराग्रीं कुधी दूर, सोडी सुवेळाग्र[8], कोपें उडे शूर. ४१
ताडी तया सौरि[9] कालाहिला वीन, तैसा, म्हणे, 'धाक कालां हि लावीन.'
सामार्थ राजा करी अंगदा दूत, तो त्या म्हणे, 'रे! मदानें न तूं ऊत. ४२

१. मोर २. मोठा विनोदी. ३. पंगूहून हि पांगळें. ४. उत्तम उपकार करणाऱ्यास. ५. त्रस्त. ६. अर्थ बरोबर लागत नाहीं. ७. [असा राम]. ८. सुवेळशिखर. (येथें रामसेना राहिली होती). ९. सुग्रीव.

दे जानकी, सर्व जातें मुधा[1], राहु, रे! दुदर्शापात्र पीतां सुधा राहु.'
इत्यादि ऐकोनि 'मारा' म्हणे पुंड, कीळा[2] वमे तुंड त्याचें जसें कुंड. ४३
जे झोंबले मूढ ते अंगदाना[3] च मेले, 'जयें' बोलिले 'अंगदा! नाच.'
युद्धीं प्रहस्तादि गेले लया योध, मत्तागजांहीं हरीचा नव्हे रोध. ४४
धांवे करी जो लवें नागपा[4] शांत, भारी तया काय हो! नागपाशांत?
कुंभश्रवा[5] ही मधुघ्नापुढें काय? ज्याचा म्हणे पर्वतातें 'कुढें[6]' काय. ४५
दुर्वासनाशल्य ज्याचें हरी नाम, तो प्राकृतें काय शल्यें श्रमी राम?
या मेघनादास ही दे प्रभु ख्याति, याच्या प्रसादें चि वातात्मजा गाति. ४६
ओषध्यगाचें महाशृंग खाणून, तत्काळ अत्यंत दूरूनि आणून
केले विशल्य प्रभू ते चमूयुक्त, वातात्मजाच्या यशा वर्णिती मुक्त. ४७
होतां हि बंधुप्रधानात्मज प्रेत, सामाकडे तो न दिकंठ दे चेत;
घाली सतीकंठनाळीं रणीं घाय, दे शक्रजित् सर्वसेनामुखीं 'हाय!' ४८
माया असें जाणवी, हर्ष न स्तोक[7] दे कुंभकर्णानुजन्मा, हरी शोक;
श्रीलक्ष्मणें मारिला तो महामाय, आनंद लोकत्रयीं ही न हा माय. ४९
ज्येष्ठात्मजाच्या विनाशें म्हणे, 'हाय!' दिकंठ सतीसि मारावया जाय.
त्या शापिती आठ वीरा मरायास लोकेश; ती आठवी रामरायास. ५०
केला सुपार्श्वे प्रधानें बरा बोध; तो वारिला. पुत्रशोकार्त, सक्रोध,
धाडी पुन्हा मूढ रामक्षया सैन्य, तें ही मरे; सर्व पावे पुरी दैन्य. ५१
वे सर्व सेना, स्वयें होउनि क्रुद्ध, दिक्कंधर क्रूरकर्मा करी युद्ध;
पाडी रणीं लक्ष्मणा, शक्तिनें वक्ष वेगें विदारूनि तो कांपवी लक्ष[8]. ५२
अंगी खळा, शक्ति काढी, म्हणे 'हंत!' राम प्रभूत्तंस, गाती असें संत.
त्या काळिजीं होय काळाहिचा दंत, वाटे महाप्रेमळा[9] होतसे अंत. ५३
तें ओषधिक्ष्माधराचें पुन्हा शृंग आणी, जसा सारसाच्या रसा भृंग.
देतां चि दिव्यौषधीच्या रसें नस्य[10], तेणें उठे क्षिप्र, वर्षे जसें सस्य[11]. ५४

---

१. फुकट. २ ज्वाला. ३. शरीरार्पणार्थ. ४. गजेंद्राला. ५. कुंभकर्ण. ६. खंत करीत रहा. ७. अल्प. ८. लक्षावधि लोक. ९. रामाला. १०. नाकांत ओढण्याचें औषध. ११. धान्य.

श्रीरामदिकंठ यांसीं महायुद्ध [1]वातार्कभा होय बाणव्रजें रुद्ध.
ते व्याघ्रहस्तीहरीश्येनसे क्रुद्ध, यांचें यश क्षीरराशींदुसें शुद्ध. ५५
वृत्रारिच्या स्यंदनीं बैसला राम संपूर्ण त्याचा कराया रणीं काम;
तो यापुढें, कुंभ पक्कापुढें आम, तैसा गमे, वर्णवेना चि तें धाम. ५६
दोघांस ही जाहलें शोणितस्नान, झालें भयें निर्जरांचें मुख म्लान.
देखावया शंभु ये सोडुनि ध्यान, सज्ञान ही तज्जया निश्चयस्थान. ५७
लोटे अहोरात्र तत्सप्तक स्पष्ट, दोघे हि युद्धीं न ते पावले कष्ट.
सामर्थ्य झालें शरांचें गमे नष्ट रामास. लोकेश ही धाकले अष्ट. ५८
एकैक मूर्धा दहादां असे राम तोडी शत [2]क्षिप्रकारी घनश्याम;
झाले यथापूर्व तेव्हां करी राग; खंडूनि [3]हृत्पद्म पाडी [4]शरीराग. ५९
तें दे यश [5]स्वर्द्विषद्भेककालाहि, राम द्विजेंद्रा, दिवानायकाला हि;
जो जिष्णुचा सूत या मातलीला हि, काळाननीं द्विट्चमू घातली लाहि. ६०
जें पीडितें [6]यक्षनाथादिसल्लक्ष, तें मारितां वक्ष भेदूनियां [7]रक्ष.
जो [8]आत्मभूकक्षदावाग्निदृग्दक्षशास्ता, [9]स्वसत्पक्ष तो हर्षला त्र्यक्ष. ६१
नानाविधोच्चस्वनें हर्ष दे वाद्य, रामीं करी पुष्पसद्वर्ष देवाद्य.
गंधर्वराजें हि तें गाइलें कृत्य, देवांगनांनीं हि केलें सुखें नृत्य. ६२
होतां द्विषद्वात कोंदे जगीं शात, वाहे गुणी वात; धाके खळव्रात;
झाले महोदाररामस्तव स्फार; वृत्रारिचे [10]दार या सजयें गार. ६३
त्या कुंभकर्णानुजातें म्हणे राम, 'मंदोदरीतें मिळो त्वन्मुखें [11]साम.
जैसा तुझा तेंवि माझा हि हा होय, या, सेवटींचें करी कृत्य, दे तोय. ६४
संस्कारिला ज्येष्ठ त्या साधुनें नीट, चित्तीं न राहूं दिला लेश ही वीट.
लंकापदीं स्थापवी राम सभ्यास, धर्मीं, नयीं, सद्गुणीं, ज्यास अभ्यास. ६५
[12]होऊं नये स्थान लोकापवादास, नाणूत नेत्रांत शोकाप वा दास;

---

१. वायु आणि सूर्यप्रभा. २. शीघ्रसंधानी. ३. वक्षःस्थळ. ४. शरीररूपी वृक्ष.
५. देवशत्रुरूपी बेडकाला काळसर्प. ६. कुबेरे वगैरे लक्षावधि सज्जन. ७. राक्षस.
८. मदनतृणाचा दृग्रूपी दावाग्नि. ९. रामपक्षपाती. १०. इंद्राणी. ११. सांत्वन.
१२. येथें 'होउ' असा हस्तदोष झाला आहे.

या कारणें दिव्य देवी, जसी काय हैमी[1], जिचा दीप्ति दे वीजसी काय. ६६
अर्ब्धींत सोडी; गमे माणिका भा[2] नें, देवा त्यजी तें न कां आणिका भान ?
डोहीं करी काय धन्या सती रास, नेती भवाब्धींत अन्यास तीरास. ६७
स्वीकारिली श्रीहुताशेश्वराद्युक्ति मानूनि रामें, जशी तज्जनें मुक्ति;
ते ऊठवी स्वामिच्या सेवना कीश पीयूष वर्षोनि तो देव नाकीश. ६८
दूरूनि पाहों शके ज्या न कीनाश[3], पाहे तया शत्रुचा जानकी नाश.
बैसोनियां पुष्पकीं सेतु पाहून, वर्णी प्रतापासि रोमांच वाहून. ६९
भेटे दशास्यानुजन्मा सखा वीर जेथें स्वयें राम तें दाखवी तीर.
दावी सुकंठाचिया भेटिचा गोत्र वाळीक्षयस्थान तो सत्कृतस्तोत्र. ७०
वातात्मजप्राप्तिचें ही तदा स्थान दावी स्वकांतेसि; मोडी तदास्था न.
पंपा, शबर्याश्रम, श्रीस दाऊन पीयूष पाडी सुवृत्तें सदा ऊनें[4]. ७१
नामें चि जो वारितो शोकबंधास, सांगे स्वयें तारिल्या तो कबंधास.
गोदावरीपंचवट्याश्रमस्थान दावी, कथी गृध्रपा जें दिलें दान. ७२
जीं कुंभजादिस्थळें दाखवी; तीस आश्चर्य[5] दे कौतुकें लाख वीतींसे.
तें अत्रिचें स्थान पाहे; रसें[6] माय मानूनि लोकीं न माहेरसें माय[7]. ७३
तो चित्रकूटाद्रितें दाखवि श्रीस, सद्दृष्टि ज्या, मक्षिका जेंवि मिश्रीस.
अत्युत्सवें त्या न दावि प्रयागा न, ते ऐकवीती तदा विप्र या गान. ७४
धाडूनियां दूत तोयस्वभावास[8], जीवप्रद श्रीश होय स्वभावास.
संदेश हा त्या क्षुधार्तास सुग्रास, कीं त्या मिळे चातका वारिमुग्रास[9]. ७५
वंदी भरद्वाजपादांस, 'मीं राम;' ऐसें कथी स्वाननें आपलें नाम.
ठेवी स्वयें, ठेववी देवरा, शीर्से[10] पायीं रमा; त्यांसि तो दे वराशीस. ७६
त्या ऐकवी भव्यभा साधुवादास, तेजें म्हणे 'नव्य भासा, धुंवा[11] दास.'
लंकेश, कीशेंद्र झाला भला गार, सोडूं नये त्यास वाटे देळागार[12]. ७७

---

१. सोन्याची पुतळी, पार्वती. २. तसें तेज नाहीं. ३. यम. ४. उणें. ५. लाखों चमत्कार करणाऱ्या (आदिमाया) सीतेस. ६. प्रेमानें. ७. सामाव. ८. पाण्याप्रमाणें निर्मळ स्वभावाच्या भरतास. ९. वारिमुक्+रास=मेघसमूह. १०. शीर्ष, मस्तक. ११. पवित्र करा. १२. अयोध्या.

घेवूनि आज्ञा, वर, श्रीश हर्षोन, वेगें निघे प्रेमपीयूष वर्षोन.
भक्तीं गुहीं भेट, शुद्धस्वभावास दे होउनि स्नेहरुद्ध[1] स्वभावास. ७८
आयुष्य वाटे वियोगीं सरो ज्यांस, भेटे तयां भानु जैसा सरोजांस.
कीं मेघ तो त्या मयूरांस, कीं सोम तो त्या चकोरांसि, दीनांस कीं सोम[2]. ७९
श्रीरामराज्याभिषेकोत्सवीं लोक झाले सुखी; सर्व गेला लया शोक.
अर्कोदय स्पष्ट तो देव, ते कोक, कीं राम तात स्वयें, विश्व तें तोक. ८०

इति श्रीरामनंदनमयूरविरचितं श्रीरमणीयरामायणं समाप्तं ।

---

# हररमणीयरामायण

(तोटक)

'दशपूर्वरथ क्षितिपाळ भला;' जगदीश म्हणे, 'मत तात, मला.'
मग होय तदीयकुमारमणी, स्तवि सद्गुरुची हि उमा रमणी. १
निजमूर्तिचतुष्टय रम्य करी, प्रभु 'राम' असें शुभ नाम धरी;
मधुचा भरताभिध होय अरी, मग लक्ष्मण आणि अरिघ्न हरी. २
गुरुवर्य वसिष्ठमुनीस करी; प्रभु गाधिसुताध्वरविघ्न हरी.
मुनिची दयिता उपळत्व[3] वरी, विभुपादरजें परि होय बरी. ३
प्रबळा तिळ जें न चळे अजि! तें, प्रभुचें धनु मोडियलें अजितें.
जनकक्षितिपाळसुता वरिली, शरदिंदुरुचि[4] स्वयशें हरिली. ४
प्रभुच्या अनुजांसि सुता जनकें दिधल्या, बहु शोभविल्या कनकें;
जन केंवि न धन्य म्हणे? सनकें[5] स्तविलें असकृद्यश, तज्जनकें. ५
धरवी प्रभु मार्गवरा, महित[6] व्रत दे, करि भार्गवरामहित;
परमाभ्युदयें सुखवी पुर; तें 'निजभाग्य' म्हणे 'त्रिजगीं पुरतें.' ६

---

१. प्रेमानें कंठ दाटून आला आहे अशा. २. शंकर. ३. पाषाणत्व. ४. शरत्कालच्या चंद्राची शोभा. ५. निवृत्तिमार्गस्थापक ब्रह्मदेवमानसपुत्रविशेष. ६. पूज्य (ब्राह्मकर्म करण्याचें).

नृप 'कोसलराजसुतातनया युवराज करीन' म्हणे 'सनया'.
परि केकयजा अडवी रमणी; बहु होय तदा जड[1] वीरमणी. ७
वदली, "दिधले वर हे च वदा 'वन आदरुं राम समा चवदा;'
'युवराज करा द्रुत मत्तनया,' वचना बुध रक्षिति, मत्त न या." ८
मृतिसी स्ववियोगकथा पितया, मळ लागु न दे चि तथापि तया.
प्रभु होय पदस्थितिस[2] त्यजिता, द्रुत कीं गति[3] कीर्ति हि, सत्यजिता[4]. ९
धरि वल्क, सबंधु सदार मुनिव्रत होय, पुरीं हि सदा रमुनि;
वनवास सुखें चि रमाधव घे; परि लोक पुरीं रडले अवघे. १०
अजिना वरि टाकुनि राजपटा, रचि राम वटागपयें सुजटा.
सुसखा गुह सांत्वुनि, तातसखा[5] नमि, दे बळ तापसवृंदमखा. ११
प्रभु 'चित्र'पदोत्तर'कूट'नगा करि आश्रय, आश्रय जो त्रिजगा.
व्यसु होय नृपाळ सुत स्मरता, गुरु आणवि मातुळगा[6] भरता. १२
जननीप्रति निंदुनि तातहिता[7] करि; सोडुनि राज्यपदा महिता,
नमि अग्रभवा महिजासहिता; कळवि क्षिति[8] त्या क्षितिभृद्रहिता. १३
पितृकार्य करी प्रभु, त्या 'परता प्रभुजी!' म्हणतां रडतां भरता
समजावुनि राम तया फिरवी, मिरवी यश ज्याप्रति सेवि रवी. १४
वरि अत्रिमुनीश्वरपर्णकुटी, अहिताहि[9] यदस्त्रसुपर्ण[10] कुटी.
क्षितिजेसि सती असि लावि उटी[11], सुगुणासि[11] जिच्या न कदापि तुटी. १५
करि शापविमुक्त विराध वनीं; शरभंग महामुनि हृष्ट मनीं.
प्रभु दंडक कानन तें निववी; रजनीचरकोटि यशें भिववी. १६
कलशोद्भव दे धनु, बाण, असी, करि सत्कृति शत्रुवधार्थ असी;
पितृमित्रजटायुस तो सुखवी, प्रभु दंडुनि शूर्पणखा दुखवी[12]. १७
दिधली खर मारुनि सैन्यसह प्रभुनें क्षितिदेवशतांसि मह.

---

१. कुंठितमति. २. यौवराज्यपदास. ३. सद्गति. ४. सत्यपालकास. ५. जटायु किंवा भरद्वाज. ६. मामाकडे गेलेल्या. ७. पितृक्रिया. ८. अराजक राज्य. ९. शत्रुसर्प. १०. गरुड. ११. उटीचा सुगुण म्हणजे सुगंध. १२. नाक कान कापून जखमी करी.

मृग पाठवि रावण हेममय, क्षितिजामन तो हरि हातनय.[१] १८
महिजा वदली, 'रघुवंशवरा! कुतुकार्थ सुरंग कुरंग धरा.'
दयिताप्रिय लक्षुनि शस्त्रधर प्रभु होय वनीं हरिणानुचर. १९
पळतां तदुरीं शर शीघ्र भरी, खळ आर्तरव प्रभुतेंवि करी.
व्यसनाकुळ राम असें गमवी; क्षितिजाहृदयासि पर[२] भ्रमवी. २०
तिस तो अनुकूल न दीर वदे, भय त्या द्रुंसि[३] जेंवि नदीरव[४] दे.
कटु बोलुनि ती सुगुणा दवडी, त्यजि मौक्तिक मानुनियां कवडी. २१
दशकंधर तों चि सतीस हरी; क्षण भग्न जटायु तयासि करी.
अरि पक्षति तोडुनि गृध्रवरा, करि मूर्छित; कंपित होय धरा.[५] २२
स्वपुरीं तिस ठेवि अशोकवनीं, प्रभु दुःशकुनें धरि आधि मनीं.
तंव लक्ष्मण भेटुनि वृत्त कथी, करि ताप सखा[६] निज[६] दाशरथी. २३
द्रुत धांवुनि ये, असुखा वसती करि धी, उटजीं दिसतां न सती;
प्रभु शोधि, करीत विलाप, वनें; बहु ताप हिमें हि दिला पवनें. २४
क्षतमूर्छित पाहुनि तातसखा, प्रभु 'हाय!' म्हणे, करि अंत्यमखा.
धरि योजनबाहु कबंध; तया गति दे रघुवीर करूनि दया. २५
फळ, पुष्प, पदावर दे शबरी; करि कीर्ति तिची वरदेश बरी.
पद दे, अरि मारुनियां, सुगळा; यश हें म्हणतें 'अमृता उँगळा.'[७] २६
करि सिंधुसि गोष्पद वातजनी, खुण दे, निववी क्षितिजेसि मनीं.
तरु, राक्षस, भंगुनि सर्व सुरी[८] सुखवी कपि जाळुनि शत्रुपुरी. २७
म्हणतात जया शिव, विप्र, 'भुला,' पवनांश तया निववि प्रभुला!
कपिदत्त शिरोमणि राम तिचा करि आश्रय भव्य[९] बरा मतिचा. २८
सबळ प्रभु जाय समुद्रतटा, करि रंगनटी[१०] च सुरपिंजटा;
कथि जो बुधसंमत साम हित, त्याजिला कुजनें गुरुसा महित. २९
अभयार्थ बिभीषण पाय धरी, प्रभु राक्षसराज तयासि करी!

---

१. त्यक्तनीति (मारीच). २. शत्रु. ३. वृक्षास. ४. गर्जना. ५. कन्या-व्यसनामुळें पृथ्वी भयभीत झाली. ६. निजसखा. ७. थुंकून टाका. ८. देवस्त्रिया ९. कल्याणप्रद. १०. रंगभूमीवरील नर्तकी.

उद्धींत हि वाट तदा बरवी नळकीशकरें भगवान् करवी. ३०
कपिसैन्य अनंत, सुखें उतरे, अहितासि म्हणे, 'न मदें उत रे!'
दिसतां खळ कीशवरें कुटिला, वदले सुर पाहुनि 'हा! कुटिला!' ३१
प्रभुनें हृदयीं नय आठविला, परभंगद अंगद पाठविला.
कटु ही हित हें न तया समजे, अहिता धरिती हि तयासम जे. ३२
पर मर्दि सुखें चि, न मूठ्[1] वळी, कथि 'योग्य तयाप्रति मूठवळी[2].
वरि साम न, दंड करा महित[3];' स्तवि तो खळदंडक राम हित. ३३
कमळें तसिं शत्रुशिरें खुडवी; दशकंठबळें प्रभु तो बुडवी.
प्रभुमारुत शत्रुतृणें उडवी; खळसस्य चि रामकरी तुडवी. ३४
करवे वश न प्रभु तो कपटें, धरवे न नभोभवतोक[4] पटें.
अतियुद्ध न जाय चि तें कथिलें, प्रभु वाहि, दशास्यबळें कथिलें. ३५
घटकर्ण महाबळ लोळविला. प्रभुनें घननाद हि बोळविला.
दशकंठ मनीं बहु पोळविला, हरिच्या हृदयीं जय घोळविला. ३६
दिधलें यश वातसुता कपिला, हरिची बहु लाजविली कपिला:
'वर देउनियां पर माराविला,' असि कीर्ति हि दे परमा रविला. ३७
खळशक्ति शमे बहु मातलि, तें, यश दे हरिसारथिमातलितें,
कथि[5] कीं न कुधी असु खाउ तटा, मज गा न पितां असुखा उतटा. ३८
न सुवाद्य, सुगीत, सुनृत्य, शमे[6]. प्रभुच्या विजयीं शिवचित्त रमे.
सकळा हि जगा सुख फार गमे, सहजारि[7]समूह कुशीळ वमे[7]. ३९
प्रभुचा अरि ही वरि कीर्तिगती, चिर होय बिभीषण यातुपती.
करि दिव्य सती, तिस देव 'रहा पहिली तसि' यापरि दे वर हा. ४०
करि भेटुनि तात[8] सुखी तनया, 'वन[9] याद[10]' म्हणे मिळण्या जन या.

---

१. मूठ उगारण्याचें हि कारण पडलें नाहीं. २. बैलाच्या खोगीरास मूठ व दोन वळकट्या असतात, त्यांस वळी म्हणतात. ३. मोठा. ४. अग्नि-पंत. वायुजन्य अग्नि. ५. अन्वयार्थ लागत नाहीं. ६. थांबे. ७. उपजतवैरी जे राक्षस त्यांच्याकडून रामानें दुःस्वभाव ओकविला. ८. दशरथ. ९. पाणी. १०. जन या मिळण्या (भेटीला) वन [आणि] याद [यांची भेट] म्हणे.

उठवी समरव्यसु सैन्य हरी; हरिला यश देउनि दैन्य हरी. ४१
करि पुष्पकयानवरीं बैसका[1], व्यवहार सतीस कथी असैका[2].
अवलोकुनि सेतु करी नमनें, स्तवि ती बहु, जेंवि कैरीन[3], मनें. ४२
अनुभूत सुखासुख आयकवी, स्थळ दाखवि तें रघुराय कवी,
भरता प्रभु भेटि, मनों[4], समया न विलंघुनि ओपि, घनासम या. ४३
अभिषेकमहोत्सव होय दयानिधिचा, म्हणती कवि, 'तोयद' या;
'अमरादिकजीव मयूर; मही सैरसी[5]; सुख तें जळ, ताप अही.' ४४
परेवाद[6] नसे, वैसुची[7] परवा; नर वा सुर वे विरसा नै[8] र्रवा.
बरवा प्रभु तो स्वगुणा वरवा, 'भैर[9] वारुनि, शर्म' म्हणे 'भरवा.' ४५
शिशुच्या न रुचे शंमनाश[10] मना; जन शिक्षि,[11] 'न तूं वदना! वद 'ना'.'
वचके न निरोशमना[12] शमना, वेनवृत्ति[13] भजे भवनोभ[13] वना. ४६
प्रभुचें यश सेव्य सुंधासरसें[14] भुलवी अबुधास, बुधास, रसें.
पशु पी रघुपाळकथा नरसा; वरि सोडुनि बाळक थान रसा. ४७
अरि हा हरि हृद्गत जो सुर[15] सा; हरि सेववि आत्मरसा सुरसा.
करि विश्वहितास्तव सासु[16] रसा; वरि अर्पिलि त्या कृति हे सुरसा. ४८

इति श्रीरामनंदनमयूरविरचितं श्रीहररमणीयरामायणं संपूर्ण ।

---

१. बैठक. २. सर्व. ३. गजेंद्र. ४. माना. ५. सरोवर. ६. परनिंदा. ७. द्रव्याची. ८. [अशी] वदंता नव्हती. ९. भूभार. १०. शांततेचा भंग. ११. शिकवी. १२. जीविताविषयीं निराश मन ज्याचें तो. १३. समाधानकारक अर्थ लागत नाहीं. १४. अमृतापेक्षां श्रेष्ठ. १५. देव (राम). १६. सासुबाई.

# सुरामायण

(भुजंगप्रयात)

रमाकांत घे ब्रह्मवाक्यें रवीच्या कुळीं जन्म, काव्यार्थ आद्या कवीच्या;
करी दिग्रथाच्या तिघी धन्य भार्या, सुरेंद्रादिकार्यां करायासि आर्या. १
सुत ज्येष्ठ जो तो घनश्याम राम; द्वितीया 'भरा' न्तीं 'त' हें रम्य नाम;
तिजा लक्ष्मण ख्यात; शत्रुघ्ननामा चतुर्थ; प्रभा देति हे तातधामा. २
गुरु श्रीवसिष्ठ स्वयें वेद दे हा, न होतां मना आनना खेद देहा;
पिता योग्य जाणूनि तोकां विवाहा, न चिंतील चित्तांत तो कां वि[1]वाहा? ३
मखाच्या मनीं सिद्धिचा आधि ज्याला, पिता दोन दे पुत्र त्या गाधिजाला;
शत स्वानुगा रामभद्रास अस्त्रें मुनी दे जसीं शर्मशोभार्थ वस्त्रें. ४
पथीं ताटकाख्य द्विजत्रास वारी; वधी सर्व सिद्धाश्रमीं वासवारी.
करी सिद्ध हर्षें मुनीश क्रतूतें, वदे, 'राघवा! आर्जवू शक्र तूतें.' ५
न मोहांत दुःखें [2]कण्हेना शिला जी, तिचा [3]तो कृपेच्या कणें नाशिला जी!
हरी जो रजाच्या हि उग्राघ वातें, स्तवी त्या दयातो[4]यमुग्राघवातें. ६
चुरी पार्वतीजानिच्या कार्मुकातें; वरी जानकी श्रीदयावार्मुकातें.
तिघींनीं तिघांला हि दे [5]तो महातें; करी जो स्वरूपीं भि[6]दाहोम हातें. ७
दिसेना जयाच्या [7]परा मार्ग [8]वातें, रघूत्तंस भंगी तया भार्गवातें.
यशें या करी दीन तो कापुराला, सुखें दे, जसा तात तोका, पुराला. ८
[9]युधाजित् स्वगेहासि ने, भानु ज्याला स्तवी, त्या स्वसेच्या सुता [10]सानुज्याला.
'[11]क्ष्मानंदना आपला भाव देतों,' असें वृद्ध राजा मुखें 'हा!' [12]वदे तों. ९
हसे मध्यमा स्त्री, करी आग्रहातें, स्वसौभाग्य नाशावया साग्र हातें;

---

१. गरुडवाहन विष्णूला. २. कण्हेना. ३. मोह, शाप. ४. दयामेघ. ५. जनक. ६. द्वैताचा होम. ७. ज्याच्या पलीकडे. ८. या वेळीं भयंकर वारा सुटल्याचें वर्णन आहे. ९. कैकेयीचा भाऊ. १०. शत्रुघ्नासह. ११. पृथ्वीस आनंददायक (रामाला). १२. कर्ता 'कैकेयी'.

पतीच्या हि ती तापवी विग्र[1]हातें, न घे निग्र[2]हातें, करी विग्र[3]हातें. १०
म्हणे, 'जाणसी धर्म तूं, देव! दोन[4] स्वयें जे दिले ते न जो दे वदोन,
तया दंड, हें जाणिजे पामरानीं, वसावा चि चौदा समा राम रानीं. ११
भजो यौवराज्या पदा वत्स माझ्या, द्वितीयें वरें; मान्य हो सत्समाज्या;
न निष्ठा बरी सत्यधर्मीं नरा ज्या, ईहामु[5]त्र त्या भाग शर्मीं न राज्या!' १२
जरी प्रार्थिली बायको [6]कामदानें, न ती आयके सर्वथा सामदानें.
नसाया चिर क्ष्मापती सासु, 'नेस' स्वयें 'वल्कलातें' म्हणे सासु 'नेस.' १३
भिडेनें उरासीं च ने सून ती तें; वसिष्ठें दिलें वल्क नेसूं न तीतें.
नमी राम वक्रांत 'हा!' स्थापित्यातें, धरूनि स्वधर्मीं च आस्था, पित्यातें.
निघे राम तो लक्ष्मणस्त्रीसहाय, म्हणायास लावी पुरश्रीस 'हाय!'
पथीं पत्ति पाहोनियां नंदनातें बसायास धाडी नृप स्यंदनातें. १५
रडे, राममातेचिया जाय गेहा, म्हणे, 'घातकर्ता नव्हे काय गे! हा?
वृथा सेविलें त्वां कृतघ्ना अशाला, न[7] शाला हिता जी प्रिये! ती अशाला.' १६
निजेल्या स्थळीं पौर जोडूनि पाणी त्यजी, जाय मीनांस सोडूनि पाणी!
सखा राम भेटे गुहाख्या निषादा, तयाच्या निवारी विचारें विषादा. १७
रचीती वटाच्या पयें ते जटा कीं; म्हणे वेष त्यांच्या परा 'तेज टाकीं.'
तरे स्वर्धुनीतें, वरी देव नौका, वनीं वाट याला बरी दे [8]वनौका. १८
भरद्वाज जो त्या करी राम हर्षीं, स्मरेना चि तेव्हां शरीरा महर्षी.
तदुक्तें पथें चित्रकूटासि गेला, खळांचें असत्कर्म आलें सिगे[9]ला. १९
पुरीं तोंड झांकूनि ये, हात जोडी, कथी सूत वृत्त; प्रभु स्नेह[10] तोडी;
वदे शाप देवीस, नामीं च गोडी धरी, चिंतितां राम तो प्राण सोडी. २०
वसिष्ठें सुत क्षिप्र तो आणवीला; तिणें घात ही अ[11]र्थेसा जाणवीला.
म्हणे साधु तो 'धिक्' तितें, आपणातें. तिच्या सुज्ञ चालों न दे हा पणातें.
स्वनिर्लोभता ज्येष्ठराजप्रियेतें कथी तो, करी सांग तातक्रियेतें.

---

१. शरीरातें. २. आत्मसंयमनाला. ३. वैरातें. ४. दोन वर. ५. येथें व स्वर्गलोकीं. ६. इच्छापूरक दशरथानें. ७. जें हितकर नाहीं तें घर च नव्हे. ८. गुह —पंत. वन हें च ओक (घर) ज्याचें. ९. पूर्णतेला. १०. माया. ११. लाभाप्रमाणें.

‘ वरीं राज्य हें ’ [1]आर्य तोखें वदे त्या, शिवों दे तयातें न, तो खेंव[2] देत्या. २२
न झाली च मान्या तदाज्ञा तया, तें तदौद्धत्य दे श्री तदा ज्ञातयातें;
निघे पौर घेवूनि आंगें अरण्या, अयोध्येसि आणावया त्या शरण्या. २३
कळे स्पष्ट तद्भक्ति सत्या गुहातें, म्हणे, ‘ जें सुजीवित्व न त्यागु हा तें.’
तया वाट गंगेंत दे तो ससेना, सुभक्ता जगीं विघ्नकर्ता असेना. २४
भरद्वाज जाणे न हा मत्त, ‘ पाहो ’ म्हणे ‘ सिद्धि, सार्थक्य या मत्तपा हो.’
नमस्कारि तो धीर सिंहासनातें[3], पित्याचें चि दे[4] वीरसिंहास नातें. २५
धरी, जेंवि भेटों नदा याद[5] वाटे, भला लक्ष्मणा तो न दायाद वाटे.
तया तापल्या, ‘ स्वस्थ हो ’ राम हातें म्हणे, ‘ पातला भव्य होरा महातें.’
तनुत्राण देहें, करें चाप, दास त्यजी; तो धरी अग्रज्याच्या पदास.
पित्याच्या कथी साश्रु हा वर्तमाना; क्षण भ्रांतिदा त्यास[6] आवर्त माना. २७
जयाच्या नसे स्थान तापा दुकानीं, करी तो सुखी त्या नता पादुकानीं.
करी जो यशें धन्य विश्वा सदा, त्या निघे भक्त वंदूनि विश्वासदात्या. २८
न राहे पुरीं त्या; न तोखे दुँसोडी; न घे वल्कधारी, न तो खेद सोडी.
विकारा भुजंगा दिसे वीन[8] भा जी, न ती जाय; कंदादि सेवी, न भाजी.
निवाया जसा मानसा हंसपत्री, तसा जाय त्या आश्रमा ज्यांत अत्री.
शिवे कामकोपाग्निची ज्या न कीला[9] समर्ची तयाची सती जानकीला. ३०
वधी दंडकारण्यविघ्ना विराधा, म्हणे तो ऋषींतें ‘ न धाकें विरा, धा.’
तया ईश्वरा पूजिती विप्र भावें, न ज्याचीं कधीं ही यशें विप्र[10]भावें. ३१
अगस्त्यर्षि तो राघवें वंदिला हो, म्हणे, ‘नम्र’ जो जिष्णुच्या मंदिला[11] ‘हो’
सुराधीश्वरस्थापितें विष्णुशस्त्रें दिलीं, कुंभजें जेंवि पूजार्थ वस्त्रें. ३२

---

१. गुरु—**पंत.** २. आलिंगन द्यावयास आलेल्या=पुढें चालून आलेल्या. ३. सिंहासारखी बैठक घालून बसलेल्या रामाला. ४. भरद्वाज—**पंत.** ५. वाटें धरी. ६. वर्तमानास—**पंत.** ७. कांवळ्याची एक दशा; काडीभर हि, असा भाव. ८. भुजंगा जी भा ती विकाराविना ( विषावांचून ) न दिसे, जाय; म्हणजे सर्पांची शोभा विषावांचून खुलत नाहीं—नष्ट च होते. (भरत रामाविणें अगदीं निस्तेज झाला, हा भाव ). ९. ज्वाला. १०. मंदतेज. ११. शिरस्त्राणविशेषाला.

प्रभु प्रार्थिला कीं, 'सदा मत्तपानें न जे भस्म केले कुधी मत्त पानें[1]
वधावे चि लीला करावि; प्रभो! 'गा' म्हणावें कवींतें; हरा विप्रभोगा[2].' ३३
पित्याचा सखा तो जटायु, प्रभूतें वनीं जाहला वंद्य भाग्यें प्रभूतें;
म्हणे त्या, 'तुझी सून सीता वनांत स्वयें रक्ष; वा! कीर्ति भीतावनांत[3]. ३४
करी आश्रय ब्रह्म गोदावरीतें, स्वयें सच्चिदानंद मोदा वरी तें.
शुभ स्थान जें पंचवट्याख्य, शाला रची त्यांत सौमित्रि रम्या विशाला. ३५
स्वसा रावणाची सजी आंगलीला, मनुष्यां[4] म्हणे, 'घे मला चांगलीला;'
प्रिया जी सुजीवातुसी[5] ताप तीतें कुधी दे, करि क्रुद्ध सीतापतीतें. ३६
जयाच्या करीती सदा वर्णना सा[6], तया लंघितां हारवी कर्णनासा.
तिचें ये वधा सैन्य कैवारि तें हो! म्हणे त्या प्रभु, 'क्षीणदैवा! रितें हो.' ३७
कथी रावणा ती, 'तुला जी वश स्त्री करायासि गेल्यें, तिचा जीवें[7] शस्त्री
करी हे दशा, प्राण तावी[8], रमाया हरीं रत्न, तूं जाणता वीर माया.' ३८
कुधी पाठवी हेमवर्णा कुरंगा[9]; म्हणे श्री, 'धरा, शीघ्र नेवूं सुरंगा.'
निघे शूर, ने दूर मारीच राया, शरें शत्रुच्या राम मारी चरा[10] या. ३९
प्रभूसा चि मारी कुधी हाक, दापी विवेका, न लोपे जऱ्ही हीं[11] कदापी,
क्षण क्षिप्र लोपोनि दे कांप तीतें, न मानील अत्यार्त ती कां पतीतें? ४०
म्हणे लक्ष्मणा, 'रक्ष, वा! देवरा! जा, उपेक्षूं नये संकटीं देव राजा;'
वदे तो सुधी, "देवि! हे होय माया, कथी तेजें[12] कीं 'नम्र तूं हो' यमा या."
महीजा म्हणे, 'रामभद्रें मरावें हरावें मला, आत्मपत्नी करावें;
असें त्वां कसें पाप चित्तीं धरावें? सरावें[13] न हें, न प्रजेशें तरावें.' ४२
असी सज्जना जाचिती होय, 'शाला, न सेवीं,' म्हणे 'जा चि' ती हो! यशाला[14].

---

१. मद्यपानानें. २. ब्राह्मणांच्या त्रासाला. ३. भ्यालेल्याचे रक्षणांत. ४. शूर्पणखा राक्षसी हें ध्वनित करण्याकरितां रामाला हें पद लाविलें आहे. ५. उत्तम जीवनौषधाप्रमाणें. ६. षट्शास्त्रें. ७. प्राणपति. ८. तापवी. ९. चांगल्या रंगाच्या. १०. दूता. ११. सीतेचा विवेक. १२. रामाचें तेज. १३. या पापाचा कधीं हि क्षय होणार नाहीं. १४. मूर्तिमान् यश च अशा लक्ष्मणाला.

न बाळासि दे वीज, सीता[1] पहाया, महाशोक देवी जसी ताप हा या. ४३
उडे धैर्य त्याचें, जसें पर्ण वातें, भजों जाय तो मीन त्या अर्णवातें,
जया सर्परूपापुढें भेकलीला [2]पेरा ये, हरी उग्र तो एकलीला. ४४
[3]स्वहंसांस मारूनि हाका 'वळा हो!' म्हणे, 'शीघ्र या, भग्न हा कावळा हो.'
जटायु स्वयें सून कां सोडवीना? गमे फार तत्कर्म तें गोड वीना[4]. ४५
रथातें स्वचंचुप्रहारें चि चूर प्रतापें करी वृद्ध तो फार शूर.
[5]कृपाणें तया दुष्ट दिक्कंठ ताडी, अधर्में रणीं भग्न होवून पाडी. ४६
क्षतांहीं, भयें, [6]कश्मलें ही गळाला, तऱ्हीं श्रीस घेवूनि वेगें पळाला,
अळंकारवस्त्र प्लवंगांत सोडी, नभामाजि हाका स्वनाथासि फोडी. ४७
समुद्रासि लंघूनि लंकेंत देवी अशोकीं वनीं दुष्ट दिक्कंठ ठेवी.
कथी साश्रु सौमित्रि तें वृत्त, राम प्रभु क्षिप्र ये, शून्य पाहे स्वधाम. ४८
तसा हा हि बोले जसा 'हाय!' कामी, म्हणों प्रेमळां[7] काय तें आयका मीं?
वनीं जानकीतें म्हणे 'हाय!' शोधी, त्रिलोकी तशा गृध्रपा हा यशोधी. ४९
पुसे राम, पक्षी कथी खेद; '[8]शास्यें वधू नेलि, केली दशा हे दशास्यें!'
प्रभूच्या त्यजी देह तो गृध्र अंकीं, बुडों दे जडा नाम ज्याचें न पंकीं. ५०
पित्याची तसी तत्क्रिया सांग केली, लयातें कबंधार्ति तत्काळ नेली.
दिली सद्गति क्षिप्र भिल्लीस, कंपा जऱ्ही दे, तऱ्ही होय धन्या चि पंपा. ५१
जया जन्म देतां वरी अंजना भा, हनूमान् वनीं भेटला कंजनाभा.
सुकंठासि तो भेटवी जानकीशा, [9]अभी ऋश्यमूकाविना ज्या न कीशा. ५२
अळंकार दे प्रेमपात्रा सखा तो, म्हणे, 'बा! मला वाळिचा त्रास खातो.'
कथा या सख्या हा निवेदी नयज्ञा, पहातां समृद्धा निवे दीन यज्ञा. ५३
वधी वाळिला, भानुजा राज्य दे हा, तयाच्या वरी श्री सुख प्राज्य देहा;

---

१. जसी देवी सीता या (लक्ष्मणाला) हा ताप [आणि] महाशोक पहाया (अनुभवायाला) दे [तसी] वीज [हि] बाळासि न—असा अन्वयार्थ. २. नाश पावतात असा दांडगा रावण. ३. रामलक्ष्मणांस (?). ४. गरुडाला. ५. तरवारीनें. ६. मूर्च्छेनें. ७. मीं प्रेमळ रामाला कामी म्हटलें तें [वाचक हो! तुम्हीं] ऐकतां काय (?). ८. दंडाई (रावणानें). ९. अभय.

म्हणे, 'दुःख कांहीं वहावें न दीनें, श्रिता तृप्ति द्याया वहावें नदीनें.' ५४
दिशा तीन शोधूनि मासांत मार्गे कपि क्षिप्र आले असंस्पृष्टआगें[१];
न ते दक्षिणाशेसि जे पाठवीले, तिहीं स्वापराध स्वयें आठवीले. ५५
असें बोलिले, पावले कीश मोहा, 'स्वजीवाहिचा आधिकेकी[२] शमो हा.
जटायू वरी कीर्तिहारा मराया, जगीं जन्मलों व्यर्थ! हा रामराया!' ५६
महेंद्राचळीं गृध्र संपातिनामा पुसे, स्वानुजा तोय दे, गाय रामा;
कथी आब्धि ऐसी पुढें वीस गावें, दिसे स्पष्ट लंकेंत ती जीस गावें. ५७
कथी तो स्वपक्षांचिया अत्ययातें, तदुत्पत्तिनें दे तयां प्रत्ययातें,
स्तवें जांबवान् वाढवी मारुतीतें, म्हणे, 'रक्ष, न क्लेश बा! मारु तीतें.' ५८
उडे, त्यासि सिंधूंत उत्साह तारी, वरी वीश ही पक्षकुत्सा[३] हतारी[४].
म्हणे लंघितां 'धन्य!' मैनाक[५], रीतिस्तवातें सुरी जेंवि मैना करीती. ५९
करी तोंड जी योजनें पांच वीस, गमे जेविला हा तिच्या पांचवीस!
मुखीं नागमातेचिया हा रिघाला; लवें सूक्ष्म होवूनि वेगें निघाला! ६०
गिळी सिंहिका जी धरी सावलीला, जळीं त्या सुदुर्बुद्धिच्या मावलीला
वधी धीर तोडूनि तत्काळजाला; पुन्हां लंघिता[६] सिंधु तत्काळ जाला[६]. ६१
न लंका[७] वळे, तीस तो हात दावी; करी[८] तोंड हुंकार तें 'हा!' तदा वी[८].
पुरी रात्रि शोधी, विलोकी अशोकीं; म्हणे, 'सर्व नाशे अधर्मे पशो! कीं.'
विलोकी सतीधिकृता यातुपातें, म्हणे, 'राम व्हावा शिखी या तुपातें.'
दयेच्या स्तवी रामराया समुद्रा, कवी दे तिला ती निवायास मुद्रा. ६२
स्वचूडामणी श्री हि दे, तोख पावे, म्हणे, 'शत्रु माझ्या करें तो खपावे.'
चुरी वृक्ष, मर्दी बळें, युद्धदक्षा वधी रावणाच्या कुमारा हि अक्षा. ६३
रणीं इंद्रजित्संज्ञ जो, तो पळानें करी बद्ध जें ब्राह्म त्याच्या बळानें.

---

१. निरपराधी. २. आपल्या जीवरूप सर्पाचा नाशक जो चितारूपी मोर. ३. [आपल्या] पंखांविषयीं तिरस्कार. ४. मारिले आहेत शत्रु ज्यानें असा (वशि–गरुड). ५. मैनाक मारुतीच्या सत्कारास आला होता. ६. लंघिता जाला. ७. लंकेची देवता. ८. आरंभीं जें तोंड हुंकार (गुरगुर) करित होतें तें 'हाय! हाय!' करूं लागलें.

न जाणे महात्मा, तया मान दे हें, वरावा यशा[1] बंध हा कां न देहें? ६५
धरी वैरि[2]भाहानिच्या कामनेला, सभेमाजि तो द्यावया धाम[3] नेला.
[4]वळें आवरी चित्तसें पुच्छ, मानी म्हणे, 'धिक् खळा!' रावणा तुच्छ मानी.
कुधी पेटवी दूतदंडार्थ पुच्छ, प्रदीप्ताग्नि झाला [5]सुता पुष्पगुच्छ!
करीत प्रहासासि होती सभा जी, सुटोनि प्रतापार्क तो तीस भाजी. ६७
जळे, होय लंका अलंका; रमा ती निवे, सर्व झाला अलंकार माती.
तिचा धूम [6]अंडीं, तसा 'हाय!' कोंदे, न नाकीं हि तो बोलणें आयकों दे!
दिला युक्त त्या पातका दंड, कानें न घे सूक्त या घातका दंडकानें;
पुरीच्या [7]फळे लेश सत्ताप दाहें, गमे लागली काळलत्ता [8]पदा हें. ६९
[9]सहायासि हा भेट आधीं तराया; कथी खूण, दे रत्न आधींत राया.
[10]फणी चंदना [10]तापतो खेंव देतो, तसा वायुजा माप तोखें वदे तो: ७०
'अनंतोपकाराचिया जाण दामीं तुझ्या बांधलों सर्वदा प्राणदा! मीं.'
करी यापरी रंजना, मान राहे न [11]यां, सूक्ति ये कंजनाभा नरा हे. ७१
निवे राम सौमित्रिसुग्रीवयुक्त स्वशुद्धें यशें व्हावया भक्त मुक्त;
नमी पाय जो, त्या दशास्यानुजाला सुख प्राज्य दे, राज्य [12]न ग्लानि ज्यालीं[12];
नळाच्या करें सागरीं सेतु बांधी, प्रतापें निजें अद्रिसीं अद्रि सांधी!
दहा रुंद तो लांब ही सेतु गावें शत, प्राज्य हें कर्म धीहेतु[13], गावें. ७३
सुराराति मूर्धाधनु श्रीस दावी; करी शोक, मायेसि ती सत्य भावी.
दिलें राज्य ज्या तत्प्रिया तत्त्व सांगे, 'छळातें सये! मानिसी सत्य कां गे!?'
कपीचें महासैन्य घेवूनि हर्षें समुद्रासि लंवी प्रतापप्रकर्षें;
सुवेळीं चढे, राम लंकेसि पाहे. द्वि[14]षद्दर्शनातें न सुग्रीव साहे. ७५

---

१. यशासाठीं. २. 'वैरि भाहानिच्या' अशीं हि पदें संभवतील. ३. शोभा. ४. मनोनिग्रह केला व पुच्छ हि आंवरिलें. ५. मारुतीला. (वायु हा अग्नीचा मित्र म्हणून समानतेच्या दृष्टीनें मारुतीला अग्नीचा सुत म्हटलें काय?). ६. ब्रह्मांडांत. ७. फळाला आला. ८. राज्यपदाला. ९. अनेकवचन मानून 'आपल्या सोबत्यांस' असा अर्थ. १०. फणी (सर्प) तापतो [आणि] चंदना खेंव देतो. ११. मारुतीस–पंत. १२. अक्षय असें. १३. बुद्धिजन्य. १४. रावणाच्या दर्शनातें.

उडे तार्क्ष्यसा, त्या भुजंगासि ताडी, तळीं तत्किरीटा, तयातें हि पाडी.
करी अंगदा दूत, सामार्थ धाडी प्रभु; क्षिप्र तो ही हरी तेज नाडी. ७६
रणीं मारितां ही प्रहस्तादिसेना, म्हणे, 'मर्त्य मारा चि' भी ज्या दिसेना.
स्वयें भंग पावे, तऱ्ही तो लवेना, तया दुर्मदासीं[1] दुजा तोलवेना! ७७
रणीं शक्रजित् सर्पपाशांत बांधी, महाभूतिची भी, हरीची न कां धी?
गरुत्मान्[2] करी दूर त्या संकटातें, सुतेज्याचिया लेववी कंकटातें[3]. ७८
प्रवीरायुतें दोंदिसां जागवीला, न वज्रप्रहारें रणीं भागवीला,
यमें ही प्रसंगांत जो आठवीला, दिगास्यें महावीर[4] तो पाठवीला. ७९
सुकंठा धरी, तो हरी नाककान, स्तवातें तयाच्या करी नाक कां न?
रणामाजि कुंभाचियां[5] सर्व तातें कपि त्रासिले, ऱ्ही दिली पर्वतातें! ८०
न मानी च रामा महाबाहुला, जो महाशक्ति दावी, म्हणे, 'राहु लाजो,'
यशांचा रणीं त्या हि तो राशि खंडी, फणीचा न साहे चि तोरा शिखंडी.
करी ज्या सदा गर्व थारा, व्रणातें[6] पवीच्या धरी, सर्वथा रावणातें.
कळे ऱ्यापि त्याचें वच, प्रत्ययाला बरें ये, न जें वाटलें सत्य याला. ८२
कथा कुंभकर्णाचिया अत्ययाची कथी दूत; मानी न धी सत्य याची;
म्हणे, 'हा न व्हावा शतां हायनाहीं, अकस्मात् कसा जाहला हाय! नाहीं?
रडे जेंवि कुंभा तसा हा निकुंभा, 'सुधेच्या' म्हणे, 'जाहली हानि कुंभा.'
त्रिशीर्षादि जो पुत्र त्या आपल्याला स्मरे, 'हा!' म्हणे, तो महाताप ल्याला.
करी इंद्रजित् काळसा नाश मायाबळें, मानि मापाळ,[7] सैंना शमाया.[8]
प्रतापाग्निनें वीर भाजी, वसेना क्रिया, नै प्रकाशी च भा, जीव, सेना.[9] ८५
रणीं राम, सौमित्रि, सुग्रीव विद्धं;[10] क्षणें ते करी मारुती युद्धसिद्ध.
महौषध्यगाचें सुधी शृंग आणी, सुधाबंधु तद्गंध शल्यार्ति खाणी. ८६
'बुडे शत्रु कां? भाविना[11] शाप हा?' तो म्हणे, 'शापिला, भाविनाशा पहातो;
तऱ्ही दे चि ना मान सामा, रणाला सजे, वाढवी मानसा मारणाला.' ८७

---

१. सीतेची. २. गरुड. ३. कवचातें. ४. कुंभकर्ण. ५. कुंभकर्णानें. ६. खुणेला. ७. क्षुल्लक. ८. हालचाल बंद झाली. ९. सेना जीव भा (तेज) प्रकाशी च न. (सेना मृतवत् दिसली). १०. जखमी. ११. मनांत आणीना.

करी रत्नहेमें घना [1]दभ्र, मायामहीजा वधी मेघनाद भ्रमाया.
मथी त्यासि सौमित्रि, दे वासवाला सुख प्राज्य, सर्वां हि देवा सवाला. ८८
रडे पुत्रशोकें सुराराति, मोहें पडे, पाप योजी मनामाजि तो हें;
'घडे जीमुळें नाश हा, ती वधावी; जडे या न कंठा, कृपाणा बधावी.' ८९
अकस्मात् पुढें देखतां खड्गपाणी, भयें राघवाची म्हणे, 'हाय!' राणी.
सुपार्श्व प्रधान स्वयें त्यास वारी; फिरे वायुनें मेघसा वासवारी. ९०
'वधा राम, सौमित्रि, सुग्रीव, भक्षा' म्हणे राक्षसांतें, 'निघा, राज्य रक्षा;
उठा, दाव व्हा शत्रुच्या सैन्यकक्षा, भिडा, [2]जानकीचें जडो वक्ष [2]वक्षा.' ९१
बळा धाडि हा नीच मूढा लयाला; गळे, दे चि हानी चमू, ढाल याला;
[3]हराक्षि स्मरा[4] अग्निचे लोळ वीतें, धनु स्वामिचें त्या बळा, लोळवी तें. ९२
न त्या ऐकवे बायकांच्या विलापा, नें [5]कंठे पुरीं राक्षसांच्या इलापा;
मनाचा खचे सर्व थारा; मराया, वधाया निघे सर्वथा रामराया. ९३
करी रावण क्रव्यभुक् सर्व गोळा, म्हणे, 'हूं! वधा वीर हो! शत्रु, घोळा.'
वदे त्यांसि सुग्रीव, 'धूळींत लोळा; रणीं भग्न व्हा, दांत खा; हात चोळा.'
बळा लक्ष्मणाच्या न दे [6]वारित्याच्या उरीं, शक्ति वक्षांत देवारि त्याच्या;
बुडाया भ्रमीं देव, शस्त्रीश हाणी, करी त्यासि जैसी वश स्त्री शहाणी. ९५
जयाची प्रसू अंजना, भानु ज्यातें कथी ज्ञान, तो कंजनाभानुजातें
पुन्हा शृंग आणून दे स्वस्थता, [7]तें तया[8]च्या मुखीं स्थापिलें स्वस्थ तातें. ९६
द्विषद्बुद्धि सोडून जो सं[9]ग रामीं, तयाच्या कथूं त्या कसा संगरा मीं?
[10]बळें शक्र रामासि दे स्यंदनातें, वधाया रणीं कैकसीनंदनातें. ९७
चहूनीं उणे लोटले साठ [11]याम, शत छेदितां ही शिरें तीं च राम
विलोकी; विरे, कुंभभू मंत्र बोधी; म्हणे सूर्य, 'वत्सा! जयें स्वस्थ हो धी.'
कथी मातली कंजजास्त्रप्रयोगा क्षणें संहराया खळा विश्वरोगा.
तया दे यश, श्रीश मंत्रूनि सोडी शर, क्षिप्र सुक्रूरशत्रूर फोडी. ९९

---

१. अल्प. २. जानकी मला भेटो. ३. शिवनेत्र. ४. मदन-[नाशार्थ]. ५. कंठवेना, रहावेना. ६. [रावणाचें] निवारण करणाऱ्या. ७. हनुमद्यश-पंत. ८. लक्ष्मणाच्या-पंत. ९. आसक्ति सोडून. १०. आग्रहानें. ११. प्रहर.

अरीची तनू भूतळीं, पुष्पवृष्टि प्रभूच्या शिरोब्जीं, सुखीं सर्व सृष्टि
पदे एकदा, वांसुरीं जेंवि गृष्टि[1] द्रवे कीर्ति भक्तीं, निवे शक्रदृष्टि. १०१
नभीं वाजले निर्जरांचे नगारे, विधाता म्हणे, 'नांद हर्षें नगारे[2]!'
कथी शंभु, 'गा या चि, अन्या न गा रे!' वदे कीर्ति, 'चित्तीं न हो म्लान गारे[3].
यशाचा जगा तारि आलाप हा, या सुधासिंधु तसांसि आला पहाया!
गजास्याचिया गर्वदाना[4] रदातें कथी, भूलवी सर्वदा नारदातें. १०२
न केलें चि रंभोर्वशीमेनकांहीं तसें नृत्य, हें सांगतां ये न कांहीं.
सुरर्षी यशा भासुरा[5] गात नानापरीनें करी त्या[6] सुरागा तनाना. १०३
म्हणे जो गुणांतें, 'सुखें मातवा हे जन क्षिप्र सारे' असा वात वाहे.
विधाता वदे, 'युद्ध पात्र स्तवा हो, व्यथा हो यशा, बुद्धपा[7] त्रस्त वाहो.' १०४
दिगास्या जळादि स्वयें देववी तो, यशें तारितो विश्व जो देव वीतो.
तया दे पद श्रीश पादानतातें; प्रकाशी सुधासत्प्रपादानता[8] तें. १०५
करी दिव्य देवादिची आइ शीता, तिला मायसी अग्निची खाइ[9] शीता.
उठे सर्व ही प्रेत होता तसा चि, द्रवे, दाखवी रीति तो तात साची. १०६
बसे पुष्पकीं तो सदार, क्षणांत[10] प्लवंगांसि घाली, सदा रक्षणांत
प्रजांच्या श्रमे जो, तया दे वदावी तसी भेटि, मोटी दया देव दावी. १०७
तपोग्नींत योगी शरीराज्य होमी जयाकारणें, तो करी राज्य, हो! मीं
वदों काय? भव्यास दावि, प्रज्या तें वारि, ध्याति नव्या सदा विप्र ज्यातें.
अधीच्या हि जो सारि खेदा, समाना दया दे, सुतासारिखा दास माना;
सुधेचा स्व तो या गमे घांस, मोर स्वयें होय हा यागमेवांसमोर. १०९
यथाबुद्धि वंदूनि जी उक्ति दास स्तवाची वदे, ती रुचे मुक्तिदास.
तसी धी न जीवीं, नसे वासवास[11]; स्वनामें चि दे मान, सेवा, सवास. ११०

---

१. नुक्ती च प्रसूत गाय. २. इंद्रा! ३. गारे! तुझ्यापेक्षां माझा (कीर्तींचा) रंग शुभ्र म्हणून झुरूं नको. ४. गर्व दान करून टाकण्यास. ५. तेजस्वी. ६. प्रसिद्धा–पंत. ७. अर्थ? ८. अमृताच्या उत्तम पोईचें दानशूरत्व प्रकट करी. ९. सतींनां वगैरे प्रवेश करण्याची अंगारयुक्त राडी–खळी. १०. आनंदांत. ११. बृहस्पतीस.

न याहूनि हा अन्य कांहीं च जाणे, दुजा अर्थ चित्तांत याच्या न बाणे;
मयूर स्वसेवा बरी यांत पाहे, 'सुरामायण' श्रीशरामासि वाहे. १११

इति श्रीरामनंदनमयूरविरचितं श्रीमत्सुरामायणं समाप्तं ।

---

# श्रीरामायण

(शिखरिणी)

रमाभर्ता गर्वें न जरि बहु दिक्कंठ उतता
तता[2] व्हाया लीला दशरथमहाराजसुतता
न घेतां[*] आचार्यत्व हि विधिसुता गाति तनया,
न याचें येतें धी समजति हि धर्मा न सनया. १
यशा कौसल्येच्या प्रथम सुतता राम परमा
रमाया साधूंचें हृदय करि भव्या अचरमा[3].
रमानाथांश श्रीभरत दुसरा केकयभवा,
भवाचा संहर्ता सुपटु षडरींच्या परिभवा. २
सुमित्रेचा ख्यात प्रथम सुत तो लक्ष्मण परा
परा[4] दे भी ज्याची मति गुरुपदाराधनपरा;
दुजा जो शत्रुघ्न प्रिय भरतसेवाविभव या,
वया ज्ञानें थोरी, लघुपण यशें दे सितवयां[5]. ३
सुमित्राकौसल्यातनुज सुमती जे तदुभया
भया वाराया ने कुशिकसुत, त्या लाभ शुभ या.
पथीं दे त्यां विद्या प्रथम चि बळा जी अतिबळा,
बळावाया अस्त्रें शत, परयशा[6] दुग्धधवळा. ४
पथीं त्या दुष्टेतें वधुनि गुरुयज्ञघ्न खपवी,
पवीतें जे भीती न खरपँर, तत्तेज लपवी.

---

१. कवि. २. विस्तृत. ३. अंतरहित अशा. ४. मोठी. ५. वृद्धाना. ६. श्रेष्ठ यशाला. ७. खरादि शत्रु. * घेता (?).

पवित्रा आशी घे स्वचरणरजें तापवसती[1]
  सती तारी; पूजी स्तवि बहु कृपेच्या निधिस ती. ५
पुरीं वैदेहाच्या स्वगुरुवचनें रुद्रधनु तें
  नुतें[2] तेजें मोडी; क्षितिजा[3]नि गणी धन्य जनुतें[4].
स्वयें श्री श्रीशातें मुदितमति होवूनि नवरी,
  वरी तद्बंधूतें तिघि तदनुज्या त्या विधिवरी. ६
म्हणे, 'ज्यांच्या तेजें बहु सभय होवूनि तमहा[5]
  महायोगी आले सकळ हि तया धावुनि महा
महा घे रामाच्या, गुरुवचन जें तत्समवना
  वना गेला राम, त्यजुनि सुसमृद्धा स्वभवना. ७
सुमित्रेचा ज्येष्ठ प्रिय तनुज, ते ही अवनिजा
  निजात्म्या सोडीना, भजति गतिदा साधु मुनि ज्या;
मरे शोकें राजा, भरत करि धिक्कार तिस, जी
  सजी दुष्कीर्तीतें, वधि भवनिलोभें गुरुस जी. ८
क्रियेतें ताताच्या करुनि जननीवक्र सुकवी,
  कवी साकेतातें त्यजि, सकळ कौलीन[6] चुकवी;
कविश्वेशध्येय[7] प्रभुसि पद वंदूनि विनवी.
  नवी रीति प्रेमा विटवुनि दयासागर न वी. ९
खडावा घेवूनि द्रुत भरत तेथूनि मुरडे,
  रडे नंदिग्रामीं असुखभर वाहोनि चिरडे,
प्रभूची त्या अत्रि स्तवुनि अनसूया अपचिती[8]
  चितीची[9] प्रेमानें करि, सुमति वेधी तप चि ती. १०
विराधातें मारी, सुखवि शरभंगादि नमुनी,
  मुनी पूजी कुंभप्रभव सुसमाज्यांत रमुनी.

---

१. तापाचें निवासस्थान अशी. २. स्तुत्य अशा. ३. सीता. ४. जन्माला. ५. अज्ञाननाशक. ६. लोकापवाद. ७. ब्रह्मदेव आणि शिव यानीं ध्येय अशा. ८. मागें पृ. ३०४ टी. ३ चा मेळ कसा घालावयाचा? ९. स्त्रीची (सीतेची) पूजा.

जटायूतें भेटे, वसवि विभु गोदातट सदा,
सदा साधूंच्या दे परमसुख, यत्कीर्ति रसदा. ११
स्वसा दिक्कंठाची, कुमतिविषयीं ज्या उपरती,
रती मागे त्या श्रीप्रियपतिस मानूनि नर ती.
रतीसी जी नासा हरुनि करि सौमित्रि विदरी,
दरीवासी ते ही बहुत सुखवी तो असदरी. १२
सुवृत्ता सस्याच्या बहिण अवलोकूनि उखरा,
खरा लागे, दंडें बहुत चि तशा त्या खरखरा.
खरा क्षोभे, सांगे निशिचर भटां 'शस्त्र विखरा;'
खरा मारी, ज्याच्या कनककशिपु क्षुद्र नखरा. १३
स्वसा सांगे, क्षोभे दशमुख, विचारासि खरची,
रची माया ज्या धी कथि 'दहन गेहीं विखर चि.'
क्षणें मोही श्रीतें दवडवुनि दोघांस कपटें,
पटें ज्वाळासी ती हरिलि निजनाशा कसपटें. १४
करी शोक श्रीश प्रभु हि विरही स्त्रैणनरसा,
रसा कांपे, ज्याच्या स्मृतिस बहु भीतात पर सा.
रसा त्या वाल्मीकि द्विजवर वदे, गृध्र खग ती
गती सांगे, त्या दे जळ, करि यशें धन्य जगती. १५
कबंधातें तारी तदुपरि तपश्री स्वकबरी
बरी राम स्वामी करि सुगति देवूनि शबरी.
मरुत्पुत्रद्वारें करुनि विधिनें सख्य सुगळा,
गळाठा वारी, दे प्लवगपति हा भार सगळा. १६
महीजा शोधाया सुगळ बहु जे पाठवि हरी,
हरीसे तेजस्वी, परि म्हणति शोकें 'हरि हरी!'
हरी तों संपाती सकळ कपिचिंताब्धिलहरी.
हरीष्टार्थी सिंधु, श्वसनज उडे, हर्षवि हरी. १७
पुरींत श्री रात्री सुनिपुणपणें ती हुडकिली,

किली[1] हातीं मुद्रा, स्मृतिस मति ही नित्य विकिली.
खळ प्रार्थी, त्याचा विहितवचनें गर्व उतरी;
तरी सेवीना तो सुमति भवपाथोधि सुतरी. १८
स्तवी, मुद्रा दे, ने प्लवग विलया ताप मतिचा,
तिचा तो घे चूडामणि हि विभुच्या हेतु रतिचा;
अशोकींचे शाखी खचरबळ अक्षादि रगडी,
गडी कल्पांताचा कुशळ करि लंकेसि सगडी. १९
महेंद्रीं कीशांचीं बहुत निववी[2] शत्रुदमनें
मनें, चूडारत्नें कपि रघुपतींचीं हि नमनें,
परिष्वंग श्रीशें द्रवुनि दिधला त्या प्रियकरा,
कराया याहूनि प्रमुदित यशें साधुनिकरा. २०
प्लवगांचें नेलें बळ जलधितीरासि अजि! तें
जितेंद्रा दिकंठा हटकुनि वधायासि अजितें.
जितें ध्यातां सर्व क्षितिप सुर चित्तीं करपती,
पति श्रीचा केला नत, पर यशें या चि लपती. २१
पयोधीतें लंघी, नळकपिकरें सेतु करवी,
रवी वंशाब्जाचा अरिस हितपीयूष भरवी.
रवी जो अद्रीतें करि, मथि समुद्रा, किति भरी
अरीतिज्ञाता त्या प्रभुसि धरि ज्याचा कर अरी[3]. २२
रडों दावी मायामय शिर धनु क्रूरहृदया
दया कैंची? चेष्टा शिकवि विविधा भाग्यमद या.
म्हणे श्रीप्राणातें सुमति सरमा कीं त्रिजटिका
'टिका,' वाटे, नाहीं तरि न टिकते एक घटिका. २३
सुवेळाच्या शृंगावरुनि अवलोकूनि अरितें

---

१. किली च अशी मुद्रा. २. येथें मूळ 'विनवी' असें लिहिलें गेलें; पुढें त्याचें 'निववी' असें करितांना मधल्या 'न' चा 'व' करावयाचा राहून 'निनवी' असें मूळांत राहिलें आहे. ३. चक्र.

रितें व्हावें जेणें पद युगळ तो कर्म करि तें.
तया प्रार्थी स्वामी ‘समुचित नसे साहस नया
न यावें पांडित्या अयश तुझिया, गावु जन या.’ २४
प्रभु प्रेषी सामास्तव निपुणधी अंगद, मना[1]
मनाक्कामी[1] देना दशमुख, पहाणार शमना[1];
‘म’ नामा ज्याच्या ये मग, ‘श’ पहिला, यास विसरे;
सरे ज्याचें आयु त्यजुनि पथ तो मूढ घसरे. २५
वधूं पाहे दूता, न करि खळ सीता[2]वितरणा;
रणातें आरंभी, पथ करि महासैन्यमरणा.
सुरेशारी[3] घाली अहिमय महापाश, चुकली
कालिघ्नांची पीडा परि, गरुड तो बंध उकली. २६
महाकष्टें राजा उठवि घटकर्णा यमसमा,
समाजा कीशांच्या भिववि, न मरावा शत[4]समा;
समावे तैसा ही युगळ हृतनास, प्रभु महें
महेंद्रा जो भारी, अमर यश गाती परम हें. २७
सुतांतें बधूंतें म्हणति ‘शमनस्थान वसवा.’
सवाजीभानीकप्रलय[5] जरि पूर्वाहुनि सवा[6],
सवा[*] त्या दे मोटें बळ, न च म्हणे तो खळ ‘पुरे,’
पुरेश क्रूरांतें कथि ‘सबळ मारा चि रिपु रे!’ २८
खिळी ब्रह्मास्त्रानें घनरव रणीं ऋक्ष कपि, ते
पिते विश्वाचे ही अरि यमसुखीं जे दडपिते.
पिते[7] झाले संज्ञेप्रति शर तदा ओषधिनगा
नगा[8] तैसें आणी पवनज, म्हणे शत्रुस ‘न गा.’ २९

---

१. कामी दशमुख मना मनाक् (यत्किंचित् हि) शमना (चित्तशांतीला) देना. [तो] शमना (मृत्यूला) पहाणार. २. सीता देण्याला न पाहे. ३. इंद्रजित्. ४. शंभर वर्षें. ५. घोडे व हत्ती यानीं युक्त अशा सैन्याचा नाश. ६. सवाई, वरचढ. ७. मूर्च्छेचे जनक. ८. अलंकाराला. * रणयज्ञाला.

मरुद्त्तें गंधें अमृतविनुतें ओषधिभवें
भवेंद्रादिस्तुत्यप्रभुसहित तें युक्त विभवें
उठे सैन्य क्षिप्र, व्रणरहित संतुष्ट दिसलें,
सलें गेलीं, चित्तीं भय दशमुखाच्या हि घसलें. ३०
पुन्हां त्या शृंगातें पवनसुत ये पोवुनि पळें,
पळें मद्यें मत्त, 'स्वगुरु' म्हणिजे ज्यासि उपळें;
'पळें' जो देवौघा घनरव म्हणे तो तळमळे.
मळे ज्याचे नाकी बहु तदुदयानें खळ मळे. ३१
वधी मायासीता, वदवि सबळा 'हाय!' विभुला,
'भुला' आधीं 'शं' ज्या कथि सुरवरां त्यासह 'भुला'.
कुधी होमा जाय प्रवररथलाभार्थ कपटी,
पटीयान् सौमित्रि प्रभु यमसुखीं त्यासि दपटी. ३२
दशग्रीव क्षोभे बहु तनुजशोकें, धरि असी,
असीमागा बोले 'वधिन चि, नसो त्या मज असी.'
सुपार्श्वाख्य ज्ञाता सचिव फिरवी त्यासि सुकृती
कृती धर्मीं न्यायीं जरि दशमुखा फार विकृती. ३३
म्हणे, 'जा; मारा ते नरकपि;' रणीं काळकवळा
बळा धाडी व्हाया महि रुधिरमांसास्थिशबळा.
बळाराति प्रेक्षी अति चकित होवूनि समरा
मरालस्थ त्र्यक्ष प्रभु हि वदला सर्व हि 'मरा!' ३४
म्हणे काळ, 'क्रोधें मज हि न असें शीघ्र मथवे;'
थवे देवर्षींचे नवल करिती, तें न कथवे.
वधी कोटी कोटी बळ न भरतां च्यार घटिका,
टिकीं श्रीचीं पाडी दशवदनसंकल्प लटिका. ३५
स्वयें तो दिकंठ प्रबळ बळ घेवूनि उसळे

---

१. अमृतानें विशेष स्तुत अशा. २. पोंचवून. ३. मांसानें. ४. दगडानें. ५. बाग. ६. अतिचतुर. ७. निःसीम अपराधी. ८. इंद्र. ९. ब्रह्मा. १०. सीताभूषण राम.

सळे[1] ज्या भूमिध्रें[2] त्रिदिवें[3], बळपाथोधि घुसळे;
उरीं सौमित्रीच्या पर खरतरा शक्ति शिरवी;
रवी ही 'हा!' बोले, क्षण रघुवरातें हि विरवी. ३६
तया भंगी अंगीकृत[4]सद्वनैकव्रतरुची,
रुचि म्लाना पाहे हृदयपिकमाकंदतरुची[5].
म्हणे 'हा!' शक्तीतें प्रभुवर वेळें[6] काढुनि गळे[6],
गळे शोकें बाष्पें भरिति, म्हणती 'हाय!' सगळे. ३७
पुन्हा आणी शृंग श्वसनज[7]न, यावें हि वरसें,
रसें गेलें कृच्छ्रं[8], त्यजुनि गुरु ही तुच्छेतरसें[9];
प्रवर्ते संग्रामक्रतु अतुळ, लोपे तपनभा[10],
न भागे कोणी ही, पटळ विशिखांचें भरि नभा. ३८
रथीं स्थापी त्यातें त्यजुनि सुरकार्यानलस खां[*],
सखा शक्राचा जो कथि निजशरा 'साध्वरिस खा.'
अहोरात्रें सत्र प्रभुवर करी युद्ध उशिरें[11],
शिरें खंडी, भेदी उर; कथि 'सुलोकीं' मग 'शिरें.' ३९
जयें श्रीरामाच्या परम मह होय त्रिभुवनीं,
वनीं वर्षे बर्ही[12] मुदित अथवा ते झष वनीं.
सुरर्षीनीं केलें स्तवन, बहु गंधर्व तनना
न नाकीं ही तैसा करिति, अरिच्या गाति हनना. ४०
यशाची रामाच्या तुरवि अमृताची चव कळा,
कळावीं[13] चित्ताश्वा जडुनि हि सुखा दे चवकळा[13].

---

१. अस्त होई. २. पर्वतानें. ३. आकाश. ४. धरिली आहे सज्जनरक्षणाच्या एका च व्रताची आवड ज्यानें. ५. हृदयकोकिलेच्या आम्रवृक्षाची (लक्ष्मणाची). ६. वरपांगीं दुःख दाखवून. ७. मारुती. ८. शरीरदुःख. ९. गुरु ही कृच्छ्र तुच्छतरसें ( अत्यंत हलकें असें ) रसें त्यजुनि गेलें ( नाहींसें झालें ). १०. सूर्यकांति. ११. वेळानें. १२. मोर. १३. चित्तरूपी खट्याळ घोड्याला पायबंद बसून सुद्धां रामयश सुख देतें. * आकाशाला.

कळा अर्पी, तर्पी, मुनि म्हणति 'हें धन्य करितें.
रितें त्या पूर्णत्वप्रद, दुरित संताप हरितें.' ४१
क्रिया दिक्कंठाची करवि, सतपा[1] संहरि रजा;
रजानें[2] दे राज्य प्रभुवर तयाच्या अवरजा[3].
सती दिव्योत्तीर्णा मग बसवि अंकीं अवनिजा,
'निजा' शक्तिज्ञाते म्हणति 'परमानंदखनि' ज्यां. ४२
मुखीं काळाच्या जो सुररिपुशतातें दडपिता
पिता भेटे नाकीं निजचरित लज्जा जड पिता[5].
यशः स्वर्गेशा दे, उठवि मृत ते ऋक्षकपि कीं,
[6]पिकीं कृत्याम्राच्या भर सुख रुचे सत्कविपिकीं[6]. ४३
सुखी केलें तें जें रुचिर राचिलें पुष्पक अँजें,
अँजें त्यास श्रीर्के बसुनि वरिला सुस्तव अँजें.
[10]अँजें भ्यावें व्याघ्रा, सतत कलिनें या हि चरिता;
रिता व्हावा याणें भवजलधि जो मग्न करिता. ४४
कपीशा लंकेशा कटकसहिता घेउनि रमा
रमाया सेत्वादि स्वकृति कळवी तीस परमा;
सुखें दुःखें सांगे निजविरहिं आलीं अनुभवा,
[11]भवाराध्य स्रष्ट्या [12]कविवर करी जो [13]तनुभवा. ४५
विमानीं तारेतें बसवि, न सिवे ज्यास विपदा
पदाब्जें स्वीयें तो प्रभुवर तया आश्रमपदा
स्वयें वर्णी, दावी जनकतनया ती च वसुधा
सुधावर्षे न्हाणी श्रितसुखद जो केवळ सुधा. ४६
पुढें धाडी रामप्रभु पवनपुत्रास विहिता,
हिता भक्ता आत्या कुशळ कळवी आप्तसहिता;

---

१. तपस्वी. २. स्वचरणांच्या-**पंत**. ३. धाकट्या भावाला. ४. रामास-**पंत**. ५. प्राशिता-**पंत**. ६. अन्वयार्थ? ७. शिवें. ८. दैवशाली रामानें. ९. दशरथातें-**पंत**. १०. भेंड्यानें. ११. राम. १२. ज्ञानीश्रेष्ठ. १३. पुत्र असा.

प्रयागीं वंदी त्या पितृसखभरद्वाजचरणां,
रणांता वृत्तांता कथि विभु वराशीर्वितरणा[1]. ४७
गुहा भक्ता आधीं मग मह दिला राजतनया,
नयाधारा रामें द्रवुनि भरता भव्यविनया,
वसिष्ठा शत्रुघ्ना सकळजननीपौरहृदया
दयामेघें काळ क्रमुनि चिर पावोनि उदया. ४८
जटा स्वभ्रात्यांच्या उकलुनि निजा राम उकली,
कलिघ्न श्री घे जी स्वपदविरहें फार सुकली;
प्रवेशे साकेतीं, सविधि मग सिंहासन वरी;
वरीयान्[2] राज्यश्री भजलि रघुसिंहास नवरी. ४९
स्मरावा चि त्राता, विसरवि चरित्रें तदपि त्या
पित्या राम श्रीमान् करुनि यश मुक्तिप्रद पित्या,
करी प्राज्या राज्या सुचिर हयमेधादि यजना,
जना सर्वां तारी सम सदय लावूनि भजना. ५०
मयूर श्रीरामायण रचुनियां पुष्पसम हें
महेंद्रादिध्येयप्रभुपदयुगीं वाहुनि महें,
महें[3] ज्याच्या नाशे तम, मिळति धर्मादि सवदे,
वदे त्या नामा, जें अधिक अमृताहूनि चव दे. ५१

इति श्रीरामनंदनमयूरविरचितं श्रीरामायणं संपूर्णं ।

---

१. वर आणि आशीर्वाद यांचें दान ज्यांत आहे अशा. २. अतिश्रेष्ठ, अत्युत्तम. ३. तेजानें.

# विचित्ररामायण

(जलोद्धतगतिः)

भवाब्धि[1] सुकवी, कविप्रिय करी, करींशतम[2] हा महादय हरी.
सुकीर्ति परमा रमाप मिरवी रवीडितमहा[3] महास्पद[4] नवी[5]. १
अजात्मजनु[6] तो नुतोदय[7] भवें[8] भवें[9] कारि मही[10] महीष्ट[11] विभवें[12].
शं[13] दे मुनिसवास वारुनि अरी अरीति[14] धारिते[14] रिते प्रभु करी. २
करी मुनिसतीस तीर्थ चि हरी, हरी अघनगा, न गाति दुसरी
उमादिक सुरी सुरीति; नवरी वरी, धनुस तो सतोप[15] हि चुरी. ३
जिणी भृगुवरा वराभयद; या दया त्यजवि भूविभूति[16] सदया.
वरी सदवना वनासि; नमुनी मुनी रमविता विता[17] सुरधुनी. ४
त्यजी असु पिता पिता गुण; सुतासु तापवि कुधी[18]; कु[19] धीरविनुता[20]
न मोहि भरता; रता[21] स्वभजनीं जनीं रघुप या पया पय मनीं[21]. ५
तपस्विजनता न तापपद[22], या दयालुनमनें मनें धारि अया[23],
म्हणे 'स्वसुख[24] गा' खगा; न खचरी चरित्र[25] वारि; ती रिती प्रभु करी. ६
वधी प्रभु खरा खरा[26] कनकसा कसा[27] मिरविता विता[28] भ्रमरसा[28].

१. हें रामायण खरोखर च नांवाप्रमाणें विचित्र आहे. २. गजेंद्रावरील संकट. ३. सूर्यानें वार्णिलें आहे तेज ज्याचें. ४. आनंदाचें स्थान. ५. नवी सुकीर्ति. ६. ब्रह्मदेवाचा पिता. ७. स्तविला आहे उदय (अवतार) ज्याचा. ८. शिवें. ९. [आपल्या] जन्मण्यानें. १०. आनंदी (अजात्मजनु). ११. पृथ्वीचें इष्ट. १२. पराक्रमानें. १३. सुख. १४. वाईट चालीचे, कुमार्गगामी. १५. सहज-लीलेनें. १६. राज्यवैभव. १७. उत्पन्नकर्ता. १८. कैकेयी. १९. पृथ्वी (पृथ्वीचें राज्य). २०. ज्ञात्यांनीं विशेष स्तुत अशा भरताला. २१. जनीं मनीं स्वभजनीं रता या [भरतरूप] पया [राम] पय [झाला]. २२. तापयुक्त. २३. भाग्याला. २४. आमचें रक्षण कर, असा भावार्थ. २५. मूळ स्वभाव (व्यभिचारोत्सुकता). २६. खरोखर. २७. कसोटीला. २८. भ्रांति उत्पन्न करणारा.

[1]रसाजनिमना मनाक्[2] मृगपणें [3]पणें हरि तया तया [4]बळकर्णे. ७
[5]स्वपत्यवरजा रजापरिस ती सती लघु करी [6]करीश्वरगती;
तशांत जपला पलाशन तिला [7]तिलापरुचि ने चि [8]नेष्टगतिला. ८
जटायु [9]शरणा रणा करि, परा पराभवि, नया न यातुप बरा.
[10]उपध्यनवधी वधी, पळवि ती, विती[11] जग परापराध गिळिती[11]. ९
कपींत [12]जगतीगति त्यजि नगा नगावरि बरा बरा रचि [13]लगा,
पुरींत वसती सतीस करि तें रितें गृह अही [14]अहीन [15]हरितें. १०
अवाच्य कविला विलाप, नरसा [16]रसाजानिप हा पहात सहसा
वनीं पितृसखास [17]खांजिरनटा न टाकि [18]महिगा हि [19]गाय सुभटा. ११
[20]सहाश्रुलव देव दे [20]जळ पित्या पित्या सुखग ती गती बहु वित्या.
कबंध सुकृती [21]कृतीश शबरी बरी [22]धृतिमती, मति स्मृति धरी. १२
सुकीर्ति [23]सरसी [24]रसी पवनभू [25]नभूषितन ती नतीष्टवन भू,
[26]सुकंठनियती [26]यतीशमहिता हिता गमलि वालिवानरचिता. १३
गणी पवनभू न [27]भूमिवसना [28]सनाथनगरा गराग्निहसना.

---

१. तया सीतामना हारि, तया ही वधी प्रभु—**पंत**. २. श्रीरामायण २५ वा श्लोक पहा. ३. प्रतिज्ञेनें. ४. बळलेशानें. ५. धाकट्या दिराला. ६. गजेंद्रगामिनी. ७. तिल+अप+रुचि=काळा. ८. आनिष्ट परिणामाला. ९. [सीतेच्या] रक्षणासाठीं. १०. अमर्याद कपटी. ११. जग उत्पन्न करणारी व परापराध गिळणारी महामाया सीता. १२. अचंचलगमना किंवा जगाला गतिरूप अशी. १३. लग्गा, युक्तिसंधान. १४. मोठा. १५. या चरणाचा चांगलासा अर्थबोध झाला नाहीं. १६. सीतापति. १७. आकाशरूपी अंगणांत नाचणारा (पक्षी—जटायु). १८. जमिनीवर पडलेल्या. १९. न टाकी पहात गाय—**पंत**. २०. दुःखाश्रूंच्या थेंबानीं युक्त अशी तिलांजलि. (या चरणाचा अर्थ नीटसा लागत नाहीं). २१. कुशलाग्रणी. २२. धैर्यवति अशी. २३. सुकीर्ति ही च तळें. २४. रसिक. २५. विभूषित. (दोन नकार म्हणजे विधि). २५. नमनयोग्य वनानीं युक्त. २६. योगिश्रेष्ठानीं पूजित असें सुग्रीवाचें दैव. २७. समुद्राला. २८. विष व अग्नि यांस हंसणाऱ्या रक्षकयुक्त नगराला (लंकेला).

सुखर्धि[1] समुदी[1] मुदी[2] सातिस दे, सदेव[3] अज[3] या जया 'बहु' वदे. १४
मणी[4] नमुनि घे, निघे, अघनगां न गांजि, न महामहा हारि जगां,
यशीं प्रभु रमे; रमेशमहिमा हिमागगुरु[5]; तो रुतो चि अधमा. १५
अपारबळ हा लहान खलपा, लपालि रविभा, विभावि न तपा.
करी नत विभी[6] बिभीषण; नसे न सेतु, वनधी[7] न धीट हि वसे; १६
न सामवश तो शतोग्र सदरी; दरीसखबळें[8] बळें हुत करी.
शयालु[9] खपला पलाश; तनयानयाश्रित[10] न ने, न नेय, विलया. १७
उभारि कपटा पटा, न बरवा रवा भलतया तया घनरवा
नये जय खपे ख पेरि तपला पलाश मरणा रणासि जपला. १८
करी पवनभू नभूतरस[11]; हा सहायवर सारसाधक महा.
महा स्तवि शचीश चित्त, वर या रया गणि पिता, पिता यश, जया. १९
विलोकि अवधी, वधी आरिस या सयातु, परमा रमाप्रियसया
उमादि हसती सती, प्रभु विता वितोप[12] कारि, भारि भा हि सविता. २०
सुपुष्पकग या गया करि, नता न तापवि घनाघनाश भरता,
निवारि विपदा, पदा वारि, सदा[13] सदा स्तववि, लावि लाज रसदा[14]. २१

'विचित्ररामायण' हें मयूरें रामनंदनें,
श्रीरामचरणीं भावें वाहिलें कृतवंदनें[15]. २२

---

१. सर्व सुखाचा ठेवा. २. आंगठी. ३. देवांसह ब्रह्मा. ४. चूडामणी. ५. हिमालयाहून मोठा. ६. निर्भय. ७. समुद्र. ८. वानरसैन्यें(?) ९. झोंपाळु. १०. अन्वयार्थ ? ११. जिवंत (?). १२. तापरहित. १३. समुदायाला (जनसमूहाला) १४. अमृत देणाऱ्याला. १५. प्रस्तुत रामायण उकलण्याच्या कामीं आम्हांस कोणत्याहि वाचकाची मदत पाहिजे! हें रामायण ध्वनिसुखलोलुपानीं अवश्य वाचावें, अशी आमची शिफारस आहे !

# सद्भक्तसर्वस्वरामायण

(वसंततिलका)

श्रीकांत तो दशरथात्मज होय दास-
 त्रासक्षयार्थ, करुणामृततोयदास
यास त्रितापहर 'राम' असें सुनाम
 स्थापी मतें स्वगुरुच्या नृप पूर्णकाम. १
भाग्यें तदंश दुसरा सुकुमार झाला,
 ठेवी पिता 'भरत' हें शुभ नाम त्याला.
तैसा चि 'लक्ष्मण' तिजा, चवथा हि नावें
 'शत्रुघ्न', तद्यश सदैव सुखार्थ गावें. २
श्रीराम लक्ष्मण असी बहु रम्य जोडी,
 यांसीं निरंतर परस्पर फार गोडी.
शत्रुघ्न ही भरतचित्त कधीं न मोडी.
 सद्रीति हे शिशुपणीं हि दिसे न थोडी. ३
विद्या कळा श्रितसुखा गुरु दे वसिष्ठ,
 ज्ञानें गुणें स्तविति जे गुरु देव शिष्ट.
वादीं तयां वचकती चवघां, सभारी[1]
 देती, न दे अमृत ती चव, घांस भोंरी[2]. ४
पाहे नृपाळ उचिता तनया विवाहा,
 चिंती मनांत अजनंदन जों विवाहा[3],
तों ये महामुनि, तया नमि गाधिजाला,
 क्रव्यादविघ्नितमखें बहु आधि ज्याला. ५
पूजूनि सादर पुसे रघुराज, 'आर्या!
 आलासि योजुनि जया हृदयांत कार्या,

---

१. सभेचे शत्रु. २. सदन्नाचे—पंत. ३. विष्णूला.

तें सांग, जाणसि च शक्ति असे नसे वा,
    बा! ध्यात मीं जरि मनांत असेन सेवा.' ६
सांगे नृपासि मुनि, 'पावुनि ताप वेना
    तैसें खळा दशमुखा मज शापवेना.
दे रक्षणार्थ सहलक्ष्मण रामराया,
    यज्ञघ्नदिङ्मुखबळा प्रखरा मराया.' ७
एहें न दे नृप, वशिष्ठ चि देववी. तो
    पायीं च जाय मग, जो जग देव वीतो.
विद्या बळा अतिबळा मुनिराज दे हा,
    क्षुत्तृट्श्रमा हरुनि ज्या सुख देति देहा. ८
अस्त्रें शत प्रभुवरा शिकवी नयज्ञा,
    रक्षावया सुकृतराशि कवीन[1] यज्ञा.
रामें गुरूक्ति बहु मानुनि ताटकेला
    मारूनि तो परम निर्भय वाट केला. ९
सिद्धाश्रमीं जय दिला बरवा सवातें,
    द्याया स्वभाग हि पुढें वरवासवातें[3]
काळा सुबाहु दिधला, मग अर्णवातें
    मारीच, जेंवि लघु नीरस पर्ण वातें. १०
होय प्रसन्न मुनि कौशिक, दे वराशी-
    राशी, म्हणे, 'उपट शत्रुफणाधराशी[4].'
बाहे मखा जनक, ने मुनि सानुजा या,
    ज्या याचि[5] पादरजगौतमधर्मजाया. ११
जो दोष 'तापिव' म्हणे 'स्वजना; शिला हो,'
    तो लाउनि स्वपदनीरज नाशिला हो!
'बा! द्यावया त्रिभुवनासि सदा मह ल्या[6]

---

१. कविश्रेष्ठ. २. यज्ञस्थान. ३. श्रेष्ठ इंद्राला. ४. शत्रुसर्पाच्या अधराला—दाढेला. ५. याचना करी. ६. धारण करा.

सत्कीर्ति,' हें वदलि पूजुनि ती अहल्या. १२
कां लंवितील भुज, नेणति चापला जे?
वाटे मनीं कठिनतेस्तव चाप लाजे.
जी त्या सुदुर्घटपणें धरि ताप शीता,
तत्काळ होय हिमशैलसुतापशीता. १३
तें भंगितां चि धनु, ती मिथिलेशबाळा
घाली गळां स्वपतिच्या समयीं च माळा.
रामाचिया मुनि तिवां अनुजांसि कन्या,
तो देववी कथुनि त्या जनकासि धन्या. १४
तो आणवी सतनया अजनंदनातें,
कन्यार्पणें मिळवि सत्सुखकंद नातें.
गेला पुसोनि, मुनि, जोडुनि सद्यशाला,
या सत्कथेहूनि परा, जसि मद्यशाला. १५
क्षत्राप्रति, त्यजुनि मार्गवरा[2], 'मरो,' धी
ज्याची म्हणे, स्वपथ भार्गवराम रोधी.
अत्युग्र, तो, फुगवि गल्ल, वदे; वदावी
जी शक्ति शांति रचि, तद्वव देव दावी. १६
पूर्वांपरीस विजयी नव राम हा, तें
साकेत सत्पुर धरी प्रवरां[3] महांतें[3].
धन्य क्षितीश महिषीसह; सासु नाहीं
धन्या असी निववली सहसा सुनाहीं. १७
ने मातुळ स्वविभवा भरता पहाया.
वृद्धास दे स्वमह्चिा भर ताप हा या.
ज्येष्ठा सुतास युवराज करावयाला
योजी; म्हणे गुरु, 'विचार बरा वयाला.' १८

---

१. भागीरथीच्या उदकाप्रमाणें थंड. २. विहित असा ब्राह्मणकर्माला. ३. अत्यंत श्रेष्ठ तेजातें.

[1]शक्रप्रियार्थ कथि दुर्मति मंथरा, या,
　दावावयासि परलोकग पंथ राया.
मन्वब्द राम वन सेवु च, एक याची,
　ऐसा दुजा वर, सुता [2]क्षिति, के[3]कैयाची. १९
येना तिच्या, विनवितां हि तसा मनातें;
　वाटे जसा हठ, न तें हित साम नातें.
व्हाया यश [4]स्वतिलकालकहानि, घाया
　स्नेहीं करी, प्रणतपालक हा निघाया. २०
चित्तीं म्हणे प्रभु, 'न या गुरुस त्यजावें
　धर्मे यशें; न विलया गु[5]रु सत्य जावें.
सीतानुजांसह निघे, जरि तात दे हा
　आज्ञा न; कष्ट हि वनीं वरितात देहा. २१
घे वल्क; भूषण सुवस्त्र न सेवि; पत्ती.
　ठावी असी पुरजनासि नसे विपत्ती.
रायें रडोनि बहु, दुर्नय आठवीला;
　स्नेहें सुमंत्र रथ सत्वर पाठवीला. २२
पौरांशि कारुणिक तो फटवी सजा[6]या
　केला विलंब न जिहीं अटवीस जाया.
भेटे सख्या त्वरित राम निषादराज्या;
　तो त्या गमे, करि महेश विषादरा ज्यां. २३
तेथें अखिन्न रचिती प्रभु ते जटा, कीं
　माता वदे, 'नृपतिवेषज तेज टाकीं.'
दे त्यांसि पुष्कळ चि तापसवेष शोभा,

---

१. इंद्राच्या इष्ट हेतुसाठीं. २. सेवू च–पंत. ३. कन्या–पंत. ४. आपल्या सौभाग्याची हानि. ५. श्रेष्ठ. ६. सिद्ध होण्यास. ('सस्त्रीक' असा हि अर्थ संभवेल). ७. शंकरानें ज्या हेतूनें हालाहलाचा आदर केला तो च हेतु रामाच्या हि वनवासांत आहे, असें गुहास वाटलें (?).

तो भाव जागवि विरक्तमनीं हि लोभा. २४
तेथें सुमंत्र, रथ, सोडुनि दे. वनौका
मागे नमूनि गुहनामक, देव नौका.
पारासि जाय, उतरोनि सुरापगेला,
प्राशूनि यत्पय गतीस सुराप गेला. २५
जावूनि कीर्ति विभु दे बरवि प्रयागा.
शिष्या सख्यासि वदला वरविप्र 'या, गा.'
श्रीचित्रकूट वरि हा नग, मेरुसा हो;
हें नीटसें जरि मना न गमे, रुसा हो! २६
वृत्रारिचा[1] हि वरि हा निधना सहाय;
होतां म्हणे कृपण हानि धनास 'हाय!'
वृत्तांत होय सुजना भरता पवी तो;
थोडा मुला ज्वर महाभर तापवीतो. २७
तैशा जडेसि भगवज्जन[2] कां न गांजी?
त्यागी अभीष्टफळसज्जनकां[3] नगां जी.
तातक्रिया करि, परी त्यजि, तो अरण्या
जावूनियां, विनवि सत्करुणा शरण्या. २८
सांगे तया भरत मृत्युकथा पित्याची,
मोहे मुहूर्त शुचि बुद्धि तथापि त्याची.
ज्याचें सुरर्षि यश वर्णित हिंडतो या
विश्वांत, तो गुरुसि दे प्रभु पिंडतोया. २९
ज्यांच्या, तुरे चि किमपि प्रखराघ, वार्ते,
तीं श्रीपदें भरत वंदुनि, राघवातें
प्रार्थी; म्हणे, 'निजपुरा परतून, ये, बा!'
बोले प्रभु, 'त्यजुनि हें परतूं नये, बा! ३०

---

१. इंद्रमित्र दशरथ. २. रामभक्त भरत. ३. इच्छिल्या फलाचे श्रेष्ठ जनक अशा वृक्षां (कल्पवृक्षाना).

मीं सेवितों वन चतुर्दशमात्र वर्षें,
तों तूं करीं गुरुवरास्तव राज्य हर्षें.
कीं, तातवाक्यपरिपालनपुत्रधर्म
त्यागी न जो, वरि तया शुचि कीर्ति, शर्म.' ३१
तेथील जे अहितमारणकाम हर्षी,
त्यांचें न ते करिति वारण कां महर्षी?
वे पादुका अभय ही; परतोन वासा[1]
बाहेर आदरि, वसे पर तो नवासा. ३२
भेटोनि अत्रिस करी प्रभु वंदनातें.
तो हर्षवी, जनक ज्यापरि नंदनातें.
लावी सती प्रभुसतीस सुचंदनातें;
प्रेमें, तपें, अवनिचें[2] करि मंद नातें. ३३
तारी वधूनि विभु उग्रतरा विराधा,
विप्रांसि हें कथि, 'यशें, न भयें विरा, धा.'
देवूनि भेटि शरभंग, सुतीक्ष्ण वर्णी.
दे यासि खेद विषयी[3] मुनि मांडकर्णी. ३४
भ्राता अगस्त्य[4]मुनिचा करि आदरातें,
नाशी महर्षिहृदयांतिल ह्या दरातें.
दे वैष्णवें घटज सन्मुनि यासि शस्त्रें,
श्रीगाधिनंदन जसीं विजयार्थ अस्त्रें. ३५
भेटे जटायु, निजतातसखा, तयातें
दे सौख्य, जें हित, करूनि महादया, तें.
गोदावरी वरुनि पंचवटींत राहे.
श्रोत्यां कथा कथि, 'भवीं[5] अवटीं तरा' हे. ३६
तेथें दशास्यभगिनी, विधवा, रमाया

---

१. वसतीला. २. पृथ्वीचें (मातेचें). ३. स्त्रीलंपट. ४. इध्मवाह. ५. संसार-कूपामध्यें.

प्रार्थी, जया भजतसे विनयें रमा, या.
सौमित्रि दंड करि, खंडुनि नाक कान.
प्रेमें तदीय यश वर्णिल नाक कां न? ३७
तीचा खराख्य खळ माउसबंधु कोपे,
मानी मदांध जड तो प्रभुबाण सोपे.
मारी चतुर्दशसहस्रपलाशयुक्ता
त्या, लाजवि प्रभु यशें हिम, दुग्ध, मुक्ता. ३८
दावी निजा, कुमति शूर्पणखा, दशा; तें
स्त्रीरत्न वर्णुनि पलाशवरा शशातें,
तत्कोपकाम खवळूनि, वळें चि धाडी
श्रीरामकेसरिवरि, व्यसनांत पाडी. ३९
'श्रीसीं,' म्हणे खळ, 'सुखें न सदा रमो हा;'
मारीचहेममृग शीघ्र सदारमोहा[1]
योजी. तया निरखितां जनकात्मजा या
वांछी, वदे, 'द्रुत धरा,' नुमजोनि माया. ४०
लागे धनुर्धर रघूत्तम रंकुमार्गे,
भागे सुदूरगमनें, वधि त्यासि रागें;
गांगे[2] शरार्त हि, नरेश्वरसा चि, खोटा.
वागे मनीं भय, सती गणि घात मोटा. ४१
'लोभें,' म्हणे कवि हि, 'कां पतिघात लागे
पाठीस हा? व्यसनिं कां पति घातला गे!?'
श्री देवरा विनवि, 'बा! लघु पाव[3]. नातें
चिंतूनि, वांचिव चि जा रघुपा वनातें.' ४२
तीतें म्हणे कवि, 'न हें श्रुचि[4] राक्षसाचें;
आहे वनीं कुशळ तो रुचिराक्ष साचें.'

---

१. सीतारामाच्या जोडप्याला भुरळ पाडण्यासाठीं. २. ओरडे. ३. शीघ्र जाऊन पोंच. ४. असत्य, कपट.

सीता वदे, 'मदभिलाष तुझ्या मनांत;
आलासि यास्तव चि तूं कुजना! वनांत. ४३
जा, नीघ, नीघ, उटजीं कितवा! न राहें;
ऐसें कुकर्म न नरा हित, वानरा हें.
भार्या कशी उचित, जी तुज मायसी, ते?'
तों आपणास हि वदे, 'त्यज काय, सीते!' ४४
रामाकडे रडत तो धृततापं गेला.
सोडी तिला, खग जसा कलुषापगेला[1].
तों ये दशानन, बळें हरि एकलीला.
इच्छी गतायु[2] उरगीसह भेक लीला. ४५
मारी सती निजपतीस दिरास हाका.
'हा काळसा हरितसे पशु, यासि हाका.
हा! काय हो! त्यजिलि ती, सहजा दया जी?
या, जी! श्रितार्तिहर[3] तो हयमेधयाजी.' ४६
वाहे, रथीं, गगनमार्ग धरी पळाया;
तों गृध्रराज अडवी सहसा खळा या;
भंगूनि वाटवि सुरांसि परासु; नेला
स्वत्रास, दे श्वशुर हर्ष बरा सुनेला. ४७
धर्में न होय जय, तोडुनि पक्षतीतें
खड्गें, पळे हरुनि, कैतवदक्ष[4], तीतें.
श्री ऋष्यमूकगतवानरपंचकातें
पाहे, त्यजी स्वनग, वंचुनि[5] वंचकातें. ४८
पावे, विलंघुनि पयोनिधि, निष्कलंका-
लंकारमूर्तिस हरूनि, दशास्य, लंका.

---

१. गढूळ नदीला. २. आयुष्य संपत आलेला. ३. आश्रितांचें दुःख निवारण केल्यानें अश्वमेधाचें पुण्य लागतें, असा भावार्थ. ४. कपटपटु. ५. रावणाचा डोळा चुकवून.

ठेवी अशोकवनिकेंत, तिला विरोधी
   रोधी, म्हणे, 'स्वभजनीं च इची शिरो धी.' ४९
सौमित्रि साश्रु निजखेद वनांत सांगे.
   स्वामी म्हणे, 'कटु असें वदलीस कां गे!?'
धांवोनि ये, उटज केवळ शून्य पाहे,
   वाहे मनीं परम शोक, न ताप साहे. ५०
तीतें वनांत बहु, सानुज हा यशोधी,
   सुस्त्रैणसा म्हणत 'हा! बत! हाय!', शोधी.
तों गृध्र, तातसख, मूर्च्छित देखिला हो!
   रामें खरा जनकघात चि लेखिला हो! ५१
'नेली सती दशमुखें, मजला अधर्में
   पाडूनि,' हें कथुनि या चि असह्यकर्में
श्रीशासि तातसम देउनि शोक, सोडी
   तो प्राण; दाखवि यशीं प्रभु फार गोडी. ५२
दे पिंड, तोय, करुणार्णव तो तयातें;
   देणार हा द्रवुनि सत्पद तो[1]तयातें.
साचें करी हरुनियां [2]गुणपाश नातें.
   द्यायासि मुक्ति हुडकी कुणपाशनातें. ५३
ग्रासार्थ ने धरुनि यास न ने कबंध,
   स्तोत्रार्चना हरि तदीय अनेक बंध.
भिल्लीस दे स्वपद, [3]बाढ विमान. [4]काय
   स्तुत्यर्ह हा. इतर वाढवि मान काय? ५४
पाहे प्रसिद्ध सरसी अतिरम्य पंपा.
   पावे, स्मरोनि दयितेप्रति, राम कंपा.
'गेली' म्हणे, 'त्यजुनि, जेंवि घनासि शंपा.

---

१. लबाडाला सुद्धां. २. सत्त्वरजादि त्रिगुणांचा नाश. ३. मजबूत, चांगलें. ४. देह. ५. वीज.

माज्या असूंसि म्हणतो [१]कुसुमेषु 'संपा.' ' ५५
सौमित्रिच्या बहुत दे प्रभु मान बोधा,
जातां कबंधवचनें प्रियदारशोधा.
भेटे मरुत्तनय भूसुरवेष, कार्या,
वृत्ता पुसे, सुगळ भेटवि [२]साधु [३]आर्यां. ५६
झाला सुकंठसख राघव; हृष्ट [४]पूषा;
[५]दावी प्रभूसि सुगळ प्रभुदारभूषा.
जो त्यासि, तत्प्रियतमेसि हरुनि, [५]वाळी,
तो मारिला प्रभुवरें [६]हरिपुत्र वाळी. ५७
दे रामभद्र कपिराज्य तथा नतातें;
केली तसी प्रियसुतीं हि दया न तातें.
कीं, हा समस्त हि सुरासुर खेळवीतो,
याच्या प्रिया अमित वानर मेळवी [७]तो. ५८
गेले सुकंठवचनें, श्रमले हि, योध.
श्रीचा कळे निपुण वायुसुतासि शोध.
तो धन्य सागर उडे, वधि सिंहिकेला;
जिंकूनि त्या हि सुरसेप्रति, पार गेला. ५९
लंकेसि जिंकुनि, पुरी हुडकूनि, रात्री
पाहे अशोकवनिकेंत विशुद्धगात्री.
तों ये दशानन, वदे, 'वश हो मला गे!
'हूं' मात्र बोल, न सुलभ न होम लागे.' ६०
सीता वदे, 'निशिचरा! निरया चपापें.
रे! ताप, शाप, कुदशा चिर या च पापें.
होसील भस्म सकुळ प्रभुसायकांहीं.

---

१. मदनबाण. २. कपि–पंत. ३. रामास–पंत. ४. स्वपुत्र सुग्रीव व स्वकुलोत्पन्न राम यांची मैत्री जुळली म्हणून सूर्यास आनंद झाला. ५. हाकलून लावी. ६. इंद्रपुत्र. ७. सुग्रीव–पंत.

ज्याघ्रा दिली गिळिल ओतुं[1] न साय काहीं.' ६१
पाण्यापरीस करि पातळ पामरा या,
चिंती मनीं जनकजा मग रामराया.
कोपे, म्हणे खळ, 'बरें न वदोन मास
देसील, जीवित जडे! तव दोन मास.' ६२
जातां दशास्य, गुण[2] घे, उकलूनि वेणी,
उद्वंधनार्थ[3] महिजा. 'खचरी न, सेणी
या पेटल्या; अदय हा वृक; मी हि एणी;
व्हावी' म्हणे तनु न सासु तयास फेणी.[4]' ६३
वर्णी मरुत्तनय शक्तिदयासमुद्रा,
तो दे नमूनि तिस ध्रुत्युदयास मुद्रा.
आनंदवी, कुशळ, उद्यमवृत्त[5], सांगे.
'नेतों' म्हणे, 'सति! वृथा श्रमतीस कां गे!!' ६४
सीता म्हणे, 'मज अयोग्य पळोनि जाणें;
जावें वधूनि खळ, हें उचित स्व जाणें.'
प्रार्थी तिच्या स्तवुनि मारुतभू सुतेज्या,
'दे वस्तु, पाहुनि निवे प्रभु भूसुते! ज्या.' ६५
चूडामणि क्षितिसुता प्लवगासि अर्पी,
आशीःसुधासुरस वर्षुनि फार तर्पी.
मोडी वरोपवनवृक्ष, अरीस झोडी;
थोडी करी परचमू, जय भव्य जोडी. ६६
क्रोधें करूनि रण दारुण, अक्ष मेला;
याच्या सुरर्षि बहु वर्णिति अक्षमेला[6].
जो प्रेषिला जलदनाद[7] हि अक्षतातें[8],

१. मार्जार-बोका. २. दोरी. ३. गळफांसासाठीं. ४. भक्ष्यपदार्थविशेष. ५. सीताशोधार्थ केलेल्या प्रयत्नांची हकीकत. ६. असहनशीलतेला. ७. मेघनाद-इंद्रजित. ८. रावणानें.

आह्में निबद्ध करि तो अरि अक्षतातें.[1] ६७
बांधोनि घे कपि बळें कुतुकें चि, अस्त्रें
बाधों नयेत चि, वरें जरि सर्व शस्त्रें.
नेला सभेप्रति; वरूनि पराभवाला
गेला; गमे अजितदास बरा भवाला. ६८
अस्त्रादिकां, धरुनि आळस, मान दे हा.
या जाचिती सुजड[2] काळसमान देहा.
'तूं कोण? कां उपवनद्रुमभंग? राया
कां मर्कटा! न भिसि, मांडुनि संगरा या?' ६९
बोले मरुत्तनय, "मी रघुवीर दास.
जैसा मयूर खग चातक नीरदास,
तैसा सदा भजतसें. मज वातजा तें
तत्कार्य कार्य, कवि जोडिति हात ज्यातें. ७०
ज्याचा कृती अनुज शूर्पणखेसि दंडी;
जो आपण प्रभु रणीं खरशीर्ष खंडी;
एकें चि जो स्वविशिखें निवटूनि वाळी,
देऊनि राज्य, सुगळा स्वसख्यासि पाळी. ७१
नेली तदीय दयिता, मरणार्थ, चोरें,
न्यावें भुलोनि उरगीप्रति जेंवि पोरें.
शोधास पाठवि सुकंठ मला हि दूता,
ती देखिली तव अशोकवनांत पूता. ७२
त्वां आणिली कसि सती दशकंधरा! हे?
श्रीचा, अशा न अनयें, तिळ गंध, राहे.
जो भाग्यमत्त, जड, तो जन अंधसा, हें
त्यातें म्हणे व्यसन, 'दुःसह बंध साहें.' ७३
रामप्रताप न कसा तुज ठावका गा!

---

१. जखमी न झालेल्या मारुतीला. २. महामूर्ख.

हंसापुढें न विजयप्रद ठाव कागा.
साध्वीस, वंदुनि, समर्पुनि रामराया,
वांच. स्वयें सजसि सान्वय[1] कां मराया? ७४
भेटावया तुज समर्थ उपाय नाहीं,
वृक्षाक्षसैन्यलय या चि उपायनाहीं[2]
आलों; पुढें हि रडसील असा वधानें,
त्वां नाशिजेल कुळ, राज्य, असावधानें." ७५
इत्यादि मारुति वदे हित सत्य यातें,
वारावया अपयशासह अत्ययातें.
सोसी न भाषण तसें उरवाळ[3] हा तें.
घे तद्वधार्थ, कुमती, करवाळ हातें. ७६
ज्ञाता बिभीषण सुधी न अनर्थ साहे;
बंधूसि तो विनवि, 'दूत अवध्य आहे.'
होतें हि आयु अवशिष्ट म्हणोनि राहे.
तत्पुच्छदाह चि बरा मग दंड पाहे[4]. ७७
तैलार्द्रनैकपटवेष्टित अग्रपुच्छ
क्रोधें प्रदीप्त करि, मानुनि त्यास तुच्छ.
सांगे, 'पुरींत फिरवा चिर वानरा, जा,'
हें राक्षसांप्रति, धरी परवा न राजा. ७८
तो कौतुकी कपि सुटे, न धरूनि शंका.
जाळी, न लंघुनि बिभीषणहर्म्य, लंका.
मानी न त्या दशमुखा, नृप जेंवि रंका.
सिंधूंत पुच्छ विझवी, उडवूनि अंकों[5]. ७९
सीतेसि वंदुनि, पुसोनि, पुन्हां उडाला,
भेटे प्रभुप्रति, पिपीलिकसा गुडाला,

१. कुलासह. २. नजराण्यासह. ३. हलका, दांडगा. ४. [त्याला] वाटला. ५. [जाळल्याच्या] खुणेला.

चूडामणी, धरुनियां चिर पाय, दे हा.
  आलिंगनें निववि तो निरपाय देहा. ८०
त्यातें म्हणे, 'हरिति मानसखेद वार्ता.
  झालासि या अमृतमेघ सखे ! दवार्ता.
द्याया नसे उचित अर्थ तुला, अगा ! घा,
  बा ! सन्मुखें पिवुनि या स्वयशा अगाधा.' ८१
वर्णी असें बहुत राघव सेवकास,
  ज्याची भयांत धरिती मुनि, देव, कास.
मार्ग स्वशत्रुमत सर्व पुसोनि घेतें;
  द्विट्तेज घे बळ; कु[1]यातु पुसों निघे तें. ८२
पावे बळार्णव नदीपतिच्या तटातें.
  तो त्यासि कांपवि सदश्व जसा तटातें.
धिक्कारिला दशमुखें कथि जो हितातें.
  त्या, वाटला रिपु बिभीषण, मोहितातें. ८३
आला बिभीषण सुधी शरण प्रभूतें,
  वंदी धरूनि विनयें चरण प्रभूतें.
होय प्रसन्न बहु, तो शि[2]वानिष्क लंका,
  संपत्ति दे, सुचिर कीर्ति हि निष्कलंका. ८४
काळासि कंप नि[3]जनामगवर्णवातें
  दे, तो न देथिल कसा प्रभु अर्णवातें ?
सिंधूंत सेतु बरवा करवी, रसाचें
  श्रीच्या मनोज्ञ पद, तें कै[4]रवीर साचें. ८५
श्रीसेतु लांब शत तो, दश रुंद गावें,
  हें दे सुखें गजमुखा, यश, तुंद गा[5]वें,
पारासि पावुनि, धृताहितदूत सोडी.

---

१. रावण–पंत. २. शंकराच्या गळ्यांतील ताईत (राम). ३. आपल्या नांवांतील एकाच्या अक्षराच्या वाऱ्यानें सुद्धां. ४. करवीरक्षेत्र. ५. म्हणूनि–पंत.

मोडी न नीति, जय यास्तव हात जोडी. ८६
श्रीराममस्तकधनुष्य सतीस दावी,
सोडावया विपुळ अश्रु दशास्य लावी.
शोका बिभीषणवधू सरमा शमाया,
'माया' असें कळवि, मानस न भ्रमाया. ८७
वेघे सुवेळशिखरीं कपिराजयुक्त
श्रीराम, ज्या स्मरुनि वारण[1] होय मुक्त.
लंका सुवर्णमय, अद्भुतदुर्ग, पाहे,
दूरूनि शत्रुस हि न प्लवगेंद्र[2] साहे. ८८
तत्काळ तो गरुडसा चि उडोनि, शंका
सोडूनि, गांठुनि पळांत चि मूर्तपंका
त्या रावणा, करुनि धिक्कृति फार ताडी.
पाडी तळीं मुकुट. त्यास हि गर्व झाडी. ८९
आला फिरोनि कपिनायक, त्यासि राम,
प्रार्थी, 'न साहस, करीं सदुपाय साम.
सामर्थ्य पूर्ण असतां हि, कधीं, नयाचा,
न त्यागिती पथ, सुकीर्ति अधीन याचा.' ९०
श्रीराम दूतपण दे परभंगदातें,
सामार्थ पाठवि अरिप्रति अंगदातें.
त्या ऐकवी प्रभुवरोक्तमहानिरोपा,
ज्याच्या, सदैव सुकरा रिपुहानि, रोपा. ९१
'द्यावी यशें[3] समवेनें जनका, क्षमेला,
त्वां प्रीति. साग्रज मदें कनकाक्ष[4] मेला.
दे मत्प्रिया, परिस साम, रहा, निकाम[5]

१. गजेंद्र. २. सुग्रीव. ३. [सीतेच्या] रक्षणानें मिळणाऱ्या यशानें. ४. हिरण्याक्ष—पंत. ५. अगदीं.

त्यागूत भूमिसुर सामर हानिकामें[1]. ९२
माझी सवेल शर चापलता, पवीतें
द्यायासि लाज, [2]खर चापल [2]तापवीतें.
मेले चतुर्दशसहस्र खरादि, वाळी तो ही;
घडेल चि शिवांसि खरा दिवाळी. ९३
दे जानकी, शरण ये मज, जोड पाणी,
कीं राज्यजीवितकुळांप्रति सोड पाणी.
लोकेश्वरांसि भज तूं, अभयार्थ जा गा.
जागा मिळेल न जगीं तुज, हो चि जागा!' ९४
इत्यादि ऐकुनि वदे दशकंठ रागें,
'मीं रक्तभुक् कपिनरांसि भिवूनि मागें
देतों कसा? भिववला हरि काय नागें?
टाकूनि बोलसि जडा! मरसील आगें. ९५
आला पदच्युत वना, त्यजिला हि तातें,
त्या [3]आत्मतातरिपुच्या जपसी हितातें.
मातेसि भोगित असे चुलता; चपापें
मूढा! सभेंत, बुध या उलता च पापें.' ९६
कोपोनि अंगद वदे, 'खळदंडकर्ता,
राजेंद्र राम शरणागतदुःखहर्ता.
तो निंदितोसि जरि नेणुनि तत्व, भर्ता,
तूं पावसील चि जडा! [4]व्यसनोग्रगर्ता.' ९७
क्षोभोनि रावण वदे, 'नरवानरांनीं
कीजे सुकातरभयां न, रवा न, रानीं.

१. रावणवधाची इच्छा. (येथें मूळांत "सामरहानि काम" अशीं पदें नजरचुकीनें दाखविलीं गेलीं आहेत, असें वाटतें). २. नीटसा अर्थ लागत नाहीं. ३. अंगदपिता वाळी. ४. संकटरूपी भयंकर खळग्याला. ५. जो अत्यंत भित्रा आहे अशाला हि भय वाटण्याजोगें.

खद्योत तूं कृपण, मीं प्रभु अर्क, टाकीं
दुर्वाक्य हें, हरिल जीवित मर्कटा! कीं.' ९८
तत्तेज वाळिसुत नेत्रयुगें तदा पी,
दापी, म्हणे, 'न जगसील जडा! कदापी.
चोरा! तुला वधिन मीं, प्रभु राम राहो.
कां माजलासि बहु? सावध पामरा! हो.' ९९
सांगे दशास्य, 'वचका न, धरा चि; राहो
न क्रूर हा; [1]न रदनीं अधरा चिरा [1]हो.'
तों झोंबले खचर दुर्मति च्यार यातें.
दावी उडोनि खग[2]भूपतिच्या [2]रयातें. १००
नेवूनि दूर गगनीं, कपि बाहु झाडी.
ते भूतळीं अहित च्यार हि तूर्ण पाडी.
पक्कें फळें गुरुशिळेवरि तेंवि ताडी.
काळाकडे प्रथम अक्ष तसे चि धाडी. १०१
'प्रासाद भंगुनि, निशाचर च्यार भारी
मारी;' कथि प्रभुसि तो पटु कारभारी.
स्वामी, स्वयें न वरि जो अरि साम, यातें
दे दंड; वैद्य रस ज्यापरि साम[3]यातें. १०२
आरंभिला समर त्या खळ यातुपानें;
रामप्रतापदहना बळ या तुपानें.
दे पाठ वज्रधर, सोडुनि संगरा, ज्या,
त्या, प्राप्त होय विभुपासुनि भंग, राज्या. १०३
वीर प्रहस्त समरीं भय दे, वसेना
ज्याच्यापुढें, नच वरी जय, देवसेना.
तो यातुसैन्यपति, [4]आहवदक्ष, मेला;

१. नुसते दांतओंठ खावूं नका, असा भावार्थ. २. गरुडाच्या वेगातें. ३. रोग्याला. ४. आहव=युद्ध.

गेला चि सोडुनि असह्य गद क्षमेला. १०४
रक्तापगा स्वकटका हि न वाहवाया
संकोचल्या. स्तवि सुरर्षि नवाहवा या.
वारी भय स्व विभुसायक बंधनाचें,
हा हर्ष सूचविति काय कबंध नाचें? १०५
लीलामनुष्य, [1]परिपूरितनागपाश,
श्रीनाथ सानुज; तयाप्रति नागपाश
योजूनि बद्ध करि रावणि काळ. जाला
वाटे चि, भूमिजनिच्या व्रण काळजाला. १०६
श्री पुष्पकांत बसवी दशकंठ, धाडी;
दृष्टीस मूर्छित सलक्ष्मण राम पाडी.
ती 'हा!' वदे, निरखितां चि तसी अवस्था;
वाळे पळांत बहु, जेंवि लता [2]दवस्था. १०७
दे धैर्य, तत्व कथुनि, त्रिजटा, कवीतें
वाटे श्रुती च, [3]तम जें निज, टाकवी तें.
ये तार्क्ष्य, नाग पळवी, जिववि प्रभूतें
प्रेमें, पित्यापरि गमे, निववि प्रभूतें. १०८
कोपोनि दाशरथि मारिति वीर कोटी.
पाहे दशानन रणीं बळहानि मोटी.
काळाननीं प्रभु घटश्रुतिला हि लोटी.
वार्ता गमे क्षण तया जडधीस खोटी. १०९
जे कुंभकर्णसुत कुंभ निकुंभ भारी,
तत्पुत्र ही, सुरनरांतक, शस्त्रधारी;
तैसा चि उग्र परम त्रिशिरा हि; सारी
तज्जीवित प्रभु, रणीं [4]अतिकाय मारी. ११०

---

१. परिपूर्ण केली आहे नागप (गजेंद्र) याची इच्छा ज्यानें. २. वणव्यांत सांपडलेली. ३. अज्ञान. ४. रावणपुत्र.

ब्रह्मास्त्र योजुनि पुन्हां घननाद ताडी;
शस्त्रवर्जें प्रभुसमेत समस्त पाडी
जे, मारुती उठवि. ओषधिशृंग आणी,
पावूनि ये, नुतिस लावि कवींद्रवाणी. १११
मायामयी जनकजा निवटूनि मोही
जो, हीनशक्ति पविपाणि जयासि, तो ही
सौमित्रिनें खपविला, स्मर जेंवि भर्गें.
स्वर्गें तसें चि वारिलें सुख साधुवर्गें. ११२
शोकार्त रावण महीतनयावधाला,
गेला, पिवूनि मुनिशोणित जो न धाला[1].
झाली, पुढें असिधरा सहसा[2], पहाती,
सीता सती, वदलि पावुनि ताप 'हा!' ती. ११३
त्यातें सुपार्श्व सचिवोत्तम साधु वारी.
रामात्ययासि बळ पाठवि फार भारी.
तें राम, सिंधुजळ कुंभज तेंवि, सारी.
कीं त्र्यंबकप्रभु जसें जग सर्व मारी. ११४
घोर स्वयें कटक घेवुनियां निघाला,
घालावया प्रभुवरावारि, शत्रु, घाला.
तों शक्ति लक्ष्मणवधार्थ उरीं शहाणी[3]
हाणी. करी कविसभामहिता कहाणी. ११५
भंगी रघूत्तम अरिप्रति; शक्ति काढी.
मूर्छा त्यजी न विभुच्या अनुज्यासि गाढी.
आणी पुन्हां त्वरित ओषधिशैलशृंग,
श्रीरामचंद्रचरणांबुजमत्तभृंग. ११६
सौमित्रि निर्व्रण उठे घडतां चि नस्य,

---

१. येथें कवीच्या हातून नजरचुकीनें 'व धाला' असें पडलें आहे. २. एकाएकी.
३. अचूक भिडणारी (?). ४. पृ० ३८७, टी० १० पहा.

श्रीयुक्त, जेंवि मिळतां शुभवर्ष सस्य.
झाले मरोन [1]गतिभाजन कोटि, काया
न प्रेक्षिती; म्हणति, 'आयु नको टिकाया.' ११७
मेलीं असंख्य कपिराक्षसवीरसैन्यें;
न स्पर्शिलें पळ हि तन्मन लेश दैन्यें.
श्रीरामरावणकृता अतुळा [2]महाजी,
'हा!' [3]जीव [3]काव्य वदले, असि दुःसहा जी. ११८
निर्जीव देह पडले बहु राक्षसांचे,
[4]सांचे सखे. रुधिरकर्दम [5]फार सांचे.
केलें महेंद्ररिपुच्या अतियुद्ध तातें,
दे त्या जनापरिस, त्यास हि, शुद्धता तें. ११९
ज्याच्या महाशरघनें हरि लक्ष मेला,
भासे सुरां भसित हा करिल क्षमेला.
तो कां सुरांसि दशकंधर कांपवीना?
ते घेति देखुनि, जसे अहि, कांप, वीना. १२०
शक्रप्रियास्तव तदीयरथीं चढून,
क्रोधें [6]दशास्यमहिमार्थ मनीं कढून,
गाया सुरांप्रति मृदंग नवे मढून,
श्रीराम दावि बळ मेळविलें पढून. १२१
तें युद्ध सप्तदिनरात्रि, जया न जोडा;
देवर्षि [7]तों म्हणति, 'या प्रभुजी! न सोडा.
होईल मस्तक नवें किति? तूर्ण तोडा;
ब्रह्मास्त्र योजुनि शरें अहितोर फोडा.' १२२
लंका म्हणे, 'पति नको [8]विदरा मला जो,'

---

१. येथें 'गतिभाजग' असा हस्तदोष झाला आहे. २. महायुद्ध. ३. बृहस्पति व शुक्र. ४. काष्ठादिकांचे-**पंत**. ५. पलल-**पंत**. ६. रावणाची च कीर्ति वाढावी म्हणून. ७. वसिष्ठगाधिजांपाशीं-**पंत**. ८. विद्रूप.

'त्या मारितां प्रभु न कोविद राम लाजो.'
ऐसें सुरर्षि वदले परिसोनि, याचें
पाडी शरीर, दिन तें करि सोनियाचें. १२३
फार प्रभूत्तमशरें समरीं गळाले;
तच्छेष जे स्वपतिच्या पतनीं पळाले,
ते क्रव्यभुक् खपविले कपिसत्तमानीं,
'हा!' नीतिला म्हणविते वरमत्त मानी. १२४
झाली प्रभूत्तमशिरीं सुरपुष्पवृष्टि.
कोंदे सुखें, प्रभुयशें, बहु सर्व सृष्टि.
गंधर्ववृंद करि सुस्वरगायनातें.
कोण्ही पुसे चि न तई [1]स्वरगायनातें. १२५
भेरीशतध्वनि, जयस्तवनाद, दाटे.
[2]भेरी सुरर्षिकपिसंहति सत्य वाटे.
हेरी सुखार्थ शिवसद्गुणमंदिरातें
हे रीति दावि भजता खग चंदि[3]रातें. १२६
नाचोनि गाति यश भक्तिपराप्सरा तें,
त्या पावल्या सुतृषिता चि व[4]राप्सरातें.
स्वच्छें, जसी सतत भा वदना, रदानें,
तैसी यशा [5]सरसभावद नारदानें. १२७
प्रेरूनि सज्जन बिभीषण रामराज्या,
संस्कारवी, सुकृत लेश न पामरा ज्या.
'माझा हि रावण, जसा चि तुझा' वदे, हें
सार्थक्य केंवि वरिजेल तया न देहें? १२८
दे राज्य लक्ष्मणकरें विधिनें नतातें,
केला कृतार्थ न असा विधिनें, न तातें;

---

१. कल्पवृक्ष कोठें आहेत म्हणून. २. वहिरी. ३. चंद्राला. ४. चांगल्या पाण्याच्या सरोवराला. ५. सप्रेमभक्तिप्रवर्तक—पंत.

सीतेकडे अजित पाठवि मारुतीतें,
तो ऐकवी जयकथामृत चारु[1] तीतें. १२९
सीता म्हणे, 'जयकथा चि सुधानद्या या.
आशीविना उचित वस्तु बुधा! न द्याया.'
प्रार्थी कृती "मुदित, पाहुनि पावलातें,
मीं फार; हें हृदयिं राहुनि, पावलां तें. १३०
देतीस देवि! तरि तूं वर एक दे, हा
होईल या अमृतसद्रससेकें[2] देहा.
मीं राक्षसी वधिन, या वद, 'मार जा च'
केला असे सति! इहीं तुज फार जाच." १३१
सीता म्हणे, 'पनवजा! न वधीं च दीना.
या किंकरी परवशा मतिशक्तिहीना.
जो यांसि जाच सिकवी परमापराधी,
तो मारिला. तव असो चि दयापरा धी.' १३२
श्रीरीतिनें पवनपुत्र सुधी निवाला.
हे सूक्ति यासि, जसि विष्णुपदी शिवाला.
'शीळें तुझ्या, प्रकृति देवि! विरो पैयाची[3],'
ऐसें स्तवूनि तिस साधु निरोप याची. १३३
देवी वदे, 'प्रभुसि सांग, मला उशीरं[4]
हो पादरेणु; हित कां गमला उशीर?
सोडू अदर्शनज सत्वर ताप हा या.
दृष्टीस; हे तृषित सत्वरता पहाया.' १३४
ऐके मरुत्सुतमुखें हरि हा, निरोपा;
ज्याच्या, सदैव सुकरा अरिहानि, रोपा[5].
लंकेश्वरा कथि, म्हणे, 'द्रुत आणवा हे.'
ती प्रत्ययार्थ करि दिव्य, न आण वाहे. १३५

---

१. गोडगोड. २. सिंचन. ३. अमृताची. ४. वाळा. ५. बाणाला.

भक्तांसि, घेउनि नतिस्तुति, देव राजी;
राजीवनेत्र दयिता तिस दे वरा, जी
वर्णी तया हि पितृपुत्रसमागमातें;
'मातें' म्हणे कविस जो 'गाति माग, मातें.' १३६
देवांशज प्लवग, ऋक्ष, सुरारिजेते,
मेले, निशाचर वधूनि रणांत जे, ते
देवेश्वरें उठविले अमृतांबुवर्षें.
या सद्यशा मुनि महा कवि गाति हर्षें. १३७
प्रार्थी बिभीषण हि भद्रसभाजनातें
घ्याया, तया अजित सद्रसभाजनातें
सांगे, 'जया विरह भूभर तावि, नातें
ही दे, नको, म्हणसि जें भरताविना, तें. १३८
पूजीं सुकंठसह वानर, ऋक्ष; बा! हें
मद्योग्य, मीं परमपूजित यांत आहें.
तो भेटिव त्वरित, साधु सभाजनातें
दे हर्ष; या चि कार्रि भव्य सभाजनातें. १३९
तैसें चि तो करुनि पुष्पक दे, वहाया.
प्रेमें अधिष्ठुनि रमायुत देव हा या,
त्या कीशराक्षसपतींसह सत्यसंध
स्वामी निघे, तुरवुनि स्वजनार्तिगंध. १४०
श्रीचें, लवों तिळ हि दे चि न सेतु, पातें.
कीं, जें गुरुत्व अमृतासि नसे, तुपा तें.
विद्वत्सभा, श्रुति तसी, परमारणाची.
सेवी कथा, प्रभुमुखें परमा रणाची. १४१
सीता, जऱ्ही विरहदुःखकथा, तथापि,

---

१. सुखें मत्त हो—पंत. २. जो दशरथरामसमागम—पंत. ३. कल्याणप्रद आदरातिथ्याला. ४. प्रेमभक्तिपात्रास—पंत. ५. शत्रुवधाची.

प्रेमें, प्रियें कळविल्या, त्यजुनि व्यथा, पी.
सुग्रीवसख्य कथि वालिविनाशकर्म;
श्रीराम दे प्रचुर भूमिसुतेसि शर्म. १४२
श्री आणवी, विनउनि [1]प्रवरावतारा,
तारावया कुसुमयानवरांत तारा.
दावी स्थळ प्रथम मारुतिसंगमाचें,
जें भाग्य मूर्त सकळस्थिरजंगमाचें. १४३
पंपेसि दाखवि, म्हणे रघुवीर, 'कांते!
म्यां या स्थळीं, [2]देशननिर्जितहीरकांते!
केला विलाप. तव सन्मति, दीर, देहा
रक्षी, पुसूनि नयनें, बहु धीर दे, हा.' १४४
दावी मतंगमुनिच्या परमाश्रमातें
स्वामी, उरीं तिळ हि दे न रमाश्रमातें.
तारी सुधा हि न [3]गेदी; शबरीकबंध
[4]त्राता हरी च जगदीश [5]बरीक बंध. १४५
श्रीजानकीस जगदीश्वर राम गोदा
तो दाखवूनि बहु दे तिस हि प्रमोदा.
दावी निजा बरवि पचवटींत [6]शाळा;
बाळा हि जी म्हणति 'कीर्तिगतींस भाळा.' १४६
दे, गृध्रतातगति सांगुनि, हर्ष तीतें,
शोकाश्रु, तद्वट विलोकुनि, वर्षतीतें.
कुंभोद्भवात्रिशरभंगसुतीक्ष्ण यांचे
दावी सदाश्रम, जयांत न मोह वांचे. १४७
श्रीचित्रकूटनगपा मग पाहवी तो,
जो कीर्तिनें दुरित सर्व हि वाहवीतो.

---

१. श्रेष्ठ अवतार ज्याचा त्या रामाला. २. जिच्या दांतानीं जिंकिली आहे हिऱ्याची कांति अशा सीते! ३. रोगी. ४. निवारी—पंत. ५. मात्र. ६. पर्णशाळा.

भेटे प्र[1]यागगततातसखा मुनीतें,
त्यातें निवोनि निववी स्वयशें पुनीतें. १४८

तेथूनि, जो पवनपुत्र, महाबळा या,
प्रेषी निजागम गुहा, भरता, कळाया.

देते चि, लोभ धरिता तरि, संपदा ते.
कीं जीविता हि म्हणतात चि 'संप' दाते. १४९

'झालों प्रसन्न तुज मीं. वर माग रामा!'
ऐसें मु[1]नीश्वर वदे परिपूर्णकामा.

त्याच्या पदासि विनयें वरदेश लागे,
कीशप्रियार्थ फळपुष्पसमृद्धि मागे. १५०

भेटोनियां गुहसखा मग धन्य केला;
दे कीर्ति हे प्रियसखी पं[2]दकन्यकेला.

हें, आर्द्र, सद्यश, करी शुचि, वाचकोरा;
मो[3]रां घनीं अणु, भँ[4]वीं रुचि वा चकोरा. १५१

सीतावरा भरत, चातक तोयदास,
प्रेक्षूनि तो परम हर्षित होय दास.

शत्रुघ्न सर्व जन सत्सद यास मोर.
येतां बळें उतावि वत्स द[5]यां समोर. १५२

आलिंगिला भरत सानुज जेंवि तातें,
हुंगी शिरीं हि विभु तो, करि जें विता तें.

प्रेमें नमी, गुरुसमप्रभ जे नमावे,
आनंद सर्व हृदयांसि भजे, न मावे. १५३

ब्रह्मादि सर्व करिती सुर पुष्पवृष्टी,
कोंदे सुखें विविधवाद्यरवें हि सृष्टी.

---

१. प्रयागास राहणारा भरद्वाज. २. गंगेला. ३. श्रीरामयशीं वाचका बहु—**पंत.**
४. [चंद्राच्या] उदयकाळीं. ५. वत्स समोर येतां मातेच्या दयेतें ऊत आणितो—**पंत.**

दे सानुजा ससचिवा भरतास वेश[1],
स्वाश्रांसि गाति यश तें विधि वासवेश. १५४
केले सुपात्र कपि, राक्षस, गौरवा हे,
पाहोनि मुन्नदशतीं[2] बहु पौर वाहे.
सर्वांसि सानुज म्हणे प्रभु वेषधारी
'घा रीतिनें' करि सुधाकरकांति धारी[3]. १५५
साकेत जें पुर तया रघुवीर, देहा
प्राण प्रवेशुनि तसें, महित्त्व[4] दे हा.
होय प्रजार्थ नृपसा, नसतां पदेहा[5].
राज्यांत या न कुतरें हि कधीं वदे 'हा!' १५६
जे दुर्लभ त्रिभुवनीं हि, तसे वित्यांचे[6]
न प्रेक्षिले कविजनें हित सेवित्याचे,
ते सद्गुण प्रकटुनीं, निववि प्रजांतें;
गाती सदा, वरुनियां, शिव विप्र ज्यांतें[7]. १५७
शत्रुघ्न मारुनि रणीं लवणासुरातें,
तो भूमिच्या सुख न दे कवणा सुरांतें?
ज्यांच्या भया कुशळ ही जन लोटिती न,
गंधर्व ते भरत संहारि कोटि तीन. १५८
केले बिभीषण मरुत्सुत भक्त धन्य;
स्थापूनि जों स्वयश सद्गुणवृंदजन्य,
जे पौर, जानपद, जे पशु, जीव अन्य,
श्रीशें पदीं बसविले, मुनि तेंवि वन्य. १५९

(शार्दूलविक्रीडितवृत्त)

श्रीरामायण वाहिलें प्रभुपदीं 'सद्भक्तसर्वस्व' हें;
प्रेमें गातिल साधु, तारितिल या दासा मयूरा महें;

---

१. वस्त्रें, पोषाख. २. आनंदरूपीं शेंकडों नदांमध्यें. ३. हलकी. ४. पूज्यत्व ५. राजपदेच्छा. ६. मातापित्यांचे. ७. ब्राह्मणाला.

त्यांचा मीं उपकार फेडुनि कसा उत्तीर्ण होवूं वरें?
श्रीरामें परि दीन हीन हित जे, ते धन्य केले वरें. १६०

इति श्रीरामनंदनमयूरविरचितं सद्भक्तसर्वस्वरामायणं संपूर्णं ।

# प्रहर्षणरामायण

(प्रहर्षणी)

श्रीभर्ता सुरमुनिहृद्व्यथा हराया, ब्रह्मोक्तें यश बरवें जगीं कराया,
स्वीकारी दशरथपुत्रता, तराया जीवांतें, कविमत मुक्तितें वराया. १
कौसल्यासुत जगदीश रामनामा, कैकेयीसुत भरताख्य भव्यधामा,
शक्राच्या[1] सुत तिसरा महात्मु[2] मित्रा झाला, त्या प्रसवलि लक्ष्मणा सुमित्रा.
शत्रुघ्न क्षितिपतिभूचतुर्थअंश श्रीशाचा कारि कविगेय सूर्यवंश.
आचार्यप्रवरवसिष्ठ वेद दे हा अभ्यासीं तिळ हि न होय खेद देहा. ३
श्रीरामें वधुनि कुबुद्धि ताटकेला निर्विघ्न प्रथम चि यज्ञवाट केला.
जी चिंती 'करु जगदीश धौत मातें' ती शुद्धा[3] दिधलि करूनि गौतमातें. ४
श्री व्हाया प्रमुदितबुद्धि, आपणातें पावाया, प्रभु कारि पूर्ण हा पणातें.
घाली ती स्वपतिगळां निवोनि माळा, दे राजा जनक तिघां तिघी स्वबाळा.
आराधी बहु जमदग्निपुत्र शर्वा, कोदंड श्रुति मग मेळवूनि सर्वा,
निःक्षत्रा क्षिति असकृत् करूनि गर्वा जो पावे, प्रभु कारि तत्प्रासिद्धि खर्वा[4]. ६
तातांचें हित कारि, सत्यधर्म रक्षी, राज्यश्री जरि अमरेप्सिता न लक्षी;
बंधुस्त्रीसह वन सेवि जेंवि पक्षी, घे वल्कें रचुनि जटांसि, वन्य भक्षी. ७
शोकार्त क्षितिपति तात देह सोडी, सद्भ्राता भरत वराहें हात जोडी,
त्या आज्ञा कारि, करवि प्रजावनातें, तो सेवी प्रियकर विप्र ज्या वना तें. ८
वंदी तो प्रभु घटभू सुतीक्ष्ण अत्री, पूजी त्या पितृसख जो जटायु पत्री,
गंगालि त्रिभुवनगीतकीर्ति गोदा, तत्तीरा वसवुनि देति सं[5]प्रमोदा. ९

१. दशरथाला. २. महात्मा. ३. शुद्ध. ४. अल्प. ५. सुप्रमोदा (?).

तेथें ये दशवदनस्वसा वराया, तन्नासा श्रुति हारि दुर्दशा कराया;
कैवारी कुमति तिचा खर क्षयातें नेला, कीं मुनि म्हणती 'न रक्ष यातें.' १०
ती दावी कुमति निजा दशा, न नातें साहों दे अयश तया दशाननातें.
मारीच्या करुनि सुवर्णरंकु धाडी, श्रीच्या ही भ्रम नयनास दुष्ट पाडी. ११
ती कांता कथि 'रुचिरा मृगा धरा या'; त्यामार्गे प्रभुवर लागला धराया;
श्रीराम प्रखरशरें तदायु सारी, 'हा सीते!' असि मरणीं हि हाक मारी. १२
रक्षाया स्वपतिस लक्ष्मणास जाया सांगे ती, कवि कथि 'हे पलाशमाया';
रागेजे, कटु भलतें वदे, न साहे, राहे तो शुचि उटजीं न, ताप वाहे. १३
तों आला दशमुख तो सहास, तीतें दे त्रास, त्वरित हरी महासतीतें.
तद्रंगें सुमह[1] जटायु दे सुनेतें, तत्तेज स्तविति महाकवी जुने तें. १४
खंडी तो असिधर गृध्रपक्षतीतें, ने रक्षोधम कपटैकदक्ष तीतें.
कीशांच्या त्याजि नग भव्य ऋष्यमूकीं वृंदीं श्री खळें[2]दशकंठभीतिमूकीं. १५
लंकेतें गगनपथें दशास्य पावे, जेथील द्रुमगुण नंदनें हि गावे.
त्या ठेवी क्षितिजनि ती वनीं अशोकीं, ती बोले 'मरसिल या अघें पशो!' कीं.
जों साधि प्रभु परते मृगा वधून, द्वेष्ट्[3]युक्त श्रमद गमे न तें मधूनें[4];
भेटावी; अपशकुनें कळे वधू न; आता ये द्रुत निघतां वनामधून. १७
तो साश्रु प्रणत कथी स्वखेद सारा, वाटे त्या अति विपरीत वेदसारा.
आले जों स्वगति करूनि सत्वरा हे, श्री कोठें हि न दिसतां न सत्व[5] राहे.
'हा सीते! सति! कसि आजि कोपलीस? हा सीते! कासि सहसा चि लोपलीस?
हा सीते! तुजविण जीव तापला गे! हा सीते! श्रितकठिनास[6] पाप लागे.
भेटा हो! मृग गमला, न तो खरा, हो! देतों, घ्या विधु हँरिणास[7], तोख राहो;
हा माझा सुमृदु! मनांत आण काय, वाहूं मीं तवविरहार्त आण काय?'२०
इत्यादि प्रभु करि हा विलाप, रानें शोधाया रडत चि लाविला परानें;
सों तात प्रियसख गृध्रराज पाहे, त्या शोका परम दयालु तो न साहे. २१

---

१. अत्यानंद. २. दुष्ट रावण्याच्या भीतीनें मुकी बनलेली (?). ३. शत्रु मारीच्याचें ओरडणें. ४. मद्याहून कमी प्रतीचें. ५. धैर्य. ६. आश्रिताविषयीं निष्ठुर अशास. ७. हरिणाबदली.

'दिक्‌कंठें जनकसुता हरूनि नेली, माझी हे गति अनयें रणांत केली.'
रामांकीं कथुनि असें असूंसि सोडी, स्वर्गातें दशरथसा चि तो हि जोडी.
गृध्राच्या करुनि यथोचित क्रियेतें गेला जों पुनरपि धुंडित प्रियेतें,
प्राप्त श्रीप्रियकर होय तो कबंधा, त्याच्या त्या परिहारि शापशोकबंधा. २३
श्रीरामें मग शबरी हि धन्य केली, याहूनि प्रभुसि रुचे न अन्य केली;
जी पंपा वरसरसी महर्षिगीता, ती दे त्या सुपतिस आठवूनि सीता. २४
झाला त्या अमृतनदी [1]मरुज्ज [2]मग्न, [3]होतें जें बहुगुणयुक्त तें चि लग्न;
सूर्याचा तनुज सुकंठ वालिभग्न, तो पावे प्रभुसि, पटासि जेंवि नग्न. २५
एकें चि प्रखरशरें वधूनि वाळी दे राज्य प्रभु सुगळास, त्यासि पाळी;
सीतेचा सुगळ करावयासि शोध प्रेषी जे निपुणतम प्लवंग योध. २६
संपाती वडिल जटायुबंधु पक्षी सांगे [4]श्रीमहिजनिशोध, जीव रक्षी;
तो पाथोनिधि शतयोजनें उडाला, जो मुंगी रघुपतिसद्यशा गुडाला. २७
मैनाकाद्रिस सुरसेसि सिंहिकेला दावूनि स्वबळविलास पार गेला,
लंकेंत क्षितितनयेसि फार शोधी, पाहे तो प्रमदवनीं तिला यशोधी. २८
तों रात्री दशमुख ये, म्हणे, 'न कारा सेवावी, न करुनियां तुवां नकारा,'
श्री बोले, 'शरण चि मत्पतीस जावें, त्वां ही कां कुगति वरावया सजावें?'
धिक्कारें खवळुनि तो सुराप गेला, [5]दुष्कर्मा त्यजुनि जसा सुरापगेला;
दे मुद्रा, कुशळ कथी, निरोप मागे, घे चूडामणि, वनभंजनास लागे. ३०
जे आले निजमथना अनेक लक्ष क्रव्याद प्रबळ दशास्यपुत्र अक्ष,
त्या मारी पवनकुमार युद्धदक्ष, क्षोभे तो ज्वलन चि, शत्रुसैन्य कक्ष. ३१
ब्रह्मास्त्रें धरि घननाद, मान दे, हा बांधूं दे सुबळ यशोनिधान देहा;
दिक्‌कंठानिकट जडें बळें चि नेला, गेला तो जन्हि अपमान फार केला. ३२
त्या सांगे हितकर तें चि, 'तार्क्ष्य सर्पा तैसा तो प्रभु तुज रावणा! सदर्पा!
दे देवी, [6]अमृतिस साम हेतु, वांच, श्रीरामीं धरिलि कुबुद्धि हे तुवां च.' ३३
यावी ज्यास्तव [7]शिवहेतु शुद्धता तें सद्वाक्य प्रिय गमलें न उद्धतातें;

---

१. वायुपुत्र मारुती. २. [जो] शोकमग्न असा राम. ३. जमतें. ४. सीताशोध. ५. दुष्कर्मे करणारा. ६. जगण्यास. ७. कल्याणहेतु.

माराया असि धरि उग्र सत्संवारी[१], त्या पापा तदनुज शांतिवत्स वारी. ३४
तत्पुच्छाप्रति करवि दीप्त कोपें दिक्तुंड स्वसुतवधें विवेकलोपें;
लंकेतें पवनसुत क्षणांत जाळी, त्या वह्नि प्रियसखनंदनासि जाळी[२]. ३५
पुच्छातें विझवुनि अर्णवीं, सतीतें वंदूनि, प्रकटुनि वायुच्या गतीतें,
लंघूनि द्रुत शतयोजनाब्धि तीरा ये, चूडामणि मह दे रघुप्रवीरा. ३६
आलिंगी त्रिभुवननाथ मारुतीतें, जी लक्ष्मी स्तवन वरी न चारु[३] ती तें;
होतां तो सुत बहुमान्य कंजनाभा, गौरीभा जसि तसि होय अंजनाभा. ३७
प्रोत्साहें कपिबळसिंधु युक्त कार्या साधाया मुदित करावयासि आर्या,
सुग्रीव प्रभुवचनें निघे वधाया दिक्कंठा, समुनि समस्त देव धाया. ३८
श्रीराम प्रभुवर जाय सिंधुरोधा, तों आला शरण बिभीषण, स्वबोधा
मानीना, करि अपमान मत्त मानी, त्या भ्रात्या त्यजि, चुकवि स्वधर्महानी.
लंकेचें प्रभुवर राज्य दे नतातें, श्री काय द्रवुनि सुता दिजे न तातें?
तेजा भी जलधि, म्हणे 'सुकीर्तिहेतु श्रीरामा! करिव, शिरीं धरीन सेतु.'
सेत्वध्वा[४] प्लवगकरें रची शमाया द्वेष्टा, न त्रिजगीं सुखें शचीश मायां[५];
तो श्रीमान् दश शत रुंद लांब गावें, ज्या वेदाप्रति हि म्हणोनि 'थांब' गावें.
सीतेला धनुशिर सत्यसें चि दावी, दिग्वक्त्र भ्रववि, रडावयास लावी;
'माया' हें कथि सरमा बिभीषणाची स्त्री साध्वी; अरिकृत सिद्धता रणाची.
सिंधूतें उतरुनि पातला सुवेळा[६], होती त्यावरि विभु वेघतां सुवेळा;
लंकेतें प्रभुसह कीशराज पाहे, तद्द्वारोपरि अरि ही पहात राहे. ४३
पाहोनि द्रुत कपिसार्वभौम[७] पापा त्या गांठी उडुनि जसा सुपर्ण सापा.
दिक्कंठा बळ कळवावयास ताडी, आधीं तन्मुकुट तळीं तया हि पाडी. ४४
त्या[८] प्रार्थी प्रभु 'वश तूं न साहसा हो, बा! माझें हृदय न आधिदाह साहो.
युक्तीनें अरि समरीं सखे! दमावा, ब्रह्मांडीं त्वदकुशळें न खेद मावा.' ४५
दे न स्त्री, हित कथितां हि अंगदानें; श्रीशे[९]षुप्रिय करणार अंगदानें;

१. साधूंच्या यशांचा शत्रु (रावण). २. [फुलांची] जाळी. ३. सुंदर. ४. सेतुमार्गाला. ५. मावावयाला. ६. सुवेळपर्वतापाशीं. ७. सुग्रीव. ८. सुग्रीवाला. ९ रामबाणाचें प्रिय.

जें सैन्य प्रबळ रणांत मारवी तें, जिंकाया सजि जड त्या तमा रवीतें. ४६
वृक्षांस श्वसन तसा कपींस झोडी; मायावी खरतर सर्पपाश जोडी.
बांधी तो घनरव सानुजा अजाला, त्या जैसा गजपक बांधितो गजाला. ४७
'सीतेतें झडकरि पुष्पकांत घाला, दोघांस क्षय समरांगणांत झाला
दावा, न्या, हठ करिती उगाचि कां? गे! बोधा' हें दशमुख राक्षसींस सांगे.
निश्चेष्ट स्वदयितदेवरांसि पाहे, 'कां गेलां त्यजुनि?' म्हणे, न शोक साहे;
होय श्री खरतरदुःखदावदूर्वा, देती ते धृतिसरिता 'जटा' 'त्रि'पूर्वा. ४९
ती त्याही परतुनि त्या स्थळासि नेली, धैर्यातें धरुनि सती उगीच गेली;
तों आला गरुड, भयें फणी गळाले, सोडूनि प्रभुवरमूर्ति ते पळाले. ५०
पक्षींद्रें रघुपति सावधान केले, ते त्यातें निजगुरु आपणांस चेले
मानूनि स्तविति; लयासि ताप नेले, देहींचे व्रण नव्हते तसे चि गेले. ५१
होतां हे निजबळकाननाश भावू, तत्तेजें मग खळ कां न नाश भावू?
आयासें उठवि दशास्य कुंभकर्णा, भ्राटातें कथि, 'बहु याशि सर्व वर्णा.' ५२
मद्याचा मद, भर त्यांत आळसाचा, वाटे तो तन्हि कटकास काळ साचा.
सुग्रीवा धरि, सुरडे सुटोनि, तोडी तन्नासाश्रुति, कपि साधुवाद जोडी. ५३
दिक्कंठानुज अतिदुर्दशार्त रागें संप्राप्त प्लवग गिळी फिरोनि रागें;
श्रीरामप्रभु निवटी रणांत आगें, वाटे त्या चिर निजवी, म्हणे 'न भागें.' ५४
श्रीरामप्रमुख समस्त मेघनाद ब्रह्मास्त्रें बळ खिळि लब्धसाधुवाद;
श्रृंग श्रीपवनज ज्यांत ओषधी तें आणी, दे उठउनि सर्व तोष धीतें. ५५
मायेची जनकसुता वधूनि मोही मायावी शतमखजित्प्रसिद्ध, तो ही
मेला श्रीमदनुजलक्ष्मणाशुगानीं, नेला श्रीपतिगुणगायकीं सुगानीं. ५६
माराया जनकसुतेसि खड्गधारी गेला, त्या सचिव सुपार्श्व साधु वारी;
धाडी त्या प्रभुवरि फार सैन्य, कोटी लाटा तो जलधि मुनिक्षयार्थ लोटी.

---

१. रवीतें जिंकाया [जसी] तमा (रात्र) [तसा] त्या जिंकाया जड सजि. २. योजी. ३. महात. ४. प्रखरदुःखानलाला दूर्वा (तृण). ५. जणुं काय नव्हतेच इतक्या बेमालुम रीतीनें. ६. आपल्या सैन्यरूपी अरण्याला दिशाभूत असे. ७. रामलक्ष्मण. ८. धन्यवाद. ९. अधाशीपणानें. १०. मार्कंडेयाच्या नाशासाठीं.

जे बंधु स्वसुत सखे प्रधान होते, पाहेना दशमुख भक्त भृत्य तो तें;
योषांचे करुणविलाप आयकोनीं मानी तो रडत बसेल काय कोनीं? ५८
मेलें ही बळ बहु, राहिलें हि होतें, घे गोळा करुनि दशास्य सर्व तो तें;
सर्वस्व त्यजुनि निघे, म्हणे, 'तरावें, मारावें परबळ कीं रणीं मरावें.' ५९
गांठूनि प्रबळतमा महा चमू, हा वीरांच्या दशमुख संहरी समूहा,
क्रोधानें अशनि तसी च शक्ति सोडी, ती उग्रा सुदृढ हि लक्ष्मणोर फोडी.
काढूनि प्रभु रघुवीर शक्ति मोडी, दिक्तुंडा विरथ रणीं करूनि सोडी;
वाताचा सुत परिसे सुषेणवाणी, तें ओषध्यग शिखर क्षणांत आणी. ६१
त्या झालें अमृत चि नस्य तद्रसाचें, स्वामीचें कारि करपद्म भद्र साचें;
तो वाटे निजुनि उठे, न खेद राहे, राज्याच्या परिहरिती सखे दरा हे. ६२
शक्राच्या बसुनि रथीं श्रितेष्टदानें केला तो व्यसु दिनरात्रिसप्तकानें;
ब्रह्मांडीं प्रभुविजयें न माय हर्ष, श्रीरामीं करिति अमर्त्य पुष्पवर्ष. ६३
गंधर्वव्रजवरगान[1] राहिना च; प्रेमें त्या करिति वराप्सरा हि नाच.
आशांता[2] गुरुतर वाद्यनाद गेले, विप्राहीं जयजयकार फार केले. ६४
सांगे श्रीदयित बिभीषणा तराया द्वेष्टा ही, दशवदनक्रिया कराया;
लंकेंत प्रभु शरणागता कधीं न भ्रंशाया बसवि, करी स्वभक्त्यधीन. ६५
ये दिव्यें स्तुति रुचि कीर्ति जानकीला, स्पर्शों दे दहन खरा निजा न कीला[3];
पूर्वींची दशरथ दाखवी सुरीति, प्रेमानें सुरसह वर्णिती सुरी ती. ६६
जे युद्धीं मृत कपि ऋक्ष वीर होते, पीयूषें उठवि सुराधिनाथ तो ते;
सुग्रीवा कपिकटका हि तो प्रभावें सत्कारी निशिचरराज साधु भावें. ६७
बैसोनि प्रभु यश पुष्पकास भारी दे, सेना बसवि वरांसमेत सारी;
पाहोनि क्षितिजनि सेतुतें निवाली, ज्या गाती सतत सरस्वती शिवाली. ६८
त्या श्रीतें कथि रविवंशराय कांत प्रीतीनें विरचितयातुनायकांत,
'भाग्यानें सुमुखि! बिभीषणासि, हेतु त्वल्लोभा नळकृत भव्य हा हि सेतु.
सुग्रीव प्रियसख हा सहाय झाला, भत्युग्रीं विजय रणीं तरी च आला;
देता हा जरि हनुमान् न भेट योध, प्राणांची कसि गति लागतां न शोध?

---

१. गंधर्वगणांचें श्रेष्ठ गायन. २. सर्व दिशांच्या मर्यादेपर्यंत. ३. ज्वाळेला.

सीते ! हे कपिवर ऋक्ष वीर धन्य प्राशूनि श्वसन जल [1]छदाल्प वन्य
केलें [2]मखवदसुखनाशनार्थ जन्य; सेही यांपरि मज वाटती न अन्य.' ७१
किष्किंधा प्रभु दयितेसि दावि, वालिध्वंसाची कळवि कथा प्रतापशाळी.
सांगे, 'हा नगवर चित्रकूट कांते ! येथें ते नग दिसले सुवर्णकांते !' ७२
सुग्रीव प्रभुदयिताप्रियार्थ तारा आणी तत्सुमति सखी प्रधानदारा,
पंपेतें मग विभु दाखवूनि 'गेला यद्रानें श्रम' कथि 'तो विलाप केला.' ७३
त्या श्रीतें कथि शबरीकथा, कबंधा वर्णी जो प्रभु हरि सर्व शोकबंधा;
ती गोदा रघुवर ती हि पर्णशाळा दावी, त्या स्तववि जटायुच्या हि भाळा.
ज्या गातां तिळ हि नये सुखास तूट, श्रीतें तो प्रभुवर दावि चित्रकूट;
जी पापें निरसुनि मुक्ति दे, वदावी विद्या ती मग सुरसिंधु देव दावी. ७५
दे भेट स्वपितृसखा मुनीस राम, प्रेमानें नमि, करि त्यासि पूर्णकाम.
धाडी तो गुह भरतां कळावयाला ज्याच्या न व्यय तिळ ही बळा वयाला. ७६
वाताचा प्रियसुत सज्जना गुहातें सांगे जें यश भरि मेरुच्या गुहा तें;
जे भ्राते निववुनियां तयां निवाला, पूजी त्या भरत सुधी जसा शिवाला. ७७
श्रीरामप्रभु मुनिच्या पदांसि लागे, कीशार्थ प्रचुर [3]फळर्धि हें चि मागे.
आलिंगी निववि सुधाधिकें सुहास्यें 'धन्योहं जगति' असें निघे गुहास्यें. ७८
कैकेयीसुत भरत स्वपादभक्त भ्रातृत्वा न गणुनि नित्य दास्यसक्त,
यद्रेणु प्रिय, नच रत्नसानु ज्याला, त्या भेटे प्रभु कृतयत्न सानुज्याला. ७९
हर्षौर्वी शिशुमुख सर्व पौर वाहे, केले जे द्विजगुरु पात्र गौरवा हे;
श्रीरामें पितृपद फार शोभवीलें, वात्सल्यें पशुखगचित्त लोभवीलें. ८०
देतात स्वहृदयकंज विप्र ज्यातें [4]ब्रह्म क्षमा वरि, बहु रंजवि प्रजातें.
जी गाती कवि रघुराजसाधुरीती, स्वल्पा ही न वरि सुधेसि माधुरी ती. ८१
सत्कारी कपिपतितें बिभीषणातें, वर्णी त्या प्रभु बहु तत्कृता रणातें.
पूजी श्रीसह विभु वायुच्या सुतातें, लाजावें श्रवण करूनि तें सुतातें. ८२
वाल्मीकिद्विजवरशिष्य पुत्र, नावें दोघांचीं कुश लव, ज्यां गुहें हि गावें;

---

१. रानांतील थोडासा झाडपाला. २. मत्‌=मान्य. ३. फळसमृद्धि. ४. ब्रह्म-रूप राम.

तद्गीत स्वचरित रामराज भावें सेवी, कीं जगदघ तें लयासि जावें. ८३
दिक्कंठप्रभ[1]वतपप्रताप सेवी श्रीकुंभोद्भववदनें, न शेष ठेवी;
वाळीचें चरित तसें चि वातजयाचें ऐके, दे यश गिरिशासि शात ज्याचें. ८४
चौघांचे गुणनिधि पुत्र आठ, राज्यें प्राज्यें त्यां करुनि दिलीं वसिष्ठयाज्यें[2];
राजा न श्रितहित रामदेवसा या, सल्लोक स्वपुरजनास दे वसाया. ८५

एतत् प्रहर्षणं नाम रामायणमघापहम् ।
समर्पितं मयूरेण श्रीरामपदपद्मयोः ॥ ८६

इति श्रीरामनंदनमयूरविरचितं श्रीमत्प्रहर्षणरामायणं संपूर्ण ।

---

# श्रीगुरुरामायण

(विविध वृत्तें)

श्री[3]रामासि पहावया जनक ये स्नेहें विशोका पुरीं[4],
भेटे, फार निवे, म्हणे, 'न गुण हा चंद्रीं शिशो! कापुरा.'
त्या सुग्रीवबिभीषणादि नमिती, सेवा करी राम ही,
वित्ता लुब्धमती तसी बहु जपे ज्याच्या शरीरा मही. १
[5]प्रधानादि गेले तया आडवे शें, वसिष्ठें समालिंगिला [6]वाडवेशें,
सुधी याज्ञवल्क्यप्रियच्छात्र वर्षे प्रमोदाश्रु, भेटे [7]शतानंद, हर्षें. २
बमे भूप रामासि तो तात साच, प्रिय प्रेमळ श्रेष्ठ होता तसा च;
नमस्कारिला पूजिला कन्यकाहीं, जया त्यांविना नावडे अन्य कांहीं. ३
कौसल्या कैकेयी सुमति सुमित्रा तिहीं [9]अनन्याही,
नात्या नव्यत्व दिलें, गौरविला फार सज्जन न्याही. ४

---

१. जन्म. २. यजमानानें. ३. हें रामायण मुख्यत्वेंकरून जनकाच्या आगमनाच्या प्रसंगानें जनकवसिष्ठादि गुरुजनांना सांगितलें आहे. ४. शार्दूलविक्रीडित वृत्त. ५. भुजंगप्रयात. ६. ब्राह्मणश्रेष्ठें. ७. जनकाचा पुरोहित. ८. गीति. ९. जुन्या च अशा कौसल्याप्रभृतीनें.

[1]ब्रह्मज्ञवर्य पारि तो जनक स्वकन्या,
सीता विलोकुनि रडे बहु तो हि धन्या;
श्रीरामचंद्र हि म्हणे, 'चिर सासु राहो
हा मातृपिता चि भरता! तव सासुरा हो.' ५

[2]जांवयांसि बहु दे मणि वस्त्रें स्यंदन द्विप तुरंगम शस्त्रें,
तो पुसे कुशळवृत्तकथा या, श्रीवसिष्ठ कथि सर्व कथाया. ६

श्रीराम प्रभु तो वदे, "गुरुकृपा पीयूषपाथोनिधि;
ज्ञाते सर्व तुम्हीं प्रजासमवनीं तैसे चि जैसा विधी;
या आचार्यवसिष्ठगाधिजभरद्वाजाग्र्यगस्त्यानुगा,
राजर्षे! कुशळ, प्रसन्न गहनीं होता जन्हीं हा उगा. ७

प्रयागीं भरद्वाज दे फार हर्ष, प्रभो! तो मला चातका होय [3]वर्षे,
मुनी चित्रकूटीं तसे देखिले हो! स्वयें ज्यां चकोरें शशी लेखिले हो! ८

[4]अत्रि स्नेहें भेटला, यत्पदासी प्रेमें सिद्धी सेविती जेंवि दासी;
आशी देती दंडकारण्यवासी या, मोक्षश्री ज्यांपुढें तोंड वासी. ९

[5]शरभंग सुतीक्ष्ण पाहिले, कवि जे भूमिहितार्थ राहिले,
घटजें जनकें तसी कृपा बहु केली, वदवे न ती नृपा! १०

[6]मातें विलोकूनि जटायुतातें केली कृपा फार जटायुतातें,
गोदावरी दे सुख मायसी ते, म्हणे, "वदावें नच 'हाय!' सीते!" ११

[7]अध्यात्मविद्या तुज जेंवि बापा! तैसी मला पंचवटी हि तापा
स्पर्शों न दे, श्रीशिवकीर्ति पापा, कीं जेंवि [8]आस्तीकवरोक्ति सापा. १२

[9]लक्ष्मणें निर्मिली पर्णशाळा ती जेंवि सत्सभा,
पोषी हर्षकळा तैसी सुरभी जेंवि वत्सभा. १३

खोटी शूर्पणखा दशास्यभगिनी या लक्ष्मणें दंडिली,
खड्गें तत्क्षण कर्णयुग्मसहिता नासा तिची खंडिली;
तीचा मावुसबंधु ये खर, मरे, तें रावणाला कळे,

---

१. वसंततिलका. २. स्वागता. ३. वर्षाव. ४. शालिनीवृत्त. ५. वियोगिनी.
६. उपजाति. ७. इंद्रवज्रा. ८. आर्याभारतांतील सर्पसत्राख्यान पहा. ९. अनुष्टुप्.

तो मायामृग पाठवी महिसुताधी त्याविना नाकळे. १४
मद्बाण लागतां त्या यातुमृगानें वनांत मोठ्यानें
'हा सीते! हा लक्ष्मण!' असि मारिलि एक हाक खोट्यानें. १५
[1]मार्गे येतां अनुज मज हा भेटला, साश्रु सीता
क्रोधें बोले कटु, मदवना पाठवी यासि भीता,
गेलों राया! त्वरित उटजा शून्य पाहोनि बापा!
क्षमापा! झालों अतिपतितसा दुःसहा पात्र तापा. १६
[2]निजाश्रम पुनःपुन्हां हुडकितां, न गोदावरी-
तटस्थवन शोधितां हि नयन प्रमोदा वरी;
क्षताकुळ विलोकिला तंव जटायु तात क्षण,
प्रभो! हृदय पावलें मजे[3] गमे सुता [4]तक्षण. १७
'अधर्में रावणें नेली सीता तोडुनि पक्षती'
सांगे, सोडी प्राण, त्याची दशा दे दुःख लक्ष ती." १८
दाटे कंठ प्रभुचा, लक्ष्मण कथि. "अंत्यकार्य देहातें
संस्कारुनि, [5]भरत तसा, साश्रु सतिळ तोय आर्य दे हातें. १९
[6]शत्रूंसि साधूंसि म्हणे 'विरा' 'धा,' वधूनि हा आर्य जसा विराधा;
तसा धरी दारुण जो कबंध, माझा तयाचा हरि शोक बंधें[7]. २०
[8]विमानीं बैसे तो [9]दनु हित कथी त्या चि अयनें.
निवालीं बा! पुण्याश्रम निरखितां आर्यनयनें.
मतंगर्षिच्छात्रा वरि पुजुनि रामा यश वरी,
शुचिस्नेहाढ्या ती निमि[10]कुळवरा! माय शबरी. २१
गेलों[11] तत्प्रोक्तमार्गें निरखिलि सरसी ती, जिचें नाम पंपा,
संपाया धैर्य दे [12]यो [13]उपगतजनतासानुकंपा हि कंपा.

---

१. मंदाक्रांता. २. पृथ्वीवृत्त. ३. मज सुता—**पंत**. ४. तासणें. ५. भरत दशरथास तसा. ६. उपजातिवृत्त. ७. शापरूपी बंध. ८. शिखरिणी. ९. कबंधाचें अन्य नांव. १०. जनका! ११. स्रग्धरा. १२. रामातें—**पंत**. १३. शरणागताविषयीं सदय असा.

सांगों दुःख प्रभो मीं निमिकुलतिलका! काय बा! आपवा तें?
आर्या मंदें सुगंधें परम सुख हिमें होय जो ताप वातें." २२
वदे राम, "स्वामी! सुमति धृति दे हा, समवन
प्रभो! नित्य प्रेमें कारि, गमवि गेहासम वन.
न सौमित्रि भ्राता, सकळगुरुसुस्नेह सजला,
प्रवासीं रक्षाया द्रवुनि मजला स्पष्ट भजला. २३
राया! जो स्यां ऋष्यमूकास जावें, या सुग्रीवा सूर्यपुत्रा भजावें.
जेणें विश्वीं अंजना भासमाना, हा या धाडी कंजनाभासमाना. २४
हा सुगळ पवनपुत्रें मजला प्रेमेंकरूनि भेटविला,
झाला प्राणसखा, या वातें उत्साहदहन पेटविला." २५
तों सौमित्रि म्हणे, "अहो गुरुजि! जो वाळी बळें माजला,
माराया सुगळा सदैव जपला, नाहीं मनीं लाजला.
आर्य स्थापुनि तत्पदीं प्रियसखा या सद्यशें साजला,
सर्वत्र प्रभुसाधुवाद सुजनस्तोमाननें गाजला. २६
प्रेषिलीं मग शोधाया सुग्रीवें जानकी शतें;
करी हा हनुमान् लक्ष क्षमले ज्या न कीश तें. २७
धैर्य पाहुनि न लेश तगावें, हा पयोनिधि उडे शतगावें.
यासि पांघुरविती सुर सेला कीर्तिचा, ठकवितां सुरसेला. २८
त्या सिंहिकेसि मारी, जी छायेतें धरूनि आकर्षी;
याच्या पराक्रमातें कां मानवला नसेल नाकर्षी? २९
आर्येतें आर्य मुद्रा परम कुशळ हा गुप्त भेटोनि अर्पी,
स्वामीच्या भव्यवृत्तें अमृतसमधिकें फार देवीस तर्पी;
भंगी दिव्यद्रुलक्षा, दशमुखतनयाक्षा हि, भी तो हि दर्पी,
ज्याच्या तेजासि लंका कनकपुर करी स्वप्रतापाग्नि सर्पी. ३०
आर्येचा, प्रभुला पदें नमुनियां दे वीर, चूडामणी,

१. वसिष्ठा! २. सुग्रीव. ३. स्तोम=समूह. ४. [वानरांचीं] शतें. ५. मारुती.
६. तूप.

या आलिंगुनि हा निवे बहु जसा सच्चंदनाला फणी;
घे माथां उपकार मेरुहुनि हीं भारी स्वचित्तीं गणी,
याचा होय हरि प्रवीरनिकरीं बंदी रघूंचा धणी." ३१
रघुपति म्हणे, 'याचा साचा ऋणी च सदा असें;'
हृदय कळवी शांता दांता स्व साधुसदा असें.
हरि वरि न तो पाहे, साहेचिना स्तवभार हा,
कवि म्हणति, 'या लोकीं शोकीं न मज्जुनि बा! रहा.' ३२
बहुलक्षकोटिकपिवीरयुत स्तुतसद्गुणप्रभुसि सूर्यसुत
द्रुत ने, पयोनिधिस घाबरवी, वरवि प्रमोद, धृति दे बरवी.' ३३
अजित कथि, "भियालों दुस्तरा सागरा मीं;
'बहुत चि विधिचा या कां असा राग रामीं?'
निजमनिं वदलों हें; नित्य निःशंक रातों
भजनिं, म्हणुनि चिंतूं लागलों शंकरा तों. ३४
तेथें बिभीषण महामति भेट दे, हें चिंतार्णवांत वरिलें पृथु बेट देहें.
बा! बंधु हा चुकवि संकटमज्जनातें, सर्वां हि राक्षि भरतासह मज्जनातें." ३५
वसिष्ठजनकांप्रति प्रभुसि वंदुनि प्रीतिनें
बिभीषण म्हणे, "अजी! भुलविलों चि या रीतिनें,
असा प्रणतवत्सळ त्रिभुवनीं नसे मानद,
प्रणाम करिती दुजे अमृतसागरा या नदी. ३६
राजाराम चि दीनबंधु करुणासिंधु स्वयें सत्य जी!
भ्राता अग्रज, धर्मनीति कथितां, भक्तानुजास त्यजी;
स्वीकारी मज वंदितां चि विजयश्रीचा स्वलंकार हा,
वात्सल्यें वदला प्रभूत्तम 'सुखी, रक्ष स्वलंका, रहा.'" ३७
तों सुग्रीव वदे वसिष्ठमिथिलेशांतें असें, "आर्य हो!
श्रीराम प्रभु हा म्हणे मज 'सख्या! आधीं तुझें कार्य हो;'
दोषावांचुनि गांजिलें बहु मला ज्या अग्रजें उद्धतें,

---

१. हरिणीवृत्त. २. मारुती. ३. प्रमिताक्षरा. ४. मालिनी.

त्या दंडी प्रभु; या मिळे यश न जें शक्रास ही शुद्ध तें. ३८
दंडावें[1] नगरेश्वरें, न चुकला त्या नागरा कां पहा[1];
वाळी काय? अहो! जगत्पति शरें दे सागरा कांप हा.
तत्काळ प्रभु बांधवी नळकरें या सेतुरूपें गुणें,
हें आश्चर्य यशांत दंडितजनाच्या ही पडेना उणें." ३९
सांगे सौमित्रि, "आर्या! प्रभुसह चढलों जों सुवेळाग्रभागीं,
लंकाप्राकारशृंगास्थितदशवदनीं दूरगीं[2] पातकागीं[2];
जातां दृष्टि प्लवंगक्षितिप उडुनि हा जेंवि हैर्यक्ष[3] नागीं[4],
क्रोधावेशें पडे हो! न पुसुनि सहसा कीं जसा तार्क्ष्य नागीं. ४०
प्रभु[5] म्हणे, 'न करीं मन घाबरें, तुज न साहस हें अनघा बरें;'
म्हणति ऐकुनि यासि नयज्ञ 'हा! झटिति[6] एकलसाध्य न यज्ञ हा[6].'
अंगद[7] दूत प्रेषिला, कथुनि बरा संदेश;
साम न करि, 'मारा' म्हणे, तो दशमुख मंदेश. ४२
मग जलदरवाच्या मांडिलें युद्ध तातें,
परिभव हि न वारी त्या महाउद्धतातें;
अगणितरुधिराच्या मग्न देवारि पूरीं,
प्लवगनग हि झाले भग्न देवा! रिपूरीं." ४३
वदे सुगळ, "आर्य हो! कपटि मेघनादें खळें,
बळें मथुनि हे प्रभू भुजगबद्ध केले छळें.
जळें न नयनोद्भवें तुटति, दुःख तें आगळें,
'गळें चि' धृतिला म्हणे कपिचमू विवेका 'पळें.' ४४
ये संकटीं धावुनि राजपक्षी[8], तो त्यां अहींतें जरि ही न लक्षी,
तत्तेज तत्पक्षज नाद भक्षी, हे आमुचे मूर्तिधरासु रक्षी." ४५
बोले सौमित्रि, "कष्टें उठवुनि गुरुजी! प्रेषिला कुंभकर्ण,

---

१. अन्वयार्थ? २. दूर असलेल्या पापपर्वत रावणाचे ठिकाणीं. ३. सिंहाचा डोळा. ४. हत्तींवर. ५. द्रुतविलंबित. ६. हा रणयज्ञ झटपट एकट्यानें शेवटास नेण्याजोगा नाहीं. ७. दोहा. ८. पक्षिराज गरुड.

[1]क्रव्यादेशें महोग्र प्रबळतम महाकाळसा काळवर्ण;
अस्मत्प्राणा सुकंठा धरि, बळ उडवी तो जसा वात पर्ण,
क्रूरा त्यातें तसें कीं सकळ जळधिचें [2]वाडवा जेंवि [3]अर्णे. ४६
फिरे ते पुरीं तो महावीर यातें तुळा तों न याच्या पहावी रयातें;
सुटे मोह जातां हरी कान नाक, प्रहर्षे म्हणे 'साधु[4]!' या कां न नाक?
पुन्हा आला क्रोधें प्रलयसमयीं सिंधु फुटला,
गमे कीं युद्धांत प्लवग सगळे खात सुटला.
जसा बोधें मोह प्रभुवरशरें तो खपविला,
दिला या सद्गीतें परम विजयें तोख पविला." ४८
कीशाधीश कथी वसिष्ठजनकस्वांतांसि हर्षावया,
तन्नेत्रांतुनि उष्ण शीतलतर प्राज्याश्रु वर्षावया,
'ब्रह्मास्त्रें बळ इंद्रजित् खळ खिळी, पावोनि संताप 'हा!'
सारे ही वदलों चि, कश्मळ म्हणे सर्वा हि संता 'पहा.' ४९
अस्मत्प्राण बहिश्चर प्रभु रणीं दोघे हि हे ताडिले,
निश्चेष्ट क्षणदाचरेश्वरसुतें निर्जीवसे पाडिले.
होता सावध हा बिभीषण दुजा हा मारुती, मोहितें
शल्यातें सकळें बळें जड[5] म्हण देवर्षि जो तो [6]हितें. ५०
रात्री [7]उल्मुकहस्त हे हुडकितां युद्धांगणीं भागले,
दैवें या परमाधिसागरतटा [8]ऋक्षेश्वरा लागले
हा सांगे सदुपाय पाय धरितां शल्यातें ही ओषधी,
क्ष्माभृच्छृंग मरुज्ज आणि, विभुची पावे महातोष धी. ५१
विशल्य झालें कटक श्रीरामासह सर्व तें,
शिवें आशीर्वच दिलें सत्य, शृंग न पर्वतें. ५२
प्रसवे पुत्र विश्वाच्या वाराया अंजना भया,

---

१. रावणानें. २. वडवाग्नीला. ३. उदक. ४. वाहवा! योग्य. ५. कठिण, संकट. ६. अन्वयार्थ? ७. हातांत कोलीत घेतलेले असे बिभीषण व मारुती. ८. जांबवताला.

देवू सदग्रगण्यत्वख्याति श्रीकंजनाभ या. ५३

वदे राम, 'हा मारुति प्राणदाता निवारी स्वलीलालवें सर्वघाता.'
कुळाचार्य त्यातें म्हणे 'सत्य ताता!' स्तवी साश्रु होवूनि वैदेह वाता. ५४

शत्रुघ्न भरत वदले, 'याचे आम्हीं खरे ऋणी आर्या!'
सचिव म्हणति, 'फेडावें ऋण याच्या करुनि कोणत्या कार्या?' ५५

ज्ञाते सर्व हि जांबवान् सहनुमान् गावा सदा स्थापिती
हा सिद्धांत, चरित्र तें धरुनियां चित्तीं सदास्था पिती.
बोले अंगद, "मेघनाद मग तो मायामयी जी वधी,
ती देवी च गमे, भ्रमे अमरधी, कां न भ्रमे जीवधी? ५६

हा तात बिभीषण दे आम्हा सर्वांसि धीर, 'हे माया'
ऐसें सांगे गुरु हो! 'हा! न म्हणों' दे चि धीरहेमा या. ५७

'जन्मो साश्व शतांग होम करितां निर्विघ्न बा! त्यावर
व्हावें बैसुनि म्यां रणीं अमर' हा मागोनि धात्य ावर
घे शक्राप्रति सोडिलां घनरव, श्रीरामचंद्रा कथी
हें त्याचा चि पितृव्य, लक्ष्मण तया होमीं अपूर्णीं मथी. ५८

मायावी घननाद तो अरि अहोरात्रत्रयें मारिला,
शक्रत्रास समूळ आर्यवर हो! सौमित्रिनें वारिला;
दावी भेदुनि शक्तिनें उर दशग्रीव प्रतापा रणीं,
दृष्टींचीं सकळांचिया पवनभू फेडी पुन्हां पारणीं." ५९

बिभीषण म्हणे, 'करी वरुनि शक्ति मद्रक्षण,
त्यजी स्वतनुभान हा सदय रामभद्र क्षण;
न बंधुपण पाहिलें परिसिलें हि अन्यत्र या-
असें, बहु जनांचिया म्हणवि हें चि धन्य त्रया.' ६०

वदे, 'राम प्रेमें द्रवुनि शिवदेवा ततनया
परा भक्ता पश्चात्, प्रथम शिव दे वाततनया.
न गावा हा सुज्ञें कळुनि हित कां जीवद नतें?

---

१. सुज्ञधना–पंत. २. युद्धोपयोगी रथ. ३. विस्तृत नीति ज्याची अशा.

न जे गाय, त्यागू अमृत, पिउ कांजी वदन तें.' ६१
म्हणे जनक, 'मारिला मग कसा कुधी, दूर सा
न जो अरि कारि, स्तवी, न विषया त्यजी दूरसा?'
वसिष्ठ हि वदे, "यशोमृत कर्त्रींस·तर्पू, 'रहा'
म्हणो परयशा 'उगें,' म्हणत जेंवि कर्पूर 'हा!'" ६२
सुगळ म्हणे, 'अहो न रण निस्तुळ तो कथवे,
निरखिति चित्रसे करुनि निर्जरलोक थवे.
मृतकपिराक्षसप्रवररक्तनदी शतशा,
स्मरति न देव वृद्ध मुनि ते हि तदीश तशा. ६३
खोटा दशास्य रण मोटा च वाढवि, न तो टाकि आग्रह अरी,
तोटा न घे, सुजनकोटास या हि पण लोटावया दृढ धरी;
झाडी मदांधमद, नाडी सरारि बहु, धाडी असा रथ हरी,
ताडी तया वरुनि, पाडी शिरें, रघुप फाडी उर, व्यसु करी. ६४
सप्ताहोरात्रकाळ प्रखर रण करी रावण क्रूरकर्मा,
तन्नाशें विश्व पावे यतिपतिमति ही शंभु धाता हि शर्मा;
झाली सत्पुष्पवृष्टि प्रभुवरि गगनीं, गर्जलीं दिव्य वाद्यें,
केली श्रीनारदें हि स्तुति, समुनिजनें कश्यपें, वासवाद्यें. ६५
हर्षे गंधर्वराज, स्वजनसह करी रम्य आलाप, हा या
श्रीरामा गाय, नाचे, सुरयुवतिगण क्षिप्र आला पहाया;
वेधा श्रीकंठ गौरीयुत सजुनि वृषाधीश्वरा शुद्धवर्णा,
आज्ञा ऐसी करी कीं, 'सुकुशळ कवि हो! सर्व हें युद्ध वर्णा.' ६६
बिभीषणकरें राम द्वेष्ट्याची करवि क्रिया
द्रवे, वधूनि न धरी हा कृपाकर विक्रिया.' ६७
पुसति वसिष्ठ जनक, 'बा वत्सा! सीता सतीव्रता पाहे
केव्हां प्रियचरणातें? योग्या तैशा न तीव्रतापा हे.' ६८

---

१. षड्रिपु. २. नर्दटकवृत्त. ३. अश्वधाटी. ४. चित्ररथ. ५. ब्रह्मा. ६. क्रोध.

बोले अक्षारि[1], 'शोकाकुळ हतरिपुचे दार जे आर्य! होते
श्रीरामें सांत्विले कीं, सुगुण शुचि शचीशा हि सत्कार्य हो तें;
केला सौमित्रिहस्तें वरपदगत हा साधुधी, निष्कलंका
पावे ती कीर्ति मानी निजहृदयिं कलापोषका निष्कलंका. ६९
देवीस मन्मुखें या प्रभुनें निजविजयसिद्धि जाणविली,
या लंकेशानुमतें मग नगरींतूनि निकट आणविली. ७०
देवी दिव्य करी, बहु द्युति धरी, दृग्दोष सारे हरी,
कामाचा हि अरी स्तुति प्रभुपरि प्रेमें स्वयें आदरी;
सावित्रीश[3] हरी मुनिव्रज वरी बंदीपणातें, खरी
हे सत्कीर्ति तरी भवांत दुसरी पावे न ईची सरी. ७१
उठवी सात्विक भावा अघशमना दिव्य थापटुनि रसिकीं,
शंका निंदा चि न तें सकळ अनादि व्यथा पटु निरसि कीं. ७२
बसुनि वरविमानीं ये महाराज तो या,
प्रभुसि तृषित हस्ती जेंवि घर्मातें तोया
प्रियतनुजयुगातें भेटला, आर्य हो! तें,
अमृत हि न जसें हें तन्मनीं कार्य होतें.' ७३
प्रेमें आपण भक्तवत्सळ वदे, 'शोकाग्नि जो पेटला
होता, त्या शमवावया गुरुकृपामेघ स्वयें भेटला;
गाढालिंगन जें शिरीं करि अवघ्राण[5] स्रवे अश्रु तें,
ने तापा तददर्शनें असुख या विप्रा जसें अश्रुतें[6].' ७४
लक्ष्मण सांगे, "वदला आर्येतें तात हें असें, 'सरलें
संकट वत्से! त्वद्व्रततेजें मत्कुळ निमज्जतां तरलें.'" ७५
महेंद्र[7] बोले, 'रघुसत्तमा! रणें प्रसन्न झालों बहु मत्तमारणें;
जरि श्रितांचा परमागसा, रतू यशीं जगा बा! वर माग सार तूं.' ७६

---

१. रावणपुत्र अक्षाचा शत्रु मारुती. २. विभीषणा–**पंत**. कला=विभीषणकन्या.
३. ब्रह्मदेव. (शंकर असा हि अर्थ होईल). ४. नौका. ५. हुंगणें. ६. अविद्वत्तेनें.
७. इंद्र. ८. वंशस्थवृत्त. ९. स्वयशें निश्व रत व्हाया–**पंत**.

श्रीराम हा मानद देवराया मागे, 'उठावे कपि, दे वरा या;'
केले सुधा वर्षुनि वीर होते तैसे चि शक्रें आजि धीर हो! ते. ७७
जोडी हस्त, म्हणे बिभीषण, 'न घे म्यां प्रार्थितां पूजना,
या आचार्य वसिष्ठ तूं मत जसा देव स्वयंभू जना.
माता आर्य पिता चि हा परि भवत्स्नेहें न आकर्षिला,
जैसा या भरतें प्रभूत्तम, रुचे हें फार नाकर्षिला.' ७८
राम म्हणे, "त्वां रक्षिलि जरि हि असुतरा तरि प्रतिज्ञा ते,
बा! तरि च जपति सेविति बहु सत्संगतितरिप्रति ज्ञाते. ७९
कैसा येतों सुदूर त्वरित जरि न मीं पावतों या विमाना,
माझ्या वाक्या न येतां भरतकृतपणा सत्यता यावि, माना
हें साचें; आर्य हो! हा प्रिय परम सदा प्राणसा कायसा हो!
कौसल्यासूनु हीं हा मग विरह अशा साधुचा काय साहो? ८०
ऋक्षाधीश सुषेण अंगद नळ स्नेही भले आगले,
हे सुग्रीव बिभीषण प्रियकर भ्राते खरे मागले[1].
हा वातात्मज हे गजादि सकळ प्रज्ञाबळें आगळे
देणारे जय, यांपुढें परबळ त्रासें करी 'आ!' गळे. ८१
याहीं दिला विजय साधुनि आर्य हो! या,
हे हेतु सिद्ध अति दुर्घट कार्य होया.
हा दाससा सतत लक्ष्मण वत्स माझ्या,
देहा जपे बहु जसा शिव सत्समाजा." ८२
सौमित्रि म्हणे, 'आर्या! गुर्वाशीर्वाद सतत तुज जपला;
निष्फळ होइल कैसें सानुज ससचिव हि भरत जें तपला?' ८३
दाखवि[2] प्रभु हि लोकरीतितें, मान्य सद्गुरु हि तो करी तितें;
याज्ञवल्क्यमुनि[3]शिष्य मानवे गाति ती च कवि उत्तमा नवे. ८४
प्रेमें श्रीरघुवंशसद्गुरु वदे, 'बा राघवा! मानदा!
देवब्राह्मणधर्मनीतिनिरता! रामा! सुधेच्या नदा!

---

१. पूर्वजन्मींचे. २. रथोद्धता. ३. जनक.

वंशीं त्वत्सम तूं चि या द्युमणिच्या वत्सा! जगा तारिता,
लोकांमाजि पडो तुझ्या सुचरिता भावें न गाता रिता.' ८५
वदे जनक, "साधु हो! चिर सुखें प्रजा नांदवा,
भवद्यश जगत्त्रयाउपरि हो सदा चांदवा.
जशा म्हणति वाढल्या 'शिव असो' नद्या वासवा,
प्रजा म्हणुत या तुम्हां, सुबहुमान द्यावा सवा."[2] ८६

इति श्रीरामनंदनमयूरविरचितं श्रीगुरुरामायणं समाप्तं ।

---

# सीतारामायण

(विविध वृत्तें)

श्री[3]जनकसुता सीताप्रभृति सुखें भेटल्या स्वसा जावा,
तत्संवाद वदावा, सज्जन पावुनि मह[4] स्व[4] साजावा. १
[5]भरताची मांडवी स्त्री, लक्ष्मणाची हि उर्मिळा,
श्रुतकीर्ति रिपुघ्नाची; जगीं यद्रीति दुर्मिळा. २
पडुनि गळां, गहिंवरल्या, सीतेच्या, कन्यका तशा गमल्या;
श्रमल्या विरहें, श्रीनें भेटुनि कुरवाळितां करें शमल्या. ३
[6]म्हणति, 'सुदिन भाग्यें आजि हें प्राप्त झालें;
अमृत परमरुग्णा वांचवायासि आलें;
सुभगिनि! चवदा कीं कल्पसे अब्द गेले,
स्वसम सखि! निजेनें निष्ठुर स्वप्न केलें. ४
[7]वृत्त सर्व सति! सांग आपलें, सूक्तिनें निविव चित्त तापलें,
दर्शनें पुरलि सर्व कामना, या नसो श्रवणकाम कां मना?' ५
आलिंगुनि, कुरवाळुनि हुंगुनि शिर, पुसुनि लोचनें पदरें,
श्री सांगे निजवृत्त, श्रवणीं ज्याच्या उरों नये च दरें. ६

---

१. पूर आलेल्या. २ सूर्याला (कुलपुरुषाला). ३. गीतिवृत्त. ४. आत्मानंद. ५. अनुष्टुप्. ६. मालिनी. ७. रथोद्धता.

[1]भावोजी चित्रकूटीं, परतुनि नगरा न्यावया, शीघ्र आले.
माझे डोळे तुम्हांतें निरखुनि, बहु हे तेधवां तृप्त झाले.
स्वामींच्या पादुकांतें वरुनि, परतले बोध मानूनि मार्गें;
विप्रांच्या, मानिलें हो ! परम सुख, अविघ्नत्व पावोनि, यागें. ७
देवुनि अभय मुनींतें, आशीर्वादप्रसाद जोडून,
अत्र्याश्रमासि गेले स्वामी, तो चित्रकूट सोडून. ८
चालति माज्या मार्गें, लक्ष्मणजी काननीं, पुढें स्वामी.
धामीं तसी च हर्षें चालें, पाहोनि आपल्या स्वामीं. ९
जैसे वसिष्ठ गाधिज, जेंवि भरद्वाज गुरु, तसे अत्री
नमिले शैमिलेखर्षभ, जे सुधवळ मानसीं जसे पैत्री. १०
जेंवि भरद्वाज, तसे द्रवले पाहोनि ते हि मामाजी;
झाले अतितर सुखकर, कर जैसे भानुचे हिमामाजी. ११
तद्भार्या अनसूया, मजवरि करि, सासु, मायसी माया,
स्वकरें चि अळंकारी, आहे प्रेमासि काय सीमा या? १२
वेणी[6] घालुनि, लोचनीं निजकरें ती लेववी कज्जळ;
लावी चंदन सुव्रता; मज गमे गंगा चि तें तज्जळ.
गुंफी सत्कुसुमें शिरीं, सुरुचिरा माळा गळां अर्पुनी,
प्रेमें धर्म कथी, सुधाधिकरसें सूक्तें मला तर्पुनी. १३
तैसा चि मल्ललाटीं साध्वी सिंदूरतिलक जो लावी,
तो हि अंगतसार सदा; कैसी तत्सुकृतसिद्धि बोलावी? १४
तो अंगराग चिरकाळ तसा चि ओला,
यत्सौरभीं भ्रमरपंक्ति सदैव लोला;
घ्राणेक्षणांसि म्हणती कुसुमें हि 'डोला.'
वेणी नवी च; 'न सतीयश शक्य' बोला. १५

---

१. स्रग्धरा. २. सर्वस्वभूत रामाला. ३. योगी आणि देव यांमध्ये भेद. ४. पक्षी (हंस). ५. अनसूयासासुबाई. ६. शार्दूलविक्रीडित. ७. टवटवीत. ८. वसंततिलका. ९. सौरभ=सुगंध.

उष्णा उटी हिमीं ती, उष्णीं ही सर्वकाळ परम हिमा.
वृष्टि न मदतिक्रम करि; साध्वीचा न वदवे चि पर महिमा. १६
वत्से मांडवि ! मद्विवाहचरित प्रेमें पुसे ती सती,
सांगावी मज लागली, निजमुखें, सर्वा कथा, तीस ती.
आशीर्वाद, बहुप्रसन्नहृदया, दे, मायसी लोभवी;
त्या आर्येसि, तसें चि ईस हि, महावात्सल्य हें शोभवी. १७
[1]मग तेथुनि उर्मिळे ! निघाले प्रभु; जों दंडककाननीं रिघाले,
धरि राक्षस तों शरीर हातें; न च हें, हे नसतां [2]शरी, रहातें. १८
मी सोडविल्यें मर्मीं ताडुनि उग्रास [3]शरसदोघाहीं;
क्षण आपणा हि धरितां, दाखविला त्यास न रस दोघाहीं. १९
मज सोडुनि, जेंवि राहु, दोघे प्रभु चंद्रार्क तसे चि, उग्र तो घे;
हृदयांतिल सर्व धीर गेला, श्रुतकीर्ते! बहु म्यां विलाप केला. २०
स्वामिनीं वधुनि तापसारिला, त्या क्षणें सकळ ताप सारिला;
हा विराध सुरमान्य तारिला तुंबरुप्रबळशाप वारिला. २१
[4]मज वनीं प्रभुनीं समजावुनि, द्विजसमाज सुतांसम जावुनि
निवविले; मुलि हो! बहु मानिती सकळ, तात तसे गुण वानिती. २२
[5]करि निर्मळ जो, तपोनि, धी, शरभंगाख्य महातपोनिधी,
प्रभुनीं गुरुसा चि पाहिला, चरणीं मस्तकपद्म वाहिला. २३
[6]करूनि मत्स्वामिसभाजनातें लावी स्तवा, शक्र, सभाजनातें.
बैसे विमानीं मुनिकाय होमीं[7] सांगों तुम्हां अद्भुत काय हो! मीं? २४
एकीं सरीं सुवाद्यध्वनि ऐकुनियां विचारितां कळलें;
चळलें, दिव्यविषयरत होवुनि मन मांडकर्णिचें, मळलें. २५
[8]सुतीक्ष्णनामा मुनिराज देखिला, षट्शत्रुनीं जो निजकाळ लेखिला;
तसा चि कुंभोद्भवबंधु सन्मुनि, स्वर्गीं हि नेणे विषयांसि जन्मुनी. २६
लोपामुद्रापति श्रीघटजमुनि, जिहीं प्राशिला सिंधु, अन्या

---

१. औपच्छंदसिक. २. बाणयुक्त. ३. बाणांच्या उत्तम पंक्तीनीं. ४. द्रुतविलंबित. ५. वियोगिनी. ६. उपजाति. ७. होम करितां चि–**पंत**. ८. इंद्रवंशा.

सांगावी ख्याति काय, त्रिभुवनमहिता सत्तपःसिद्धिजन्या ?
प्रेमें मानूनि पुत्रापरि रघुवर हे, मानिली हे हि कन्या,
दिव्यें शस्त्रें दिलीं हो ! म्हणुनि वरि जयश्री, दुजी कीर्ति धन्या. २७
त्यावरि मामाजींचे गृध्रेंद्र सखे, जटायु या नावें,
स्नेहाब्धि भेटले, हो ! त्यांचें साधुत्व काय वानावें ? २८
विनयें करितां चि वंदनातें, द्रवले भेटुनि जेंवि नंदनातें.
प्रभु मानिति गेह, काननातें; निववी तें बहु देह कां न नातें ? २९
आम्हांतें वदले, 'स्वतातसदना आलां, सुखें या वनीं
वर्ता पंचवटीस्थळीं, मुनिनुतीं गोदातटीं पावनीं '
मत्स्वामी विनयें असें विनविती, 'बा ! हे स्नुषा आपली;
रक्षावी समयीं, निवो मति इची, स्वादर्शनें तापली.' ३०
वदले ते मामाजी, 'स्वस्थ तपा, मंत्र जा जपा, सून
रक्षिन दंडकवनपति मीं; व्हा निश्चित आजपासून.' ३१
स्वामी मातें नेति गोदावरीतें, यद्वातें ही चित्त मोदा वरीतें;
भावोजीनीं निर्मिली पर्णशाला; तैसें देना, रत्न वा स्वर्ण, शाला. ३२
निववी मज मातासी, श्रीमत्त्र्यंबकजटोद्भवा, गंगा,
ध्यानें गानें पानें शुचि करिती विश्वचित्तवागंगा. ३३
ये, म्हणवाया, भेटुनि शोकघनें वत्सैं, 'हा !' तदा, विवशी;
स्वाम्याज्ञेनें, तीतें हा लक्ष्मण वत्स हात दावि वशी. ३४
श्रीसीतेतें तिवी ही पुसति सुभगिनी, प्रेमळा जेंवि आली,
'कोणाची, कोण गे ! ती ? मळमति विवशी सांग कोठूनि आली ?
दुष्टेनें काय केलें ? सुमुखि ! सकळ ही वृत्त तें आयकों दे.
बाई ! दुःखें सुखें ही, चरित परिसतां, आमुचा कार्य कोंदे.' ३५

---

१. हरिणीप्लुतावृत्त. २. मी दृष्टीस न पडल्यामुळें. ३. शालिनी. ४. सुखाला—**पंत.** ५. मूळ पाठ—**स्मरणें स्तवनें स्नानें.** ६. [अनुक्रमें] जगाचें (सर्वांचें) मन, वाणी आणि देह यांला. ७. उरो वत्सं च वक्षश्चेत्यमरः—**पंत.** ८. क्रूरकर्मा देवताविशेष. ९. जितेंद्रिय. १०. देह.

सांगे भूमिसुता, 'दशास्यभगिनी मांसाशनें मातली;
*नामें शूर्पणखा, कुबुद्धि, विधवा, नक्तंचरी, पातली.
मायारूपवती, प्रभूंसि भुलली, मोहीं स्मरें घातली.
ती त्यांच्या हि गळां पडे, मति तुझी ज्यांच्या पदीं [१]रातली.'
'म[२]ला आहे स्त्री, हो मदनुजनिसौमित्रिदयिता;
वधू तूं योग्या त्या, सुमुखि! [३]गुणरूपातिशयिता.'
असें स्वामी तीतें कथिति; हित ती मानुनि, 'भजा'
म्हणे 'मातें' त्यांतें. तिस म्हणति ते भानुनिभ 'जा.' ३७
'या आर्यांच्या पदाचा, सुदति! सतत मीं दास; तूं काय दासी
होसी? मत्स्वामिनी हो. सुमुखि! भज तया मानदा कायदा[४]सी.'
ऐसें जें उर्मिळे! त्वत्प्रियतम वदला, ये पुन्हां तन्मना तें.
लावूं पाहे प्रभूंसीं, समुचित नसतां सद्यशा जन्म नातें. ३८
[५]प्रभूंसि कळली खरप्रकृति, [६]रम्यकोषा सुरी,
तसी वरि बरी, जसी रुचिरमूर्ति योषा [७]सुरी,
गमे मज हि; धी गुणीं जरि हि रंगली, लाज न
त्यजी; सुकुलज स्वयें नुघडि अंगलीला जन. ३९
[८]प्रभूंतें म्हणे, 'हें पहा आंग; लीलावती मीं; वरावें मला चांगलीला.'
स्तवी, दाखवी ती सये! आस्य, काय, स्वयें; तें पहातां न ये हास्य काय? ४०
कृत्यासी क्रुद्धा, ती माझ्या मंदें हि, केलि गे! हास्यें;
प्रभु देखतां हि धांवे मज खाया, [९]भीतिकेलिगेहास्यें. ४१
भ्यालयें मीं; स्वामींनीं 'हूं' म्हणतां क्रोधमद तिचा माथिला
लक्ष्मणभावोजींनीं केला जो दंड तो तुम्हां कथिला. ४२
कथूं दुर्दशा ती तिची काय गे!? 'हा!' वदे स्वापराधें, कुधी जाय गेहा.
खरा बंधुला अन्यथा, आरडोनि, स्वयें ताप सांगे, करी 'आ' रडोनि. ४३

---

१. रमली. २. शिखरिणी. ३. अत्यंत गुणवान व रूपवान अशाला. ४. शरीर अर्पण करणाऱ्या. ५. पृथ्वीवृत्त. ६. सुंदर म्यान जिला अशी. ७. देवांगना. ८. भुजंगप्रयात. ९. भीतीचें केवळ क्रीडास्थान च अशा तोंडानें. *हस्तदोष—**नामे**.

जनस्थानवासी खर क्रूरकर्मा न पाहे नया, जो विचारी न शर्मा.
स्वसैन्यासि आज्ञा कुधी दे वधाया, प्रभू सिद्ध झाले यशें देव धाया. ४४

प्रेमें लक्ष्मणजींसि सांगति रणारंभीं च मद्रक्षण
स्वामी; लाविति न, द्विषद्दळवधें न्हायासि भद्र, क्षण.
हे तार्क्ष्यें[1] प्रभु, ते चतुर्दशसहस्र क्रव्य[2]भोक्ते अही;
बाई! देखिलि दूरुनीं हि, रुधिरें धाली निवाली, मही. ४५

[3]मारूं ये जो, स्वामिशरें तो खर मेला; वाटे झाला दुष्टवधें तोख रमेला.
माता[4] माझी बुद्धि तदा भावि दरीतें; [5]चिंती दावो जें घृतलोभा विदरी तें.

भावोजींनीं स्वोटजातें नगीं रक्षुनि आणिलें;
स्वामीनीं दृष्टिपीयूषवृष्टिनें मज न्हाणिलें. ४७

स्व[6]मुख अवदसा तसें हि दावी, न धरुनि लाज कलागतीस लावी.
प्रकटुनि बळ, पुष्करा[7]क्ष साचें कारिति भयें मुख शुष्क राक्षसाचें. ४८

मायासुवर्णमृग राक्षस त्या खळानें,
जो धाडिला परम रम्य, विशृंखळानें,
तो वाटला निरखितां, मजला धरावा,
न्यावा पुरा, स्वजन सर्व सुखी करावा. ४९

'घ्या' म्हणें 'सुरुचिरा हरिणा' मीं, बाइ! दृष्टि न दिली परिणामीं.
सोडिली निपट भीड, सतीहो! आग्रहें तिपट भी डसती हो! ५०

देवूनि चाप भाते, वदल्यें, 'लांबेल मृग, धरा, जा च;'
ठेवुनि लक्ष्मणजींतें गेले. स्त्रीचा नव्हे बरा जाच. ५१

पळे मृग, कळे छळ, प्रभु तया शरें ताडिती,
हरूनि असु, काननीं, आरिस बाइ हो! पाडिती.
तशांत खळ हाक दे प्रभुवरस्वरासारखी;

१. गरुड. २. क्रव्य=कच्चें मांस. ३. मत्तमयूरवृत्त. ४. माझ्या बुद्धीनें गुहेला माता मानलें, म्हणजे मीं भयानें गुहेंत दडून बसलें. ५. [आणि] त्या लोभी हडळीनें जो प्रकार दाखविला त्याचें चिंतन करूं लागलें. ६. पुष्पिताग्रा. ७. कमलनयन राम. ८. स्वागतावृत्त.

खरें चि म्हणति श्रुती[1], मन हि जें बरें पारखी. ५२
'हा सीते! हा लक्ष्मणा!' यापरीची, दीना वाणी ऐकिली ग्यां अरीची.
बाईहो! ती मद्विचारासि मोडी, धैर्या सोडी, शोक चित्तांत जोडी. ५३
वदल्यें मीं, 'लक्ष्मणजि! स्वाम्यसुसंरक्षणार्थ[2] धांवा हो!
धांवा हो! विपदोघीं म्हणतां सर्वस्व भव्य कां वाहो?' ५४
तों भावोजी वदले, 'आर्ये! हें स्पष्ट राक्षसच्छद्म;
पद्मच्छदाक्ष[3] आहे विजयश्रीनित्यकेलिचें सद्म.' ५५
गमलें लक्ष्मणजींचें वच कटु मधुर हि, असत्य सत्य हि तें.
त्यांतें वदल्यें वचनें हृदय विदारावयासि अत्यहितें[4]. ५६
"तापते[5] ऐकतां आर्तें 'हा!' केला कांन; रक्षण
कारिता टाळिता साधु हाकेला कां नर क्षण? ५७
वर्ततो मदभिलाष मनांत, तूं तरी च सिरलास वनांत,"
जींत उग्रतरता असिवाणी, मन्मुखांतुनि निघे असि वाणी. ५८
क्रोधें केलें छिन्न प्रेम, हृदय दुष्टवाक्शरें भिन्न.
त्रासें झाले खिन्नस्वांत[6] महासाधु कंपित स्विन्न. ५९
नमुनि मला साश्रु निघुनि, धरुनि, विकळमानस, त्वरा, गेले.
मजवरि न, नियतिवरि, हे कवि शिखरिसमानसत्व रागेले. ६०
भ्रमल्यें भाविबळें मीं, बाई! कोणास ही न गांजावें.
साधुपुरुषच्छळें तों, स्थैर्यें सोडुनि मही नगां जावें. ६१
गेले लक्ष्मणजी त्यजूनि उटजा जों, तों चि ओका यती
तैसा ये दशकंठ, दाखवि तनू जी उग्र तो, काय ती
सांगावी? भयदा तऱ्ही न वदल्यें, पावोनि मीं कांप, 'हा!';

१. कान. २. रामाच्या प्राणरक्षणार्थ. ३. कमलपत्राक्ष. ४. अति+अहितें= अत्यंत दुष्ट अशीं. ५. आर्तें केला (केलेला) 'हा!' ऐकतां कांन (कान) तापते; रक्षण करिता साधु नर क्षण (क्षणभर तरी) हाकेला कां टाळिता? ६. मनानें उदास. ७. घामानें भरलेले. ८. पर्वताप्रमाणें अचल धैर्याचे. ९. मूर्तिमंत शांतता हि अरण्यवास पतकरिते, असा भाव. * हस्तदोष–**मननि.**

मंदावो, परि तेज सोडिल निज, ज्वाला, हिमीं कां? पहा. ६२

म्यां[1] वदोनि शर्महेतु धर्ममार्ग, दापिला;

स्थापितां निजीं रथीं बळें, कुबुद्धि शापिला.

ने नभःपथें मला प्रभूंसि हाक मारिली;

दूर शूर ते तिहीं भयांत हे न तारिली. ६३

ऐकोनि या सुनेची हाक, द्रवले जटायुमामाजी.

धांवुनि येतां, न म्हणे जिह्वा, सोडूनि भीति, 'हा!' माजी. ६४

त्यांच्या षष्टिसहस्रवत्सर वया, नाहीं तऱ्ही भागले;

युद्धीं दिग्वदना करूनि विरथ, क्रोधें वधूं लागले.

मामाजी मज सोडवूनि विजयी झाले, खळें ताडिले,

खड्गें पक्ष, मदश्रुबिंदुसह ते, क्षोणीतळीं, पाडिले. ६५

अधमें असा हा करी घात मोटा; मला जाय घेवूनि अत्यंत खोटा.

नग स्वोत्तरीयांत बांधूनि शोधा कपींमाजि म्यां सोडिलें आत्मबोधा. ६६

लंघुनि बहु नगगहनें, जलनिधि, सोडूनि मरणशंकेला,

लंकेला खळ गेला, वेगें घेउनि मला विपंकेला. ६७

ताप दे बहु निशाचर मेला, जेंवि अद्भुत पिशाच रमेला.

राक्षसी करिति रक्षण दासी, होय तीं स्थिति चिर क्षणदासी[2]. ६८

स्वामीचा मज न कळे, माझा स्वामीस ही, समाचार.

सोसित होत्यें सर्वें अहितांचे मीं, महीसमा[3], चार[4]. ६९

सुज्ञाना सरमा बिभीषणवधू विद्या चि माना; कळा

तत्कन्या, त्रिजटा हि, रंजवि, जसी गानाभिधाना कळा.

चिंतीं लक्ष्मणजीसमेत सतत स्वामींस मीं, चातकी,

जैसी जीवनदासि; बाइ! तिळ ही तो न द्रवे पातकी. ७०

मामाजींचे शतमख सखे धाडिती अन्नपात्र,

स्वामींतें मीं स्मरत कवळीं तत्प्रिया ग्रासमात्र;

केलें देहावन मुनिसतीनिर्मितें अंगरागें[5].

१. पंचचामर. २. रात्रीसारखी. ३. क्षमाशील पृथ्वीप्रमाणें. ४. चेष्टा ५. उटीनें.

चिंतीं[1] चित्त प्रभुजय सदा, शत्रुचा भंग रागें. ७१
चोरुनि अमराखूंचा नरभेकांचा[2] मला बळें अहि ने.
लंकेंत अशोकवनीं रोधी, तो बहुत लोटले महिने. ७२
एकाकाळीं रात्री प्रार्थी तो, परमदुर्मिळेस मज.
पतिभक्तिबळें नाहीं गडबडल्यें, सत्य उर्मिळे! समज. ७३
प्रत्यक्ष दुर्जनाशीं बोलायाचा प्रसंग पडला गे!
वत्से मांडवि बाई! श्रुतकीर्ते! तें मनास जड लागे. ७४
काडी आड करूनि, चिंतुनि मुनिस्त्रीतारकें पावलें,
तेज्यानें वदल्यें विशंक; समयीं जें सत्व तें पावलें.
'कां श्रीमत्परदारसंग रुचला रे! वांच मूढां! सळी[3]
काम क्रोध हि, अन्य काय बुडवी देवां? चमू ढांसळी. ७५
बुडसि करुनि या महापराधा, नमुनि विभूसि, पहा महा[4] परा, धा.
समजुनि बळ, कां असा? वधा न प्रभु चुकतील; नसें असावधान. ७६
भ्रमसि, खरविनाश आयकोनीं, स्वयुवति बैसविणार काय कोनीं?
हठ, मद, करि घात थोर, टाकीं; प्रभु रघुनायक, तूं हि चोरटा कीं. ७७
स्मरपुरहरचापभंग केला, सहज सहस्रभुजघ्नगर्व गेला.
खरें[5] खर खरसो[5] पळांत मेला, तरि हि तव भ्रम कां तसा चि ठेला?' ७८
बोले तो, 'राक्षसीहो! हित कथुनि पहा; हे सुरामा[6], सखा या
राया मासद्वयें ही न करि तरि, इचें द्या सुरा मास खाया.'
गेला, मेला वदोनि श्रुतिकटु; मग त्या गांजिल्यें बायकांनीं;
प्याले मत्कर्ण, घालूं गरळ तुमचिया, बाइ! तें काय कानीं? ७९
त्या कृत्या चि, तयांमध्यें त्रिजटा, बाइहो! भली.
क्षोभली ती न, धात्रीसी लोभली, फार शोभली. ८०
उद्बंधनें[7] मराया, मग वेण्युद्ग्रथन[8] सुगुण[9] हे उकली,

१. हस्तदोष—चिंत्तीं. २. देवरूपी उंदरांचा व मनुष्यरूपी बेडकांचा सर्प (रावण).
३. श्रीरामायण ३६ वा श्लोक पहा. ४. तेजाला. ५. गाढवासारखा उग्र खर राक्षस.
६. सुंदर स्त्री. ७. गळफांसानें. ९. वेणीला बांधलेला चांगला—मजबूत—दोरा.

तों मारुति मुद्रा दे; मृतिची वेळा म्हणोनि ती चुकली. ८१

हा वातभू कुशळ वृत्त समग्र सांगे.
दे हर्ष, जेंवि जवळ स्वकुमार रांगे.
जे मन्मनोरथ महाधिगदार्त[1] पांगे,
झाले समर्थ; अमृतें नुठतील कां गे!? ८२

मज चवथे भावोजी सुगळ मिळाले वनीं, असें कळलें.
टळलें व्यसन, उजळलें यश, मद्धरणेंकरूनि जें मळलें. ८३

मिळालीं, उत्साहें बहु कपिबळें ऋक्षकटकें;
कळे, वाटे, केली मजवरि दया विश्वघटकें.
खुणेला म्यां चूडामणि निज दिला 'जा, नै[2] अटकें,'
म्हणें यां[3]; हा भासे जनक चि; वदावें न लटकें. ८४

जोडी हात मला, निघे पवनभू, खोडी करी हा बळें.
मोडी वृक्ष सुरम्य जे उपवनीं, झोडी अरींचीं बळें.
तोडी मस्तकलक्षराक्षस[4] रणीं, सोडी न एकास ही;
थोडी यातुचमू उरे, बहु असृग्गोडी[5] सुखें घे मही. ८५

गाती[6] प्रेमें देवता अक्षमेला, याच्या हस्तें जेधवां अक्ष मेला.
ज्यांतें वैरी पाठवी रक्षणांत स्वीर्या देती पाठ वीर क्षणांत. ८६

धरूं दे मेघनादा; हा व्याघ्र, तो शश; काय ती
लीला? शक्त हि पीडूं दे पुण्यार्थी मशका, यती. ८७

वदल्या रागें राक्षसी कपि नेतां बांधून,
'आंबासा हिरवा बरा, खावा कां रांधून?' ८८

पावे मारुति धर्मनीतिरहिता, पाहे असारा सभा,
मानी त्यां[10] अतितुच्छ सुच्छवि[11] कपी, वाजी जसा रासभा[12].

---

१. मोठ्या चिंतारूप रोगानें पीडित असे. २. येथें च घोंटाळूं नकोस. ३. या मारुतीला. ४. लाखों राक्षसांचीं मस्तकें. ५. रक्ताची चव. ६. वैश्वदेवी छंद. ७. [मारुतीच्या] असहनशीलतेला. ८. आपली. ९. दोहा. १०. रावणा-पंत. ११. अत्यंत तेजस्वी. १२. गाढवाला.

वर्णी स्वामिभुजप्रताप, करुनि न्यायें चि धिक्कार हा
  सांगे, "वाढलि कामवृत्ति, न म्हणे कीं 'सासु' हिका 'रहा.'"
माराया कपिला दशास्य असितें घे, घोरकर्मा सये!
  प्रार्थी साधु बिभीषण, 'क्षितिपते! हा दूत, मारूं नये.'
वैरी पेटवि पुच्छ, बाइ! सरमा सांगे, तदा अंजली
  केला त्यां ज्वलनासि, कीं महित जे तद्धी स्तवीं रंजली. ९०
ज्या मत्ता राक्षसांच्या पदें अतिकुतुकें होय हास्यां, सभा जी
  तीला, त्यांच्या, तयांच्या मळमातिपतिच्या, त्यां हि, आस्यांस भाजी.
तेजें सर्वांसि घोळी; कारि कनकपुरी हा कृती वत्स होळी.
  याच्या पुच्छा न पोळी दहन, खळ, सये! 'हा!' म्हणे, हात चोळी.
बिभीषणाच्या परि राक्षि गेहा, पुन्हां मला येउनि लक्षि गे! हा;
देवर्षि दे या बहु तोख गानें, वाटे न केला रय तो खगानें. ९२
  सांगों काय, रयें दे जें सुख चित्तास वत्स, माज्या तें?
  प्रभुतें मणिनें जैसें, बोधें देवर्षिसत्समाजातें. ९३
    'रक्षू मला, करुनियां अरिहानि रोप,'
      स्वामींस सिद्ध, सखिहो! करि हा निरोप;
    आले महाकपिचमूंसह सागरातें,
      त्याया परायु, शिवसे सहसा गरातें. ९४
  धर्मन्यायमतें बिभीषण सभेमध्यें वदे साम, या
    धिक्कारी खळ; भाग भेषज गतायुष्का न दे सामया.
  त्या लंका प्रभुनीं, पदाब्ज नमितां, वारूनि कंपा, दिली;
    हे भारी, शरणागतीं द्रवुनियां, सत्कीर्ति संपादिली. ९५
  भ्यसला सागर, भेटला, नळकरें जो सेतु केला, सये!
    तो सांगे, 'शरण प्रभूंसि, कुमते! जों तूं न मेलास, ये.'

---

१. उचकी. २. मारित्ये–पंत. ३. जे पूज्य आहेत अशांची बुद्धि. ४. पात्र. ५. राक्षसांच्या. ६. रावणाच्या. ७. वेग. ८. येथें स्यमंतकमण्याच्या कथेशीं अनुसंधान आहे. ९. भाग्य (आयुष्य). १०. अगदीं घोंगडावर काढलेल्या रोग्याला.

गांवें शंभर लांब, रुंद दश, हा अत्यद्भुत क्षोभला
[1]क्षोणीबाहु गमे, [2]सुताहरपरव्यापादना, लोभला. ९६
मायानिर्मित चाप मस्तक मला दिक्कंधरें दाविलें,
या माज्या नयनें, मनें हि सहसा तें सत्यसें भाविलें.
बाई! काय कथूं खळें हृदय हें शोकानळें ताविलें;
दुष्टें एक मूहूर्त अश्रु सहसा सोडावया लाविलें. ९७
'हे माया,' हें कथि, करी सरमा परमादर.
'आले स्वामी तुझे,' ऐसें कळवी, पळवी दर. ९८
सुगळ माथिति रावणा सुवेळावरुनि उडोनि सये! तदा सुवेळा;
प्रभुवर वदले, 'सख्या! नयज्ञा! समुचित साहस होय या न [3]येज्ञा.' ९९
स्वामींनीं श्रितशर्मद धर्म, दया करुनि, सनय आठविला.
या ताराबाईचा सुत अंगद पूत दूत पाठविला. १००
धर्मज्ञ नयज्ञ कुशळ, ऐसा लोकांत बोलका नाहीं.
पारि त्या आरिनें याचा एक हि वारिला न बोल कानाहीं. १०१
वदला, 'घेउनि देवी, प्रभुच्या चरणांसि, चाल वंदाया.
मंदा! याद जलधिसीं विटतां, वांचविल कोण [4]धंदा या?' १०२
कोपे दुष्ट, म्हणे, 'धरा चि.' चवघे बाहुद्वया झोंबले.
तों हा अंगद वत्स जाय गगनीं क्रव्याद ते लोंबले.
वेगें जावुनि दूर, भव्य भुज या शूरस्तुतें झाडिले;
[5]झाले पंक, धरातळीं, सकळ ही तत्काळ जे पाडिले. १०३
बाइहो! करुनि तें पुर रुद्ध, क्रुद्ध वीर करिती बहु युद्ध;
वाहती जरि हि शोणितपूर, क्रूर 'हाय!' न म्हणे रणशूर. १०४
ज्या, वृत्रारिचमूसमूह समरीं दे पाठ, वीरा, वण
स्वांगीं जो पविचे प्रहस्त मिरवी, त्या पाठवी रावण;

---

१. पृथ्वीचा हात. २. आपल्या मुलीचें हरण करणाऱ्या शत्रूचा नाश करण्याकरितां. ३. रणयज्ञाचे कामीं. ४. उद्योग–उपाय. ५. त्यांचा चेंदामेंदा झाला.

सेनानी [१]प्रथमाहवीं च खपला, घेवूनि सैन्यास, हा.
बोले, 'पावुनि भंग, हीन कटका देऊनि दैन्या, सहा.' १०५
त्याचा दारुण इंद्रजित् सुत सये! युद्धांत मायाबळें
कीशांचीं, अति शोक पावुनि, पळें, सारीं शमाया, बळें,
विस्तारूनि भुजंगपाश समरीं, स्वामीस बांधी, सये!
स्वोत्कर्षें मग उद्धतत्व अरिच्या, तेव्हां न कां, धीस ये? १०६
केले लक्ष्मणजी हि बद्ध अहिनीं, मर्मस्थळीं चाविले.
दोघांनीं हि सुनेत्रपद्म मुलिहो! मूर्छाभरें लाविले.
दासीनीं मज पुष्पकीं बसवुनि, त्रासावया दाविले.
शोकें मीं रडल्यें बहु, व्यसु चि [२]मत्स्वांतें सये! भाविले. १०७
सत्संगतिसी त्रिजटा नाशी बोधेंकरूनि मन्मोहा.
वदलि, "महाभागे! या मायेनें त्वन्मुखीं न जन्मो 'हा!'" १०८
मातें घेऊनि गेल्या फिरुनि उपवनीं राक्षसी; नागपा[३]शा
संपूर्णा यत्प्रसादेंकरुनि, परिहरी [४]तत्सखा नागपाशा.
दोघांचे देह केले, स्वकर फिरवुनि, स्वस्थ, तत्काळ जाला
सर्वां साधूंसि मोटा मह; दशमुख जो ताप तत्काळ जाला. १०९
तेव्हां तो कुंभकर्णा उठवि अहित, कीं यत्न कांहीं न चाले,
मत्स्वामी [५]सानुजन्मे, कटकसह पुन्हां, संगरा सिद्ध झाले.
भ्याले, उग्रा पहातां, कपि सकळ सये! काळसा वाटला गे!
प्राणत्राणा धरावी, त्यजुनि रण, तयां सेतुची वाट लागे. ११०
[६]कळेच्या [६]तातानें निपुण कथिलें हें बुजवणें;
फिरावें त्यांहीं ज्यां स्वजनु [७]पतिकार्यें उजवणें;
धरी सुग्रीवातें, पळवुनि भयें सर्व, परते;
सये! बाई! तेव्हां सकळ धरिती गर्व पर ते. १११

---

१. पहिल्या तोंडाला च. २. माझ्या मनानें. ३. गजेंद्राची इच्छा. ४. त्याचा (विष्णूचा) सखा गरुड. ५. लक्ष्मणभावजींसह असे. ६. बिभीषणानें. ७. धन्याचें कार्य करून.

मूर्छा जातां, हरिती तन्नासाश्रुति सुकंठभावोजी.
ती यांस हि दे समर्यों प्रेमें श्रीनरहरींस भों वो जी. ११२
खिजोनि परते अरी, गिळि न चावितां ही हरी.
कितेक पळती परी वरुनि कर्णनासादरी.
अनर्थ बहु तो करी, [2]नैळवनांत जैसा करी.
गति प्रभु, बरोबरी करि तयासि, दे ती बरी. ११३
तच्छिर, बाहु, चरण, हे कटकांचे स्पष्ट काळसे तुकडे,
मृतघटकर्णोपद्रुत पळती कपियूथपाळ सेतुकडे. ११४
[3]अर्थनिष्ट कळवी सरमा, जें होय तापहर तें सर[4] माजें.
[5]तो वदे विकळमानस, 'हाय!' ध्वंसतां असुसमान सहाय. ११५
इंद्रजित[6] पुत्र तद्बुद्धि भेदी, 'रहा स्वस्थ,' ऐसें वदे, मूढ दे धीर हा;
श्मश्रु हातें पिळी, वीर सारे खिळी, मोह सेना गिळी; खंडि खड्गा [7]निळी.
स्वामी, लक्ष्मणजी, सुकंठ अवघे शस्त्रव्रजें ताडिले,
शल्यार्त, क्षणदाचरेश्वरसुतें निःप्राणसे, पाडिले.
होता सावध वत्स मारुति, सुधी, कीं हा [8]कलातात; मीं
सांगों मेंकसें, धरुनि फिरले हस्तीं [9]अलाता तमीं. ११७
मामाजीसम वृद्ध मान्य सकळां ऋक्षेंद्र, हे ओषधी
आणाया पवनात्मजासि कथिती, पावावया तोप धी;
कैलासाजवळील श्रृंग गिरिचें वत्सें पळें आणिलें,
केलें सर्व विशल्य निर्व्रण बळ, प्रेमाश्रुनीं न्हाणिलें. ११८
प्रेमार्द्रा मांडवी तों वदलि, 'सकटकां नायकां जीवदाना
दे हा. सत्कीर्ति याची अमृत; अमृत त्या काय कांजी वदाना?'
'साचें सौभाग्य रक्षी पवनसुत', असें बोलिली उर्मिळा; तें
बोले अन्यीं हि, 'हा, हो सुसदभिमत, जें पात्र त्या दुर्मिळा तें.' ११९

---

१. तेज. २. देवनळाच्या–टोकराच्या–वेटांत. ३. कुंभकर्णकृत वानरनाश. ४. माझें क्रीडासरोवर (राम). ५. रावण. ६. स्रग्विणी. ७. भार्जा चिरण्याची. ८. मागें १११ वा श्लोक पहा. ९. शब्दार्थ? १०. कोलिताला. ११. श्रुतकीर्ति.

म्हणे जनकजाः-प्रभु स्वकटकासि आज्ञापिती;
सुधा तृषित तेंवि, ती सकळ वीर आज्ञा पिती.
प्रतापदहनीं महें, करिति वैरिहोमा, रणीं.
निजक्षत न पाहती सुभट, बाइहो! मारणीं. १२०

असंख्य युद्धीं अरि लोळवीले, स्वर्गासि बाई! बहु बोळवीले.
मायाबळें दाखवि मत्त मातें, मारूनि मोही प्रभुसत्तमातें. १२१

तो अरि लक्ष्मणजींनीं साधुबिभीषणमतें रणीं वधिला;
सखि! काढिला शरकरें, हारिच्या कांटा चि काळजामधिला. १२२

बसता अग्निभवरथीं, होता अरि अमरकाय; होमरता
विघ्न न करि[1]ते जरि, तरि करिता चिर समर; काय हो! मरता? १२३

वरश्रीमत्त न म्हणे जो सामा अनघा 'बरें'
त्या पाप्याचें, पुत्रशोकें जाहलें, मन घाबरें. १२४

भावी न स्वकुमतितें, मातें चि, अनर्थमूळ, तो पापी;
ये खड्गासि म्हणाया 'मत्कंठरुधिर, धरूनि कोपा, पी.' १२५

'हो' म्हणे अघ 'असावध, मातें' त्या कुबुद्धिस; असा वध मातें
प्राप्त होय; पारि मज्जनकाचें पुण्य, बोलति, न, सज्जन, काचें. १२६

स्वर्गासि ज्याहीं नत पाठवीले, ते म्यां मनांत प्रभु आठवीले.
वारी अरातीस, सुपार्श्वनामा त्याचा प्रधानोत्तम शुद्धधामा. १२७

[2]पाठवी मग तो शताधिक कोटि सैन्य, वदे, 'वधा
मर्त्य वानर, खा चि, ते हि कुधी उरोत न देव, धा.'
त्या बळा बुडवी प्रभूत्तमबाणवा[3]र, समुद्रसा
होय, तत्क्षतजें भिजोनि निवोनि फार समुद्रसा[4]. १२८

प्रभूनीं रणीं दाविलें रुद्रसत्व, स्ववीरारसातें दिलें [5]उद्रसत्व.
पुरीं न स्त्रियांचा महा 'हाय!' माये, नवा [6]वस्र धाया महा हा यमा ये.

मारावे अरि सर्व आपण रणीं, किंवा मरावें, असा

---

१. हस्तदोष–करितां. २. विबुधप्रियावृत्त. ३. समूह. ४. आनंदयुक्त पृथ्वी.
५. उत्कृष्ट रसत्व. ६. [यमापिता] सूर्य.

चित्तामाजि करूनि निश्चय, निघे तो दुष्ट, कांपे रसा.
क्रुद्ध व्याघ्र चि रावण क्षण रणीं, कीशौघ भासे ससा; १३०
पाडी लक्ष्मणजींस शक्ति अरिची, जी स्पष्ट काळस्वसा.
भंगूनि शत्रुतें, स्वामी शक्ति काढुनि, मोडिती.
वदोनि बंधुशोकें 'हा!' दीर्घोष्ण श्वास सोडिती. १३१
हा साधु वत्स आणी ओषधि शृंगासमेत पुनरपि त्या.
निववी स्वयशें, प्रभुसह सज्जननिकरासि, जेंवि सुनर पित्या. १३२
युद्धीं भूमिवरि प्रभूंसि, सुरथीं दिक्कंधरा पाहिलें;
शक्राच्या, सखिहो! न तें अनुचित, स्वांतें, तदा साहिलें;
प्रेमें मातलिनें शतक्रतुरथीं, प्रार्थूनियां, वाहिलें,
तेव्हां राक्षससैन्यरक्त विपुल क्षोणीतळीं वाहिलें. १३३
होय द्वैरथयुद्ध, रावणशर स्वामींस ही लागले.
स्वामीचे शर दिङ्मुखास हि, न हे दोघे सये! भागले;
सप्ताहर्निश निर्निमेष अतुळीं त्या अध्वरीं[1] जागले,
तेव्हां वात न, बाणरुद्धगगनीं, सूर्यांशु ही, वागले. १३४
खंडिलीं शत शिरें, पर तो न प्रेत होय; उठलीं परतोन;
ग्लानि लेश हि शिवे न च काया, लावि नाथहृदया वचकाया. १३५
कुंभजसामाजीनीं केला मंत्रोपदेश समरांत.
उर भेदुनि, अरि वधितां, 'जय! जय!' हा शब्द होय अमरांत. १३६
झाली प्रभूत्तमशिरीं वरपुष्पवृष्टि,
स्वर्वाद्यनाद भरि तत्क्षण सर्व सृष्टि;
देवांगना करिति हर्षितबुद्धि नृत्यें,
गंधर्व गाति मधुरस्वर पुण्यकृत्यें. १३७
देवें[2] मुनि स्तविती; पवमान सुमंद सुगंध सुशीतळ वाहे;
प्रेरुनि साधु बिभीषण शत्रु हि उद्धारिला; पुरशोक न राहे.
त्या दशकंठपदीं सरमापति बैसवितां, कपि वर्णिति या हे,

१. [रणरूपी] यज्ञांत. २. सवयावृत्त.

बाइ! दया इतरत्र दिसे; प्रभुहृत्कमळीं परि संतत आहे. १३८
स्वामीनीं पाठविला मारुति, मच्चित्ततापा पळवाया,
कळवाया प्रिय; बाई! कीं कारि देहा वियोग [1]पळवा या. १३९
प्राशुनि विभुविजयकथा, ज्या सन्नलिनीस सेविती सद्‌ली,
'पद्‌लीना या बा! तुज योग्य नसे देय,' हे [2]असें वद्‌ली. १४०
प्रार्थी मारुति, 'गांजिलें तुज जिहीं, त्या या महापापिणी
दासी दुर्मति राक्षसी वधिन मीं, पक्षींद्रसा सापिणी.'
'मेला योजक; अस्वतंत्र जन हा; बापा! न दीनावरी
क्षोभावें,' वदल्यें 'असें अघ [3]करीं; आपा नदी नावरी.' १४१
हें ऐकुनि मज, बाई! सुविचक्षण आंजनेय कर जोडी.
बोले जेंवि स्वामी 'पुण्ययशाची असी च कर जोडी.' १४२
निरोप म्यां पाठविला, 'दावा चरणसारसें.
वियोगतापें गमलें मना मरण सारसें.' १४३
आज्ञा होय, बिभीषण आले, घेऊनि नव्यशिबिकेला;
नेउनि दाखविले ते, यत्स्मरणें प्राज्ञभ[3]व्य शिबि केला. १४४
तों स्वामी वदले 'हरी [4]सुरुचिराकारा गुणें या तुतें
तद्गेहीं वसलीस तूं चिर, न दुःशीलें उणें यातु तें.
केला तद्वध कीर्तिशुद्धिकरितां, वंशप्रभावा रण;
त्वत्स्वीकार करील पूर्वजयशश्चंद्रप्रभावारण.' १४५
स्वामी सर्वज्ञ चि, परि जपती निंदक यशा विटाळाया.
म्यां दिव्य म्हणुनि केलें, प्राकृतजनसंशया पिटाळाया. १४६
दहनीं मुहूर्त होती हे, स्पष्ट गमे हृदीं च, तनु, [5]गांगीं,
प्रभुनामें न मदंगीं साधूंच्या जेंवि ताप [6]अनुगांगीं. १४७
होत्यें मीं अग्निकुंडीं, प्रमुदितहृदया, जेंवि [7]पाटीरपंकीं;

---

१. वाळलेली भाजी (शुष्क). २. मी सीता. ३. पूर्वचरणांतील 'न' ची पुनरावृत्ति करून 'न करीं' असा अन्वय. ३. ऐश्वर्यवान्. ४. अत्यंत सुंदर रूपवती. ५. गंगेच्या डोहांत. ६. सेवकांच्या ठिकाणीं. ७. चंदनाच्या चिखलांत.

स्वामींच्या, मूर्तिधारी दहन मज सये! स्थापिता होय, अंकीं;
राहे नाथप्रसादें असुख न, निधिनें जेंवि रंकत्व रंकीं;
तेव्हां माझ्या, न मावे महभर सखिहो! मानसीं, त्यक्तशंकीं.
तों मामाजी विमानीं बसुनि तरणिसे शक्रसे पातले, ख[1]
व्यापूनि स्वप्रकाशें; स्तविति बहु तयां जोडिती हात लेख[2].
त्यांहीं स्वाराज्य[3], आम्हा निपट गमविलें, वंदितां पाय, सानें.
कीं, द्यावें प्राशितां जें सुख अमृतरसें, काय तें पायसानें? १४९
संसारीं असतात साधु, कुलज, स्नेहाढ्य, कै[4] सासरे;
मामाजी परि एक, यांसह दुजा साम्यास कैसा सरे?
पोटासीं धरिलें सये! मज शिरीं हुंगूनियां दाटले,
प्रेमें तात चि वाटले, नयनिंचे नाहीं झरे आटले. १५०
[5]अस्मदर्शनशोकें तृणसें सर्वस्व जीवित त्यजुनी
स्वर्गीं हि खिन्न होते; प्रीति नव्हे सन्मनांत सत्य [6]जुनी. १५१
मातें ते वदले, 'तुवां उपवनें, तैसीं च वत्से! वनें
केलीं; जें पतिभक्तिसद्व्रत सतीसर्वस्व, तत्सेवनें
भर्ता तारुनि संकटीं कविसभाश्रीसंपदे! वारिला
विश्वोपद्रव, जाहला तव तपें या कंप देवारिला. १५२
त्वां सूर्यवंश सुयशें सति! धन्य केला;
वैदेह धन्य, तुज पावुनि कन्यकेला.'
प्रेमें असा मज दिला बहु मान; लज्जा
सांगे मदीय नयनांसि 'पदीं च मज्जा.' १५३
स्वामीनीं, 'कैकेयीसासूबाईवरि प्रसाद करा,'
मामाजीपासुनि वर वारिला; गमला तयासि फार बरा. १५४
दशमुखवधप्रसन्नें शक्रें वर मागवूनि बहु हर्षें

---

१. आकाश. २. देव. ३. स्वर्गाचें राज्य. ४. कित्येक. ५. आमची भेट न झाल्याच्या शोकामुळें. ६. यापुढील कवितेला या (३७ व्या) पत्रावर सुरुवात करावयाला जागा असून हि केली नाहीं.

रणमृत ऋक्ष कपि यथापूर्व सकळ उठविले अमृतवर्षें. १५५
प्रार्थी साधु बिभीषण स्तवुनि कीं, 'लंकेंत या, चाकरा
द्या हें, पूजुनि घ्या, मनोरथ विभो! हा पूर्ण याचा करा.'
मत्स्वामी वदले, 'नको चि भरतावांचूनि; माजा चि तो,
जो सत्कार कपींस; त[1]च्छ्रम मला आप्तोत्तमा जाचितो. १५६
टळतां अवधि ज्वलनीं न चुकेल चि तो स्वकाय होमाया.
नश्वरवपुची, अ[2]वितथसंधा सुज्ञास, काय हो! माया? १५७
पुर दूर, मार्ग दुर्गम, अवधि दिवस एक राहिला आहे.
साहे भरत न संधालंघन, चिंता सुदुस्तरा बा! हे.' १५८
बिभीषण म्हणे, 'प्रभो! प्रणतकार्य जें साधितें,
प्रसन्न तुमचें असो हृदय, बा! नसो साधि तें.
पहा भरत पुष्पकीं बसुनि; स्त्व रक्षाल न
स्[3]वें कां नतविपत्तिचें करुनि सत्वर क्षालन?' १५९
पूजी बिभीषण महें सुगळा ससेना;
ज्ञात्यास इष्ट यश, वित्त असें असेना.
स्वामींस व[4]द्धकर पुष्पक हें बसाया,
त्या कीशपा हि म्हणति प्रभु हे, 'बसा, या.' १६०
विमानीं बैसले स्वामी, मज सादर वाहिलें.
वाहिलें बाइ! *अंकीं; हें प्रेम कोठें न पाहिलें. १६१
रणक्ष्[5]मा दावूनि, प्रभु मज कथा आयकाविती.
तसी अन्य ज्ञाते, कथितिल, मुखें काय कवि, ती?
सुमार्गें या पावे, हृदयहर हासे तुज पती.
भवीं जैसे साधु त्रिपुरहर हा सेतु जपती. १६२
कांहीं स्वामी, कांहीं लक्ष्मणजी, सांगती कथा सारा;
साराया, क्षिप्र पथ, स्वामींचा विरहताप ही सारा. १६३

---

१. भरतश्रम–**पंत**. २. सत्यप्रतिज्ञ अशा. ३. स्वसत्व. ४. हात जोडलेले (विभीषणभावजी). ५. रणभूमि. * हस्तदोष–**सुगळ.** अंकीं.

मत्स्वामीचा, माझा, अभिलाष जसा, तसी विमानगती,
नग, तीर्थाश्रम, गहनें, जगती, दावी; रुचे न कां मग ती? १६४
सुग्रीवराजधानी किष्किंधा, ती स्वयें चि जाणविली.
त्यां स्वामीतें प्रार्थुनि, ताराबाई क्षणांत आणविली. १६५
वर्षाकाळीं यांसि झाला जो भूभृत् साधु आसरा,
सासरा न कसा? केला तद्यशा जेंवि 'आ' सरा. १६६
पंपाख्या सरसी, स्वयें मग मला मत्स्वामिनीं दाविली;
माझी दे स्मृति यां[त] ती प्रियसखी मद्बुद्धिनें भाविली.
जी शिष्या शबरी मतंगमुनिची, तीची कथा लाविली;
तीतें त्यां म्हणतां 'सुधा,' स्वरसना हे बाइहो! चाविली. १६७
गोदावरी नदी जी, जें तत्तट, होय माय माहेर.
यत्पवन म्हणे जीवा, 'पद नियमा हो यमा, यमा हेर.' १६८
अश्रु तिघांस हि आले, मामाजींच्या विलोकितां चि वटा;
शुचि गुणमय तद्भव परभव यां अंतर, जसें पटा चिवटा. १६९
घटजादि सत्तपोनिधि विधिसम समयज्ञ यज्ञपर महित,
परमहिततदाश्रमपदशत दावित येति नाथ मजसहित. १७०
अत्र्याश्रमपद, बाई! सत्यपदाहुनि उणें नसे तिळ तें.
त्यां ओळखिलें, नमिलें, ज्यांत बहु शिव प्रवेशतां मिळतें. १७१
वदल्यें, 'सति अनसूये! लाजेल तुज्या सुधा सदाशीतें;
बहु निवविलें तव यशें, सर्वां विबुधा बुधा, सदा शीतें.' १७२
जो यशोधवळ, मान्य नंदिला, चित्रकूट नग, तो हि वंदिला.

---

१. राजा (सुग्रीव). २. सुधा जीपुढें अतितुच्छ तिला सुधेची उपमा दिली म्हणून. ३. यमा नियमा पद हो; मग यमास पहा पूजूनि व्यावयास—**पंत**. ४. तद्भव (त्या वटाचा जन्म) शुचि [व] गुणमय [असल्यामुळें] तद्भव व परभव (दुसऱ्या एखाद्या वटाचा जन्म) यां अंतर जसें पटा [आणि] चिवटा (सुताच्या गुंडाळ्यास) [असतें तसें आहे]. शुचि व गुणमय हीं पदें श्लिष्ट आहेत. ५. अत्यंत हितकर असे त्यांचे शंभर आश्रम.

तीर्थराज हृदयांत राहिला, श्रीप्रयाग बहु भव्य पाहिला. १७३
देखिली सूर्यकन्या; कां यमुना नमुना मग?
गंगा नेती पदा, पानें, जिष्णुच्या विष्णुच्या जग. १७४
ताराया जग, जे प्रयाग दुसरे मूर्त स्वयें राहिले,
पुण्याचे निधि, तीर्थतीर्थ चि, भरद्वाजर्षि ते पाहिले;
आम्हीं मस्तक तत्पदांवारि महाभाग्यें सये! वाहिले,
ज्यांच्या दुःसह कष्ट दारुण तसे आशीर्बळें साहिले. १७५
यत्पदाब्ज विजया नवसावें, तत्प्रियास्तव कसें न वसावें?
अर्पिलें अभय जें भरतां तें नाथ देति दुसरें भरतांतें. १७६
गुहें, पण भरतांचा[2] मानसीं आठवीला;
त्वरित पवनपुत्र स्वामिनीं पाठवीला.
पळ हि न निजले, त्या सांगतां सत्समाजा,
म्हणति, 'दिसति केव्हां दृष्टिला, वत्स, माझ्या?' १७७
तीर्थे, क्षेत्र, तपोवनें, मुनिजन प्रेमार्द्रधी पाहुनि,
स्वामी या विषया[3] पुरा विसरते, पुण्याश्रमीं राहुनी;
स्वर्गी न त्यजिते विरक्ति; नसती चित्तें सखीहो! ढिले,
आले, गाय तसे चि, वत्सभरतस्नेहें चि हे ओढिले. १७८
भक्तप्रेमवश प्रभु, प्रिय नसे यांला दुजें; काय ती
जातीनें शबरी, बरी गति जिला, भव्या दिली आयती?
बाईहो! गुह हा सखा भरतसा, जो गृध्र तो तातसा,
ज्यां न प्राप्त असे दयालु नसतां सत्कार होता तसा. १७९
त्रैलोक्यहृदयकंटक दशमुख त्याच्या समूळ उद्धरणें
मुलिहो! प्रसन्न झाले मामाजी अत्युदार शुद्धरणें. १८०
बोलिले, 'रघुपते! वर माग', ब्राह्मणेंद्र गमले पैरमाग,
मागती वर फळार्धि असा हे, कीं श्रितार्ति तिळमात्र न साहे. १८१

---

१. संपल्यावर. २. "पण गुहभरतांचा" असा उद्दिष्ट पाठ असेल काय? ३. देशाला. ४. कल्पवृक्ष—**पंत**. ५. फळांची विपुलता.

वाटले मुदितधी कपि नाकी[1], कां महावरद ते न पिनाकी[2]?
देतिल द्रवुनि कां न निरोप? म्लान हे भरत कानननि[3] रोप. १८२
अभीष्ट[4] बहु तें दिलें फळ गुहा तदा नवसल्या महाचळगुहा,
सये! प्रभुसखे खरे भरतसे परत्र न मुदश्रुचे भर तसे. १८३
मार्गे शत्रुघ्न आले कवि भरत महाभाग, मेघांसमोर
प्रेमें जें प्रेक्षिति क्षुद्रिकळ कवळितो हा गमे घांस मोर;
श्रीकंठीं बाष्प दाटे, न विजय मिळतां ही असा हर्ष वाटे,
जाणों ग्रीष्मीं तृपार्ता विपुळतर मिळे तें सुधावर्ष वाटे. १८४
भगिनीहो! या सासूबाईंचें पुण्य तों अगाध रणीं
आला जय, शत्रु भयें कांपुनि हें कांपवी अगा धरणी. १८५
सांब चि अरुंधतीपति केलें अस्मद्धिता सुतप याहीं,
यांची दया यशाहीं पोषी माता जसी सुत पयाहीं. १८६
श्रीसीता भगिनींतें अर्पी सांगोनि असि कथा रीतितें.
प्रभुचें पुण्ययशोमृत ईत सकळ ज्यांत रसिक थारति तें. १८७
'सीतारामायण' प्रेमें मयूरें रामनंदनें
श्रीरामचंद्रचरणीं आर्पिलें कृतवंदनें. १८८

इति श्रीरामनंदनमयूरविरचितं श्रीसीतारामायणं संपूर्णं ।

---

# हनुमद्रामायण

(गीतिवृत्त)

श्रीमारुतिची माता कीर्ति जगीं अंजना भली लाहे,
सत्पुत्रमुखें सेवी श्रीरघुपतिकंजनाभलीला हे. १
चरणनता आलिंगी, हुंगी माथां, न शुष्क राहूनीं
युद्धीं हि पुत्र हर्षें, पाहे मुख रम्य पुष्कराहूनीं. २

---

१. देव. २. शंकर. ३. अरण्यांत. ४. जलोद्धतगतिवृत्त. ५. सुखातें. ६. स्थिर होतात. ७. या गीतींत प्रस्तुत रामायणाचा हेतु व्यक्त झाला त्र आहे. ८. म्लान.

त्यासि पुसे, 'सांग मला प्राप्त तुला परम हर्ष वत्सा ! जो;
त्वत्कुशळवृत्त मातें निववुनि बा ! अमृतवर्षवत् साजो.' ३
मारुति म्हणेः-रमापति दशमुखहननार्थ जाहला नरसा;
सुरसिक कवि तत्सुयशा सेविति, इच्छिति सुरांचिया न रसा. ४
प्रभु रूपें च्यार धरी दशरथदारोदरीं जनीनि ! 'राम'
ज्येष्ठा कौसल्येच्या पुत्राचें अमृतगर्वहर नाम. ५
कैकेयीपुत्र भरत, तनुज सुमित्रासुकुक्षिभव दोन,
ते लक्ष्मण शत्रुघ्न, न निवति सुकवि यद्गुणांसि न वदोन. ६
ने रामलक्ष्मणांतें गाधिज व्हाया निजाध्वरत्राण,
प्राण हरि ताटकेचे प्रभु एक चि सोडुनि प्रखर बाण. ७
शत अस्त्रें मुनि शिकवी, रक्षी तन्मख, पलाश मारूनीं,
तारूनि अहल्येतें, यश घे तत्पापशाप वारूनीं. ८
जनकाचा पण पुरवी त्र्यंबककोदंडदंड मोडूनीं,
सानुज होय ख्यात प्रभु चवघी तत्सुता हि जोडूनीं. ९
भूमिसुता श्रीसीता वरिली रामें रघूत्तमें स्वरतें,
शत्रुघ्नें श्रुतकीर्ति, प्रेमें सद्बुद्धि मांडवी भरतें. १०
लक्ष्मण हि उर्मिळेतें स्वीकारी, कवि जसा सुनीतीतें.
जी हे चतुर्विवाही गाती देवर्षिमुख मुनी तीतें. ११
प्रभु दे भृगुरामातें शांति, म्हणे, 'उग्रता नसे उचिता.'
तो वदला, 'उचितज्ञा ! तुज न लवुनि मूढ कां न सेउ चिता ?'
दुर्बुद्धि मंथरेतें शिकवुनि शक्रादि देव आर्यपर
कैकेयीच्या मतितें दूषविति दशास्यहननकार्यपर. १२
ती स्ववर पतिस मागे, 'राम चतुर्दशसमा वनीं राहो,
द्या हो ! हें मज, भरत चि अभिषेका पात्र निश्चयें हा हो.' १४
पितृसत्यपाळना प्रभु कैकेयीचें न चित्त मोडून,

---

१. माते अंजने ! २. आत्मरूपीं रममाण होणाऱ्या रामानें. ३. 'चांगदेवपासष्टी' यासारखा च हा शब्द आहे. ४. आर्यश्रेष्ठ.

जोडून स्वगुरुजना हस्त निघे निजपुरासि सोडून. १५
सीतालक्ष्मणयुक्त प्रभु आला चित्रकूटशिखरीतें,
माते ! ज्याचें नाम स्वरतांवारि अमृत नित्य विखरीतें. १६
दशरथ राजा पावे हृत्प्रियशोकें म्हणोनि 'हा !' निधना,
केवळ लुब्ध जन जसा घडतां दैवेंकरूनि हानि धना. १७
भरत रडे, मातेचा तो स्नेह हि तापला पर[1] तवा[2] या[3],
ये शरण चरण नमुनि प्राणप्रिय आपला परतवाया. १८
भरत म्हणे, 'म्हणतील चि कैकेयीतोक विप्र पापरत
श्रीरामा ! चालवितो जो धार्मिक तो कवि प्रपा[4] परत.' १९
त्या प्रभु म्हणे, "करावें सत्य तुवां, म्यां हि बा ! जनकवचन;
म्हणती 'यापरि रक्षक पविचें ही' जाणते जन 'कवच न.' २०
सत्यवचन येईन चि मीं बा ! सरतां चि वर्ष चवदावें,
तों राज्य करीं वत्सा ! जें यश तें अमृतवर्ष च वदावें." २१
वदला भरत, 'न घडतां हें, होमिन पावकांत देहातें,
जातों राज्य कराया, आपुलिया पादुका चि दे हातें.' २२
निजपादुका समर्पुनि भरत फिरविला, पुरीं न शिरला गे !
दंडकगहनीं प्रभुचें अत्र्यादिद्विजपदांसि शिर लागे. २३
श्रीसीतेसि हरी, दे अत्युग्र विराध, अंजने ! त्रास,
तो मारुनि उद्धरिला तुंबरु, बहु गाय कंजनेत्रास. २४
देवुनि अस्त्रें लावी स्वयशातें प्रभुवरा घटज गाया,
निववी प्रवरा[5] स्वच्छा स्वच्छाया करुनि जो वट जगा या. २५
प्रभुसख गृध्र जटायु प्रभुनें वंदूनि निवविला साचा,
केला वरप्रसादें प्रासादप्रवर शिवविलासाचा. २६
गोदावरीतटीं जी पंचवटी, तींत रचुनि दलशाला
वसतां शूर्पणखा ये, त्या प्याया अमृतपूर्णकलशाला. २७

---

१. परंतु. २. पात्रविशेष. ३. भरतास. ४. धर्मपोय. ५. उत्तम अशी.

प्रभुसंगपुरोडाशा[1] वांछी ती रावणस्वसाकुतरी,
लक्ष्मणकरवाळ तिच्या कर्णघ्राणांसि तत्क्षणीं उतरी. २८
तीचा भ्राता क्रोधें ओंठ मणगटें खळेश खर चावे,
चवदा हजार राक्षस आणी, प्रभुबाण म्हणाति 'खरचावे.' २९
प्रभुच्या प्रखर शराहीं सकटक तत्काळ खर खरचला, गे!
माते! दशकंठमनीं या भंगें[2] फार खरखर च लागे. ३०
कपटकनकमृग दावी, सीतेच्या मतिस दृष्टिस भ्रमवी,
गमवी प्रिय ती प्रभुला, धाडूनि धरावया वनीं श्रमवी. ३१
त्या मायाहारिणोरीं प्रभुबाण प्राणहर जसा लागे,
'हा सीते! हा लक्ष्मण!' ऐसें तो आर्त रामसा गागे. ३२
पति पीडित मानुनि भी श्री, प्रार्थी देवरास रक्षाया;
तो हांसे, 'कपट' म्हणे, कीं प्रभुचें तेज विदित दक्षा या[3]. ३३
शोकें क्रोधें भक्ता भलतें चि वदे, न दे अभय, दवडी,
तों चि तितें दुष्ट हरी. मुक्ता चि भ्रांतदृष्टिला कवडी. ३४
जारि तो मदांध रावण 'काय करावें[4]?' म्हणे, 'जड गिधानें'
रथ भंगुनि सोडविली परि सून जटायुनें बळानिधानें. ३५
खड्गें पक्ष च्छेदुनि गेला खळ जानकीस वाहून,
ती ऋष्यमूकगोत्रीं नग टाकी पांच कीश पाहून. ३६
लंकेंत अशोकवनीं ठेवी, मृदु न करि तो पलाश मन,
सीता म्हणे, 'प्रसन्न हि खळ अहित चि, हित चि कोपला शमन[5].'
भेटे वनांत लक्ष्मण, वृत्त कथी प्रभुसि, 'हाय!' तें वदवी;
धांवुनि येतां उटजा झाली बहु दूर दुस्तरा पदवी[6]. ३८
प्रभु 'हा!' वदे न दिसतां उटजीं बाहिर हि ती अनादि सती,
दोघे ही दाशरथी हृतधनसे शोधितां वना दिसती. ३९
मूर्छित जटायु पाहुनि 'हा तात!' म्हणोनि ते गळां पडले,

---

१. यज्ञांतील हवनीय द्रव्यशेष. २. पराभवानें. ३. लक्ष्मणाला. ४. हस्तदोष–**करावें**. ५. यम. ६. स्थान.

रडले, वदले, 'आम्हां शोकद परघात सर्वथा घडले.' ४०
तो कथि, 'पक्ष च्छेदुनि रत्न उडविलें दशाननें, त्या तें
राहुसि अमृत वारिल कां? सद्वसुंसि[1] असी दशा न नेत्यातें.' ४१
प्रभु उत्तरकार्य करी सुतसा, स्वजना कदापि न विसंबे,
स्तंबेरमासि[2] धांवुनि करुणार्णव हा चि दे सुगति, अंबे! ४२
स्वकळत्र प्रभु गहनीं तेंवि, जसें परम तृषित पय शोधी,
जो सफळ करी दावुनि मुक्तिप्रद चरण ऋषितपयशोधी. ४३
योजनबाहु भयंकर खाया या सानुजा धरि कबंध,
त्याचा हरितां त्यां[3] न श्रमहर बहु होय यां[4] बरिक बंध. ४४
ऐकोनि कबंधमुखें शबरीच्या परमशुद्धरीतीतें,
दर्शन देउनि घेउनि पूजुनि करुणाब्धि उद्धरी तीतें. ४५
पंपातीरीं, माते! प्रभुहृदयीं विरहताप बहु मांते[5],
मुनि जाणति महिमा ते प्रभु[6] चि, नच विलाप परमनीं मांते[7]. ४६
शस्त्री दूरुनि पाहे सुगळ, बहु त्रास[8] तन्मनीं दाटे,
वाळीनें पाठविले तापसवेषें वधार्थ हें वाटे. ४७
शोधार्थ मला धाडी द्विजवेषें, त्यां विचारिलें 'आर्य!
वल्कजटाधर शस्त्री कोण तुम्हीं? काय या वनीं कार्य?' ४८
आर्यप्रेरित लक्ष्मण सांगुनि निजवृत्त तो वदे, 'बा! हे
आम्हीं सुगळा आलों शरण, असें कार्य आमुचें आहे.' ४९
सुगळा भेटविले त्यां पृष्ठीं वाहोनि ऋष्यमूकनगीं,
प्रभुनें सख्य करुनि तो केला सुग्रीव धन्य धन्य जगीं. ५०
दावी नग सुगळ, पुसे प्रभु, 'वत्सा[9]! सांग हे तिचे काय?'
'हीं तीं च नूपुरें' जों सौमित्रि, प्रभु हि तों म्हणे 'हाय!' ५१
प्रभु बळ कळवी अनुजप्रियदाररता वधूनि वाळीतें,
तद्राज्यश्री स्त्री हीं देवुनि जननि! स्वमित्र पाळी तें. ५२

---

१. उत्तम धनास. २. गजेन्द्रास. ३. कबंधाला. ४. रामाला. ५. माजला. ६. समर्थ. ७. समावते–पंत. ८. भय. ९. लक्ष्मणा!

मेळवि सुगळ कपिबळें, सीताशोधार्थ पाठवी योध,
धुंडाळितां दिशात्रय कोणाला ही न लागला शोध. ५३
अग्रज जटायुचा जो सांगे तो शोध साधु संपाती,
"लंकेंत अशोकवनीं दिसती, म्हणती असूंस 'संपा' ती." ५४
दे वृद्ध जांबवान् मज करुनि स्तव कथुनि शक्ति उत्साहा,
त्वत्पुण्यें प्रभुतेजें दुर्घट कर्मीं वरी न कुत्सा हीं[1]. ५५
ज्यां उडतां रंजविलें मैनाका त्या हि नागमातेतें[2],
प्रभुचरण चि यश देती, जे निगमां[3] वंद्य आगमां[3] ते तें. ५६
मज सिंहिका समुद्रीं माते! छाया धरूनि आकर्षी,
उदरीं शिरोनि वधिली तेव्हां होय प्रसन्न नाकर्षी. ५७
शिरतां पुरीं प्रदोषीं[4] मजसीं लंकाधिदेवता कळहा
बळहानि व्हावया करि, 'हा!' म्हणवी तीस जरि नव्हे खळ हा.
शिरलों पुरींत मग मीं प्रकटुनि होतां प्रवृत्त सांज रया;
किति लक्षुनि हि न लक्षिति लघुदेहा, म्हणति मूढ 'मांजर' यां[5].
माते! पुर तें पुरतें द्विषदंतःपुर हि सर्व धुंडाळी
शत्रूष्णीष[6] स्पर्शायोग्य[7] म्हणुनियां चि हा न गुंडाळी. ६०
झालों साधि न देवी आढळतां, शोक फार मनिं केला;
मीं सेवटीं पहाया माते! गेलों अशोकवनिकेला. ६१
श्री राक्षसींत भाग्यें देखिलि वृक्षीं हळू च वेघोन,
त्वत्सुत तद्दर्शन तिळ तुळित्यांसि न चातकोन मेघोन[8]. ६२
श्रीदृग्गंगेंत कठिन तो राहे का न नींच कोरा[9]? तें
तद्दर्शन मंज जैसें शशिदर्शन काननीं चकोरातें. ६३
तों ये दुष्ट, कसा तद्दुर्वाग्व्यापार तुज कथावा गे!?
सति! या त्वदपत्यमुखीं जी श्रुतिसी ती च शुचि कथा वागे. ६४

---

१. मी मारुति. २. सुरसेतें. ३. वेदशास्त्रांला. ४. सायंकाळीं. ५. मला. ६. शत्रूचें शिरस्त्राण (पागोटें). ७. स्पर्श करण्यास अयोग्य. ८. चातकाहून किंवा मेघाहून तिळभर हि कमी नाहीं. ९. न भिजलेला. १०. हस्तदोष—**मच**.

धर्मन्यायमयी ती आर्या तेजें वदे असी वाणी,
लागे त्या खळहृदया, तिळ हि धृति धरूं न दे असीवाणी[1]. ६५
दासींस कथि, "अवश्य चि हे हठ सोडुनि वंदो[2] न मां[2], 'समज
स्वहितार्थ' म्हणा; द्या[3] मग मास इचें, परि न दोन मास मैंज[3]." ६६
ऐसें बोले, दापी, खाया गोब्राह्मणांसि जो कापी,
जाय क्षोभुनि पापी त्यातें 'तूं भस्म हो' असें शापी. ६७
मरतां देता झालों दशरथमहिपा दयामतिसमुद्रा
वर्णुनि मीं श्रीराम स्वामीस हि पादयाम[4] तिस मुद्रा. ६८
झाली बहु प्रसन्ना मजवरि न दुजी असी महासदया;
प्रभुला निरोप सांगे, विश्वा व्हाया असीम हासद या. ६९
सर्व कुशल वृत्त पुसे, दे चूडामणि निरोप परमाशी[5];
मम तनु निघे, मति नुठे, न सिता[6] त्यजि लब्धतृप्ति पर माशी.
उपवन अखिल खळसुत अक्ष मथुनि मीं बळें चि सांपडलों.
घननादब्रह्मास्त्रा; परिस जननि ! संकटांत[*] कां पडलों? ७१
प्रभुबळ कळवुनि वळवुनि हितबोधें दुष्टधी हि रक्षावा,
लक्षावा न कुडें काळें गृध्रादिकीं न भक्षावा. ७२
बांधुनि नेलों गेलों शत्रुजवळ, अपयशें न मळलों मीं,
तुझिया धन्यें स्तन्यें माते ! माझ्या पवीड्य[7] बळ लोमीं. ७३
वदलों हित, परि न वळे, खवळे धवळेतर[8]प्रकृति खळ तो,
वळतो, असतां आयु, प्राणी, सरतां चि शलभसा जळतो. ७४
माते ! मज माराया उपसी दशमुख सभेंत करवाळा,
तदनुज साधु बिभीषण वारी त्या करुनि यत्न अरवाळा[9]. ७५
मीं शस्त्रास्त्रावध्य त्वत्पुण्यें, म्हणुनि ये मला हास्य,

---

१. तरवारीसारखी. २. मा (नाहीं) न=होय [असें] वदो=वश होवो, असा भावार्थ. ३. दोन मास न परि मग (दोन महिने वाट पाहून नंतर) इचें मास मज द्या. ४. घटकाभर. ५. उत्तम आशीर्वाद. ६. शर्करा. ७. वज्रानें स्तुति करण्याजोगें. ८. तामस. ९. दांडग्याला. * हस्तदोष—**संकटात**.

आस्य प्रेक्षी न रिपु, क्रोध मनीं लोचनीं करी लास्य. ७६
मद्दुर्दशार्थ करवी माझ्या दशकंठ दीस पुच्छातें,
लंका जाळुनि दिधलें दुष्कृतफळ त्या अतीव तुच्छातें. ७७
माझें श्रीचें रक्षण तेटकारुनि[1] पावकास तो करवी,
ज्या प्रभुपदप्रतापा म्हणतो 'बा! मीं त्वदीय तोक' रवी ७८
विझवुनि पुच्छ समुद्रीं, वंदुनि देवीस जननि! शतगावें
जलधि उडुनि मीं आलों, या कर्मीं अन्य तेज न तगावें. ७९
ध्याना नामा प्रभुच्या हा न विसरला चि अंजने! त्रात्या,
चूडामणि दे, सांगे कुशळसमाचार अंजनेत्रा[2] त्या. ८०
प्रभु करि वरप्रसादा चरणीं* होतां चि नत वतन यातें,
आलिंगन वर्णन वरि पाहों दे आइ! न तव तनयातें. ८१
निववि मम परिष्वंगें[3] श्रीविरहेंकरुनि सव्यथोरें[4] पण,
भक्तीं प्रभुचें अतुळ प्रेम कृतज्ञत्व भव्य थोरपण. ८२
प्रभु ऋक्षकपिबळांचे पति सुग्रीवादि वीर बरवे घे,
लक्ष्मण वालिसुतावर, मैंजवर रघुवीर धीरवर वेघे. ८३
बहु बळसमूह पावे जिंकाया सागरासि सागरसा,
कन्याहरमथना[6] नग धाडी जाणों धरूनि राग रसा. ८४
त्यजिले बिभीषणें खळ, 'रघुपतितेजाचिया मरा लेशें,'
हें वदुनि प्रभुपदयुग वरिलें, मानस जसें मरालेशें. ८५
जें लंकाराज्य प्रभु दे त्या शरणागतासि नमितां तें;
हें यश करी नतिस्तुतिरत लज्जित मुदित सतत अमितांतें. ८६
भिउनि प्रभुप्रतापा सागर भेटोनि निववि आगमनीं,
गतिहेतु सेतुयुक्ति स्तवुनि कथि, प्रभु धरी न आग मनीं. ८७
नळ सेतु रची पांचां दिवसां त्याची हि अंजने! रुंदी

---

१. आज्ञा करून. २. सुंदरनेत्रा. ३. आलिंगनानें. ४. व्यथायुक्त उर ज्याचें असा. ५. हें पद मुळांत द्विरावृत्त झालें आहे. ६. पृथ्वी आपली मुलगी सीता हिला हरण करणाऱ्या रावणाच्या शासनासाठीं. * हस्तदोष-**चरणीं होता.**

दश योजन, शत लांबी, झाले पाहुनि सुरर्पि ज्या तुंदी.[1] ८८
जननि ! अहोरात्रत्रय उतराया त्या पथें बळा लागे,
सुगळ सुवेळगिरिवरुनि उडुनि नियुद्धीं छळी खळाला गे ! ८९
वेढुनि लंका प्रभुवर, अंगद सामार्थ पाठवी; त्यातें
धरवी खळ. कपि सुखवी प्रभवादिक[2] पुत्र साठ वीत्यातें. ९०
मग युद्ध होय भारी, न गणिति कपिवीर आहवायास,[3]
राक्षसवीर हि लाविति रुधिरांचे पूर वाहवायास. ९१
मेघरव श्मश्रु पिळी, सबळ प्रभु शरघनें रणांत खिळी.
सर्वांतें मोह गिळी, पाडी उत्साहशक्ति शत्रु शिळी. ९२
जांबवदुक्तें हरगिरिसख[4] ओषधिनग तदीयशिखरा या
हस्तें घेउनि आलों, प्रभुयश लोकत्रयांत विखराया. ९३
त्या दिव्यौषधिवातें उठले पात्या न लागतां पातें,
ज्यासि न म्हणवे 'हा!' तें प्रभुसह बळ सर्व कोंदलें शातें.[5] ९४
प्रभु कप्याखुड्याळा घटकर्णा वज्रभृच्चमूकाळा
कटकें देतां टाळा वधुनि रडवि सकळयातुभूपाळा.[6] ९५
कविवर गाती त्राता ज्या घेत्या नाम नागपा[7] शतशा,
लक्ष्मणसहिता बांधी घनरव घालूनि नागपाश तशा. ९६
देवीस दुष्ट दावि दयितासह देवरा हि तदवस्था,[8]
त्रिजटोपदेश झाला तद्धृदया, घन जसा हित दवस्था. ९७
केला सानुज राम प्रभु पन्नगपाशमुक्त खगपानें,
या सद्यशोमृताच्या झालें परितृप्त सर्व जग पानें. ९८
मग तो घनरव मायासीतावध दाखवी रणीं माते !
येता जरि न बिभीषण, तरि अस्मत्प्राण तत्क्षणीं जाते. ९९
आम्हां मोहुनि करितो अमरत्वप्रदरथार्थ होम हि, तें

---

१. हर्षभरित. २. प्रभवादिकरून साठ पुत्रांचा पिता नारद त्याला. ३. युद्ध-श्रम. ४. कैलास पर्वताचा मित्र द्रोणागिरि. ५. सुखानें. ६. रावणाला. ७. गजेन्द्राला. ८. त्यांचा अंत.

कळतां लक्ष्मण वधि त्या, 'तव[1] नाम' म्हणे 'यथार्थ[2] हो' महितें.
शोकामर्षाकुळ खळ घे सीतेतें वधावया असितें,
साधु सुपार्श्व निवारी त्या, ज्या कर्में समें सितें असितें. १०१
मग खळ बळ बहु धाडी, त्यातें प्रभु खरशरव्रजें ताडी,
मदगद सर्व हि झाडी, दों चि मुहूर्तांत तें रणीं पाडी. १०२
ताप खळा[3] हतरक्षःस्त्रीकोटींच्या तदा विलापानीं
जेंवि दिला, मरणारा तेंवि विषानीं न दाविला पानीं. १०३
स्वमरणपरवधनिश्चय करुनि निघे सर्वशेषबळसहित,
ज्या विषय बाह्यरंगें वाटे जैसा जडासि पळस हित. १०४
कमळवन क्रुद्ध करी[4] रगडी, बळ तेंवि उग्र युद्ध करी,
कपिवीरमुक्त शिखरी ते पिष्ट करुनि दिगंतरीं विखरी. १०५
श्रीमल्लक्ष्मणजीचें वक्षस्थळ शत्रु शक्तिनें फोडी,
सोडी उष्ण श्वास, प्रभु दशकंठासि ते क्षणीं मोडी. १०६
म्यां आणिलें पुन्हां तें शिखर सदोषधि, सुधासमरसाचा
स्तव याचा[5] हि प्रभु कारि, तो अत्यद्भुत बुधा समर साचा. १०७
सप्त अहोरात्र प्रभु शतमन्युरथीं बसोनि समर करी,
झाले रघुपतिदशमुखबाणरवें विमद सर्व अमरकरी. १०८
शिर एकैक दहादां दश हि असीं तोडितां तसीं च शिरें,
जननि! नवल तें, म्हणती, 'प्रभुहृदया! आधिच्या रसीं च शिरें.'
मंत्र घटज दे प्रभुला त्यातें जपतां चि विजयवर हि रवी,
दावी अंतःपक्का परि अजित मनुष्यरीति वर[6] हिरवी. ११०
उर भेदुनि अरि वधिला तो ब्रह्मास्त्राभिमंत्रितें बाणें,
प्रभुसि वरुनि विजयश्री कीर्तिसितेचीं[7] दिशांसि दे वाणें. १११
माते! सेवित होते पुष्कळ पीयूष सुरस पारि वारि[8];

१. पृथ्वीचें नांव. २. सार्थ (मह=आनंद व मही=आनंद देणारी). ३. दुष्ट रावणाला. ४. हत्ती. ५. माझा हि. ६. ही मनुष्यरीति जरी वर दिसण्यांत अपक्क दिसली तरी आंत ती पक्क च होती, असा भाव. ७. कीर्तिरूप साखरेचीं. ८. जमाव.

हा चि निवावि शिवविधिमन, झाले परितृप्त सुर सपरिवार. ११२
गीतध्वनिस्तुतिध्वनिवाद्यध्वनिपुष्पवृष्टिलक्षा या
न पुरे ब्रह्मांड, प्रभुरुचिस हि शक्रादिदृष्टि लक्षाया. ११३
अग्रजशोकें माते! साधु बिभिषण करूनि 'आ' रडला;
दशवदनस्त्रीजन ही शव हृदयासीं धरूनि आरडला. ११४
रडती, स्मरती शोकें मंदोदर्यादि ज्या प्रिया केली;
त्यांतें सांत्वुनि सुजनें प्रभुवचनें उत्तरक्रिया केली. ११५
अभिषेचिला बिभीषण विधिनें लंकेंत लक्ष्मणें आंगें,
मग मज म्हणे प्रभूत्तम, 'जा वत्सा! विजय देविला सांगें.'
शतदा आर्या हि पुसे, म्यां ही कथिला तिला विजय शतदा;
सच्छ्रुतिस तसें तीस हि वांटे प्यावें चि तें निजयश तदा. ११७
वदली, 'देय नसे बा! त्वां भरिलें अमृत चांगलें कानीं,
तुजसारिखें श्रमविलें गुर्वर्थ न हृदय आंग लेंकानीं.' ११८
वदलों, "दुष्टा दासी, यांतें म्हण मार, देवि! वर दे हा,
वरदे! 'हाय!' म्हणुनि तूं वदलिस भूमीस 'दे विवर देहा.''
या मद्वचनें माते! श्री कांपे, जेंवि मारुतें कदली;
'अबळा अस्वाधीना वत्सा! वध्या न या' असें वदली. १२०
वदलों मीं आर्येतें, 'तूं प्रभुची साधुरीति मूर्तिमती,
त्वद्वात्सल्यें झाली माझी प्राप्तप्रमोदपूर्ति[1] मती.' १२१
'लब्धाभया त्रिलोकी झाली, हे स्त्री नसो असामा[2], न्या.'
प्रभुला सांगाया श्री साश्रु कथि निरोप ती असा मान्या. १२२
ऐकुनि निरोप सांगे श्रीरामबिभीषणा, 'सती सरमा
परमा पूजा करि, हरि जाणे खळभीषणास[3], तीस रमा.' १२३
नेली बिभीषणें, करि दिव्य श्री म्हणवि अंजने! 'हा!' तें.
देवर्षिमुखें कठिन क्षणभरि त्या विश्वरंजनेहातें[4]. १२४

१. जिला पूर्णपणें आनंद प्राप्त झाला अशी (मति). २. अप्राप्तसांत्वना—**पंत.**
३. दुष्टाला भिवविणाऱ्या रामास. ४. विश्वरंजनाची इच्छा ज्याला अशा रामाला.

अग्न्यादिब्रह्मांत स्तविति प्रभुतें तसे चि देवीतें,
दशरथ हि महाराज स्वसुतयशोमृत यथेष्ट सेवी तें. १२५
पुत्रस्नुषांसि भेटुनि भूप निवे बहु, न हा निवे नाकीं;
द्विजशाप तापवी या, घडली येणें चि हानि वेना कीं. १२६
शक्रकृतामृतवर्षें[१] मृत उठुनि करिति निकाम कपि लास्य,
या प्रभुयशासि वर्णी सदभिमत वरद हि *काम कपिलास्य[२]. १२७
विनवि बिभीषण सानुज सबळ प्रभुचें सभाजन कराया,
तासि या हि मानवे बहु जासि साधूंची सभा जनकराया. १२८
प्रभु कथि, 'पूजावा त्वां सबळ सुगळ मत्समान सत्वरतें,
द्रुत घडिव भरतदर्शन, देखाया वत्स मानस त्वरतें.' १२९
पूजुनि सबळ सुकंठा प्रभुसि बसवि दास पुष्पकविमानीं.
मधुपपति घनश्यामा सुरतरुचें यास पुष्प कवि मानी. १३०
सबळ सुकंठ बिभीषण घेउनि भेटोनि अवनिभर तातें
दिधला उतरि, दयाघन विसरे जो पळ हि न वानि भरतातें. १३१
पुरभरतप्रभु यांचें माते! त्यां प्रेम काय सांगावें?
हंसां न मानसीच्या श्रीसाकेतस्थवायसां गावें. १३२
विश्वा तसा न होय प्रभुला राज्याभिषेक हर्षद; या
श्रीरामघनाची करि नतमोराउपरि अमृतवर्ष दया. १३३
श्रीनें निजकंठींचा मुक्ताहार प्रसाद हा हातें
देतां जें मज्जाड्य प्रलया पावे म्हणोनि 'हा हा!' तें. १३४
माते! प्रभुदत्तवरें लोकीं झालों असें चिरंजीव,
प्रभुजवळि सुवर वरिला 'सुयशें धालों, असें चि रंजीव.' १३५
सर्वत्र असे स्नेह प्रभुचा मजवरि च परि परम तो कीं,
कार्याक्षमीं[३] हि माते! ताताचा जेंवि बहु चरमतोकीं[४]. १३६
जननि! प्रभुप्रसादें झालों मीं धन्य धन्य मूर्धन्य[५],

---

१. 'मृतवर्षें' ह्या चार अक्षरांची द्विरावृत्ति झाली आहे. २. कपिलऋषीचें मुख. ३. कार्य करण्यास असमर्थ अशा. ४. शेवटल्या बालकावर. ५. श्रेष्ठ. * यथेच्छ.

स्तन्य तुझें कौसल्यास्तन्यसम स्तुत, असें नसे अन्य. १३७
प्रभुचरण पाहिले ज्यां त्वत्पुण्यें तेधवां [1]महालग्न;
भग्न भ्रांत न झालों, होतों सेवामृतहृदीं मग्न. १३८
श्रीरामभरतलक्ष्मणशत्रुघ्नांचे विलोकिले चरण,
स्मरण न झालें चि तुझें, तद[2]दर्शन तें चि वाटलें मरण. १३९
प्रभुच्या वरें मजपुढें प्रभुयश गंधर्व अप्सरा गाती,
आधीं च आदिकविकृति मन हरि, भुलविल न कां स[3]रागा ती? १४०
रामात्मजें मयूरें हें श्रीरामप्रिय पाहिलें,
तत्पदीं 'हनुमद्रामायण' वंदुनि वाहिलें. १४१

इति श्रीरामनंदनमयूरविरचितं श्रीहनुमद्रामायणं संपूर्ण।

---

१. सुमुहूर्त. २. त्यांचें अदर्शन. ३. प्रीतियुक्त.

# रामायणपंचशती[1]

## बालकांड[2]

(साकीवृत्त)

**गातां रामचरित्रास । स्मरमुख[3] धरिति अरि त्रास. ॥ ध्रुवपद ॥**

**श्रीरविकुळमणि दशरथ राजा शतमखसख शूरवर,**
**ज्याचें अरिकुळसह दुरित पिटित यश गेलें दूरवर. १**
**अनपत्यनृपासि म्हणे चिंताज्वर उतला 'भाजीन,'**

---

१. पंतानीं आपल्या अष्टोत्तरशतरामायणांचें नामकरण निरनिराळ्या दृष्टींनीं केलें आहे. कांहींचीं नांवें त्यांच्या मंत्रवद्ध रचनेला अनुसरून तर कांहींचीं योजलेल्या वृत्तावरून, कांहींचीं रचनाविशेषावरून तर कांहींचीं अविशेषामुळें विशिष्ट असें झालें आहे. अगोदर नांव व मागाहून रचना किंवा अगोदर रचना व मागाहून नांव देण्याचा पंतांचा प्रघात होता हा एक चिंतनीय प्रश्न आहे. प्रस्तुत रामायणाच्या च दृष्टीनें विचार केला तर या रामायणाची पद्यसंख्या पांचशेंच्या वर जातां कामा नये, व पंतानीं जेथें संख्येचें बंधन पतकरिलें आहे तेथें त्याचें उल्लंघन केलेलें नाहीं. असें असतां या रामायणांतच बंधनाचें उल्लंघन झालेलें कां दिसतें? मूळ पोथी पाहिली असतां अशी एक मौज दृष्टीस पडते कीं, क्रमांकांच्या बाबतींत पंतांच्या लेखणीकडून अनेक वेळां मनोरंजक प्रमाद घडले आहेत. ७५–७९ च्या ऐवजीं ३५–३९ क्रमांक पडून पुढें मात्र ८० पासून क्रम आहे. यापुढें २२० बद्दल २३० असा क्रम सुरू होऊन २८८ व ३४१ यांची द्विरावृत्ति, तसें च ३६६ च्या ऐवजीं ३५६ असा मागच्या पावलावरून क्रम सुरू होऊन पुन: ३६६ व ४९४ यांची द्विरावृत्ति, अशा रीतीनें आंकड्यांची कवाईत झाल्यामुळें पंतलिखित पोथींतील संख्या वास्तविक संख्येपेक्षां चारानीं कमी म्हणजे उपसंहाराचा श्लोक रीतीप्रमाणें सोडतां बरोबर ५०० भरली व ही पहातां च कवीनें हि मोठ्या आनंदानें 'रामायणपंचशती' असें गोड नांव दिलें, असें वाटतें. २. मूळांत कांडवारी केली नाहीं, ती येथें सोयीसाठीं केली आहे. ३. कामप्रभृति (शत्रु).

परि पात्र होय गुरुमखसुकृतें तो सुतलाभा जीन. २
प्रभुसि विनवि विधि, 'हो खळदशमुखनाशास नरसमान,
अमृताधिक पावेल चि खळजनता शासनरस मान. ३
अंशें झाले कपि ऋक्ष सुरज्वलनादि हरिसहाय;
म्हणवाया त्या अतिमदमत्ता सर्वजगदरिस 'हाय!' ४
भक्तसुरद्रुम जगदवनव्रत जो वरद उदारांतें,
मूर्तिचतुष्टय धरि, नरपतिच्या धन्य करि सुदारांतें. ५
कौसल्यासुत राम सुगुणनिधि, कैकेयीसुत भरत,
लक्ष्मण शत्रुघ्न सुमित्रासुत, सर्व हि सदय शुभरत. ६
वाढति मूर्त महोत्सव बरवे सुगुणगणांसह अवघे,
चवघे सुत आलिंगुनि दशरथ निरुपम सुख नवनव घे. ७
निवविति सुजनचकोरांच्या ते राकोडुप[1] नयनांतें.
अर्थी सुखउनि रघुराज करी त्यांच्या उपनयनांतें. ८
होय वसिष्ठ जगद्गुरुगुरु कीं सद्विद्या दे त्यांतें,
शिष्य करूनि प्रणतां सर्वां सद्विद्यादेत्यांतें. ९
गाधिज ये, पूजुनि त्यासि म्हणे दशरथ नृप, 'बा! ज्ञात्या!
ज्या कार्यें तव येणें, करिन चि मीं, करितां आज्ञा त्या.' १०
मुनि सांगे, 'ऋष्यामिष[2] भक्षुनि, सेवुनि मद्या, गाते
दशमुखयश जे तदनुग पीडिति येवुनि मद्यागा ते. ११
राम सलक्ष्मण मख रक्षाया मज दे चि महाबाहो!
वेचुनि तप, अपराधी दंडुनि, ऋषि रिक्त न हा बा! हो.' १२
नृप वचके, नच केवळ लोभी, परि भी सुतविरहातें;
गुरुवचनें दे, म्हणवि न भेटुनि जें सत्सुख चिर 'हा!' तें. १३
मार्गी क्षुधा तृषा सुकुमारा तिळमात्र न बाधाया,
दोन बळातिबळा विद्या दे सानुजदेवा धाया. १४
वधवि ताटका, शत दिव्यास्त्रें दे सुतपोराशि कवी,

---

१. पौर्णिमेचा चंद्र. २. ऋषींचें मांस.

अतुला विद्या न निजा सोडुनि गुरु सुतपोरा[1] शिकवी. १५
ज्याचे चरण भवीं सुज्ञानीं जाया आधि जपावे,
त्या प्रभुसह निज सिद्धाश्रमपद भगवान् गाधिज पावे. १६
यज्ञायतन[2]द्वारीं ठाके प्रभु करवि प्रारंभा,
तों ये यातुचमू, मोहाया जसि वैरविप्रा[3] रंभा. १७
प्रबळ सुबाहु वधुनि तद्राक्षसकटकातें प्रभु बुडवी,
तेंव्हां पत्रि[4]पवन शतगावें मारीच्यातें उडवी. १८
तन्हि न ताटकासुत तो मेला, उडुनि समुद्रीं पडला,
झाला तापस, रघुवरखरशरसंत्रास मनीं जडला. १९
म्हणति श्रीस्तुत्याशींस[5] सगुरु[6] मुनिवरविप्र 'भुला'[7] जे
गुरुजनसमक्ष पूजा न वरी जन्हि बरवि, प्रभु लाजे. २०
तों मुनितें 'यावें यज्ञातें' जनक असें आमंत्री,
त्र्यंबक[8]दर्शनकुतुकिप्रभुतें प्रेमें ने हा मंत्री. २१
प्रभु करि रजें अहल्यावपुतें ध्यानें धौत मनातें,
प्रभुसीं पिता श्वशुर हें लाविति साध्वी गौतम नातें. २२
जनक निववि आलिंगुनि मुनितें, तीर्थें न वपु निवे तें,
न नृप श्रीमूर्तितें, चकोर चि पाहे नव पुनिवेतें. २३
गाधिजवचनें दशरथसुत हें जनकनृपा या समजे,
स्वसमाधिसमसुखें ब्रह्म असें त्यांस हि कवि यासम जे. २४
स्वमखावनसत्युद्धरणचरित[9] मुनिनें जनका कथिलें,
या पांवुनि इतर बळें तैसीं जैसीं कनका कथिलें. २५
त्र्यंबकचापविलोकनकाम हि रघुपतिचा जाणविला,

---

१. उत्तम तपाच्या ठिकाणीं आहे उर (मन) ज्याचें अशाला. २. आयतन= स्थान, मंडप. ३. शुक्राचार्याला. ४. पृ० १९९ टी० ५ पहा. ५. ऐश्वर्य, स्तुति आणि आशीर्वाद यांस. ६. विश्वामित्रासह. ७. रामास भुला. ८. येथें त्र्यंबक म्हणजे त्र्यंबककार्मुक असा अर्थ घ्यावा लागतो. ९. स्वयज्ञरक्षण व अहल्योद्धार हें कृत्य.

बहुशत भट आज्ञापुनि [1]तो त्या नरनाथें आणविला. २६
सीता प्रभुसि विलोकुनि वदली, 'तात जनक थोर, पण
घोर पण प्रकटुनि कळवितसे परम स्वकठोरपण.' २७
प्रभु नमुनि गुरुसि शिवधनुसि तया सज्य करी, आकर्षी,
मोडी, थोडी शक्ति प्रकटुनि, एक न भी नाकर्षी. २८
वंदुनि हृदयीं श्रीसांबातें मुदिता सीता बाळा,
वाळाया परवदनें घाली प्रभुच्या कंठीं माळा. २९
कौशिकवचनें जनकें दशरथ सगुरु ससुत आणविला,
स्वविचार 'तिघांसि तिघी कन्या द्याव्या' हा जाणविला. ३०
श्रीसीता श्रीरामासि वरी, मांडव्याख्या भरता,
देति उर्मिळा श्रुतकीर्त्याह्वा सुमति [2]येमातें वरता. ३१
वर्षे नृप पौरबळांवरि हि स्वंबरमणिकनकाहीं,
हर्षे रघुप, वदे, 'नातें बहु, वांछा आणिक न कांहीं.' ३२
दासी दास तुरग रथ हस्ती वस्त्रें रत्नें कनकें,
विपुळ दिलें प्रिय जामात्यांतें परमवदान्यें जनकें. ३३
प्रथम चि कन्यादानसुनिश्चय करवुनि कौशिक गेला,
जनक हि सानुज राम प्रभु ही विरहें व्याकुळ केला. ३४
घेउनि सकळ सकळत्रसुत नृप जनकाज्ञेतें परते,
परतेजा भार्गव भेटे त्या गमले नम्र हि पर ते. ३५
[3]विधिजन्मद तन्मद हरि, पावे साकेतातें हर्षे,
प्रभुच्या सुयशें सुजन निवविले जैसे बर्हा वर्षे. ३६
निजनगरासि युधाजिन्मातुळ ने सानुज भरतातें,
निश्चय केला स्थापायाचा रामीं भूभर तातें. ३७

## अयोध्याकांड

देव म्हणति, "दशवदन वधावा प्रभु या कार्या नर हा,
नृपदयिता कैकेयी च म्हणो या ती आर्या 'न रहा.'" ३८

---

१. त्र्यंबकचाप. २. लक्ष्मणशत्रुघ्नांतें. ३. ब्रह्मदेवाचा पिता ( राम ).

ब्रह्मादि अमर अशा विचारें मंथरिकामति हरिती,
करि ती कैकेयीधीभेदा, लोभा झाली धरिती. ३९
वरयुग देवूं केलें होतें तें ती अडवुनि मागे,
सत्यव्रतरतमति पतिस तिचें वाक्य करावें लागे. ४०
अभिषेकोत्सवसमयीं च रुसे, नृप साम वदे, विनवी,
'यश न मळिव, कळिव प्रिय, दाखिव रीति मज न देवि! नवी.'
ती बोले, 'हे दोन वर प्रिय घे' हें हर्षें च वदा,
भरत असो युवराज, राम वनवासी वर्षें चवदा." ४२
भूप म्हणे, 'सर्वस्व हि दयिते! घे, प्रेमा आठीव,
या वृद्धीं करुनि कृपा, न वनीं रामातें पाठीव.' ४३
न वळे कैकेयी, सुतशोकें पतिचें मन घाबरवी.
प्रभु वनवास वरी, दे कीर्ति स्वपित्या अनघा बरवी. ४४
गुरुसत्यव्रत संरक्षाया लक्ष्मण सीतासहित,
प्रभु पितृपद नमु निघे, द्याया साधुनि भीतास हित. ४५
बळकटसुतशोकव्याघ्र धरी नृपहरिणाचें नरडें,
आलें फार अयोध्येला, परि कैकेयीला न रडें. ४६
प्रभुसि सुमंत्र सचिव राजरथीं राजाज्ञेनें वाहे,
साहे पुरजन न क्षण विरह, प्रभुतें वेढुनि राहे. ४७
क्षुधिततृषितनिद्रितपौरांतें सदय हि ठकवुनि सोडी,
गोडी प्रभुकृतवंचन दावी बहु, अमृत निपट थोडी. ४८
भेटे प्रभु भक्त सखा जो त्या स्वविरहभीतगुहातें,
वाटे अमृत चकोरा भरवी प्रेमें शीतगुं हातें. ४९
वटदुग्धें रचुनि जटा होय प्रभु सानुज तापससा,
वल्कजटाधरमूर्ति ध्यातां हरि तद्भवताप ससा. ५०
गुरुसचिवासि 'गुरुकडे जा' हें कथि, बहु मानवरीती
प्रभु दावी, जी साधुसभेंत स्तुति बहुमान वरी, ती. ५१

---

१– चंद्र.

ज्याची कीर्ति सुदुस्तरभवजलनिधिपतितांची सुतरी,
त्यासि सखा गुह निजनौकेनें गंगापारीं उतरी. ५२
वंदी प्रभु प्रयागीं प्रेमें तातसखभरद्वाजा,
त्या मुनि सुखवी वेद कवि म्हणति नित्य सुखभरद्वा[1] ज्या. ५३
श्रीस उतरिती यमुनेंत प्रभु काष्ठमय करिति तापा[2],
जे नेती भवसागरपारीं, नामें चि हरिति तापा. ५४
करिति चित्रकूटस्थमुनींसीं प्रभु सहवास, वनाचे
गुण घेती पावुनि, ऋषिगणसा बहुमह वासव नाचे. ५५
तें प्रभुवृत्त गुहपुरुषकथित श्रवण करि सचिव, देहें
विकळें परते स्वपतिस, व्हाया मुदित अरिस चि वदे हें. ५६
'सुतशोकें मरण' असा कळवुनि कौसल्येतें शाप,
'राम! राम!' म्हणत चि असु सोडी, जोडी सुगति क्ष्माप. ५७
तैलीं स्थापुनि नृपवपु गुरुनें त्वरित भरत आणविला,
मातेनें येतां चि तया तो स्वकृतानय जाणविला. ५८
कैकेयीतें भरत परमगुरुविरहाकुळतनु गांजी,
गुरुघात करुनि शोकीं बुडवी दुष्प्रज्ञा[3] अनुगां जी. ५९
त्या मंथरेसि मारित होता शत्रुघ्न क्रोधानें,
भरत निवारी त्यातें प्रभुमतसुयशस्करबोधानें. ६०
करुनि पित्याचें उत्तरकार्य प्रभुसि पुरा आणाया,
भरत निघे, 'सस्वजन' म्हणे 'मीं नत घालिन आणा या.' ६१
धरि गंगेचा घाट, होय गुह सिद्ध कराया युद्ध;
मग तो प्रभुचा भक्त सखा दे वाट वाटतां शुद्ध. ६२
सिद्धिबळें सबळा सत्कारी भरद्वाज, कैसा या
तुमजुनि सोडिल? मुनि दावी त्या सिंहासन बैसाया. ६३
भद्रासन[4] वंदुनि तत्पार्श्वीं[5] भरत कृतांजलि राहे,
पाहे साश्रु मुनि, शिरीं त्याच्या आशीरत्नें वाहे. ६४

---

१. द्वार—पंत. २. ताफा. ३. दुर्बुद्धि. ४. सिंहासन. ५. त्याच्या शेजारीं.

मुनि आज्ञा दे, नमुनि तयातें प्रभुतें भेटे भरत,
‘न रत वनांत’ म्हणे ‘तापससा, साकेता ये परत.’ ६५
भरतकथित ताताची वार्ता सीतालक्ष्मणसहिता
प्रभुला ‘हा!’ वदवी, प्रकट करी गुरुवत्सळता महिता[1]. ६६
ब्रह्म स्वीकारी पुत्रत्व प्रेमें दे पिंड पित्या[2],
क्षाळी नयनजळें तत्कर्मा संसारीं हिंडवित्या. ६७
हठ करितां प्रभु बोधी भरता भक्ता परमा ज्ञात्या,
‘म्यां त्वां ही जो गुरु यश द्यावें वंदुनि चरमाज्ञा[3] त्या.’ ६८
भरत वदे, ‘चरमांतीं दर्शनसर दे, हा हो मौन,
चुकतां दिन हि दहनकुंडीं मीं नरदेहा होमीन. ६९
श्रीचरणानुगृहीता द्याव्या बा! पादुका, नयातें
धर्मातें पाहुत रक्षुत जें बापा! दुकान[4] या तें.’ ७०
देऊनि अभय पादुका, सांत्वुनि भरत पुरा पाठविला;
पाठ विलाप जया तो प्रभुनें प्रेमळ बहु आठविला. ७१
नंदिग्रामीं वल्कजटाधर फळशाकाशी राहे,
श्रीपादुका पदीं स्थापुनि तें राज्य तयांवरि वाहे. ७२
वसतां निकट पुन्हा स्वजनागम ऐसें चिंतुनि चित्तीं,
भेटे प्रभु अत्रिस, जो स्वजनीं जैसा लोभी वित्तीं. ७३
अनसूयोक्ति सुधेचा सर्व हि हरि गर्व स्वादुहिता[5],
श्री केली पात्र तपःसुकृता जसि सर्वस्वा दुहिता. ७४

## अरण्यकांड

ऋषिवृंदासि म्हणे प्रभु, ‘निर्भय वधुनि विराधा राहें.’
आधार प्रभुयश होय जना परमनिराधारा हें. ७५
प्रभुसि समर्चुनि शरभंग मुनि ज्वलनीं वपु करि सर्पी,
वसुनि विमानीं वरि सुगतिस, हें प्रभुयश कविशत तर्पी. ७६

---

१. स्तवनीय. २. पित्याला. ३. अखेरची आज्ञा. ४. पसारा (राज्यविस्तार). पृष्ठ ३०४ टीप ३ येथें भिन्नार्थी प्रयोग दिसतो. ५. मधुर व हितकर.

निववुनि सुतीक्ष्णादि मुनि निजनुतिसुरुचि[1] नवि प्रभु लावी;
म्हणति, 'त्यजुनि प्रभुयश, अमृता जीभ न' विप्र 'भुलावी.' ७७
यत्तत्व कथाया पुरति असे योजति न रवें[2] पुराणीं[3],
शस्त्रें देवुनि हर्षविला तो घटजें नरवपु राणा. ७८
दशरथसख गृध्रेंद्र प्रभुला भेटे, कळवी नातें,
प्रभुच्या गुरुविरहजतापातें मग कां पळवीना [4]तें? ७९
'गोदावरीतटीं पंचवटी तेथें वस वत्सा! जें
प्रिय तें कळिव, करिन, सुसरःस्थितनवसारसवत् साजें.' ८०
प्रभु त्यासि म्हणे, 'धर्में आम्हीं सुत, हे बापा! सून,
तूं राजा दंडकगहनाचा रक्षीं यापासून[5].' ८१
प्रभुसि जटायु म्हणे, 'स्वस्थ रहा, जय जोडुनि जा गेहा,
न वन तातगृह हें निद्रेतें जळें[6] सोडुनि जागे हां. ८२
नमुनि पुसुनि ते त्या ताताला प्रेमामृतकलशाला,
जाउनि पंचवटींत रहाती रचुनि रुचिर दलशाला. ८३
कांहीं काल सुखानें क्रमिला तों शूर्पणखा आली,
झाली कामार्ता प्रभुरूपें दुर्मति ती च न धाली. ८४
[8]ज्याचें तत्व असुगम युक्तिशत जरि कवि लाख विवरिती[9],
त्या भुलवाया कपटें सुंदरपण बहु दाखवि वारि ती. ८५
कपटप्रेमवती बरवी हि प्रभुसि नको विदरी ती;
हंस साररुचि नसतां गाते वरिलि न कोविदरीती. ८६
ती प्रार्थी, 'न बरी स्त्री पहिली, बहु बरवी मीं दुसरी,
रमविन, गमविन धन्य, वरा मज, जाणें सुकळाकुसरी.' ८७
प्रभुवर म्हणे, 'मदनुजासि [तूं] वरीं पुरुषसुंदरि! तें
या सुरतरुकुसुमें पाडावें पुरुषांतरकुंद रितें.' ८८

---

१. आपल्या स्तवनाची चांगली गोडी. २. शब्द. ३. पुराणें ज्याचें वर्णन करूं शकत नाहींत. ४. नातें. ५. आजपासून पुढें. ६. सोडून देणें, त्याग करणें. ७. गृध्रराज. ८. हस्तदोष—जाचें. ९. विवरण करिती.

प्रभुवचनें ती प्रभुसि तसें चि प्रार्थी कामांधा त्या;
त्यजुनि सुधांगुळि[1] सुरुचि सुरांगुलि[2] देइल कां मांधात्या[3] ? ८९
लक्ष्मण म्हणे, 'स्वामिनी हो, जा पावें मुदतिशयातें,
पडतां गळां, प्रभु स्वीकारिल तुझिया सुदति ! शयातें.' ९०
केला बोध 'वरुनि गुरुसि सुख यश वाढिव' हा तेणें,
उच्चैःश्रव्याप्रति पुन्हां गेली ती गाढिव [5]हातेणें. ९१
समजे न विनोद, प्रभुहारितें विनवि जडा ती कुतरी[6],
हास्यें श्रीतें लंघूं पाहे जसि गंगेतें कुँतरी[7]. ९२
आर्याज्ञेनें धारिलि लक्ष्मणें हंसें जैसी काकी,
खड्गें कर्णघ्राण खंडितां हर्षति भीति हि नाकी. ९३
'शुकनासा ही न' म्हणे, 'रुचिरा' जी 'हरिची ही न कटी'
गुर्वपराधें स्वसा होय हरिच्या अरिची ही नकटी. ९४
जाय दटावुनि रडत राक्षसी, तद्बंधु खर क्षोभे,
समनुसहस्रबळा[8] त्या वधुनि प्रभु पुरहरसा शोभे. ९५
कुमति जनस्थानातें बुडवुनि बुडवाया लंकेला,
भेटुनि मुख दशवदना दावी ती न धरुनि शंकेला. ९६
सांगे, 'पंचवटींत निरखिलें अतुळ नरस्त्रीरत्न,
तें द्याया साधुनि तुज भोक्त्या म्यां केला बहु यत्न. ९७
तद्भर्त्यानें केल्यें तव भय न धरुनि विनासा हे.
मानी पळ ही अपमानातें नच मृत्युविना साहे.' ९८
खवंळुनि दशमुख करुनि कनकमृग दभ्रमहा[9] मारीचा,
जाय पडाया वदनीं दाटुनि सभ्रम हा मारीच्या[10]. ९९

---

१. अमृतरूप अंगुलि. २. इंद्राची अंगुलि. ३. याचें असें नांव पडण्याचें कारण इंद्रानें 'मां धास्यति' असें म्हणून आपली अंगुलि त्याच्या मुखांत घातली. ४. हा-तातें. ५. कामाच्या इच्छेनें. ६. येथें 'कुतरी ती' असें लिहिलें गेलें आहे; पण तें नजरचुकीनें असावें. कारण, यमकप्रिय कवीचा तो उद्दिष्ट पाठ असणें शक्य वाटत नाहीं. ७. वाईट नौका. ८. चौदा हजार सैन्य. ९. अल्पतेजा. १०. महामारीच्या.

कपटहरिण जाय पुढें, मागें पाप चापधर राहे;
स्वाश्रमपदीं तयातें फिरतां सीता सहसा पाहे. १००
प्रभुसि म्हणे, 'नाहीं च कनकमय मृग लोकांत असा या,
द्यावा चि धरुनि मज हा उचित स्वसदोकांत असाया.' १०१
प्रभु उटजीं बंधुसि ठेवुनि घे शर कोदंड करानीं,
जाय मृगामागें रुद्राचा धरि तो दंडक रानीं. १०२
भिवुनि कपटमृग करुनि पवनसम जव नव नीच पळाला;
प्रभु शर सोडी, लागे तो अतिजवन वनीं चपळाला. १०३
'हा सीते! हा लक्ष्मण!' ऐसें मोठ्यानें आरडला,
खळ हि धन्य कीं 'आइ बा!' म्हणुनि तो न करुनि 'आ' रडला.
अत्यार्तप्रभुकृत शब्द असें मानुनि झाली भीता,
'बा सौमित्रे! धांव, प्रभुला पाव' म्हणे श्रीसीता. १०५
लक्ष्मण विनवी, 'आर्ये! स्वस्थ प्रभु आहे, हेमा या
बेगड परशक्ति न जिंकिल, त्या हरिणाची हे माया.' १०६
क्रोधें बोले सीता, 'माझा अभिलाष मनीं धारिसी,
प्राणव्यसनीं तरि च उपेक्षा मन्नाथाची करिसी. १०७
विंगळ[1] मणि म्हण, सर्वां हि विटिव संता, पाप्या! वेंचे[2];
स्यां विष अयशें न भजाया चिर संतापा प्यावें च. १०८
तापें विघरे मन, निघ रे! या न गृहांत असें, जा चि.
व्यसनीं[3] तत्काळ पडाया ती भक्तासि असें जाची. १०९
आर्येतें नमुनि निवे लक्ष्मण 'हाय!' म्हणत शोकानें,
तों श्रीतें हरि, हरिच्या सभयें आयकिला जो कानें. ११०
'हा रघुवर! हा लक्ष्मण!' ऐसी हाक तिची परिसून,
पावे श्वशुर जटायु, तयातें ती अंजलि करि सून. १११
दे अभय, विरथ करि आरिस, तिला रोधूनि नभा जीन
सोडवि, म्हणे, 'अरे! अंडीं कां शोधूनि न भाजीन?' ११२

---

१. इंगळ; निखारा. २. टळ; नाहींसा हो. ३. हस्तदोष—व्यसनी.

खड्गें पक्ष च्छेदुनि पाडुनि संमूर्छित खगपतितें,
स्कंधीं वाहुनि नेली देवी दशकंठें मग पतितें. ११३
ऋष्यमूकगिरिवरि पाहुनि कपि पांच तयांत चि नग ती
जगतीजा सोडी, कीं, प्रभुला आपुलि मोहिल न गती. ११४
खळ शतयोजन सिंधु विलंघुनि लंकेतें तो पावे,
श्रीस अशोकवनीं रोधी, ज्या कर्मे यति कोपावे. ११५
फिरतां गहनीं लक्ष्मण वंदी साश्रु तया आर्यातें,
कळवी वदली पदलीना जें त्यजुनि दया आर्या तें, ११६
प्रभु परिसुनि तें स्त्रैणतसा चि व्याकुळ होय वदे 'हा!'
उटजीं दयितेसि तसा पाहे आपुलिया हि न देहा. ११७
सांजलि साश्रु पुसे असकृत् प्रभु, 'देखिलि गोदावरि! ती?
तुज भेटुनि दिवसांत दहादां जी बहुमोदा वरिती.' ११८
'वत्सा! त्वां हि पुसावें पुनरपि विनवुनि तुळसी लवती
जी सुमति तुला, देखिलि काय सुगात्री कुलशीलवती? ११९
कनकमृग न तो राक्षस वधिला म्हणुनि देवि! न रुसा हो!
मरुसा[1] हो जलधि म्हणा नंदनविरह कल्पतरु साहो. १२०
वत्सा! वनवासी हि मला जी नित्य नवा उत्सव दे,
न रुसावी च जनकजा; चुकतां दास हि गतकुत्स वदे. १२१
हिंस्त्रें वधिली तरि रुधिराचा एक हि न दिसे बिंदु,
इंदुमुखी नेली च पलाशें, त्या जग शापू निंदु.' १२२
प्रभु धरि विषयिजनविडंबन जें त्यास्तव नव सोंगातें.
कवि म्हणति, 'वसों वैकुंठीं भवचक्रीं न वसों गा! तें.' १२३
'जातीमल्लीधात्रींस[2] पुसे आम्रा पनसा बकुळा,
नकुळा सर्पा खग मृग यांच्या मग पुसेल कां न कुळा? १२४
'बा! सीता सांग' पुसे ऐसें अंजलि करित नगातें,
गातां शोक न हरितें तरि कविकुळ हें चरित न गातें. १२५

१. मारवाडदेशाप्रमाणें. २. आवळीचें झाड.

सानुज गहनीं हुडकित फिरतां प्रभु तातसखा पाहे,
साहे न सुनेच्या हरणा जो सासुं[1] कथाया राहे. १२६
उदकें पवनें सावध करुनि प्रभु त्यासि पुसे, ‘बा! हे
झाली दशा असी कां? सांग त्वत्पुत्र चि हा आहे.’ १२७
सांगे, ‘वत्सा! रावण गेला सीतेतें घेवून;’
सोडी प्राण प्रभुच्या अंकीं स्पर्शें सुख सेवून. १२८
त्याचें उत्तरकार्य करि प्रभु, साश्रु तिळोदक ओपी;
तो पी दशरथसा, मुक्ति तया, यश गात्या ही सोपी. १२९
योजनबाहु कबंध धरी त्या वधुनि, तयाच्या पापा,
शापा वारुनि[2] बसवि विमानीं प्रभु निववी भवतापा. १३०
तो दनुनामा[3] सांगे, ‘शबरीप्रोक्तपथें जा आर्या!
सुग्रीवा भेट, सखा हो, तो करिल तुज्या या कार्या.’ १३१
प्रभुतें पाहुनि मतंगमुनिची सच्छिष्या ती शबरी
पूजुनि होमी वपु तीतें दे गति तो जगदीश बरी. १३२
शबरीकथितपथें जाय प्रभु पावे पंपासरसी,
कामासि म्हणे, ‘न क्षण मागें देवुनि कंपा सरसी.’ १३३
‘कुसुमशर’ म्हणति ‘धन्य,’ न पावति जे कवि दयिताविरहा,
चिर ‘हा!’ रघुकुलजा मज हि म्हणवि काम, नव्हे चि रुचिर हा.
त्वत्प्रिय सन्मुनिशिष्य दाशरथि सति! म्हणता पाविस ‘रहा’
दयिते! न पडों दे चि कुसुमशरभव पण ताप विसर हा. १३५
तुजहुनि मज मजहुनि तुज अधिक चि ताप नवनवा सीते!
रक्षिति, तप मज तुज हि न देती शाप न वनवासी ते. १३६
हा! हा! राक्षसवृक तो गेला घेवुनि तुज एणीतें,
त्वन्मृदुपण नवनीतीं हि नसे, सखि! कैचें मेणीं तें? १३७
सीते! तुज विरहानळ कीं तो क्रव्याद चि भक्षील,
रक्षील प्राण न हा राघव जरि न तुला लक्षील.’ १३८

---

१. जीवंत. २. हस्तदोष-**वरुनि**. ३. कबंध.

## किष्किंधाकांड

सौमित्रि म्हणे, 'आर्या! आर्या व्रतवज्रकवच वाहे,
पापा त्या पाताळगता ही तव शर वधितिल बा! हे. १३९
धैर्य धरुनि भेटावें आर्धी सुग्रीवा आर्यातें,
सख्य करावें, पावविल चि तो सिद्धिस या कार्यातें.' १४०
तेथुनि ऋष्यमूकपथ धरुनि प्रभु सानुज जों चाले,
देहीं भुजनेत्रस्फुरण, वनीं शुभ शकुन हि बहु झाले. १४१
तापस शस्त्री दूरुनि पाहुनि भी सुगळ मनीं मानी,
वाळीनें पाठविले बहुधा करवाया निजहानी. १४२
शोध कराया वातसुतातें धाडी द्विजसा,[1] तो या
भेटे, पाहोनि निवे सहसा बहु तृषित जसा तोया. १४३
पुसतां लक्ष्मण आर्याज्ञेनें वृत्त कथी ऋजुभावें.
"जातों सुगळा शरण म्हणाया, 'व्यसनीं आम्हां पावें.'' १४४
सूक्तिश्रवणें मारुति हर्षे, दोघे पृष्ठीं वाहे.
अचळीं भेटवि सुगळा; यश हित अन्योन्याचें पाहे. १४५
पावकसाक्षिक सख्य करुनि, तो दावी ते नग यातें,
ज्याची कीर्ति सुकृत दे दीना न सुरनदी न गया तें. १४६
राम म्हणे, 'नग मद्दयितेचे हे कीं काय पहावे.
वत्सा! श्रुत्यर्थे तसे निरुपम तव हृदयांत रहावे.' १४७
लक्ष्मण म्हणे, 'न जाणे अन्या दृष्टि अळंकारा हे,
नमितां पळ या नूपुरतीर्थी धूतकळंका राहे.' १४८
प्रभु हृदयीं धरुनि प्रक्षाळी नयनजळें नग, गमले
श्रमले सखे वियोगें समसुखदुःखालिंगित शमले. १४९
सुगळ म्हणे, "वाल्यपहृतदार प्लवग हि मीं बा! न रडें,
जरि धरिलें प्रबळाधिव्याघ्रें दृढ चावाया नरडें. १५०
व्यसनीं कठिन असावें सखया! 'हा!' म्हणणें कुत्सा हें,

---

१. ब्राह्मणाचा वेष देऊन.

तुज सीता भेटवितों तूं हो युक्त निजें उत्साहें." १५१
प्रभु त्यासि पुसे, 'आत्यांसीं हें अतिवैर कसें घडलें?
सांग सविस्तर कोणापासुनि अंतर कैसें पडलें?' १५२
सुगळ कथी, "मायावीनामक असुर रणातें बाहे,
धावे वाळी त्यावरि, अरिचें पळ हि न गर्जित साहे. १५३
झालों सहाय बंधुस मीं कीं काळा अरि हो घांस,
पाताळबिळीं पळुनि शिरे जड, भी आम्हां दोघांस. १५४
द्वारीं स्थापुनि मजला, वाळी जाय बिळीं त्यामार्गें
रागें, आखुवधार्थी जैसा व्याळ खवळला रागें. १५५
असुरबळाचे शब्द ऐकिले, न आत्याचे रामा!
रक्तपूर बिळवदनीं आला, बंधु न जगदभिरामा! १५६
वर्षांतीं हि न येतां वाळी, वधिला ऐसें गमलें;
ठेविलि महासिळा विवरमुखीं; शोकें चित्त भ्रमलें. १५७
किष्किंधेप्रति परतुनि आलों, अग्रजशोकें रडलों,
कथितां वृत्त स्वाप्तजनाला रामा! मूर्छित पडलों. १५८
रामा! पात्र बळें सचिवानीं केला राज्यपदा हा,
जैसा ज्वररोगी बंधूनीं विपुला आज्यप दाहा. १५९
खळबळ वधुनि बिळमुखीं[1] येतां न मला पाहे, दगडा;
'रगडा' मुष्टींस म्हणे, मजसीं करि आरि मानुनि झगडा. १६०
दंडुनि सचिवांसि मज वधाया वाळी पाठीं[2] लागे;
भ्रमतां भूवलयीं बा रामा! हा हि न तो हि न भागे. १६१
या ऋष्यमूकगोत्रीं न शके याया बापा! वाळी,
अपराध करुनि मतंगमुनीच्या पावुनि शापा वाळी[3]. १६२
असुर महिषतनु दुंदुभिनामा युद्ध कराया आला,
झाला व्यसु, बाहुबळें वाळी दूर झुगारी त्याला. १६३
शुद्धाश्रमांत तच्छव घाली शोणित वमुनि सडा, जो

---

१. हस्तदोष–मुखीं. २. हस्तदोष–पाठीं. ३. वर्जी.

गर्वें अदराध असा केला, तो कां न मुनिस डाजो? १६४
'करिल प्रवेश या स्थानीं जरि तरि तो वाळी पापी,
व्यसु हो, तत्प्रिय कपि हि उपळ हो.' ऐसें सुतपा शापी. १६५
न करी प्रवेश मरणभयें या स्थानीं रामा! वाळी,
त्या काळापासुनि मज नग हा ऋषिला शिवसा पाळी." १६६
रघुवीर म्हणे, 'वधुनि खळातें देतों कपिराज्य तुला,
गंधतैल हि न पावे होउनि यज्ञोचित आज्यतुला.' १६७
सुगळ म्हणे, 'वधिन म्हणसि परि तो सखया! अरि बळकंट कीं,
देवांच्या हि नसे वध याचा होय असें बळ कटकीं. १६८
दुंदुभिदेह पहा तो दिसतो जो श्वेताद्रिशिखरसा
योजन एक उडविला अरिला हा हर जेंवि खरसा.' १६९
पादांगुष्ठें त्यातें उडवि प्रभु दशयोजन दूर,
गुरु पूर्वीं लघु आतां म्हणतां तो संशय हरि शूर. १७०
'एकें एक असे शालद्रुम सप्त भेदि तो रोपें'
ऐसें म्हणतां, प्रभु बळ दावी तें कळवाया सोपें. १७१
एकें चि शरें सप्त शालतरु भेदुनि खडक हि भेदी,
छेदी संदेह, प्रभु राहों दे न स्वाश्रित खेदी. १७२
सुग्रीव म्हणे, 'बा रघुवीरा! आला प्रत्यय पूर्ण,
चूर्ण प्रभु तूं करिसिल अरिला एकें चि शरें तूर्ण.' १७३
गेला सानुज राम सुगळसह किष्किंधेच्या जवळ,
कवळ स्वशरा वाळी देउनि यश जोडाया धवळ. १७४
एकीकडे वनीं गुप्त प्रभु बाणधनुर्धर राहे,
समरा होउनि सिद्ध सुकंठ स्वभ्रात्यातें बाहे. १७५
वाळी क्रोधें ये अनुज्याचे घ्याया युद्धीं प्राण,
दोघांत न लेश हि भेद दिसे, राम न सोडी बाण. १७६
भंगे, व्याकुळ सुग्रीव पळे, पावे स्वस्थानातें,

---

१. मार्कंडेया–पंत. २. बाणानें.

त्या प्रभु सांत्वुनि, 'सत्य सखा हें,' कळवी स्वस्था नातें. १७७
पुष्पित वल्ली कंठीं बांधुनि पुनरपि सुगळा प्रेषी,
गुह्म बसे प्रभु, तो हि हटकितां क्षोभे परम द्वेषी. १७८
तारा म्हणे, 'भग्न ही आला, झाला राम सहाय,
सुगळा न भिडें ' अभिमानें [तो] म्हणतो तामस 'हाय!' १७९
वाळी म्हणे, 'प्रिये! मीं जाणें रामा गुणपात्रास,
तोष पहातां सुजना चंद्रा कुजना कुणपा त्रास.' १८०
ऐसें म्हणे निघे श्येनास श्येन तसा झडपाया,
परि तो चि खचे, सुग्रीव टिके, कीं त्याचा धड पाया. १८१
प्रभुनें तो सुगळ सखा रक्षुनि लक्षुनियां वहयंका,
उर चिरुनि शरें वाळी केला उचित चितापर्यंका. १८२
वाळी निंदी प्रभुला, ईश्वर समजुनि मग कर जोडी;
पितृदत्त कनकमाळा देवुनि अनुजासीं करि गोडी. १८३
तारा महिषी, पुत्र अंगद, प्रभुला अंतीं निरवी.
प्रभुदर्शनबोधामृत त्यांच्या शोकाविषातें जिरवी. १८४
कपिचें उत्तरकार्य करवुनि प्रभु यश जोडी प्राज्य.
देववि देव विश्वहित सुगळा अनुज प्रेरुनि राज्य. १८५
राज्यश्री तारा हि रुमासी सुगळासि दिली रामें,
सीतेच्या तेंवि जिच्या जळतें अघ संकीर्तितनामें. १८६
विनवी बहु सुग्रीव, परंतु व्रतसंरक्षण पाहे,
राहे किष्किंधेंत न वर्षां प्रस्रवणनगीं साहे. १८७
वृष्टि सरे, तरि सुगळ न भेटे, न मनावरि घे कार्य.
मानी परम कृतघ्न तया कीं सीताविरही आर्य. १८८
अनुजासि म्हणे, 'जा त्या पाठिव बंधुकडे मत्तातें;
परि शोधीं, स्वर्गीं लावावा शब्द न मज मत्तातें.' १८९

---

१. गजपुष्पी नांवाची. २. चितारूपी शय्येला. ३. पावसाळा. ४. वालीकडे—अर्थात् यमसदनीं.

गेला लक्ष्मण किष्किंधेतें गुण जोडुनि चापातें,
तापातें कपि पावति जैसे करुनि महापापातें. १९०
अंगदतारायुत सुगळ म्हणे, ‘बा! समज, न कोपावें;
मानूं हृदयांत कृतघ्नत्वा वास मज नको, पावें. १९१
गेले दूत, ऋक्षकपिकटकें येतिल, करितिल कार्या,
आर्या भेटवितिल, वधुनि रणीं दशवदनाप्रति, भार्या.’ १९२
सौमित्रि म्हणे, ‘चाल स्वमुखें प्रभुसि असें सांगाया.
न कळविला केला उद्योग प्रथम तुवां कां गा! या?’ १९३
लक्ष्मणसह बैसुनि शिबिकेंत प्रभुला भेटे सुगळ,
ज्याचा प्रताप काळासि म्हणे गिळितां ‘कवळा उगळ[1].’ १९४
तों बहुलक्ष यूथपति आले, गगनीं भरला धुरळा,
जे म्हणणारे निजनखरांतें* वज्रशिळांतें* भुरळा[2]. १९५
शोधाया श्रीस सुषेणातें वरुणदिशेला राजा,
शतबळिस उत्तरेला, विनता पूर्वेस, म्हणे, ‘बा! जा.’ १९६
जांबवदंगद वायुसुत बळी अन्य हि हरि शमनाशा[3]
धुंडाया पाठविले गेले, वाहुनि अरिशमनाशा. १९७
मास अवधि न विलंघुनि शोधुनि काष्ठात्रय[4] कपि आले,
विंध्यबिळीं सुतृषित कपि शिरले, फळ जळ सेवुनि धाले. १९८
सुरगणिकाहेमाप्रिय मयकृत दिव्य स्थळ पाहून,
झाले साधि[5] अलब्धविनिर्गम[6] कपि तेथें राहून. १९९
हेमाप्रियालि सावर्णिसुता स्वयंप्रभा ते साधी
नेत्रें झांकवि, बाहिर काढी कपि, यश सदया साधी. २००
शोध न लागे प्रभुदयितेचा, अवधि लंघिला, श्रमले,
उग्रशासना भ्याले सुगळा, सांगद सर्व भ्रमले. २०१
सागरतीरमहेंद्रपर्वतीं झाले सिद्ध मराया,

१. बाहेर टाक. २. भोंक पाडा. ३. दाक्षिणदिशा. ४. दिशात्रय. ५. दुःखी.
६. बाहेर पडण्याचा मार्ग ज्याना सांपडला नाहीं असे. * ह्रस्वदोष—ते.

कीं, न सुचे चि उपाय तयांला मृत्युविपत्ति तराया. २०२
'धन्य जटायु यशस्वी, न तसें अस्मद्धाळीं मरण,
न रण, व्यर्थ मरतसों, घडलें न प्रभुचें परिचरण.' २०३
अग्रज जटायुचा संपाती तो ऐके ती वाणी,
ज्याच्या मनीं असें कीं आपण भक्षावे ते प्राणी. २०४
जाणुनि अनुजमरण तो त्यांतें वृत्त पुसे, तें हरि ते
कथिति सविस्तर रामप्रभुचें सद्गुणवर्णन करिते. २०५
बंधुस्नेहें क्षण रडुनि म्हणे, 'न्या जलधिजवळ मजला,
तोयांजळि देइन अनुजाला, साधु मला बहु भजला.' २०६
सिंधुप्रति गृध्र विपक्ष तिहीं नेला, जळ दे भावा,
पुनरपि म्हणे, 'साधुहो! मज न्या स्वस्थानातें, पावा.' २०७
नेला होता तेथें मग तो निजवृत्त कथी, "हरिहो!
परिसा, सीताशोध सांगतों, स्थिर तुमचें मन परि हो. २०८
जातां तपननिकट तत्तेजें मदनुज जटायु भाजे,
पोटाखालें धरिला तो म्यां, पक्ष जळाले माजे. २०९
या चि महेंद्रनगीं मी पडलों मूर्छित दुःसहतापें,
हरिला दाह निशाकरमुनिनें, शिशुचा ज्यापरि बापें. २१०
वदला तो मुनि 'येथें चि रहा, श्रीसीतेचा शोध
सांगुनि हृष्ट करीं श्रीरामप्रभुचे वानर योध. २११
फुटतिल पक्ष पुन्हा, मग जा, तूं तोंवरि येथें चि रहा,'
या कार्याकारितां या स्थानीं होता कपिहो! चिर हा. २१२
नेली श्रीसीता दशतुंडें वरबळमत्तें अनयें,
रोधुनि मार्ग, प्रणत सोडिला सदयें माझ्या तनयें. २१३
कपिहो! वाटो तुमच्या कथितों हें सत्य मना दिसती,
कीं गृध्र दूरदर्शी मी, ती लंकेंत अनादि सती." २१४
ऐसें वदतां होय सपक्ष व्योमीं भरला उडुनीं,

---

१. हस्तदोष—सु. २. मंत्ररामायण—किष्किंधाकांड गीति १२८ पहा.

तो हर्षप्रद नामिला कपिनीं, अमृतांशु जसा उडुनीं. २१५
'शतयोजन सिंधु उडुनि जाणें कोणाची किंति शक्ति'
ऐसें अंगद युवराज पुसे व्हाया तदभिव्यक्ती.[1] २१६
'दश योजनें उडेन' गज म्हणे, दुसरा गवाक्ष 'वीस,'
शरभ 'तीस,' ऋषभ हि 'चाळीस,' प्रेक्षीन नमीं श्रीस. २१७
'पन्नास' गंधमादननामा, मैंदाभिध कपि 'साठ,'
द्विविद म्हणे, 'सत्तर, अधिक न मीं, जन्हि थापटिली पाठ.' २१८
वीर सुषेण म्हणे, 'मीं गावें जाइन उडोनि ऐसी,'
ऋक्षेंद्र वदे, 'नव्वद संप्रति मच्छक्ति असे ऐसी. २१९
पूर्वीं[2] प्रदक्षिणा म्यां केल्या तीन त्रिविक्रमातें,
कारितां अमृतार्थ मथन ओषधिशत मेळविलें बा! तें.' २२०
अंगद म्हणे, 'उडुनि जाइन मीं लवणजळधि शतगावें,
परि वाटे [मज] परतुनि येतां बळ माजें न तगावें.' २२१
वृद्ध म्हणे, 'उडसिल युवराजा! जरि तूं बहुशतगावें
भृत्याहीं न प्रेषावें न स्वामीनें ही जावें.' २२२
अंगद म्हणे, 'तरि कसी प्रभुची कार्यसिद्धि बा! होती?'
वृद्ध म्हणे, 'प्रभुतेजें होती जाण महाबाहो! ती.' २२३
एकांतास्थितमारुतिस म्हणे, 'सुगळासम तूं बापा!
लक्ष्मणसम किंबहुना रामप्रभुसम तूं निष्पापा! २२४
पुंजिकस्थळा[3] केसरिभार्या होय अंजना शापें,
केलासि समुत्पन्न तदुदरीं प्रिय सुत वातें बापें. २२५
तूं उपजतां चि पक्क फळ असें मानुनि चित्तीं रवितें,
त्रिशत योजनें उडालासि बा! गाती ज्ञाते कवि तें. २२६
शतमख वज्रें ताडी पाडी मूर्छित, कोपे वायु,
तुज दे शस्त्रास्त्रावध्यत्व ब्रह्मा पुष्कळ आयु. २२७
गरुडतरणिमारुतसमगति तूं सिंधुलंघनीं शक्त,

१. त्याची स्पष्टता. २. वैरोचनाच्या यज्ञप्रसंगीं. ३. एक अप्सरा.

जा, देवीतें पाहुनि ये, बा ! हो प्रभुचा प्रिय भक्त.' २२८
तापसशापें जें निजशक्तिज्ञान लोपलें होतें.
करी प्रकाशित मारुतिहृदयीं बोधें विधिसुत[1] तो तें. २२९
दशयोजनतनु झाला वृद्धें स्तवितां हर्षें फुगला,
भगवत्प्रसादसद्यश मिळतां सुज्ञ न राहे उगला. २३०
शिरला तळीं, दडपला भारें उडतां नग तो खचला.
मुनि म्हणति, 'कुतुक पावों आधीं ध्यानें मग तोख, चला.' २३१

## सुंदरकांड

शक्रप्रेरित[2] मैनाक उठे, त्यास उरें कपि ताडी,
पाडी सांत्वुनि हस्तस्पर्शें, जलधिस वेगें फाडी. २३२
विघ्नपरीक्षार्थ करी सुरसा जी नागांची माता,
विंशतियोजन मुख पसरी ती देवप्रहिता घाता. २३३
ती 'विधिवरें गिळीन' म्हणे, तों होवुनि गावें तीस
मारुति म्हणे, 'सती सांत्वूं दे, त्वां ही गावें तीस.' २३४
'सोडीना चि' म्हणे, मुख पसरी ती गावें चाळीस,
खेचर[3] म्हणती, 'कपि सांपडला असुर जसा काळीस.' २३५
जो धावुनि संरक्षी समयीं द्विरदा आपन्नास,
त्या प्रभुतें चिंतुनि कपि झाला गावें हा पन्नास. २३६
षष्टि योजनें सुरसा त्यातें भक्षाया मुख वासी,
मारुति पोषी सप्तति गावें वपु जैसें सुखवासी. २३७
ती नागांची माता पसरी आनन गावें ऐसी,

---

१. ब्रह्मदेवाचा पुत्र जांबवान. २. येथें 'सिंधुप्रेरित' किंवा 'अब्धिप्रेषित' असा कांहीं पाठ असता तर तो मूळाला अनुसरून झाला असता (मंत्र० सुं० गीति ४ पहा). या प्रसंगीं कवीच्या मुखीं 'शक्र' शब्द येण्याचें कारण, इंद्रानें आपलें पर्वत-पक्षकर्तनाचें काम सुरू केल्यानंतर त्याला भ्यालेल्या मैनाकाला वायूनें उडवून क्षारसमुद्रांत टाकून त्याचा बचाव केला होता, हा उपकार स्मरून वायुपुत्राला विश्रांति देण्यासाठीं मैनाक वर आला अशी कथा आहे. ३. देव.

नवति योजनें कपिवपु हि, कथा आन न गावें ऐसी. २३८
शतयोजन मुख पसरी वाटे गिळिल व्योम हि सुरसा,
लघु होवुनि त्यांत पडोनि निघे विषयीं कवि महिसुरसा[1]. २३९
होय करुनि हें यश सर्व जसा मारुतसुत पाठ कवी,
तो सुरसेसि, तसा संसृतिला हा ही सुतपा ठकवी. २४०
छाया धरुनि सिंहिका वोढी, तद्देहीं शिरला जो,
छेदी काळिज, कोण ठेवितां तच्चरणीं शिर लाजो? २४१
पावे तैसा चि जवें पारीं तो कवि लंबागातें[2]
चरिता लावुनि हें जड लक्ष्मीतोक[3] विलंबा गातें. २४२
अधिदेवीतें[4] भंगुनि संध्यासमयीं पुरींत शिरला,
फिरला बहुत, श्रीस पहातां शोकें हृदयीं चिरला. २४३
सुकृती कृती अशोकवनीं त्या साध्वीतें पाहून,
राहून नगीं[5] गुप्त निवे तो, हर्षातें वाहून. २४४
तों चंद्रोदय होय, निशीथीं[6] रावण ये विनवाया;
कीं, कामांधा विषयाख्य सदा उत्सव सेवि नवा या. २४५
तो विधिमातेसि म्हणे, "सुभ्रु! श्रमविसि कां हें गात्र?
पात्र प्रियसुखभोगातें हो, सुंदरि! म्हण 'हूं' मात्र. २४६
मदधिक काय पदच्युत वल्की वनवासी प्रिय नर तो?
मानस सोडुनि मन हंसीचें पळ हि पल्वलीं[7] न रतो. २४७
आज्ञेंत तुझ्या मत्प्राणस्त्री, जनपद, लंका राहो,
त्यजें हठ, सुदति! मुदतिशय घे, दे पद सदलंकारा हो. २४८
एकें दिवसें निष्कंटक भू देतों साधुनि जनका,
म्हणतिल होतां अभ्युदय बरा ते तों साधु निज न का? २४९
पावेल तुला नर तो न रतो मन धृतलोभ स्मरणीं,
ऐसा नाहीं अमर हि माझ्या होय न जो भस्म रणीं." २५०

---

१. विप्राप्रमाणें. २. लंबनामक पर्वतातें. ३. पंतांच्या मातेचें नांव लक्ष्मी. ४. केची लंकानामक अधिदेवता. ५. वृक्षावर. ६. मध्यरात्रीं. ७. डबक्याचे ठायीं.

साध्वी तृण आड करूनि बोले, " रे ! मत्ता हरिणा ! मीं
नरसिंहस्त्री, समजेल तुला कामांधा ! परिणामीं. २५१
उटजांतुनि कपटें त्वां प्रभुवर सानुज दवडुनि दूर,
पळविलि चौर्यें वीरवधू, घे स्वमुखें चि म्हणुनि 'शूर.' २५२
पाताळीं जासिल तरि हि तुला प्रभुशर करितिल चूर,
प्रभु विखारिति खरतर शर समर्यीं करदशशतमितसूर[1]. २५३
प्रभुफणिपतिच्या पचविसिल कसा तूं उंदीर मणीतें ?
विघ्नोपहता होऊं[2] देइल तो तुंदी[3] रमणीतें ? २५४
मज करुनि उपायन जासील प्रभुला जरि तूं शरण,
तरण घडेल व्यसनीं, नाहीं तरि तुज आलें मरण." २५५
इत्यादि वदे देवी, कोपे दशकंठ, म्हणे, 'उडसी
गर्वें मुग्धे ! बेट भेटतां दुःखसमुद्रीं बुडसी.' २५६
दासींस म्हणे, 'मन सीतेचें हित सांगुनि वळवावें,
मासद्वय भरतां भक्षिन हें स्पष्ट इला कळवावें.' २५७
त्या समजावुनि त्याची दयिता घेउनि गेली मागें,
करिति राक्षसी जाच क्रूरा, विषकटु वदती रागें. २५८
त्रिजटा त्यांसि दटावूनि म्हणे, 'साध्वी छळितां कां गे !?'
दुःस्वप्न दशास्यक्षयसूचक अनुभाविला[4] ती सांगे. २५९
उद्बंधनार्थ काढुनि घे ती वेणीचा आगवळ,
स्वमतिस म्हणे, 'विपदुदधिपारा दृढ होवुनि लाग, वळ.' २६०
तों कवि[5] गाय तयां[6] घटजन्मा जो सुरभीतिसमुद्रा,
मग अर्पी प्रभुची, प्रणतांची जी सुरभी, तिस मुद्रा. २६१
नमुनि कुशळ कळवी सुगळाचें सख्य, वाळिवध सांगे,
स्तवुनि म्हणे, 'चाल तुला नेतों, माते ! श्रमसी कां गे !?' २६२
स्मित करुनि श्री वदली, 'वत्सा ! त्वां न मला पळवावें,

---

१. किरण आहेत सहस्र ज्याचे असा सूर्य च असे प्रभु. २. अत्र काकु-**पंत**. ३. विघ्नेश्वर-**पंत**. ४. अनुभविलेला. ५. मारुति. ६. रामाला.

मळवावें न यश, वधुनि रिपुला, तेज जगीं कळवावें.' २६३
मारुति म्हणे, 'असें चि घडेल, प्रभुचे अक्षय तूण[1],
जातों, प्रभुतें घेउनि येतों, द्यावी कांहीं खूण.' २६४
काककथा कथि, चूडामणि दे, माराया मंदेशा,
'मज कीर्तिस संरक्षा' ऐशा सांगे श्री संदेशा. २६५
आज्ञा आशी घेउनि हर्षें मारुति, उपवन मोडी,
झोडी वनपाळांतें, उग्रें राक्षसकटकें तोडी. २६६
लीलेनें मारी रणदक्षा शत्रुकुमारा अक्षा,
भस्म करी घनरवभटलक्षा, जेंवि दवदहन कक्षा. २६७
घननाद ब्रह्मास्त्रासि बळें सांपडतां त्या बांधी,
ने तातसभेसि, महाकपि न भ्रमविल अरिची कां धी? २६८
दशकंठ पुसे, 'कोणाचा तूं ऐसा मत्त? नयातें
लंघुनि, वधिता झालासि रणीं कैसा मत्तनयातें?' २६९
कपि सांगे, 'श्रीरामप्रभुचा दूत, सती शोधाया
आलों, रणें[2] तवदर्शन व्हाया, हित तुजला बोधाया. २७०
साध्वी जनकसुता प्रभुदयिता नोहे कोंडायाची.
साम त्यजि कलिरुचि जड, कीं कण टाकुनि कोंडा याची. २७१
वांच, शरण चाल, प्रभुला दे प्रभुदार उपायनसे,
यावांचुनि वांचाया दुसरा तुज सार उपाय नसे. २७२
रोधावें ब्रह्मकुलोत्पन्नें त्वां काय अशा स्त्रीतें?
शास्त्री असोनि करिसि, न करिती जें कर्म अशास्त्री तें.' २७३
नकटी होय बहिण, अन्यायें मेला भावु खर चि तो.
सर्वस्वप्राणांतें काळग्रस्त व्यर्थ खरचितो. २७४
न टिकति खळहृदयबिळीं उजळी[3] बोध दिवे कपि कवि तो,
घन सुक्षेत्रीं शाळि, तसा चि प्राज्ञ विवेक पिकवितो. २७५
खळ खवळे, कपिकदन कराया कवळी करवाळातें,

---

१. भातें. २. उत्कंठा. ३. प्रज्वलित करी.

त्या तदनुजनि बिभीषण यत्नें वारी अरवाळातें. २७६
वेष्टविलें वायुजपुच्छ खळें बहुतैलार्द्रपटानीं,
पेटविलें, चालविला नगरीं फिरवायासि भटानीं. २७७
तें ऐकुनि देवी दहनातें प्रार्थी, तो केशातें
त्याच्या न स्पर्शे, सुखवि सख्या त्या ही लोकेशातें. २७८
कपि वधि भुजपाशधरा सर्वा त्या पाशा हिसकून,
स्वामियशोर्थे दशमुखा न मथी, तन्नाशा हि सकून[1]. २७९
साधुबिभीषणगृह संरक्षी, लंकेची करि होळी,
घोळी बहु कटकें, हरि आरि तो 'हाय!' म्हणे, कर चोळी. २८०
सन्मणिकनकप्रासादांचे काळ धडकले वर ते,
[2]खचरांचें हि न राहों देती ज्वाळ धड कळेवर ते. २८१
त्या लंकेच्या सेवुनि पावे सुख वासव धूमातें,
म्हणे, 'न दे निवचायास असा मुखवास वधूं[3] मातें.' २८२
ब्रह्मांड भरिति बहु रक्षःस्त्रीशोकार्तस्वर पुरेतें[4],
जेव्हां करी प्रदीप्त शिखावान् तो कार्तस्वरपुर[5] तें. २८३
विझवि समुद्रीं पुच्छ, 'हा!' म्हणे सीतालय मानून,
तीस पुन्हां पाहुनि सुकवि निघे, तो न गमे भानून[6]. २८४
अंगदजांबवदादिकपींतें कुशळवृत्त आयकवी,
नायकवीरानंद अतुळ जो, त्या वर्णिल काय कवी? २८५
सुगळप्रियमधुवन लुटुनि बळें तदधिप दधिमुख मथिला,
तेणें तो अपराध क्रोधें कपिपतिपतिला कथिला. २८६
समजे केलें कार्य, मोडिली तरि च मदाज्ञा त्याहीं,
न जयोत्कर्षाविणें लंघिली, धरुनि मदा ज्ञात्याहीं. २८७
प्रभुला कार्यसिद्धि कळवी, त्या सांत्वी मधुवनपाळा,
सांगे, "जा, म्हण त्यांसि, 'न लावा मज भेटाया काळा.'" २८८

---

१. समर्थ असून. २. आकाशगामी जनांचें. ३. इंद्राणी. ४. पूर्णपणें. ५. सुवर्णनगर (लंका). ६. सूर्यापेक्षां कमी.

दधिमुख सोडुनि परिभवखेद प्रेरी हरिचक्रातें;
ते अतिहर्षें नमिति प्रभुतें, अमर जसे शक्रातें. २८९
श्रीराम पुसे त्यांसि, 'सखेहो! भटमणिहो! बोला हो!
मद्दयिताशुभवृत्त अमृत या श्रवणयुगा लोला हो.' २९०
मारुति चूडामणि दे, सांगे जें वदली आर्या तें
तात तसा आलिंगी प्रेमें प्रभु त्या कृतकार्यातें. २९१
प्रभु बोले, 'अभिषेक न बहु बा! केला[1] मणिकनकांहीं,
तुज आलिंगनसर्वस्व दिलें, समुचित आणिक न कांहीं. २९२
या एका उपकारासि दिले म्यां तुज सर्व प्राण,
यावरि करिसिल जे त्यांचा मीं बंधुसह ऋणी जाण. २९३
परपुर केलें भस्म, लंघिला मकरालय शत गावें,
हें चिर[2] म्हणावया गात्यां 'हा! न कराल' यश तगावें. २९४
इत्यादि बहु स्तवुनि प्रभुनें शुद्धयशें साजविला,
माजविला उत्साह मनीं तो परि सन्मणि लाजविला. २९५

## युद्धकांड

वर्णुनि लंकारचना, सेना कथुनि खळदुरभिमाना,
तो कवि म्हणे, 'प्रभुजि! चापलता हे सत्य सुरभि माना. २९६
तव शर पवन जलद तो, कीं हा पावक तो कापूस,
बापा! चापा सोडुनि न मला वानरतोका पूस.' २९७
प्रभु सुगळासि म्हणे, 'चाल सख्या! विजयश्री तुज वरिती,
वत्सा सौमित्रे! जी कीर्ति प्रीतिमती तुजवरि ती.' २९८
विजयमुहूर्तीं सुगळानुमतें घेउनि भावु निघाला,
खळदशकंठावरि घालाया कोपें जावुनि घाला. २९९
वायुवालिसुत रामलक्ष्मणां उडति नभीं वाहून,
पाहूनि द्विजवर आशी दे तदुत्कर्ष साहून. ३००

---

१. केलेला. २. हें तव यश गात्यांला 'हाय न म्हणाल' असें म्हणाया चिरकाळ रहावें–**पंत**.

अगणित कपिबळ घेउनि गर्जत सुगळ सागरा गेला,
उत्तरजलधि गमे त्यावरि[1], तें स्मरुनि आग, रागेला. ३०१
तें चार कथिति, दशमुख पुत्र भ्राते मंत्री बाहे,
मत्तमतें रणपण करि, नाश स्पष्ट बिभीषण पाहे. ३०२
'सीता रामा दे; अग्नि बळें लाविसि कां गेहातें?'
अहित गमे पुत्रांसह मूढा, जें हित सांगे हा[2] तें. ३०३
हितशत्रु असें समजुनि खळ त्या परमहिता अपमानी,
प्रभुच्या तेजाहूनि आपलें तो जड बहु तप मानी. ३०४
वदला 'नरकपिभय दाखविसी, भ्याड न हा फटकाळा!
गट काळाभेका करिता मीं व्याळ महाफट[3] काळा.' ३०५
होतां धिक्कार सभेंत, निवे घेउनि मंत्री चवघे;
सुज्ञ बिभीषण पाहे मोहें काळें गिळिले अवघे. ३०६
त्यजि राज्यातें, दावपरिवृता जेंवि गज अरण्यातें,
शरणागत तो बहुमत झाला त्या विश्वशरण्यातें. ३०७
प्रभु अनुजातें सांगुनि करवी अभिषेक पदनतातें.
देववि राज्य, जसें तनयातें द्यावें स्वसदन तातें. ३०८
नाथ अहोरात्रत्रय विनवी परि न[4] घणमणी[4] सिंधू;
शर चापगुणीं जोडूनि म्हणे, 'हा या शोपू विंधु.' ३०९
तापे सागर कांपे, भेटे, अभय प्रभुला मागे,
शरणागता तया प्रभु रक्षी, हृदयीं करुणा जागे. ३१०
'सेतु नळ करिल, मीं धरिन शिरीं, सद्यश वा! पसरेल.'
सागर विनवि असें, गातां हें सर्व हि पाप सरेल. ३११
पांचा दिवसांत दहा गांवें लांब रुंद शत गांवें,
सेतु समुद्रीं प्रभु करवी, हें यश सुरबहुमत गावें. ३१२
कृत्रिम धनु शिर दावुनि, 'वधिला तव पति' हें खळ सांगे,
'हो मद्दयिता, मर्त्यबळानें होतीस उढत कां गे!?' ३१३

---

१. सुग्रीवावर. २. बिभीषण. ३. मोठा साप. ४. न द्रवे.

मद्बळपति प्रहस्त करि असा सुविजय उत्तररोधीं,
लक्ष्मण सुगळ पळाले, न रडें, बहु हित मत्कृतबोधीं.' ३१४
ऐसें छळितां, सचिवानीं तो खळ नेला बाहून,
सरमा बोधी श्रीतें, माया लोपे क्षण राहून. ३१५
संपूर्ण अहोरात्रत्रय तें उतराया बळ लागे,
सरमा हि कथी श्रीस, 'अरि सचिवबोधासि न वळलां गे!' ३१६
चढुनि सुवेळीं लंकादुर्गं प्रभुवर देखत राहे,
बैसुनि तत्प्राकारशिरःशृंगीं खळ हि कपिकटक पाहे. ३१७
दूरुनि पाहुनि, सुगळ समजला छत्रें कीं खळ आहे;
सर्पीं गरुड तसा उडुनि पडे दुष्टीं, श्रीसैं न साहे. ३१८
उडउनि मुकुट नियुद्ध करि तया बहु धिक्कारुनि ताडी,
पाडी त्या प्राकाराखालें, नखदंताहीं फाडी. ३१९
ये फिरुनि सुवेळाग्रीं, त्यातें राम म्हणे, 'बापा! हें
साहस न बरें, तुझिया क्षेमें क्षेम जना या पाहें.' ३२०
लंकेला जेव्हां सैन्यें, तो कपिवर वेढी, गमला
कोट; म्हणे 'तीनं दिसति बरवे तरि बरवे ढीग मला.' ३२१
पाठविला सामार्थ प्रभुनें अंगद, भेटे अरितें,
प्रभुची आज्ञा कथि, अवतंस त्रिभुवन जीतें करितें. ३२२
'दशकंठा! देवर्षि पीडिले त्वां बहु अन्यायशतें,
बहु भाग्यें हि न तुज कुजना! जें स्वल्पें अन्या यश तें. ३२३
कामी कोपी लोभी प्राणी तो सेवुनि विषय मरे,
यांसम नसती, जरि गमती, हे उग्र दहन विष यम रे! ३२४
माजें हरिलें स्त्रीरत्न, मला वंदुनि दे मत्ता! तें,
कथिलें शरणागतरक्षण हें स्वव्रत मज मत्तातें. ३२५
प्राणादि त्वत्सर्वस्व रणीं व्यर्थ न खरचो, राहो,

---

१. पैलतीरीं. २. शब्दार्थ? ३ श्वेतछत्ररूप राजचिन्हावरून. ४. बाहुयुद्ध. ५. अन्वयार्थ? ६. तुरा (शिरसामान्य). *[रावणाच्या] वैभवास.

अथवा हो, जात्यश्वसुधैर्यं त्यजुनि, न खर, चोरा ! हो.' ३२६
प्रभुची आज्ञा कथि मारुतिचा अंगद वरवीर गडी,
त्या प्रकटुनि शक्ति हि अरिचा तो भंगद बरवी रगडी. ३२७
दशकंठ म्हणे, 'कोण प्रभुला कथिता पंथ वानर तूं ?
आम्हीं रतूं नीतिधर्मपथीं[1] स्वरसें अथवा न रतूं. ३२८
तातसखा[2] निंदिसि मज[2], मूढा ! तातघातका गासी,
त्यजु[नि] यशाहंसासि अपयशा देसि हात कागासी. ३२९
मातें[3] जा त्यातें भजसी [तूं] भाजन धिक्कारा हो.
जडा ! न करिसी प्रतीकार कां ? म्हणसी 'हिक्कां[4] राहो.' ३३०
तातसखा मज भज; मीं धर्में तात तुज पद नतातें,
देतों, त्या म्यां ही घालावें खालें न वदन तातें.' ३३१
तारेय म्हणे, "काळाजगर ग्रासितसे कीं अंधा !
संधा काय तुझी ? तूं नेणसि नयधर्मांच्या गंधा. ३३२
श्रीरामप्रभुच्या बहु गाती मुनि कविवर कृत्यातें,
मूढतमा ! तुज काय ठावुकें विषयनरकभृत्या[5] ! तें ? ३३३
'देतों देवी, पद नमुनि' असें कीं मत्ता ! वद, 'नाहीं
साधु,'[6] म्हणुनि घेसिल तूं देतां साधूंच्या वदनाहीं. ३३४
'लंके ! नाथ बिभीषण केला सुज्ञप्रभुनें बरवा,
भरवायास यशोमृत न धरीं या पा[पा]ची परवा.'" ३३५
कोपे दुष्ट, धराया सांगे, धरिति भुजद्वय चवघे;
अवघे हि उडुनि झाडुनि मारी, प्रासाद हि परिभव[7] घे. ३३६
प्रभुला वंदुनि अंगद अरिचें दुर्मत सांगे सारें,
आज्ञा प्रभुनें करितां, कांपे क्षोणी कपिबळभारें. ३३७
अगणित कपिबळ सहसा लंकाप्राकारावर वेघे,

---

१. धर्मनीतिपथ. २. वालीचा मित्र अशा मज. ३. उन्मत्त हो. ४. उचकी, हुंदका. ५. विषयरूप नरकाच्या चाकरा ! ६. असा. ७. राजवाडा हि खालीं आला.

वाटे त्या गुडराशिचे तें [1]नाकाराव [2]रवें घे. ३३८
मारिति राक्षस, कपिनीं वधितां, हाका, "यम हा मारी,
कपिरूप धरुनि; म्हणवील असी 'हा!' काय महामारी?" ३३९
चतुरंग कटक आणुनि भारी दशमुख तो युद्ध करी,
केवळ मदांध होवुनि जैसा सिंहासीं क्रुद्ध करी. ३४०
कपि राक्षस बहु [3]मेले, नटले बहु कबंध रणरंगीं,
अंगीं क्षतशत गणिति सुख, जसें कामुकजन रतिसंगीं. ३४१
वरिला सिंधु तदितरस्थानीं न टिकुनि रक्तनदीनीं;
कीं, लोकीं प्रायशः स्त्रियांचें मानस सक्त न दीनीं. ३४२
सेनापति प्रहस्त निवटिला, रावण केला भग्न,
प्रथमरणीं झालें चिंतेंत क्षणदाचरबळ मग्न. ३४३
मग त्या घननादें केले ते दाशरथी बद्ध रणीं,
'नर किति' म्हणे 'मजपुढें? क्षम मीं जो वज्री तद्धरणीं.' ३४४
[4]खचरी नेती श्रीस पुष्पकीं पतिवचनें वाहून,
'हाय!' म्हणे फणिपाशबद्ध ते पतिदेवर पाहून. ३४५
अतिमूर्छाव्याकुळ मानुनि ते मृत, शोकीं श्री पडली,
रडली, तेव्हां त्रिजटा चिंता हरि, हृदयीं [जी] जडली. ३४६
नेली पुन्हां अशोकवनीं श्री, आला पक्षीश तदा,
तत्रासें तें अहिकुळ पळतां मागें लक्षी शतदा. ३४७
पक्षिवरकरस्पर्शें झाले व्रण हि फणीसे नाहीं,
केले जयजयकार पहातां स्वस्थ धणी सेनाहीं. ३४८
पुनरपि राक्षसकदन करिति ते सुगळदाशरथि भारी,
मारी घटकर्ण रणीं सारी सेना, मागें सारी. ३४९
मूर्छित करुनि सुकंठासि धरी, विजयी होउनि परते,
परतेजस्वी तद्घ्राण हरी, 'हा! हा!' वदले पर ते. ३५०

---

१. नाके आरावो यस्य तदिति वळविशेषणं—**पंत**. स्वर्गापर्यंत गेली आहे गर्जना ज्याची (असें सैन्य). २. तुकडे. ३. हस्तदोष—**मले**. ४. राक्षसी.

मुरडे कुंभकर्ण तो, क्रोधें प्लवगभट गिळी सगळे,
तन्नादें खचलीं नगशिखरें, मग कपिबळ कां न गळे? ३५१
खंडुनि भुज चरण शिर प्रभुनें रणरंगीं लोळविला,
बोळविला परलोका, दशमुख तच्छोकें पोळविला. ३५२
देवुनि धैर्य पित्यातें मेघध्वान महामायावी,
प्रभुसह सर्व खिळी[1] कीं विजयश्री निजधामा यावी. ३५३
मारुति दशमुखबंधु निराळे[2] करुनि कश्मलें[3] गिळिले;
वर्षुनि खरतर शर गगनस्थें गुरें सर्व हि खिळिले. ३५४
जांबवदुक्तें मारुति गेला श्रीकैलासाजवळ,
आणी ओषधिशृंग गमे तें तत्पाणिस्थितकवळ. ३५५
त्या दिव्यौषधिगंधवहानें[4] उठले विशल्य सर्व,
पावुनि शिखर पुन्हां ये, न धरी अद्भुतकर्मीं गर्व. ३५६
त्यावरि करिती श्रीदाशरथी राक्षसबळकदनातें,
आठवलें [5]विधिनंदिकेश जें वंदले दशवदना तें. ३५७
मायासीता आणी दावी घननाद रणीं पापी,
दापी सर्वांसि, तिचें खड्गें प्रभुसमक्ष शिर कापी. ३५८
मोहुनि रडवी सुगळमरुत्सुतलक्ष्मणसह निर्माया[6],
जाय रणीं अमरत्वप्रद रथ होम करुनि निर्माया. ३५९
कळवि बिभीषण कपट, सलक्ष्मण शीघ्र विघ्न करि होमीं,
जो घननाद क्षोभोनि म्हणे, 'वधिन तुम्हां अरिहो! मीं.' ३६०
दारुण रण रावणि करि, परि तो प्रभुच्या अनुजें वधिला.
शक्र म्हणे, 'उद्धारिला कांटा माझ्या हृदयामधिला.' ३६१
सुतशोकाकुळ रावण गेला सीतेला माराया,
सचिव सुपार्श्व म्हणे, 'न वधावी स्त्री बरवी बा राया!' ३६२
मग चतुरंग कटक बहुकोटि प्रेषी प्रभुवरि अरि तो

१. मोहून टाकी. २. वगळून. ३. मूर्च्छेनें. ४. वायूनें. ५. पृष्ठ १४१, गीति ६८ पहा. ६. मायारहित रामाला.

त्यातें प्रभु करि भस्म, तृणातें जेंवि दवानळ करितो. ३६३
राक्षसदाराविलापलक्ष जे तया परिसवेना तें,
समरार्थ निघे, मुनि म्हणति भला जया[1]परिस वेनातें. ३६४
निश्चय करि नरकपि मारावे कीं आपण चि मरावें,
तद्दैव म्हणे, 'जें सेवटिलें चिंतित तें चि करावें.' ३६५
उत्पातांतें न गणी, गाँ[2]ठि तो प्रभुसीं अरि घाली,
त्याच्या तेजें भीति प्रभुच्या मात्र मनीं न रिघाली. ३६६
रावण होय प्रभुबंधूरीं उग्र शक्ति शिरकविता,
ती त्याचें कांपवि, जसि मु[3]निची रसिकाचें शिर कविता. ३६७
तेंव्हां हि उठवि मारुति [ आणुनि ] ओषधिगिरिशिखरातें.
वर्णुनि सांगे सर्व कवींस प्रभु कीं 'यश विखरा[4] तें.' ३६८
दशमुख रथीं, क्षितिवरि प्रभु, तें शक्रास पहावेना,
स्वरथ पाठवी तो कीं अरिचा उत्कर्ष सहावेना. ३६९
मातलि सारथि वंदी प्रार्थी, प्रभु शक्ररथीं* चढला,
पढला गुरुपाशीं तें प्रकटी; श[5]त्रु क्रोधें कढला. ३७०
प्रभु हि न आटे, अरि हि न आटे, शस्त्रांहीं नभ दाटे,
वाटे दुर्जय दशमुख समरीं, सुरहृदय भयें फाटे. ३७१
सप्त अहोरात्र महायुद्ध क्रुद्ध द्वेष्टा करि तो,
परितोष न होय सुरर्षींतें, वाटे प्रभुयश हरितो. ३७२
अरिचें शिर एकैक दहादां खंडी प्रभु शत पाडी,
फुटलीं जेंवि न तुटलीं उठलीं दश हि न मग विभु ताडी. ३७३
प्रभु निजशस्त्रास्त्रांची शक्ति क्षीणा ऐसें मानी*,
वचके, नच केली वाटे त्या शत्रुशरांची हानी*. ३७४
प्रकटे घटज प्रभुला सांगे 'रविहृदय'महाम[6]नुतें,

---

१. रावणापरि—पंत. २. गाठ घालणें=भिडणें; झुजणें. ३. वाल्मीकीची. ४. विश्वांस पसरा—पंत. ५. 'शत्रुविषयक क्रोधानें' असा अर्थ केल्यास समास होईल. ६. महामंत्रातें. * हस्तदोष—रथीं; मानीं; हानीं.

धनुतें इषुतें विजयश्री दे भेट धरुनियां हनुतें. ३७५
रविदत्तवरें ब्रह्मास्त्रधरें उर तीक्ष्ण शरें भेदी,
दे दीर्घस्वाप[1] तया प्रभु, कीं झाला चिर तो खेदी. ३७६
रावणतनु भूवरि, कुसुमांची वृष्टि प्रभुवरि पडली,
झडली चिंता, कार्यसिद्धि जी बहु अवघड ती घडली. ३७७
देवानीं दुंदुभि वाजविले, मेघध्वनि लाजविले,
आशांत स्तुतिनीं गाजविले, लोक यशें साजविले ३७८
अग्रजभार्या समजावी तो साधु बिभीषण यत्नें,
वाक्य 'ममाप्येष[2] यथा तव' हें ऐकवितां रघुरत्नें. ३७९
जें उत्तरकार्य आत्याचें करि साधु यथाविधि तें,
श्रुतिसी मान्या होय प्रभुची सत्कीर्तिकथा विधितें. ३८०
श्रीरामें बंधुकरें विधिनें करवुनि अभिषेक महें[3],
शरणागत सुपदीं बैसविला, सद्यश नुरवि श्रम हें. ३८१
यावच्चंद्रदिवाकर धरणी स्वकथा तावद्राज्य,
दिधलें बिभीषणासि प्रभुनें, स्वच्छ सुख यश प्राज्य. ३८२
मग मारुति पाठविला प्रभुनें श्रीस विजय सांगाया,
ती तृषिता, आळस सुरसिक तो भक्त करिल कां गाया? ३८३
श्री बोले, 'वत्सा! तुज द्यावें, परि योग्य नसे कांहीं,
अमृतघनाचा सत्कार घडे कोणा हि न सेकांहीं.' ३८४
मारुति म्हणे, "राक्षसी होत्या म्हणवित तुज वरदे! 'हा!'
याचा वध परम प्रिय माते! मज दासा वर दे हा." ३८५
देवी म्हणे, 'न माराव्या बा! बळहीना या दासी;
कासार सुके, उग्रत्व नसे मग दीना यादासी.' ३८६
मारुति वर्णी श्रीसीतेच्या पुण्याचारा शीला,
वारंवार नमस्कारी त्या पुण्याच्या राशीला. ३८७
प्रभुसि निरोप पुसे, श्री सांगे, 'श्रीचरण-पहायाचा

१. मरण; महानिद्रा. २. पृ० १२१ गीति ७१३ पहा. ३. उत्सवानें.

सुचिर मनोरथ आहे, त्यांच्या छायेंत रहायाचा.' ३८८
मारुति येवुनि कळवि प्रभुतें कळवी लंकेशाला,
ज्याच्या कीर्तिस चिंतामणिची बहुत चि शंके शाला. ३८९
न्हाणवुनि अळंकारवुनि नेतें देउनि शुचि शिबिकेला,
श्री भेटविलि प्रभुला जेणें स्व[य]शोरुचि शिबि केला. ३९०
प्रभु तीस म्हणे, 'समरीं तपलों निंदापरिहारा मीं,
स्वीकार तुझा अयशस्कर या होइल परि हा रामीं. ३९१
स्त्रीरत्न म्हणुनि यत्नें आला घेउनि तुज अरि कामी,
राहो देइल निद्रालु बरी सुखशय्या न रिकामी.' ३९२
याया स्वशुचित्वप्रत्यय ती करि दिव्य अनादि सती,
झाली कनकमूर्तिसी ज्वलनीं देवादिजना दिसती. ३९३
सुरमुनिगीता सीता दहनें प्रभुच्या अंकावरि ती
बसविलि, घनीं अकंपा शंपा असि किति शंका वारिती. ३९४
'शतमखसख दशरथ नृप भेटे तात,' असें शिव कळवी,
पळवी श्रम पितृसुतसंगम तो पतिमतिमतितें वळवी. ३९५
आलिंगी पुत्रांस सुनेस प्रेमें हुंगी शिर, ती
भेटि मुक्ति कीं नृपमति जैसी क्षौद्रीं भुंगी शिरती. ३९६
सीतेचें व्रत वर्णूनि म्हणे, "क्षिति बहुत चि रंजीव,
म्हणति प्रजा न तेजें करितां अरि न हुत 'चिरंजीव.'" ३९७
शक्र म्हणे, 'वर माग;' प्रभु ही, 'मृत उठिव' असें मागे;
अमृतवृष्टिनें उठवी बळ तें, वांटे निजलें जागे. ३९८
प्रभुला लंकानाथ कराया पूजनसेवा विनवी,
'नयनाहीं शोभवुनि मूर्तिची शोभा सेवावि नवी.' ३९९
प्रभु सांगे, 'सबळा सुगळाचें प्रेमें पूजन् बा! जें
माजें, भेटिव भरत शीघ्र, मी त्याच्या विरहें भाजें. ४००

१. बिभीषणानें. २. पतियुक्त जी कैकेया तिच्या बुद्धीला. ३. मधामध्यें. ४. 'दशरथ' हा कर्ता. ५. खोडलेला पाठ–सुसोत्थितसें वागे.

त्वां जोडुनि दिधली विजयश्री, भेटविली हे भूजा,
तिसरी सत्कीर्ति हि केली बा! रघुवंशाची पूजा.' ४०१
भक्त बिभीषण आज्ञा प्रभुची प्रेमें माथां वाहे,
सबळा सुग्रीवातें पूजी, परमसुखातें लाहे. ४०२
प्रभुला पुष्पकविमान दे, जें रंजवि नाका मग तें,
कां त्या लोकेशस्तुतचरणा रंजविना कामगतें[1] ? ४०३
प्रभुसंकल्पें पुष्पक गगनीं शिरला खगवरसा जो,
कां न गगनमणिसा तेजस्वी तो कामगवरें[2] साजो? ४०४
अत्यद्भुत रणभूमि श्रीतें दाखवुनि श्रीरामें
नामें स्वपरभटांचीं कथिलीं, वर्णुनि कर्मं धामें. ४०५
श्रीस प्रभुनें सेतु दाविला, जो रुंद दहा गावें,
शंभर गांवें लांब, जगें ज्या पावोनि महा गावें. ४०६
कथिलें, 'नळ या झाला लाभा विजयधनाच्या रचिता,
या यमदंडावांचुनि वारिता तो न अनाचार चिता.' ४०७
देवी म्हणे, 'पसरला वाटे क्षुधित महाभुजग मला,
खळसंहर्ता मन्मातेचा उग्र महाभुज गमला.' ४०८
प्रभुच्या विजयश्रीलाभाचा हेतु सेतु देवीतें
बहुमत झाला, तद्दर्शन जें अमृत तसें सेवी तें. ४०९
राम म्हणे, 'सुंदरि! इकडे हें सिंधूत्तरतीर पहा,
या स्थानीं मज भाग्यें भेटे मूर्त विजय वीरप हा[3]. ४१०
झालों स्थिर जो होतों जैसा चंचळ पारा वारा,
भेटवि मज याच्या चि युक्तिचा अंचळ[4] पारावारा[5].' ४११
मग ऋष्यमूक दावुनि सांगे, "सजले मदसु गळाया,
तों मारुति मज भेटवि येथें सुयशःपद सुगळा या. ४१२
रडविति मज दाखविले सुगळें दयिते! जे तव नग ते.
वदलों 'मजविण वांचसिल कसी जानकि! खळभवनगते!?' ४१३

१. स्वेच्छ गमनानें. २. वर=श्रेष्ठ. ३. बिभीषण. ४. पदर. ५. समुद्राला.

तुज चिंतित या प्रस्रवणनगीं होतों मीं घनकाळीं,
दिग्वदनें भिवविति, बहु भासे तव विरहीं मन, काळीं. ४१४
ती किष्किंधा सुदति ! पहावी, तीतें पहिला वाळी,
आतां माझा हा सुगळ सखा धर्में न्यायें पाळी." ४१५
स्वविमानीं आणविली प्रेमें प्रभुदयितेनें तारा
दारा कपियूथपतीच्या ही सुगुणा रम्याकारा. ४१६
पंपा सरसी दावी प्रभु, जें आपण विरहव्यथितें
तत्तीरीं अनुभाविलें होतें, श्रीस सविस्तर कथि तें. ४१७
आश्रम दावी, सांगे केला शबरीनें स्वादर तो;
कीं, निजभजनीं घेउनि विश्वप्रेमसुधास्वाद रतो. ४१८
प्रभु उग्रकबंधकथाकथनें श्रीतें आधीं भिववी,
मग तन्मोक्षतदुक्तसुकंठप्राप्तिवर्णनें निववी. ४१९
पाहुनि नमुनि म्हणे प्रभु, 'देसी सद्गति गोदावरि ! ती
जीतें श्रवण करुनि संसारीं परमा मोदा वरिती.' ४२०
सीता नमुनि म्हणे, 'भक्त तुझा मोदा वरि, परमेला
तुज भजलें, त्या पुण्यें माते ! गोदावरि ! पर मेला.' ४२१
गोदेतें प्रेमें दाशरथी ते तोकापरि पुसती,
म्हणती, 'त्वद्भक्ता संसारीं देतो कांप रिपु सती !' ४२२
सीता पंचवटीदलशाला मुरडुनि बहुदा पाहे,
शून्य निरखितां वट, अश्रु तिच्या नयनांतुनि बहु वाहे. ४२३
सुगळ म्हणे, "सति ! केला तृप्त स्वपितृसम निवापानें,
हें यश म्हणतें सुश्रोत्यांतें सकळ 'मम निवा पानें.'" ४२४
श्रीराम म्हणे, 'या ताताचा त्या ताताचा सम जो,
तो शतदा स्मरतो स्नेह मला तुज सत्य सख्या ! समजो.' ४२५
जाणें त्या गृध्रेंद्रीं प्रभुचा प्रेमा बाढ, विमान

१. काळीं दिग्वदनें. २. पितृतर्पणानें. ३. श्रवणानें. ४. जटायूचा.

[1]तन्न्यग्रोधा उजवें घाली, जातां वाढवि मान. ४२६
घटजादिमहर्षींचे जे ते आश्रम दावुनि नमवी,
शमवी विरहश्रम सुकथांहीं सीतेचें मन रमवी. ४२७
अन्याश्रम वंदुनि सीतेला प्रभु सांगे 'नमन करीं.'
हें यश गाती साधु पडाया गर्वांच्या न मन करीं. ४२८
प्रभु कथि, "म्हणे श्रिता जो 'मोहा' मित्र 'कूट' न गजा ये
भक्षूं हरि, अहिस नकुळ, तो हा चित्रकूट नग, जाये ! ४२९
या श्रीगंगायमुना, यांचा विश्वस्तुत संगम हा,
भंग महापापाचा करि, दे यन्मारुत भंग[2] महा. ४३०
ती श्रीमती अयोध्या दिसती, सीते ! नमुनि पहावी,
मत्पूर्वजदयिता[3] सुरगीता तीस सुदृष्टि वहावी." ४३१
सुगळ बिभीषण कपियूथप ते देखति नभीं उडूनीं,
द्विजराजपुरी[4] अवलोकावी सादर जेंवि उडूनीं[5]. ४३२
राहे प्रभु प्रयागीं प्रेमें नमुनि भरद्वाजातें,
सांगुनि वृत्त प्रमुदित करि त्या जेंवि पित्या आज्यातें. ४३३
तेथें भरत गुह हि निजभक्त श्रीरामें आठविला,
'आलों' ऐसें कळवायाला पवनतनुज पाठविला. ४३४
कपि शृंगिबेरपाळ गुहातें भेटे, मग भरतातें,
तो सुख पावे जें प्राणांतीं अमृतसरीं भरता तें. ४३५
प्रभु वनवासव्रत प्रयागीं सांग संपवी, ऋषितें
नमुनि निघे गुहभरतलोचनें तृप्त कराया तृषितें. ४३६
गुह चातकसा, पुष्पक घनसा, भेटि प्रभुची वृष्टि,
सृष्टि सुखानें दाटे, वाटे वत्स चि तो प्रभु गृष्टि[6]. ४३७
भारी प्रभुपददर्शननमनप्रेमाचा भर, भरतें

१. त्या जटायूच्या वटवृक्षाला. २. तरंग-पंत. ३. दयिता=आवडती. (रामाचे पूर्वज अयोध्यापति च असल्यामुळें 'दयिता' हा श्लिष्ट शब्द योजिला आहे). ४. चंद्रनगरी. ५. नक्षत्रानीं. ६. सकृत्प्रसूता गाय.

गणिलें मंदगति विमान मनीं, जन्हि धांवे भरभर तें. ४३८
प्रेमळ गुरु जननीजन सचिव द्विज पौर सखे दास
भरत अधिक विरहीं बहु पावे शिशु औरस खेदास. ४३९
कविस गमे, करि लोकवृंद तें चातककुळ 'आ' सारें,
प्रभुघन तृप्त करी निववी जें दर्शन त्या ओसारें. ४४०
पुष्पक महिवरि उतरे, भेटे प्रभु सानुज भरतातें,
प्रथम पादुकांसह उतरुनि घे जो दिधला भर तातें. ४४१
नमुनि वसिष्ठप्रमुख गुरुजन प्रभुनें बहु हर्षविला,
आलिंगुनि आत्मशिरीं प्राज्य प्रेमजळें वर्षविला. ४४२
वंदुनि माता तात सचिव ही पौर वृद्ध गौरवि तो,
भेटुनि पाहुनि सर्व जन, असें प्रभुयश शशिगौर वितो. ४४३
सुगळ बिभीषण हें भेटविलें शत्रुघ्ना भरतातें,
ते त्या बहु मानिति, ज्या न रुचे दिधला भूभर तातें. ४४४
पुष्पवृष्टि देवांहीं केली, वाजविलीं बहु वाद्यें,
आद्यें विधिच्या जग हर्षविलें वेदांतप्रतिपाद्यें. ४४५
नंदिग्रामीं[2] उकलवुनि जटा अनुज सचिव न्हाणविले,
जाणविले प्राण बहिश्चरसे सुगळादि हि आणविले. ४४६
स्नानें करवुनि धरवुनि भूषा पूषान्वयवररत्नें[3],
मज्जन करुनि भूषणें वरिलीं, तातें दिधलीं प्रेत्नें. ४४७
कौसल्येनें जैसी सीता तसि गौरविली तारा,
थारा केल्या यूथपदारा स्वंबरभूषणभारा. ४४८
प्रभुसि सहाय मिळविले होते देवांपरि समरा जे,
ते तेजस्वी सुंदर दिसले, न प्रभुहरिसम राजे. ४४९
करिवरि हरिसे गमले कपि जे बसणार नगांवारि ते,
सौम्य न होतां त्रासें होते तारि काय न गांव रिते ? ४५०
प्रभुचा प्रवेश साकेतीं जो तो प्राणाचा देहीं,

१. धारासंपातें–पंत. २. हस्तदोष–प्रामी. ३. सूर्यवंशश्रेष्ठानें. ४. नवा.

पौरगृहीं च न केवळ सुख तें विधिच्या हि भरे गेहीं. ४५१
सुगळा बिभीषणाला देती रविं बरवि प्रासाद,
सुखसिद्धि पुरीं स्वर्गीं जसि दे गति वरविप्रा साद. ४५२
भरताज्ञेनें कपिवर सुगळें पाठविले जे तूर्ण,
ते कनककलश घेउनि आले चतुरंबुधिजलपूर्ण. ४५३
पंचशतनदीसत्तीर्थजळें कनकघट भरुनि भरता,
कपिनीं निवेदिले अभिषेका अंगीकारुनि नरता. ४५४
त्रिजगदभ्युदयकरसुमुहूर्तीं विश्वहितपर महर्षी
वसिष्ठादि करिति श्रीरामीं अभिषेक परमहर्षी. ४५५
साकेतीं दिव्यकुसुमवृष्टि त्रिदशवरानीं केली.
दिव्यें वाद्यें नृत्यें गानें बहु वाढे श्रीकेली. ४५६
सिंहासनीं निरखिला ज्यांहीं श्रीराम श्रीयुक्त,
मुक्त प्राणी ते झाले हें तत्वज्ञांचें उक्त. ४५७
शक्र अनर्घ्य किरीट सन्मुक्ताहार पाठवी, त्यातें
स्वीकारी प्रभु, निजपद देता सहज आठवीत्या तें. ४५८
तो देतां हार प्रभुनें, श्री त्यातें हस्तीं वाहे,
मारुतिकडे मायसी प्रेमें स्वामीदेखत पाहे. ४५९
श्रीराम म्हणे, 'द्यावा वाटे ज्यासि तया दे हातें.'
तेणें मारुतिच्या शोभवि ती मूर्तदया देहातें. ४६०
हार न तो त्या दासासि मिळे मूर्त प्रसाद धवळ,
जवळ प्रेमें बाहूनि दिला कीं मातेनें कवळ. ४६१
सुगळ बिभीषण यांसि मिळाली पूजा जी विततां तें.
तेंवि प्रेम अपत्यार्थ जसें धरिजे जीवित तातें. ४६२
तात तसा जनक श्रीरामें केला प्रमुदित, रमला
न समाधिसुखांत, म्हणे, 'सगुण श्रेष्ठ; नको इतर मला.' ४६३
आधिव्याधिजरादारिद्र्यव्यसनपंचताक्लेश-

१. सुख. २. हाक, आवाज. ३. देवश्रेष्ठानीं. ४. विस्तृत अशी.

लेश प्रभुच्या राज्यांत नसे, संपन्न सुखी देश. ४६४
व्याळ व्याघ्र चोर दुर्भिक्ष प्रभुच्या राज्यांत नसे,
जन सेविति शिशुसे चि प्रेमें प्रभुचे सुगुण स्तनसे. ४६५

## उत्तरकांड

घटज कथि, "पुलस्त्यसुत विश्रवा, तत्सुत दशमुखनामा,
तदनुज घटकर्ण बिभीषण हे कैकस्यात्मज, रामा ! ४६६
दुश्चर तप दशवदन करी, तो करुनि नवशिरश्छेद,
'दे दर्शनवर' विधिस म्हणे; हा न धरी कांहीं खेद. ४६७
ब्रह्मा भेटे अयुताब्दांतीं दशमशिराच्या होमीं,
म्हणे, 'इष्ट वर माग, पुरवितों काम, महाबाहो! मीं.' ४६८
नर वानर तुच्छ असें मानी, देवाहितकाम[1] धरी,
मागे सर्वावध्यत्ववर, द्रुहिण हि तें मान्य करी. ४६९
देवानीं घटकर्ण भुलविला, यास्तव निद्रा मागे,
साधु बिभीषण धर्मवर वरी, विधिच्या पायां लागे. ४७०
अग्रज वैश्रवण तयाची घे वरमत्त बळें लंका,
पीडी जग, मोडी मर्यादा, तिळ ही न धरी शंका. ४७१
हित कथितां बहु खवळे, जैसा दंडस्पर्शें साप;
भंगुनि धनदा, तत्पुष्पक घे, तों दे दुष्टा शाप. ४७२
मर्कटमुख अवलोकुनि, आज्ञा मोडी, हांसे पापी,
'वानर बुडवितिल तुला,' ऐसें नंदिकेश ही शापी. ४७३
स्तंभित पुष्पक होतां उपडूं लागे श्रीकैलास,
प्रभु तद्भुज चिरडी स्वांगुष्ठें दडपुनि त्या शैलास. ४७४
दशशत वर्षें गाजवि रडतां दशकंठ समस्त वनें,
मुक्त करी प्रभु जो सर्वत्र प्राज्यदय सम स्तवनें. ४७५
धर्षण करितां वेदवती[2] ही मत्ता दे शापाला,
होय [illegible]वीत्या कारि तो सर्वां देशा पाला. ४७६

---

१. देवांच्या अकल्याणाची इच्छा. २. कुशध्वजमुनींची कन्या.

अनर्थें भंगी अनरण्या, ज्या दिव्य हि विषय न मोही,
'मत्कुलज राम वधिल तुज' असें शापी मत्ता तो ही. ४७७
किति राजे भंगातें वरिती, किति सामातें करिती,
कार्तवीर्य अर्जुन वाळी हे दोघे तन्मद हरिती. ४७८
यमलोकीं रावण युद्ध करी, काळ धरी दंडातें,
'मद्वर अमृत नसो' या वचनें विधि वारी चंडातें. ४७९
जे प्रबळ असुरवर सामर्थ्यें त्यांसीं करितां युद्ध,
विधि 'सख्य करा' ऐसें सांगे, करि शांत अतिक्रुद्ध. ४८०
वरुणसुतांतें रावण भंगी समरीं कृतयत्नांतें,
दिग्विजय करुनि लंका पावे, हरुनि [1]स्त्रीरत्नांतें. ४८१
धर्में स्नुषा परंतु न चित्तीं कांहीं आणी पाप,
रंभेसि बळात्कारें भोगी, नळकूबर दे शाप. ४८२
स्वर्गीं दशवदन त्रिदशांसीं युद्ध करी बहु भारी,
त्या समरीं घननादें धरिला वृत्रनमुचि[2]जंभारी. ४८३
सोडविला विधिनें तो; रामा! बा! हें मागें जालें;"
घटज म्हणे, "सद्यश तुज समरीं त्यास हि मारुनि आलें. ४८४
घोर [3]अनुज, दशवदन घोरतर, घनरव घोरतम रणीं,
जेणें भासविले अमर जसे निजले घोरत [4]मरणीं. ४८५
सानुज तूं विष्णु चि न जगाचें करिता विष्णुसम हित,
विधिस शिवास हि झालासि, न बा! केवळ जिष्णुस, महित."
पूजुनि सुगळ बिभीषण सबळ स्वस्थाना पाठविले,
तत्समरश्रम उपकार बहु श्रीरामें आठविले. ४८७
प्राकृतजननिंदाश्रवणें [ती] साध्वी अंतर्वत्नी
वाल्मीकिच्या आश्रमीं त्यजिली, यश रक्षाया पत्नी. ४८८
प्रभुचे कुश लव पुत्र; हर्षवी सत्सुतजन्म [5]तिघांस.

१. नाग, गंधर्व, देव, दानव व महर्षि यांच्या कन्या. २. इन्द्र. ३. कुंभकर्ण—पंत. ४. भासले—पंत. ५. माता, पिता आणि पितर यांस.

भरवि गुणामृताचे सर्वा जीवा सन्मति घांस. ४८९
यमुनातटवासिद्विजवृंदें परम उपद्रव कथिला,
शत्रुघ्नें लवणासुर समरीं प्रभुच्या तेजें मथिला. ४९०
कोटित्रय गंधर्व हि भरतें न उठायासि निजविले,
ज्या मत्ताहीं गल्ल जनाचे, रीति त्यजुनि, भिजविले. ४९१
प्रकृतिकथा[१] किति? धर्मन्यायें बहु निववि श्वानातें,
प्रभुचें तोका जेंवि पित्याचें दे शिव विश्वा नातें. ४९२
प्रभु हयमेध करी त्यांत रची जांबूनदकनकाची[२]
जनकाची कन्या, देखति जे न[३] म्हणति ते जन काची[३]. ४९३
श्रीरामचरित त्या हयमेधीं गाती कुश लव दोघे,
प्रभु हि म्हणे, 'कर्णयुगा![४] सर्व ज्ञाता कुशल वदो, घे.' ४९४
वाल्मीकिच्छात्र स्वसुत असें निजसारूप्यें कळलें,
वळलें प्रभुचें मन अपवादें जें वरि होतें मळलें. ४९५
आदिकवि श्रीवाल्मीकि म्हणे, 'त्यजली कां हे शुद्धा?
कैसें होतें साध्वी होती जरि या त्यागें क्रुद्धा?' ४९६
राम म्हणे, 'स्वामी! हें जाणें, त्यजिली अपवादानें;
करवा दिव्य, पुन्हा इष्टाच्या सुरतरु लपवा दानें.' ४९७
श्री वदली, 'जें व्रत न विटविलें जरि माते! महि! म्यां तें,
घे पोटीं, गावुत, जाणति जे गरिमा[५], ते महिम्यातें.' ४९८
ऐसें सांजलि सीता वदली, तों चि वसुमती चिरली,
स्थिर लीला गाया विश्वें ती तीमाजि सती शिरली. ४९९
कोपे प्रभु धरणीवरि, तत्वस्मरण करुनि दे धाता,
'ताता! तूं विष्णु, श्री सीता त्रैलोक्याची माता.' ५००
अभिषेचुनि आठां पुत्रांतें दिधलीं राज्यें आठ,

---

१. प्रजेची गोष्ट कशाला? २. सुवर्णविशेषाची. ३. कचीं न=खरीखुरी जानकी. ४. ज्ञाता वदो [ कीं ] 'कर्णयुगा! सर्व कुशल घे.' ५. मोठेपणा.

पाठ पुरविते सेवारीची[1], ज्यां श्रुतिशास्त्रें पाठ. ५०१
द्विजशिशु उठवी, नुरवी कोठें वार्ता अन्यायाची,
धन्या याची रीति, न कोणी याचक अन्या याची[2]. ५०२
सर्व प्रजा विमानकोटिनीं संतानकलोकातें,
शोकातें वारुनि, ने, सुखवी तात जसा तोकातें. ५०३
स्वजनत्राण कराया ठेवी भक्तसुचिरजीवि[3] वर,
कीर्ति हि, कळिस न दे, देवुनियां सौख्य रुचिर, जी विवर. ५०४

(गीतिवृत्त)

रामात्मजें मयूरें श्रीरामपदांसि हात जोडून,
'रामायणपंचशती' वाहिलि सप्रेम वचकें[4] सोडून. ५०५

इति श्रीरामनंदनमयूरविरचिता श्रीरामायणपंचशती संपूर्णा।

कै. ... ना. परांजपे
यांचे स्मरणार्थ
कुटुंबीयांकडून भेट

प्राचीन ग्रंथ संग्रहालय ...
2366
ग्रं. क्र. 22001
संग्र. शाखा

REFBK-0022449

REFBK-0022449

१. खोडलेला पाठ—सर्वांरीचे. २. प्रार्थी—पंत. ३. भक्तांला चिरंजीव करणारा राम. ४. भय.